[illegible] १६ वें [illegible]

शील परीक्षा.

साठ वर्षांपूर्वी—

माई कमळावती—

लेखक

[illegible]—मावळे [illegible] एल्‌एल्. बी; प. गळ;
आणि [illegible] बी. ए. एल्‌एल्. बी;

प्रकाशक
[illegible] मंडळी
गिरगाव—मुंबई.

किंमत [illegible]

सुवाङ्मयेन गीतेन युवतीनां च लीलया । यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्ताथवा पशुः ।

सरसवाङ्मयरत्नमालेचें १६ वें रत्न.

शील परीक्षा

अथवा

राईचा पर्वत.

लेखक.

कै० प्रभाकर अनंत माळवे
एम्‌ए., एल्‌एल्‌. बी.

प्रकाशक

तात्या नेमिनाथ पांगळ

प्रोप्रायटर—सरसवाङ्मयप्रसारक मंडळी—गिरगांव—मुंबई.
डॉ. भालचंद्रसमोर, रा. भांडारे यांचा दगडी बंगला, चर्नीरोड.

मुद्रक

रा. रा. केशव रावजी गोंधळेकर, 'जगद्धितेच्छु प्रेस'
शनवार पेठ, ४३२ पुणें.

वर्ष तिसरें. आगष्टचा अंक. | किंमत एक रुपया. | सन १९१७. आवृत्ती पहिली.

प्रकाशकाचे दोन शब्द.

———:०:———

अगाऊ जाहीर केल्याप्रमाणें सुप्रसिद्ध नाट्याकलानिपुण किर्लोस्कर संगीत मंडळीमार्फत लौकरच रंगभूमीवर येणारें प्रस्तुतचें नाटक आम्ही आमच्या वाचकांना सादर करीत आहोंत. गुर्जरवाङ्मयलेखनपटु व सुप्रसिद्ध विद्वान वकील श्रीयुत **रमणभाई महिपतराम नीलकंठ** बी. ए. एल् एल्. बी— आमदाबाद यांचे ' **राईनो-पर्वत** ' हें नाटक गुजराथी साक्षर समाजास अत्यंत आवडलें असून, गुर्जर रंगभूमीवरहि तें लोकप्रिय झालें आहे. अशा लोकप्रिय नाटकाचेरूपांतर कै. माळवे यांनीं मराठींत केलें आहे. या राजकारणरहस्यात्मक नाटकांत " केवळ दानत चांगली ठेवल्यानें रंकाचा राव कसा होतो " हें दर्शविलें असून, नायिकाची उदात्तता चांगलीच व्यक्त झाली आहे. सारांश, हें नाटक कै. माळव्यासारख्या कसलेल्या लेखकानें लिहिलें आहे व किर्लोस्करसारखी सुप्रसिद्ध नाटक मंडळी लौकरच स्टेजवर आणणार आहेत, एवढें कळविलें म्हणजे या नाटकाच्या उत्कृष्टपणाविषयीं अधिक लिहिणें नकोच. फक्त कै. प्रभाकरराव माळवे हे, ही आपली कृती प्रसिद्ध होऊन रंगभूमीवर खेळत असलेली पहाण्यास दुर्दैवानें आपणांत उरले नाहींत, याबद्दल अत्यंत वाईट वाटतें; पण दैवगती विचित्र आहे, तेथें मनुष्याचा काय पाड ! असो. हें उत्कृष्ट नाटक आमच्या रसिक वाचकांना आवडेल अशी आम्ही आशा बाळगतों. कै. प्रभाकरराव माळवे यांचा अल्प परिचय व्हावा एतदर्थ त्यांचें अल्प चरित्रहि फोटो सोबत जोडलें आहे.

ता. १५-११-१७.
गिरगांव-मुंबई.

आपला नम्र
तात्या नेमिनाथ पांगळ.



कै. प्रभाकर अनंत माळवे. M. A. LL. B.

हायकोर्ट वकील—अहमदनगर.

जन्म. १८९०

निधन. १९१७

कै० प्रभाकर अनंत माळवे, एम्.ए., एल्‌.एल्. बी.

हायकोर्ट वकील—अहमदनगर.

प्रभाकरराव यांचा जन्म ता. २० ऑगस्ट १८९० रोजीं पुण्यास झाला. हे लाड सोनार जातीपैकीं पहिले ग्र्याजुएट होत. यांचे वडील रावसाहेब डॉ० अनंत संतराम माळवे हे सीनियर ग्रेड स. अ. सर्जन आहेत. हल्लीं ते प्रकृतीनादुरुस्तीमुळें अहमदनगर येथें रजेवर आहेत. हे कट्टे सुधारणावादी, गायनशास्त्रनिपुण व स्त्रीशिक्षणाचे चाहते असल्या-मुळें त्यांनीं प्रभाकरराव यांना उत्तम शिक्षण दिलें. प्रभाकरपंत हे १९११ त एम्. ए. व १९१५ त एल् एल्. बी. पास होऊन त्यांनीं हायकोर्ट वकिलीची सनद घेतली व वडिलांच्या इच्छेनुरूप अहमदनगर येथें वकिली आरंभिली. शाळेंत असतांना ते नेहमीं अभ्यासांत दक्ष असत. कॉलेजमधील प्रि. कॉव्हर्टनप्रभृति शिक्षकांचें त्यांच्यावर अत्यंत प्रेम होतें. एम्. ए. झाल्यावर प्रॉव्हिन्शियल सिव्हिल सर्व्हिसमध्यें दाखल होण्याचा त्यांचा प्रथम मानस होता; पण केवळ समाजसेवा करण्याच्या उदात्त हेतूमुळेंच त्यांनीं तो विचार बदलला. वकीलींत नीट जम बस-तांच त्यांनीं आपलें लक्ष्य प्रथम वाङ्मयसेवेकडे वळविलें व मनोरंजन, नवयुगप्रभृति मासिकांतून लेखन सुरू केलें. त्यांना गुजराथी, उर्दु, हिंदी, संस्कृत, मराठी व इंग्रजी अशा एकंदर सहा भाषा चांगल्या अवगत होत्या. त्यांचा-आपले एकुलते एक कन्येस उच्च शिक्षण देऊन तिला "बेझंटबाई किंवा सरोजिनी नायडू" करण्याचा-मानस होता; पण दुःखाची गोष्ट ही कीं, ती इच्छा पूर्ण झाली नाहीं. कारण, प्लेग संपला ह्मणून ते गांवांत रहावयास येणार तोंच प्रथम एकाएकी त्यांची पत्नी, नंतर मुलगी व १६-२-१७ रोजीं स्वतः ते नगर येथें प्लेगला बळी पडले ! सारांश, प्रभाकरराव यांचें देहावसान अत्यंत उद्वेगकर झालें. रावसाहेब अनंतराव यांचेवर व त्यांचे पत्नीवर वृद्धपणीं मोठा गहजब कोसळला; पण जग-रहाटीकडे पाहून त्यांनीं आपलें दुःख आवरावें अशी त्यांना आमची नम्र सूचना आहे. प्रभाकररावांनीं प्रस्तुत ग्रंथाबद्दल प्रकाशकाकडून व नाटक मंडळीकडून मिळणारे पैसे सार्वजनिक कार्यीं खर्च करावे, अशी आपले वडिलाजवळ इच्छा व्यक्त केली आहे. ती पूर्ण करण्याचा त्यांच्या वडिलांचा निश्चय आहे. ईश्वर प्रभाकररावांचे आत्म्यास शांति देवो !!!

शीलपरीक्षा अथवा राईचा पर्वत.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

[स्थळः—किसलवाडी. जादूची तयारी करीत असलेली जालका अंधारांत प्रवेश करते.]

जालकाः—(स्वगत) मंत्रसाधन करणें यांत कांहींच नाहीं. पण त्या वेळीं रायजीला दूर कसा ठेवावा हाच प्रश्न आहे. तो जवळ राहिला तर सर्व डाव फसेल. कांहीं तरी बतावणी करून त्याला लावून दिला पाहिजे. (हांक मारते) रायजी !

[हातांत पुस्तक घेऊन रायजी प्रवेश करतो.]

रायजीः—जालका, मला बोलावलेंस काय ? मी आपल्या खोलींत वाचीत बसलों होतों, तेथें मला तुझी हांक ऐकूं आल्यासारखें वाटलें.

जालकाः—वाचायला तुला हवा तेवढा वेळ मिळतो पण बाग संभाळायला मात्र मुळींच मिळत नाहीं ! तुझ्या बेपर्वाईनें या सुंदर बागेची काय खराबी होत चालली आहे पहा ! या अर्धविकसित कलिका पाण्यावांचून म्लान होऊन तुझ्याकडे जणूं तिरस्कारानें पहात आहेत. तसेंच, इकडे जरठाच्या पाशांत सांपडलेल्या तरुणीप्रमाणें कांटेरी झुडपांनीं गुरफटलेल्या या बिचाऱ्या नाजुक वेलींची स्थिती झाली आहे त्याची तुला शुद्धिच नाहीं !

रायजीः—मग तूं मला पुस्तकें कशाला आणून देतेस ? माळ्यांनीं पुस्तकांपेक्षां झाडांकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे हें मला कबूल आहे. पण माझ्यानें हें असलें माळ्याचें काम व्हावयाचें नाहीं हें मीं तुला मागेंच सांगून टाकलें आहे. केवळ तुझ्या मर्जीखातर मी झारी आणि खुरपें हातांत घेतों.

जालका:—कां बरें? आणखीहि एक कारण आहे.

रायजी:—हो, तूं मला आणून दिलेल्या एका पुस्तकांत असें लिहिलेलें होतें, कीं, माळी आणि प्रजापालक या दोघांची वृत्ति सारखीच असते. दोघेहि जोपासना करतात, फळ घेतात, मनापासून ममता करतात, आणि प्रसंग पडल्यास उच्छेदहि करतात. त्यावरून मला वाटलें, कीं, माळ्याच्या कामांतहि आत्मोन्नति शक्य आहे. पण उपमेच्या असल्या पोकळ मोठेपणानें कोणालाहि महत्त्व प्राप्त होत नसतें. ईश्वर कोणत्या प्रकारें सृष्टि निर्माण करतो हें सामान्य जनांना समजावून सांगतांना कित्येक प्रसंगीं कोळी आणि त्याच्या जाळ्याची उपमा देतात, पण एवढ्यावरून कोणी त्या किड्याची पूजा करीत नाहींत!

जालका:—असेल, आतांच या वादविवादावांचून कांहीं अडलें नाहीं. जा, दिवा घेऊन ये. रायजी जातो. रायजीला थोडेंबहुत कळणारच. तेव्हां तो येईपर्यंत मी तयार तरी होतें. पाहीना कां तो हीं वस्त्रें!

(वस्त्र धारण करते.)

रायजी:—(दिवा घेऊन प्रवेश करून) घे, हा दिवा आणला. (जालकेस पाहून आश्चर्यानें) जालका, काय हें! आज हें कसलें सोंग घेतलेंस? काळें वस्त्र काय पांघरलीस, केंस काय मोकळे सोडलेस, गळ्यांत अस्थींची माळ काय घातलीस, हातांत दंड कसला घेतलास, आहे तरी काय? तूं नेहमीं गूढ वर्तनांतच आनंद मानतेस हें कांहीं खोटें नाहीं.

जालका:—तर मग तुझ्यापासून कांहींच गुप्त ठेवीत नाहीं. ऐक. तुझ्या निष्काळजीपणामुळें सुकून गेलेल्या रोपांना पुनः सजीवन करण्याचा मी प्रयत्न करीत आहें. पहिला प्रयोग या सुकलेल्या शेवंतीवर करून पहातें. उद्यां सकाळीं तुला काय तो चमत्कार दिसेल! पण—या चौकटींत हा काळा पडदा मला बांधू लाग पाहूं! (दोघे मिळून पडदा बांधतात.) तूं आतां जा. मनुष्याच्या डोळ्यादेखत कोणत्याहि प्राण्यांत प्राण प्रवेश करीत नाहीं. मंत्राच्या सामर्थ्यानें मी आपल्या नेत्रांस अदृश्य करूं शकेन. पण तूं येथें रहातां उपयोगी नाहीं. जा. उगीच कांहीं तरी विचारित उभा राहूं नकोस.

रायजी:—मी जातों. पण तुझ्या या अनुष्ठानाची हकीगत ऐकल्या-

वर मला झोंप तरी कशी येईल ? खोलींत जाऊन उगीच जागत बसणें मला नाहीं आवडत !

जालका:—(विचार करून) बागेच्या दक्षिणेस रोज रात्रीं जनावरें येऊन नासाडी करतात आणि विशेषें करून चाफ्यांचा सुगंध त्यांना सहन होत नाहीं म्हणून कीं काय, तींच झाडें त्यांच्या डोळ्यांत सलतात. तर तुला झोंप येत नसल्यास तिकडे जाऊन राखण करीत बैस.

रायजी:—तीरकमठा घेऊन जातों आणि दूर लपून बसतों म्हणजे तें जनावर आयतें सांपडेल.

जालका:—ठीक युक्ति काढलीस, जा. (रायजी जातो.) तीं माणसें उत्तरेकडच्या वाटेनें येणार आहेत तेव्हां रायजी दक्षिण बाजूस तिरंदाजी करीत बसला तरी हरकत नाहीं. माझी बहुतेक तयारी झालीच आहे. सुकलेल्या शेवंतीस हिरवी गार करून दाखविली, कीं, माझ्या मनोरथाच्या सिद्धीस सुरवात झालीच. (काळ्या पडद्याच्या मागें जाते.)

प्रवेश २ रा.

[स्थळ:—किसलवाडी. हातांत तीरकमान घेऊन दगडावर बसलेला रायजी प्रवेश करतो.]

रायजी:—या रात्रीच्या अंधकारापेक्षांहि गाढ पटल माझ्या आयुष्याच्या सभोंवतीं पसरलेलें आहे. मी कोण आहे, जालका कोण आहे, तिच्याजवळ मुबलक द्रव्य असून ती माळणीचा धंदा कां करते, मला वाचण्यासाठीं पुस्तकें कां आणून देते, माझ्या धनुर्विद्येच्या नादास उत्तेजन कां देते, माझ्या स्वारीसाठीं खंदे घोडे कां बाळगते, आणि इतकें असून मला माळ्याचेंच काम करावयास कां लावते, आणि मीहि तिच्या इच्छेप्रमाणें कां वागतों ? या सर्व गोष्टी या अंधकारापेक्षांहि अधिक अगम्य आहेत. (उठून) पण मानवी जीवनांत अगम्यता नाहीं कोठें ! तेजोमय आत्म्यास या मांस-अस्थिंच्या पिंजऱ्यांत कोंडून कां ठेवलें, प्रबल परंतु दुष्प्राप्य अशा अभिलाषांनीं संसार कां भरला आहे, कार्यकारणांच्या बेड्यांनीं पुरुषार्थास पंगू करून ठेवण्याचा हेतु काय, हें कोणी

सांगूं शकेल काय ? तें कांहीं नाहीं. जिकडे पाहावें तिकडे कल्पना शक्तीस गुंग करणारी अगम्य घटनाच दृष्टीस पडते. (पुढें येऊन) पण जालकेनें मेलेल्या रोपांस जिवंत करण्याचा हा काय मिथ्या प्रयत्न चालविला आहे ? त्यापेक्षां नवीनच रोप ती कां नाहीं लावीत ? ज्याची जीवनकला नष्ट झाली त्याचा पुनः विकास झालेला कोणीं पाहिला आहे काय ? जालका इतकी चतुर, व्यवहारज्ञ, परंतु तिला एवढें समजू नये कीं, एकदां शुष्क झालेलीं पानें पुनः कधीं हिरवीं होत नाहींत ! क्षयानंतर वृद्धि फक्त चंद्रालाच असते, प्राण्यांना तें कांहीं शक्य नाहीं. मनुष्याच्या जीवनांत एकदां ओहोटी आली, कीं, पुनः तेथें भरती येण्याची आशाच नको. (चपापून) पण हा आवाज कसला ? दक्षिणेच्या बाजूसच खडखडाट ऐकूं येत आहे. निःसंशय जनावरच तें ! (धनुष्यास बाण लावून) अंधारांत कांहीं दिसत नाहीं; पण हा शब्दवेधी बाण त्याला अचूक जाऊन लागेल ! (बाण सोडतो. दुरून किंकाळी व " घात झाला, दगा झाला, कोणी धांवा रे धांवा ! " अशी ओरड ऐकूं येते. रायजी तिकडे धांवत जातो.)

प्रवेश ३ रा.

[स्थळः--किसलवाडी. छातींत तीर लागलेलें एक प्रेत पडलें आहे. जवळ शीतलसिंह बसला आहे. एका बाजूनें रायजी धांवत येतो, व दुसऱ्या बाजूनें जालका दिवा घेऊन येते.]

रायजीः—(शव पाहून दचकून) हे कोण ? काय पर्वतराय महाराजांच्या छातींत माझा बाण लागला ? हर हर ! काय गहजब हा ! निशाचर पशु समजून मीं बाण सोडला आणि हा काय अनर्थ झाला ? शीतलसिंह, अंधाऱ्या रात्रीं आपण इकडे कोणीकडे ?

शीतलसिंहः—मृत्यूनें महाराजांस येथें आणलें, आणि मलाहि मृत्यूच येथून घेऊन जाणार. कारण नगरापर्यंत आतां दुसरा कोणीच माझ्या सोबतीस नाहीं !

जालकाः—शीतलसिंह, काय केलेंत हें ! मी तुम्हांस निक्षून सांगि-

तलें होतें, कीं, महाराजांना उत्तरेकडच्या वाटेनें घेऊन या; आणि असें असून तुम्ही दक्षिणेकडून कां आलां ? इकडून तर वाट सुद्धां नाहीं !

शीतलसिंह:—नशीब महाराजांचें आणि माझें ! इकडून येण्याचा महाराजांनींच आग्रह धरला. या बाजूस झांपा नसेल तर, तरवारीनें कुंपण तोडून आंत शिरूं असें तें म्हणाले. कारण महालांतून निघण्या-पूर्वी महाराजांना राजजोशांनीं सांगितलें होतें, कीं, या वेळीं नगराबाहेर दक्षिणेकडे प्रयाण करण्यास फारच शुभ लग्न आहे. त्या मूर्खांच्या नादीं लागून महाराज प्राणास मात्र मुकले, अदृष्ट भवितव्य कधीं कोणाला सांगतां आलें आहे काय ? भर दिवसा समोर मृत्यु उभा असला तरी तो कोणाला दिसत नाहीं ! पण तें असो. आतां पुढचा विचार काय ?

रायजी:—मला या घोटाळ्यांतलें कांहींच समजलें नाहीं. नकळत राजवध केल्याबद्दल आपण सांगाल ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहें. पण आपला असा काय संकेत ठरला होता, कीं, ज्याच्या योगानें माझ्या माथीं हा दोष आला ?

शीतलसिंह:—रायजी, यांत तुझा कांहीं अपराध नाहीं. जालका, याला सर्व हकीकत कळूं दे, म्हणजे आपण तिघें मिळून कांहीं इलाज शोधून काढूं.

जालका:—रायजी, जो पडदा हळू हळू बाजूस सारण्याचा विचार होता त्याच्या, तूं, या बाणानें तडकाफडकीं चिंधड्या उडवून दिल्यास.

रायजी:—मग सुकलेल्या झाडांस सजीवन करण्याचें तूं म्हटलेंस तें खोटें तर !

जालका:—नाहीं. तो प्रयोग मी पर्वतराय महाराजांना करून दाखविणार होतें. म्हातारपणीं त्यांना तारुण्याची प्राप्ती करून देण्याचें मी कबूल केलें होतें आणि माझ्या उपचाराची खात्री पटावी म्हणून हा झाडावरचा प्रयोग पाहण्यासाठीं त्यांना आज रात्रीं इकडे बोलावलें होतें.

रायजी:—महाराजांचा काय विचित्र अभिलाष हा ! तरुणांना यौवन इष्ट वाटावें, इतकेंच नव्हे तर तें अक्षय राहण्याचा त्यांनीं यत्न करावा हें साहजिकच आहे. परंतु सृष्टिक्रमानुसार एकदां प्राप्त झालेलें ज्ञान

आणि अनुभवयुक्त वृद्धत्व टाकून देण्याची इच्छा म्हाताऱ्यांना व्हावी, हें मात्र विलक्षण दिसतें !

जालका:---महाराणी रूपवतीच्या स्वर्गवासानंतर महाराजांनीं दुसरें लग्न केलें, आणि नव्या राणीसाहेब लीलावती नुकत्याच युवावस्थेंत प्रवेश करीत आहेत हें तुला माहीत नाहीं वाटतें ?

रायजी:—आणि या अशा लग्नाची नवी विधात्री होऊन तुला काय मिळणार होतें ?

जालका:—पुनः यौवन प्राप्त झाल्यास तुला राज्याचा चौथा हिस्सा देण्याचें महाराजांनीं कबूल होतें. पण महाराजांचे मनोरथ त्यांच्या रक्ताबरोबर वाहून जात आहेत तेथें माझें मनोरथ विफल झाल्याबद्दल शोक करून काय फायदा ?

शितलसिंह:--अघळपघळ गोष्टी सांगण्याचा हा प्रसंग नाहीं. महाराजांच्या मृत्यूची बातमी कोणत्या रीतीनें जाहीर करावी, हें अक्कल लढवून शोधून काढ. महाराजाबरोबर मी होतों हें महलांत सर्वांना ठाऊक आहे. तेव्हां माझी या लचांडांतून सुटका व्हावी कशी ? आपण खरें सांगायला गेलों तर त्याच्यावर कोणाचा विश्वास कां बसणार आहे ?

जालका:—(विचार करून)महाराज जिवंत आहेत अशी बातमी आपण पसरली तर ?

शितलसिंह:--तुला भ्रम तर नाहीं झाला ? महाराज जिवंत आहेत असें आपण ज्याला सांगायला जाऊं तोंच विचारील कीं असली बातमी सांगण्याचें प्रयोजन काय ? महाराज स्वतः परत आले हीच बातमी लोकांना पाहिजे ?

जालका:—माझें म्हणणें जरा स्वस्थ चित्तानें ऐकून घ्या. महाराज तरुण होण्यासाठीं प्रयास करीत आहेत, ही गोष्ट सर्वांना जाहीर आहे. तेव्हां आपण अशी बातमी पसरवूं या कीं, “ परदेशाहून एक मोठे वैद्यराज आले आहेत. त्यांनीं महाराजांस तरुण करण्याचें कबूल केलें आहे आणि औषधोपचारासाठीं सहा महिन्यांची मुदत मागून घेतली आहे. मात्र या सहा महिन्यांत वैद्य देतील तेंच अन्नपान घेऊन महाराजांनीं एकाद्या एकांत भुयारांत राहिलें पाहिजे. दुसऱ्या कोणाचें दर्शन घेतां कामा नये, व त्यांचा शब्दहि दुसऱ्या कोणीं ऐकतां कामा नये, अशी

वैद्यांनीं अट घातली आहे. महाराजांनीं अशा प्रकारचा आयुष्यक्रम ठेवला तरच प्रयोग सफळ होईल. कारण त्यांचें टकल जाऊन तेथें काळेभोर केंस येतील, पडलेले दांत पुनः उगवतील. सुरकुत्या पडून शिथिल झालेलें आंग पुनः प्रफुल्ल होईल. नेत्रांत तेज चमकूं लागेल आणि त्यांची मुखाकृति बदलून ती इतकी सुंदर होईल, कीं, त्यांना ओळखणेंहि मुष्किल पडेल, असें वैद्यराजांचें ह्मणणें आहे, याची प्रतीति पाहण्यासाठीं महाराजांनीं वैद्यासह भुयारांत निवास केला आहे आणि आणखी सहा महिन्यांनीं ते बाहेर येईपर्यंत कल्याणकाम प्रधानजीनीं राज्यकारभार पहावा अशी महाराजांची आज्ञा आहे. " शितलसिंहजी, ही हकीकत सर्वांना खरी वाटेल. कोणी भुयार पाहण्यास आले तर येथून नगराकडे जातांना नदीचे कांठीं रुद्रनाथाचें मंदिर आहे त्यांत भुयार आहे तें बंद करून ठेऊं आणि हेंच तें भुयार म्हणून लोकांना दाखवूं. शिवाय तें मंदिर तर माझ्याच ताब्यांत आहे.

शीतलसिंह:—युक्ति तर ठीक दिसते. पण सहा महिन्यांनीं कोणाला पुढें करावें ?

जालका:—याला एकच मार्ग आहे. या रायजीलाच पर्वतरायांच्या जागीं उभा करावा !

शीतलसिंह:—(संतापून) काय म्हणतेस ? माळ्याला महाराजा करावा !

जालका:—तुम्हांला गादीवर बसविलें असतें, पण तुम्ही पडलां सर्वांच्या ओळखीचे ! तुमचा चेहरा थोडाच बदलणार आहे ? दुसऱ्या कोणाची निवड करूं म्हटलें तर तिऱ्हाइताला आपल्या मसलतींत घेणें जोखमीचें आहे. तेव्हां हा रायजीच आपल्या उपयोगी पडेल. सहा महिन्यांत आपण याला राज्यकारभारांत वाकबगार करूं.

रायजी:—तुमच्या या कटाला मी जणूं काय संमति देऊन चुकलों आहें असें गृहित धरूनच तुम्ही वाटाघाट करीत आहां !

जालका:—रायजी, प्रसंग कठीण आहे. या वेळीं दीर्घदृष्टि ठेऊन वागलें पाहिजे. मी सांगेन तें ऐकणें एवढेंच तुझें कर्तव्य ! शीतलसिंह, आपणाला जिवंत राहावयाचें असेल तर मीं सुचविल्याप्रमाणें केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

जीतलसिंह:—हें साहस कांहीं लहानसान नाहीं. पुढेंमागें कधीं
तरी भ्रमाचा भोपळा फुटून हा माळी आहे असें लोकांना कळलें तर
आपली काय गति होईल याचा कांहीं विचार ?

जालका:—आहे त्यापेक्षां वाईट गति होणार नाहीं. शिवाय पर्वत-
राय महाराजांना संतान नसल्यामुळें त्यांच्या मृत्यूचें वर्तमान प्रकट
झाल्याबरोबर कोण जाणे किती लढाया होतील ! आणि शेवटीं राज्याची
किती पायमल्ली होईल याचा कांहीं विचार केलात ? दुसरी एक गोष्ट
अशी, कीं, पर्वतराय महाराजांचे मंत्री कांहीं वंशपरंपरेचे हक्कदार नाहींत.
पर्वतरायांबरोबर या देशांत आलेल्या तुमच्यासारख्या मंत्र्यांच्या जहा-
गिरी जो कोणी नवा राजा येईल तो कायम ठेवील याची काय खात्री ?
रायजी गादीवर बसला म्हणजे या चिंतेचें कारणच राहणार नाहीं.
तुमच्या सेवेची कदर तो अवश्य करील.

शीतलसिंह:—ही योजना पार पडण्यासारखी आहे खरी; पण या-
पेक्षां साधा, सोपा आणि बिनधास्त मार्ग सांपडणें शक्य नाहीं का ?

जालका:—शीतलसिंह, तुम्ही एकाद्या मुलाप्रमाणें बोलतां. साखर-
पाण्यानें कोठें भयंकर रोग बरे होत असतात ? एकीकडे राजवधाच्या
आरोपाची धास्ती, दुसरीकडे राज्याची धूळधाणी होण्याची दहशत त्यांत
पाण्याप्रमाणें रात्र निघून जात आहे. पहाट होण्यापूर्वीं सर्व व्यवस्था
झाली पाहिजे, आणि असें असून म्हणे साधा, सोपा आणि बिनधोक
मार्ग शोधून काढ ! मला उपाय सुचला तो मीं तुम्हांस दाखवून दिला.
याहून चांगला रस्ता तुम्हांस दिसत असेल तर बरेंच झालें ! नाहींपेक्षां
शेवटीं एक सोपा इलाज आहे. हें शव घेऊन आपण राजवाड्यांत जाऊं
आणि तेथें सुळावर चढण्याच्या तयारीस लागूं. कां हा रस्ता अगदीं
सरळ आहेना ?

शितलसिंह:—जालका, या संकटानें माझें चित्त विव्हल झालें आहे,
अशा वेळीं माझा उपहास करूं नकोस. माझी बुद्धि तर बिलकूल चालत
नाहीं. तूं सांगशील त्याप्रमाणें वागायला मी तयार आहे. तूं माळीण कशी
झालीस याचें मला नवल वाटतें. खरोखर तूं असामान्य स्त्री आहेस.

जालका:—आतां महाराजाच्या शवास दृष्टिआड करूं या. अग्नि
दिल्यास कोणाचें लक्ष जाण्याचा संभव आहे. तेव्हां तें भूमीस समर्पण

केलेलें बरें. शीतलसिंह, तुम्ही नदींत स्नान करून या. आम्ही दुसऱ्या तयारीस लागतों. (जातात.)

प्रवेश ४ था.

[स्थळः—किसलवाडी. रायजी आणि जालका संभाषण करीत प्रवेश करतात.]

रायजीः—कांहींहि झालें तरी अशा रीतीनें माझ्या चित्ताचें समाधान व्हावयाचें नाहीं. शीतलसिंहाला भय आणि लोभ दाखवून त्याचें तोंड तूं बंद केलेंस. पण माझें अंतःकरण अशानें शांत होणार नाहीं. कपटानें मिळविलेलें राज्य मला नको आहे.

जालकाः—तूं फक्त पुस्तकेंच वाचलीं आहेस. जग कसें आहे तें पाहिलें नाहींस बरं कां बाळ !

रायजीः—जगांत उच्च भावना नसतील तर त्यांत पाहण्यासारखें तरी काय आहे ? पण माझी खात्री आहे, कीं, जग इतकें अधम नाहीं. उच्च जीवनहि जगतांत शक्य आहे.

जालकाः—तुला उच्च जीवन प्राप्त करून देण्यासाठींच मी प्रयास करीत आहें.

रायजीः—नीच मार्गाचा अवलंब करून उच्च जिवन प्राप्त होणार !

जालकाः—बरें, तुझी इच्छा आहे तर आपण नीच मार्गाचा अवलंब करणार नाहीं आणि आपलें काय होईल याचीहि पर्वा बाळगणार नाहीं; पण राज्याचें काय होईल याचा विचार नको का करायला ?

रायजीः—त्याची फिकीर तुला आणि मला कशाला ?

जालकाः—ज्या राज्यांत आपण राहतों त्याचें हित पाहणें आपला धर्म आहे. शिवाय यांत भूतदयेचाहि प्रश्न आहे. आपल्या एका कृत्यानें जर लाखों माणसांच्या जिवाचा व मालमत्तेचा संहार चुकत असेल तर तें कृत्य बावनकशी नीतिमत्तेच्या कसोटीस उतरतें कीं, नाहीं हें पाहात बसणें क्रूरपणाचें आहे.

रायजीः—हक्कदार वारसास गादीवर बसविण्याचे कामीं मदत करावी एवढेंच आपलें कर्तव्य आहे.

जालकाः—या कामीं मदत करण्याची तूं प्रतिज्ञा करतोस ?

रायजीः—अलबत. जिवंत जीव आहे तोंपर्यंत साह्य करीन. न्यायानें जो खरा वारस ठरेल त्याला गादी मिळेपर्यंत मी मुळींच विश्रांति घेणार नाहीं अशी प्रतिज्ञा करतों.

जालकाः—तर मग हक्कदार वारस कोण आहे तें पाहूं या. पर्वतरायांना मुलगा नाहीं आणि जवळचे आप्तहि नाहींत. त्यांनीं दूर देशाहून येऊन हें राज्य घेतलें. तेव्हां स्वतः त्यांचाच या राज्यावर जुना हक्क नाहीं. मग आतां परदेशाहून त्यांच्या एकाद्या दूरच्या नातलगास आणून गादीवर बसवावा असें तुझें म्हणणें आहे कीं काय ?

रायजीः—तूं म्हणत होतीस ना, कीं, पर्वतरायांनीं पूर्वीच्या रत्नदीपदेव राजाचा अधर्मानें वध केला, त्या वेळीं रत्नदीपदेवाची राणी अमृतदेवी आपल्या जगदीप नांवाच्या लहान बालकासह माहेरीं होती व पुढें तीं दोघेंही कोठें नाहींशीं झालीं. तर त्या राजपुत्राचा पत्ता लागल्यास गादी त्यालाच मिळाली पाहिजे.

जालकाः—हें तुला पसंत आहे ?

रायजीः—यांत काय संशय !

जालकाः—असें आहे तर आजपर्यंत गुप्त ठेवलेली गोष्ट तुला सांगतें, ऐक. तूंच जगदीप, आणि मी तुझी आई अमृतदेवी आहें.

रायजीः—(आश्चर्यानें) काय ? तूं माझी आई ! (जालकेस भेटून) इतके दिवस तूं मला मातृहीन कां ठेवलेंस ? ही सुधासरित् संनिध असून माझा कंठ इतके दिवस शुष्कच राहिला ! डोळ्यासमोर प्रलेपनिधि असून माझ्या नेत्रांस शितलता प्राप्त करून घेतां आली नाहीं ! आणि ही सुवासिक पुष्पवाटिका निकट असून मी मूढासारखा रूक्ष असे रानोमाळ भटकत राहिलों !

जालकाः—तुझ्या संरक्षणासाठीं आणि भाग्योदयासाठीं मला हें गुप्त ठेवावें लागलें.

रायजीः—तुझ्या गाढ वात्सल्याची किंमत आतां मला कळते. परंतु मातृप्रेमाचा खरा आस्वाद घेण्याचें जें वय तें व्यर्थ गेलें या विचारानें

माझें हृदय भरून येतें. लहानपणच्या एक एक गोष्टी मला आतां आठवतात. आपली आई दृष्टीस पडतांच एकादें मूल मोठ्या हौसेनें तिच्याकडे दुडदुड धांवत जातांना पाहून माझ्या हृदयांत ज्या कांहीं विलक्षण ऊर्मि उठत असत, त्याचें कारण मला त्या वेळीं कळत नसे. तूं माझ्या सुखांत कसलीच उणीव ठेवली नाहींस; पण मातृप्रेमाचें जें पाठबळ असतें त्याच्या अभावीं माझ्या बाळपणाच्या सुखांत न्यूनता राहिली ती राहिलीच. " आई " हा गोड व मनोहर शब्द उच्चारून मीं कधीं तुजजवळ एकाद्या वस्तूसाठीं हट्ट घेतला नाहीं ! किंवा बालमित्रांमध्यें " माझ्या वाटेला गेलास तर माझ्या आईकडून तुझी खोडच मोडीन " असेंहि मीं कधीं अभिमानानें म्हटलें नाहीं !

जालका:—अज्ञातवासांत काल कंठावयाचा, तेव्हां उघडपणें मी तुझी आई म्हणवून कसें चाललें असतें ? पुष्कळ वर्षें लोटल्यामुळें कनकपुराजीक हा मळा घेऊन राहणें आपणांस शक्य झालें आहे.

रायजी:—हा माळ्याचा वेष तुला इतका कां आवडला ?

जालका:—या वेषानें नगरांत वाटेल तेथें राजरोस फिरतां येतें म्हणून. एरव्हीं राजवाड्यांत शिरकाव होऊन पर्वतराय महाराजांची मुलाखत होणें दुरापास्तच होतें.

रायजी:—बरें, पर्वतरायास तूं कोणत्या युक्तीनें तारुण्य प्राप्त करून देणार होतीस ?

जालका:—केंस काळे होऊन घोड्यावर स्वारी करण्याइतकी शक्ति येईल अशीं औषधें मजजवळ आहेत. आणि मीं तेवढेंच करण्याचें कबूल केलें होतें; पण पर्वतरायांची औषधांपेक्षां जादूवरच विशेष श्रद्धा असल्यामुळें आजचा हा खटाटोप करावा लागला. झाडाचा हा प्रयोग मीं करून दाखविला असता म्हणजे तारुण्याचीं चिन्हें प्राप्त झाल्याबरोबर राज्याचा चौथा हिस्सा तुला देण्याचा करारनामा पर्वतरायांनीं आज रात्रींच लिहून दिला असता.

रायजी:—पण हा प्रयोग तुला कसा करतां आला असता ?

जालका:—ही करामत त्या काळ्या पडद्याच्यामागें बांधलेल्या दोऱ्यांच्या साह्यानें करून दाखविणार होतें. सुकलेलें झाड जमिनींत गेलें असतें आणि त्याच्या जागीं हिरवें आणून ठेवलें असतें.

रायजीः—या कपट नाटकाची काय जरूर होती ?

जालकाः—तुला तुझ्या पित्याची गादी परत मिळावी म्हणून हा एवढा खटाटोप. एकदां राज्याचा चौथा भाग तुझ्या हातीं आला असता म्हणजे पर्वतरायांच्या हयातींत किंवा त्यांच्या मागें सबंध राज्य मिळविणें तुला अगदीं सोपें गेलें असतें. तुझें बाहुबल आहेच तसें !

रायजीः—पण बाहुबलाचा उपयोग करणारे कधीं कपटाचा आश्रय करीत नाहींत.

जालकाः—ईश्वराचे दरबारीं कपटाला जी शिक्षा असेल ती भोगण्यास मी तयार आहें; पण तुझ्या कुळाच्या लौकिकासाठीं निदान तुझ्या मातेच्या प्रेमासाठीं तरी, ही आलेली संधि व्यर्थ दवडूं नकोस. बळानें राज्य मिळविण्याइतकें आपलें हल्लीं सामर्थ्य नाहीं. शिवाय, हरप्रयत्नानें जगदीपाला गादीवर बसविण्याची माझी प्रतिज्ञा आहे.

रायजीः—असत्याच्या मार्गाचें नांव काढूं नकोस. धर्मयुद्ध करण्यास तूं सांगशील त्या वेळीं मी एका पायावर तयार आहें. त्यांत प्राणाची आहुति द्यावी लागली तरी चिंता नाहीं.

जालकाः—पर्वतरायांचा तूं आपल्या हातांनींच वध केला आहेस.

रायजीः—न कळत झालेल्या वधांत क्षत्रिय भूषण किंवा पराक्रम मानीत नाहींत. समोर उभा राहून उघडपणें जो वार करतो तोच खरा वीर. आडून तीर मारणें आणि चहाडीचुगलीनें एकाद्याचा नाश करणें या दोन्ही कृत्यांची योग्यता सारखीच ! मला प्रकट होऊं दे आणि मग माझा पराक्रम पहा !

जालकाः—प्रकट होण्याचा हा समय नव्हे. तुझी एकदां गादीवर कायमची स्थापना झाली म्हणजे मग आपण कांहीं एक गुप्त ठेवणार नाहीं; पण जगदीप,—नव्हे—रायजी, हा आणीबाणीचा प्रसंग आहे. तूं आपल्या मातेची निराशा करूं नकोस. मृत्यूची मला भीति वाटत नाहीं; पण माझ्या पतीचें, माझ्या पुत्राचें राज्य कायमचें नष्ट झालेलें पाहून, त्यांचा वंश निर्मूळ झालेला पाहून, मीं प्राणत्याग करावा ही कल्पनाच मला दुःसह वाटते. हाय हाय ! ज्याचें मीं जिवापलीकडे जतन केलें, अनेक कष्ट सोसून ज्याचें पालन केलें, ज्याच्यावर माझ्या आशेची सारी भिस्त, त्या माझ्या मुलानें माझ्यावर हा प्रसंग आणावाना !

रायजीः—तुला आई या नांवानें मला एकदां हांक मारूं दे.(जवळ पास कोणीहि नाहींसें पाहून)आई ! मातृप्रेमापुढें माझें आत्मबळ विरघळून गेलें ! कपटाची जी शिक्षा असेल ती मी भोगीन. तुझ्या इच्छेच्या मी अधीन आहें.

जालकाः—शाबास ! पण तो पहा, शीतलसिंह स्नान करून येत आहे. जा, तूंहि स्नान करून ये. राजासाठीं राजाच्या वारसानें स्नान केलें पाहिजे.

रायजीः—पर्वतरायाच्या मृत्यूनें मला मलिनता प्राप्त झाली आहे काय ? पण असो. नदीची शीतलता शांतिकर होईल. (जातो.)

(शीतलसिंह प्रवेश करतो.)

जालकाः—शीतलसिंह, इतका वेळसा लागला ?

शीतलसिंहः—[धांपा टाकीत] काय असेल तें असो ! रात्र अंधारी आहे म्हणून ह्मणा, कीं, आपल्यावर ओढवलेल्या या प्रसंगामुळें म्हणा, नदीवर फार भयानक प्रकार घडून आला ! मी नदीकडे चाललों इतक्यांत कोणीं महाराजासारखा आवाज काढून मला मोठ्यानें हांक मारली. मागें वळून पहातों तों कोणीं नाहीं ! थोडा वेळ मी जागच्या जागीं खिळल्यासारखा झालों. पुन्हां हिंमत करून प्रत्येक पावलाला मागें पुढें पहात मी कसाबसा किनाऱ्यापर्यंत जाऊन पोंहचलों. पण पाण्यांत पाय टाकतों तोंच जणूं रूपवती राणीसाहेब पाण्यांतून वर आल्या, आणि मला आंत ओढण्यासाठीं त्यांनीं हात लांब केला. त्यासरसा मी भीतीनें उसळून पळालों आणि बराच वेळ एका झाडाला चिकटून लपून बसलों. शेवटीं तुझी आठवण झाली तेव्हां मला थोडें धैर्य आलें आणि जीव मुठींत घेऊन, डोळे झांकून आणि कान बंद करून मीं एकदांची पाण्यांत बुडी मारली आणि तसाच इकडे धांवत सुटलों. या मळ्यांत शिरलों तेव्हां मी जिवंत आहें अशी माझी खात्री झाली. रायजी नदीकडे चालला असेल तर त्याला बोलाव माघारीं.

जालकाः—त्याची काळजी नको बाळगायला. त्याला भीति वाटणार नाहीं आणि भूतहि दिसणार नाहीं. भीतीनें गाळण उडून मन अघू झालें म्हणजे हा कल्पनेचा खेळ सुरू होतो.

शीतलसिंहः—तूं कांहींहि ह्मण, मीं पाहिलेला कांहीं कल्पनेचा खेळ नाहीं. छातींतली धडकी अजून निघाली नाहीं पहा!—पण बरी आठवण झाली. जालका, मला दुसरी एक शंका येते. रागावूं नकोस. तुझ्या युक्तीप्रमाणें आपण नगरांत संदेश पाठवूं, किंवा मी स्वतः जाऊन सांगेन. पण समजा, कीं, कल्याणकाम आणि इतर धूर्त मंत्र्यांचा त्यावर विश्वास नाहीं बसला तर? मग अशा गोष्टी एकदम कोण खऱ्या मानील?

जालकाः—त्याची तोड मजजवळ आहे. महाराजांच्या कमरपट्यांत हा कागद मला सांपडला. यावर फक्त महाराजांचीच सही आणि मोर्तब आहे आणि बाकीचा कागद कोराच आहे.

शीतलसिंहः—तूं सांगशील त्या प्रकारचें करारपत्र लिहून देण्यासाठीं महाराजांनीं हा कागद बरोबर घेतला होता.

जालकाः—आतां या कागदावर आपला संदेश लिहून काढ. महाराजांच्या हातांतील ही आंगठी मीं काढून आणली आहे ती पत्राबरोबर खूणमुद्रा म्हणून पाठवूं म्हणजे तर झालें? मग हें पत्र महाराजांनीं पाठविलें नसेल असें म्हणण्याची कोणाची छाती होईल?

शीतलसिंहः—शाबास! धन्य आहे तुझ्या चाणाक्षपणाची! महाराज जिवंत असते तर त्यांची सुद्धां एवढ्या पुराव्यानें खात्री झाली असती.

जालकाः—रायजीला या पत्राची हकीगत सांगायची नाहीं समजलांत! कारस्थानांत जितके कमी लोक सामील तितका सुरक्षितपणा अधिक. महाराजांचा हा कंठा आणि शिरपेंच आणला आहे तो रायजी महाराजांच्या वेषानें नगरांत प्रवेश करील त्या वेळीं त्याला घालायला देऊं. आतां राहिलेलें काम उरकून टाकूं. (जातात.)

प्रवेश ५ वा.

[स्थळः—रंगिणी नदीचा किनारा.]

रायजीः—मानवकृति आणि निसर्ग या दोहोंमध्यें जें अगाध अंतर आहे त्याचा अनुभव आज मला प्रत्यक्ष आला. पुस्तकांत वाचलें होतें, आणि ऐकलें होतें त्याची आज प्रतीति येईपर्यंत या अंतराची मला स्पष्ट

कल्पनाच नव्हती असें म्हटलें पाहिजे. कोठें तो मळा आणि कोठें हा नदी तट! तेथें सृष्टीच्या नैसर्गिक सौंदर्यास मनुष्यानें आपल्या लहरी प्रमाणें विच्छिन्न करून टाकलें आहे. आणि येथें ही भूमि, हें जल, हें आकाश आपल्या स्वाभाविक सौंदर्यानें किती खुलून दिसत आहे! तिकडे नजर फिरविली तर मनुष्य कृतीचीं इंधनें धुमसत असलेलीं दृष्टीस पडतील. इकडे नैसर्गिक सौंदर्याचा पूर्णचंद्र प्रकट होऊन आपल्या उज्ज्वल प्रभेनें दशदिशा दिपवून टाकीत आहे! तिकडे सुरू असलेल्या कारस्थानास, कपटनाटकांस—या सृष्टींत जागा नाहीं. तेथल्या मलिन वातावरणांत माझा जीव जसा गुदमरल्यासारखा झाला होता तो येथें येतां क्षणीं या सृष्टीशीं एकात्म होऊन किती उल्लसित होत आहे! रंगिणी! सान्निध्यानें तुझी शीतलता माझ्या चित्तास प्राप्त होणें शक्य आहे का? [पाण्यांत उतरून खालीं पहात रहातो.] काय चमत्कारिक देखावा हा! हे दैदीप्यमान तारे प्रतिबिंबरूपानें जणू जलांत उतरले आहेत, आणि नदीचा वेग त्यांना जोरानें ओढीत असतांहि आपल्या जागेपासून ते केंसभर सुद्धां ढळत नाहींत. माझ्या अंतःकरणांत ज्या कांहीं पवित्र ज्योति प्रतिबिंबित झाल्या आहेत त्यासुद्धां या तारकांप्रमाणें अचल राहतील कीं, जालकामतिवेगांत वाहवत जातील हें कोणी सांगावें? पण आतां जालकेच्या मतीचा कोठें प्रश्न आहे? अमृतदेवीची इच्छा ही कांहीं निराळीच वस्तू आहे. मातेच्या इच्छेपुढें मुलाच्या आवडनिवडीचा काय उपयोग?—पण मुलाला योग्यायोग्य पहाण्याचा अधिकारच नाहीं काय? रंगिणी! या गुंतागुंतीचा उलगडा तुझ्या निर्मल जलांत सांपडेल काय? तुझ्या तळापर्यंत जाणाराला या प्रश्नाचें उत्तर मिळेल काय? पृथ्वीवर जें कोठेंहि मिळत नाहीं तें तुझ्यापासून मिळत असेल तर केवढी तुझी योग्यता! पण माझ्या दुर्बलतेचा दोष पृथ्वीवर मीं कां लादावा? आजपर्यंत असंख्य ज्ञानी, तपस्वी, संत ज्या मेदिनीनें निर्माण केले तिच्यांत काय उणें आहे? वसुंधरेला "बहुरत्ना," "बव्हाश्चर्या" म्हणतात तें उगीच? ज्या जगांत विषापासून आरोग्य प्राप्त करून घेणारे योजक लोक आहेत त्यांत माझ्या या शंकांचें निवारण करणारा कोणी आढळणार नाहीं? मातेचें प्रेम माझ्या चित्तास मोह कां उत्पन्न करतें याची मीमांसा कोणी पंडित करूं

शकणार नाहीं? प्रेम आणि सत्य हे दोन्ही जर एकाच ईश्वराचे अंश आहेत तर त्यांचे मार्ग परस्पर विरोधी कां दिसावेत?—पण तें कोण? माझ्या एकांताचा भंग करून या जागेच्या पवित्रतेस कलुषित करण्यासाठीं कोण बरें इकडे येत आहे? जालका तर नाहीं? होय, तीच.

(जालका प्रवेश करते.)

जालका:—काय हें रायजी! अजून स्नान नाहीं केलेंस? आणि कपड्यांसुद्धा पाण्यांत कशाला उतरलास?

रायजी:—स्नान करावें कीं नाहीं या विचारांत आहें. पृथ्वी मला कोरडा ठेवील आणि ओला करील. या दोहोंतून कोणता प्रसाद ग्रहण करावा याचा निर्णय करणें कठीण आहे.

जालका:—हें पांडित्य आतां बाजूला ठेव. जगाच्या खऱ्याखुऱ्या बाबींशीं यापुढें गांठ आहे.

रायजी:—आणि पांडित्य काय खोटी बाब आहे?

जालका:—तें मी जाणत नाहीं. पण राज्यकारभार चालविण्याची ताकद पंडिताच्या अंगीं नसते हें मात्र खरें.

रायजी:—मुळींच नाहीं. खरें पाहिलें तर सर्व देशांत पंडितच राज्य चालवीत असतात. राजे आणि त्यांचे मंत्री फक्त पंडितांनीं घालून दिलेल्या नियमांची अंमलबजावणी करतात. त्यांत जरा चूक झाली, कीं, राज्याचे दिवस भरलेच म्हणून समजावें.

जालका:—तूं गादीवर बसलास म्हणजे पंडितांची सभा भरवून या प्रश्नाचें चर्वण करीत बैस पण आतां आधीं स्नान करून घे पाहूं! मीहि स्नानासाठींच आलें आहें.

रायजी:—काय स्नानाचें ढोंग हें! प्रेताला स्पर्श केल्यानें जर तुला मलिनता प्राप्त झाली नाहीं तर मग स्नानाची तरी काय जरूर? स्नान करावयाचें शांति मिळावी म्हणून. पण तुझ्या चित्ताचा जर क्षोभच झाला नाहीं तर स्नानानें प्राप्त होणाऱ्या शांतीचा तुला काय उपयोग?

जालका:—प्रेताचा संबंध तुटला हें स्नानानें मनावर ठसतें.

रायजी:—ती कल्पना व्यर्थ आहे. पर्वतरायाचा संबंध कधीं तुटणार नाहीं आणि या प्रेताचें विस्मरणहि कधीं होणार नाहीं. कांहींहि केलें तरी पर्वतरायाच्या मृत्यूचें चित्र आपल्या डोळ्यासमोरून हालणें शक्य

नाहीं आणि एवढ्यानें पुरें झालें, नाहीं म्हणून कीं काय, कमतींत भरती पर्वतरायाचा वेष घेऊन त्यांच्या घरांत जाऊन राहण्याची योजना केली आहे !

जालका:--पुनः लहर आली वाटतें !

रायजी:—वाटेल तें म्हण. ज्याला मी खंबीरपणा समजतों त्याला तूं दुर्बलता हें नांव देत असशील. पण माझ्या अंतःकरणाची खळबळ कांहीं कमी होत नाहीं. तेव्हां तुमच्या मसलतीस त्यांत थारा कसा मिळावा ?

जालका:—एकदां पाऊल पुढें टाकल्यावर माघार घेणें नामर्दपणाचें आहे. त्यापासून शेवटीं विनाश मात्र होतो.

रायजी:—अजून पाऊल पुढें टाकला आहे कोठें ?

जालका:—तूं अजून भ्रांतीत आहेस. पर्वतरायांचें प्रेत पुरलें आणि शीतलसिंह आपला संदेश घेऊन राजवाड्याकडे रवानासुद्धां झाला.

रायजी:--एकदां खड्डयांत पाय पडला म्हणजे बाहेर निघणें मुष्किल. थोडें सारलें जाऊन सुटका झाली तर मोठेंच नशीब ?

जालका:--रायजी, या तुझ्या धरसोडीच्या भाषणानें माझ्या मनाला किती यातना होत असतील याची तुला कल्पना नाहीं. आपले दुर्दैवाचे दिवस संपले असें मला वाटतें न वाटतें तोंच तूं नवीन दुर्दैवपरंपरेस सुरवात कां करतोस ? माझ्या सुखाची तुला कांहींच का काळजी नाहीं ?

रायजी:—काळजी आहे म्हणूनच मी विवश झालों आहें. नाहीं तर माझें मन केव्हांच निश्चित झालें असतें.

जालका:--माझ्यासाठीं ही विवशता कांहीं काळ सहन कर. चल आतां घराकडे. तेथेंच स्नान करूं. येथें तुझें चित्त लागणार नाहीं. तुला वेळ लागला तेव्हांच मला शंका आली, कीं, तुझें मन पुनः घोटाळ्यांत पडलें असेल. चल, कांहीं काळानें तुझ्या शंकांचें आपोआप निराकरण होईल. [जातात.]

अंक पहिला समाप्त.

अंक २ रा.

——:o:——

प्रवेश १ ला.

[स्थळः—कनकपूर. कल्याणकाम आणि पुष्पसेन कचेरींत बसले आहेत.]

कल्याणकामः—पुष्पसेनजी, उत्तरेकडील दंग्याचें अंतस्थ कारण आपणाला काय आढळून आलें ?

पुष्पसेनः—कर वसूल करणारांनीं जुलूम चालविला होता हें कांहीं अंशीं खरें. पण बंडाचें मुख्य कारण म्हणजे सुभेदार दुर्गेशाची चिथावणी याविषयीं माझी अगदीं पक्की खात्री झाली.

कल्याणकामः—आपण येथून जाण्यास निघाला त्या वेळींच मीं आपणास इशारा देऊन ठेवला होता, कीं, दुर्गेशाबरोबर मोठ्या कुशलतेनें वागलें पाहिजे. ज्या बुद्धिसामर्थ्याच्या योगानें राजकार्यनिपुणतेबद्दल त्याची कीर्ति झाली आहे तेंच बुद्धिसामर्थ्य त्याला महत्त्वाकांक्षेच्या भोंवऱ्यांत लोटीत आहे. पण या बंडाशीं त्याचा कोणत्या प्रकारचा संबंध होता ? बंडाळी मोडण्यासाठीं त्यानें राजधानीहून सैन्य मागविलें होतें. यावरून तर दंग्याधोप्यामुळें तो फार चिंताक्रांत झाला असावा असें दिसलें.

पुष्पसेनः—मी सैन्यासह तेथें जाऊन पोंहचलों तेव्हां आणीबाणीचा प्रसंग येऊन ठेपला होता, या वेळीं त्याच्या चिंतेला सबळ कारण होतें हें खरें. पण त्याच्या हातून सूत्रें निसटून गेलीं होतीं आणि म्हणूनच त्याला भीति आणि चिंता वाटूं लागली. आरंभीं तर त्यानें बंडखोरांना पैसे आणि हत्यारें पुरविलीं ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि रयतेला बेदिल करण्यासाठीं त्यानें मुद्दाम कर वसूल करणाराच्या जुलमाकडे कानाडोळा केला. इतकेंच नव्हे तर त्यांना धडधडीत जुलूम करतां यावा अशा प्रकारचे नवीन कायदेहि त्यानें अमलांत आणले.

कल्याणकामः—हें सर्व करण्याचा उद्देश काय ?

पुष्पसेनः---पर्वतराय महाराज हल्लीं एकांत वासांत आहेत ही संधि साधून लष्करांस चिथवून द्यावें, व लुटीचें आमिष दाखवून सैनिकांना वश करून घ्यावें आणि शेवटीं त्यांच्या मदतीनें उत्तरेकडील प्रांताचा स्वतंत्र मालक व्हावें असा त्याचा हेतु होता. आपण त्याच्या महत्त्वाकांक्षी स्वभावाची परीक्षा केली ती बरोबर आहे.

कल्याणकामः---त्याचे हे बेत कशामुळें फसलें बरें ?

पुष्पसेनः---त्याच्या योजनेप्रमाणें बंड तर सुरू झाले. पण नंतर बंडे-खोर त्याच्या ताब्यांत राहिले नाहींत. त्यांनीं दुर्गेशाच्या सांथीदारांवर हल्ला केला, आणि देशांत इतकी नासधूस चालविली, कीं, सर्व लोक त्राहि त्राहि करावयास लागले. शेवटीं लुटीच्या वांटणीवरून सैनिक आणि इतर बंडखोर यांच्या मध्यें यादवी सुरू झाली. दुर्गेश मात्र कैचींत सांप-डल्यासारखा झाला; एका पक्षास उचलून धरलें तर दुसऱ्याचें चित्त खवळायचें ! तेव्हां भीक नको पण कुत्रा आटोप अशी स्थिति होऊन त्यानें मदत मागितली.

कल्याणकामः---असें होणें साहजिक आहे. जे लोक जनसमूहाच्या अधम मनोवृत्ति जागृत करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या प्राणावर कधीं तरी गोष्ट बेतायचीच. तुडुंब भरलेल्या सरोवराचा बांध फोडणाराच्या नशीबीं जलसमाधि लिहिलेलीच असते. एकदां बांध फोडल्यावर मग पाण्याचा धोत थांबवूं म्हणणें व्यर्थ आहे. दुर्गेशाला चांगली अद्दल घडली; पण आतां त्याच्याकडे सुभेदारी राहूं देणें जोखमीचें आहे असें तुम्हांला नाहीं का वाटत ?

पुष्पसेनः---बंड मोडण्याचे कामीं त्यानें मला मनापासून मदत केली, आणि आतां त्या प्रांतांत जिकडे तिकडे शांतता झाली आहे, या गोष्टी खऱ्या; पण राजद्रोहाचें विष मोठें जालीम असतें. एकदां भिनलें कीं, साफ उतरणें कठीण. आणि राज्यलोभाचा कीटक तर त्याहूनहि वाईट. कांहीं काळ तो अचेतन पडल्यासारखा दिसेल पण संधि आली, कीं, पुनः सचेतन होऊन तो चित्ताला कुरतडूं लागल्याशिवाय राहणार नाहीं. आपण प्रतिबंध केला नसता तर मी दुर्गेशाचा शिरच्छेदच केला असता. निदान त्याला गिरफदार तरी केलें असतें.

कल्याणकामः---त्याच्यावर आतां पूर्वींप्रमाणें विश्वास ठेवणें धोक्याचें

आहे; पण आपण जर त्याचें पारिपत्य करण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या नादीं लागून फसलेले व असंतुष्ट झालेले त्याचे मित्र आणि मदतगार पुनः त्याला जाऊन मिळतील यांत कांहीं संशय नाहीं. शिवाय असल्या बुद्धिमान आणि धाडसी तरुणाचा राजकारणांत फार उपयोग होण्यासारखा आहे. त्याला कायमचा निकामी करून टाकणें हेंहि उचित नाहीं. त्याच्या कर्तबगारीस पुढें चांगलें वळण लागणार नाहीं कशावरून ? तेव्हां आपण त्याला उपमंत्री पद देऊन येथें बोलावूं. तोहि आतां खुशीनें येईल. आणि तो येथें असला म्हणजे आपल्या नजरेखालीं राहील. याशिवाय दुसरा फायदा म्हटला म्हणजे उत्तरेकडील प्रांतासंबंधानें आपल्या भीतीचें कारणहि नाहींसें होईल.

(द्वारपाल प्रवेश करतो.)

द्वारपालः—[नमन करून] भगवन्त, राणीसाहेबांकडून निरोप घेऊन मंजरी दासी बाहेर आली आहे.

कल्याणकामः—आंत येऊं दे. [द्वारपाल जातो.]

पुष्पसेनः—प्रधानजी, मी आतां येतों तर.

कल्याणकामः—बसा हो, आपल्या सल्ल्याची कदाचित् जरूर पडेल.

(मंजरी प्रवेश करते.)

मंजरीः—राणीसाहेबांनीं आपणांस सांगून पाठविलें आहे कीं, दक्षिणेहून जो जवाहिरी आला आहे त्याच्याकडून हिरे आणि मोत्यें घेतलीं आहेत, त्याची किंमत एक लाख रुपये देण्याची खजीनदारास आज्ञा व्हावी.

कल्याणकामः—मागच्या महिन्यांत आम्हीं राणीसाहेबांकडे एक लाख रुपये पाठवून दिले होते.

मंजरीः—होय; पण त्यांपैकीं बहुतेक पैसे काशीहून आलेल्या पैठण्या आणि शालू घेण्यांत खर्च झाले. थोडे उरले होते ते किरकोळ खर्चास लागले. मागेंच राणीसाहेबांनीं आपणांस जवाहीर मागवून देण्यास सांगितलें होतें. त्या वेळीं आपण म्हणाला कीं, उत्तरेकडील बंडाचा लौकर बंदोबस्त झाला नाहीं तर पैशाची टंचाई पडेल म्हणून तूर्त जवाहिरासाठीं खर्च करतां येत नाहीं; पण सुदैवानें बंड लौकरच मोडलें आणि

जवाहिरी चांगला माल घेऊन आयता आला आहे म्हणून राणीसाहेबांनीं खरीदी केली.

कल्याणकाम:—पुष्पसेनजी, मोहिमीचा सर्व हिशेब चुकता केला काय ?

पुष्पसेन:—धान्याचे आणि चाऱ्याचे दोन लाख रुपये अजून व्यापाऱ्यांना द्यावयाचे आहेत. शिवाय लष्करासाठीं घोडे आणि शस्त्रें घेतलीं होतीं त्याचे पावणेतीन लाख राहिलेच आहेत.

मंजरी:—राज्य तेथें खर्च चाललेलाच आहे. महाराज हल्लीं एकांतवासांत आहेत म्हणून राणीसाहेबांना पैशासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागतें, याचें त्यांना किती वाईट वाटतें म्हणून सांगूं! प्रधानजींनीं मागें रत्नालंकार घेण्यास नको म्हटलें तेव्हां राणीसाहेबांच्या डोळ्यांत आंसवें आलीं.

कल्याणकाम:—राणीसाहेबांना आमचा प्रणाम सांग आणि त्या जवाहिऱ्याला इकडे पाठवून द्या म्हणावें. पैसे देऊन टाकूं.

[मंजरी जाते.]

पुष्पसेन:—खजानजी म्हणत होते कीं, पुढच्या सालाचा कर वसूल होईपर्यंत खर्चाची मोठी पंचाईत पडणार आहे.

कल्याणकाम:—मंजरीनें शेवटीं अश्रुपाताची भीति दाखविली तेव्हां माझा निरुपाय झाला. साम, दाम, दंड, भेद, हे चार उपाय पुरुषांनीं आपल्या बुद्धीनें ठरविले आहेत. राजनीतिशास्त्रकार जर स्त्रिया असत्या तर त्यांनीं या चारांच्या भरतीला अश्रुपात हा पांचवा उपाय खात्रीनें घातला असता.

पुष्पसेन:—नेहमीं राजकारस्थानांत गढून राहिल्यामुळें आपलें मन जरा कठीण झालें आहे, आणि म्हणून स्त्रियांच्या कोमलतेची आपण अवगणना करतां. त्यांच्या हृदयांतील नैसर्गिक मार्दवाचा झरा अश्रूंच्या रूपानें बाहेर पडत असतो. या अमृततुल्य झऱ्याचें सिंचन होत नसतें, तर ही पृथ्वी किती रुक्ष झाली असती याची कल्पनाहि करवत नाहीं !

(द्वारपाल प्रवेश करतो.)

द्वारपाल:—कोतवालसाहेब आंत येण्याची परवानगी मागतात.

कल्याणकाम:—एकटेच आहेत का ?

द्वारपाल:—बरोबर शिपाई आणि पकडून आणलेलीं माणसेंहि आहेत.

कल्याणकाम:—पाठवून दे सर्वांना.

[द्वारपाल जातो. कोतवाल, शिपाई आणि मुसक्या बांधलेले दोन इसम प्रवेश करतात.]

कोतवाल:—भगवन्तांस नमन असो.

कल्याणकाम:—कोतवालजी, या माणसांचा अपराध काय आहे ?

कोतवाल:—भगवन्त, हे दोन इसम राजमार्गावर एकमेकांस शिव्या देऊन मारामारी करीत होते. त्यांच्या मदतीस दुसरे कांहीं लोक आले आणि रस्त्यांत दांडगाई करूं लागले. शिपायांनीं त्यांना अडविलें; पण हे आडदांड लोक उलट शिपायानांच मारावयाला धांवले.

कल्याणकाम:—[पकडून आणलेल्या माणसांस] तुम्हांला आपल्या घराचा कंटाळा आला असेल म्हणून तुरुंगांत जावयाला इतके आतुर झालां असें दिसतें; पण त्यापेक्षां तीर्थयात्रेला कां जात नाहीं ?

पहिला मनुष्य:—भगवन्त, तुरुंगांत जाण्यासारखें मीं काय केलें आहे ?

दुसरा मनुष्य:—भगवन्त, हाच तुरुंगांत जाण्याच्या लायकीचा आहे. मी अगदीं निर्दोषी आहें.

कल्याणकाम:—जो साळसूदपणा राजदरबारांत आल्यावर धारण करतां तोच जर घरीं असतांना धारण केला असता तर कोतवालजीस इतकी मेहनत कां पडली असती ? तुमचें भांडण झालें कशामुळें ?

दुसरा मनुष्य:—भगवन्त, हा बेरड माझा उपाध्या आहे. याला मीं माझ्या मुलीसाठीं स्थळ पाहावयाला परगांवीं पाठविलें होतें. आमचें यजमान आणि उपाध्याचें नातें पिढ्यान्‌पिढ्यांचें आहे. माझ्याकडून याला नेहमीं भरपूर दानदक्षणा मिळत असते आणि असें असून हा मांग माझ्या नऊ वर्षांच्या मुलीचा वाग्निश्चय एका ऐंशी वर्षांच्या थेर-ड्याशीं करून आला. त्या म्हाताऱ्याचे पैसे खाऊन यानें माझ्या मुलीच्या जन्माचा सत्यानाश केला.

कल्याणकाम:—यांत सत्यानाश कसला ? तूं वाग्निश्चय मोडून टाक.

दुसरा मनुष्य:—उपाध्या ठरवून आल्यावर मोडतां कसें येईल ?

कल्याणकाम:—अन्यायाचें बंधन तोडून टाकतां येत नाहीं ?

दुसरा मनुष्यः—भगवन्त, रूढीपुढें काय इलाज चालणार? आमच्या जातींत एकदां झालेला वाग्निश्चय कांहीं झालें तरी मोडतां येत नाहीं. कोणीं मोडलाच तर त्याला जातीबाहेर टाकतात, आणि त्या मुलीलाहि मग कोणी करीत नाहीं.

कल्याणकामः—योग्य अयोग्याचा विचार जात करणार नाहीं?

दुसरा मनुष्यः—जात कधीं असला विचार करीत असते?

कल्याणकामः—जात सत् असत्हि पाहणार नाहीं?

दुसरा मनुष्यः—काय म्हणून पाहणार?

कल्याणकामः—[पहिल्या मनुष्यास]—भूदेव, तुम्ही त्या मुलीच्या बापासारखे असून तिला बिचारीला विहीरींत कां ढकलून आलेत?

पहिला मनुष्यः—भगवन्त, विहीरींत कोठें ढकलली? वर चांगला श्रीमंत आहे. आतां, बिजवर आहे तेव्हां वय थोडें अधिक असणारच; पण मुलगी तर सुखांत पडेल! आणि हल्लीं पर्वतराय महाराजांना जे वैद्यराज उपचार करीत आहेत त्यांचें औषध त्या बिजवरानें घेतलें म्हणजे तोहि पुनः तरुण होईल.

दुसरा मनुष्यः—भगवन्त, हा भट असें म्हणूं लागला म्हणूनच तर भांडण झालें. मीं त्याला म्हटलें, "तुला म्हाताऱ्यानें जे पैसे दिले आहेत त्याचे चार भाग कर. एक भाग तूं ठेव, एक भाग आपण त्या म्हाताऱ्याला तरुण करण्यांत खर्च करूं, आणि बाकीचे दोन भाग मला दे म्हणजे त्यांतून उतार वयांत माझा चरितार्थ तरी चालेल." तेव्हां मीं पैसे मागितले म्हणून हा भट मला शिव्या देऊं लागला. आणि उलट मला मारावयाला धांवला. त्यामुळें लोकांची गर्दी जमली आणि थोडा दंगा झाला.

पहिला मनुष्यः—भगवंत, माझ्या पैशांतून मीं याला काय म्हणून वांटा द्यावा? मी याचें कार्य करून दिलें. वराला तरुण व्हावयाचें असेल तर त्यानें पैसे खर्चावे. मुलीच्या बापाला पैसे हवे असतील तर त्यानें वराकडून घ्यावेत.

दुसरा मनुष्यः—म्हाताऱ्याला मोठाले मुलगे आहेत ते आतां एक पैसासुद्धां देऊं देणार नाहींत.

कल्याणकामः—कोतवालजी, आमचें चित्त या वेळीं व्यग्र आहे.

या माणसांना उद्यां हजर करा. यांच्या मुसक्या सोडा. दुराचरणांनीं यांना बांधलें आहे तेवढें पुरे आहे.

कोतवालः—जशी आज्ञा.

[कोतवाल शिपाई आणि माणसें जातात.]

पुष्पसेनः—प्रधानजी, नेहमींच्या या असल्या किरकिरीमुळें आपल्या मनास फार त्रास होत असेल. आमचा समशेरबाजीचा धंदा सोपा आणि बिन त्रासाचा !

कल्याणकामः—असल्या आचारांनीं देशाची दुर्दशा व्हावयास लागली आहे. समशेरीचा तेथें काय उपयोग ? महाराजांनीं जर स्वतः म्हातारपणीं लग्न केलें तर त्यांचें अनुकरण केल्याबद्दल प्रजाजनाला कसा दोष देतां येईल ? आणि म्हातारपणासाठीं चालविलेल्या या उपचाराला आणखी किती फणगडे फुटतील कोणास ठाऊक ! आतां कचेरी बरखास्त करावी. [जातात.]

प्रवेश २ रा.

[स्थळ—कल्याणकामाची हवेली. कल्याणकाम आणि सावित्री बसलेले आहेत.]

कल्याणकामः—राणीसाहेबांचे नवे अलंकार पाहून तुलाहि कांहीं थोडेबहुत घेण्याची इच्छा झाली नाहीं हें कसें ?

सावित्रीः—पर्वतराय महाराज तरुण होऊन परत येतील तेव्हां त्यांना प्रसन्न करण्याच्या हेतूनें राणीसाहेबांनीं ही सारी तयारी चालविली आहे. आणि मी तर इकडे केव्हांच प्रसन्न करून ठेवलें आहे.

कल्याणकामः—तूं म्हणत होतीस ना कीं, स्त्रिया आपल्या मनाच्या समाधानासाठींहि अलंकार घालीत असतात म्हणून ?

सावित्रीः—अतृप्त मन तृप्तीचीं अनेक साधनें शोधीत असतें. पण माझ्या तृप्तींत मुळीं उणीवच नाहीं. लग्नापूर्वीं मला अलंकाराची भारी हौस असे आणि आजहि जर इकडच्या प्रेमांत कसर असती तर मींसुद्धां अलंकारांनीं मनाचें समाधान करून घेण्याचा प्रयत्न केला असता.

कल्याणकामः---तसं नव्हे गं ! पण माझ्या नेत्रांच्या रंजनासाठीं तूं थोडे तरी अलंकार नाहीं कां घालणार ?

सावित्रीः—इकडच्या नेत्रांचें रंजन होत असलें तर मी या शरीराला रत्नालंकारांनीं मढवून टाकीन. पण इकडच्या हृदयाचें रंजन कशानें होतें हें मला पक्कें माहीत आहे. हृदयाच्या प्रसन्नतेहून निराळ्या प्रकारची प्रसन्नता मिळविण्याची इकडच्या नेत्रांस इच्छा होईल असें मला नाहीं वाटत.

कल्याणकामः—एकूण तुझ्या दृष्टीनें माझ्या हृदयाची किंमत कायम आहे तर ! आज पुष्पसेन म्हणत होते,—राजकार्यामुळें माझें हृदय फार कठोर झालें आहे. कारण स्त्रीजातीच्या नाजुकतेची माझ्याकडून अवज्ञाच होते.

सावित्रीः--पुष्पसेनजीच्या जागीं मी असतें तर मलाहि असेंच वाटलें असतें. कारण इकडच्या आयुष्यक्रमाला दोन बाजू आहेत. बाहेरून पहाणारांच्या दृष्टीस कठीणपणाच पडावयाचा. पण या कठीणतेच्या पडद्याआड जी कोमलता आहे ती लोकांना कशी दिसणार ? फळाच्या गोड रसाचें जतन करण्यासाठीं ईश्वरानें वर कठीण साल निर्माण केलेली असते, पण हें वरचें कवच ज्याला दूर करतां येईल त्यालाच आंतील मधुर रस लाधेल.

कल्याणकामः--बरें, महाराजांकडे जे वैद्यराज आले आहेत त्यांना बोलावून आपण दोघेंहि तारुण्यावस्था प्राप्त करून घेऊं. तुला कसें वाटतें ? तुझें सौंदर्य कांहीं कमी झालें नाहीं. पण आपलें वय कमी होऊन पुनः तारुण्याच्या स्वारस्याचा आस्वाद घेतां आला तर बहार होईल नाहीं बरें ?

सावित्रीः--असल्या दिखाऊ उपायांनीं आपल्या मनोवृत्तींत थोडाच फेरफार होणार आहे ? लग्नाचे दिवशीं जें गाढ प्रेम होतें तें आजहि कायम आहे. त्यांत तिळमात्र फरक झाला नाहीं. उसळत असलेला धबधबा खालीं येऊन आज सरोवर भरलें आहे, पण पाणी होतें तेंच आहे.

कल्याणकामः—हृदयदेवी, आपण पतिपत्नी झालों तरी अजून प्रेमीजनच आहोंत हें पूर्वपुण्याईचें फळच म्हटलें पाहिजे. हें सुख फार थोड्या दंपत्यांना लाभतें. आणि या सुखानें प्राप्त होणाऱ्या सामर्थ्यामुळेंच मी आपल्या हृदयास राजकार्याच्या दगदगीचा स्पर्श होऊं देत नाहीं,

आणि चिंतेस दूरच्यादूर ठेवतों. एरव्हीं राजकारभाराचे क्लेश माझ्या हृदयाच्या भावनांशीं एकाकार करून मीं आपल्या जीवनाचें एकच स्वरूप ठरवून टाकलें तर या जगाच्या आघातांपुढें माझें हृदय टिकाव धरून कसें राहील ?

सावित्री:---दागिन्यांची गोष्ट काढण्याचें कारण मला आतां कळलें. पुष्पसेनजीचें बोलणें मनाला लागल्यामुळें माझ्याकडून समाधान करून घेण्यासाठीं मुद्दाम हा विषय काढायचा झाला. मी इतक्या निकट परिचयाची असून हें कळायला मला इतका वेळ लागला तर वरवर पहाणारांना इकडच्या दूरदर्शीपणाचें रहस्य न उमगल्यास नवल नाहीं. त्यांना इकडचें अंतःकरण कठोर वाटणें स्वाभाविकच आहे.

(बाहेर गलबला होतो.)

कल्याणकाम:---(दार उघडून) कोण आहे तिकडे ?

सवक:-(प्रवेश करून) जी काय हुकूम आहे ?

कल्याणकाम:---बाहेर इतकी गडबड कसली चालली आहे ?

सेवक:---एका स्वाराचा घोडा बेफाम होऊन बाजारांतून पळत सुटला आणि आपल्या दारावरून उधळत चालला होता. इतक्यांत स्वारानें खालीं उडी टाकली. त्यामुळें त्याला फार लागलें. त्याच्या भोंवतीं लोकांची गर्दी जमली आहे.

सावित्री:---दुसऱ्या नोकरांना तूं घेऊन जा, आणि त्या माणसाला तजवीजीनें उचलून आंत आण आणि मग मला सांगायला ये.

सेवक:---जी, होय. [जातो.]

कल्याणकाम:---तूं जाऊन त्याला पहा. मी उत्तर प्रांताच्या सुभेदाराला पाठवावयाचें पत्र लिहून तिकडे आलोंच. [जातात.]

प्रवेश ३ रा.

[स्थळः--कल्याणकामाची हवेली. अंथरुणावर टेंकून रायजी बसला आहे. जवळ कल्याणकाम आसनावर बसला आहे. आणि वंजुल उभा आहे.]

रायजीः--भगवन्त, बाईसाहेबांनीं सख्ख्या आईप्रमाणें माझी शुश्रूषा केली. त्यांच्या उपकाराची फेड माझ्याकडून होणें शक्य नाहीं. आतां मला पुष्कळ बरें वाटतें. माझ्यानें आतां चालवेल. म्हणून म्हणतों, मला जाण्याची परवानगी असावी. माझ्या घोड्याचें काय झालें तें कळल्याशिवाय माझें मन स्वस्थ होणार नाहीं.

कल्याणकामः--घोड्याला धरून आणण्यासाठीं मीं माणसें पाठविलीं आहेत. तुमच्या अंगावर बऱ्याच जखमा झाल्या आहेत त्या भरून येईपर्यंत तुम्ही बाहेर पडूं नये असें मला वाटतें.

वंजुलः—या उभ्याआडव्या पट्टया पाहून लोक हंसतील आणि मुलें टाळ्या वाजवून नाचतील.

रायजीः---जखमांनीं मी कमकुवत झालों नाहीं आणि पट्टयांची मला लाजहि वाटत नाहीं. सावित्री देवीच्या दयेचा प्रसाद नेहमीं मिळत असेल तर नेहमीं जखमी होण्यास मी तयार आहें.

वंजुलः--शिरा खाण्यास मिळत असेल तर मीहि पट्टया बांधून निजून राहीन. पण जखमेची अट मला कबूल नाहीं.

कल्याणकामः—(रायजीस) तुम्ही कोण आहां ? राहतां कुठें ?

रायजीः—जी, मी परदेशाहून आलों आहे. नगराबाहेर रंगिणी नदीचे कांठीं एका मळयांत मी माळयाचें काम करीत असतों. मला " राई " या नांवानें सर्व ओळखतात.

कल्याणकामः--या शरीरकांतीस आणि बुद्धिमत्तेस माळयाचें काम शोभत नाहीं आणि " राई " हें नांवहि शोभत नाहीं.

रायजीः—योगायोग कांहीं विलक्षण असतात ! (बाहेर घोड्याचें किंकाळणें ऐकून) हा माझाच घोडा. मी येथें आहें हें ओळखून खिंकाळत आहे.

वंजुलः—मलाहि कपड्याच्या वासावरून पुष्कळ लोकांना लांबून ओळखतां येतें.

कल्याणकामः—(रायजीस) तुमची आणि घोड्याची परस्परावर इतकी ममता असून तो तुमच्या कह्यांत कसा नाहीं राहिला !

रायजीः—नगराबाहेर मी तलावाचे कांठीं बसलों होतों आणि घोडा जवळच चरत होता. इतक्यांत कोणी वडाच्या झाडाचें खोड गाड्यांत घालून चालविलें, पण तें पाहून घोडा बिचकला आणि भरधांव निघाला. मी त्याच्या मागें लागलों आणि चपळाई करून एकदांचा वर बसलों. पण लगाम खालीं लटकत असल्यानें मला घोड्याला कांहीं आवरतां आलें नाहीं. रस्त्यांत एके जागीं मोठा दगड पडला होता तो घोड्याचे पायास लागला, आणि लगाम सारखा लडबडत असल्यामुळें तो अधिकच भडकला, आणि गांवांत शिरला. या रस्त्याला येतांच तो एकदम आपल्या हवेलीकडे वळला. तेव्हां आतां हा भिंतीवर खात्रीनें आदळणार असें वाटून रस्त्यांतल्या माणसांना मीं ओरडून सांगितलें, कीं, घोड्याला लगामानें धरून अडवा. पण जवळ येण्यास कोणी धजलें नाहीं. आपल्या हवेलीच्या खिडकींत एक मनुष्य उभा होता त्यानें वरून कागदाचा एक बोळा भात्र फेंकला तो माझ्या फेट्यांत पडला. शेवटीं मीं खालीं उडी टाकली आणि घोडा वळसा घेऊन पुढें निघून गेला.

वंजुल—वडासारखा कोणी महान् छत्ररूप पुरुष पतन पावल्यामुळें दैवानें मोठ्या लगबगीनें तुम्हांला ठेंचाळत, अडखत, प्रधानजींची मदत मागण्यासाठीं येथें आणलें, असा मला तरी भास होतो.

कल्याणकामः—वंजुल, तुझें लक्षणज्ञान जरा बाजूला ठेव. (रायजीस) कसला कागद होता तो ?

रायजीः—कदाचित् अजून माझ्या फेट्यांत असेल. (फेटा चांचपून) हा पहा ! (कल्याणकामास देतो.)

कल्याणकामः—(उलगडून वाचतो) " प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति । " वंजुलमिश्र, हें आपलें अक्षर दिसतें आहे !

वंजुलः—(घाबरून) माझें कशावरून ?

कल्याणकामः—तुझा वांकडा आंगठा कांहीं छपत नाहीं ! या जोडाक्षरांत आठाच्या आंकड्यासारखा रकार, खालीं येतांना डावीकडे

लुले झालेले हे काने, काकपदासारख्या या वेलांट्या, हत्तीच्या अंबारी सारखा हा " भ, " ही सर्व तुझीच हातोटी आहे.

वंजुलः—माझ्या अक्षरासारखें दिसतें आहे खरें !

कल्याणकामः—तुझें स्वतःचें अक्षर नाहीं हें ?

वंजुलः—मी कोठें नाहीं म्हणतों आहें ?

कल्याणकामः—हें लिहिण्याचें कारण काय ?

वंजुलः—भगवन्त, खिडकींत बसल्या बसल्या मी गीतेचा पाठ करीत होतों. इतक्यांत हा मनुष्य लोकांना घोडा आवरण्यास सांगत होता तें ऐकून गीतेंतलें हें वचन लिहून मीं त्याच्याकडे कागद फेंकला.

कल्याणकामः—कशासाठीं ?

वंजुलः—आपल्या स्वभावावर जाणाऱ्या प्राण्यांना आंवरणें गीतेंत निषिद्ध मानलें आहे. असें असून हा इसम धांवत्या घोड्याला अडविण्यास सांगत होता. तेव्हां हा मिथ्या प्रयास यानें सोडून द्यावा म्हणून याला मीं शास्त्रवचनाची आठवण करून दिली.

कल्याणकामः—मूर्खा, हें गीतावचन धांवत्या घोड्यास लागू आहे असें तुला कोणीं सांगितलें ? संकटांत पडलेल्या मनुष्यास साह्य करावें एवढेंहि तूं गीतेच्या अध्ययनानें शिकला नाहींस ?

वंजुलः—भगवन्त, शास्त्राचे अनेक अर्थ होतात. आपण एक अर्थ घेत असाल, मी दुसरा अर्थ घेत असेन ! कित्येक लोक असें म्हणतात, कीं, सायणाचार्यांच्या भाष्याप्रमाणें वेदांत कोठेंहि चरवीनें तूप पिण्याचें निघत नाहीं, पण आम्ही " आयुर्वै घृतम् " या श्रुतीच्या अधारें वेदांतून असा अर्थ काढून देत असतों. आणि पुरोहिताला चरवीनें तूप पाजल्यानें शास्त्रोक्त पुण्य लागतें हें तत्त्व सांगून पुष्कळ यजमानांना कृतार्थ करतों.

(सेवक प्रवेश करतो.)

सेवकः—भगवन्त, यांचा घोडा आणला आहे. त्याला इतके लागले आहे, कीं, त्याच्यावर बसून आतां जातां येणार नाहीं. [जातो.]

कल्याणकामः—(रायजीस)मग तुम्हांला रथांत निजवून पाठवूं.

रायजीः—भगवन्त मला, उगीच पंगू कां बनवितां ? असल्या जख-

मांचा काय हिशोब ? जोंपर्यंत माझ्या अंगांत शक्ति आहे तोंपर्यंत मी कधीं असहाय वृत्ति धारण करणार नाहीं.

(औषध घेऊन सावित्री प्रवेश करते.)

सावित्रीः—(रायजीस)घ्या हें औषध. यानें तुम्हांला बराच आराम वाटेल.

वंजुलः—इतकें नौकरचाकर असून आपण स्वतः कां औषध खलीत बसतां ? आपल्याला हें शोभतें तरी का ?

रायजीः—बाईसाहेब, इतकें श्रम घेऊन आपण जी कृपा करीत आहां तिच्यांत या औषधापेक्षां खात्रीनें अधिक गुण आहे'

(औषध पिऊन टाकतो.)

सावित्रीः—कमरेची तरवार तुह्मीं काढूं दिली. पण हा कमरबंद सोडीत नाहीं हा काय हट्ट ? कमर मोकळी केल्यास जरा बरें वाटेल.

रायजीः—आपल्या म्हणण्याचा अपमान करून मी अकृतज्ञतेचा दोष पदरीं बांधून घेत आहें याची मलाच लाज वाटते म्हणून एकदाचा खुलासा करतों. हा कांहीं कमरपट्टा नाहीं, हें माझें जीवन आहे.

सावित्रीः—म्हणजे ?

रायजीः—हा पट्टा दिसत आहे, ती म्यान आहे आणि त्याच्या आंत तरवार आहे. रात्रंदिवस मी तिला अंगावर बाळगतों. प्रहार करण्याचा प्रसंग आल्याशिवाय मी या तरवारीस बाहेर काढीत नाहीं.

वंजुलः—बाईसाहेब, यांचें नांव काय ? राई राई म्हणजे मोहरी, दिसायला अगदीं लहान पण कुटल्यावर मात्र झणझणीत ! डोळ्यांतून टिपें गाळायला लावील ! आतां खरें स्वरूप समजलें. दोन दोन तरवारी ! एक कमरेस लटकविण्याची आणि दुसरी गुंडाळण्याची !

सावित्रीः—इतकी लवचीक तरवार पाहण्यासारखी असेल नाहीं ?

रायजीः—आपणाला पहायचीच असेल तर बाहेर काढून मी आपल्याला न कळत घाव करून पुनः ठेऊन देतों म्हणजे माझ्या प्रतिज्ञेचा भंग होणार नाहीं.

सावित्रीः—स्त्रीजातीवर जो अनिवार कुतूहलाचा आरोप आहे तो खोटा करण्यासाठीं मी यावेळीं आपली जिज्ञासा बाजूला ठेवतें.

वंजुलः—फार चांगलें केलेंत! असल्या तरवारीचें वेटाळें एकदां हातांतून निसटून बाहेर आलें, कीं, कोणाला लागेल याचा नेम नाहीं.

रायजीः—(अंथरुणावरून उठून) भगवन्त, आतां मला जाण्यास आज्ञा असावी.

कल्याणकामः—तुमची जाण्याची इच्छाच असली तर मी कांहीं तुह्मांला अडवीत नाहीं. पण शरीरास स्वास्थ्य प्राप्त झाल्यावर पुनः भेट घ्याल या अटीवरच मी आतां तुह्मांस रजा देतों.

रायजीः—आणखी कांहीं दिवस कदाचित् माझें येणें होणार नाहीं. पण वेळ आला म्हणजे आपणांस भेटेन आणि नेहमीं भेटत राहीन. आपला समागम म्हणजे एक अलभ्य लाभ आहे.

सावित्रीः—या अवस्थेंत तुम्हांला घोड्यावर बसतां येईल कसें? घोड्याच्या अंगांतही ताकद नसेल.

रायजीः—घोड्याला धरून मी चालतच जाईन त्यानें आम्हां दोघांनाहि संतोष वाटेल. आणि श्रम किंवा वेदना मुळींच जाणवणार नाहींत.

(सर्वांना नमन करून जातो.)

वंजुलः—काय घोड्यासाठीं सायास! मीं तर असल्या घोड्याला पांजरपोळांत पाठवून दिला असतां.

कल्याणकामः—कायरे, तूं कधीं घोड्यावरून पडला होतास का?

वंजुलः—जन्मांत कधीं घोड्यावरच बसलों नाहीं तर मग पडतों कसा?

सावित्रीः—येत्या लग्नसराईत तुला घोड्यावर बसलें पाहिजे.

वंजुलः—(खुष होऊन) भगवन्ताची आणि आपली कृपा.

कल्याणकामः—वंजुल, गृहस्थाश्रमांत प्रवेश करणारा पूज्य होतो. पण तूं पडलास बुद्धीचा खंदक. तुला पूज्य कोण मानील!

वंजुलः—आपल्या दृष्टीनें माझी बुद्धि थोडी असेल. पण माझ्या बायकोला तर मी परमेश्वराहून मोठा दिसेन.

कल्याणकामः—तूं गीतेंत वाचलें नाहींस का, कीं, ईश्वराच्या बरोबरीचासुद्धां कोणी नाहीं. मग त्याच्यापेक्षां मोठा कोण असणार?

वंजुलः—हा सिद्धांत पुरुषासाठीं आहे, बायकांसाठीं नाहीं. आपल्या

बायकोला मी असा नियम पाळायला लावीन, कीं, मी बाहेरून आल्याबरोबर तिने दारांतच माझी आरती करावी.

कल्याणकामः--आरती ओवाळण्याचे ऐवजीं तुला पिण्यास थंड पाणी दिलें तर अधिक बरें नाहीं होणार ?

वंजुलः—फार तहान लागली असेल तर आरती होईपर्यंत दम निघणार नाहीं हें खरें. तेव्हां तिला हुकूम करीन, कीं, पाण्याचा तांब्याहि पुढें ठेवावा. मी इकडे पाणी पिईन आणि ती आपली आरती ओवाळीत राहील.

सावित्रीः--वंजुल, इकडे घरीं येणें झाल्यावर मी आरती ओवाळीत नाहीं, हें तुला चमत्कारिक वाटत असेल नाहीं ?

वंजुलः—माझ्या बुद्धीची आपणाला कांहीं किंमत वाटत नाहीं तेव्हां मी काय बोलूं ? पण स्त्रियांचें हें परम कर्तव्य आहे बरें ! मी आपल्या बायकोला आमचा सनातन पतिव्रताधर्म विनचूक, सांगोपांग पाळावयाला लावीन. मी जेवल्यावर माझ्या उष्ट्या ताटांतच तिनें जेवावें, मी आराम घेत पडेन तेव्हां तिनें वारा घालीतच बसावें, मीं ठोक दिला तरी तिनें तोंडांतून चकार शब्दहि काढूं नये, इत्यादि सर्व सती-धर्माच्या नियमांची मी कडक अंमलबजावणी करीन.

कल्याणकामः--तूं स्वतः एकादा तरी नियम कडक रीतीनें पाळशील का ?

वंजुलः--स्त्रियांसाठीं पुरुषांनीं जे नियम ठरविलें आहेत ते स्त्रियांना पाळावयाला लावणें हाच एक नियम स्त्रियांच्या बाबतींत पुरुषांनीं पाळावयाचा आहे.

कल्याणकामः--तूं आपल्या बायकोला उष्ट्या ताटांत जेवावयाला लावशील त्यामुळें कोणतें फळ प्राप्त होईल ? आपला हक्क बजाविल्याचा तुला संतोष वाटेल, कीं, तुझ्या स्त्रीला आपलें कर्तव्य केल्याचें पुण्य लागेल ?

वंजुलः—आपल्या घरांत हे नियम पाळले जात नाहींत म्हणून आपणांस या शंका सुचतात. मी सांगतों तसल्या आचारांनीं बायकांना पूज्यबुद्धीचें शिक्षण मिळतें. त्याशिवाय नवऱ्यावर त्यांचें प्रेम जडणार नाहीं, आणि त्यांचा संसारहि सुखाचा होणार नाहीं.

कल्याणकाम:—तुझ्या उष्ट्या ताटांत जेवल्याशिवाय बायकोला तुझ्याविषयीं पूज्यभाव आणि प्रेम वाटूं लागलें तर ?

वंजुल:—पण तें कायम राहील याचा काय भरंवसा ?

कल्याणकाम:—मग बायकोच्या उष्ट्या ताटांत जेवल्याशिवाय तुझें तिच्यावरचें प्रेम कसें कायम राहील ?

वंजुल:—मला पूज्य भावानें प्रेम करावयाचें आहे थोडेंच ! मी तर मालकाच्या नात्यानें प्रेम करणार.

सावित्री:—स्त्रियांसाठीं सर्व नियम तुम्ही पुरुषच ठरवून टाकणार, कीं, थोडे नियम स्त्रियांना स्वतः ठरविण्यासाठीं शिल्लक राहूं द्याल ?

वंजुल:—मग आमच्या या मिशा काय कामाच्या ?

सावित्री:—मिशांनीं जर बायकांना मारण्याची आणि उष्टें खाऊं घालण्याची इच्छा होत असेल तर त्या जगांतून लौकर नाहींशा झालेल्या बऱ्या. मिशांशिवाय जग खात्रीनें चालेल. जगाला मर्दपणा पाहिजे पण तो रायजीच्या अंगीं होता तसा पाहिजे.

कल्याणकाम:—बरोबर आहे. ज्या शौर्यांत कोमलतेचा अंतर्भाव होतो त्यानेंच पुरुषत्वाची शोभा वाढते. द्रव पावणाऱ्या लोखंडाचें खड्ग होतें, पण पाषाणाचें खड्ग झालेलें कोणीं ऐकलें आहे ?

सावित्री:—त्या रायजीचें उज्ज्वल शौर्य पाहून पूर्वीं असा कोणीं पुरुष पाहिला असावा असें वाटूं लागलें. पण पुन्हां विचार केला असतां त्याची आकृति अपरिचित दिसूं लागली.

कल्याणकाम:—अनेक भावनांना मूर्तस्वरूप प्राप्त झाल्यामुळें मनाला पूर्वसंस्कारांचा जणूं साक्षात्कारच होत होता. पण या भावना एकाच व्यक्तीसंबंधानें कधीं अनुभविल्या नसल्यामुळें त्या तरुणाची आकृति अपरिचित, कधीं न पाहिल्यासारखी वाटूं लागली.

वंजुल:—त्याला पाहून मला तर मोहऱ्या लावलेल्या तिखट सुरणाची आठवण व्हावयास लागली. खरा स्मरणालंकार हाच !

कल्याणकाम:—अलंकारशास्त्रांत तूं तरबेज आहेस; पण सुरण कांहीं सुंदर दिसत नाहीं.

वंजुल:—तो पाहिजे तसा सुंदर असेल पण माळी तो माळीच !

कल्याणकाम:—असा कोणी क्षत्रिय आढळून आला असता तर

पर्वतराय महाराजांना मीं सांगितलें असतें, कीं, तरुण होण्यासाठीं उपचार करण्यापेक्षां अशा तरुणाला दत्तक घेणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे. योग्यतेप्रमाणें पदवी देतां आली असती तर राजपद यालाच—

[सेवक प्रवेश करतो.]

सेवकः—(नमन करून) मिळालें, भगवन्त.

कल्याणकामः—काय ?

सेवकः—पूर्व प्रांताच्या सुभेदाराकडून दूत आला आहे, तो म्हणतो, कीं, भगवन्तास हाच शब्द सांगायचा आहे.

कल्याणकामः—ठीक आहे. त्याची उतरायची सोय करा. आणि पुष्पसेनजीस सांगून ये, कीं, आपल्याशीं जरूरीचें काम आहे, करितां कृपा करून लौकर यावें.

सेवकः—जशी आज्ञा. (जातो.)

कल्याणकामः—वंजुल, जा त्या दूताच्या भोजनाचा बंदोबस्त करून ये.

वंजुलः—(स्वगत) माझ्या भोजनाचें कोणी नांवहि काढीत नाहीं ! (जातो.)

सावित्रीः—या दूताचा निरोप कांहीं गुप्त दिसतो आहे !

कल्याणकामः—होय. पर्वतरायमहाराजांच्या गैरहजरीमुळें रोज एक नवीन विघ्न उद्भवत आहे. पूर्वेकडील प्रांत बळकाविण्यासाठीं शत्रू जारीनें तयारी करीत आहे अशी मला गुणगुण लागली होती. त्यांचें सैन्य सरहद्दीवर जमा झालें, कीं, आपल्या सुभेदारांनीं गुप्त निरोप पाठवावा असें ठरलें होतें. त्याप्रमाणें हा दूत आला आहे. पूर्वेकडे मीं अगोदरच सैन्य रवाना केलें आहे. पण आतां पुष्पसेनजीला पाठविणें आवश्यक आहे. ते येईपर्यंत मी कागदपत्र तयार करून ठेवतों.

सावित्रीः—भोजन करून विश्रांति घेतल्यानंतर हें काम केलें तर नाहीं का व्हायचें ?

कल्याणकामः—राज्यशकटाचें जूं एकदां मानेवर घेतलें म्हणजे आराम कसला आणि विश्रांति कसली ? भोजनाविषयीं म्हणशील, तर तुझ्या वचनामृतानेंच मी तृप्त झालों आहें. तेव्हां उदर भरणारास आतां दोन चार घटका विलंब लागला तरी हरकत नाहीं. (जातात.)

प्रवेश ४ था.

[स्थळः--रुद्रनाथाचें मंदिर. जालका आणि रायजी प्रवेश करतात.]

जालकाः—शीतलसिंहाकडून मागविलेल्या दप्तरावरून तुला राज्य-कारभाराची माहिती झालीच आहे. आतां गुप्तपणें फिरून नगरांतील प्रत्येक कोनाकोपरा आणि प्रत्येक वजनदार इसमास तुला पाहून आलें पाहिजे. कल्याणकामास तूं आपलें नांव, ठावठिकाणा सांगितलेंस त्यामुळें हें काम फार अवघड झालें आहे. आतां फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. तुला लागलें होतें त्या वेळीं जखमांमुळें आणि जागोजाग बांधलेल्या पट्ट्यांमुळें तुझी ओळख पटण्यासारखी नव्हती. पण आतां तूं कल्याण-कामाकडे जायचें करूं लागलास तर पुढें तो तुला पर्वतराय म्हणून कसें कबूल करील ?

रायजीः—आणखी थोड्या दिवसांनीं कल्याणकाम मला विसरूनहि जाईल. त्याच्या मागें सत्रा महत्त्वाचीं कामें. त्यांत घोड्यावरून पड-लेल्या माळ्याची आठवण त्याला कशाला रहाते आहे ?

जालकाः--कल्याणकाम एवढीशी गोष्ट सुद्धां विसरत नाहीं, परवां त्याच्याकडून एक मनुष्य तुझी खबर काढण्यासाठीं आला होता. मीं त्याला म्हटलें, "राई नांवाचा एक माळी येथें होता पण तो कोठें निघून गेला त्याचा पत्ता नाहीं. आणि तो पुन्हां येईलसें वाटत नाहीं."

रायजीः—एक खोटें काम केलें, कीं, त्याचें समर्थन करण्यासाठीं दुसरीं शेंकडों खोटीं कामें करावीं लागतात. असत्याचें बीज पेरणारांच्या मागें हें विकत श्राद्ध लागलेलें असावयाचेंच !

जालकाः--तूं कल्याणकामास स्वतःविषयीं खोटें सांगितलें असतेंस तर मला तुझ्यासाठीं खोटें बोलण्याचा हा प्रसंग आला नसता.

रायजीः--मी काय म्हणून खोटें बोलेन ?

जालकाः--ज्याला राज्य करावयाचें आहे त्याचें खोट्याशिवाय चाल-णारच नाहीं.

रायजी--पण अखिल विश्वाचें राज्य ईश्वर सत्यानेंच चालवीत आहे.

जालकाः—असें कोणत्या तरी शास्त्रांत लिहिलेलें असेल. (बाहेरचें दार वाजविल्याचा आवाज होतो.) जा, तूं त्या पलीकडच्या खोलींत बैस.

मीं दार उघडून येतें. कोणी आलें आहे तें दर्शन करून गेल्यावर तूं बाहेर ये. (रायजी जातो. जालाका दार उघडते व दुर्गेश प्रवेश करतो.) यावें. रुद्रनाथाच्या दर्शनास आज पहिल्यानेंच येत आहां वाटतें ?

दुर्गेशः—बाई, तुम्ही मला ओळखतां हें मला माहीत नव्हतें.

जालकाः—नायब दिवाण दुर्गेशरायांना या कनकपुरांत ओळखीत नाहीं कोण ?

दुर्गेशः—पण ज्यांना मी ओळखीत नाहीं असे लोक कनकपुरांत पुष्कळ आहेत. आधीं तुम्ही कोण हें मला विचारलें पाहिजे.

जालकाः—मी या मंदिराची पुजारीण आहें.

दुर्गेशः—तर मग तुमच्याशींच माझें काम आहे.

जालकाः—आपल्याला जेव्हां पूजा किंवा अभिषेक करविणें असेल तेव्हां आम्ही सर्व व्यवस्था अगदीं आपल्या मनाप्रमाणें ठेवूं.

दुर्गेशः—केवळ पूजेसाठीं माझें स्वतःचें इतक्या दूर येणें होणार नाहीं. मला तितका वेळहि नाहीं. तुम्हांला सवड होईल तेव्हां माझ्या वतीनें एक महारुद्र करावा, आणि जो कांहीं खर्च लागेल तो मागवून घ्या. मी आलों आहें दुसऱ्याच कामासाठीं.

जालकाः—पुजारणीचे हातून दुसरें काय होण्यासारखें आहे.

दुर्गेशः—ऐका, पर्वतरायमहाराज हल्लीं या मंदिरांतील भुयारांत वास करीत आहेत, आणि त्यांच्या आज्ञेवरून बाहेरची सर्व व्यवस्था तुमच्याकडेच आहे; तेव्हां महाराजांना औषधोपचार करणारे वैद्यराज जर कधीं बाहेर निघत असले तर त्यांची मुलाकत होऊं शकेल काय ?

जालकाः—प्रधानजीशिवाय दुसऱ्या कोणासहि भुयाराची जागासुद्धां दाखवूं नये अशी सक्त ताकीद आहे. तेहि एकदांच इकडे येऊन बाहेरून भुयार पाहून चालते झाले.

दुर्गेशः—महाराजांची आज्ञा उल्लंघन करण्याची माझी लेशमात्र इच्छा नाहीं. तळघर कोठें आहे आणि आंत काय चाललें आहे हें मला मुळींच पाहावयाचें नाहीं. फक्त वैद्याची भेट होईल कीं नाहीं, हें जाणण्यास मी उत्सुक आहें.

जालकाः—एवढेंसुद्धां मला सांगतां येईल, कीं, नाहीं कोण जाणे ? पूजा करायचें तेवढें मला माहीत आहे.

दुर्गेश:—वैद्यराजाच्या हालचालीची बातमी दिल्यानें मोठ्याशा रहस्याचा स्फोट होईल असें कांहीं नाहीं.

जालका:—आपण नायब दिवाण आहां, कल्याणकाम, प्रधानजीच्या विश्वासांतले आहां, तेव्हां आपणांस सांगण्यास कांहीं हरकत नाहीं असें आपल्या म्हणण्यावरून मला वाटतें, ह्मणून मी एवढें सांगतें कीं, वैद्यराज कधीं बाहेर येतच नाहींत. हें सांगितल्याबद्दल माझ्यावर कांहीं अरिष्ट आलें तर आपण मला वांचाविलें पाहिजे. मी गरीब बायको आहें. उभ्या जन्मांत पूजेशिवाय दुसरें कसलेंहि काम मला माहीत नाहीं.

दुर्गेश:—येथें झालेली हकीकत मी कोणाच्या कानीं घालणारच नाहीं तर तुमच्यावर ठपका येणार कोठून? वैद्यराज हल्लीं बाहेर येत नसतील; पण मुदत संपल्यावर महाराजांबरोबर बाहेर निघण्याचा वेळ आली म्हणजे मला आगाऊ सूचना पाठवा. त्या संधीला मी त्यांची गांठ घेईन.

जालका:—वैद्यराजाला भेटायला आपण इतके आतुर आहां याचें कारण काय? उसन्या जवानीची आपणाला कांहीं जरूर दिसत नाहीं. मग आपलें तारुण्य चिरकाल कायम राहत असलें तरच आपल्याशीं लग्न करीन अशी अट घालणारी एकादी तरुणी भेटली आहे कीं काय?

दुर्गेश:—(हंसून) अशी कोणी तरुणी अजूनपर्यंत तर भेटली नाहीं आणि कदाचित् भेटलीच तरी जिला असल्या कृत्रिम उपायांची आवश्यकता वाटते, तिच्यासाठीं मी इतके परिश्रम कधीं करणार नाहीं. मी जसा आहें तसा तिला आवडलों पाहिजे; पण तें असो. वैद्यराजाची भेट घेण्यांत माझा उद्देश हा, कीं, त्यांनीं महाराजांकडे माझी शिफारस करावी. कोणीं महाराजांच्या मनांत माझ्याविषयीं कांहीं भरवून दिल्यास त्यांची माझ्यावर इतराजी होण्याचा संभव आहे. त्याचा इलाज आधींपासून करून ठेवण्यासाठीं वैद्यराज बाहेर पडल्याबरोबर त्यांची भेट घ्यावी असा माझा हेतु आहे.

जालका:—महाराजांची मुदत केव्हां संपते तें कांहीं मला ठाऊक नाहीं. मला पुजारणीला या गोष्टी कोण सांगणार आहे? पण आपण म्हणत असाल तर, प्रधानजी कधीं इकडे आले म्हणजे आपल्या वतीनें त्यांना ही गोष्ट मी विचारून ठेवीन.

दुर्गेशः—छे छे ! कल्याणकामास याचा मागमूसहि लागतां उपयोगी नाहीं. मी येथें आलों होतों आणि कांहीं विचारपूस करीत होतों हेंहि त्यांच्या कानीं जातां नये. वैद्यराज कधीं बाहेर येणार हें तुम्हांला दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें कळल्यास मला सांगून पाठवा म्हणजे झालें.

जालका:—हें काम मात्र माझ्यानें होण्यासारखें आहे; पण—आपण पडलां मोठे मनुष्य. काम झालें म्हणजे आमच्यासारख्या गरिबांना विसरून जाल.

दुर्गेशः—दुर्गेशाचे दुसरे कांहीं दोष असतील, पण दुर्गेश कृतघ्न खास नाहीं. तुम्ही महत्त्वाची बातमी देण्याचें कबूल केलें आहे हें मी कधीं विसणार नाहीं. माझें काम होवो अथवा न होवो; पण तुम्हांला जी कांहीं मदत लागेल ती मी अर्ध्या रात्रीं देईन असें वचन देतों. तूर्त माझें दुसरें कांहीं काम नाहीं. (जातो. जालका, दार लावून घेते. रायजी खोलींतून बाहेर येतो.)

रायजी:—शाबास ! बतावणी तर हुबेहुब केलीस. माळणीची भूमिका घेतलीस, जादुगारणीची घेतलीस, आणि शेवटीं पुजारणीची घेतलीस. आणखी किती भूमिका घेण्याचें योजिलें आहेस ?

जालका:—या सर्वांच्या आधीं माझ्याकडे राणीची भूमिका होती, आणि आतां या सर्वांच्या मागाहून मला राजमातेची भूमिका घ्यावयाची आहे.

रायजी:—पडद्याच्या आडून केलेल्या जादूपेक्षां तुझी ही करामत विशेष अद्भुत आहे; पण या बिचाऱ्या दुर्गेशास तूं इतकें कां चकविलेंस ? त्याच्या उमद्या मुद्रेवरून त्याच्याशीं सरळपणा धारण करावा असें तुला नाहीं वाटलें ?

जालका:—त्याला वाटलें होतें, कीं, या पुजारणीला राजकीय बाबतींत कांहीं समजत नसेल, आणि म्हणून आपण सांगूं तसें ती ऐकेल. पण मी कसली वस्ताद ! ही त्याची समजूत खरी आहे असेंच मीं त्याला भासविलें आणि कधीं काळीं उपयोगी पडावा म्हणून त्याच्यावर उपकाराचें टेपरहि ठेऊन दिलें. खरें पाहिलें तर मला कांहीं करायचें नाहीं. बातमी लागलीच तर त्याला ती कळवावयाची एवढेंच.

रायजीः—असला व्यवहार न्याययुक्त नाहीं. पण असो. दुर्गेशाशीं न्यायानें वागण्याचे पुष्कळ प्रसंग येतील. त्याच्या चर्येत असा उमदेपणा आहे, कीं, शीतलसिंहाचे ऐवजीं त्याच्याबरोबरच फिरून कनकपुराचें अवलोकन करावें असें मला वाटूं लागलें आहे.

जालकाः—पण याच्यावर विश्वास कसा ठेवावा ? याला मोठेपणाची किती हांव आहे तें पाहिलेंस ना ? राजाची मर्जी संपादन करण्यांत याला कल्याणकामाच्याहि वर कडी करावयाची आहे.

रायजीः—महत्त्वाकांक्षा सन्मार्गाकडे वळल्यास तिच्यावरचें लोभाचें दडपण निघून जाईल आणि तिला उच्च वातावरणांत वावरतां येईल, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. कल्याणकामाच्या धिमेपणाशीं दुर्गेशाच्या तडफेचा मिलाफ झाला तर दुधांत साखरच पडल्यासारखें होईल.

जालकाः—तुला राज्याभिषेक झाल्यानंतर मंत्रिमंडळाची हवीतशी घटना करतां येईल. पण तूर्त जो मनुष्य अधिक बुद्धिमान त्याला अधिक दूर ठेवावा या नियमाबरहुकूमच वागलें पाहिजे. सहा महिन्यांची मुदत भरण्याची वेळ जवळ येईल तसतसें या भुयाराचें कारस्थान गुप्त ठेवण्यासाठीं मला अधिक अधिक उपाय योजावे लागतील. लोकांची नजर चुकविण्यासाठीं तूं आतां किसलवाडींत राहिलें पाहिजेस. पर्वतराय महराज किसलवाडींत गेले होते हें कोणालाहि माहीत नाहीं. तेव्हां तिकडे कोणी फाजील चौकस रिकामटेकडे जाणार नाहींत.शिवाय जमिनींत पुरलेल्या प्रेताचा मागमुद्दा नाहींसा होईपर्यंत तेथें कोणाचा शिरकाव होऊं नये म्हणून मळ्यावर सक्त देखरेख ठेवणें जरूर आहे. वेळोंवेळीं येऊन मला बातमी देत जा. आतां आरतीची वेळ झाली आहे. कदाचित दर्शनास लोक येतील. तूं जा. मी पुनः पुजारीण बनून बसतें. (जातात.)

प्रवेश ५ वा.

[स्थळः—कल्याणकामाचा बाग. कल्याणकाम व सावित्री फिरत आहेत.]

सावित्रीः—या सर्व फुलांत मला वाटतें चांपाच अधिक सुखी आहे. कारण मधुमक्षिकेकडून त्याला कधीं उपद्रव होत नाहीं.

कल्याणकामः—आणि याच कारणामुळें कवीहि फारसे चांप्याच्या वाटेस जात नाहींत, म्हणून चांप्याला दोन्हीकडून विसांवा आहे.

सावित्रीः--कवींच्या कृतींनीं पुष्पांना कांहीं त्रास होत नाहीं. उलट कवि तर पुष्पांच्या कीर्तीचा प्रसार करतात.

कल्याणकामः--कवीच्या शिवाय इतरांनीं पुष्पावर वाग्बाण सोडूं नयेत असा निर्बंध घालणें शक्य असतें तर पुष्पांना त्रासाचें कांहीं कारणच उरलें नसतें. पुष्पांतील रसस्थान ओळखून कवि त्यावर रसभरित वाग्बाण फेंकीत असतो आणि त्यायोगानें पुष्पाच्या सौंदर्याचें पोषणच होतें; पण तें पाहून, ज्यांना पुष्पांतील रसस्थान दिसत नाहीं, आणि आपल्या वाणींतहि रस उत्पन्न करतां येत नाहीं असे अनेक अधम कवी, शुष्क आणि जड वाग्बाण योजून पुष्पांना विनाकारण व्यथा मात्र करतात. कमलाचें सौंदर्य ज्यांनीं ओळखलें नसेल त्यांनीं कमलावर कविता करण्याच्या भानगडींत पडूं नये हें बरें. परंतु दुर्दैवानें ते कविता करूंच लागले तर त्यांचा हात धरतां येत नाहीं. आणि ज्यांनीं जन्मांत कधीं कमल आणि भ्रमराचा योग पाहिला नाहीं असे पुष्कळ लोक घरांत बसल्या बसल्या कमल-भ्रमराविषयीं वाग्जाळ करीत असतात!

सावित्रीः—सारांश हाच, कीं, ज्यांना चांप्यासारखी शांति पाहिजे असेल त्यांनीं कमलाप्रमाणें रसकोश धारण करूं नये. चांप्याच्या सुगंधांत असणारा अदृश्य आणि अस्पृश्य रस ज्याला समजेल तोच चांप्याच्या जवळ जाईल.

कल्याणकामः—राजकार्यांच्या दगदगीपासून मला परावृत्त करण्यासाठीं तूं नेहमीं अप्रत्यक्ष रीतीनें असा उपदेश करीत असतेस. पण हें शक्य आहे का? प्रधान पद सोडून देऊन मी फक्त राज्याचा सल्लागार होऊन राहिलों तर कसें चालेल? मंत्राला फलप्रद करणारें तंत्र हातांत ठेवलें नाहीं तर हल्लींच्या पेक्षां दुष्टांशीं कमी प्रसंग पडतील आणि राजकार्याच्या संघर्षणानें उत्पन्न होणारी कर्कशताहि सोसावी लागणार नाहीं हें खरें. पण मग या देशाचें काय होईल? माझ्यावर ज्या देशाचा पूर्ण विश्वास त्याला दैवाचे हवाली करून मी बेफिकीर राहूं? युद्ध करण्याचें सोडून मी आचार्य बनलों तर माझ्या जागीं झुंजण्यास कोण तयार होईल?

सावित्रीः—त्याची चिंता परमेश्वरास आहेच.

कल्याणकामः—परमेश्वर आपल्या चिंतांचा उपाय मनुष्यद्वारांच करीत असतो. तेव्हां ज्याच्या शिरावर भार येऊन पडला असेल त्यांनीं तो झुगारून कसा द्यावा ?

सावित्रीः—पर्वतराय महाराज तरुण होऊन परत आले म्हणजे सर्व भार वाहण्यास तेच समर्थ होतील.

कल्याणकामः—काय असेल तें असो, त्या भावी स्थितीची माझ्या मनास कांहीं केल्या कल्पनाच होत नाहीं. उदय होईल तेव्हां दिसेल. तूर्त तर त्या पश्चिमेकडे होणाऱ्या सूर्यास्तासारखा अस्तच आपल्या शिरीं आहे झालें.

सावित्रीः—सूर्यास्ताचा देखावा किती तरी मनोहर आहे !

कल्याणकामः—खरेंच ! वणव्याप्रमाणें दिसणाऱ्या या मेघमालेनें सूर्यास कसें झांकून टाकलें आहे. क्षितिजाखालीं जसजसें त्याचें एकएक पाऊल पडत जातें तसतशी ही मेघमाला अधिकाधिकच प्रदीप्त होते आकाशांत स्वैरपणानें तरंगणारे हे लहान लहान ढगहि हा रंग जणूं झेलून धरीताहेत आणि क्षणोक्षणीं आपला वर्ण बदलून गुप्तपणें नाहींसा होणाऱ्या सूर्याला दिपवीतच आहेत असा भास होतो.

सावित्रीः—इकडची दृष्टि वर आहे. पण या जागीं जरा संभाळून चाललें पाहिजे. येथेंच- (लज्जित होऊन खालीं पाहते.)

कल्याणकामः—(सभोंवती पाहून) ओहों ! याच जागीं एकदां फिरत असतांना मी नकळत एका सर्पावर पाय देणार होतों इतक्यांत दुसऱ्या कोणत्याही उपायानें भयाचें निवारण होणें शक्य नसल्यामुळें तूं झटकन् सर्पावर पाय देऊन माझें रक्षण केलेंस आणि स्वतःवर सर्पाचा दंश ओढून घेतलास. सुदैवानें सर्प विषारी नव्हता. नाहीं तर आज या बागेंत किंवा कल्याणकामाच्या हृदयकुंजांत एक पुष्प किंवा पर्णसुद्धां राहिलें नसतें! हा वृत्तान्त गुप्त ठेऊन तूं जगांतील दिव्य कृत्यांच्या मालिकेस कांहीं अंशीं अपूर्ण ठेवीत आहेस.

सावित्रीः—डंका वाजविल्यानें ही अपूर्णता कांहीं कमी व्हायची नाहीं, उलट अधिकच होईल.

कल्याणकामः—निदान आपल्या संततीस तरी समजलें पाहिजे, कीं, असल्या मातेचें नांव त्यांना पुढें चालवावयाचें आहे !

सावित्रीः—मातेला मुलें फक्त एका प्रसंगावरूनच ओळखतील असें थोडेंच आहे ?

कल्याणकामः—कबूल. पण असला उज्ज्वल प्रसंग त्यांच्यापासून मुद्दाम गुप्त ठेवण्यांत हेतू काय ?

सावित्रीः—गुप्ततेचा स्फोट करण्याचा समय ईश्वरच निश्चित करीत असतो.

(सेवक प्रवेश करतो.)

सेवकः—(नमन करून) भगवन्त, सेनापतींची स्वारी आली आहे.

कल्याणकामः—त्यांना इकडे घेऊन ये. [सेवक जातो.] या वेळीं येण्याचें कारण कांहीं कळत नाहीं. (पुष्पसेन प्रवेश करतो.) यावें पुष्पसेनजी. पूर्व सरहद्दीवरील शत्रूंचा बीमोड झाल्यामुळें आतां कांहीं काळ आपणांस विश्रांती लाभेल असें मला वाटलें होतें, पण आपल्या चर्येवरून तसें दिसत नाहीं.

पुष्पसेनः—आपण मला सैन्य देऊन लढाईवर पाठविणार असतां तर या वेळीं मी खात्रीनें विश्रांतीसाठीं थोडी मुदत मागून घेतली असती, परंतु सैन्यास सैन्य ! नेऊन भिडविण्यासाठीं तूर्त मला लांबची मजल गांठण्याची अवश्यकता नाहीं. माझ्या हृदयांतच रणसंग्राम चालला आहे आणि त्यामुळें आपली आणि वहिनींची मदत मागण्यासाठीं मी आलों आहे.

सावित्रीः—आपण जरा शांत व्हा. या लिंबाच्या पारावर सर्वजण बसू या.

(तिघेहि बसतात.)

कल्याणकामः—हं सांगा आतां. बलाढ्य शत्रूंचीं हृदयें विदारण करणाऱ्या हृदयास व्यथा करणारे कोण आहे ?

पुष्पसेनः—दुसरे कोणी शत्रू नाहीं फक्त माझी लाडकी कन्याच ! !

सावित्रीः—कमलेकडून असा काय अपराध झाला बाई ? तिची आई वारल्यापासून आपल्या संसाराचा भार तिनेंच उचलला आहे, आणि आपल्याला मागच्या दुःखांचा विसर पाडायला तिची सुशीलता आणि तिचा प्रेमळपणाच कारण झाला, होयना ?

पुष्पसेनः—म्हणूनच तिच्या हल्लींच्या दुराग्रहानें मला विशेष दुःख होत आहे. तिच्यासाठीं मी योग्य वर पहात आहें हें आपणास माहितच

आहे. पण दोन दिवस झाले ती दुर्गेशाबरोबर लग्न करण्याचा हट्ट धरून बसली आहे.

कल्याणकाम:—दुर्गेशाबरोबर ?

पुष्पसेन:—होय; माझ्या अंतःकरणास लागतें तें हेंच. ज्याचा मी संतापानें शिरच्छेद करण्यास तयार झालों होतों त्यालाच माझ्या मुलीनें वरावें यापेक्षां मानहानि ती कोणती ?

सावित्री:—दुर्गेशावर तिचें मन बसलें कसें ?

पुष्पसेन:—दुर्गेशाला तिनें एकदांच पाहिला, आणि तोहि माझ्या घरीं आणि माझ्या समक्ष. दुर्गेश मला भेटण्याकरितां आला होता. त्याची चर्या आणि वागणूक मलाहि पसंत पडली. पण कमला त्याच्यावर तात्काल मोहित कां झाली हें कांहीं मला उमजत नाहीं.

सावित्री:—अशा गोष्टी जगांत कोणाला तरी कधीं उमजल्या आहेत? हृदयांत मन्मथाचा संचार आपोआपच व्हावयाचा. त्याचे कांहीं नियम नाहींत आणि कारणहि शोधू गेलें असतां आढळावयाचें नाहीं. त्याचें साम्राज्य आत्मवृत्तींत आणि त्याचें पद अखिल सृष्टींत अनन्य आहे एवढें मात्र खरें !

कल्याणकाम:—दुर्गेशाचा मनोदय काय आहे हें आपल्याला कळलें का ?

पुष्पसेन:—कमला तर म्हणत आहे, कीं, तोहि तिच्याशीं लग्न करण्यास अगदीं उत्सुक झाला आहे आणि त्यांचें प्रेम गाढ आहे. पण मला वाटतें यांत त्याचा कांहीं तरी डाव असावा. कमला पडली साधी भोळी. तिला त्याचे डांवपेंच काय कळणार ? दुर्गेशाच्या वशीकरणास ती भुलली असावी दुसरें काय ?

कल्याणकाम:—दुर्गेशाच्या नातलगांस त्याच्या उलट वाटत असण्याचा संभव आहे.

पुष्यसेन:—कां बरें ? असली देवकन्या प्राप्त झाली तर त्याचें नशीबच उघडेल ! पण कमला माझी एकुलती एक मुलगी माझा जी प्राण, जिच्या कल्याणासाठीं मी मोठमोठें बेत केले, तिचें जीवित शाच्या अज्ञात भावी आयुष्याशीं मी आपल्या हातानें सलग्न करूं क

कल्याणकाम:--व्यग्र चित्ताला कोणताहि उपाय सुचत नसतो. शांतपणानें मनन केलें म्हणजे पुढचा मार्ग आपोआपच दिसूं लागेल.

सावित्री:--कमलेला बोलावून आणून तिच्याजवळ मी ही गोष्ट काढतें.

कल्याणकाम:—आणि मीहि दुर्गेशाचा विचार घेतों.

पुष्पसेन:—आपण दोघे मिळून त्यांचा निश्चय फिरवा, म्हणजे मी कृतार्थ होईन.

कल्याणकाम:--त्यांचा निश्चय फिरवावयाचा कीं, आपला फिरवावयाचा, या दोहोंतून कोणतें इष्ट आहे आणि कोणतें शक्य आहे, हेंच पाहिलें पाहिजे. आतां आपण उगीच कमलेशीं भांडत बसूं नका.

पुष्पसेन:—जें योग्य असेल तेंच आपण कराल अशी माझी खात्री आहे. आजपर्यंत मी आपल्या किंवा वहिनींच्या शब्दाबाहेर कधींहि गेलों नाहीं. बरें तर, येतों मी आतां. [जातात.]

अंक दुसरा समाप्त.



अंक ३ रा.

—:०:—

प्रवेश १ ला.

[स्थळः--दुर्गेशाचा वाडा. कमलेसह दुर्गेश बसलेला आहे.]

दुर्गेशः--प्रिये, आज आपल्या लग्नास एक मास पूर्ण झाला. तरी पण दिवस आणि रात्र, प्रहर आणि घडी, पळ आणि विपळ सर्व एकाकार होऊन त्यांच्या मधील अंतर लुप्त झाल्यामुळें कीं काय, आज विवाहाचा प्रथम दिवसच असल्याप्रमाणें वाटत आहे.

कमलाः—असें म्हणतात कीं स्वर्गांत कालाची गणनाच असत नाहीं.

दुर्गेशः—स्वर्गांत काल नाहीं त्याप्रमाणें दिशाहि नाहींत आणि सीमाहि नसल्यामुळें तेथें राहणारांना स्वर्गाच्याबाहेर जाण्याचा प्रसंगच येत नाहीं.

कमलाः—आपल्याला ज्यांनीं या स्वर्गाचे अधिकारी केलें त्यांचें ईश्वर कल्याण करो.

दुर्गेशः—खरोखर कल्याणकाम आणि सावित्री देवीच्या उपकाराचें ऋण आपल्यावर आजन्म राहील. तुझ्या पित्याच्या कठीण अंतःकरणास मृदु करण्याचें काम त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाच्या हांतून झालें असतें ! जो दंड दुसऱ्याच्या हातून वांकवितांना भंगला असता त्याचीच यानीं कमान करून दाखविली.

कमलाः—कन्यादान करतांना बाबांचें जें प्रेम दिसून आलें तें मागच्या सर्व गोष्टींचा विसर पाडण्यास पुरें आहे असें मला वाटतें.

दुर्गेशः—या सर्व घटनेचे चालक आणि मला कनकपुरांत आणण्यास जे कारणीभूत झाले, त्या भगवन्त कल्याणकामाच्या हृदयाची उदात्तता पाहून माझ्या हृदयाचाहि विकास झाला आहे. माझ्या स्वार्थी राज्य-लोभाची आणि अधम राजद्रोहाची मलाच आतां लाज वाटूं लागली आहे. प्राणेश्वरी, तुझ्या प्रेमप्रसादाशिवाय हें सुभाग्य मला कोठून प्राप्त झालें असतें ! माझ्या हृदयांत प्रेमाची प्रेरणा करून त्याला ऊर्ध्व गति

देण्याचें महत्कृत्य तूं केलेंस. माझें मलिन चित्त सुधेनें धुऊन तूं स्वच्छ केलेंस. आणि म्हणूनच मला आज पवित्र आत्मबलाची प्राप्ति शक्य झाली आहे हें मी कधीं तरी विसरेन काय ?

कमला:—आपण अबलांना नसतें महत्त्व देतां.

दुर्गेश:—शक्ति अबलेच्या रूपानें प्रकट झाली आहे हें मार्मिक विधान प्रसिद्धच आहे.

कमला:—हो, बरी आठवण झाली! सावित्रीदेवीनें महिषासुरमर्दनीचें एक चित्र काढलें आहे त्यांत दुर्गेला चंडीरूपानें न काढतां सौम्य आकृतीची काढली आहे. तिच्या हातांतील खड्ग कोमल पल्लवयुक्त शाखेचें आहे. तिनें पायाखालीं तुडविलेला महिष हा मनुष्याची जडता आहे असें दर्शविण्यासाठीं टक्कर मारतांना मोडलेल्या शिंगांमध्यें त्याचें कपाळ आणि डोळे स्थूल बुद्धीच्या माणसासारखे दाखविले आहेत. त्याचे कान आणि नाक थोडेसें माणसासारखे आणि थोडे पशूसारखे दिसतात. सर्वांना हें चित्र फारच हृदयंगम वाटत आहे. मात्र वंजुल म्हणतो, कीं, " रेड्याला तर शेंपूट आणि शिंगें असतात; रेडा कोठें माणसासारखा काढल्यानें बरा दिसतो ? आणि शिवाय दुर्गा चंडीप्रमाणें विक्राळ आणि रक्तपातास हपापलेली दिसली पाहिजे तर तें महिषासुरमर्दनीचें चित्र ! नाहीं तर हें काय ? "

दुर्गेश:—सावित्रीदेवीच्या रसिकतेची आणि सहृदयतेची या ठोंब्याला काय परीक्षा ? कोठें तिची उच्च भावना आणि कोठें या शंखाची जडतेंत गुरफटलेली बुद्धि !

कमला:—पहिल्यानें मला असें वाटत असे, कीं, कल्याणकाम आणि सावित्रीदेवीच्या गांभिर्यांत आणि प्रौढतेंत प्रेमाला अवकाशच नसेल; पण आपल्या लग्नापूर्वीं त्यांच्याशीं माझा विशेष परिचय झाला तेव्हां मला कळलें कीं, त्यांचें प्रेम अगाध आहे आणि त्यांच्या अनुरागाची नदी दुथडी भरून सारखी वाहत असते. मात्र एका गोष्टीचें मला जरा आश्चर्य वाटलें. त्याना मी कधीं " प्रिया " " प्राणनाथ " किंवा दुसरीं असलीं प्रेमाचीं संबोधनें उच्चारतांना ऐकलें नाहीं. अनिवार कुतूहलामुळें एक दोनदां मी त्यांचीं एकान्तभाषणें आडून ऐकलीं; पण त्यांच्या तोंडून असलें शब्द कांहीं निघाले नाहींत.

दुर्गेशः--प्रिये, मला तर असें वाटतें, कीं, तुला प्रेम-वाचक वचनांनीं संबोधन केल्याशिवाय जी घडी जाईल ती सृष्टीच्या इतिहासांत निरर्थक गेली असेंच म्हणावें लागेल !

कमलाः—आपली हें अत्यंत प्रेम पाहून मला वारंवार भीति वाटते, कीं, त्यांत कधीं काळीं शिथिलता दिसल्यास मला ती सहन तरी कशी होईल ?

दुर्गेशः—माझ्या प्रेमाच्या निश्चलतेवर तुझा विश्वास नाहीं ?

कमलाः—या प्रश्नाचें कारणच काय ? ज्यांना मी आपलें हृदय प्रेमानें अर्पण केलें, ज्यांच्यासाठीं कांहीं काळ मी आपल्या पित्याच्या रोषास पात्र झालें, माझें जीवन ज्यांच्या प्रेमाकरितांच आहे असें मी समजतें, त्यांचें हृदय मला अचल वाटणार नाहीं असें होईल कसें ? लग्नापूर्वीं सावित्रीदेवी मला म्हणाल्या होत्या, कीं, " गेलेलें तारुण्य परत मिळविण्याचा इलाज पर्वतरायमहाराजांना सांपडला आहे; पण नष्ट झालेलें प्रेम परत मिळविण्याचा इलाज अजूनपर्यंत तरी कोणास सांपडला नाहीं. ह्मणून तुम्हां दोघांत आहे तसें प्रेम निरंतर ठेवण्याचें मनोबळ असेल तरच लग्नाचा विचार करा. फेंसावरून पाण्याच्या खोलीचा अंदाज होत नसतो, ह्मणून खळबळाट शांत होऊन फेंस जिरल्यावर पाणी किती राहील याचा आधींपासूनच विचार करून ठेवा. "

दुर्गेशः--मग माझें मनोबळ किती आहे याची तूं चौकशी कां नाहीं केलीस ?

कमलाः--स्वतःवरून जग ओळखावें असें म्हणतात. माझ्या मनोबलावरून आपल्या मनोबलाची कल्पना मला सहज करतां आली. एकाच आंसेवर दोन चक्रें फिरत असलीं म्हणजे एकाची गति दुसऱ्याच्या गतीइतकीच असते हा मुळीं सिद्धांतच आहे.

दुर्गेशः—कमले, तूं आपल्या हृदयाच्या उदात्ततेवरून माझ्या हृदयाच्या उदात्ततेची कल्पना जर करतेस तर पुढेंमागें तुझें हृदय शिथिल होणार नाहीं आणि माझें मात्र होईल अशी शंका तुला येते हा अन्याय नव्हे काय ?

कमलाः—हृदयेश्वरा, मी अन्याय करीत नाहीं; पण आपल्या सुखाची परिपूर्णता पाहून मला वेडीला अशी कुशंका येते कीं, काळाच्या

चंचल पँजानें ही परिपूर्णता विछिन्न तर नाहीं ना होणार ? आपले मित्र त्या दिवशीं म्हणत होते कीं, काळाला सर्व सारखेच.

दुर्गेशः—त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, काळ दिरंगाईनें एकाच्या जवळ उभा राहिला आहे आणि दुसऱ्याच्या जवळून त्वरेनें निघून गेला आहे असें कधींच होत नाहीं.

कमलाः—आपल्या मित्राची आतां येण्याची वेळ झाली आहे. नेह-मीं पेक्षां आज मी जरा लौकरच येईन असें त्यांनीं म्हटलें होतें. ते आपलें नांव सांगत नाहींत, म्हणून त्यांच्याविषयीं बोलतांना सर्वनामांचाच उपयोग करावा लागतो.

दुर्गेशः—त्यांनीं आपलें नांव आणि वृत्तान्त गुप्त ठेवला आहे तरी पण त्यांच्याशीं अकस्मात् समागम झाला, त्या क्षणींच त्यांच्यावर माझा संपूर्ण विश्वास बसला. ते म्हणत असतात कीं, तुमचा माझ्यावर विश्वास आहे त्यापेक्षां माझाच तुमच्यावर अधिक आहे, आणि वेळ आली म्हणजे याची प्रतीति तुम्हांस येईलच.

कमल :—त्यांच्या गुप्ततेंत महातेज झांकलेलें आहे असें वाटल्यावां-चून राहत नाहीं. हे पहा ! आलेच ते. (रायजी प्रवेश करतो.)

रायजीः—तुम्ही दोघेंहि माझी निंदा करीत होतां असें दिसतें.

कमलाः—ज्यांची संपूर्ण स्तुति करणें अशक्य असेल त्याची अपूर्ण स्तुति करणें म्हणजे निंदाच आहे.

रायजीः—स्वतःविषयीं तुम्ही म्हणत होतां कीं, विवाहित दंपत्यास जगांत सर्व कांहीं संपूर्णच आहे. तेव्हां मला वाटतें दुनियेंत उरलेली अपूर्णता तुम्ही अविवाहितांना बक्षीस देऊन टाकीत असाल !

कमलाः—आपण अविवाहित आहां हेंसुद्धां आम्हांला आतांच कळतें आहे. तेव्हां या बक्षीसाची कल्पना कांहीं संभवत नाहीं.

रायजीः—तुम्ही दोघेंहि माझ्याविषयीं इतका आपलेपणा दाखवितां आणि मी मात्र अंतर ठेवून वागतों याचें मला नेहमीं वाईट वाटतें. पण हें अंतर दूर करण्याचा समय येईल तेव्हां माझी वागणूक वाजवी होती असें तुम्हीच कबूल कराल.

दुर्गेशः—यांत कांहीं शंका नाहीं. पण कमलेची जिज्ञासा दाबून ठेवणें जरा जड जातें.

कमलाः—पुरुषांची जिज्ञासा स्त्रियांच्या जिज्ञासेइतकीच तीव्र नसती तर ते शोधीत शोधीत पाताळापर्यंत खास गेले नसते.

दुर्गेशः—बरें, तसें का होईना! पण या वेळीं आम्हांला जिज्ञासा आहे तुझें मनोरम गायन ऐकण्याची! घे ही वीणा. गा पाहूं? (उठून वीणा देतो.)

कमलाः—[वीणा लावून गाते.]

[राग बहार–त्रिताल.)

रस सुखकर घन वरसी रह्यो।
वरसी रह्यो वरसावी रह्यो ॥ धृ० ॥
प्रेम गगन केरो कंई आणी।
पुलक पुलक विकसावी रह्यो ॥ १ ॥
मर्म उपर सिंची रस ज्यां त्यां।
सुरभि सुरभि प्रकटावी रह्यो ॥ २ ॥
ऊर्मिमाळ धारामहिं घेरी।
सरित सरित उछळावी रह्यो ॥ ३ ॥
भिंजवी केसर पांखडि तंतु।
कुसुम कुसुम नितरावी रह्यो ॥ ४ ॥

रायजीः—अहा हा काय हें माधुर्य! असल्या गोड संगीतानें प्रसन्न होऊन चित्त उत्तुंगपदीं आरोहण करतें, किंबहुना, घनवर्षणांत गर्भित असलेल्या खुबीचा आस्वाद घेण्यासाठीं कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन मेघमंडळापर्यंत भरारी मारतें.

कमलाः—हा सौजन्याचा पक्षपात आहे झालें.

रायजीः—या रुक्ष ऋतूंतहि माझ्यासारख्या रुक्ष हृदयाच्या माणसाला आर्द्रतेचा अनुभव आल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या उपकारबुद्धीला पक्षपात कसें म्हणतां येईल?

दुर्गेशः—तुमच्या सहृदयतेंत रुक्षपणाला अवकाशच नाहीं.

कमलाः—आणि असें असूनहि जर रुक्षपणा वाटत असेल तर मला एक सखी आणून द्या म्हणजे तो कसा निघून जाईल तें समजणार सुद्धां नाहीं.

रायजीः—अजून मला पुष्कळ गोष्टी प्राप्त करून घ्यावयाच्या आहेत.

दुर्गेशः—पर्वतराय महाराजांनीं पुनः राज्यसूत्रें हातांत घेतलीं म्हणजे तुम्ही राजसेवेंत दाखल व्हावें अशी माझी सूचना आहे.

रायजीः—ईश्वरेच्छा असेल तसें होईल. हर प्रकारानें लोकसेवा करावी असा माझा हेतु आहे. बरें, महाराजांच्या परत येण्यासंबंधानें लोकांची वृत्ति कशी काय आहे ?

दुर्गेशः—महाराजांचें दर्शन घ्यावयास लोक फार उत्सुक झाले आहेत.

रायजीः—लोकांना महाराज वृद्ध असलेले आवडतील कीं, तरुण झालेले आवडतील ?

दुर्गेशः—तें कांहीं मला सांगतां येणार नाहीं. मला स्वतःला काय आवडेल तें पाहिजे तर सांगतों.

रायजीः—लोकांना काय आवडतें तें मंत्रिमंडळाला कळणें जरूर नाहीं ?

दुर्गेशः—जरूर आहे, पण असल्या बाबतींत लोकांच्या मनांत काय आहे तें कळावें कसें ?

रायजीः—आपली संमति असेल तर रात्रीं वेष पालटून आपण नगरचर्चा ऐकण्यास जाऊं.

दुर्गेशः—योजना उत्तम आहे.

कमलाः—मला एकटीला घरांत सोडून रात्रीं बाहेर फिरण्याची योजना उत्तमच आहे. पण तूर्त नदीकांठीं विहारगृहांत जाण्याची योजना आपल्याला पार पाडायची आहे. चला. आतां उगीच उशीर नको.

[सर्व जातात.]

प्रवेश २ रा.

[स्थळः—कनकपुरांतील एक रस्ता. वेष बदललेला रायजी प्रवेश करतो.]

रायजीः—[स्वगत] या वेळीं मी जगदीप नाहीं, रायजी नाहीं, पर्वतराय नाहीं, आणि दुर्गेशाचा नामहीन मित्रहि नाहीं; पण पांचव्याच

वेषानें नगरांत निघालों आहे. माझें स्वतःचें कांहीं खरें स्वरूप आहे कीं, मी केवळ निरनिराळ्या वेषांचाच बनलेलों आहे याविषयीं मला शंका यावयास लागली आहे. नाट्यप्रयोग संपला म्हणजे नट पुनः आपलें खरें स्वरूप धारण करीत असतो. पण माझ्या नशिबीं विधात्यानें जन्मल्यापासून मरेपर्यंत नित्य नवे नवे वेष घेण्याचेंच लिहिलें आहे काय ?—पण जनसमाजाची सेवा करूं इच्छिणारानें कधीं काळींहि वेष टाकून देण्याचें मनांत तरी का आणावें ? सेवकाला सुटका कोठून असणार ? घरीं काय, दारीं काय, निद्रेंत काय किंवा जाग्रतींत काय, सेवक तो सेवकच. कधीं मंत्रि, तर कधीं सेनापति, कधीं कोतवाल, तर कधीं कोशाधिपति, असे अनेक वेष तो घेत असतो. स्वामीच्या सेवेसाठीं त्याला कधीं पाणी वाहावें लागेल तर कधीं सिंहासनींहि बसावें लागेल ! तो श्वासोश्वास घेतो तोही आपल्या स्वामीसाठीं. असली सेवा पत्करल्यावर मग विश्रांतीचें नांव तरी कशाला पाहिजे ?—पण हा दुर्गेशहि गुप्त वेषानें आलाच. [दुर्गेश आणि पुरुष वेषानें कमला, दोन चरव्या आणि वाट्या घेऊन प्रवेश करतात.] यावें दुर्गेशराय. [कमलेकडे पाहून] आपल्याबरोबर हा मुलगा कोण आहे ?

दुर्गेशः—माझ्या विश्वासांतला एक मनुष्य आहे. मी असा बेत ठरविला आहे कीं, आपण नगरांत उंसाचा रस विकण्यास निघावें. येथें असा रिवाज आहे कीं, या दिवसांत चांदण्या रात्रीं लोक अंगणांत बसून रस पीत असतात. म्हणून या वेषानें आपल्याला सर्व प्रकारच्या लोकांत मिसळतां येईल. आपण दोघें रसाची एक एक चरवी घेऊं आणि हा पोरगा वाट्या घेईल. चला. [चालूं लागतात.]

रायजीः—समोरून ते बुवाजी येताहेत, त्यांच्या हातची बोहणी करूं या. [गोसावी प्रवेश करतो.] जय सीताराम, बोवांजी !

गोसावीः—जय सीताराम ! बच्चा, ये घडे में क्या हय ?

रायजीः—उंसाचा रस आहे, बुवाजी. पितां काय ?

गोसावीः—मुफ्त पिलाय गा तो पिएं गे !

दुर्गेशः—बुवाजी, फुकट पाजूं लागलों तर आम्ही खावें काय ?

गोसावीः—सारा नगर ऐसाहि हय्. हम दाता ढुंढने कु आये, तो लोक हमारेहि पाससे दाम मंगते हय्. हम रुद्रनाथके दर्शनके लिये

आये, तो मालूम हुवा के मंदिर के द्वार रातदिन बंद रहते हय्. हम बुढ्ढे राजा को देखने की, वास्ते आये तो वोह जवान होने के लिये कौन जाने कहां जाके बैठा हय् ! भाई, हम तो यहां नहीं रहें गे. ये कनकपुर में अलख जगाना नकम्मा हय्. [जातो.]

रायजीः—बुवाजीच्या कसोटीला कनकपुरांत कांहीं सोनें आढळलें नाहीं.

दुर्गेशः—गोसाव्याचे उद्गार म्हणजे लोकवाणी नव्हे. संसारांतील गोष्टींची तुलना बैराग्याला कशी करतां येईल ?

रायजीः—गाणें गात आणि नाचत हे कोण विचित्र लोक येत आहेत ?

[अंगावर जागोजागीं आरसे बांधून, आणि हातांतील आरश्यांत तोंड पहात कांहीं माणसें गात गात प्रवेश करतात.]

माणसेंः—

मुख देख दर्पणीं नित्य प्रभातीं उठतां ।
मुख देख दर्पणीं नित्य भोजनीं बसतां ॥
मुख देख दर्पणीं नित्य हाटबाजारीं ।
मुख देख दर्पणीं नित्य राजदरबारीं ॥
मुख देख दर्पणीं नित्य बोलतां वाणी ।
मुख देख दर्पणीं नित्य ऐकतां कहाणी ॥
करी कार्य सकल निजरूप दर्पणीं बघुनी ।
नच जाई कधीं दर्पणा गड्या विसरुनी ॥

रायजीः—अहो तुम्ही आहांत तरी कोण ?

एक मनुष्यः—[दर्पणांत तोंड पाहून] आम्हीं सर्व दर्पण संप्रदायी आहोंत.

रायजीः—हा एक नवाच संपद्राय ! ठीक आहे ! ज्या पृथ्वीवर हजारों संप्रदायांचे डोंगर पडलेले आहेत ती एका नवीन संप्रदायाच्या भारानें कांहीं वांकून जाणार नाहीं.

दुसरा मनुष्यः—[दर्पणांत तोंड पहात] आमचा संप्रदाय भाररूप नाहीं. आम्ही लोकांना दर्पण दाखवून त्यांचा उद्धार करतों, आणि या रीतीन पृथ्वीचा भार हलका करीत असतों.

रायजीः—या शहरांत तुम्हीं केव्हांपासून राहतां ?

पहिला मनुष्यः—[दर्पणांत पाहून] येथें आम्हीं हल्लींच आलों. पर्वतराय महाराजांना म्हातारपण आलें तेव्हां त्यांनीं महालांतील सर्व आरसे फोडून टाकण्याची आज्ञा केली होती. आतां ते तरुण होऊन परत आले म्हणजे राजवाड्यांत पुनः दर्पणांची स्थापना व्हावी अशी विनंति करण्यासाठीं आम्हीं या नगरांत आलों आहों.

रायजीः—महालांत पुन्हां आरसे लावल्यानें काय फायदा होईल ?

दुसरा मनुष्यः—[दर्पणांत पहात] वार्धक्याचे ऐवजीं तारुण्य घेतल्यानें सत्व वाढलें कीं कमी झालें याची महाराजांना कल्पना येईल. आणि महालांतील सर्व माणसांना स्वतःची आणि महाराजांची खरी योग्यता कळून येईल. घ्या तुम्हीहि तोंड पहा. [आरसा दाखवितो.]

दुर्गेशः—अहो आम्ही उंसाचा रस पाजून नाण्यांचें दर्शन घ्यावयास निघालों आहों.

दुसरा मनुष्यः—[आरसा पहात]:—तर मग तुमचें आणि आमचें सूत जुळायचें नाहीं. चला दर्पणदर्शीहो ! [पूर्वीप्रमाणें गात आणि आरशांत पहात सर्व जातात.]

दुर्गेशः—भटकणाऱ्या वाटसरांची थोडी ओळख झाली. आतां चला, आंगणांत बसलेल्या पौरजनांना भेटूं या. ए हुजऱ्या, पुकारा करायला लाग पाहूं !

कमलाः—[हातांतील वाट्या वाजवीत] लेओ कोई रस रसाल ! मिस्री माल ! दिल हो खुशहाल ! [जातात.]

प्रवेश ३ रा.

[स्थळः—कनकपुरांतील दुसरा एक रस्ता. रस्त्यांत कित्येक माणसें रस पीत बसले आहेत. त्यांच्या जवळ रायजी, दुर्गेश आणि कमला आहेत. पलीकडे ओट्यावर स्त्रिया बसल्या आहेत.]

पहिला मनुष्यः—वाः ! लज्जतदार रस आहे बुवा ! रस पिऊन यांनीं जीभ गोड केली नाहीं तो नखशिखांत कडूच राहिला म्हणायचा.

दुसरा मनुष्यः—जगांत गोडपणासारखें कांहींच गोड नाहीं.
तिसरा मनुष्यः—आणि गोडासारखें स्वादिष्टहि कांहीं नाहीं.
चौथा मनुष्यः—आणि स्वादिष्टासारखें सुखकरहि कांहीं नाहीं.
पहिलाः—

(राग हमीर—त्रिताल)

नका करूं अनमान ।
अहो तुम्ही करा त्वरित रसपान ॥ धृ० ॥
या क्षणीं मधुर असे, परी न कळें ।
होईल कटु कधीं काळ बळें ॥ १ ॥

पांचवाः—रस पिऊन ज्याच्या तोंडास मिठी बसते तो पिईल तरी काय !

पहिलाः—ज्याच्या तोंडास मिठी बसेल त्याला रस पितां आला नाहीं असें समजावें.

तिसराः—तृप्त होऊन मिठी बसल्यामुळें पर्वतराय महाराजांनीं पुनः जवानी मागितली, कीं, तृप्तींत कांहीं कमी पडल्यामुळें !

पांचवाः—दोहोंतून एक कारण असलें पाहिजे. आयुष्य कसें घालवावें हें कळलें नाहीं हें मात्र खास.

दुसराः—म्हातारपणीं त्यांना रस आवडला नाहीं कीं, रस मिळाला नाहीं !

पहिलाः—या रस विकणारांनाच कां विचाराना, कीं, तुह्मांला कधीं म्हातारीं गिऱ्हाइकें मिळतात का ते !

रायजीः—तुमच्यासारखें गिऱ्हाइक म्हातारे नाहीं तर काय तरणे म्हणावें !

पहिलाः—हं ! मी काय म्हातारा !

रायजीः—तुमच्यापैकीं कोणी तरी म्हातारा असेलच !

दुसराः—ए, तूं रस विकायला आलास कीं, शिव्या द्यायला !

रायजीः—म्हातारा म्हणणें ही काय शिवी झाली !

तिसराः—नाहीं तर काय मोठा गौरव झाला !

रायजीः—मग पर्वतराय महाराजांना म्हातारपण आवडलें नाहीं ह्मणून दोष कां देतां !

पहिलाः—महाराजांना तर खरोखरीं म्हातारपण आलें होतें. आह्मांला काय त्यांच्यासारखें टक्कल पडलें आहे, का डोळ्यांत मोतिबिंदु वाढले आहेत, का तोंडाचें बोळकें झालें आहे, का हातापायाला कांपरें सुटलें आहे, का अंगावर सुरकुत्या पडल्या आहेत, झालें आहे तरी काय ? महाराजांच्या या सर्व अवयवांत तारुण्य येईल, पण म्हातारें काळीज पुनः तरुण कसें होईल ?

पांचवाः—आतां म्हातारीं माणसें त्यांना वृद्ध म्हणून ओळखणार नाहींत, आणि जवानांना त्यांचें तारुण्य पटणार नाहीं मिळून स्थिति त्रिशंकूसारखीच !

रायजीः—तुम्हाला तरुण राजापेक्षां म्हातारा राजा अधिक आवडतो असें दिसतें.

पांचवाः—आम्हाला चांगला राजा आवडतो. मग तो म्हाताराअ सो कीं तरुण असो ! म्हातारा असला तर त्याला म्हातारपणाची लाज वाटूं नये, आणि तरुण असला तर तारुण्यानें त्यानें बहकून जाऊं नये.

दुर्गेशः—तुम्ही सारे मोठमोठ्या शहाणपणाच्या गोष्टी सांगतां हो !

पहिलाः—अहो हा सारा या मजेदार रसाचा प्रताप ! बढाता हय् अक्कल, खुलाता हय् दिल्, देता हय् कुव्वत मानन्दे पील ! असा हा रस आहे; पण तुम्हाला ही उत्तरेकडील भाषा काय समजणार ? देता हय कुव्वत मानन्दे पील " म्हणजे काय, समजलांत ? हा रस प्याल्यानें हत्तीसारखी शक्ति येते !

दुसराः—तुमच्या बरोबरचा मुलगा चलाख आहे. तुम्ही गोष्टी सांगतच बसला; पण त्यानें ओस्यावर जाऊन बायका मुलांना रस देण्यास सुरुवात केली.

दुर्गेशः—आमची उणीव तो भरून काढीत आहे. (रस्त्यानें जाणाऱ्या स्त्रिया प्रवेश करतात.]

तिसराः—अरे पोऱ्या, समोरून ती मदनमंजरी येते आहे तिला एक वाटी पाज.

कमलाः—कोणाला ?

तिसराः—अरे ती पैठणी नेसून ठुमकत मुरडत येते आहे त्या चटक चांदणीला ?

चौथा:—अरे बायकांत जाऊन असें विचार कीं, लीलावती राणी-सारख्या रुपवान आहेत आणि त्यांच्याचप्रमाणें म्हाताऱ्या नवऱ्याशीं लग्न केलें आहे त्या बाईसाहेब कोणत्या?

कमला:—बायका माणसांना असले फाजील शब्द माझ्यानें बोलवणार नाहींत आणि तुम्हीहि बोलूं नयेत.

चौथा:—मोठा आला आहे बेटा ब्रह्मज्ञान शिकवायला! तूं कोणरे आम्हाला विचारणार?

कमला:—मर्यादा सोडून बोलणाऱ्या माणसाला विचारण्याचा सर्वांना हक्क आहे. गांवांतील स्त्रियांची लाज आम्ही राखली नाहीं तर कोण राखील?

तिसरा:—आम्हाला तूं निर्लज्ज म्हणतोस होय?

कमला:—तुम्हीच तुलना करून पाहा. असें सांगतात कीं, महाराज रत्न दीप-देवांच्या राज्यांत ऐन मध्यरात्रीं एकादी सोळा वर्षांची मुलगी रस्त्यानें एकटी जरी चालली असली तरी तिच्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाची छाती नव्हती. इतकी मर्यादा आज दिसते आहे का? तरुण बायकांना एकट्या पाहिल्या म्हणजे तुम्हाला मनुष्यपणाचा जणूं विसरच पडतो.

तिसरा:—फार चरबटपणा लावलास तर पाहिला का हा सोटा?

कमला:—त्याची तोड ही मजजवळ आहे. [कट्यार काढून दाखविते.]

दुर्गेश:—अरे काय हें! हत्यार काढण्याइतका काय प्रसंग आला आहे? [कमलेस ओढून धरतो.]

कमला:—स्त्रियांची मानखंडना हा कांहीं लहानसान गुन्हा नाहीं!

[पुरुष व स्त्रिया धांवून येतात, आणि तिसऱ्या मनुष्यास धरून ठेवतात.]

एक स्त्री:—म्हाताऱ्या नवऱ्यांच्या बायकांची मस्करी करण्याऐवजीं या मुलाप्रमाणें बायकांचा कैवार घ्यायला शिकाना! असले पुरुष पुष्कळ निघाले म्हणजे कोणी आपल्या मुली म्हाताऱ्यांना देणारच नाहींत.

पांचवा:—आतां आम्हाला जरा स्वस्थ बसूं द्या. उगीच भांडण वाढवूं नका. आणि तुम्हाला भांडायची फार खुमखुमीच असली तर उद्यां सकाळीं येऊन आपली हौस फेडून घ्या. (जातात.)

प्रवेश ४ था.

[स्थळः-- दुर्गेशाचा वाडा. दुर्गेश, कमला आणि रायजी बसलेले आहेत.]

कमलाः--(हंसत हंसत) समजला आपला विचक्षणपणा! माझ्या आवाजावरूनहि आपण मला ओळखलें नाहीं !

रायजीः—स्त्रियांपेक्षां पुरुषांना विचक्षणपणा कमी असतो हें मी कबूल करतों; पण विचक्षणता दाखविण्यासाठीं स्त्रीला पुरुषाचा वेष घ्यावा लागणें ही पुरुषाची नसली तरी पुरुषवेषाची तारीफच म्हटली पाहिजे. या वेषानें आवाजांतसुद्धां स्त्रीत्व प्रकट होऊं दिलें नाहीं हा सुद्धां पुरुष वेषाच्या सामर्थ्याचा एक पुरावाच आहे.

कमलाः—स्त्रियांचें स्त्रीत्व झांकून टाकण्याचें सामर्थ्य पुरुषांच्या अनेक योजनांत आहे यांत कांहीं संशय नाहीं.

रायजीः--ही सर्व गोपनसामग्री असूनहि कट्यार धरण्याच्या ढबीवरून हत्यारांशीं बराच परिचय असावा हें मात्र उघड उघड दिसत होतें.

कमलाः--क्षत्रियकन्या हत्यारांशीं थोडीबहुत परिचित असणारच.

रायजीः--वीरांगनेच्या तेजाची चुणूक पहावयास मिळाली हें आमचें भाग्यच म्हटलें पाहिजे. पण पुरुषवेषानें आमच्याबरोबर येण्याचें कारण कांहीं मला कळलें नाहीं. दुर्गेशरायांना रात्रीं एकटें जाऊं न देण्याइतका अविश्वास कमलादेवीस असेल हें संभवत नाहीं.

कमलाः—प्रेमीजनांना परस्पराचा विश्वास कां अविश्वास ! हें आपणांस अनुभवानें कळून येईलच.

दूर्गेशः--जेथें अविश्वास आहे तेथें प्रेम असणें शक्य नाहीं.

रायजीः--मग अल्पकाळसुद्धां वियोग सहन होत नाहीं म्हणून बरोबर आला कीं काय ! पण तसेंहि नसावें.

कमलाः—कवितेच्या नांवाखालीं वियोगाच्या असह्यतेची जी कृत्रिम वर्णनें करण्यांत येतात, त्यामुळेंच ही असह्यता हास्यास्पद वाटूं लागते. तहानेशिवाय पाण्याची खरी किंमत कळत नसते; मग ज्या सूर्यतापानें तहान लागते त्याची निंदा कां करावी ! पण आपणाला विशेष तर्क करण्याचे श्रम मी देत नाहीं. पर्वतराय महाराजांच्या वर्तनासंबंधानें लोक-

मत काय आहे तें नायब दिवाणजीस कळावें म्हणून आपण ही नगरांत फिरण्याची योजना केलीत. तेव्हां महाराजांच्या वर्तनानें स्त्रीवर्गाची कशी अवमानना होत आहे इकडे नायब दिवाणांचें लक्ष्य जावें म्हणून मी बरोबर आलें होतें. पुरुषवेष घेण्याचें कारण असें, कीं, ही अवमानना दूर झाल्याशिवाय असल्या प्रसंगीं स्त्रियांनीं उघडपणें पुरुषाबरोबर फिरणें अशक्य आहे.

दूर्गेशः--याचा चांगलाच मासला पाहावयास मिळाला. शंभर वर्णनांनीं जें काम झालें नसतें तें आजच्या या प्रकारानें झालें. माझ्या मनावर या प्रसंगाचा जो कायमचा ठसा उमटला तो केव्हांहि निघून जाणें शक्य नाहीं.

रायजीः--नायब दिवाणजी आणि इतर मंत्री या अवमाननेंतून स्त्रीजातीला सोडविण्याचा कांहीं प्रयत्न करतील तरच या ठशाचें सार्थक होईल.

थुर्गेशः—असली स्फूर्तिदायक दीक्षा मिळाल्यावर नायब दिवाण यशांत कांहीं कसूर करील असें तुम्हांस वाटतें काय ?

कमलाः—असें आहे तर स्त्रियांच्या उन्नतिप्रित्यर्थ यज्ञ सुरू करण्याचा संकल्प करा.

रायजीः—मलाहि या संकल्पांत वाटेकरी होण्याची परवानगी असावी.

कमलाः—ठीक आहे. आपण दोघेहि संकल्प करा.

रायजी व दुर्गेशः--[म्यानांतून तरवारी बाहेर काढून]--स्त्रीजातीच्या अवनतीचा परिहार करण्यासाठीं आम्ही असा प्रखर हुताशन प्रज्वलित करूं कीं, त्याच्या प्रचंड ज्वाळेंत अज्ञान, स्वार्थ आणि दुर्मति हीं सर्व भस्म होऊन गेलींच पाहिजेत !

कमलाः—तथास्तु !

दूर्गेशः--पर्वतरायमहाराजांचें नवें राज्य झालें म्हणजे हा यज्ञ सुरू करण्यास अनुकूल समय येईल.

रायजीः--नवें राज्य कसलें ?

घुर्गेशः—नव्या तारुण्याबरोबर राजनीतींतहि नवें बळ येणार नाहीं ?

रायजी:—तारुण्याचा आणि राजनीतीचा कोणत्या प्रकारचा संबंध असतो, आणि तारुण्य एकदां गेल्यावर पुनःत्याच रूपानें येईल कीं दुसऱ्या एकाद्या रूपानें—हे सारे गहन प्रश्न या मध्यरात्रींच्या घनांधकारानीं अधिक गहन करून फायदा काय ? आतां आपल्यापुढें निद्रा सुलभ कशी करावी हाच एक प्रश्न आहे तो सोडविण्याच्या तयारीस लागलेलें बरें. [जातात.]

अंक तिसरा समाप्त.

अंक ४ था.

——:o:——

प्रवेश १ ला.

[स्थळः—रुद्रनाथाचें मंदिर. जालका आणि शीतलसिंह प्रवेश करतात.]

शीतलसिंहः—आज सकाळींच कल्याणकामानीं मला बोलावून सांगितलें कीं, महाराजांची नगरांत कधीं प्रवेश करण्याची इच्छा आहे याची पुजारणीकडून चौकशी करवा म्हणजे राजोपाध्याला मुहूर्त निश्चित करण्यास सांगूं.

जालकाः—रायजीला मुहूर्ताची पर्वा नाहीं. पण पर्वतरायाचें सोंग घेतलें म्हणजे त्यालाहि महाराजाप्रमाणें मुहूर्त आणि योग पाहून प्रत्येक काम केलें पाहिजे. कल्याणकामाला सांगा, कीं, उद्यां रात्रीं सहा महिने पूर्ण होतात तेव्हां त्यानंतरचा पहिला उत्तम मुहूर्त ठरवून इकडे वर्दी द्यावी अशी महाराजांची आज्ञा आहे. स्वारीच्या व्यवस्थेविषयीं महाराज मागावून निरोप धाडतील असेंहि कळवा.

शीतलसिंहः—उद्यां रात्रीं रायजींनीं होईल तितके लौकर भुयारांत दाखल झालें पाहिजे. स्वारीचा मुहूर्त एकदां ठरला म्हणजे लोक जिज्ञासेनें मंदिराभोंवती घिरट्या घालूं लागतील. तुम्हालाहि बरी युक्ति सुचली कीं, अगोदरपासूनच, मंदिराचीं दारें बंद करून टाकलीं. हल्लीं दर्शन होत नाहीं असें कळल्यामुळें इकडे लोकहि फारसे येत नाहींत.

जालकाः—भुयाराचें एक दार मंदिराच्या मागच्या बाजूला अवाराबाहेर असलेल्या एका खोलींत आहे. रायजीला तिकडून आंत येण्यास सांगूं म्हणजे आजूबाजूला फिरणाऱ्या लोकांचें लक्ष जाणार नाहीं. रायजी पर्वतराय बनून मंदिराच्या महाद्वारानें बाहेर निघाला म्हणजे वैद्यराज आदले रात्रीं मागच्या वाटेनें निघून गेले असें तुम्ही लोकांना सांगा; पण रायजीला इकडे पाठविण्यापूर्वीं तुम्ही एक जागा दाखवून ठेवली पाहिजे.

शीतलसिंहः—लीलावती राणीचें शयनगृह.

जालकाः—मी तेंच सांगणार होतें. आज रात्रीं त्याला तेथें घेऊन जा.

शीतलसिंह:—ठीक आहे. महालांतील एका गुप्त खिडकीवाटें रायजीच्या दृष्टीस राणीसाहेब पडाव्यांत अशी मी व्यवस्था करतों.

जालकाः—रायजीनें कधीं राणीला पाहण्याची जिज्ञासा दाखविल्याचें तुम्हांला आठवतें काय ?

शीतलसिंह:—त्यांनीं याविषयीं कधीं गोष्टच काढली नाहीं. ही बाबत त्यांना सुचली नसावी असें वाटतें.

जालकाः—पहा बरें ! विषय नाजूक आहे. त्याच्या पुढें काढतांना फार धोरण लढविलें पाहिजे.

शीतलसिंह:—याबद्दल मागेंच तुम्ही सूचना केली होती ती माझ्या लक्षांत आहे. हो, बरें आठवलें. काल फिरत असतांना त्यांच्या खिशांतून हा कागद पडला तो मी हळूंच उचलून घेतला. कांहींसें लिहिलेलें आहे पण बरोबर समजत नाहीं.

जालकाः—(कागद घेऊन वाचते.)

(अंजनगीत.)

" विचित्र पटा या कोण विणितसे ?
तंतू अवश हे कोण तणितसे ?
अगम्य भासे हेतू तयाचा;
तंतू अबल हा मनुष्य साचा !

पण नाहीं, चुकलों.

(दिंडी.)

नससि मुळिंहि बलहीन मानवा तूं.
सकल कार्यें कारितोस निश्चयें तूं
मार्ग असती तुजपुढें खुले दोन्ही
एक स्वीकारी योग्य पारखोनी.

राई, ईश्वरानें तुला जी शक्ति दिली आहे तिचा कसून उपयोग कर-स्वतःला " अबला " " असहाय " असलीं विशेषणें लाऊन तूं फसव-तोस कोणाला ? " (हंसते.)

शीतलसिंह:—हें काय बुवा ! मला कांहीं यांतलें कळलें नाहीं.

जालका:—आहे काय त्यांत ? रायजीला फुरसतीचें वेळीं असलें कांहीं तरी भरकटण्याची संवय आहे झालें. जरा लेखणी द्या पाहूं. रायजीनें विचारलेल्या प्रश्नाला मी या कागदावरच उत्तर लिहून देतें. (लिहिते.) " खेळांतल्या सोंगट्या, राई तेवीं जालका, कोण फसवी कुणाला, खेळ जेथें सारखा ? " हं, घ्या. पुनः हा कागद गुपचुप त्याच्या खिशांत ठेऊन द्या. (कागद देते.) आतां किसलवार्डीत जा आणि रायजीला तयार राहण्यास सांगा. महालांतून परत आला म्हणजे मला हकीगत कळविण्यास इकडे या. (जातात.)

प्रवेश २ रा.

[स्थळः—कनकपुरांतील राजमार्ग. रायजी व शीतलसिंह प्रवेश करतात.]

रायजी:—शीतलसिंह आज आपण कोणीकडे जात आहों ?

शीतलसिंह:—प्रभापुंज महालांत.

रायजी:—महालापेक्षां नगरांत फिरल्यानें मला अधिक आनंद होतो.

शितलसिंह:—शहराचे मुख्य मुख्य भाग आपण पाहिले आहेत तेवढ्यानें काम भागेल; पण महालांतील प्रत्येक कोपऱ्याची आपणाला माहिती झाली पाहिजे.

रायजी:—महालांत आतां पाहायचें राहिलें आहे काय ?

शीतलसिंह:—राणीचें शयनमंदिर.

रायजी:—राणीचें ! कोणती राणी ?

शीतलसिंह:—लीलावती.

रायजी:—तिचें शयनमंदिर पाहण्याची मला काय जरूर ?

शीतलसिंह:—आपण आतां पर्वतराय होणार. तेव्हां पर्वतरायाच्या राणीची ओळख नको का व्हायला ?

रायजी:—शीतलसिंह, तुमच्या या उद्गारांत कांहीं मर्म दिसतें आहे. (थांबून) मला कांहीं अमंगल चिन्ह झाल्यासारखें वाटतें. तुम्हालाहि तसेंच वाटतें काय ?

शीतलसिंह:—मला नाहीं बुवा तसें कांहीं वाटत.

रायजी:—(आकाशाकडे पाहून) पाहा, चंद्र उगवतो न उगवतो तोंच त्याच्यावर हा विक्राळ ढग चाल करून येत आहे. ढगाची आकृति तरी किती भयानक दिसते ! काळेंकुट्ट गांठाळ शरीर, हात वांकडे, पाय लठ्ठ आणि आखूड, कपाळावर गेंड्यासारखें शिंग, मानेचा पत्ता नाहीं आणि डोकें लहान, असा हा विद्रूप राक्षस बिचाऱ्या चंद्राला गिळण्यासाठीं जणूं धांवून येत आहे !

शीतलसिंह:—हा सारा आपल्या कल्पनेचा खेळ आहे. मला तर ढगासारखा ढग दिसतो आहे. राक्षस कसला आणि काय कसलें ! पहा, आपण महालाच्या मागील दारीं येऊन पोंहचलों.

रायजी:—शीतलसिंह, मला जरा हात द्या. माझे पाय कां कांपावयास लागले कोण जाणे !

शीतलसिंह:—हें काय ? महालांत आपण कितीदां तरी जाऊन आलों ! आज नव्यानें थोडेच जात आहों ? आपली नेहमींची हिंमत या वेळीं कोठें गेली ?

रायजी:—काल रात्रीं मला झोंप मिळाली नाहीं ह्मणून घेरी आल्यासारखें वाटतें. विशेष कांहीं नाहीं; पण राणीचें शयनगृह आपल्या दृष्टीस पडणार कसें ?

शीतलसिंह:—त्याची काळजी नको. पर्वतराय महाराजांनीं छताजवळ एक लहान चोर खिडकी ठेवली आहे. राणीला किंवा तिच्या दासींना ती कांहीं माहित नाहीं. खिडकी बंद असली म्हणजे भिंतीवरच्या चित्रांत तिचीं दारें मिळून जातात. आणि खिडकीजवळ एक मोठें झुंबर टांगलें आहे त्यामुळें खिडकी उघडली तरी शयनागारांतील माणसांच्या ती नजरेस पडत नाहीं. आपण त्या खिडकीजवळ जाऊन बसूं म्हणजे झालें.

रायजी:—पर्वतरायांनीं ही खिडकी कशासाठीं ठेवली असावी बरें ?

शीतलसिंह:—राणी एकांतांत काय करते त्यावर गुप्त देखरेख ठेवतां यावी ह्मणून.

रायजी:—पर्वतरायांना राणीचा इतका अविश्वास होता ?

शीतलसिंहः—म्हाताऱ्या नवऱ्याला तरुण बायकोबद्दल अविश्वास वाटायचाच.

रायजीः—असला प्रेमहीन विवाहपाश पर्वतरायांनीं बांधून तरी कां घेतला ?

शीतलसिंहः—पाळलेलें पांखरूं उडून जाऊं नये म्हणून आपण त्याला पिंजऱ्यांत कोंडून ठेवतों, एवढ्यावरून त्याच्यावर आपलें प्रेम नाहीं असें होतें काय ?

रायजीः—(स्वगत) शाबास ! काय प्रेमाची विटंबना ही !

शीतलसिंहः—चला, आंत जाऊं या. नेहमींप्रमाणें हें दप्तर घेऊन तुम्ही नौकरासारखें माझ्या मागून चाला. (जातात.)

प्रवेश ३ रा.

[स्थळः—प्रभापुंज महालांतील राणीचें शयनमंदिर. लीलावती व मंजरी शयनगृह शृंगारीत आहेत. रायजी आणि शीतलसिंह छताजवळ झुंबराच्या आड खिडकींत बसले आहेत.]

शीतलसिंहः—(हळूंच) चंद्रकळा नेसली आहे ती लीलावती. पांढरें पातळ नेसलेली तिची दासी मंजरी.

रायजीः—(हळूंच) वस्त्रांची खूण कशाला ? राणी कोणती आणि दासी कोणती तें कांतीवरूनच उघड दिसतें आहे.

मंजरीः—(मंचकाला तोरण बांधीत) हें टपोऱ्या मोत्यांचें तोरण पलंगास काय म्हणून बांधतां ? छताला लहान मोत्यांची जाळी आहे तेवढी पुरे. हें तोरण पलंगाला बांधण्याऐवजीं दारावर बांधलें तर अधिक नाहीं का शोभणार ?

लीलावतीः—दारावर मी एकटीच उभी राहून महाराजांचा सत्कार करीन. तोरणच हवें तर माझ्या नेत्रांचें तोरण दाराला बांधलेलें असेल आणि त्यांच्या खालीं हें हृदय हिरा होऊन लटकत राहील. एवढें असल्यावर महाराजांची दृष्टि दुसऱ्या तोरणावर जाईल कशी ?

मंजरीः—महाराज तर आपल्याला तेव्हांच ओळखतील. पण आपण

महाराजांना पुरतेपणीं ओळखण्याच्या अगोदरच नेत्रांचें तोरण बांधणार आणि हृदयाचा हिरा लटकावणार !

लीलावती:--शरीराची आकृति पालटल्यामुळें महाराज कदाचित् ओळखूं येणार नाहींत असें तुला वाटतें; पण माझ्यावरचें त्यांचें प्रेम थोडेंच झांकलेलें राहणार आहे ! ओळख पटायला तेवढेंच पुरें नाहीं कां ? नुसती दृष्टादृष्ट होण्याचा उशीर, कीं, मी त्यांना ओळखलेंच ह्मणून समज.

मंजरी:--महाराजांचें येथें कधीं येणें होईल हें कांहीं कळलें का ?

लीलावती:--उद्यां जोशी मुहूर्त सांगणार आहेत; पण मी प्रधानजींना सांगून पाठविणार आहे, कीं, महाराजांची स्वारी आल्याबरोबर त्यांनीं अगोदर माझ्या महालांत यावें आणि नंतर दरबारांत जावें अशी व्यवस्था करावी.

मंजरी:--महाराजांना भेटायला आपण तर भारी उतावळे झालां आहां; पण प्रधानजींना इतक्यांत सांगून पाठविण्याची घाई करूं नये असें मला वाटतें. महाराज आपण होऊन अगोदर इकडे येण्याची व्यवस्था करतात कीं काय तें पाहूं या, म्हणजे त्यांच्या प्रेमाची आयतीच परीक्षा होईल.

लीलावती:--असली परीक्षा पहायला माझें मन बाई नाहीं धजत. कदाचित् कामाच्या धांदलींत महाराज आधीं इकडे येण्यास विसरले म्हणजे ते मला भेटायला उत्सुक नाहींत अशी समजूत होऊन माझ्या हृदयाला ज्या वेदना होतील त्या मी कशा सहन करूं ? पण मीहि चुकलें आणि तूंहि चुकलीस. महाराजांची परीक्षा कसली पाहायची ? त्यांच्या उत्कंठेविषयीं आम्हाला शंका वाटली हा आमचाच वेडेपणा. महाराजांनीं सहा महिन्याचा खडतर बंदीवास पतकरला तो माझ्या साठींचना ?

मंजरी:—आपल्यासाठीं कां स्वतःसाठीं ?

लीलावती:—मंजरी, तुझ्या अंगांत आज कांहीं वारें शिरलें आहे वाटतें ?

मंजरी:—मी नेहमीं असतें तशीच आहे. आपली आज्ञा असेल तर बोलतें, नाहीं तर राहिलें.

लीलावती:--बोल. मी तुला बोलायला कोठें नको म्हटलें आहे ?

मंजरीः--महाराज तरुण झाले ते आपल्यासाठीं असें आपण म्हटलें तें कसें ?

लीलावतीः—अग मीं प्रसन्न व्हावें, माझ्या सुखांत कमतरता नसावी, ह्मणूनच महाराजांना तारुण्य हवें आहे.

मंजरीः–ह्मणजे ? महाराज वृद्ध होते तेव्हां आपण प्रसन्न नव्हतां, सुखी नव्हता असेंचना ? आपली प्रीति महाराजावर आहे कीं तारुण्यावर ?

लीलावतीः--असले विनयहीन प्रश्न विचारण्याचें तूं कोठून शिकून आलीस ?

मंजरीः—आपली आज्ञा आहे म्हणून बोलतें. माझें म्हणणें असें आहे कीं, आपल्या सुखांत कांहींच उणीव नव्हती. पण म्हातारपणांत महाराजांना स्वतांमध्यें कांहीं कमीपणा वाटत असावा म्हणून ते तरुण झाले.

लीलावतीः—वा मंजरी, तूं तर मोठी पंडिता झालीस !

मंजरीः--या सहा महिन्यांत आपण मला जवळ बसवून प्रेमाची अनेक पुस्तकें वाचून दाखविलीं आहेत. त्यामुळें मी पंडिता झालें असलें तर कांहीं सांगवत नाहीं. दुसऱ्या कोणत्याहि विद्येंत मी अपूर्ण नाहीं. कां माझें म्हणणें कांहीं खोटें आहे का ? आपण तर महाराजांना तरुण व्हायला सांगितलें नव्हतें ना ?

लीलावतीः—आमच्या गुप्त गोष्टी मी तुला काय म्हणून सांगेन ? आतां महाराज आले म्हणजे त्यांच्या वैद्यराजांना सांगूं कीं, आमच्या मंजरीचा नवरा ऐंशी वर्षांचा म्हातारा जख्ख होईल असा कांहीं तरी इलाज करा, म्हणजे तूं विचारतेस त्या प्रश्नाचा आपोआप उलगडा होईल.

मंजरीः—म्हातारपण यायला वैद्याची जरूरी नसते आणि राजाज्ञेचीहि जरूरी नसते.

लीलावतीः—मग कशाची जरूर असते ! दुर्दैवाची !

मंजरीः—दुर्दैवाची असेल किंवा सुदैवाची असेल ! !

लीलावतीः--तोरण बांधून झालें. आतां या प्रत्येक पुतळ्याच्या हातांत एक एक आरसा ठेव. बिलवरी पुतळ्याशेजारीं आरशाच्या सोनेरी चौकटी फार खुलून दिसतील नाहीं बरें !

मंजरी:--महालांत आरसे लावण्याची मनाई आपण विसरलांत वाटतें ?

लीलावती:--आतां आरसे लावण्याला महाराज प्रतिबंध करताहेत कशाला ?

मंजरी:--आज्ञेशिवाय आरसे कां लावले असें जर महाराजांनीं विचारलें तर ?

लीलावती:--असें विचारलें तर म्हणेन, कीं, दर्पणांनीं मागच्या दोषाबद्दल प्रायश्चित्त घेतलें असल्यामुळें आतां त्यांच्यात मनासारखें प्रतिबिम्ब दिसेल याची मी हमी घेतें. आणि इतक्यांवर महाराजांची दर्पणावर झालेली इतराजी कायम आहे असें दिसून आल्यास त्यांच्या गालाशीं गाल आणि भुजेशीं भुज लावून मी त्यांना आरशापुढें घेऊन जाईन.

रायजी:--(हळूंच) शीतलसिंह, माझ्यापासून दूर होऊं नका.

शितलसिंह:-मी आपल्या जवळच आहे. पण असें आहे तरी काय ?

रायजी:--पुष्कळसें आहे.

मंजरी:--आरशाजवळ नेऊन महाराजांची कशी खात्री कराल ?

लीलावती:--बरीच आहेस कीं ग तूं ! लाडीगोडी लावून विचारतेंस आणि मी आपली चटकन बोलून जातें. माणसाला फसविण्यांत मोठी पटाईत आहेस बाई !

मंजरी:--मी विचारतें एक आणि आपण सांगतां भलतेंच. आज्ञा नसतांना दर्पण लावण्याचें कारण महाराजांनीं विचारलें तर काय सांगावें एवढेंच मी आपणाला विचारलें, तोंच आपण मनांतली हौसेची गोष्ट बोलून दाखविली यांत माझा काय अपराध ?

लीलावती:--बरें दर्पणाशिवाय एकहि पुतळा राहिला नाहीं. आतां मेहराबींत काढलेल्या कमळांनां लाल रंग द्यायला लाग पाहूं. गहिरा रंग कोठें द्यावयाचा आणि पक्का कोठें द्यावयाची यांत चुकूं नकोस हो.

मंजरी:--सर्वच कमळें तांबडीं करावयाचीं कीं काय ! मधून मधून पांढरींहि असूं द्यावींत.

लीलावती:--महाराजांना आरक्तकमलांचीच भारी आवड आहे. त्यांच्या उपमाही नेहमीं त्याच फुलाच्या असतात. त्या दिवशीं मी लाल

चंद्रकला नेसलें होतें, तेव्हां–पण जा गडे, पुनः तूं मला कांहीं तरी बोलायला लावलेस !

मंजरीः—मी कांहीं बोलायला लावलें नाहीं. आपणच राहून राहून उगीच दचकून उठल्यासारखें करतां आणि मला दोष देतां.

लीलावतीः—दचकून उठायला मी थोडीच झोपेंत आहे ?

मंजरीः—झोपेंत नाहीं गुंगीत आहां.

लीलावतीः—ती कशी बाई !

मंजरीः—गुंगींत असल्याशिवाय रात्रीच्या वेळीं हें चित्रें रंगविण्याचें काम हातांत घेतलें ?

लीलावतीः—उद्यां मुहूर्त निश्चित ठरणार अशी बातमी लागल्याबरोबर आपण महाल शृंगारण्याला आरंभ केला. आतां अवकाश फारच थोडा राहिला आहे. शिवाय कमळांच्या दोन्ही बाजूला दोन समया ठेवावयाच्या आहेत. तेव्हां रंग होता होईल तो लौकरच दिला पाहिजे, म्हणजे उद्यांपर्यंत सुकेल आणि चमकदार दिसेल. पण मंजरी, तुला एक गोष्ट सांगण्याचें मी विसरूनच गेलें. आपली ती जालका माळीण पुष्कळ महिन्यांनीं आज सकाळीं आली होती. ती म्हणे कोठेशीं गेली होती तेथून तिनें नक्षीचीं दोन तबकें आणिलीं होतीं. ती आज आपल्याला भेट म्हणून देऊन गेली. त्या पलीकडच्या चौरंगावर ठेवलीं आहेत. तीं आण जा पाहूं. (मंजरी तबकें घेऊन येते,) पहा, काय सुंदर नक्षीकाम केलें आहे !

मंजरीः—कांहीं चित्रेंहि दिसताहेत.

लीलावतीः—होय पूर्वींच्या रत्नदीपदेव राजाच्या वेळचीं तीं आहेत. एका तबकावर त्या राजाच्या दरबाराचें चित्र आहे आणि दुसऱ्यावर ज्या लढाईत त्याचा पराभव झाला त्या लढाईचें चित्र आहे. कोठेंशीं हीं तबकें विक्रीस ठेविलीं होतीं. आपल्या महालांत असावींत म्हणून जालकेनें विकत घेतलीं. महाराज आले म्हणजे या तबकांत ठेवण्यासाठीं फुलांचे गजरे आणि मंचकावर टाकण्यासाठीं फुलांचा पलंगपोस देऊन जाईन असें जालका म्हणाली.

शीतलसिंहः—(हळूंच) आपल्या सुखासाठीं जालकेनें काय तयारी चालविली आहे तीं पाहिलींत !

रायजीः—(इळूंच) वैभैवाचीं आणि युद्धांचीं चित्रें माझ्या डोळ्या-समोर ठेऊन मला प्रोत्साहन देण्याची आणि शेवटपर्यंत माझ्यावर देख-रेख ठेवण्याची जालकेची ही तजवीज आहे. पण राणीला एकाएकीं काय झालें ?

(मंजरीच्या खांद्यावर मान टाकून लीलावती दीर्घ निश्वास सोडतें.)

मंजरीः—बाईसाहेब प्रकृति बिघडली कीं काय ? तरी म्हटलें इतके श्रम सोसणार नाहींत !

लीलावतीः—मंजरी, प्रकृति बिघडायला काय झालें आहे. पण या चित्रांनीं मला यांच्याहिपेक्षां जुन्या वृत्तान्ताचें स्मरण होऊन मनांत वेड्या वाकड्या शंका यावयास लागल्या आहेत. महाराजांचें घराणें स्वदेशांत असतांना मामंजीला मूल बाळ नव्हतें म्हणून पहिली राणी वार-ल्यावर त्यांनीं एका तरुण राजकन्येशीं लग्न केलें, पण तिलाही दोन तीन वर्षांत मूल झालें नाहीं. तेव्हां पुढें मामंजीनीं तिसरें लग्न केलें. या तिसऱ्या राणीच्या पोटीं महाराज झाले पण त्या दिवसांपासून मामंजींना दुसऱ्या राणीचा अजिबात विसर पडला आणि ती बिचारी झुरून झुरून इह लोक सोडून गेली. मंजरी, या दुसऱ्या राणीसारखी माझी दशा झाली तर कसे करूं ? महाजांचें यौवनच मला शापरूप होणार नाहीं कशा-वरून ? हा सर्व शृंगार माझ्या उपहासास कारण होणार नाहीं याची काय खात्री ?

मंजरीः—भरधांव मोकळी सोडलेली कल्पना शेवटीं भलत्याच शंके-वर जाऊन आदळली ! बाईसाहेब, स्वस्थ व्हा. विनाकारण मनाला त्रास कां करून येतां ? महाराजांचें आपल्यावर अपार प्रेम आहे.

लीलावतीः—महाराजांच्या प्रेमाविषयीं मला मुळींच शंका नाहीं. पण माझी उत्सुकता नसत्या शंका उत्पन्न करून मला विव्हल करीत आहे. दिशा किंवा काळामुळें पडणाऱ्या अंतराचें मला कांहीं वाटत नाहीं, पण कुशंकेनें प्रेमांत जें अंतर उत्पन्न होतें तें मात्र असह्य आहे.

मंजिरीः—आपण आतां गच्चींत जाऊन जरा विसांवा घ्या, म्हणजे पहांटेस शयनगृह शृंगारण्यास हुषारी वाटेल, आणि मनासारखी तयारीहि चटकन करतां येईल. चला. [दोघी जातात.]

शीतलसिंह:—आपण स्वस्थ कां दिसतां ?

रायजी:—भविष्यकालाचें अंधुक चित्रसुद्धां कल्पनेला रेखाटतां येत नाहीं. जिकडे पहावें तिकडे अभेद्य सीमेचें तट कल्पनेला अवरोध करण्यास उभे आहेत. शीतलसिंह, चला. महालांतील हवेनें आपला गुदमारा झाला आहे. बाहेरच्या मोकळ्या हवेचा आस्वाद घेऊं या. (जातात.)

प्रवेश ४ था.

[स्थळ:—कनकपुरांतील राजमार्ग. रायजी आणि शीतलसिंह प्रवेश करतात.]

शीतलसिंह:—आपण विचारांत फार मग्न दिसतां. महालांतून निघाल्यापासून आपल्या तोंडांतून एक अक्षरहि बाहेर पडलें नाहीं.

रायजी:—या अडचणीला काय इलाज करावा याच्या विचारांतआहे.

शीतलसिंह:—कोणती अडचण ?

रायजी:—लीलावती राणीच्यासंबंधीं.

शीतलसिंह:—त्या बाबतींत काय अडचण आहे ? लीलावती तर पूर्ण प्रेमानें आणि विश्वासानें आपल्याला भेटायला अधीर झाली आहे याचा प्रत्यक्ष पुरावा एका घटकेपूर्वीं आपणास मिळालाच आहे;

रायजी:—मला भेटायला ?

शीतलसिंह:—आपल्या पतीला भेटायला म्हणजे आपल्यालाच भेटायला.

रायजी:—शीतलसिंह, ही काय विपरीत गोष्ट बोलतां ! मी तिचा पति नाहीं.

शीतलसिंह:—पण आपण पर्वतराय म्हणून प्रकट होणार आहां ना ?

रायजी:—मुष्किली आहे ती तेथेंच. मी पर्वतराय आहे पण लीलावतीचा पति नाहीं असें कोणत्या रीतीनें प्रतिपादन करावें तेंच सुचत नाहीं.

शीतलसिंह:—असें प्रतिपादन करणें अशक्य आहे. आपण पर्वतराय झाला म्हणजे पर्वतरायाचे सर्व संबंध आणि व्यवहार आपणांस चिक-

टणारच. पर्वतराय म्हणून आपण राज्याचे स्वामी व्हाल आणि अमृतमय सुखाचे अधिकारी व्हाल.

रायजीः—शान्तं पापम्. असले शब्द माझ्यापुढें उच्चारूं नका.

शीतलसिंह:—राणीचें सौंदर्य अनुपम आहे.

रायजीः—म्हणून काय झालें ?

शीतलसिंह:—अशा अनुपम सुंदरीचें स्वामी होण्याला आपली हरकत तरी काय आहे ?

रायजीः—हरकत हीच कीं, मी तिचा स्वामी नाहीं.

शीतलसिंह:—पति म्हणून ती आपला स्वीकार करील, मग काय ?

रायजीः—केवळ फसवणूकीमुळें—मी खरोखरीं पर्वतराय आहे अशी समजूत होऊन ती स्वीकार करील, पण काय म्हणून मी अनीतिमार्गाचें अवलंबन करावें आणि तिलाहि करायला लावावें ?

शीतलसिंह:—पर्वतरायाच्या रूपानें पर्वतरायाच्या गादीवर बसण्यांत अनीति नाहीं तर पर्वतरायाच्या राणीचा पति होण्यांत कसली आली आहे अनीति ?

रायजीः—(स्वगत) याचें म्हणणें बरोबर आहे, पण उलटून बोलतो आहे एवढेंच. दोन्हीं कृत्यें सारखींच अनीतिमय आहेत. (उघड) शीतलसिंह, तुमच्या लक्षांत एवढी गोष्ट कशी येत नाहीं, कीं, लीलावतीशीं पर्वतरायाचें लग्न झालें होतें, माझें कांहीं झालें नव्हतें; आणि लग्नानेंच पतिपत्नीचा संबंध प्रस्थापित होत असतो.

शीतलसिंह:—लग्नाची क्रिया झाल्याशिवाय लीलावतीचे पति होण्यास आपल्याला संकोच वाटत असेल तर ही क्रिया करवून घ्यावी. तारूण्य प्राप्त झाल्यामुळें आतां लग्नसमारंभाचा खरा उल्हास आणि खरी मौज अनुभविण्यास मिळेल असें राणीला सांगितलें म्हणजे ती पुनः लग्नक्रिया करविण्यास एका पायावर तयार होईल. अहो आहे काय त्यांत ?

रायजीः—असल्या कपटयुक्त क्रियेनें अनीति कधीं तरी नीति ठरेल काय ?

शीतलसिंह:—त्या दिवशीं नगरांत एका अनाथ विधवेचा विलाप ऐकून आपण म्हणाला, कीं, हिला पुनर्विवाहाची मुभा असती तर नव्यानें संसार थाटून या बिचारीला किती सुखांत रहातां आलें असतें ?

रायजी:—होय, माझें असेंच मत आहे, कीं, विधवांना पुनर्लग्नाचा मार्ग मोकळा असावा म्हणजे ज्यांची इच्छा असेल त्यांना पुनः विवाहित जीवनाचा आस्वाद घेतां येईल. लग्नाप्रमाणें पुनर्लग्न हाहि स्वातंत्र्याचा विषय आहे, आणि या बाबतींत स्त्रियांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याचा आपल्याला काय हक्क पोंहचतो ?

शीतलसिंह:—रूढीला खुशाल घाब्यावर बसवावी असें आपलें मत दिसतें. मग लीलावतीचें पुनर्लग्न आपल्याला अनीतिमय कां वाटावें हें मला कळत नाहीं !

रायजी:—समजून उमजून, राजीखुषीनें होणाऱ्या पुनर्लग्नाची मी तरफदारी करतों. कपटानें होणारे पुनर्विवाह मला नको आहेत. मी पर्वतराय आहे असें समजून लीलावतीनें माझ्याशीं लग्नक्रियेचें सोंग करणें याला कांही पुनर्लग्न म्हणतां येणार नाहीं.

शीतलसिंह:—पर्वतराय हयात आहेत आणि आपण पर्वतराय आहां या गोष्टी निश्चित झाल्या आहेत आणि आतां फिरवितां येणार नाहींत. ऐन वेळीं आपण मागें पाय घेतल्यास काय अनर्थ ओढवेल ! आपल्या सर्वांचा उपहास, तिरस्कार आणि विनाश हा ठरलेलाच आहे.

रायजी:—शीतलसिंह, माझें शरीर किंवा माझें शील या दोहोंपैकीं एकाचा विनाश झालाच पाहिजे. कशाचा विनाश होऊं द्यायचा नाहीं हाच मुख्य प्रश्न आहे. बाकीचे सर्व परिणाम आनुषंगिक व गौण आहेत.

शीतलसिंह:—जालकेला सर्व वृत्तांत सांगण्याचें मी कबूल केलें आहे. तर जाऊन काय सांगूं ?

रायजी:—जें झालें आहे तें सांगा आणि मी विचारांत आहे असेंहि कळवा.

शीतलसिंह:—उद्यां रात्रीं आपल्याला भुयारांत दाखल व्हावयाचें आहे. मी बोलवायला कोठें येऊं ?

रायजी:—किसलवाडींत. मी तेथेंच असेन.

शीतलसिंह:—या वेळीं इकडे एकटे राहिल्यानें आपलें चित्त अधिक व्यग्र होईल. मळ्यांत जाऊन निद्रा घ्या.

रायजी:—कांहीं हरकत नाहीं, आपण माझी काळजी करूं नका.

[जातात.]

प्रवेश ५ वा.

[स्थळ:—किसलवाडी नजीक नदी किनारा. रायजी रेतींत फिरत आहे.]

रायजी:—शीतलसिंह जें कांहीं म्हणाला त्यांतली एक गोष्ट मात्र अक्षरशः खरी आहे. लीलावतीचें सौंदर्य अनुपम आहे. असलें सौंदर्य मी आज पर्यंत कोणत्याही स्त्रीचें पाहिलें नाहीं. मी कधीं वस्तींत राहिलों नाहीं ह्मणून कदाचित असें वाटत असेल; पण लीलावतीचें सौंदर्य अत्यंत मनोहर आहे यांत मुळींच संशय नाहीं. असल्या सौंदर्याचा उपभोग घेण्यासाठीं पर्वतरायांनीं यौवनप्राप्तीची इच्छा केली असल्यास ती क्षम्य आहे. पण गेलेलें तारुण्य पुनः मिळत नाहीं हें माहित असून पर्वतरायांनीं लीलावतीशीं लग्न करून तिचें लावण्य निरुपयोगी करून टाकलें हें त्यांनीं बरोबर केलें काय ? स्वर्गलोकींहून भूतलावर येणाऱ्या सौंदर्य संपत्तीचा दुर्व्यय करण्याचा अधिकार कोणालाहि नाहीं. लीलावतीचें लग्न एकाद्या तरूण, समानरूप, क्षत्रिय वीराशीं झालें असतें तर त्या दोघांच्या जीविताचें साफल्य झालें असतें आणि जगांतील दंपती रत्नांच्या उज्ज्वलतेंत किती तरी भर पडली असती ! मी पर्वतराय ह्मणून नव्हे, तर जगदीप ह्मणून गादीवर असतों तर लीलावतीसारखी राणी—(जीभ चावून) अरे ! काय हें ? परस्त्रीबद्दल लालसेच्या विचारांना मी आपल्या चित्तांत थारा देत आहे काय ? हाय ! शीतलसिंह, सौंदर्यमोहसर्पाचा माझ्या हृदयांत तूंच शिरकाव केलास. अरे ! पण मी त्या सर्पास टिकूं दिलें कसें ? त्या क्षणींच त्याला ठेंचून टाकला असता तर आतां त्यानें उचलखाल्ली नसती.—मग काय, मीं सौंदर्य या वस्तूचा तिरस्कारच करावा ? सृष्टीच्या यशाची जी पताका, जी प्रेरणांची अमूल्य खाण, ज्याची महती त्रिलोकांत वर्णिली जाते, त्या सौंदर्याचा मीं मात्र द्वेष करावा ? लीलावतीचें लावण्य परम आदरास पात्र आहे; पण आदरानंतर कोणती मनोवृत्ति येते ? काय ? या आदरामुळेंच माझी तारांबळ उडाली आहे ? कधींच नाहीं. सौंदर्याचा आणि या तारंबळीचा काय संबंध आहे ? मी पर्वतराय झालों म्हणजे पर्वतरायाच्या राणीचें काय करावें हाच प्रश्न आहे. लीलावती सुरूप असो, कीं, कुरूप असो, हा प्रश्न कांहीं चुकत नाहीं. काय मी इतका दुर्बल आहे कीं,

सौंदर्याबद्दल वाटणाऱ्या आदरामुळें या प्रश्नाचा माझ्यानें निर्णय होत नाहीं ? असें कसें असेल ? सौंदर्याबद्दल आदर ही कांहीं अधम मनोवृत्ति नाहीं; पण या वेळीं मनोवृत्तींचें प्रथ:करण करून काय उपयोग ? (थांबून) मी तरी केवढा मूर्ख ? पर्वतराय झालों म्हणजे मला पर्वतरायाच्या राणीचा पति व्हावें लागेल हें सुचलेंच नाहीं. जालका मला नेहमीं " शाई आणि कागदाचा पंडित " म्हणते तें कांहीं खोटें आहे ? जालका आणि शीतलसिंह या दोघांनीं मला गादीचा मालक बनविण्याचें ठरविलें त्या वेळींच राणीचा स्वामीहि बनविण्याचें ठरविलेंच असेल; पण या गोष्टीचा त्यांनीं मला कसा थांग लागूं दिला नाहीं ? एवढ्या साध्या गोष्टीचा मला नुसता विचारहि आला नाहीं तेव्हां माझ्या शहाणपणाची कमालच झाली ! या चुकीचें कांहींतरी दृश्य चिन्ह नेहमीं डोळ्यासमोर ठेवलें पाहिजे. कागदावरच लिहून ठेवतों म्हणजे झालें. (खिशांतून कागद काढून) हें काय ? याच्यावर जालकेचें अक्षर कोठून आलें ? काय लिहिलें आहे बरें तिनें ? (वाचतो.) " **खेळांतल्या सोंगट्या राई तेवीं जालका !** " काय मी केवळ खेळांतली सोंगटी ? माझ्या पौरुषाचा हिशेब नाहीं ! शौर्याचा हिशेब नाहीं ! जालकेचें फासें पडतील तसें मला पटावर इकडून तिकडे नाचलें पाहिजे ! जालका स्वतःलाहि सोंगटी म्हणविते ही तिची खुबी आहे आणि तिला सोंगटी व्हायचेंच असेल तर खुशाल होईनाका; मी नाहीं होणार. दुसरी ओळ काय आहे ? (वाचतो.) " **कोक फसवी कुणाला, खेळ जिथें सारखा ?** " अस्सं ! ही सारी भामटेगिरी म्हणजे जालकेला एक खेळ आणि गंमतच वाटते आहे ! डाव सरल्यावर खेळणारे जसे हंसतात तसें ही कपटक्रिया आणि अनीति यशस्वी झाली म्हणजे आम्ही सर्वांनीं हंसायचें ? हें सूत्र मला साफ कबूल नाहीं. जालकेला जें कळलें तें मला कळलें नाहीं. एवढ्यापुरता तिचा व्यवहारकुशलतेनें माझ्या पांडित्याचा पराभव केला. तर आतां माझ्या पांडित्याचा विजय हाच आहे कीं, तिनें जें इच्छिलें तें मी इच्छिलें नाहीं, आणि कधींहि इच्छिणार नाहीं. (थांबून) माझ्या इच्छेला आतां अवकाशच नाहीं काय ? मी पक्का बांधला गेलों ? शीतलसिंह म्हणाला, कीं, मी पर्वतराय होण्यास कबूल झालों त्यांत पर्वतरायाच्या संबंधाचा आणि व्यवहाराचा स्वीकारहि अंतर्भूत झालाच. मी पर्वत-

राय होण्यास तयार झालों त्याला लीलावतीसारख्या स्त्रीरत्नाचा अभिलाष हेंहि एक कारण असावें असें लोकांना वाटेल काय ? माझ्या कपटांत कामवासनेचा अंश नव्हता या गोष्टीवर कोणाचा भरंवसा बसणार नाहीं काय ? त्या वेळेस माझ्या मनाची काय स्थिती होती ती दुसऱ्यास कशी कळणार ? हो ! हेंच तें स्थळ होतें. या रंगिणी नदीला सर्व ठाऊक आहे ! रंगिणी, माझ्या मनोवृत्तींची साक्ष देण्यास तूंच समर्थ आहेस. त्या रात्रीं माझे संकल्प आणि माझे संदेह तूं ऐकलेस. तुझ्यापुढें जर मी अविश्वासी जगाला आणून हजर केलें तर तूं खरें सांगणार नाहींस काय ? अनेक युगांचें मौन तूं माझ्यासाठीं सोडणार नाहींस ?—पण माझ्या मनाची विशुद्धता जगाला पटली नाहीं म्हणून मी त्या विशुद्धतेचा त्याग करूं काय ? तर मग पर्वतराय व्हायचें, आणि लीलावतीचा पति व्हायचें नाहीं असें घडून यायला काय केलें पाहिजे बरें ? (थांबून) हें केवळ अशक्य आहे. एक तर दोन्ही व्हावें किंवा कोणतेच होऊं नये, हेच दोन मार्ग आहेत. मधला मार्ग नाहींच. मधला मार्ग शोधणें ही निव्वळ भ्रांति आहे. मग जिकडून ओढ बसेल तिकडे डोळे झांकून जावें ? मला खेंचून नेण्याची शक्ति कोणत्या वायुवेगांत आहे बरें ? मी या कागदावर काय लिहिलें होतें ? (वाचतो.)

मार्ग असती तुजपुढें खुले दोन्ही ।
एक स्वीकारी योग्य पारखोनी ॥

हीच खरी गोष्ट. मनुष्य स्वतःच मार्ग पसंत करीत असतो. खेंचला गेलों म्हणणें हा जबाबदारींतून सुटायचा एक बहाणा आहे. पुस्तकी ज्ञानानें लिहिलेला हा सिद्धांत आणीबाणीच्या वेळीं किती उपयोगी पडला ! (कागद खिशांत ठेवतो.) सिद्धांत झाला. आतां निर्णय हाच करावयाचा, कीं, दोहोंतून कोणत्या मार्गानें जायचें. शील परीक्षेची हीच वेळ आहे. लीलावतीचा प्रियकर व्हावयाचें नसलें तर पर्वतरायपणा जाणार, कनकपुरची गादी जाणार, गुजराथचें राज्य जाणार, द्रव्य–सुखवैभवाचें भांडार जाणार, पुरुषार्थाचे प्रसंग जाणार, कृतसंकल्पांवर पाणी सोडावें लागणार, आणि जालकेचा मनोभंग करावा लागणार ! (डोळे झांकून क्षणभर स्तब्ध राहतो.) कांहीं हरकत नाहीं. जीविताच्या सर्व आशा भग्न होवोत, उपहास होवो, विनाश होवो पण प्रभु–प्रीति नाश मात्र कधींहि

न होवो ! (हात जोडून) पतितोद्धारका प्रभो ! सन्मतीची प्रेरणा केलीस त्याप्रमाणें बलहि दे म्हणजे मी सर्वस्वाचा त्याग करून तुझ्या चरणाचे ठायीं लीन होऊन राहीन. आतां मला कसलीच भीति नाहीं, शंका नाहीं. कर्तव्याचा मार्ग मला स्पष्ट आणि सरळ दिसत आहे. पुष्कळ महिन्यांनीं आज मी स्वस्थ चित्तानें झोंप घेईन. (जातो.)

प्रवेश ६ वा.

स्थळः--किसलवाडी. रायजी आणि शीतलसिंह प्रवेश करतात.]

शीतलसिंह:—महाराज आपली शांत आणि प्रसन्न मुद्रा पाहून मला फार आनंद झाला. आपलें मन बहुत करून अस्वस्थ आणि व्यग्र असेल अशी मला काळजी पडली होती.

रायजी:—अस्वस्थता आणि व्यग्रता पार दूर झाली आहे. भयापासून मुक्त होऊन माझें चित्त आनंद सागरांत पोहत आहे.

शीतलसिंह:—तर मग आपण चांगलाच विचार केला असेल.

रायजी:—विचार केला इतकेंच नव्हे तर निर्णयहि केला. उत्तमोत्तम आणि परम संतोषकारक निर्णय केला. आतां चिन्तेचें कारणच राहिलें नाहीं.

शीतलसिंह:—हें वर्तमान ऐकूनजालकेला फार आनंद होईल.

रायजी:—जालकेलाच काय, प्रत्येक जणाला आनंद होईल.

शीतलसिंह:—(सभोंवतीं पाहून) पण आपण चाललों आहों कोणीकडे ? आपण चालत आहां म्हणून आपल्याबरोबर मीहि उगीच चाललों आहे.

रायजी:—त्या दिवशीं रात्रीं पर्वतरायाबरोबर तुम्ही या बागेंत दक्षिणेकडून जेथें आंत शिरलां त्याच ठिकाणीं आपण येऊन पोहोंचलों. पर्वतरायानें कुंपण तोडून भोकसा पाडला तो हा पहा. अजून तसाच राहून आहे.

: —महाराज, या धोक्याच्या जागीं आपण आलों तरी

कशाला ? पर्वतरायांनीं माझें म्हणणें ऐकलें नाहीं आणि या भयाण ठिकाणीं येऊन आपला प्राण मात्र घालविला.

रायजी:—या वेळीं मलाहि एकादा बाण लागला तर तुम्ही तो बाण मारणाराला राजा करा म्हणजे झालें.

शीतलसिंह:—शिव शिव, महाराज हें काय बोलतां! मी तर आपला एकनिष्ठ आज्ञांकित सेवक. पण अरे! नदींत हा काय चमत्कार दिसत आहे! पाण्यांत एका मागून एक दिवे कसले वाहात चालले आहेत? तेथें मनुष्य तर कोणी दिसत नाहीं.

रायजी:—देखावा चमत्कारिक आहे खरा! हे दिवे मूळ कोठून येतात तें जरा जाऊन पाहून या.

शीतलसिंह:—रात्र अंधारी, चंद्रहि अजून उगवला नाहीं, आणि हें दिव्याचें प्रकरण काय असेल कोण जाणे!

रायजी:—तुह्मांला भीति वाटते कीं काय?

शीतलसिंह:—महाराज भीति वाटण्यासारखेंच आहे.

रायजी:—ज्याच्या कमरेला तरवार आहे त्याला भीति कसली?

शीतलसिंह:—आपली बुवा छाती नाहीं होत. मी कांहीं जात नाहीं.

रायजी:—आपल्या हिंमतीनें जाववत नसेल तर माझ्या आज्ञेनें जा. तुम्ही आतांच म्हटलें ना कीं, "मी आपला आज्ञांकित सेवक आहे?"

शीतलसिंह:—आपण आज्ञाच करतां तेव्हां मी जातों बापडा. पण मी ओरडलों तर लौकर धांवून मात्र या. [स्वगत] सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं म्हणतात ते यालाच.

(कुंपणांतील छिद्रांतून निघून जातो.)

रायजी:—पर्वतरायांनीं कुंपणाला हें छिद्र पाडलें. अगदीं सामान्य गोष्ट, पण तिचे परिणाम किती दूरवर झाले पहा! या छिद्रांतून त्यांचा मृत्यू आंत आला. माझ्या चित्तांत क्षोभानें प्रवेश केला, आणि राज्यांत अनपेक्षित क्रांतीचा पाय शिरला! किती तरी भावी इतिहास---सृष्टीचें बीज या एका गोष्टींत सांपडेल!---वाटेल तें होवो. **भिद्यते हृदयग्रन्थिच्छिद्यन्ते सर्वे संशयाः।** या उपनिषदांतील सूत्राप्रमाणें माझी स्थिती झाली असल्यामुळें मी निश्चिंत आहे. पण या निश्चिंततेनें समाधान वाटत नाहीं असें कां? [उगवत असलेल्या चंद्राकडे पाहून] अहाहा! आपल्या

नाथाचें दर्शन होतांच ही रजनी एकाद्या नववधूप्रमाणें आपलें कृष्णवसन सांवरूं लागली आहे. आनंदित झालेल्या दश दिशांवर हळूं हळूं शुभ्र किरणांचा वर्षावच चालला आहे. वायुलहरींनीं ही सृष्टि जणूं दोलायमान होत आहे. जिकडे पहावें तिकडे प्रवृत्तीचेंच साम्राज्य दिसतें आहे. निश्चेष्ट असें कांहींच नाहीं. माझ्या मनःसृष्टींतहि असलीच कांहीं क्रांति घडून येत आहे असें वाटतें. मग शांतींत कृतकृत्यता नाहीं म्हणावयाची !—हे पहा शीतलसिंह ! एकाद्या जखमी झालेल्या शिकारीसारखे जड पावलें टाकीत येताहेत. [शीतलसिंह प्रवेश करतो.] काय शीतलसिंह, जिंकून आलेत कीं हरून ?

शीतलसिंहः—अहो महाराज विचारतां काय ? हा कांहीं भयंकरच प्रकार आहे !

रायजीः—जरा स्वस्थ होऊन सांगा.

शीतलसिंहः—वरच्या बाजूनें दिवे येत होते म्हणून मी हळूं हळूं नदीच्या काठा काठानें तिकडे चाललों. दिवे एकामागून एक येतच होते. जातां जातां या मळ्याच्या टोंकाला नदीच्या घाटावर महादेवाचें एक मंदिर आहे तेथपर्यंत मी पोहोंचलों. दिवे मंदिरांतून बाहेर पडत होते म्हणून आंत जाऊन पहातों तों एक भयंकर देखावा दृष्टीस पडला ! पिंडीजवळ एक माणसाचें धड पडलेलें. शिवलिंगावर अभिषेकपात्राचे जागीं शेंडीनें बांधलेलें मुंडकें लटकत आहे आणि त्यांतून रक्ताचे थेंब पिंडीवर टपकताहेत. पन्हाळवाटें रक्त खालच्या कुंडांत पडतें आहे. कुंडांत पहावें तों तर तुपाचे दिवे लावलेले शेंकडों द्रोण तरंगत आहेत. पन्हाळांतून ज्या द्रोणावर रक्त टपके तो जोरासरसा कुंडांतून बाहेर निघून नदींत वहात जाई. अशा रीतीनें दिव्याची माळ सारखी लागली आहे. तेथें मनुष्य कोणी नाहीं आणि हा प्रकार केव्हांपासून चालला आहे कोण जाणें !

रायजीः—दुसरा कांहीं तपास केला का ?

शीतलसिंहः—आणखी तपास काय करणार ? धड आणि मुंडकें कोणाचें तें कांहीं ओळखूं आलें नाहीं. तो देखावा पहातांच माझी तर ळण उडाली. पाय लागलें लटपटायला पण कसा तरी घाईघाईनें

एका दमांत परत आलों. रेतींतून पुढें चालतां चालतां मंदिराकडे सारखा वळून पहात होतों कीं आंतून तर कोणी बाहेर नाहीं निघत.

रायजीः—पण तुम्हांला परत यायला थोडा अधिक उशीर लागला. मंदिर कांहीं येथून फारसें लांब नाहीं. ह्मणून मला वाटतें वाटेंत कांहीं तरी विचार करीत उभे राहिला असाल.

शीतळसिंहः—विचार—विचार कसले आले आहेत ?

रायजीः—हा देखावा पाहून तुमच्या मनांत कांहींतरी विचार खात्रीनें आलेच आहेत. कसले विचार आले, खरें सांगा पाहूं ?

शीतलसिंहः—महाराज, विचार यायचेच. चाललेंच आहे. विचार कांहीं आपल्याला विचारून येतात थोडेच ? आणि त्यांत त्रेधा उडालेली !

रायजीः—त्रेधेमुळें आलेले विचार असोत कीं कसलेहि असोत. मला कळले पाहिजेत. सांगा पाहूं.

शीतलसिंहः—उगीच वेडेविद्रे विचार कशाला बोलून दाखवायला लावतां ? आणि मला सर्व आठवताहेत तरी कोठें !

रायजीः—तुह्मांला सारें आठवतें आहे. आणि सांगितलेंच पाहिजे. माझी आज्ञा आहे.

शीतलसिंहः—आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. माझ्या ज्ञानेंद्रियांच्या आधीं माझीं कर्मेंद्रियें आपल्या आज्ञेस वश होतात असा आपला प्रताप आहे.—पण माझे विचार ऐकून आपल्याला राग आला तर ?

रायजीः—वाटेल तसले विचार असेनात का, मी तुह्मांला क्षमा करीन. माझें अभयवचन घ्या.

शीतलसिंहः—मंदिरांतील देखावा पाहून माझ्या मनांत असें आलें कीं, ईश्वरा, तो माळी राजा झाला त्यापेक्षां या बिचाऱ्यानें मस्तकपूजा केली हा कां नाहीं राजा झाला ? या विचारानें माझें अंतःकरण भरून आलें आणि कांहीं वेळ माझ्यानें तेथून हालवेना. विचार फार मूर्खपणाचा होता त्याबद्दल मी क्षमा मागतों.

रायजीः—क्षमा तर मी आधींच केली आहे. पण शीतलसिंह, तुमचा विचार बरोबर होता. त्यांत मूर्खपणा आहे कोठें ? माळ्याच्या

अंगीं राजा होण्याची लायकी नसते हें खरें आहे, आणि मी खराखुरा माळी असतों तर राजा होण्याला कबूलहि झालों नसतों, पण मी माळी नाहीं. तुमच्यापुढें स्वर्गवासी रत्नदीपदेव राजाचा पुत्र जगदीप उभा आहे आणि जालका त्याची माता अमृतदेवी आहे.

शीतलसिंह:—[आश्चर्यचकित होऊन] हं! खरेंच कीं काय ? केवढें आश्चर्य !

रायजी:—ही पहा, माझ्या कमरेभोंवतीं माझ्या पित्याची तरवार. मुठीवर त्यांची रत्नमुद्रा आहे ती कदाचित् तुमच्या परिचयाची असेल. [कमरेवरचें वस्त्र सारून गुंडाळलेली तरवार दाखवितो.]

शीतलसिंह:—महाराज, आजपर्यंत मी आपणाला माळी समजत होतों या अपराधाची क्षमा करावी. (पायां पडतो.)

रायजी:—तशी तुमची समजूत मींच केली. यांत तुमचा कांहीं अपराध नाहीं. उठा. (उठवितो.)

शीतलसिंह:—महाराज, कृपावंत आहां म्हणून विचारतों. अशा रीतीनें राज्य मिळविण्याचें पसंत कां केलेंत ?

रायजी:—मला राज्य मिळावें म्हणून माळणीच्या वेषानें येथें येऊन जालका खटपट करीतच होती. इतक्यांत पर्वतरायांचा अकस्मात् वध झाल्यामुळें तिनें ही योजना केली. तुम्हांला सर्व हकीकत माहितच आहे.

शीतलसिंह:—या भानगडींत पडायला आपण पहिल्यापासूनच नाखूष होतां. जालकेनें आणि मी आग्रह करून आपल्याला राजा बनविलें.

रायजी:—शीतलसिंह, एका जगदीशाशिवाय वैभव आणि संपत्ति देण्यास कोणाही समर्थ नाहीं. तुम्हाला वाटत असेल, कीं, मीं राज्य देवविलें, आणि माझी अशी घमेंड असेल कीं, मीं स्वतः राज्य मिळविलें, पण ही सारी भ्रांति आहे. कारण

मालिकसे सब कुछ होत है,
ये बन्देसे क्या होय ?
राईका पर्वत करे,
दर्या बुन्द बनाये.

सर्व आदि कारणांचा प्रवर्त्तक तो परमात्मा आहे. त्याच्या इच्छेला

साधनरूप व्हायचें एवढेंच आपलें कर्तव्य त्याला जी सिद्धी इष्ट वाटते ती घडवून आणणाऱ्या मार्गाचा आपण त्याग केला म्हणजे आपल्या जबाबदारीस सुरवात होते. आपण मार्ग बदलला तरी अंतिम परिणाम त्याच्या इच्छेप्रमाणेंच घडून आला पाहिजे. ईश्वरी संकेत असल्याशिवाय मला राज्य मिळणार नाहीं. याची खात्री असूं द्या.

शीतलसिंहः—महाराज, आपल्याला राज्य केव्हांच मिळालें आहे. आतां मागच्या गोष्टी कशाला काढाव्यांत ?

रायजीः--राज्य मिळालें असें तुम्हांला वाटत आहे. पण मला नाहीं तसें वाटत, आणि हें पहा, तुमची इच्छा असेल तर आतांच जाऊन जाहीर करा, कीं, हा पर्वतराय नसून जगदीप आहे, माझी बिलकूल याला आडकाठी नाहीं.

शीतलसिंहः—छे, छे ! मी इतका नीच असेन असें आपल्याला वाटतें काय ? शिवाय ही गोष्ट आतां कोणाला खरीहि वाटणार नाहीं. आणि त्यापासून मलाहि फायदा नाहीं. पर्वतरायाच्या वधाची हकीकत लोकांना विश्वसनीय वाटली, तरी पण इतके दिवस बातमी गुप्त ठेवल्याबद्दल मला काय शिक्षा होईल कोण जाणें ! तेव्हां आतां ठरलेली योजना पार पाडावी हाच उत्तम मार्ग.

रायजीः--तुम्हांला योग्य दिसेल तसें करा. तुमचें विचार जाग्रत करण्यासाठीं मी तुम्हांला दिवे कोठून येतात तें पाहून यायला सांगितलें. मंदिरांतील आणि दिव्यांची योजना मींच केली होती. तुम्ही जरा बारकाईनें पाहिलें असतें तर तें धड आणि मस्तक मेणाचें आहे. आणि टपकत होतें तें रक्त नसून लाल रंगाचें पाणी आहे, असें तुम्हाला आढळून आलें असतें.

शीतलसिंहः—महाराज, इतकें श्रम घेण्याचें काय कारण होतें ?

रायजी—त्या दिवशीं नगरांत कांहीं स्त्रिया फेर धरून मस्तकपूजेचें गाणें गात होत्या. तें ऐकून तुम्हीं म्हटलेंत, कीं, राजपद मिळण्यासाठीं या जन्मीं मस्तकपूजा केली म्हणजे पुढच्या जन्मीं शंकराच्या कृपेनें ती इच्छा पूर्ण होते. तेव्हां मला मिळालेल्या राज्याविषयीं तुमच्या मनांत विचार उत्पन्न करण्यासाठीं मीं मुद्दाम ही योजना केली.

शीतलसिंह:—महाराज, बुद्धीनें, प्रभावानें आणि भाग्यानें आपण राजपदास सर्वस्वी योग्य आहां. आपला अचल निष्ठावान परम भक्त म्हणून माझा स्वीकार करावा. उद्यां सायंकाळीं रुद्रनाथाच्या मंदिरांतून आपली स्वारी निघेल त्या क्षणापासून आपण गुर्जराधिपति पर्वतराय आणि मी आपला सतत इमानी सेवक—शीतलसिंह. चला, आतां आपल्याला गेलें पाहिजे. भुयारांत दाखल होण्याचा वेळ होत आला, जालका अगदीं अधीर झाली असेल. [जातात.]

अंक चवथा समाप्त.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

[स्थळः—कल्याणकामाची हवेली, सज्जावर सावित्री, कमला, वंजुल आणि इतर चाकर नौकर बसले आहेत.]

कमलाः—वंजुलमिश्र, स्वारी येथें येऊन पोहोंचेपर्यंत सूर्य जागच्या जागींच थांबून रहावा असा कांहीं चमत्कार आपल्या ब्रह्मतेजानें करून दाखवा, म्हणजे आम्हांला महाराजांचा चेहरा तरी नीट पाहायला सांपडेल.

सावित्रीः—रुद्रनाथाच्या मंदिरांतून स्वारी निघाली असा आतांच निरोप आला आहे. त्यावरून अंधार पडण्यापूर्वींच स्वारी येथें येईल असें दिसतें. वंजुलाच्या ब्रह्मतेजाचें कांहीं काम पडणार नाहीं.

वंजुलः—नाहींतरी कमला देवीची आमच्या ब्रह्मतेजावर कोठें श्रद्धा आहे ! कधीं त्यांच्या येथें भोजन किंवा दक्षिणा तर आम्हांला मिळालीसुद्धां नाहींत !

कमलाः—तुम्ही ब्रह्मतेज दाखवीतच नाहीं तर श्रद्धां कशी बसावी !

वंजुलः—आमच्यांत तेज असल्याशिवाय प्रधानजी आम्हांला बाळगीत असतील ! आतां प्रधानजींनां एकांतांत विचार करण्याची जरा संवय आहे त्यामुळें आम्हाला कधीं सल्ला देण्याची संधिच मिळत नाहीं. पण अस्मादिकांची सल्ला घेतली असती तर राजकार्यांत एवढीशींसुद्धां न्यूनता राहिली नसती. बाकी बाईसाहेबांशिवाय दुसऱ्याला त्यांच्या मनांतलें कांहीं कळतच नाहीं, त्याला आमचा नाइलाज आहे.

सावित्रीः—राजकारणांच्या सल्ला मसलतींत स्त्रियांना घेऊं नये असें तुझें मत आहे वाटतें !

वंजुलः—माझ्या मताची काय कथा ! पण मनुस्मृतींत देखील म्हटलें आहे, कीं, राजकार्यासंबंधीं मसलत करते :वेळीं बहिरे, मुके, आंधळे, लुळे, पांगळे, रोगी, म्हातारेकोतारे आणि स्त्रिया, या सर्वांनां

दूर ठेवावेत. कारण त्यांच्या पोटांत कोणतीहि गुप्त गोष्ट राहत नाहीं. आणि स्त्रियांचे ठायीं हा दोष विशेष असतो.

सावित्रीः—हें तुला खरें वाटतें काय ?

वंजुलः—शास्त्रांत म्हटलें आहे तेव्हां अक्षरशः खरें असलेंच पाहिजें. मला वाटण्याचा कोठें प्रश्न आहे ?

सावित्रीः—मी असें विचारतें, कीं, तुझ्या स्वतःच्या अनुभवावरून स्त्रिया विश्वासाला पात्र नाहींत हें म्हणणें तुला विचाराअंतीं खरें वाटतें कीं काय ?

वंजुलः—खुद्द मनूनींच जर द्रोहभाव आणि अनृत हे स्त्रियांचे गुण ठरविले आहेत तर मला विचार करण्याची काय जरूर ?

कमलाः—पण मनूनीं असेंहि म्हटलें आहे, कीं, स्वर्ग दाराधीन आहे; आणि पत्नीमुळें पतीला, त्याचप्रमाणें पतीच्या पितरांना स्वर्गप्राप्ति होते.

वंजुलः—ही अर्थवादाची अतिशयोक्ति आहे झालें. होम करते वेळीं गोवऱ्या आणून द्यायला कोणी तरी पाहिजे, आणि धुरांत दुसरें कोणी उभें रहाणार नाहीं म्हणून हें काम बायकांवर लादलें, आणि त्यांनीं गोवऱ्या घेऊन तेथेंच हजर रहावें म्हणून होमाचे वेळीं त्यांनीं आपल्या नवऱ्याच्या शेजारीं बसावें असें ठरविलें. बायको नसली तर गोवऱ्या मिळणार नाहींत, गोवऱ्याशिवाय होम होणार नाहीं, आणि होमाशिवाय स्वर्ग मिळणार नाहीं, म्हणून बायकांमुळें स्वर्ग प्राप्त होतो असें म्हटलें आहे. आपल्याला धर्मपत्नीची मोठी पदवी मिळते आहे या लालचीनें बायकांनीं होमाच्या धुराला कंटाळूं नये यासाठीं आमच्या धोरणी स्मृतिकारांनीं शास्त्रांत असलीं वचनें घालून ठेवलीं आहेत.

कमलाः—वाः ! काय अगाध विद्वत्ता ! धर्मपत्नी म्हणजे गोवऱ्या आणणारी दासी हें आतांच कळलें. मनुस्मृतींत स्त्रियांची पूजा करण्याविषयीं आणि त्यांना प्रसन्न ठेवण्याविषयीं जीं वचनें आहेत त्यांचा अर्थहि असाच कांहीं असेल !

वंजुलः—अलंकार, वस्त्रें आणि भोजन या तीन प्रकारांनीं स्त्रियांची पूजा करावी असें मनूनीं म्हटलें आहे. आतां दागिने आणि कपडेलत्ते घेण्यांत पुरुषांचाच फायदा आहे. कारण एरव्हीं जो पैसा खर्चला गेला

असता तो दुसऱ्या रूपानें कां होईना पण घरांतल्या घरांतच रहातो. म्हणजे पुरुषांची मालमत्ता उघड उघड वाढते. शिवाय अडचणीच्या वेळीं दागिने मोडले कीं, पैसे तयार! एकदां बायकोला दिलेले दागिने पुनः परत घेऊं नयेत असें कोठें मनूनीं म्हटलें आहे? आतां रहातां राहिली भोजनाची पूजा. पण हें पहा, चांगलेंचुंगलें अन्न खाल्याशिवाय बायकांना घरांतलें काम करावयाला शक्ति कशी येईल? घोडे, बैल यांच्याकडून काम करवून घ्यायचें असलें म्हणजे कामाच्या मानानें आपण त्यांना कमीज्यास्ती खुराक देतों कीं नाहीं? बायकांना वाटावें कीं, आपली चैन होते, आणि फायदा व्हावा नवऱ्याचा, असा आहे आमच्या स्मृतींचा हेतु!

सावित्रीः—खरोखर तुला महाराजांच्या पुरोहिताची जागा मिळाली पाहिजे; म्हणजे तुझ्या शास्त्रज्ञानाचें कांहीं चीज होईल आणि त्या योगानें सबंध देशाचा उद्धार तरी होईल.

वंजुलः—प्रधानजीकडे मीं एकदोनदां याविषयीं गोष्ट काढली होती पण ते म्हणाले, राजाच्या पुरोहिताला राजाबरोबर लढाईला जावें लागतें तर तूं जाशील का? म्हणून मीं विचार करून उत्तर देण्याचें तहकूब ठेवलें आहे.

कमलाः—घरीं जरा तरवार धरण्याचा सराव ठेवा म्हणजे आपोआप हिंमत येईल.

वंजुलः—अहो, नागव्या तरवारीकडे माझ्यानें नुसतें बघवत नाहीं, आणि म्हणे तरवार हातांत धरा!

कमलाः—आजच्या स्वारींत नागव्या तरवारीचे घोडेस्वार बरेच असतील, मग कसें कराल?

वंजुलः—असला पाणचटपणा आपल्याला नाहीं आवडत! लढाईवर जाऊन पाहिजे तर हत्यारांनीं खेळावें, पण हे शिपुरडे भरवस्तींत तरवारी काढून लोकांना भीति दाखवीत काय म्हणून फिरतात?

सावित्रीः—पहा, स्वारी येऊन ठेपली!

वंजुलः—कोठें आहे? मला तर अजून माणसेंबिणसें कांहीं दिसत नाहींत!

कमलाः—स्वारीच्या पुढें पुढें चालणारी स्वारीची खबर येऊन पोंहचली. तें पहा, मार्गानें उभे असलेल्या लोकांच्या माना कशा वांकड्या झाल्या, नेत्र विस्तृत झाले आणि ओंठ किंचित उघडले. इतका वेळ चाललेला कोलाहल शांत होऊन जिकडे तिकडे स्तब्ध झालें, आणि सर्वांचे डोळे स्वारीच्या दिशेकडे लागले. एकाद्या महानदाच्या पुराप्रमाणें भासणाऱ्या या स्वारीवर आश्चर्य आणि कुतूहलाच्या लहरी उत्पन्न झाल्या आहेत. पूर पृथ्वीवर चालला आहे, लहरी मार्गावरील लोकांच्या मुखावर खेळत आहेत, म्हणून पुराचे आधीं ही पुरोगामिनी लहरीपरंपराच येऊन ठेपली !- --कान द्या, आतां तर वाद्येंहि ऐकूं येत आहेत.

सावित्रीः—पहा, महाराजांचें निशाणहि दिसावयास लागलें.

वंजुलः---आतां मात्र स्वारी आली खरी ! पण आपल्याप्रमाणें नुसत्या पक्वान्नाच्या सुवासावरून मला पक्वान्न आल्याची खात्री वाटायची नाहीं. मला तर प्रत्यक्ष पक्वान्न पाहिलें म्हणजे पाहिल्याचा संतोष वाटेल आणि खाल्लें म्हणजे खाल्ल्याचा संतोष वाटेल.

सावित्रीः---ही पहा, आतां तर स्वारी आपल्या दाराजवळ आली. तुझ्या पक्वानाचा गंध, रूप आणि रस समोरच आहे. पाहिजे तर सुवास घे, पहा, आणि खाववेल तर खा.

[रस्त्यावर स्वारी प्रवेश करते.]

वंजुलः—पक्वान्न माझ्यानें खाववणार नाहीं हें म्हणणें मिथ्या आहे; वंजुलमिश्राच्या भक्षणशक्तीस अपाय करूं शकेल असें हत्यार महाराजांच्या समस्त सैन्यांत कोणाजवळहि नाहीं. पण ओ हो हो ! हें जंगल कसलें येतें आहे !

सावित्रीः—- अरे हें तर नागव्या तरवारीच्या घोडेस्वारांचें लष्कर !

वंजुलः—-मला नको तें पहायला. मी आपला जातों घरांत. आंत बसल्या बसल्या मंत्रोच्चार करीन, म्हणजे तुम्हां सर्वांचें अमंगल दूर होईल. ही पीडा गेली म्हणजे मला हांक मारा.

सावित्रीः---येथेंच कां बसून राहीनास ! डोळे घट्ट मिटून ठेव म्हणजे झालें. आम्हीं सांगूं तेव्हां उघड—(वंजुल डोळे झांकून बसतो. घोडेस्वार जातात.) हं वंजुलमिश्र, उघडा डोळे ! महाराजांचा हत्ती येत आहे.

वंजुलः---[डोळे उघडून मार्गाकडे पाहून] ओहो ! हाच तो भव्य यशःपाल हत्ती, आणि हीच ती रत्नजडित सोन्याची अंबारी ! गेल्या दसऱ्याच्या स्वारींत पाहिली होती त्यावर आज बरोबर सव्वासहा महिन्यांनीं दृष्टीस पडली. हत्ती आणि अंबारी होती तशीच आहे पण महाराज मात्र जुन्याचे नवे झाले !

सावित्रीः—हळू बोल, हत्ती जवळ येत आहे. [हत्तीवर बसलेला रायजी मार्गानें जातो.] अगबाई ! काय आश्चर्य हें !

कमलाः—खरेंच, मोठ्या नवलाची गोष्ट !

वंजुलः---महाराजांनीं इकडे पाहून नमस्कार केला त्याचें आपल्याला नवल वाटलें कीं, काय ? अहो त्यांनीं मला नमस्कार केला, तुम्हांला नव्हे.

सावित्रीः—बरोबर आहे. तुझ्याशिवाय नमस्कार करणार कोणाला ? पण आह्मांला आश्चर्य वाटलें तें महाराजांची मुद्रा पाहून, त्यांच्या नमस्काराचें नाहीं हो !

वंजुलः---मुद्रेंत आश्चर्य वाटण्याजोगें काय होतें बुवा ?

सावित्रीः--महाराजांचा चेहरा कोणासारखा झाला आहे बरें ?

वंजुलः---पर्वतरायमहाराजांचा चेहरा पूर्वीं होता तसाच आहे.

सावित्रीः--असें तुला कशावरून वाटलें ?

वंजुलः---अहो, मंदील तोच, शिरपेंच तोच, अंगावरचा शेला तोच, गळ्यांतला कंठा तोच, कमरबंदाहि तोच आणि पायांतला तोडाहि तोच. सर्व कांहीं जसें होतें तसेंच आहे.

सावित्रीः—जितक्या बारकाईनें वस्त्रालंकार पाहिलेस तितक्या बारकाईनें चेहऱ्याची ठेवण नाहीं पाहिलीस ती ?

वंजुलः---कातड्यासारखी कातडी, त्यांत बारकाईनें पहायचें तें काय ? मनुष्य काणाकुबडा असला तर तिकडे एक लक्ष जातें, पण उगीच मनुष्य पाहिला कीं तुम्ही चित्र काढायला बसलां म्हणजे जसा काथ्याकूट करतां तसा करावयाचा कीं काय ? म्हणे गोड तोंड आणि लंबगोल तोंड, नोकदार नाक आणि सरळ नाक, चिंचोळे डोळे आणि पाणीदार डोळे, काळ्या भिंवया आणि कमानदार भिंवया, चौकोनी

कपाळ आणि वरवंट्यासारखें कपाळ, पातळ ओंठ आणि मिटलेले ओंठ, याची चौकशी करीत बसा !

सावित्री—अरे इतकी चौकशी आणि काथ्याकूट केल्याशिवाय तुला असें नाहीं का वाटलें कीं, त्या दिवशीं घोड्यावरून पडलेल्या ज्या स्वाराला आपण उचलून घरांत आणलें त्याच्या चेहऱ्यासारखा महाराजांचा चेहरा हुबेहूब दिसावयास लागला आहे ? त्याचें नांव रायजी कीं कायससं होतें.

वंजुलः—त्या माळ्यासारखें महाराजांचें तोंड ! बोलतां तरी काय ?

सावित्रीः—असावें कसें आणि झालें आहे कसें या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. पण खरें सांग, तुला कांहीं सारखेपणा वाटला का ?

वंजुलः—त्या माळ्याला पुनः पट्ट्या बांधून खाटेवर निजविल्याशिवाय मला कांहीं तो ओळखूं येणार नाहीं.

कमलाः—मला तर बाई महाराजांचा चेहरा नायब दिवाणजीच्या एका मित्रासारखा झाला आहे असें वाटलें. त्या मित्राचें नांव मला माहीत नाहीं पण अलीकडे ते नेहमीं आमच्याकडे येत असतात. त्यांच्या मुखावर जें तेज आणि जी नम्रता दिसते तिचेंच प्रतिबिंब महाराजांच्या मुखावर उमटलें असल्याचा मला भास झाला.

सावित्रीः—तुला एका माणसाच्या चेहऱ्याशीं सारखेपणा वाटला आणि मला दुसऱ्याच एकाच्या चेहऱ्याशीं वाटला यावरून आपल्या दोघींची कल्पना चुकली असें दिसतें.

वंजुलः—मला कोणाच्याच चेहऱ्याशीं साम्य दिसलें नाहीं तेव्हां मी किती शहाणा !

सावित्रीः—तुझ्या शहाणपणाविषयीं शंकाच नाहीं ह्मणा, पण तुझ्या शहाणपणाला महाराजांच्या मुखावर कोणत्या वृत्तीचें प्राबल्य असलेलें दिसलें तें तरी कळूं दे—आनंद कीं आश्चर्य कीं चिंता ?

वंजुलः—मला यापैकीं कांहींच दिसलें नाहीं. महात अंकुशाच्या प्रहारानें हत्तीस चालवीत होता तें पद्दात महाराज बसले होते असें मला वाटतें.

कमलाः—पण मार्गांतील लोकांनीं " पर्वतरायमहाराजकी जय "

म्हणून गर्जना केली म्हणजे महाराज तिकडे प्रसन्न दृष्टीनें पहात होते, खरें ना ?

वंजुलः—कोणाला ठावूक ! त्या वेळीं माझें सारें लक्ष महाराजांच्या मागें बसलेले प्रधानजी, सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत होते तीं कोणाला सांपडतात हें पहाण्याकडे होतें. पहा, स्वारी संपली, आणि खालीं पडलेलीं फुलें स्वारी निघून गेल्यावर आपल्या हातीं येतील अशी माझ्यासारख्या कोणीं आशा केली असल्यास ती व्यर्थ आहे. आतां रस्त्यांत फक्त कचराच राहिला आहे.

सावित्रीः—कचऱ्याची सोन्यारुप्यासारखी किंमत करणारा कोणी असला तर कचरा सुद्धां पडून रहाणार नाहीं.

वंजुलः—असला फुटक्या कपाळाचा कोण असेल ?

सावित्रीः—जगाला कचऱ्याची किंमत कळून आली म्हणजे या प्रश्नाचें उत्तर आपोआप मिळेल. आणि कोणाचें कपाळ फुटकें आणि कोणाचें घडकें, कोणाची परीक्षा खरी आणि कोणाची खोटी, या प्रश्नांचा उलगडा ज्यानें निःसारांतलें सार पाहिलें तोच करूं शकेल हेंहि जगाला त्या वेळीं समजेल. (परिचारक प्रवेश करतो.)

परिचारकः—[नमन करून] बाईसाहेब, स्वारी महालांत पोंचल्याबरोबर महाराज राणीसाहेबांची भेट घेऊन लागलीच दरबारांत यावयाचे आहेत म्हणून दरबाराचे आधीं माझे घरीं येणें होणार नाहीं, असें प्रधानजींनीं सांगून पाठविलें आहे. त्याचप्रमाणें महाराजांचा असा निरोप आहे कीं, दरबाराचे वेळीं राणीसाहेब जेथें असतील तेथें त्यांच्याबरोबर आपण आणि कमलाबाईसाहेबांनीं हजर रहावें.

सावित्रीः— महाराजांनीं आम्हांला हें काम सांगितलें ही त्यांची कृपाच आहे.

वंजुलः—प्रधानजींनीं मला कांहीं निरोप धाडलाच असेल ?

परिचारकः—नाहीं भूदेव, मला कांहीं सांगितलें नाहीं.

वंजुलः—सांगितलें नसलें तरी मला दरबारांत गेलेंच पाहिजे. मी नसलों तर दरबारांत उगीच कमतरता राहून जावयाची !

[जातात.]

प्रवेश २ रा.

[स्थळः---प्रभापुंज महालांतील राणीचें शयनगृह. लीलावती वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन उभी आहे. रायजी प्रवेश करून क्षणभर स्तब्ध राहतो.]

रायजीः---(खिन्न स्वरानें) आर्ये, कुशल आहेसना ?

लीलावतीः---महाराज, दरबारांत जाण्यापूर्वीं येथें येऊन माझ्या विनंतीला आपण मान दिलात आणि मी न सांगतांना माझें हृद्गत ओळखून महालांत आरसे लावण्याची आपण होऊन परवानगी दिलीत या कृपाप्रसादामुळें माझा उल्हास गगनांत मावेनासा झाला; पण आपली स्वारी यावयाचे वेळीं मीं दारांत उभी न राहतां आंत राहावें असा कठोर निरोप आपण धाडलात तेव्हां मी कुशल कशी असेन !

रायजीः---दार अरुंद आणि क्षोभाचा प्रसंग म्हणून---

लीलावतीः---(खालीं पाहून) म्हणून तर विशेष लाभ !

रायजीः---राणी---

लीलावतीः---अजून " राणी, " " आर्ये, " आणि असलीं दुरून बोलणीं ! सहा महिन्यांच्या विरहावस्थेंत आपण माझ्यासाठीं एकहि प्रेम-वचन योजून ठेवलें नाहीं ? आपण असे स्तब्ध कां ? माझी परीक्षा पाह-ण्याचा विचार केला आहे कीं काय ? पण माझी ती परीक्षा कसली ? मी स्त्री आहें, अधीर आहें, आणि कांहीं झालें तरी अधीर स्त्री पहिल्यानें हाच उपक्रम करणार. आपण बोलत कां नाहीं ? माझ्याकडून असा अपराध तरी काय झाला ?

रायजीः---आपला कांहींच अपराध नाहीं. उलट मीच सहस्रशः अपराधी आहें.

लीलावतीः---असल्या उपरोधिक बोलण्याचें मला खरोखरी भय वाटतें. आजच्या प्रसंगीं तीं शोभतात तरी का ?

रायजीः---हा उपरोध नाहीं, खरी हकीकत आहे. मी माझ्या अप-राधांची गणती करूं लागलों म्हणजे आपली खात्री होईल.

लीलावतीः---मला असल्या गणतीशीं काय करावयाचें आहे ? खरें

सांगायचें गडे ! कारण मी आपल्या अनुग्रहाची गणती करायला उत्सुक झालें आहें.

रायजीः--अनुग्रह करण्याचा माझा अधिकार नाहीं.

लीलावतीः---महाराज, या दर्पणांत सर्व जड चराचर वस्तूंचें प्रतिबिंब दिसतें त्याप्रमाणें या माझ्या हृदयाचें प्रतिबिंबहि त्यांत दिसणें शक्य असतें तर या हृदयाच्या प्रत्येक रंध्रांत केवळ आपलाच अधिकार चालत असलेला दृष्टीस पडला असता. प्राणनाथ, आतां कोठपर्यंत अंत पाहणार ?

रायजीः---राणीसाहेब, आपण चुकतां मी आपला प्राणनाथ नाहीं.

लीलावतीः—(अश्रु पुशीत) या अभागी हृदयाला आपल्या प्रेमाबद्दल शंका आली होती त्याचें प्रायश्चित्त त्याला मिळालेंच पाहिजे. पण माझ्यावरचें आपलें प्रेम इतकें का लुप्त झालें ? अवशिष्ट कांहींच राहिलें नाहीं ?

रायजीः--मीं खरी हकीकत सांगितली तर आपलें धैर्य कायम राहील ?

लीलावतीः--आधारच नाहींसा झाल्यावर धैर्य टिकावें कसें ? पण आपण सांगाल तें ऐकणें माझा धर्म आहे.

रायजीः—तर मग ऐका. मी पर्वतराय नाहीं.

लीलावतीः--काय ? आपण महाराज नाहीं ? मग माझे प्रिय स्वामी आहेत कोठें ?

रायजीः--सहा महिन्यांपूर्वींच ते स्वर्गवासी झाले. मी फक्त त्यांचा वेष घेऊन आलों आहें.

लीलावतीः--हाय ! प्राणनाथ ! (मूर्छित होऊन पडते.)

रायजीः—(लीलावतीस हातावर झेलून) जिचा स्पर्श चुकविण्यासाठीं मीं पावलोपावलीं इतकी सावधगिरी बाळगली तिलाच स्वहस्तानें उचलून धरणें शेवटीं भाग पडलें ! मी आलों म्हणजे महालाच्या दारांत माझा सत्कार करण्यासाठीं लीलावतीनें निकट येऊं नये, तिनें आंतच थांबावें, म्हणून सांगून पाठविलें, तिनें ठरविल्याप्रमाणें गळ्यांत हात घालून मला दर्पणाजवळ नेऊं नये म्हणून महालांत आरसे लावावे अशी मीं आपण होऊन आज्ञा केली;-पण हिच्या या अचेतन शरीरास जमीनीवर पडूं देण्याइतका कठोरपणा आणावयाचा कोठून ? हिला आतां स्वस्थ-

तेची जरूर आहे. (लीलावतीला उचलून मंचकावर ठेवतो.) वाऱ्यानें हिला कांहींसा आराम वाटेल. (पंखा घेऊन वारा घालतो.) डोकें खालीं झुकलें तर मेंदूंत उलट रक्त चढावयाचें ! (तिचें मस्तक उचलून तकियावर ठेवतो.) एका क्षणांतच शरीर किती कोमेजून गेलें ! तरी पण या स्थितींतहि हिचें सौंदर्य अखंडित आहे. अहाहा ! गौरवर्णाच्या उज्ज्वलतेस तर उपमाच नाहीं ! आणि काय चमत्कार आहे पहा ! एकाद्या निर्जन अरण्यांत अमूल्य रत्नांची पण कांहींशी मलिन झालेली माला पडलेली असावी आणि तिच्यांत चैतन्य नसतांहि तिच्या जवळून जातांना वनपशु जसे भीतीनें तिला टाळण्याचा स्वभावतः प्रयत्न करीत असतात, त्याप्रमाणें ही युवती येथें पडलेली आहे; आणि मी भिऊन दूर दूर सरत आहें !—पण मला भीति कसली ! माझे पाय कां कांपतात ? काय मी वन्यपशु आहे ! सौंदर्य पाहून मला भीति वाटते ! येथें येते वेळीं या सौंदर्याच्या सन्मुख मला व्हावें लागणार हें मी पुरतेपणी जाणून होतों. पर्वतरायाच्या मृत्यूची बातमी लीलावतीला दुसऱ्या कोणीं कळविली तर भलताच अनर्थ ओढवेल, माझ्या येण्यापूर्वी ही बातमी पसरली तर राज्याची लगाम कोणाच्याच हातांत राहणार नाहीं, या विचारानेंच लीलावतीची स्वतः भेट घेण्याचें मीं ठरविलें; आणि असें असून आतां मी विव्हल कां झालों ? या सौंदर्यचंद्रिकेंत माझ्या संकल्प तारकांचा लोप झाला काय ! "सन्मतीची प्रेरणा केलीस त्याप्रमाणें बलहि दे–" हें कोणत्या ग्रंथांतलें वाक्य मला या वेळीं आठवलें बरें ! सतत अध्ययन करीत राहिलें म्हणजे वाटेल तेव्हां वाटेल तें वाक्य उगीच मनांत येतें. अरे, पण नाहीं ! हें वाक्य म्हणजे त्या प्रसंगीं मीं केलेली प्रार्थना होय ! अहाहा ! या आठवणीनें मला किती बल प्राप्त झालें आहे ह्मणून सांगूं ! आतां माझे सारे संकल्प पुनः उद्दीप्त आणि दृढ झाले. सौंदर्य म्हणजे दैवी विभूतीचा अंशच ना ? त्याला भिण्याचें कारण काय ? आनंदाशीं किंवा पवित्रतेशीं सौंदर्याचा विरोध कां होऊं द्यावा ? अरे, मोहवशतेमुळें मी हिला मूर्छेंतून जागृत करण्याचेंहि विसरलों ! (जल पात्रांतील पाणी घेऊन लीलावतीच्या मुखावर शिंपडतो.) राणीसाहेब, जागृत व्हा.

लीलावतीः—(डोळे उघडून सभोंवतीं पाहून) मी या मंचकावर कशी आलें ? (उठून बसून) हें पाणी कसलें ?

रायजी:—राणीसाहेब, आपण मूर्छित झालां होतां आणि मी आपणांस सावध करण्याचा प्रयत्न करीत होतों.

लीलावती:—आपण कोण बरें ? हो, आतां मला आठवण झाली. (मंचकावरून खालीं उतरते.) मला खरेंच सांगा, आपण थट्टा तर करीत नाहीं ना ?

रायजी:—ईश्वर साक्षी आहे. मी कांहीं असत्य सांगत नाहीं. [खिशांतून कागद काढून] या पत्रांत मीं सर्व हकीकत विस्तारानें लिहिली आहे. दुसऱ्या दालनांत जाऊन आपल्या परिचारिकाजवळ असतांना हें वाचा आणि माझ्या अनेक अपराधांबद्दल मला क्षमा करा एवढीच माझी विनंती आहे. [कागद देतो.] सर्व गुर्जर प्रजेला आपण मातृतुल्य आहां त्याप्रमाणें मलाहि मातृतुल्य आहांत. [जातो.]

प्रवेश ३ रा.

[स्थळ:—प्रभापुंज महालांतील एक दालन. शुभ्र वस्त्र नेसून लीलावती बसली आहे. सावित्री आणि कमला तिच्याजवळ बसल्या आहेत. बाजूला मंजरी उभी आहे.]

लीलावती:—अजून मला हें सारें गूढच वाटतें. या पत्रानें कोड्याचा उलगडा होण्याचे ऐवजीं उलट घोंटाळा मात्र झाला आहे.

सावित्री:—या जगांतील रहस्याचें स्वरूपच असें असतें. एक पडदा उघडण्याचा उशीर, कीं, त्याच्यामागें दुसरे शंभर पडदे दत्त ह्मणून उभे. जेवढें समजलें तेवढें आपलें अज्ञान दूर झालें अशी मनाची समजूत करून समाधान मानलें पाहिजे.

लीलावती:—मी समाधान मानूं कशाचें ? मला न कळत ओढवलेलें दुर्भाग्य आतां प्रकट होऊन मीं सुखासाठीं केलेल्या धडपडीचा जणूं उपहास करीत आहे आणि माझ्या दुःखाची तीव्रता क्षणोक्षणीं वाढवीत आहे. [दासी प्रवेश करते.]

दासी:—राणीसाहेब, जालका माळीण आपल्या भेटीसाठीं आली आहे. आंत पाठवून देऊं का ?

सावित्रीः—भेटण्याची ही वेळ नव्हे.

लीलावतीः—पण माझें तिच्याशीं काम आहे. येऊं दे तिला इकडे.

[दासी जाते. फुलांचें तबक घेऊन जालका प्रवेश करते.]

जालकाः--राजाराणीच्या जोडप्यास देव सुखी ठेवो !

लीलावतीः--काय ग, राजाराणीच्या सुखाची तुला फारशी काळजी लागली आहे !

जालकाः--हें काय विचारणें राणीसाहेब ! मी आपली जुनी माळीण ना !

लीलावतीः—तूं खरोखरी माळीणच आहेस का पण !

जालकाः—एवढ्यांत ओळख विसरलां वाटतें !

लीलावतीः—नाहीं, तुला विसरलें नाहीं आणि कधीं विसरायचीहि नाहीं; पण तूं आलीस कां तें सांगितलें नाहींस.

जालकाः—मी कालच आपल्याला सांगून नव्हतें का गेलें ! घ्या, ही फुलांची जाळी पलंगावर अंथरा, हे हार आणि गजरे महाराजांना घाला आणि अखंड सौभाग्यवती व्हा.

लीलावतीः--माझें सौभाग्य किती वर्षें टिकेल हें तूं कोणा जोश्याला विचारून आलीस का ?

जालकाः—इडापिडा टळो ! राणीसाहेब असले अशुभ शब्द कां उच्चारतां ! जोशी आकाशांतले तारे पाहून भविष्य वर्तवितात त्याप्रमाणें माझ्या बागेंतलीं फुलें पाहून मीं असें भविष्य केलें आहे, कीं, आपलें सौभाग्य अखंड राहिलेंच पाहिजे !

लीलावतीः--पुरे झालें, दुष्टे, जीभ आवरून धर. तुला खोटें बोलायला लावायची मलाच लाज वाटते. माळणीचें सोंग घेऊन माझ्या स्वामीचा घात केलास एवढ्यानें तुझी शांति झाली नाहीं म्हणून माझ्या दुःखावर डागण्या देण्यासाठीं आलीस कीं काय ?

जालकाः—काय हें !

लीलावतीः—उगीच वेड कां पांघरतेस ! तुझ्या मुलानें या पत्रांत सर्व खरी खरी हकीकत लिहून कळविली आहे. तूं क्षत्रियकन्या असून आपल्या राज्यतृष्णेस माझ्या पातिव्रत्याची आहुति देण्यास तयार झालीस ! धिक्कार असो तुला आणि तुझ्या कुळाला !

जालका:—सारी हकीकत जाहीर झालीच आहे तेव्हां म्हणतें कीं, माझ्या पतीचा अधर्मानें वध करून त्याची गादी बळकावणाराच्या बायकोनें माझ्याकडून न्यायाची अपेक्षा करावी तरी कोणत्या तोंडानें !

लीलावती:—न्याय करण्याची तुझी अवकात नाहीं, आणि मी तुझ्याकडे न्यायाची याचनाहि करीत नाहीं. पण तुला एका राणीच्या, एका क्षत्रियकन्येच्या, निदान एका स्त्रीच्या अब्रूची कांहींच का चाड नाहीं ?

जालका:—तुमच्या अब्रूची हानि होण्यासारखें मीं केलें तरी काय ?

लीलावती:—तुझ्याप्रमाणें तुझा पुत्रहि अधम असता तर माझ्या पावित्र्याचें काय झालें असतें ?

सावित्री:—पवित्रतेची काळजी ईश्वराला आहेच.

जालका:—ईश्वराच्या आणि न्यायाच्या मोठमोठ्या गोष्टी सांगतां तर माझ्या मुलाला त्याचें हक्काचें राज्य देऊन टाकाना !

लीलावती:—असें भीक मागितल्यानें राज्य मिळत नसतें आणि चोरीमारीनेंहि मिळत नसतें. क्षत्रिय बाहुबळानें राज्य संपादन करीत असतात. पण तूं आपलें क्षत्रियकुल सोडून माळीण झालीस तेव्हां तुला क्षत्रियधर्म कोठून आठवणार ?

सावित्री:—राणीसाहेब, उगीच त्रास करून घेण्यांत काय अर्थ आहे?

जालका:—वेळ आली म्हणजे मला क्षत्रिया होतां येतें कीं नाहीं तें दाखवीन. पण सध्यां तर तुम्हांलाच गाशा गुंडाळला पाहिजे. राज्यावर तुमचा काडीइतकाहि हक्क राहिला नाहीं. निपुत्रिकाचें राज्य दुसऱ्यालाच जात असतें.

लीलावती:—पुरे कर, मला असले अपशब्द बोलणारी तूं कोण ?

जालका:—आणि मला अरेतुरे म्हणणारी तूं तरी कोण ? मी सुद्धां राजाची राणी आहें. तुझ्या लहानवयाकडे पाहून इतका वेळ तुझीं बेसुरवतीचीं बोलणीं सोसून घेतलीं समजलीस !

लीलावती:—माझ्या लहान वयाची तूं फार कींव केलीस खरी ! आतां अधिक कींव करण्याची तसदी घेऊं नकोस. पण तुझ्यावर दया करून सांगतें, कीं, तुला जर जिवंत रहायचें असेल तर या देशांतून ताबडतोब चालती हो कशी !

जालका:---माझ्या एका केंसासहि धक्का लावण्याची कोणाची छाती नाहीं. मी राजमाता झालें म्हणजे माझ्यापुढें नाक घासण्याचा तुलाच प्रसंग येईल हें लक्षांत ठेव.

लीलावती:—माझी अन्नान्नगत दशा झाली तरी मी तुझ्यापुढें म्हणून कधीं तोंड वेंगाडण्यास येणार नाहीं हेंहि तूं पक्कें लक्षांत ठेव. तुझा पुत्र राजा होईल कीं नाहीं तें मला सांगतां येत नाहीं, पण तूं राणीची माळीण झालीस ती मरेपर्यंत माळीणच रहाशील. माझें हृदय तूं भग्न केलेंस त्याप्रमाणें तुझेंहि हृदय भग्न होईलच होईल !

[जालका मूर्छित होऊन पडते.]

कमला:—शेवटीं गड ढासळला.

सावित्री:—कमले, तूं आणि मंजिरी मिळून हिला बाहेर घेऊन जा आणि कोणाबरोबर तरी घरीं पोंहचती करा.

(कमला आणि मंजिरी जालकेला सावध करून बाहेर नेतात.)

लीलावती:—कशी खोड मोडली अवदसेची !

सावित्री:--राणीसाहेब, कोणालाहि शाप देणें योग्य नव्हे. ईश्वराच्या प्रेम तंत्राला आपल्या शापानें आघात मात्र होतो.

लीलावती:—असल्या स्त्रीलाहि शाप देणें उचित नाहीं काय ?

सावित्री::--मनुष्याच्या अधिकारांतली ही गोष्ट नाहीं.

(कमला प्रवेश करते.)

लीलावती:—जातांना ती कांहीं बोलली का ?

कमला:—शुद्धीवर येत असतांना ती म्हणाली, " जगदीप, तुला किसलवाडींत आणि प्रभापुजांत कांहींच का फरक वाटत नाहीं. " पण डोळे उघडल्यावर आम्हांला पाहिलें तेव्हां तिचें बोलणेंच बंद झालें.

लीलावती:--तुम्हांला कसें वाटतें, तिच्या मुलालाच गादी मिळेल काय ?

कमला:--योग्य स्वामीला माळ घालण्यास राज्यलक्ष्मी समर्थ आहे. ही लक्ष्मी सनाथ असणें यांतच लोकांचें हित आहे.

सावित्री:—कदाचित् दरबार झाल्यावर या गोष्टीचा खुलासा होईल.

लीलावती:—मी स्वस्थ चित्त असलें म्हणजे दरबारांत झालेली हकी-

कत मला येऊन कळवा, आतां मला येथून घेऊन चला. प्रखर संतापाचा परिणाम मला इतक्यांतच जाणवूं लागला आहे असें दिसतें.

(सावित्री आणि कमला लीलावतीस आंत नेतात.)

प्रवेश ४ था.

(स्थळः--दरबार, कल्याणकाम, पुष्पसेन, दुर्गेश, आणि इतर सरदार लोक बसले आहेत. पुढें प्रतिहार आणि त्याच्या मागून रायजी प्रवेश करतो. मंगलवाद्यें वाजावयास लागतात. सर्व दरबारी लोक खडी खडी ताजीम देतात.)

प्रतिहारः--श्रीमत् परमभट्टार्कपरममाहेश्वरपरमभागवतसमधिगतपंचमहाशब्दसकलसामंताधिपतिबाहुसहाय गुर्जरनरेन्द्र श्री पर्वतराय महाराजाधिराज की जय! (रायजी तरवारीनें सिंहासनाला स्पर्श करतो. इतर दरबारी लोक म्यानांतून तरवारी काढतात, रायजी सिंहासनावर बसतो. दरबारी लोक तरवारी म्यानांत ठेऊन खालीं बसतात. थोडा वेळ गायनवादन होऊन थांबतें.)

राजभटः--(पुढें येऊन नमन करतो.) महाराजाधिराजाचा जयजयकार असो!

कविता.

गुर्जरत्रानें सूर्यको उदय भयो नूतन,
बुढापनको बादल श्यामल चलो गयो;
प्रबल प्रताप वाको जल स्थल पुर रहो,
गुर्जर प्रजाको मुख तेजसे दीप्त भयो;
पांख आप खोले तब खगराज थंभे नही,
ग्रहराज थंभे नही पूर्वाद्रिशृंग गृह्यो;
गिरिसे बाहेर आय नदराज थंभें नहीं;
गुर्जरराज न थंभे जोबन पाय नयो. ॥

गुर्जराधिपतीचा पराक्रम आणि यश वृद्धिंगत होवोत!

प्रतिहारः--महाराजांची आज्ञा असल्यास प्रथम प्रधानजी मुजरा करण्यास पुढें येतील.

रायजीः--मुजरे आणि नजराणे घेण्याचा हा प्रसंग नाहीं पण मी जें बोलणार आहे तें लक्षपूर्वक ऐकण्यास सर्वांना सांगा.

प्रतिहारः जशी महाराजाची आज्ञा. (दरबारी लोकांकडे वळून) आजच्या दरबारांत भेट बंद आहे. पण महाराज जें बोलताहेत तें सर्वांनीं सावधान चित्तानें ऐकावें अशी सरकारांची आज्ञा आहे.

रायजीः--आपल्या आजच्या आनंदाचा विरस करण्यास मला अ-
त्यंत वाईट वाटतें, परंतु माझा नाइलाज आहे. सत्य हें केव्हां तरी
जाहीर झालेंच पाहिजे, आणि तें जाहीर होण्यास जितका अधिक विलंब
लागेल तितका नुकसान होण्याचा संभवहि अधिक. मी ह्मणतों तें सत्य
हेंच कीं, मी पर्वतराय नाहीं. दचकूं नका. माझा खुलासा ऐकून घ्या.
मी पूर्वींच्या रत्नदीपदेव राजाचा पुत्र जगदीप आहें. माझी आई अमृत-
देवी आणि मी या नगराबाहेर असलेल्या किसलवाडींत आज बऱ्याच
दिवसांपासून माळ्याच्या वेषानें राहत आहों, आणि जालका आणि राई
या नांवानें आम्ही ओळखलें जात होतों. बरोबर सहा महिन्यांपूर्वीं एके
रात्रीं महाराज पर्वतराय किसलवाडींत आले होते. रात्र अंधारी होती.
आणि त्यांच्या येण्याची मला गंधवार्ताहि नसल्यामुळें निशाचर पशु आहे
असें समजून मीं दुरून बाण मारला तो दुर्दैवानें अकस्मात् महाराजांना
लागला आणि ते त्याच क्षणीं गतप्राण झालें. त्यांचें शव तेथेंच पुरलेलें
आहे. मीं पर्वतराय बनावें अशी योजना त्या वेळीं करण्यांत आली,
आाण त्याप्रमाणें महाराज सहा महिन्यांनीं भुयारांतून बाहेर निघतील
अशी निव्वळ खोटी बातमी घाडली. परंतु कपटानें राज्य मिळविण्याची
माझी इच्छा नाहीं. महालांत जाऊन लीलावतीराणीसाहेबांनाहि मी ही
खरी हकीकत कळवून आलों आहें. महाराज पर्वतरायांना कोणी वारसा
नाहीं. तेव्हां नवीन राजा गादीवर बसेपर्यंत देशाची शांतता आणि सुव्य-
वस्था कायम ठेवणें हें मुत्सद्याचें आणि लोकनायकांचें आद्यकर्तव्य आहे.
कोणास गादी द्यावी हाच आतां एक मोठा प्रश्न आहे. रत्नदीपदेव
महाराजांचा पुत्र या नात्यानें गादीवर माझा हक्क आहे असें माझें ह्मणणें
आहे. परंतु गेल्या सहा महिन्यांत जें कपट नाटक चाललें होतें त्याच

कोणत्याही प्रकारें गैरवाजवी फायदा घेण्यांत येऊं नये म्हणून आजपासून पंधरा दिवस मी नगरापासून दूर राहीन आणि ह्या मुदतीनंतर राष्ट्रांतील राजकार्यधुरंधर आणि प्रजेचे अग्रणी यांना योग्य वाटेल त्या पुरुषास राजगादी द्यावी अशी माझी सूचना आहे. या बाबतींत सर्वांची इच्छा समजून घेण्यास काय करावें तें मंत्रीश्वर कल्याणकाम ठरवितीलच. सहा महिने ज्याप्रमाणें पर्वतराय महाराजांच्या वतीनें प्रधानजींनीं राज्यकारभार चालविला त्याप्रमाणें आणखी पंधरा दिवस नवीन होणाऱ्या राजाच्या वतीनें ते चालवितील; आणि सर्व प्रजा हा वेळपावेतों जशी त्यांच्या आज्ञेंत वागली तशीच आणखी कांहीं दिवस वागेल अशी मला उमेद आहे. प्रधानजीच्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें आणि सत्त्वप्रभावानें आपल्या देशास सुस्थिति आणि समृद्धि ही खात्रीनें प्राप्त झालीच पाहिजे. माझ्याविषयीं लोकांना कांहीं माहिती असण्याचा संभव नाहीं. पण एके प्रसंगीं रायजी म्हणून मी प्रधानजींना भेटलों आहें आणि नायब दिवाण दुर्गेशरायांना माझें नांव गांव जरी माहीत नव्हतें तरी ते मला आपला मित्र म्हणून समजत होते. त्यांच्याकडून आपल्याला थोडीशी माहिती मिळेलच. आतां या विलक्षण प्रसंगाची समाप्ति करतों. आणि माझ्या अपराधाबद्दल सर्वांची एकवार क्षमा मागतों.

(दरबारांतून उठून जातो.)

कल्याणकामः—प्रतिहार, सभा विसर्जन करा.

प्रतिहारः—(मोठ्यानें) दरबार बरखास्त ! [सर्व जातात.]

अंक पांचवा समाप्त.

अंक ६ वा.

——:०:——

प्रवेश १ ला.

(स्थळः—रंगिणी नदीचा किनारा. रायजी एका टेकडीवर बसला आहे.)

रायजीः—हें रमणीय स्थळ इतकें जवळ असून मी कधींच इकडे आलों नाहीं हें आश्चर्यच म्हणावयाचें ! किसलवाडी आणि कनकपुराच्या दरम्यान मी नेहमीं फिरतों. सारें कनकपूर मीं पालथें घातलें. पण कनकपूर सोडून इकडे उत्तरेकडे येण्याचें माझ्या मनांतच आलें नाहीं. पलीकडच्या बाजूस एक बाग आहे आणि तेथें राजवाड्यासारखी एक इमारतहि दिसते आहे. नदी या बागेंतूनच जाते असें वाटतें. शीतलसिंहांनीं या इमारतीबद्दल कधीं अक्षरहि कां बरें नाहीं काढलें ? कांहीं कां असेना !--पण शीतलसिंहाचें काय होईल ? आणखी कांहीं वेळ मी नगरांत राहिलों असतों तर जालका आणि शीतलसिंह या दोघांची क्षमा मागण्यास मला अवसर तरी सापडला असता. क्षमा ! आह्मां तिघांपैकीं क्षमा कोणीं कोणाची मागावयाची ! शिवाय, मी रातोरात तडक निघून आलों नसतों तर मला ही स्वतंत्रताहि कोठून प्राप्त झाली असती ? अहाहा ! या अरुणोदयानें माझा उल्हास किती पटीनें तरी वाढला आहे ! आकाशांत हळू हळू स्फुरण पावणाऱ्या प्रभाताशीं ही सर्व पृथ्वी जणूं एकात्मच झाली आहे. जलांतून, वायूंतून वृक्षांतून, पक्ष्यांच्या पंखांतून जेथें पहावें तेथून प्रभाताचा उदय होत आहे; आणि माझ्या मनोवृत्तींतूनहि प्रभात प्रकट होत आहे असें मला वाटतें ! (ऐकून) पण हा ध्वनि कसला ऐकूं येत आहे बरें ? कोणी गात आहेसें वाटतें (लांबवर पाहून) नदींत एक नौका दिसतें आहें आणि नौकेंत बसलेल्या दोन स्त्रियांपैकीं एक वीणा घेऊन गाते आहे. अहाहा ! काय मधुर अवाज ! नौका इकडेच येत आहे. पण बागेभोंवतीं तट असल्यामुळें येथपर्यंत नौका येणें शक्य नाहीं. तेथेंच या झाडाआड बसून संगीताचा अस्वाद घेऊं या झालें !

विणावती:—(पडद्यांतून)

[राग भैरवी–त्रिताल.]

विनवूं, मार्ग करो ! वहे मुज नाव ॥धृ०॥
रोक नदी, तुज प्रतिकुल स्रोत तूं ! वचमां आ नाव समाव।१।
वायु, घसे जे वेग तुज सामो । नाव काज ते हठाव ॥ २ ॥
काष्ठ तुंतज आजड भार तारो । नाव हलकी बनाव ॥ ३ ॥
जाओ छुटी सहु स्थूल मम बंधन । सूक्ष्म गति, तूं आव॥४॥
सरल पथ मन अभिलाषा........

रायजी:—एकाएकीं गायन बंद कां बरं झालें ! (पाहून) अरेरे ! नाव बुडायला लागली ! मी त्यांच्या मदतीला जाऊं कसा ? बागेभोंवती तर उंच तट आहे ! (टेकडीवरून खालीं उतरून) पाण्याखालून तेथ-पर्यंत पोंहत गेलें पाहिजे. दुसरा मार्गच नाहीं.

(नदीत उडी टाकतो.)

प्रवेश २ रा.

[स्थळ:—रंगिणी नदीजवळचा बाग. वीणावतीला घेऊन रायजी नदींतून बाहेर निघतो.]

रायजी:—(वीणावतीला जमीनीवर ठेऊन) नुसत्या भीतीनेंच ही बेशुद्ध झाली असावी. नौका बुडतांक्षणींच ही माझ्या हातीं लागली तेव्हां हिच्या जिवाला अपाय होण्याची धास्तीच नको. बाई, सावध व्हा ! (थांबून) अहा ! काय अप्रतिम सौंदर्य हें ! या स्थितींत हिला उपमा म्हणजे प्रातःकाळीं दंवानें थबथबलेल्या नवविकसित गुलाबाचीच शोभेल. हिच्या शरीरकांतीच्या तेजानें भोंवतालची तृणमय भूमि एकाद्या प्रासा-दांतील पाच जडलेल्या गच्चीप्रमाणें चमकूं लागली आहे, आणि ही सुंदरी देखील एखाद्या प्रासादांतली लावण्यवती स्त्रीच असावी.—पण मी काय करीत आहे हें ! मूर्च्छागत झालेल्या परस्त्रीच्या अंगाचें निरीक्षण करणें योग्य आहे का ? हरकत नाहीं, तिच्याकडे पाहिल्याशिवाय मी तिला

उठविण्याचा प्रयत्न करतों म्हणजे तर झालें ! (खालीं पाहून) बाई, अहो बाई, उठा, सावध व्हा !

(भिजलेल्या वस्त्रानें लेखा प्रवेश करते.)

लेखाः—हाय हाय ! राजकुमारीचें झालें तरी काय ? (रायजीला पाहून चपापून) आपण कोण ?

रायजीः–नौका बुडत असलेली पाहून मी मदतीसाठीं धांवून आलों आणि यांना आतांच पाण्यांतून बाहेर काढलें. मला वाटतें त्या शुद्धीवर येत आहेत. त्यांचा अधर जरा हालल्यासारखा दिसला.

वीणावतीः—(डोळे उघडून) लेखा कोठें आहेस ?

लेखाः—ही मी आपल्याजवळच आहें.

वीणावतीः—आपण वांचलों कशा ?

लेखाः—आयुष्याची दोरी बळकट म्हणून वांचलों. मी वहात चाललें होतें ती कांठावरील एका झुडपाला धरून कशीबशी बाहेर निघालें आणि आपणाला वांचविणारे हे जवळच उभे आहेत. (वीणावती उठून बसून रायजीकडे पहाते आणि पुनः खालीं दृष्टि करते.)

वीणावतीः—लेखा आतां आपल्याला येथून गेलें पाहिजे. आपलीं वस्त्रें ओलीं आहेत.

(सेवक प्रवेश करतात.)

लेखाः—हो, हे सेवक आलेच. (सेवकांना) जा, ताईसाहेबांसाठीं झटकन् पालखी घेऊन या पाहूं. [सेवक जातात.] (रायजीस) आमच्यावर आपले फार फार उपकार झाले. आतां आपण येथून जाण्याची कृपा करावी, कारण या बागेंत परक्या माणसाला पाऊलसुद्धां टाकूं देऊं नये अशी कडक आज्ञा आहे.

वीणावतीः—लेखा, अगदींच शिष्टाचार सोडणें बरें का ?

लेखाः—मग यांना आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण करूं कीं काय ?

वीणावतीः—चल वेडी कुठली ! असें मीं कधीं म्हटलें ?

रायजीः--या अकस्मिक प्रसंगानें आपल्या ताईसाहेबांना कांहीं इजा झाली नाहीं एवढें त्यांच्या तोंडून ऐकलें म्हणजे मला समाधान वाटेल.

लेखाः—तें कांहीं शक्य नाहीं. (नोकर पालखी घेऊन प्रवेश कर-

तात.) चला. ताईसाहेब, पालखींत बसा पाहूं. (रायजीस) तें समोरचें महाद्वार सेवक उघडून देतील तेथून आपण जावें.

(वीणावती. रायजीकडे पहात पालखींत बसते. नोकर पालखी घेऊन जातात. बरोबर लेखा जाते.)

रायजी:—(पालखीकडे दृष्टि करून) किती त्वरेनें पालखी दृष्टिआड निघून गेली ! पण त्यांत आश्चर्य कसलें ? दुसऱ्याचें रत्न हिसकावून घेणारा त्या माणसाचें काय झालें हें पहाण्यास उभा राहील कशाला ? रंगिणी नदीनें नौकेंतून हें रत्न हिरावून घेतलें आणि बिचाऱ्या नौकेला बुडत ठेऊन आपण पुढें चालली. त्याचप्रमाणें मी रंगिणीकडून हें रत्न छिनावून घेतल्यावर पुन: कांहीं तिच्याकडे पाहिलें नाहीं. तेव्हां आतां मला लुबाडून जाणाऱ्या पालखीनें माझी तरी पर्वा कां बाळगावी ?—पण माझी अशी स्थिति कशानें झाली असावी बरें ? आज मी एक नवीनच भाव अनुभवीत आहें. त्याचें निश्चयात्मक स्वरूप माझें मलाच कळत नाहीं. माझ्या हृदयास ज्या अनेकविध वृत्ति हालवून सोडीत आहेत त्यांची एकवाक्यता करणें याक्षणीं तरी शक्य दिसत नाहीं. चला, महाद्वार उघडलें. मला बाहेर गेलेंच पाहिजे. पण येथें मी माझें काय ठेऊन जात आहें आणि येथून बरोबर काय नेत आहें हें कांहीं समजत नाहीं.

[जातो.]

प्रवेश २ रा.

[स्थळ:—वीणावतीच्या महालाबाहेरील जागा. रायजी आणि दुर्गेश बोलत आहेत.]

दुर्गेश:—त्यानंतर ती कधीं तुमच्या दृष्टीस पडलीच नाहीं म्हणावयाची ?

रायजी:—आणखी एकदांच दृष्टीस पडली होती. त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत मी तेथेंच बसून राहिलों पण कोणींहि दिसलें नाहीं. दुसरे दिवशीं ज्या टेंकडीवरून मी नौका बुडतांना पाहिली त्याच टेंकडीच्या पायथ्याशीं एक मोठा देवमासा मरून पडलेला आढळला. त्याला पहाण्यासाठीं ती सुंदरी आपल्या दासीजनासह बाहेर आली. तेव्हां मीं

अशी युक्ति केली कीं, त्यांच्या परत जाण्याच्या वाटेवर एक मंदीर होतें त्या मंदिराच्या ओट्यावर मी दुसऱ्या रस्त्यानें जाऊन बसलों. थोडक्याच वेळानें त्या युवती परतल्या. पण जवळ येतांच सर्व दासी माझ्याकडे रागारागानें पाहूं लागल्या !

दुर्गेशः—आणि ती सुंदरी ?

रायजीः—माझ्या समोरून तर ती खालीं मान घालूनच गेली पण थोडें पुढें गेल्यावर क्षणभर उभें राहून तिनें केश सांवरण्याच्या निमित्तानें माझ्याकडे खालच्या नजरेनें पाहून मंदस्मित केलें आणि लागलीच पुढें निघून गेली. मी मात्र तिचें खरोखरी दर्शन झालें, कीं, नुसतें स्वप्नच पडलें या संशयांत गर्क होऊन राहिलों.

दुर्गेशः—मग हल्लीं स्वप्नस्थितींत आहां, कीं, संशयावस्थेंत ?

रायजीः—माझी विव्हलता तुम्हांला हास्यास्पद वाटत असेल, पण ती नाहींशी होण्यास त्या युवतीच्या पुनर्दर्शनाशिवाय दुसरा इलाजच नाहीं.

दुर्गेशः—तिचें नांव तरी तुम्हांला कळलें का ?

रायजीः—नाहीं. तिच्या नामाच्या श्रवणानें माझे कर्ण धन्य झालें नाहींत. पण तिच्या एका दासीचें नांव लेखा आहे.

दुर्गेश—(हंसून) अहो, स्वामीच्या नांवानें सेवक ओळखले जातात, कीं, सेवकाच्या नांवावरून स्वामीला ओळखतात.

रायजीः—जगांतील सर्व सिद्धांत माझ्या स्मृतींतून जणूं नष्ट झाले आहेत. लेखेनें तिला राजकुमारी म्हटलें होतें, असें मला आतां आठवतें.

दुर्गेशः—.राजकुमारी ? येथें राजकुमारी कोणीच नाहींत. पर्वतराय महाराजांच्या पहिल्या राणीला एक कन्या होती. पण ती बऱ्याच वर्षांपूर्वीं वारली. तिला काय झालें होतें हें कांहीं कोणाला कळलें नाहीं. आतां जिला राजकुमारी म्हणतां येईल अशी मला तर येथें कोणी दिसत नाहीं.

रायजीः—मग या महालांत राहतें आहे कोण ?

दुर्गेशः—कायमचें असें कोणीच राहत नाहीं. हा महाल आहे राणीसाहेबांच्या ताब्यांत, आणि त्या येथें कधीं कधीं येत असतात. त्यांच्या परवानगीवांचून कोणाला आंत सोडीत नाहींत. येथील खर्चाची वगैरे

सर्व व्यवस्था त्यांच्याच हातीं आहे. प्रधानजीचा किंवा आमचा इकडच्या व्यवहाराशीं कांहीं संबंध नाहीं. सर्व कांहीं लीलावती-राणीसाहेब स्वतः पाहत असतात. जगदीपसिंह, तुम्ही म्हणतां ती युवती लीलावती तर नाहीं ?

रायजी:—खात्रीनें नाहीं. तिचें वय लीलावतीपेक्षां थोडेंसें कमी असेल पण तिचें सौंदर्य लीलावतीच्या सौंदर्यापेक्षां सहस्रपटीनें सरस आहे. लीलावतीस मीं पाहिलें तेव्हां तिचें सौंदर्य मला अनुपम वाटलें होतें. परंतु चित्तांत उपमानांचा विशाल संग्रह केल्याशिवाय, " अनुपम " " अतुल्य, " " अपूर्व, " " सर्वोत्कृष्ट, " " अलौकिक, " इत्यादि विशेषणांचा उपयोग करणें हा निव्वळ मूर्खपणा आहे असें आतां मला कळलें. त्या अज्ञात रमणीचें वर्णन करण्यास विशेषणांची किंवा उपमानांची अवश्यकताच नाहीं. कारण जी जी वस्तू तिच्या संसर्गानें धन्य होत असे ती तत्क्षणींच सुंदर दिसावयास लागे आणि तिचा संसर्ग नाहींसा झाल्याबरोबर, तीच वस्तू विद्रूप होऊन जात असे, एवढीच खूण तिची ओळख पटण्यास पुरेशी आहे.

दुर्गेश:—अशी एकादी सुंदर स्त्री या भागांत राहते कीं काय हें मी कमलेला विचारून पाहीन. पुरुषांची गोष्ट सोडून द्या; पण स्त्रियांना इतर सुंदर स्त्रियांची माहिती बहुतकरून असतेच. त्यांच्या चौकशीच्या तावडींतून असली महत्त्वाची बाब सहसा सुटायची नाहीं; पण जगदीपसिंह, आपणहि कांहीं शोध केला पाहिजे. इतक्या दिवसांत कोणी जाणारे येणारे नौकरचाकर तुमच्या दृष्टीस पडलेच असतील ?

रायजी:—पांच दिवस झाले या महालाभोंवतीं मी प्रदक्षिणा घालतों आहें. तटाच्या प्रत्येक दाराजवळ बसून बसून कंटाळलों; पण कोणतेंहि दार कधीं उघडत नाहीं, आंतून कोणी बाहेर निघत नाहीं आणि बाहेरूनहि आंत कोणी जात नाहीं, मात्र दररोज सकाळीं हें महाद्वार उघडून आंतून कोणी एक तांबडी गाय बाहेर सोडून देतें आणि बाहेरचा एक गुराखी तिला चारावयाला घेऊन जातो. संध्याकाळीं पुनः येऊन तो गाईला आंत सोडून देतो. दाराच्या आड कोण उभें असतें तें कांहीं कळत नाहीं.

दुर्गेश:—गुराखी सकाळीं कोणत्या वेळीं येत असतो बरें ?

रायजी:—त्याची येण्याची हीच वेळ आहे, म्हणूनच मी इकडे

आलों. सकाळ-संध्याकाळ दरवाजा उघडतो तें पाहून मी आपला संतोष मानून घेतों.

दुर्गेशः—याहून अधिक संतोष मिळविण्याचा मार्ग कदाचित आतां सांपडेल.

रायजीः—तो कसा ?

दुर्गेशः—त्या युवतीच्या दृष्टिपाताच्या आणि मंदस्मिताच्या जो प्रकार तुम्ही वर्णन केला त्यावरून असें दिसतें, कीं, तिचें हृदयहि तुमच्यावर आसक्त झालें असलें पाहिजे आणि तीसुद्धां तुमच्या दर्शनासाठीं उत्कंठित झाली असावी.

रायजीः—असें अनुमान केल्यानें आपल्या हातीं काय आलें ? नुसत्या तर्कानें थोडाच कार्यभाग होणार आहे ?

दुर्गेशः—जगदीपसिंह, प्रेमांत सुद्धां धीर हा पाहिजेच. नुसत्या अनुमानानें काय हातीं येईल असें आपण विचारतां. पण अनुमानानें स्वर्गाचा मार्ग सुद्धां सांपडणें शक्य आहे. पाहा, तुम्ही उत्सुकतेनें बागेभोंवतीं फिरत असाल असा तर्क ती चतुर तरुणी करणारच, आणि रोज फक्त हाच दरवाजा उघडला जातो आणि त्यांतून ती तांबडी गायच बाहेर येते हें सुद्धां तिला माहित असलेंच पाहिजे. तेव्हां गाय बाहेर येण्याच्या वेळीं ती युवती तुम्हांला कांहीं तरी निरोप पाठविण्याचा प्रयत्न करणार नाहीं कशावरून ?

रायजीः—तो पहा, गुराखी येत आहे. (गुराखी प्रवेश करतो.) दरवाजा उघडला. गाय बाहेर आली, आणि पुनः दरवाजा बंदहि झाला.

दुर्गेशः—गाय दिसते आहे छान. चला त्या गुराख्याशीं जरा बोलूं या. (पुढें येऊन) राम राम, गुराखीदादा !

गुराखीः—राम राम !

दुर्गेशः—या गाईला थोडा नैवेद्य चारूं का ? केव्हांपासून आम्ही लाल गाय हुडकतों आहों.

गुराखीः—चारा कीं राव. शिजवल्यालं तर ही लइ खातीया. (काठीवर हनवटी टेकून उभा राहतो.)

दुर्गेशः—(थैलींतून खाण्याचें पदार्थ काढून गाईला चारीत) काय पाटील, ही गाय कोणाची हो ?

गुराखीः--कुनाची हाय काय जनू? मला तरी काय ठाव?

दुर्गेशः—तुम्हांला कोणी तरी चराई देत असेल ना?

गुराखीः--मिळतिया सरकारांतून. राव तुमचा निवद खाऊन टाकला कीं गाईन. [गाईला ओढून] हं चल आतां कुरनाकड. [गाईला हाकीत घेऊन जातो.]

दुर्गेशः--कमलेनें तुमच्यासाठीं पाठविलेल्या अपूपांचा कसा उपयोग झाला पाहिलेंत?

रायजीः—तें कमलाबाईलाच सांगा म्हणजे झालें! स्वर्गहि हातीं लागला नाहीं, आणि स्वर्गाचा मार्गहि सांपडला नाहीं. पृथ्वीवर जेथें होतों तेथेंच आहोंत.

दुर्गेशः—हें विमानासारखें कांहीं दिसतें आहे पाहा! [हातांतील कागद दाखवितो.]

रायजीः—हा तुम्हांला सांपडला कोठें?

दुर्गेशः—गाईला चारीत असतांना तिच्या गळ्यांत बांधलेल्या कवड्यांच्या माळेंतील मधल्या मोठ्या कवडींत मला कांहींसें दिसलें तें मीं हळूच ओढून घेतलें. गुराख्याकडे मी पाठ करून उभा होतों तेव्हां त्याला हें कर्म कांहीं दिसलें नाहीं. आतां या कागदांत कांहीं तथ्य आहे कीं नाहीं तें पहा!

रायजीः—[कागद उघडून] काय लिहिलें आहे हें? [वाचतो.]

“ सरलहृदयी वनवासि बालिकेला ।
जलस्रोतांतुनि काढुनिया गेलां।
दुज्या कवण्या अतिगूढशा प्रवाहीं।
लोटुनीया दिधलीत परि तुह्मीही ” ॥

दुर्गेशः—मीं कल्पना केली त्याप्रमाणेंच स्थिति आहे. माझ्याजवळ ही लेखनसामग्री आहे तेव्हां याचें उत्तर लिहून टाका पाहूं!

रायजीः—याचें उत्तर कागदाच्या उलट बाजूस मी असें लिहून पाठवितों. [लिहूं लागतो.]

“ ओघ आहे हा उच्च भावनांचा।
जोड मिळते ज्या तोचि तरे साचा।

साह्य करण्या औत्सुक्य जया भारी ।
होति तट हे त्या फार कष्टकारी " ॥

दुर्गेशः--संध्याकाळपर्यंत गाईच्या गळ्यांतील त्याच कवडींत हा कागद पुनः ठेऊन द्या. आतां तुम्हांला अंगावरून हात फिरविण्याच्या निमित्तानेंहि गाईच्या जवळ जातां येईल. उद्यां तुमच्या प्रियतमेकडून प्रत्युत्तर आलेंच ह्मणून समजा.

रायजीः--दुर्गेशराय, तुमच्या मदतीशिवाय माझें प्रेम जागच्या जागींच राहिलें असतें. मी वस्तीपासून दूर वाढलों असल्यामुळें प्रेमी जनांच्या युक्त्या मला माहीत नाहींत.

दुर्गेशः--जडावाशिवाय रत्नाला किंवा माळेंत गुंफल्याशिवाय पुष्पाला शोभा येत नाहीं. त्याप्रमाणें युक्तिप्रयुक्तीशिवाय प्रेमालाहि मजा येत नाहीं. तुमचें पडलें आपलें साधेंभोळें काम !

रायजीः--मला जी युक्ति सुचली नाहीं तीं या एकांतवासी मुग्ध बालिकेला सुचावी हें आश्चर्यच म्हटलें पाहिजे !

दुर्गेशः—आश्चर्य कसलें ! एकदां प्रेमाचा उद्भव झाल्यावर स्त्रियांना प्रेमयुक्त्या शिकवाव्या लागत नाहींत.

रायजीः—असें दिसतें आहे खरें !—पण दुर्गेशराय, बरी आठवण झाली. कनकपुरची हकीगत काय आहे ?

दुर्गेशः—तुमच्यापेक्षां मला कांहीं अधिक माहीत नाहीं. कारण तुह्मी दरबारांतून निघून गेल्याबरोबर मीहि मागोमाग तुमचा शोध करीत निघालों. पण तुह्मी परस्पर निघून आलां आणि मी कमलेला भेटण्यासाठीं घरीं जाऊन आलों म्हणून आपल्या दोघांत अंतर पडलें.

रायजीः—विवाहितांत आणि अविवाहितांत एवढें अंतर असावयाचेंच ! पण तुह्मीं मला शोधून काढलें कसें ?

दुर्गेशः—राजसभेंत वृत्तांत सांगतांना तुह्मीं किसलवाडीचा उल्लेख केला होता म्हणून प्रथम मी तिकडे गेलों पण तेथें तुमचा पत्ता लागला नाहीं. तेव्हां नगराच्या चारी बाजूंला शोध केला. शेवटीं, तुमच्या या नदीवर असलेल्या भक्तीची आठवण होऊन तुह्मी नदीतटीं कोठें तरी असाल असें मीं अनुमान केलें आणि कांठाकांठानें मार्ग क्रमीत येथपर्यंत येऊन पोंहचलों. पण जगदीपसिंह, या शिवालयांत रहाण्याऐवजीं

तुम्हीं नगरांत येऊन कां रहात नाहीं ? तेथून वाटेल तेव्हां इकडे येतां येईल.

रायजी:—हें पहा, पंधरा दिवसपर्यंत नगरापासून दूरच रहावें अशी माझी इच्छा आहे. कारण त्याशिवाय माझ्या प्रतिज्ञेप्रमाणें मला तटस्थ वृत्तीनें रहातां येणार नाहीं.

दुर्गेश:—बरें आहे, मी आतां नगरांत जाऊन कमलेला तुमची हकीगत कळवितों आणि नगरांत काय चाललें आहे याची पक्की बातमी काढून पुनः तुमच्या भेटीस येतों. येतांना एकांतवासांत तुमच्या उपयोगीं पडतील अशा कांहीं किरकोळ वस्तूहि आणतों. आतां तुह्मी अगदीं स्वस्थचित्त असा. मी परत येईपर्यंत तुमच्या कार्याची सिद्धि झालीच पाहिजे.

रायजी:—या सिद्धीचा सर्व आधार त्या गाईवर आहे. ती चरत असेल तिकडे मी आतां जातों. कमलाबाईना सांगा कीं, त्यांना सखी मिळावी म्हणून मी गोपूजेचें व्रत आरंभलें आहे. [जातात.]

प्रवेश ४ था.

[स्थळ:—वीणावतीचा बाग. तटाजवळ असलेल्या एका पिंपळाच्या वृक्षाखालीं वीणावती उभी आहे.]

वीणावती:—अजून कां आले नाहींत बरें ? खरोखरी येतील तरी का पण ? मध्यरात्रीनंतर या पिंपळावरून चढून या असें मीं त्यांना कळविलें पण इतकें साहस ते करतील का ? माझ्या पत्राखालीं "कसेंहि करून येईन" असें त्यांनीं लिहून पाठविलें. पण कसेंहि करून येण्याइतकी त्यांना काय जरूर आहे ? असें ह्मणावें तर परिजनांना झोंप लागली असें पाहून इतक्या रात्रीं या एकांतस्थळीं त्यांच्या भेटीसाठीं गुपचुप येण्याची तरी मला काय जरूर होती ? मला येथें कोणीं आणलें बरें ? हृदया, याचें उत्तर फक्त तुलाच देतां येईल. ज्या क्षणीं शांतीचा त्याग करून तूं नवीन, अपरिचित अशी वृत्ति धारण केलीस त्या क्षणापासून पूर्वींचा संबंध विसरून मी तुझी दासी बनलें आहें. जिकडे तूं

नेईल तिकडे गेल्यावांचून मला गत्यंतरच नाहीं. [वर पाहून]— पण या झाडांतून डोकावतें आहे कोण ? दुसरें कोण असणार ? रजनीनाथच तो. चंद्रा, माझी ही विवशता पहाण्यानें तुला कुतूहल उत्पन्न झालें आहे काय ? आणि केवळ त्याच्या तृप्तीसाठीं मला किरणांच्या जाळ्यांत गुरफटून तूं हळू हळू वर उचलीत आहेस असें दिसतें. माझी ही स्थिति पहाण्यांत तुला आनंद वाटतो तर मग ! पण कदाचित माझा हा आरोप खोटा असेल. तूं माझ्या मदतीस धांवून येत नसशील कशावरून ? ज्यांच्या दर्शनासाठीं अधीर होऊन मी उत्सुकतेनें येथें आलें आहे त्यांच्या आणि माझ्यामध्यें असलेलें प्रतिबंध तूं दूर करीत असशील, नाहीं कोणीं ह्मणावें ? [वरून " सुंदरी ! प्रतिबंधाचे दिवस संपले; आतां समीपतेचें साम्राज्य सुरूं होणार आहे ! " असे शब्द ऐकून दचकून.] अगबाई, हें काय ? माझें बोलणें ऐकलें कोणीं ?

[वर पहाते.]

रायजी:—[झाडावरून खालीं उतरत] या वचनामृताचा जो पिपासु होता त्यांनींच या अमृताचें पान केलें. (वीणावतीच्या जवळ जाऊन) आणि काय चमत्कार आहे पहा, या पानानें त्याची तृषा द्विगुणित मात्र झाली ! पण या अमृताच्या सरोवरावर अजून जरा छाया दिसते आहे याचें कारण काय ?

वीणावती:—मला बाई अशी चिंता पडली होती कीं, या झाडाच्या भिंतीपलीकडे गेलेल्या शाखा पडल्या फार उंच, तेव्हां आपलें येणें होईल कसें ?

रायजी:—कसल्याहि झाडावर चढण्याची कला आम्हांला लहानपणापासून अवगत आहे. पण या कलेच्या साह्यानें एके दिवशीं स्वर्ग सुखाची प्राप्ति होईल याची मला कल्पनाहि नव्हती.

वीणावती:—स्वतःला कसल्याहि झाडावर चढण्याची कला अवगत आहे त्याप्रमाणें दुसऱ्याला हरबऱ्याच्या झाडावर चढविण्याची कलाहि आपणास अवगत आहे असें दिसतें.

रायजी:—माझें बोलणें आपल्याला अतिशयोक्तीचें वाटत असेल, पण हा कांहीं माझा अपराध नाहीं. कारण हृदयाला जो विषय सांगावयाचा

आहे तोच आधीं अतुलनीय आणि अतिमर्याद आहे. माझें हृदय बोलवीत आहे त्यापेक्षां मी एक अक्षरहि अधिक बोलत नाहीं.

वीणावती:--आपण म्हणतां तो विषय सोप्या भाषेंत सांगितल्याशिवाय या तटाच्या आंत रहाणाराला कसा समजावा ?

रायजी:--या तटाच्या बाहेरच्या भाषेंत या विषयाला प्रेम ह्मणतात. तटाच्या आंत कदाचित् त्याला कांहीं दुसरा शब्द असेल ? (वीणावती खालीं पाहून झाडाच्या सालीवर नखानें "संकोच" हा शब्द लिहिते तो वाचून) सुंदरी, या संकोचाचें खरें नांव प्रेम आहे, असें कळल्यावर त्याचाच स्वीकार करणें योग्य आहे.

वीणावती:--खऱ्या शब्दाचा स्वीकार केला तरी खोट्याची कचाटी कांहीं चुकत नाहीं.

रायजी:—प्रेमापुढें कसल्याही कचाटीचा टिकाव लागत नसतो.

वीणावती:--माझ्या परवशतेची आपल्याला कल्पना नाहीं. मी राजकन्या आहे खरी, परंतु एखाद्या सामान्य माणसाइतकी सुद्धां मी आपल्या इच्छेची मालकीण नाहीं.

रायजी:--आपण राजकन्या ? कोणत्या राजाचें सदन असल्या अलौकिक रत्नानें धन्य झालें आहे तें ऐकण्यास मी उत्सुक आहें.

वीणावती:—पितृगृहीं माझा राजरोस संचार असता तर हा प्रश्नच उत्पन्न झाला नसता, परंतु पर्वतरायमहाराजांना आपल्या कन्येला दूर एकान्तवासांत कोंडून ठेवणें आवडतें त्याला कोणीं. काय करावें ?

रायजी:—मी काय ऐकतों आहें हें ! पर्वतरायांची कन्या मागेंच स्वर्गवासी झाली असा सर्व प्रजेचा समज आहे.

वीणावती:—या स्थूल तटाशिवाय माझ्या जीवनाच्या भोंवतीं गुप्ततेचे आणखी किती अदृश्य तट आहेत कोण जाणे ! पण मी पर्वतरायांची कन्या वीणावती आहें, आणि अजून स्वर्गवासी झालें नाहीं, एवढें मात्र मला खात्रीनें माहीत आहे.

रायजी:--मनसिजा ! धन्य आहे तुझी ! तुझ्या लीला अतर्क्य आहेत यांत संशय नाहीं. कोठें पर्वतरायांची कन्या वीणावती आणि कोठें रत्नदीप देवाचा पुत्र जगदीप !

वीणावती:—खरेंच कीं काय ? आपण या देशांत कोठून ?

रायजीः—माझ्या अपराधाची कथा ऐकली म्हणजे आपण अर्पिलेला प्रेमप्रसाद ठेऊन घेण्याचा माझा अधिकार नाहीं असें आपल्याला वाटूं लागेल.

वीणावतीः—आपल्याला ही शंका कां यावी ? या उद्यानांत विकसणारीं सुमनें एकदां दिलेला सौरभ परत का घेत असतात ? किंवा येथील पक्षी एकदां काढलेला मधुर रव पुन्हां आपल्या कंठांत ओढून घेतात अशी का आपली समजूत आहे ?

रायजीः—प्रिये, तूं कां कुसुमांच्या आणि पक्ष्यांच्या संगतींत वाढली आहेस आणि त्यांच्याच वर्गांतील आहेस. त्यांच्याप्रमाणें तुझें प्रेमदानही अलोप्य आहे हें मी जाणून आहें. परंतु माझा अपराध गुप्त ठेऊन तुझें प्रेमदान ग्रहण करणें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं.

वीणावतीः—ज्यांच्या गुणांची मी पूजा करतें त्यांचे अपराध जाणण्याची मला काय जिज्ञासा असणार ?

रायजीः—(खालीं पाहून) माझ्या पायाला काय लागलें हें ? (जमिनीवरून उचलून) रेशमी दोऱ्यानें बांधलेला मत्स्याचा कांटा दिसतो आहे.

वीणावतीः—इकडे द्या पाहूं. मी तो गळ्यांत बांधून ठेवला होता. पण केव्हां सुटून पडला कोण जाणे ! त्याला फार संभाळून ठेवावयाचा आहे.

रायजीः—अशी त्याची किंमत तरी काय आहे ?

वीणावतीः—त्याचें मोल कोणालाच करतां येणार नाहीं. जो देवमासा जिवंत असतांना आपल्या पहिल्या भेटीस कारण झाला, आणि मेल्यावरहि ज्यानें दुसऱ्या भेटीचा योग जुळवून आणला, त्याच्या शरीरांतील हा कांटा आहे.

रायजीः—असें असल्यास त्याला मोठ्या आदरानें बाळगला पाहिजे. पण आपल्या भेटीस देवमासा कसा कारण झाला हें कांहीं मला कळलें नाहीं.

वीणावतीः—समुद्रांतून भरतीबरोबर हा मासा नदींत आला असावा. आमच्या नौकेची आणि त्याची टक्कर झाल्यामुळें नौका पालथी झाली आणि आम्हांला जलसमाधी मिळण्याचा प्रसंग आला, पुढें भरतीचें

पाणी ओसरूं लागल्यावर तो वाहत वाहत त्या टेकडीच्या पायथ्याशीं किनाऱ्यावर जाऊन पडला आणि कांहीं वेळानें गतप्राण झाला. तेथेंच दुसऱ्या दिवशीं दासीसह मी गेलें आणि त्याच्या शरिरांतील हा कांटा स्मारकचिन्ह म्हणून घेऊन आलें. माझ्या सेवकांकडून त्याच्या देहाला मी त्या जागींच अग्नि देवविला.

रायजीः—त्याच्या सेवेला खरोखर उपमा नाहीं. वडवानलांतून आणलेला प्रेमस्फुलिंग आपल्याला अर्पण करण्यासाठीं त्यानें स्वतःचा बळी दिला. त्यानें नौका बुडविली म्हणूनच या दुर्गम उद्यानांत माझा प्रवेश झाला आणि ही दिव्य वनलक्ष्मी मला लाभली. मला तर असें वाटतें, कीं, ज्या जागीं त्यानें दुसऱ्या दिवशीं आपली पुनः भेट करविली तेथें एक स्मरणस्तंभ उभारून आपण त्याच्या ऋणांतून अंशतः मुक्त व्हावें. पण तोंपर्यंत त्या प्रेमदूताच्या अवशेषाची अर्थात् मीनेकतनाच्या या आवडत्या मंगलसूत्राची स्थापना या तुझ्या गौर कंठावर पुनः करूं दे. (वीणावंतीच्या कंठाभोंवतीं रेशमानें गांठलेला मत्स्याचा कांटा बांधूं लागतो व क्षणभर तिच्या नेत्राकडे पहात स्थिर राहतो.)

वीणावतीः—माझ्या नेत्रांत आपल्याला काय दिसतें आहे ?

रायजीः—प्रियतमे, या प्रेमार्द्र नयनांत मला काय दिसतें आहे तें शब्दांनीं सांगता येणें शक्य नाहीं. मानवी जीवनांचें खरें रहस्य मला याच क्षणीं कळलें. जी घटना आजपर्यंत अगम्य वाटत असे ती या नेत्रांचें दर्शन झाल्याबरोबर गम्य वाटूं लागली, आणि कल्पनेला अवरोध करणाऱ्या अभेद्य सीमा तर कोठच्या कोठें पार वितळून गेल्या !

वीणावतीः—या नेत्रांची माझ्या प्रियकरांस जर इतकी किंमत वाटत आहे तर मी ते काढून देण्यासुद्धां तयार आहे.

रायजीः—मला पाहिजे आहे सबंध वीणा ! तिच्या एका अवयवाची किंमत अधिक आणि एकाची कमी असें मी मुळींच मानीत नाहीं.

वीणावतीः—(वर पाहून) या चंद्राला तर बाई आज विसावाच नाहीं ! झाडांवरून निघून त्यानें इतक्यांत आपल्यावरचें छायेचें आवरण दूर केलेंसुद्धां ! चला, महालांतून दिसणार नाहीं अशा दुसऱ्या एकाद्या वृक्षाचा आपण आश्रय घेऊं.

रायजी:—प्रेमप्रतिज्ञेनें पावन झालेलें हें स्थळ सोडण्यापूर्वीं तुझ्या सुकोमल अंगुलीवर एकादी मुद्रा घातली पाहिजे. परंतु या वेळीं माझ्या-जवळ सुवर्णाची मुद्रा नाहीं किंवा रत्नाचीहि नाहीं. तेव्हा प्रेमरसाच्या अमृतमुद्रेनें ही अंगुली मला अंकित करूं दे. (वीणावतीच्या हस्ताचें चुंबन घेतो.) स्वर्गात अमृताचा आस्वाद मिळतो ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं ! आतां उषःकाल होण्यापूर्वीं त्या पलीकडल्या वृक्षाच्या छायेंत मी आपला वृत्तान्त तुला निवेदन करून माझ्या हृदयावरील भार हल-का करतो चल.

[जातात]

प्रवेश ५ वा.

[स्थळः—वीणावतीचा महाल. वीणावती आसनावर बसली आहे. लेखा दाराच्या आड लपून उभी आहे.]

वीणावतीः—(स्वगत) सारेंच कांहीं चमत्कारिक दिसतें !

पद्य चाल—(त्या मदनमनोरम रुपी)

बघतें मि तेज तें बाई । परी रूपरंग त्या नाहीं ॥ लेशही ॥
ऐकतें नाद मी कांहीं । परी श्रोत्रश्राव्य तो नाहीं ॥ लेशही ॥
चाखतें स्वाद नामी मी । नच स्पर्श परी रसनेशीं ॥ लेशही ॥
सेवितें मधुर परिमलहि । नच घ्राणग्राह्य कवणाला ॥ लेशही ॥
स्पर्शितें वस्तु कसलीशी । संसर्ग परी न त्वचेशीं ॥ लेशही ॥
वसतें मी कवण्या लोकीं । भूवरीं, स्वर्गीं न कळे कीं ॥ लेशही ॥
भावना । नविन कल्पना । नित्य मन्मना । अनुभवा येती ॥
मी वीणा किंवा असे अन्य कुणीं युवती ॥ भ्रांति ही ॥

जगाच्या भ्रमणाचें केन्द्र बदललें किंवा माझ्या स्वतःच्या जीवन चक्राचें केन्द्र बदललें कांहींच कळत नाहीं.

लेखाः—(पुढें येऊन) ताईसाहेब खरें सांगूं का ? तुमचे असले विचार ऐकून मला कसेंसेच वाटतें !

वीणावतीः—कसले विचार म्हणते आहेस तूं ?

लेखा:--आतांच तुम्ही मनाशीं काय गुणगुणत होतां ? अलीकडे मला तुमच्याविषयीं चिंता वाटूं लागली आहे, म्हणून दाराआड राहून मीं सर्व कांहीं ऐकलें.

वीणावती:—माझ्याविषयीं चिंता करायला मेलें झालें तरी काय ?

लेखा:--कां बरें ? त्या दिवशीं बुडतां बुडतां वांचला तेव्हांपासून तुमचें सारेंच कांहीं पालटलेलें दिसतें आहे. तुमच्याबद्दल मला चिंता वाटूं नये तर वाटावी कोणाला ?

वीणावती:—पण हें पहा, मृत्यूच्या जबड्यांत जाऊन आल्यावर मी पूर्वींच्यासारखीच राहीन कशी ?

लेखा:—ज्यानें तुम्हाला नदींतून काढलें त्याची कांहीं आठवण तुम्हांला राहिली आहे का ?

वीणावती:--जीवदान देणाराचें विस्मरण कसें होईल ?

लेखा:—नुसती आठवणच आहे, कीं, आठवणीबरोबर एखाद्या मनोवृत्तीचें मिश्रणहि झालें आहे ?

वीणावती:—समजा. झालें आहे, पण पुढें काय ?

लेखा:—नुसती कृतज्ञताच वाटते, कीं, विशेष कांहीं आहे.

वीणावती:—विशेष असलें तरी काय बिघडलें !

लेखा:—ताईसाहेब, खरेंच सांगा, त्यांनीं तुमचें चित्त तर हरण केलें नाहीं ना ?

वीणावती:--आपल्या राज्यांत एकाद्याचें चित्त हरण करणें हा गुन्हा होतो कीं काय ?

लेखा:—तुमच्या असल्या बोलण्यानें माझ्या मनांत नाहीं नाहीं त्या कुशंका येतात. आजपर्यंत तुम्हांला मीं जो शब्द कळूं दिला नाहीं, त्याचा उच्चार करून विचारतें, कीं, तुमच्या हृदयांत प्रेमाचा उद्भव झाला कीं काय ?

वीणावती:—शब्दाचा उच्चार केला नाहीं म्हणून भावाचा उद्भव व्हावयचा थोडाच रहातो.

लेखा:—हाय हाय ! आणखी काय अनर्थ ओढवताहेत कोण जाणे ?

वीणावती:—यांत अनर्थ कसला ? प्रेमासारख्या पवित्र वस्तूनें कोठें अनर्थ ओढवत असतात ?

लेखाः—पण तुम्ही मुळीं प्रेम करतांच उपयोगी नाहीं.

वीणावतीः—म्हणजे ? जगाच्या प्रेमघटनेंतून विधात्यानें मला एकटीलाच वगळलें आहे वाटतें !

लेखाः—(अश्रु पुशीत) अजूनपर्यंत या उद्यानाच्या बाहेर तुम्हीं पाऊलच टाकलें नाहीं तर जगांत काय आहे हें तुम्हांला कसें कळणार ?

वीणावतीः—प्रेमाच्या प्राप्तीबरोबर मला जगाच्या अनुभवाचीहि प्राप्ती झाली आहे. या उद्यानांत आहे तेंच जगांत आहे हें मला आतां कळलें. मी अनुभवीत असलेल्या प्रेमाचा प्रवाह जर सर्वत्र व्यापून राहिला आहे तर मींच मात्र त्या प्रवाहापासून अलिप्त रहावें असें तूं कां म्हणतेस ?

लेखाः—अरे दैवा, शेवटीं माझ्याच नशिबीं सांगण्याचें आलें ना ! ताईसाहेब, मी सांगतें. पण अगोदर हा खंजीर बाजूला ठेवूं द्या. (खुंटीवरचा खंजीर पेटींत ठेवून पेटीला कुलूप लावते.)

वीणावतीः—लेखा, आज तुला झालें आहे तरी काय ? असें वेड्यासारखें काय करतेस ? खंजीर पेटींत काय म्हणून ठेवलास ?

लेखाः—ताईसाहेब, प्रेमीजन असतात अविचारी, तेव्हां मी जें कांहीं सांगणार आहें तें ऐकून निराशेच्या भरांत तुम्ही आपल्या जिवाला कांहीं वेडेंवांकडें करून घ्याल या भीतीतें मीं खंजीर ठेवून दिला.

वीणावतीः—निराशाच जर झाली तर शस्त्राच्या आघाताची तरी काय जरूर आहे ? एका उश्वासाचा आघातच प्राण घेण्यास पुरे नाहीं का होणार ?

लेखाः—तुम्ही कधीं प्रेमाचीं पुस्तकें वाचलीं नाहींत तरी अगदीं त्यांत लिहिल्याप्रमाणें आज बोलायला लागलां ? मीहि एके ठिकाणीं वाचलें होतें कीं—

कोई कटारी कर मरे, कोई मरे बिख खाय ।
प्रीती ऐसी कीजिये, "हाय !" करे जी जाय ॥

वीणावतीः—पण तूं काय सांगत होतीस तें तरी ऐकूं दे ?

लेखाः—आपण आधीं खालीं बसा. [दोघी बसतात.] ताईसाहेब, तुम्हांला आई आठवते का ?

वीणावतीः—मुळींच नाहीं, मी फार लहान असेन.

लेखाः—मग त्यांच्या शेवटच्या आजाराचीहि आठवण कोठून असायला ?

वीणावतीः—नाहींच.

लेखाः—या दुखण्यांतून आपण कांहीं उठत नाहीं अशी जेव्हां त्यांची खात्री झाली तेव्हां त्यांना तुमच्याबद्दल भारीच काळजी वाटूं लागली आणि आपल्या डोळ्यांदेखत मुलीचें लग्न उरकून टाकावें असा त्यांनीं आग्रह धरला.

वीणावतीः—मोठीच नवलाची गोष्ट ! मी त्या वेळेला फार तर वर्ष दोन वर्षांची असेन.

लेखाः—यांत नवल कसलें ? एकुलत्याएक मुलीचा लग्नसोहळा पहाण्याची इच्छा आईला असणें अगदीं साहजिक आहे. तेव्हां तुमचें वय जरी लहान होतें तरी राणीसाहेबांच्या हौसेसाठीं तुमचें लग्न केल्यावांचून महाराजांना गत्यंतरच नव्हतें.

वीणावतीः—बरें मग !

लेखाः—मग महाराजांनीं तुमच्यापेक्षां वयानें थोडा अधिक असा एक राजपुत्र पाहिला, पण लग्नासाठीं त्याचें इकडे स्वतः येणें झालें नाहीं म्हणून त्याच्याकडून आलेल्या कटारीबरोबर तुमचें लग्न लावून दिलें.

वीणावतीः—कोणीं लावून दिलें ?

लेखाः—तुमच्या मातापितरांनीं.

वीणावतीः—काय बाई, एक एक गंमतच आहे !

लेखाः—अशी रूढीच आहे, पण सर्वांत भयंकर गोष्ट पुढेंच आहे. ताईसाहेब, अशा जवळ या. (वीणावतीच्या पाठीवर हात ठेवून) माझी जीभ रेटत नाहीं, पण सांगितल्याशिवाय आतां सुटकाच नाहीं म्हणून सांगतें. लग्नानंतर आठच दिवसांनीं नवज्वर होऊन त्या राजकुमाराला देवाज्ञा झाली ! [रडूं लागते.]

वीणावतीः—अरेरे ! त्याच्या आईबापांना फार दुःख झालें असेल नाहीं ?

लेखाः—त्याच्या आईबापांची काय गोष्ट विचारतां ? पण तुमच्या आईनेंहि अशुभ बातमी ऐकतां क्षणींच प्राण सोडला !

वीणावतीः--माझी आई अत्यंत कोमल हृदयाची असेल, म्हणूनच दुसऱ्याच्या दुःखानें तिच्या मनाला एवढा जबरदस्त धक्का बसला.

लेखाः--दुसऱ्याचें दुःख आणि स्वतःचें नाहीं वाटतें!

वीणावतीः—स्वतःचें कसलें ?

लेखाः—आपल्या एकुलत्याएक मुलीच्या जन्माचें मातेरें व्हावें ही दुःखाची गोष्ट नाहीं ?

वीणावतीः--माझ्या जन्माचें मातेरें झालें ? मीं असें काय केलें आहे म्हणून माझ्या जन्माचें मातेरें होईल ?

लेखाः—ताईसाहेब, तुह्मांला जगाचें अगदींच ज्ञान नाहीं. त्या राजकुमाराच्या मृत्यूनें तुम्ही विधवा झालां हें तुह्मांला अजून कसें कळत नाहीं ?

वीणावतीः—अग, तूंच वेड्यासारखें कांहीं तरी बोलतेस आणि उलट मला जगाचें ज्ञान नाहीं म्हणून म्हणतेस. मी विधवा व्हायला माझें लग्नच कोठें झालें आहे ?

लेखाः—अहो, तुमचें लग्न लावून दिलें म्हणजे तुमचें लग्न झालेंच असें ठरलें!

वीणावतीः--तें लग्न आईबापांनीं आपल्या हौसेसाठीं आणि गंमती-साठीं लावून दिलें होतें. त्याला कोणी खरें लग्न का समजणार आहे ?

लेखाः—त्यालाच खरें लग्न समजावयाचें. खऱ्या लग्नाला आणखी कांहीं शिंगें नसतात.

वीणावतीः—खरें लग्न प्रेमाचेंच असतें, होय ना ?

लेखाः—म्हणूनच तर मी म्हणतें, कीं, तुम्ही आतां प्रेम करून उप-योगी नाहीं. स्त्रीचें प्रेम एकाच पुरुषावर असावें लागतें.

वीणावतीः--पण मी अगोदर दुसऱ्या एकाद्या पुरुषावर प्रेम केलें आहे कोठें ?

लेखाः—तुमचें लग्न झालें म्हणजे तुम्ही प्रेम केलेंच असें म्हटलें पाहिजे. विधवांना प्रेम करण्याची मोकळीक असती तर त्यांना लग्न करतां आलेंच असतें. पण आपल्या शास्त्रांनीं विधवाविवाह निषिद्ध मानला आहे.

वीणावतीः—कां बरें ?

लेखा:—विधवा लग्न करूं लागल्या तर प्रेमाचें शुद्धस्वरूप कायम रहाणार नाहीं म्हणून.

वीणावती:—ज्याच्यावर माझें प्रेम आहे त्याच्याशीं मीं लग्न केलें तर प्रेमाची शुद्धता वाढेल कीं कमी होईल ?

लेखा:—पुनः लग्न करून प्रेम शुद्ध कसें ठेवतां येईल ?

वीणावती:—पण माझ्या प्रेमांत तुला कांहीं अशुद्धता दिसते आहेकां ?

लेखा:—ताईसाहेब, ही स्थिति येऊं नये म्हणून महाराजांनीं केलेले सर्व प्रयत्न निष्फळ गेले असेंच आतां म्हणावयाचें आलें !

वीणावती:—महाराजांनीं काय प्रयत्न केले होते ?

लेखा:— तुमच्यावर हा दैवाचा घाला पडला तेव्हां त्याचें महत्त्व कळण्याइतकें तुमचें वयहि नव्हतें. म्हणून महाराजांनीं अशी आज्ञा केली, कीं, तुमचें मोठें वय होईपर्यंत कोणीहि ही गोष्ट तुमच्याजवळ बोलूं नये. राजवाड्यांत तितकी गुप्तता राहणें कठीण म्हणून महाराजांनीं तुम्हांला नगराबाहेरील या एकांत महालांत ठेऊन तुमचें संगोपन करण्याचें काम माझ्यावर सोंपविलें. नंतर महाराजांनीं दुसरें लग्न केलें आणि तुम्हांला वैधव्य दुःसह वाटूं नये म्हणून सांसारिक विषयांत तुमचें चित्तच लागूं नये अशा रीतीचें शिक्षण तुम्हांला देण्याची व्यवस्था केली. प्रेमाचा विचारहि तुमच्या मनास शिवूं नये यासाठीं माझ्याकडून मीं शिकस्त केली, कोणाहि पुरुषाशीं किंवा स्त्रीशीं तुमची भेट होऊं नये असा बंदोबस्त केला. येथें जे थोडे सेवक आहेत त्यांनासुद्धां बाहेर जाण्याची परवानगी नाहीं आणि तुम्ही कोण आहां तें कोणासच माहीत नाहीं. शिवाय लोकांच्या फाजील चौकशीस आळा बसावा आणि त्यांना कांहीं संशय येऊं नये म्हणून तुम्ही लहानपणींच वारलां अशी बातमी आम्हीं पसरून दिली. या सर्व खटाटोपाचा उद्देश हाच, कीं, तुम्ही विधवा आहां ही गोष्ट तुम्हांला कळविण्याचा प्रसंग आला तरी तुम्हांला वैधव्यदुःख मुळींच जाणवूं नये, आणि तुमच्या चित्तांत विषयसुखलालसा कधींच उत्पन्न होऊं नये, पण विधिलिखित काय आहे कोण जाणे !

वीणावती:—इतका कडेकोट बंदोबस्त असून प्रेमाचा प्रवेश व्हावयाचा तो झालाच ! आतां त्याला घालवून देण्यासाठीं कोणत्या युक्त्या योजणार आहां ?

लेखाः—प्रेमाचा प्रतिबंध करतां आला नाहीं तरी लग्नाचा प्रतिबंध करणें शक्य आहे.

वीणावतीः—प्रेमाचा आणि लग्नाचा वियोग करणें इष्ट आहे का ? शिवाय लग्न हा, लग्न करणाराच्या इच्छेचा विषय नाहीं वाटतें ?

लेखाः—पण महाराज असल्या गोष्टीला कधींच संमति देणार नाहींत.

वीणावतीः—लेखा, आतां तुला कोणताहि वृत्तांत गुप्त ठेवतां येणार नाहीं. महाराज स्वर्गवासी झाले हें मला कळलें आहे, आतां माझ्या आयुष्याची दिशा मलाच ठरवावयाची आहे.

लेखाः—येथें कोणाचा तरी पादसंचार झाला आहे खचित !

वीणावतीः—ज्याच्याकरितां प्रेमानें या कारागृहाचे तट जमीनदोस्त केले त्याचाच पादसंचार झाला असेल ! लेखा, घाबरूं नकोस. आतां सर्व जबाबदारी माझ्यावरच आहे.

लेखाः—पण असल्या अनोळखी गृहस्थास भेटणें योग्य आहे का ?

वीणावतीः—ज्याला हृदयानें ओळखलें त्याला अनोळखी कसें म्हणतां येईल ?

लेखाः—तें सारें ठीकच आहे. पण ते कोण आहेत याची चौकशी नको का करायला ?

वीणावतीः—मी तुला सर्व कांहीं सांगतें. त्यांचे गुण ऐकलेस म्हणजे मी करतें तें योग्यच आहे असें तुला वाटूं लागेल. चल, आतां बागेंत जाऊन थोडीं फुलें वेंचू. आज सायंकाळीं त्यांची स्वारी इकडे येणार आहे. [जातात.]

प्रवेश ६ वा.

[स्थळः—वीणावतीचा महाल. वीणावती आणि रायजी संभाषण करीत प्रवेश करतात.]

वीणावतीः—आपल्या इतर कोटिक्रमाची माझ्यापुढें डाळ शिजत नाहीं असें पाहिलें तेव्हां लेखा म्हणाली, कीं, तुमच्या नशिबांत विधात्यानें दुःखच लिहिलें आहे असें समजून मनाचें समाधान करून घ्या !

रायजीः—विधात्यावर काय दुष्ट आरोप हा ! बरें, मग तूं काय ह्मणालीस ?

वीणावतीः—मीं तिला विचारलें, "बाहेरचें जग या उद्यानासारखेंच आहे, कीं, कांहीं निराळ्या प्रकारचें आहे ?" ती ह्मणाली "जग तेथून सारखेंच. हें उद्यान जगाबाहेर थोडेंच आहे !" तेव्हां मी ह्मणालें, "या उद्यानांत मी चोंहोंकडे फिरलें पण दुःखासाठीं निर्माण झालेला एकहि प्राणी मला आढळला नाहीं. हेंच पहा ना, झाडाला कळ्या आल्या, कीं, त्या प्रफुल्ल होऊन जणूं हसू लागतात; जन्मल्याबरोबर फुलपांखरें पुष्पांचा आस्वाद घेत स्वैरगतीनें विहार करूं लागतात; आणि हे मृगशावक गति प्राप्त झाल्याबरोबर आनंदानें बागडूं लागतात. याप्रमाणें सर्व सृष्टीच जर उल्हासासाठीं निर्माण झालेली दिसते आहे तर विधात्यानें माझ्या एकटीच्याच नशिबीं दुःख लिहिलें आहे हें म्हणणें मला कसें पटावें ?"

रायजीः—असल्या सुंदर उद्यानांत वर्षेंच्या वर्षें काढूनहि तुझ्या सखीला जर सृष्टीचें रहस्य कळलें नाहीं तर शुद्ध प्रेमाची महतीहि तिला कोठून कळणार ?

वीणावतीः—प्रेम म्हणजे उष्णता लागतांच उडून जाणारी वाफेसारखी कांहीं वस्तू आहे असें तिला वाटतें. माझें मन वळविण्यासाठीं तिनें परोपरीच्या शंका आणि हरकती काढल्या; पण मी कशालाच जुमानीत नाहीं असें पाहून शेवटीं ती ह्मणाली, "तुमच्या वैधव्याची गोष्ट कळल्यावर त्यांच्या प्रेमाचा एक बिंदूहि शिल्लक रहातो कीं काय तें पहा !"

रायजीः—हें ऐकून तुला भीति वाटलीच असेल !

वीणावतीः—कशाची भीति ?

रायजीः—माझें प्रेम नष्ट होऊन मी तुझा त्याग करीन या गोष्टीची.

वीणावतीः—मुळींच नाहीं. (अंगुलिनिर्देश करून) नदीकिनारीं शांतपणें विहार करीत असलेलें तें सारसपक्ष्यांचें जोडपें पाहिलेंस का ? त्यांच्यापैकीं कोणालाहि दुसरा आपला त्याग करील अशी भीति वाटत नाहीं तर मला तरी तशी भीति कां वाटावी ?

रायजीः—तुझी ही अकृत्रिम निष्ठा पाहून मला धन्यता वाटते. पण

संसाराचा मार्ग सरळ नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हल्लींच्या काळीं आपल्या समाजांत विधवाविवाहास प्रतिबंध आहे, तेव्हां आपलें लग्न झालें तर कदाचित आपल्याला राजवैभवास मुकावें लागेल आणि जनसमाज आपल्याशीं संबंधहि ठेवणार नाहीं.

वीणावती:—त्यामुळें माझ्या जगदीपाच्या जगदीपपणांत कांहीं फरक पडेल कीं काय ?

रायजी:—या वीणेच्या प्रेमानें ज्याला नवजीवन प्राप्त झालें आहे, वीणा हीच ज्याच्या सुखाचें सर्वस्व, त्या जगदीपांत कोणत्याहि परिस्थितीमुळें काय बदल होणार आहे ?

वीणावती:—असें जर आहे तर वीणेलाहि राजवैभवाची किंवा जनसमाजाची काय म्हणून पर्वा वाटावी ?

रायजी:—ठीक आहे. आतां मी कनकपुरास जातों आणि तेथील परिस्थिति पाहून मग लग्नाचा दिवस नक्की करतों. आपल्या सुखाच्या परिपूर्णतेस आणखी थोडासा विलंब लागणारच.

वीणावती:—विलंब म्हणजे वियोगच ना ?

रायजी:—प्रेमपंथानें प्रवास करणाऱ्यांच्या वांट्यास थोडा बहुत वियोग येतच असतो. तेव्हां अगोदरच त्याचा आस्वाद घेतलेला बरा म्हणजे मागाहून आनंदजनक संयोगच शिल्लक राहील.

वीणावती:—या उद्यानाबाहेरचें जग एवढें विशाल असून अजूनपर्यंत त्यांत कोणालाहि प्रेमांतून वियोग नष्ट करण्याचा उपाय सांपडला नाहीं ?

रायजी:—तूं म्हणतेस तसा उपाय जगाला सांपडला नाहीं, पण जगाच्या ज्या नियंत्यानें प्रेमाचें वरदान दिलें आहे त्यानेंच आशेचेंहि वरदान दिलें आहे, आणि या आशेच्या जोरावरच वियोगावस्थेंतहि प्रेमीजनांचीं हृदयें टिकाव धरून रहातात. आपली पुनः भेट होईपर्यंत ही आशाच आपल्या चित्ताचें समाधान करील ! [जातात.]

अंक सहावा समाप्त.

अंक ७ वा.

——:o:——

प्रवेश १ ला.

[स्थळः—वीणावतीच्या महालाहून कनकपुराकडे जाण्याचा रस्ता, रायजी आणि दुर्गेश बोलत प्रवेश करतात.]

दुर्गेशः—त्याबद्दल कांहीं शंकाच नको. सर्वांनीं एकमतानें अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, कीं, जगदीप यासच गादी मिळाली पाहिजे.

रायजीः—भिन्न मत कोणाचेंहि पडलें नाहीं ?

दुर्गेशः—फक्त एकाच माणसाचें आणि तो मनुष्य ह्मणजे आपला शीतलसिंह !

रायजीः—शीतलसिंह ? मोठेंच आश्चर्य ! स्वारीच्या आदले रात्रींच माझ्या तोंडून सर्व खरा वृत्तान्त ऐकून तो म्हणाला, कीं, " आपण राजपदास सर्वस्वी योग्य आहां. " आणि " आपला अचल निष्ठावान सेवक म्हणून माझा स्वीकार करावा, " अशीहि त्यानें विनंति केली होती !

दुर्गेशः—त्या वेळीं भितीमुळें त्याची पांचावर धारण बसली होती, आणि दुसऱ्या कोणत्याही मार्गानें त्याला लाभ होण्याचा संभव नव्हता, म्हणून तो कांहीं तरी बोलला एवढेंच ! पण दरबारांतील तुमच्या अनपेक्षित वर्तनामुळें त्याच्या मनांत एक नवीनच महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. लीलावती राणीला आपला मुलगा दत्तक देऊन त्याला गादीवर बसवावें या खटपटींत सध्यां शीतलसिंह आहेत !

रायजीः—स्वतः लीलावतीची इच्छा काय आहे ?

दुर्गेशः—तें कांहीं अजून समजलें नाहीं, पण या महत्त्वाकांक्षेमुळें शीतलसिंहासारख्या नेभळभट माणसाचा जिकडे तिकडे उपहास मात्र चालला आहे. त्याला स्वतःला वाटतें, कीं, मी म्हणजे एक मोठा झब्बू-च आहें !

रायजीः—मनुष्य नेभळभट असो, कीं खंबीर असो, फाजील महत्त्वलोभानें तो उपहासपात्र होतोच. एकदां महत्त्वलोभाचें वारें अंगांत शिरलें, कीं, मनुष्य स्वतःची योग्यता विसरून मिथ्यातरंगांत गुंग होऊन आपली आपणच फसवणूक करून घेतो. शीतलसिंहाचीहि अशीच स्थिति झाली असेल.

दुर्गेशः—त्याच्या या उपद्व्यापाविषयीं कांहींच काळजी करावयास नको. पण तूर्त चिंतेचें दुसरेंच एक कारण उद्भवलें आहे. तुमच्या मातोश्री अत्यवस्थ आहेत.

रायजीः—माझी आई ? तिला काय झालें आहे ? दुर्गेशराय, ही बातमी मला तुम्ही आल्याबरोबर कां नाहीं सांगितली ?

दुर्गेशः—तुमच्या मनास एकदम धक्का बसूं नये म्हणून. आधीं साधारण अप्रिय अशी गोष्ट सांगून मीं तुमच्या मनाची तयारी केली. आणि मागाहून मुख्य गोष्ट कळविली. दरबार संपल्यावर तुह्मीं कनकपूर सोडलें तेव्हांपासून आईसाहेब आजारीच आहेत.

रायजीः—मी स्वारीला निघालों त्या वेळीं तिची प्रकृति अगदीं उत्तम होती. मग एकाएकीं बिघडण्याचें कारण काय ?

दुर्गेशः—लीलावतीराणीला खरी हकीकत सांगून तुम्ही दरबारांत आला त्याच वेळीं राणीसाहेब माळणीच्या वेषानें लीलावतीकडे गेल्या होत्या. तेथें दुःखाच्या आवेशांत लीलावतीनें झालेला प्रकार उघड करून त्यांची निर्भर्त्सना केली आणि दोघींचा चांगलाच कलह झाला. शेवटीं आईसाहेब बेशुद्ध होऊन पडल्या.

रायजीः—अरेरे ! मी एक आघात चुकविण्यास गेलों तों इकडे दुसरा आघात झालाच ! मनुष्याची योजनाशक्ति किती परिमित असते पहा ! दुर्गेशराय, तेथें माझ्या मातोश्रीची शुश्रुषा करण्यासहि कोणी नसेल !

दुर्गेशः—सावित्रीदेवी आणि कमला तेथेंच होत्या.

रायजीः—राणीसाहेबांस धीर-भरंवसा द्यावयास कोणी तरी पाहिजे म्हणून मींच त्या दोघींना तिकडे जाण्यास सांगितलें होतें.

दुर्गेशः—राणीसाहेबांस आश्वासनाची जरूर होतीच म्हणा, पण सुदैवानें त्या दोघी तेथें असल्यामुळें आईसाहेबांची मात्र चांगली शुश्रुषा

झाली. कमलेनें आणि मंजरीनें त्यांना सावध करून त्यांची घराकडे रवानगी केली.

रायजीः—तेव्हांपासून ती आजारीच आहे वाटतें ?

दुर्गेशः—त्यानंतर दरबाराची हकीगत त्यांच्या कानीं गेली तेव्हां त्यांच्या मनोभंगाची परमावधि झाली आणि त्यांचें दुखणेंहि विकोपास गेलें.

रायजीः—आतां ती कोठें आहे ? रुद्रनाथाच्या मंदिरांत ?

दुर्गेशः—नाहीं किसलवाडींत.

रायजीः—मग तिच्याजवळ आतां कोणीहि नसेल !

दुर्गेशः—दरबार झाल्यावर मी तुमचा शोध करीत निघालों तेव्हांपासून कमला किसलवाडींतच आहे. आईसाहेबांची सेवाचाकरी ती करीत असते.

रायजीः—वहिनीचे माझ्यावर महत् उपकार आहेत. पण दुर्गेशराय, येथून गेल्याबरोबर तुह्मीं मला कां नाहीं बोलावून घेतलें ?

दुर्गेशः—आईसाहेबच नको म्हणाल्या. तुह्मीं ठरविलेली पंधरा दिवसांची मुदत संपू द्यावी, व एकदां गादीचा निर्णय झाला म्हणजे तुह्मीं नगरांत परत यावें, अशी त्यांची इच्छा दिसली.

रायजीः—मला गादी मिळावी म्हणून बिचारीनें किती सायास केले ! मातेशिवाय इतके कष्ट कोण सोशील. खरोखर आई ही ईश्वराची एक अमूल्य देणगी आहे. या जगांत मातृत्व नसतें तर कृतज्ञता, दया आणि प्रेमळता या शब्दांचा अर्थच मनुष्यजातीस कळला नसता.

दुर्गेशः—पशुपक्ष्यांना जन्मल्यानंतर अल्पकाळच मातृत्वाची महति वाटते, आणि मनुष्यास ती यावज्जन्म वाटत असते; या एका गोष्टींतच मनुष्य जाति आणि इतर प्राणी यांच्यामध्यें असलेल्या भेदास आरंभ होतो. कुटुंबाच्या आणि समाजाच्या पवित्र घटनेचें मूळ तरी यांतच आहे.

रायजीः—या संसाराच्या घटनेंत मला तर तूर्त दुःखमय व विसंवादी द्विविधता दिसत आहे. हृदय पटावर प्रणयाचा कोमल रंग कोठें दिसतो न दिसतो तोंच त्याच्या मागें प्रखर दुःखाग्नि धुमसूं लागला आहे. हें सुख खरें मानावयाचें, कीं, दुःख खरें मानावयाचें, हेंच कळत नाहीं !

दुर्गेशः—दोन्ही भावना खऱ्याच आहेत, आणि या दोहोंच्या मिश्रणामुळेंच संसारिक घटनेस उच्चता आणि सुसंगता प्राप्त होत असते.

रायजीः--सुखदुःखाची सुसंगत असो कीं नसो, पण या वेळीं मला दुःखास तोंड दिलेंच पाहिजे. प्रथम माझ्या प्रिय मातेकडे मला त्वरेनें घेऊन चला. (जातात.)

प्रवेश २ रा.

[स्थळः--किसलवाडींतलें घर, अंथरुणावर जालका टेंकून बसली आहे. जवळ रायजी, कमला आणि दुर्गेश उभे आहेत.]

जालकाः—जगदीप, कमलेनें जशी माझी सेवा केली तशी तुला कधींच करतां आली नसती. देवीनें मला कमलेसारखी एकादी कन्या दिली असती तर माझ्या मनाला किती समाधान वाटलें असतें म्हणून सांगूं ! पण मला एका मुलाला सुखी करतां आलें नाहीं तर दोघां आपल्यांना माझ्याकडून काय सुख लाभलें असतें तें दिसतेंच आहे !

रायजीः--माझ्या सुखासाठीं तूं थोडे का प्रयत्न केलेस ? आणि इतकें करूनहि जर मला सुख प्राप्त झालें नाहीं तर तो माझच अपराध म्हटला पाहिजे. तुझ्याकडे मुळींच दोष नाहीं.

जालकाः—पण माझ्या एकाहि प्रयत्नास यशच आलें नाहीं तर तुला सुख प्राप्त होणार काठून !

रायजीः—प्रयत्नास यश आलें नाहीं म्हणून काय झालें ? मला सुखी करण्यासाठीं माझ्या आईनें अटोकाट यत्न केले या एकाच गोष्टीनें मला किती सौख्य प्राप्त झालें आहे याची तुला कल्पना नाहीं.

जालकाः—जगदीप, तुझ्या चित्ताचें समाधन झालें एवढाच मी अंतकालीं संतोष मानतें. यापेक्षां अधिक संतोष या जन्मीं तरी माझ्या नशिबीं लिहिलेला नाहीं. ईश्वरा, तुझी इच्छा ! [तोंड फिरविते.]

कमलाः--आईसाहेब, अशा संतापानेंच आपली प्रकृति या थरास

येऊन पोंहचली. आपण इतकें सुद्धां बोलूं नये असें वैद्यराजांनीं बजावून सांगितलें होतें.

जालका:--जी प्रकृति पुनः सुधारण्याची आशा नाहीं ती लौकर बिघडली काय आणि उशीरां बिघडली काय एकच.

रायजी:—आई, तूं आपल्या मनास निराश कां होऊं देतेस? तुझ्यामध्यें सबंध जगाला प्रोत्साहित करण्याचें सामर्थ्य होतें तें कोठें गेलें?

जालका:—नष्ट झालें. एका सत्त्वाच्या साह्याशिवाय कालगतीपुढें या सामर्थ्याचा टिकाव लागणें शक्य नाहीं हें मला आतां कळलें. पण सामर्थ्याचा चुराडा झाल्यावर आतां या सत्त्वाची आठवण होऊन काय उपयोग?

दुर्गेश:—आईसाहेब, विचारतों त्याची क्षमा असावी. हें सत्व कोणतें?

जालका:--ईश्वरश्रद्धा.

कमला:—काय ईश्वरश्रद्धेची आपल्यांत उणीव आहे?

जालका:—कमले, या आजारापासूनच मला तूं ओळखतेस; पण-- हाय! मनुष्याची स्मृति थोड्या थोड्या अंतरानें प्रलयांत सांपडून नष्ट होत असती तर किती बरें झालें असतें!

रायजी:--मानवस्मृतींत जिवंत ठेवण्यासारखेंच पुष्कळ असतें.

जालका:—एकंदर गोळाबेरीज पाहिली असतां कदाचित् तसें असेल; पण पर्वतरायाच्या मृत्यूनंतर मीं जे संकल्प केले त्यांची स्मृति आज जागृत नसती तर माझ्या अंतसमयींच्या वेदना किती तरी सौम्य झाल्या असत्या!

रायजी:—तुझ्या संकल्पांत सामील होऊन त्याची अर्धी जबाबदारी मीं आपल्या शिरावर घेतलीच आहे.

जालका:—माझ्या अधर्मी संकल्पांत तुला सामील केल्यानें माझी जबाबदारी निम्मी होण्याचें ऐवजीं द्विगुणित मात्र झाली आहे.

रायजी:—झाल्या गेल्या गोष्टींचें आतां काय? भूतकाळ आपल्याला थोडाच बदलतां येणार आहे?

जालका:--भूतकाळ बदलतां येत नाहीं आणि भूतकाळाची स्मृतीहि नष्ट करता येत नाहीं ह्मणूनच माझा नाइलाज आहे. नाहीं तर मला किती सुखांत मरण आलें असतें!

कमला:—भूतकाळाच्या स्मृतींच्या ऐवजीं भविष्य काळाच्या आशांचें मनन केलें तर मनास शांति नाहीं का प्राप्त होणार ?

जालका:—असा विश्लेष करणें शक्य असलें तरी मी कोणत्या आशांचें मनन करूं ?

कमला:—जगदीपरायांच्या राज्यारोहणाच्या आशेचें.

दुर्गेश:—नुसती आशाच का ? खात्रीच म्हणेनास !

रायजी:—पण शीतलसिंह आपल्या मुलाला लीलावतीस दत्तक देऊन गादीवर बसविणार नाहीं कशावरून ?

दुर्गेश:—तें शक्यच नाहीं. प्रधानजी आज सकाळींच म्हणत होते, कीं, शीतलसिंहाचें मनोरथ जागच्या जागींच जिरून जाणार.

जालका:—शीतलसिंहाची अवकात ती किती ! त्याची मला मुळींच भीति वाटत नाहीं.

रायजी:—मग कशाची वाटते ?

जालका:—लीलावतीचा शाप खरा होण्याची. माझा धिक्कार करून ती ह्मणाली होती कीं, " मरेपर्यंत तूं माळीणच राहशील. " मला मृत्यु आणण्याचें किंवा माळणीच्या स्थितींत ठेवण्याचें तिच्या हातीं नाहीं हें खरें; पण तिचे शब्द ऐकले त्याचक्षणीं मला वाटलें, कीं, या शिक्षेस मी पात्र आहें. आणि तेव्हांपासून माझें हृदय शून्य झालें. या जगांत आतां मला कसलीच आशा उरली नाहीं.

दुर्गेश:—जगदीपरायांना गादीवर बसलेले पाहिलें म्हणजे आपण राजमाता व्हाल आणि लीलावतीचें शब्द सहजच खोटे ठरतील.

जालका:—जगदीप गादीवर बसेल कीं नाहीं, या गोष्टीचा विचार करण्याचेंच मीं सोडून दिलें आहे. या प्रश्नाचा निर्णय होईल तो दिवस पाहण्यास मी कांहीं जगणार नाहीं असें माझेंच मन मला सांगत आहे.

रायजी:—आई ! तुझा संताप मला दे, आणि माझी जी कांहीं शांति आहे ती तूं घे !

जालका:—अशी अदलाबदल कोठें होत असते ? ज्या कारणांनीं मला संताप आणि तुला शांति प्राप्त झाली तीं कारणें झालीं आणि गेलीं. त्यांची देवघेव कशी करतां येईल ?

रायजीः—तें असो. पण आई, तुला आनंद होईल अशी एकादी बातमी सांगूं का ?

जालकाः आतां या जीर्ण कलेवरांत आनंदास थारा मिळणें शक्य नाहीं. जें हृदय एकदां भंगलें तें कोणत्याहि उपायानें पुनः जडत नसतें. पण तुला आनंद झालेला पाहून मला संतोषच वाटेल.

रायजीः—माझ्या जीवनाची सहचारिणी मला आढळली आहे.

जालकाः—दोघेंहि सुखी व्हा !

रायजीः—अधिक जाणण्याची तुला जिज्ञासा दिसत नाहीं, तरीहि सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. जिचें पाणिग्रहण करून मी धन्य होणार आहे ती सुंदरी पर्वतरायाची कन्या वीणावती होय.

कमलाः—वीणावती तर बाल्यावस्थेंतच विधवा होऊन स्वर्गवासी झाली !

रायजीः—विधवा झाली हें खरें, पण स्वर्गवासी झाली हें मात्र सपशेल खोटें. तिच्यावर अन्यायानें आणि क्रूरतेनें वैधव्य लादलेलें आहे, आणि लग्नानें हा अन्याय—आणि ही क्रूरता नाहींशी होत असली आणि पवित्र प्रेमाचा विकास होत असला तर तें कर्तव्य नाहीं काय ?

जालकाः—जगदीप, तुला कर्तव्य वाटत असलें तर बेलाशक कर. आतां माझ्या सल्ल्याशिवाय तुला कर्तव्यनिर्णय करावयाचा आहे. आणि कर्तव्याचा प्रश्न आला म्हणजे लोकापवादास न जुमानतां आपली मनोदेवता सांगेल त्याप्रमाणें आचरण करण्याचें धैर्य तुझ्या अंगीं आहे अशी माझी खात्री झाली आहे. आतां ऐहिक विषयांतून मन काढून घेण्यापूर्वी मला एक गोष्ट सांगावयाची आहे. ती राहून जाऊं नये म्हणजे झालें.

दुर्गेशः—आपण म्हणत असाल तर मी आणि कमला बाहेर जातों.

जालकाः—नको. माझे शब्द तुम्हीहि ऐकण्यासारखे आहेत. आणि जी एके काळीं जालका होती तिनें हे शब्द उच्चारले या गोष्टीवर पुढें-मागें जगाचा विश्वास बसला नाहीं तर तुम्ही साक्ष देण्यास पुढें व्हा. [उठून बसून] जगदीप, तुला पर्वतराय बनविण्याची मीं योजना केली त्याच दिवशीं या कपटाची जी कांहीं शिक्षा असेल ती भोगण्यास मी तयार झालें, आणि माझ्या आग्रहामुळें तूंहि तयार झालास. परंतु आतां मला उमजलें, कीं, ईश्वराची नीतिव्यवस्था अशी आहे, कीं, मनुष्यानें

जाणूनबुजून कपटाचा आश्रय करून त्याची शिक्षा स्वतःवर ओढून घेऊं नये. अनीतीची शिक्षा भोगण्यास तयार होऊन अनीतीचा अवलंब करणें हा मनुष्य धर्म नव्हे. ईश्वरानें जी नीतिव्यवस्था निर्माण केली आहे तिच्याच अनुरोधानें हें विश्व चाललें आहे. तिच्या व्यतिरिक्त अशी नवी घटना करण्याचें सामर्थ्य मनुष्यांत खात्रीनें नाहीं.

रायजीः—आणि विश्वाच्या या नीतिव्यवस्थेशीं झगडण्याचे यत्न व्यर्थ गेल्यामुळें माझ्या मातृप्रेमांत कांहीं न्यूनता राहिली असल्यास त्याबद्दल मला क्षमा कर.

जालकाः—यांत तुझा मुळींच अपराध नाहीं. कारण सत्याशीं विरोधी असें प्रेम या जगांत असणें अशक्य आहे. जेथें सत्य असतें तेथेंच प्रेम असतें, आणि प्रेम असतें तेथें सत्यहि असतें. (खिडकीकडे पाहून) हाय ! या खिडकींतून ती दुष्ट जागा दिसते आहे. डोळे मिटून घेते. अजूनहि डोळ्यासमोरून हालत नाहीं ना !

रायजीः—कोणती जागा ?

जालकाः—(भयभीत मुद्रेनें अंगुलि निर्देश करून) तीच जागा, जगदीप, तीच जागा ! पर्वतरायाचें शव तेथेंच पुरलें आहे. पुरते वेळीं त्याच्या हृदयांत टोंचलेला बाण मींच ओढून काढला होता. पण आतां माझ्या हृदयांत टोंचलेला बाण कोण ओढून काढील ? मला येथून घेऊन चला. या जागीं मला निद्रा लागणार नाहीं. दयाघना ! कदाचित तुझ्या शांतिधामांत एकादा कोंपरा... (बेशुद्ध होऊन पडते.)

प्रवेश ३ रा.

[स्थळः—शीतलसिंहाचा वाडा.]

शीतलसिंहः—(स्वगत) मला जी मोठी भीति होती ती एकदांची नाहींशी झाली ! या जालकेचा बुद्धिप्रभावच असा होता, कीं, तिच्यापुढें माझें शहाणपणच चालत नसे. ती जिवंत असती तर माझे सारे बेत तिनें एका निमिषांत हाणून पाडले असते. पण दैव बलवत्तर म्हणून ही पिडा आयती दूर झाली. आतां पुढें काय ? तिच्या मृत्यूचा कोणत्या रीतीनें उपयोग करून घ्यावा ? [सेवक प्रवेश करतो.)

सेवकः—बाहेर एक ब्राह्मण आला आहे. आपली भेट घेतल्या-शिवाय हालणार नाहीं असें म्हणतो.

शीतलसिंहः—असा आहे तरी कोण ?

सेवकः—कोण जाणे ! भल्या लांबलचक दाढीचा बुड्ढा आहे.

शीतलसिंहः—काय काम आहे तें विचारलेंस का ?

सेवकः—होय. तो म्हणतो काशीयात्रेला निघालों पण वाटेंत पैसे संपल्यामुळें दिवाणजीचें नांव ऐकून त्यांच्या पायापाशीं आलों आहें.

शीतलसिंहः—ठीक आहे. पाठीव त्याला आंत, आणि तो परत जाईपर्यंत तूं देवडीवरच बसून रहा, समजलास ? (सेवक जातो.) खूण तर पटली. पण न जाणों भलत्याच माणसाला सुगावा लागून तो मला फसवायला आला असला तर ! तसें कांहीं झालें तर मात्र धडगति दिसत नाहीं ! पण मी एकदम गोष्ट कशाला काढतों आहें !

(वृद्ध ब्राह्मणाच्या वेषानें मंजरी प्रवेश करते.)

मंजरीः—कल्याण ! कल्याण !

शीतलसिंहः—(स्वगत) हेच खुणेचे शब्द. (मोठमोठ्यानें) या कोठून आला तुम्ही भटजी ?

मंजरीः—यायचें तेथूनच आले. (दार बंद करून खोटी दाढी आणि पुरुषवेष काढून टाकते). शाबास ! खुणेचे शब्द सांगितले तरी देखील तुम्ही मला ओळखलें नाहीं ना !

शीतलसिंहः—न ओळखायला काय झालें ! पण मला अशी धास्ती पडली कीं, आपला ठाव पहाण्यास दुसरेंच कोणी आलें असलें तर कसें व्हावें ?

मंजरीः—वेळ पडला थोडा, काम उरकायचें पुष्कळ, आणि तुम्ही असे भीत, कचरत वागूं लागलां तर आपल्याला यश मिळावें कसें ?

शीतलसिंहः—काम असें जोखमीचें आहे, कीं, साधलें तर ठीक नाहीं तर शेवटीं आपलीच गरदन उडावयाची; म्हणून माझें मन जरा माघार घेतें. पण तुझी हिंमत पाहिली म्हणजे केव्हां केव्हां मलाहि अवसान येतें. बरें आतां सांग. राणीसाहेबांपुढें दत्तकाची गोष्ट कोणाकडून काढून पाहिलीस का ?

मंजरीः—हा विषय काढायला कोणीच कबूल होत नाहीं.

शीतलसिंहः---असें कां बरें ?

मंजरीः---कारण, प्रधानजी या दत्तविधानाच्या विरुद्ध आहेत हें सर्वांना ठावूक आहे.

शीतलसिंहः---एकटे प्रधानजी विरुद्ध असले म्हणून काय झालें ? खुद्द राणीसाहेबांची जर दत्तक घेण्याची इच्छा असली तर वाटेल तें करण्यास त्या मुखत्यार आहेत.

मंजरीः---सगळी गोष्ट खरी. पण अलीकडे राणीसाहेबांची प्रधानजीवर इतकी श्रद्धा बसली आहे, कीं, त्यांच्या सल्ल्याशिवाय त्या इकडची काडी तिकडे करीत नाहींत.

शीतलसिंहः---पूर्वीं प्रधानजीवर त्यांची इतराजी असे, मग ही श्रद्धा नवीनच कोठून उत्पन्न झाली ?

मंजरीः---राणीसाहेब आजारी पडल्यापासून त्यांच्या समाचारास रोज सावित्रीदेवी येत असतात. त्या जवळ नसल्या, कीं राणीसाहेबांना करमतच नाहीं. इकडे राज्यासंबंधीं हे गुंतागुंतीचे प्रश्न निघाले म्हणून राणीसाहेब प्रधानजींना सल्लामसलतीसाठीं बोलावूं लागल्या. तेव्हांपासून त्यांना प्रधानजींबद्दल फारच आदर वाटूं लागला आहे आणि हें साहजिकच आहे.

शीतलसिंहः---बरें, पण पुनः तूं दत्तकासंबंधानें लीलावतीला कांहीं बोललीस का ?

मंजरीः---बोललें, पण त्यांना भारी राग आला आणि "पुनः ही गोष्ट काढूं नकोस, मी एक अक्षरहि ऐकायची नाहीं." असें त्यांनीं निक्षून सांगितलें. संतापानें त्यांच्या आजार वाढावयाचा म्हणून मी कांहीं अधिक बोललें नाहीं.

शीतलसिंहः---पण लीलावतीनें दत्तक घेतला म्हणून कल्याणकामाच्या आजोबाचें काय जातें ! तो इतका विरुद्ध कां हें कांहीं मला समजत नाहीं.

मंजरीः---काय असेल कोण जाणे, प्रधानजीचा आणि सावित्रीदेवीचा जगदीपरायाकडेच ओढा दिसतो. गादीवर बसण्यास तोच सर्वस्वीं लायक आहे असें त्यांचें ठाम मत झालें आहे.

शीतलसिंहः---पुष्पसेनाची काय खबर आहे ?

मंजरीः—खबर काय असायची ? दुर्गेशाची आणि जगदीपाची गट्टी तुम्हांला माहीत आहेच. तेव्हांच कमलाहि आपल्या विरुद्ध पक्षाचीच झाली आणि जिकडे कमला तिकडे पुष्पसेन ! पुष्पसेनाच्या मनांतून जरी तटस्थ रहावयाचें असलें तरी कमला त्याला राहूं देईल तेव्हांना !

शीतलसिंहः—मग कांहीं आशाच राहिली नाहीं म्हणावयाची ! आपण जरी दत्तविधान घडवून आणलें तरी सैन्याच्या मदतीशिवाय आपलें काय चालणार आहे ?

मंजरीः—पण लीलावतीनें दत्तक घेतल्यास त्याला गादी कां मिळू नये हा प्रश्न उत्पन्न होणारच. हो, बरी आठवण झाली ! आज ब्राह्मण जेवूं घालण्याच्या निमित्तानें मीं वंजुलास बोलावून घेतलें होतें. जेवणाचें वेळीं तो सहज बोलून गेला, कीं, "लीलावतीला दत्तक घेण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि तिनें दत्तक घेतलेल्या मुलास पर्वतरायाचा हक्कदार वारस समजलें पाहिजे" असें खुद्द जगदीपाचें म्हणणें आहे. आणि या प्रश्नाचा निर्णय होईपर्यंत जगदीप स्वतःस राज्याभिषेकहि करून घेण्यास तयार नाहीं म्हणे !

शीतलसिंहः—पक्का पढतमूर्ख आहे झालें ! पण त्याचा हा न्यायीपणा आपल्या पथ्यावरच पडत आहे. हरकत नाहीं ! (दार ठोकल्याचा आवाज होतो.) हें काय ? कोण आलें असेल बरें ? कोणी तरी दाराजवळ राहून आपल्या गोष्टी ऐकल्या खास ! आतां आपलें कसें होईल ?

मंजरीः—दिवाणजी, राजाचा बाप होऊं इच्छिणारानें मन जरा घट्ट ठेवलें पाहिजे ! (पुरुषवेश धारण करून) हं उघडा आतां दार.

शीतलसिंहः—उघडूंच का ? (दार उघडतो.)

सेवकः—(प्रवेश करून) सरकार—

शीतलसिंहः—[संतापून] गाढवा, देवडीवर बसून राहा म्हणून सांगितलें होतें ना ? येथें कशाला आलास, मरायला ?

सेवकः—नाहीं सरकार, या भटजीचा एक साथीदार धांवत-पळत आला आहे. तो म्हणतो, कीं, आपण उतरलों त्या धर्मशाळेला आग लागली तेव्हां भटजीला म्हणावें, लौकर चला. तो फारच मयावया करूं लागला म्हणून सांगायला आलों. नाहीं तर मी कशाचा देवडीवरून हालतों !

मंजरीः—हर हर, दुष्काळांत तेरावा महिना म्हणतात तो यालाच ! होतें नव्हतें तेंहि अग्निनारायणानें फस्त केलें ! बाबा, त्याला पाठवून दे आंत.

शीतलसिंहः—आणि तूं देवडीवरच ऐस. पुनः तोंड घेऊन इकडे येऊं नको. [सेवक जातो.] मंजरी, आग लागली आहे तिकडे तुला जायचें असलें तर जा. हा तुझा साथीदार इकडे आला म्हणजे उगीच लोकांना कांहीं तरी सांगत सुटेल, आणि सगळाच भ्रमाचा भोपळा फुटेल.

मंजरीः—अहो, आग कसली आणि काय कसलें ! सौराष्ट्राधिपतीकडे सैन्याची मदत मागण्यासाठीं मीं दूत पाठविला होता. तो आजच परत येणार होता म्हणून मी घरीं सांगून आलें होतें, कीं, कदाचित तो इतक्यांत आलाच तर त्याला पढवून इकडे धाडून द्यावा. " आग लागली " हे आमचे खुणेचे शब्द आहेत. इतकें घाबरायला काय झालें ? [दूत प्रवेश करून मंजरीस कागद देतो तो वाचून] बरें आहे, तूं जा. आपलें सामान काढून घेतलें आहे ना ? मग जळेनां का खुशाल ती धर्मशाळा ! [दूत जातो.] पत्रांत लिहिलें आहे, कीं, " सौराष्ट्राधिपति सैन्य पाठविण्यास कबूल आहे; पण त्याचा मोबदला म्हणून एक कोट रुपये आणि उत्तरेकडील आपला सर्व प्रदेश त्याला पाहिजे आहे. "

शीतलसिंहः—कोट रुपयांचें असो म्हणा, ते रयतेकडून मारहाण करून केव्हांहि काढतां येतील; पण उत्तरेकडील सबंध प्रांत द्यावयाचा म्हणजे माझ्या मुलाचें राज्य तितकें कमी होईल ना !

मंजरीः—गादी मिळण्याचीच पंचाईत आणि म्हणें, राज्य कमी होईलन् अधिक होईल !

शीतलसिंहः—तुला या अटी पसंत असतील तर माझी कांहीं ना नाहीं. जाईना कां एकादा प्रांत !

मंजरीः—बरें, सैन्याच्या मदतीचें तर ठरलें. आतां पुष्पसेनाची पर्वा नको बाळगायला. दत्तविधान झालें, कीं, वाटेल त्या वेळीं सैन्य बोलवितां येईल.

शीतलसिंहः—पण दत्तविधानच व्हायचें कसें ? सारी अडचण आहे तेथेंच. राणीसाहेब हट्टच धरून बसल्या तर आपण करायचें काय ?

मंजरीः—मीं एक उपाय शोधून काढला आहे. राणीसाहेबांच्या

माहेरचा पुरोहित येथें आला आहे, तो अगदीं राणीसाहेबांच्या मर्जींतला आहे. त्याला भरभक्कम दानदक्षिणा देऊन वश करून घ्या आणि त्याच्या समक्ष एकदां राणीसाहेबांनीं तुमची भेट घ्यावी अशी कांहीं व्यवस्था करण्यास त्याला सांगा.

शीतलसिंह:—भेट घेऊन तरी मी काय करणार ?

मंजरी:—तुम्ही आणि पुरोहित मिळून राणीसाहेबांला दोन गोष्टी आग्रहानें सांगा. एक गोष्ट अशी आहे कीं, जी जालका पर्वतरायाच्या मृत्यूस कारणीभूत झाली, इतकेंच नव्हे तर, जिनें राणीसाहेबांच्या पातिव्रत्यावर गदा आणण्याचा घाट घातला होता, तिचा मुलगा गादीवर बसावा हें केव्हांहि योग्य नाहीं. दुसरें जगदीप, वीणावतीशीं लग्न करण्यास तयार झाला आहे या गोष्टीचा उल्लेख करा. धर्मशास्त्रांनीं अत्यंत निषिद्ध मानलेल्या आचारास उत्तेजन देणारा, पर्वतरायाच्या कुलास चिरकालीन कलंक लावणारा असा हा स्वेच्छाचारी जगदीप गुजराथचा राजा होणार यापेक्षां देशाचें दुर्दैव तें कोणतें ? धर्माची पायमल्ली ती कोणती ? असा तुम्ही जोरानें प्रश्न विचारा.

शीतलसिंह:—तुझ्यासारखी वाचाळता जर मला करतां येत असती तर राणीसाहेबांचें मन मीं केव्हांच वळविलें असतें आणि माझ्या मुलास केव्हांच गादी देवविली असती !

मंजरी:—आणि मलाहि ठरल्याप्रमाणें पांच लाख रुपये केव्हांच मिळाले असते, आणि माझ्या मुलीचें तुमच्या मुलाशीं लग्न होऊन ती केव्हांच गुजराथची राणी झाली असती !—आपल्या कराराची आठवण आहे ना शीतलसिंहजी ! का विसरलात ?

शीतलसिंह:—छे छे ! हें काय बोलणें ! विसरेन कसा ?

मंजरी:—बरें तर आतां विलंब लावूं नका. अगोदर जाऊन त्या म्हाताऱ्या पुरोहिताला गांठा पाहूं कसे ! मी पुनः येईन तेव्हां अत्तर विकणाराचा वेष धारण करीन. आणि खुणेसाठीं आपल्या सेवकाबरोबर अत्तराच्या तीन कुप्या आंत पाठवीन समजलांत ? तुमचा प्रयत्न साधला तर ठीकच आहे. नाहीं तर शेवटचा इलाज मीं योजून ठेवलाच आहे. जवळ या, तुमच्या कानांत सांगतें. (शीतलसिंहाच्या कानांत कांहीं सांगते तें ऐकून शीतलसिंह दचकतो.) हं ! गोष्ट अगदीं गुप्त राहिली

पाहिजे. या कानाचें त्या कानास कळतां कामा नये. आलें ना लक्ष्यांत ! येतें मी आतां. [जातात.]

प्रवेश ४ था.

[स्थळः—दुर्गेशाचा वाडा. रायजी, दुर्गेश आणि कमला बोलत बसलीं आहेत.]

दुर्गेशः—शीतलसिंहाचा उपद्व्याप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. प्रधानजी म्हणत होते, कीं, त्याच्या मदतीस सौराष्ट्राधिपति सैन्य घेऊन येणार आहे, अशी त्यांना परवां बातमी लागली. उत्तरेकडील प्रांताच्या सुभेदाराकडून त्याच्या लष्करास अडथळा होऊं नये म्हणून सुभेदारासहि फितविण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला होता परंतु तो फसला. प्रधानजीच्या दक्षतेमुळें सर्व अधिकाऱ्यांची राजनिष्ठा अचल राहिली आहे.

कमलाः—आतां राणीसाहेब काय करताहेत त्यावर सर्व कांहीं अवलंबून आहे. पाहावें काय होतें तें !

दुर्गेशः—त्यांच्या माहेरचा पुरोहितहि येथल्या राजकारणांत ढवळाढवळ करूं लागला आहे. परवां त्यानें राणीसाहेबांस अशी विनंति केली, कीं, आपण एकदां शीतलसिंहाची समक्ष भेट घ्यावी. राणीसाहेबांनीं तें कांहीं कबूल केलें नाहीं; पण प्रधानजींनीं त्यांना अशी सल्ला दिली, कीं, त्या लोकांचें म्हणणें काय आहे तें एकदां ऐकून घ्यावें. विधवाविवाह अनिष्ट आहे असें भासवून ते लोक राणीसाहेबांचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न करतील असें दिसतें.

रायजीः—मलाहि एक थोर गृहस्थ मित्रभावानें म्हणाले, कीं, " हा विधवाविवाह बाजूला ठेवल्यास अर्धी अडचण दूर होईल. आपण एकदां राजे झालां म्हणजे पंचवीस राजकन्या आपल्यापुढें लोटांगण घालीत येतील. या वीणावतीचेंच काय एवढें महत्त्व आहे ! " मीं त्यांना उत्तर दिलें, कीं, गुजराथचेंच काय परंतु सर्व पृथ्वीचें राज्य मिळत असलें तरी त्यासाठीं हा जगदीप वीणावतीचा त्याग करण्यास प्रवृत्त होणार नाहीं.

दुर्गेशः—प्रधानजींना कोणीं असें सुचविलें कीं, जगदीपरायांनीं " मी वीणावतीशीं लग्न करणार नाहीं. " असें तूर्त सांगितलें म्हणजे झालें. एकदां राज्यारूढ झाल्यावर त्यांनीं वीणावतीशीं लग्न लावलें तरी त्यांचा कोण हात धरणार आहे ? मग त्यांनीं वाटेल तें केलें तरी तें चालून जाईल.

रायजीः—असला असत्यवादी पुरुष गुजराथच्या गादीस आणि वीणावतीच्या प्रेमास केव्हांहि पात्र म्हणतां येणार नाहीं. बरें, मग प्रधानजी काय म्हणाले ?

दुर्गेशः—प्रधानजींनीं उत्तर दिलें, कीं, जगदीपरायाच्या उदात्त स्वभावाची तुम्हाला कल्पना नाहीं म्हणूनच तुम्ही अशी सूचना करीत आहां. भावी गुर्जरनरेशाच्या हातून असलें नामर्दपणाचें कृत्य कालत्रयींहि घडणार नाहीं.

कमलाः—असल्या उदात्त भावनांचें साम्राज्य प्रस्थापित झालें म्हणजेच गुर्जर स्त्रियांची अवनति दूर होईल, आणि समाजाला कळूं लागेल, कीं, स्त्री ही केवळ पुरुषाच्या सुखाचें साधन नसून—
स्त्रियांची सर्व महति त्यांच्या स्त्रीत्वांतच आहे. पुरुषांप्रमाणें त्यांनाहि ईश्वरानें मानवपणा दिलेलाच आहे. परंतु या गोष्टी विसरून पुरुषांनीं विषयमय भावनांनीं प्रेरित होऊन जे निर्बंध घालून ठेवले आहेत त्या योगानें स्त्रियांची महति तिळमात्रहि कमी होत नाहीं. या तत्त्वाची जाणीव समाजाला पटली म्हणजे वीणावतीनें आपलें सारें आयुष्य क्लेशांत आणि कष्टांत काढावें यांतच तिच्या जीवनाची कृतकृत्यता आहे असें म्हणणारे कोणी निघणार नाहींत.

रायजीः—राणीसाहेबांच्या माहेराहून पुरोहिताशिवाय दुसरें कोणी कसें आलें नाहीं ?

दुर्गेशः—त्याला कांहीं कारणें आहेत. पर्वतरायांच्या मृत्यूची बातमी समजण्यापूर्वींच राणीसाहेबांच्या धाकट्या बहिणीचें लग्न ठरलें होतें. त्यांच्या बंधूकडून लग्नाचें आमंत्रण येण्याला आणि महाराजांच्या मृत्यूची खबर जाहीर होण्याला एकच गांठ पडली. तेव्हां लीलावतीनें आपल्या बंधूस असा निरोप पाठविला, कीं, " माझ्या जन्माचें मातेरें केलेंत तसें माझ्या बहिणीचें करूं नका. तुमचा मोठेपणा वाढेल अशा ठिकाणीं तिला न देतांना तिला खरोखरी सुख लागेल अशाच ठिकाणीं द्या. "

एवढ्यावरून त्यांचे बंधुराज जरा रागावले. आतां ठरलेल्या तिथीस लग्न उरकलेंच पाहिजे तेव्हां दुसऱ्या नातलगांस लग्नसमारंभ सोडून इकडे येतां येईना. म्हणून लीलावतीचें सांत्वन करण्यास त्यांनीं पुरोहित महाराजांनाच धाडून दिलें आहे.

कमलाः---पुरोहित महाराज महालांत लीलावतीचें सांत्वन करतात आणि बाहेर येऊन शीतलसिंहाच्या वतीनें डावपेंच लढवितात! सांत्वन करतांना कांहीं खरें खोटें अश्रू डोळ्यांतून निघालेच तर शीतलसिंहाच्या सुवर्ण मुद्रा लाभतांच ते पुसले जातात. सुवर्णांतहि अश्रू शोषून घेण्याचा गुण आहे म्हणावयाचा !

रायजीः---म्हणूनच सुवर्ण पिळून घेतलें, कीं, पुनः त्यांतून अश्रूच निघतात.

दुर्गेशः---जगदीपराय, राजा हा लक्ष्मीपति आहे, त्यानें असली वैराग्यवृत्ति धारण करून कसें चालेल ?

कमलाः---तें असो. पण वीणावतीचा लग्नसोहळा पाहण्याची आमची हौस केव्हां पुरविणार ?

रायजीः---माझ्या प्रिय मातेच्या देहावसानानंतर लागलीच अशा प्रकारचा उत्सव करण्यास माझें मन तयार होत नाहीं; पण वीणावतीलाहि ती आहे तशा स्थितींत एकटी ठेवणें उचित नाहीं. आजच तिला नगरांत घेऊन येण्याचें मीं ठरविलें आहे. आम्हीं दोघांनीं मिळून लीलावतीकडे जावें आणि तिचा आशीर्वाद घेऊन मग लग्नक्रिया करवावी असा माझा विचार आहे. प्रधानजींचीहि या विचाराला संमति आहे.

दुर्गेशः---बरें आहे. तुम्ही परत येईपर्यंत आम्ही सर्व तयारी करून ठेवतों. [जातात.]

———

प्रवेश ५ वा.

[स्थळः—प्रभापुंज महाल. आराम आसनावर लीलावती बसली आहे. जवळ मंजरी आणि इतर दासी उभ्या आहेत. शीतलसिंह आणि पुरोहित प्रवेश करून लीलावतीस नमन करतात.]

पुरोहितः—राणीसाहेब, आपण कृपावन्त होऊन परवानगी दिली म्हणून दिवाणजींना आपल्या पुढें घेऊन आलों आहें.

शीतलसिंहः—(जवळ येऊन नमन करून) मी महाराजांचा एकनिष्ठ, आज्ञाधारक सेवक होतों, त्याप्रमाणें आपलाहि आहें.

लीलावतीः—तुमची राजनिष्ठा मला पुरतेपणीं ठाऊक आहे. तिचें वर्णन करावयाला नको. तुम्हांला जें कांहीं सांगावयाचें असेल तें चटकन सांगा. माझी प्रकृति फारच अस्वस्थ आहे. केवळ प्रधानजीच्या आग्रहामुळें मी तुमचें म्हणणें ऐकून घेणार आहें.

शीतलसिंहः—राणीसाहेब, मी सांगणार आहें ती हकीकत फार महत्त्वाची आहे. सुटकाच नाहीं ह्मणून मी आपणाला तसदी देण्यास आलों. आपलें शरीर अस्वस्थ आहे हें मी जाणून आहें.

लीलावतीः—माझें शरीर अस्वस्थ आहे त्याप्रमाणें मनहि अस्वस्थ आहे; म्हणून म्हणतें, कीं, लांबलचक प्रस्तावना न करतांना जें सांगणें असेल तें थोडक्यांत सांगा.

शीतलसिंहः—राज्याचा एक मंत्री या नात्यानें माझें कर्तव्य आहे—

लीलावतीः—तुमचें कर्तव्य पुष्कळ आहे; पण त्याचा हिशेब या वेळीं कोठें घेत बसूं !

शीतलसिंहः—मी असें म्हणत होतों, कीं, जगदीप गादीवर बसणें केव्हांहि इष्ट नाहीं.

लीलावतीः— कां बरें ! तुमच्या मुलापेक्षां तो सहस्रपटीनें गादीस लायक आहे.

शीतलसिंहः—अं–ते आपलें. मी म्हणतों–तें राणीसाहेबांचें पाहणें आहे; पण किती झालें तरी माझा मुलगा म्हणजे मंत्रीपुत्र, आणि जगदीप हा त्या जालकेचा मुलगा !

लीलावती:—म्हणून काय झालें ?

शीतलसिंह:—जी जालका पर्वतराय महाराजांच्या मृत्यूस कारणीभूत झाली, इतकेंच नव्हे तर जिनें राणीसाहेबांच्या पातिव्रत्यावर घाव आणण्याची गदा घातली होती- नव्हे चुकलों- गदा आणण्याचा घाट घातला होता तिचा मुलगा महाराजांच्या गादीवर बसणार काय ?

लीलावती:—तसें पाहिलें तर जालका आणि तुम्ही एकाच माळेचे मणी आहांत. ज्या शीतलसिंहानें महाराजांना जालकेच्या कपटजालांत गुंतविलें, ज्यानें महाराज स्वर्गवासी झाल्याचें वर्तमान गुप्त ठेऊन परपुरुषास माझा पति बनविण्याच्या दुष्ट योजनेस आपली संमति दिली, त्या शीतलसिंहाच्या मुलाला मी होऊन महाराजांच्या गादीवर बसवूं काय ?

शीतलसिंह:—राणीसाहेब, माझ्याकडे कांहींच दोष नाहीं. त्या जालकेच्या आग्रहापुढें माझें कांहींच चालेना. याचें कारण माझें मन असावें तितकें खंबीर नाहीं हेंच होय.

लीलावती:—खंबीर मनाच्या माणसापेक्षां दुर्बल मनाचा मनुष्यच अधिक घातकी म्हटला पाहिजे. कारण खंबीर माणसाची दुष्टपणाकडे प्रवृत्ति झाली म्हणजे तो आपल्या मनांत असेल तेवढेंच दुसऱ्याचें नुकसान करतो; पण दुर्बल मनाचा दुष्ट मनुष्य अनेक दुष्टांच्या तावडींत सांपडून दुसऱ्यांचें किती नुकसान करील याचा नेमच नसतो.

पुरोहित:—आपलें म्हणणें अगदीं बरोबर आहे. शीतलसिंह केवळ आपल्या स्वार्थावर दृष्टि ठेऊन बोलताहेत; पण आपली परवानगी असेल तर या बाबतींत दत्तविधानाखेरीज दुसरा एक प्रश्न उत्पन्न होतो त्याविषयीं मी थोडेसें बोलतों.

लीलावती:—हरकत नाहीं. काय बोलायचें असेल तें बोला. ऐकण्यास तयार होऊनच मी बसलें आहें.

पुरोहित:—राणीसाहेब, माझें बोलणें आहे धर्मापुरतें. उगीच स्वार्थपर गोष्टींचा पाल्हाळ लावून मी आपल्याला निष्कारण त्रास देणार नाहीं. मला जगदीप काय आणि शीतलसिंह काय दोघेहि सारखेच. पण विषवेधीं पाट लावून आपल्या सनातन धर्माचा उच्छेद करण्याचा हा जो जगदीपाचा ठाम निश्चय झाला आहे तो मात्र मला मुळींच पसंत

नाहीं. असल्या अधर्माचा वेळींच निषेध करणें हें आम्हां शास्त्रीपंडितांचें आद्य कर्तव्य आहे.

लीलावती:--आमचे प्रधानजी म्हणतात, कीं, शास्त्रांत विधवेच्या पुनर्विवाहास मुळींच आडकाठी नाहीं. जी हरकत आहे ती केवळ रूढीची आणि राजाला रूढी बदलण्याचा पूर्ण अधिकार आहे.

पुरोहित:--प्रधानजींनीं असें म्हटलें म्हणून काय झालें ? त्यांचें म्हणणें म्हणजे कांहीं ब्रह्मवाक्य नव्हे ! शास्त्रीपंडितांचें जें मत असेल तेंच ग्राह्य धरलें पाहिजे.

लीलावती:—प्रधानजींच्या अमलाखालीं असलेल्या देशांत त्यांच्या मतालाच सर्वांनीं मान दिला पाहिजे. शिवाय प्रधानजींची शास्त्रनिपुणता प्रसिद्धच आहे.

पुरोहित:—त्याबद्दल माझें कांहीं म्हणणें नाहीं, पण मला जें वाटतें तें मी आपल्याला स्पष्ट सांगतो याची क्षमा असावी. विधवाविवाह सशास्त्र असो वा नसो, पण वीणावतीच्या लग्नानें कुलाला कायमचा कलंक लागणार ही गोष्ट निर्विवाद आहे.

लीलावती:--मला तसें मुळींच वाटत नाहीं. विधवाविवाहांत जर अनीति नाहीं, दुराचार नाहीं, तर त्यामुळें कुलास कलंक लागणार कसा ? उलट जगदीपाच्या आणि वीणावतीच्या शुद्ध प्रेमाकडे पाहिलें म्हणजे त्यांच्या विवाहानें उभय कुलांच्या किर्तींत भरच पडेल, असें मला वाटूं लागतें. शिवाय, वीणावतीनें सौभाग्यसुखावर लाथ मारून जन्मभर वैधव्य सुखांत खितपत पडावें असें म्हणण्याचा मलाहि अधिकार नाहीं आणि तुम्हांलाहि नाहीं. जगदीप गादीवर बसला तर महाराजांच्या मुलांचा वंश पुढें चालेल. पण शीतलसिंह तर बोलूनचालून परके. त्यांच्या वंशांत गादी गेल्यानें आम्हांला काय समाधान वाटणार आहे ?

पुरोहित:—पण जगदीप हा महाराजांच्या शत्रूचा मुलगा आहे हें आपण विसरतां !

लीलावती:--शत्रु असला तरी एके काळीं तो गुजराथचा राजा होता. शिवाय जगदीपालाच राज्याभिषेक व्हावा अशी सर्व प्रजेची इच्छा आहे. तिच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. राज्याच्या हिताचा प्रश्न आला

म्हणजे लोकांच्या इच्छेला अवश्य मान दिला पाहिजे. कारण जेथें प्रजेचा अनादर होतो तेथें राज्यलक्ष्मी टिकून राहात नाहीं.

पुरोहितः—हे सिद्धांत आपल्याला प्रधानजींनीं सांगितलें असतील ! पण ज्या माणसाच्या बाणानें पर्वतरायमहाराजांचा वध झाला त्यालाच महाराजांचा वारस ठरविणें हें माझ्या अल्पबुद्धीला कांहीं योग्य दिसत नाहीं !

लीलावतीः—अकस्मातानें घडलेल्या गोष्टीबद्दल कोणालाहि दोष देतां येत नाहीं. जगदीपाच्या हातानें महाराजांचा वध झाला, एवढीच गोष्ट तुमच्या लक्ष्यांत राहते पण कपटानें मिळणाऱ्या राज्याचा त्याग करून त्यानें माझ्या पातिव्रत्याचें रक्षण केलें ही गोष्ट मात्र तुम्ही अजीबात विसरलां. त्याचे हें उपकार विसरून मी आपल्या पदरीं कृतघ्नतेचा दोष बांधून घ्यावा असेंच तुमचें म्हणणें आहे ना ? बरें, तसें कां होईना! जगदीपाला मी गादी मिळूं देत नाहीं. पण मग अंतस्थ कलह आणि परचक्र यांपासून गुजराथचें रक्षण करण्याचा आपण एकादा मार्ग सुचवितां काय ? आपण वृद्ध आहां, अनुभवी आहां, आणि आमचे हितचिंतक आहां, तेव्हां आपण योग्यच सल्ला द्याल !

पुरोहितः—राणीसाहेब, आपण कोणालातरी दत्तक घ्यावें हा एकच मार्ग आहे. माझ्या अल्पबुद्धीला दुसरा कांहीं उपाय सुचत नाहीं.

लीलावतीः--कोणाला दत्तक घ्यावें असें आपलें मत आहे ?

पुरोहितः--हें सांगणें जरा कठीण आहे. पण येथें मी तिऱ्हाईत मनुष्य आहें आणि कोणत्याही पक्षाकडून मला कवडीचा देखील लाभ नाहीं हें आपण जाणतच आहां. तेव्हां खरें सांगावयास कांहीं हरकत नाहीं. येथें आल्यापासून बहुतेक क्षत्रियांशीं माझा परिचय झाला आहे. आणि निःपक्षपात वृत्तीनें पाहतां मला असें वाटतें कीं, त्या सर्वांत शीतलसिंहाचा मुलगाच दत्तक घेण्यास अधिक योग्य आहे. यावर आपली मर्जी.

लीलावतीः--त्याच्या अंगीं असे कोणते विशेष गुण आहेत ते तरी कळूं द्या.

पुरोहितः--विशेष गुण काय असणार, पण शीतलसिंहावर पर्वत-

रायमहाराजांचा पूर्ण विश्वास होता. आणि त्याचें घराणें अत्यंत राजनिष्ठ आहे या गोष्टीचेंच मला अधिक महत्त्व वाटतें.

लीलावती:—मंजरी, तुला कसें वाटतें ?

मंजरी:—राणीसाहेब, या राजकार्याच्या गोष्टींत माझी काय बुद्धि चालणार ? पण हे पुरोहित महाराज आपले आप्त असल्यासारखे आहेत तेव्हां त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागलेलें बरें. (स्वगत) रंग तर ठीक दिसतो आहे. शेवटच्या उपायाची जरूर पडणार नाहीं असें वाटतें.

लीलावती:—शीतलसिंह, तुम्ही ही सल्ला देतां ती फक्त माझ्या आणि राज्याच्या हितासाठींच ना ?

शीतलसिंह:—राणीसाहेब, माझा दुसरा काय हेतु असणार ? (स्वगत) शेवटीं आपलें काम फत्ते होतें आहे ?

लीलावती:—पुरे करा ! तुमच्या निर्लज्जतेची आणि दांभिकपणाची कमाल झाली ! " निर्दोष, " " निःस्वार्थी, " " निष्पक्षपात, " हे शब्द तुमच्या तोंडांतून निघाल्यामुळें कलुषित मात्र होतील. तुम्हां तिघांचें कारस्थान मला कळत नाहीं अशी तुमची समजूत आहे कीं काय ? अहोरात्र चाललेल्या तुमच्या फंदफितूरांवर माझ्या मंत्री मंडळाची गुप्त नजर नाहीं असें तुम्हांस वाटल्यास तुमच्यासारखे मूर्ख तुम्हीच ! माझ्या मंत्र्यांचा प्रभाव अजून तुम्हांला कळला नाहीं. तुमचा असा बेत ठरला होता, कीं, सर्व डाव फसले म्हणजे शेवटीं माझा एकाएकीं खून करून माझें प्रेत कोणास न कळत जाळून टाकावें आणि अशी बातमी उठवावी, कीं, मी या पुरोहितासमक्ष शीतलसिंहाच्या मुलास गुप्तपणें दत्तक घेऊन महाराजांच्या मागें सती गेलें. हा संकेतहि प्रधानजींना कळल्यावांचून राहिला नाहीं. त्यांच्या दक्षतेची आणि सावधगिरीची तुम्हाला कल्पना नाहीं. दासी, शेजारच्या दालनांत प्रधानजी बसले आहेत त्यांना बोलावून आण पाहूं !

दासी:—जशी आज्ञा.

शीतलसिंह:—आश्चर्यानें प्रधानजी या येथें वेळीं कसे !

लीलावती:—सर्पाला जवळ येऊं दिलें म्हणजे मांत्रिकाला ठेवलेंच पाहिजे. (कल्याणकाम आणि दासी प्रवेश करतात.) प्रधानजी, या तीन अपराध्याना काय शिक्षा करावयाची ती सांगा !

कल्याणकामः--राणीसाहेब, जरा शांत व्हा. संतापानें आपल्या प्रकृतीला अपाय होईल.

लीलावतीः—माझ्या प्रकृतीला अपाय करूं इच्छिणाऱ्या या तिघांना योग्य शासन करावें असेंच माझें म्हणणें आहे.

कल्याणकामः—हें कांहीं न्यायमंदिर नव्हे. त्यांचें म्हणणेंहि आपल्याला शांतपणें ऐकून घेतलें पाहिजे.

लीलावतीः—शीतलसिंह, खरें सांगा. काल रात्रीं तुमच्या घरीं मंजरी आणि हे पुरोहित अत्तर विकणारांच्या वेषानें आले होते कीं नाहीं? त्या वेळीं माझा खून करण्याचा बेत करून मी निजलें असलें म्हणजे मंजरीनें माझ्या छातींत कटार भोंकसावी असें तुम्हीं सर्वांनीं ठरविलें कीं नाहीं? मी म्हणतें हें खरें ना?

शीतलसिंहः—कांपत (कांपत हात जोडून राणीसाहेब,) मीं पुष्कळ नको म्हटलें पण ही मंजरी आणि हे पुरोहित कांहीं केल्या ऐकेनात. तेव्हां निरुपायानें मी यांच्या म्हणण्याला रुकार दिला. हें सगळें कारस्थान या दोघांचें. त्यांच्या संगतीनें माझीहि बुद्धि फिरली! असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ!

मंजरीः—(स्वगत) असल्या भागुबाईच्या कामांत पडावें आणि आपलें नाक मात्र कापून घ्यावें! यापेक्षां दुसरा फायदा नाहीं. आतां शिर सलामत राहिलें म्हणजे मिळविलें!

लीलावतीः—प्रधानजी, आतां काय ऐकायचें बाकी राहिलें आहे सांगा.

कल्याणकामः—घाईघाईनें न्याय होत नसतो.

लीलावतीः—ठीक आहे. आपल्याला योग्य वाटेल त्या वेळीं यांचा न्याय करा. मलाहि आतां यांचा संबंध नको आहे, पण अगोदर जालकेला बोलावून आणा. मी तिला जीं शापवचनें बोललें होतें तीं या सर्वांसमक्ष मला परत घ्यावयाचीं आहेत. तिनें माझ्या हृदयाचा भंग केला म्हणून मीहि लागलीच उसनें फेडावयाचें नव्हतें. (थांबून) पण प्रधानजी, जालकेला बोलावणें पाठवावयाचें सोडून उगीच पहात कां बसला?

मंजरीः—जालका आहे कोठें! ती केव्हांच हा लोक सोडून गेली!

लीलावती:— दचकून काय? जालकेचा अंत झाला?

मंजरी:—त्या दिवशीं येथून गेल्यापासून ती आजारीच होती. तिच्या मनाला जो धक्का बसला त्या दुःखानेंच ती झिजून झिजून मेली.

लीलावती:—अरेरे, तिला क्षमा करण्यापूर्वींच तिचा अंत झाला ना? अन्य रीतीनें तरी मंजरी, शेवटीं तूं कटार मारलीसच! (मूर्च्छित होते.)

कल्याणकाम:—राणीसाहेब! मन स्वस्थ ठेवा. (दासी,) राणीसाहेबांना वारा घालून जागृत कर पाहूं. दासी लीलावतीस वारा घालूं लागते.

लीलावती:—(नेत्र उघडून) जालकेचें सांत्वन करून मनाला समाधान मानून घ्यावें म्हटलें तर तीहि आशा नाहींशी झाली, तिला मी जे शब्द बोललें त्याचा प्रतिध्वनी माझ्या कानांत अजून दुमदुमत आहे आणि आतां शेवटपर्यंत दुमदुमत राहील. पण माझा शेवटही कांहीं दूर नाहीं. प्रधानजी, माझी एक इच्छा राहिली आहे. जगदीपाला आणि वीणावतीला आणून मला भेटवा.

कल्याणकाम:—दोघेंहि जवळच्या दालनांत बसलेलीं आहेत. दासी, त्यांना इकडे बोलावून आण. (दासी जाते.) आपला आशीर्वाद घेण्यास तीं उत्सुक झालीं आहेत.

लीलावती:—आणि मीहि त्यांची इच्छा पूर्ण करण्यास उत्सुक झालें आहें. [जगदीप आणि वीणावती प्रवेश करून लीलावतीस नमस्कार करतात. त्यांना उठवून] जगदीप, त्या दिवशीं तुम्हीं मला माता म्हटलें होतें म्हणून त्याच नात्यानें मी तुम्हांला आशीर्वाद देतें, कीं, वीणावतीला आणि गुर्जरभूमीला सुखी करून तुम्हीहि सुखी व्हा. मला दत्तक घ्यावयाचा असता तर तुम्हांलाच घेतलें असतें. पण रत्नदीपरायाचे पुत्र या नात्यानें गुजराथच्या गादीवर तुमचा हक्क आहेच. तेव्हां दत्तविधानानें प्राप्त होणाऱ्या नवीन हक्काची तुम्हांला आवश्यकताच नाहीं. वीणावती, आजपर्यंत तुझ्या सुखाची मीं फारसी काळजी केली नाहीं, पण मातेच्या आशिर्वचनानें कांहीं कल्याण होत असलें तर मी मनापासून आशीर्वाद देतें, कीं, तुला अखंड सौभाग्याची आणि परमसुखाची प्राप्ति होवो! [थांबून] माझ्यानें अधिक बोलवणार नाहीं असें वाटतें. पण माझें तुला शेवटचें एक सांगणें आहे, तें हें, कीं, गुर्जरराष्ट्राची राणी झाल्यावर तूं

आपल्या पतीस निरंतर हेंच मागणें मागत जा, कीं, आपल्या प्रजेला लग्न-व्यवहारांत स्त्री जातीचें हित पहाण्यास शिकवा, म्हणजे लीलावतीसारख्या हतभागी स्त्रिया समाजांत दृष्टीस पडणार नाहींत. (थांबून) माझे प्राण कासावीस होत आहेत. मला थोडें पाणी द्या. [दासी पाणी देतें तें पिऊन] माझ्या या वचनानें देशांतील एका अभागी स्त्रीचें दुःख जरी कमी झालें तरी परलोकांत मला किती शांति प्राप्त होईल! पण या लोकीं कांहीं--

(मूर्छित होते.)

कल्याणकामः—(दासीस)राणीसाहेबांना नीट शय्येवर निजवून कांहीं उपचार करा. आम्ही जाऊन वैद्यराजांना इकडे पाठवून देतों.

[पडदा पडतो.]

प्रवेश ६ वा.

[**स्थळः**—प्रभापुंज महालांतील दरबार. सर्वत्र श्वेत बिछाईत टाकलेली आहे. सिंहासनावर जगदीप आणि वीणावती बसलेलीं आहेत. एके बाजूस सावित्री, कमला आणि इतर स्त्रिया, व दुसरे बाजूस कल्याण-काम, पुष्पसेन, दुर्गेश आणि इतर सरदार मंडळी बसलेली आहे असा प्रवेश.]

प्रतिहारः—श्रीमत् परमभट्टार्कपरममाहश्वरपरमभागवतसमधिगत पंच-महाशब्दसकलसामंताधिपतिबाहुसहायगुर्जरनरेन्द्रश्रीजगदीपदेव महाराजा-धिराजकी जय! श्रीमती महाराज्ञी—वीणावतीदेवीकी जय! महाराज आणि महाराणी या सभेंत सर्वांचें स्वागत करतात.

जगदीपः—प्रतिहार, आजच्या दरबारांत उत्सव आणि अभिनंदन बंद आहे असें जाहीर करा.

प्रतिहारः—[नमन करून] जशी महाराजांची आज्ञा. दरबारी मंडळीकडे वळून मोठ्यानें आजच्या प्रसंगीं उत्सव आणि अभिनंदन बंद आहे.

कल्याणकाम:—महाराज, अशा मंगलप्रसंगीं शोक पाळणें उचित नव्हे.

जगदीप:—प्रधानजी, आमच्या दोन्ही मातांची चिताभूमि तप्त आहे तोंच लग्न आणि राज्याभिषेक यांसारख्या क्रिया करून आम्हीं स्नेहभावाचा उच्छेद केला याची आम्हांला जाणीव तर होऊं द्या.

कल्याणकाम:—या दोन्ही क्रिया केवळ कर्तव्य म्हणूनच आपण केल्या आणि कर्तव्याचा प्रश्न आला म्हणजे हर्षशोकाकडे लक्ष देऊन कसें चालेल ? शिवाय संसाराची घटनाच अशी आहे, कीं, मातापितरांची चिता स्वहस्तानें पेटवून तिच्याच ज्वालेंत संतानाला आपला आत्मदीप प्रज्वलित करावा लागतो. आपल्या इच्छेनुसार आज उत्सव आणि अभिनंदन तहकूब ठेवलीं आहेत. पण राजकार्यें कांहीं तहकूब ठेवतां येत नाहींत. एक जरूरीचें राजकार्य राहिलें आहे आणि आपली आज्ञा असेल तर तें रुजू करतों.

जगदीप:—आपल्याला जें योग्य दिसतें तें करावयास आमची मुळींच हरकत नाहीं.

कल्याणकाम:—प्रतिहार, बाहेर दोन अपराधी आहेत त्यांना आंत घेऊन या.

प्रतिहार:—जशी आज्ञा; (बाहेर जाऊन, शीतलसिंहास आणि मंजरीस घेऊन येतो.)

कल्याणकाम:—महाराज, यांच्या बाबतींत आपण जो निर्णय केला आहे, तो जाहीर करण्याची कृपा व्हावी.

जगदीप:—शीतलसिंह, तुमच्या आणि मंजरीच्या सर्व अपराधांची क्षमा करावी असें आम्हीं प्रधानजींच्या विचारानें ठरविलें आहे. पुरोहित महाराज परराज्याचे पाहुणे असल्यामुळें त्यांना कांहींएक शिक्षा न करतां स्वदेशीं पाठवून देण्यांत आलें आहे. तुमचे अपराध लहानसहान नाहींत. आपल्या स्वार्थासाठीं गरीब प्रजेचा छळ करून एक कोट रुपये वसूल करण्यास तुम्ही तयार झाला होतां. ही रक्कम आणि आमचा उत्तरेकडील सारा प्रदेश सौराष्ट्राधिपतीस लांच म्हणून देण्याचा तुमचा विचार होता. राजद्रोहाची आणि देशद्रोहाची मजल यापलीकडे जाणें शक्य नाहीं. या अपराधास आपल्या शास्त्रांत देहांतशासनच सांगितलें आहे. पण

शीतलसिंह, तुमच्यावर पर्वतरायमहाराजांची शेवटपर्यंत कृपा होती. आणि मंजरी, तूंहि कांहीं काळ लीलावती राणीसाहेबांची मनोभावें सेवा केली होती. या गोष्टी लक्ष्यांत घेऊन आम्ही तुम्हांस यत्किंचितहि शिक्षा करूं इच्छित नाहीं. लोकांत तुमची अपकिर्ति झाली आहे हीच शिक्षा तुह्मांला तूर्त पुरे आहे. पुनः असल्या फंदांत पडूं नका.

शीतलसिंहः—महाराज, आपण उदार अंतःकरणानें माझ्या अपराधांची क्षमा केली आहे. तेव्हां मला राजनिष्ठेची शपथ घेण्याची परवानगी असावी.

जगदीपः—शीतलसिंह, सर्वांच्या आधीं तुम्हीं ही शपथ घेतली होती, हें तुमच्या लक्ष्यांत असेलच.

शीतलसिंहः—(खालीं पाहून) ती पाळली गेली नाहीं म्हणून पुनः प्रतिज्ञा करण्याची इच्छा आहे.

जगदीपः—प्रतिज्ञेप्रमाणें वागण्यास जो मनोनिग्रह लागतो तो आधीं प्राप्त करून घ्या आणि मग प्रतिज्ञा करा.

शीतलसिंहः—महाराज, आपण न्यायी आहां. म्हणून दुसरी एक याचना करतों. मंजरी आणि पुरोहितमहाराज माझी सर्व दौलत गिळून बसलीं आहेत, यांना वेळोवेळीं रकमा पुरवून माझ्या जहागिरीचीहि वाट लागली तेव्हां माझे पैसे मला परत मिळण्याची कांहीं व्यवस्था व्हावी.

जगदीपः—त्यांच्याकडून कांहीं पैसे मिळत असल्यास बेलाशक घ्या. आमची कांहीं हरकत नाहीं.

दुर्गेशः—आणि पूर्वसंकेताप्रमाणें तुह्मांला आपल्या मुलाचें लग्न मंजरीच्या मुलीशीं करावयाचें असल्यास त्यालाहि आमची हरकत नाहीं.

शीतलसिंहः—वः ! कांहीं झालें तरी मी गुजराथच्या अष्टप्रधानापैकीं एक प्रधान आहें. माझा मुलगा दासीच्या मुलीशीं लग्न करील ? आणि तेंहि असल्या नीच कृतघ्न दासीच्या मुलीशीं !

मंजरीः—अहाहा ! असल्या भितऱ्या मेषपात्र्याच्या मुलाशीं लग्न करून माझ्या पोरीला तरी काय सुख लागणार आहे ? माझी मुलगी कांहीं अगदीं वर नाहीं आली बरें, शीतलसिंह !

कल्याणकामः—एकमेकांला टाकून बोलण्याचें हें स्थळ नव्हे आणि

हा प्रसंगहि नव्हे. तुमचे दुष्ट संकेत तडीस गेले नाहींत याबद्दल ईश्वराचे आभार माना.

जगदीपः—शीतलसिंह, पुढें काय करावयाचें हें तुम्हीं स्वतःच ठरविलें पाहिजे. पण माझा सिद्धांत तुमच्या उपयोगी पडत असेल तर मी पुनः त्याचा उच्चार करतों. ते दिवशीं रात्रीं किसलवाडींत मीं तुम्हांस आपला खरा वृत्तान्त निवेदन करून एक दोहरा म्हटला होता तो तुम्हांस आठवत असेलच.

शीतलसिंहः--होय महाराज, आपण म्हटलें होतें कीं,

मालिकसे सब कुछ होत है ये बन्देसे क्या होय ?
राईको पर्वत करे फिर पर्वतको राय !

जगदीपः--ईश्वरनिर्मित नीतिव्यवस्थेची कास धरल्यामुळें राईचा पर्वत होण्याचें माझ्या नशीबीचे चुकलें आणि मी पुनः राई झालों. पण आज पुनः राईचा जगदीप होऊन मी आपल्या वडिलांच्या गादीवर बसलों आहें, आणि त्याहिपेक्षां विशेष गोष्ट म्हणजे दिव्य प्रेमानें पावन करणारी ही सहधर्मचारिणी मला प्राप्त झाली आहे. प्रधानजी, आतां आपलें आशीर्वचन ऐकून आजचा दरबार विसर्जन करूं.

कल्याणकामः--महाराज, आपली उदात्त नीतिमत्ताच प्रजेला आशीर्वादरूप आहे तिची दिगंतरीं कीर्ति होवो. शासित आणि शास्ते यांच्यामध्यें ऐक्यभाव वाढो, त्याचप्रमाणें दुरिताचें तिमिर जाऊन विश्वाला स्वधर्मसूर्याचें दर्शन होवो, एवढीच त्या जगन्नियंत्याकडे माझी अनन्य भावानें प्रार्थना आहे !

[पडदा पडतो]

समाप्त.

चित्ताकर्षक भाग निवडून त्यांच्या सहाय्यानें त्यास वाचकांच्या चित्ताला चटका लावितां आला नसता. या कादंबरींत विशेषेंकरून वत्सलरस साधला आहे. भोळी लीला व मायाळू दिनू या तर वत्सलरसाच्या मूर्तिच आहे.

नायिकेच्या–विमलेच्या–मानीपणाचें निरभिमानत्वांत परिवर्तन घडवून आणणारी मंदाकिनी प्रेमळ पत्नीचा उत्तम नमुना आहे. हीं तीन पात्रें ज्या ज्या भागांत येतात ते ते भाग कोरड्या डोळयांनीं वाचणें कठीण जातें. याशिवाय नायक मनोहर, त्याचे वडील आप्पासाहेब, दिवाण आणाराव, विश्वनाथ, नाना, नायिका विमला, शालिनी या साऱ्यांचींच स्वभावचित्रें चातुर्यानें रंगविलीं आहेत. "

सारांश, एका गृहिणीला "**होमरूल**" न मिळाल्यानें ती कशी भग्नहृदय झाली आहे व तें "**स्वराज्य**" (गृहराज्य) मिळविण्यासाठीं तिला किती अपूर्व स्वार्थत्याग करावा लागला, याचें अत्यंत उदात्त व करूणपूर्ण चित्र या हृदयंगम कादंबरींत रेखाटलें आहे. प्रत्येक **होमरुलर गृहिणीनें** ही कादंबरी आवश्य वाचावी.

(१) विहंगवृंद (शिल्लक नाहीं); (९) रत्नकंकण–कृपणकन्या २।≈ रु.
(२) स्वर्गीय प्रेम किं. १॥ रु. (१०) शापित महाराष्ट्र २। रु.
(३) वनज्योत्स्ना-सुभेदार किं १॥। रु (११) तीन शिलेदार ३ रु.
(४) जीवनलता किं. १। रु. (१२) दुर्गादास–प्रेमशृंखला २ रु.
(५) गृहलक्ष्मी-शरयू किं. २ रु. (१३) अल्ला हो अकबर २ रु.
(६) रणरंग बंड-सौदामिनी १॥। रु. (१४) प्रेमळ सवत किं. २॥ रु.
(७) ताजमहाल काव्यरत्न २।– रु. (१५) गुर्जरवीर अनहिल किं. २॥ रु.
(८) पतित–जर्मननाश २। रु. (१६) नंदनवन, सैतानी चक्कर

एक रुपाया प्रवेश फी भरून या मालेचें कायम ग्राहक होणारांस मालेचीं वरील सर्व पुस्तकें व पुढील सर्व पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतात. खालील पत्त्यावर नांवें नोंदवून मागणी करावी.

सेक्रेटरी–सरसवाङ्मयप्रसारक मंडळी.
डॉ. भालचंद्र यांचे समोरील, भांडारे यांचे दगडी बंगल्यांत
ट्रामटर्मिनस–गिरगांव मुंबई.

सुवाङ्मयेन गीतेन युवतीनां च लीलया। यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोथवा पशुः।

सरसवाङ्मयरत्नमालेचें १६ वें रत्न.

साठ वर्षांपूर्वी.

अर्थात्

१८५७ सालचें कानपूर येथील बंड

लेखक व प्रकाशक.

तात्या नेमिनाथ पांगळ.

" तीर्थंकर चरित्रें, इ. स. पूर्वीचा जैन इतिहास, दुर्गादास "
वगैरे पुस्तकांचे कर्ते; व
प्रोप्रायटर, सरसवाङ्मयप्रसारक मंडळी—गिरगांव—मुंबई.
डॉ. भालचंद्रसमोर, रा. भांडारे यांचा दगडी बंगला, चर्नीरोड.

मुद्रक
रा. रा. केशव रावजी गोंधळेकर, 'जगद्धितेच्छु प्रेस'
शनवार पेठ, ४३२ पुणें.

वर्ष तिसरें. आगष्टचा अंक. } किंमत दीड रुपया. { सन १९१७ इ. आवृत्ती पहिली.

ॐ नमः सिद्धेभ्यः ।

प्रकाशकाचे दोन शब्द,

——:०❀०:——

गेले खेपेस जाहीर केल्याप्रमाणें प्रस्तुत आम्ही " साठ वर्षांपूर्वी, बाई कुसुमावती व शीलपरीक्षण अथवा राईचा पर्वत " हीं पुस्तकें वाचकांना सादर करीत आहोंत. " साठ वर्षांपूर्वी " ही कादंबरी, अर्थात् आज १९१७ इ. स. पासून साठ वर्षांपूर्वी, म्हणजे सुप्रसिद्ध १८५७ चे बंडाचे वेळच्या प्रसंगाची आहे व ती १८५७ च्या बंडाच्या इतिहासांतले निरनिराळे उतारे देऊन कादंबरी लिहिलेली आहे; अर्थात् यांत लेखकाला पदरचा गरम मसाला घालण्यास भाषेशिवाय अन्य वाव मुळींच नसल्यामुळें याला कादंबरी म्हणण्याऐवजीं " १८५७ च्या बंडाच्या वेळच्या कांहीं व्यक्तींच्या जबान्या " हें नांव दिल्यास अधिक शोभेल असें वाटतें. निरनिराळ्या जबान्यांचा आश्रय घेऊन लिहिलेली, मला वाटतें, मराठींत ही पहिलीच कादंबरी असावी व तीं सुप्रसिद्ध आंग्ल कादंबरीकार Wilkie collinse यांच्या Woman in white च्या पद्धतीवर लिहिलेली आहे व ही नवीन पद्धत आमच्या रसिक वाचकांना आवडेल असा भरंवसा आहे.

या कथानकांतील सर्व व्यक्ती इतिहासप्रसिद्ध व तत्कालीन समाजांत क्रांती घडवून आणणाऱ्या असल्यामुळें त्यांच्या संबंधानें म्हणजे नाना साहेब, तात्या टोपे वगैरेसंबंधानें इतिहासकारांनीं केलेल्या उल्लेखापेक्षां विशेष म्हणण्यासारखें जरी कांहीं नाहीं, तरी सरदार रामपाल या चातुर्यपूर्ण, धाडसी, न्यायी व करुण हृदयाच्या गुप्त पोलिसासंबंधानें करावी तितकी तारीफ थोडी आहे; आणि खरोखरच आमच्यांतल्याच " या हिंदी गुप्तपोलिसाच्या साह्यामुळेंच १८५७ च्या बंडाचें स्वरूप तीव्रतम झालें नाहीं " असे आंग्ल मुत्सद्यांनीं व तत्कालीन व्हायसरायसाहेबांनीं जे उद्गार काढलें याबद्दल आम्हांस अभिमान वाटतो. त्याचप्रमाणें न्याय व

शांतताप्रिय ब्रिटिशसत्तेची इमानें इतबारें, आणि एकनिष्ठपणें सेवा करणाऱ्या सरदार रामपालसिंहाची, चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया यांनीं खुद्द स्वदस्तुरचें पत्र पाठवून प्रशंसा केली, ही गोष्ट अखिल भारतवासीयांना गौरवास्पद आहे. कथानकाची नायिका अखेर-पावेतों करुणरसांत बुडलेली आहे व अशा शोकपर्यवसायी कथानकांत नायिका शोकरसपूर्ण असली तर वाचक नाखुष होणार नाहींत अशी पूर्ण खात्री आहे. सारांश, श्रृंगार, वीर, करुणा, भय व अद्भुतरसपूर्ण नितांतरमणीय, बाबू पंचकोडी देव यांच्या कथानकाधारें लिहिलेलें हें ऐतिहासिक कथानक आमच्या रसिक वाचकांना रुचेल अशी आम्ही आशा बाळगतों. लौकरच असेंच एक नवीन ऐतिहासिक कथानक आम्ही पुनः वाचकांना सादर करूं.

आमचे सन्मान्य मित्र श्रीयुत अच्युतराव कोल्हटकर यांनीं, प्रस्तुत कादंबरीच्या प्रसंगास अनुरूप असे, लिहिलेलें यापुढें जोडलेले लेख प्रसिद्ध करण्यास आम्हांस परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों.

गेल्या खेपेस प्रसिद्ध केलेल्या " गुर्जरवीर अनहील " या कादंबरीची विद्वानांनीं अत्यंत तारीफ केली असून मराठीं भाषेंतले ज्येष्ठ व श्रेष्ठ मासिक विविधज्ञानविस्तार यानें तर " कादंबरी वीररस व स्वदेशप्रेम यांनीं ओथंबलेली आहे. नायक नायिका यांचें स्वभावचित्र फारच उदात्त व उदार दाखविलें आहे" वगैरे उद्गार काढून प्रशंसा केली आहे; पण त्याचे लेखक श्रीयुत वामनराव बर्वे हे, स्वर्ग० सहकारीकृष्णाप्रमाणें पुस्तक-प्रसिद्धीपुर्वींच प्लेगला बळी पडले व ती प्रशंसा ऐकण्यास आज हयात नाहींत याबद्दल आम्हांस अत्यंत दुःख होत आहे; पण त्यांतले त्यांत इतकेंच समाधान मानावयाचें कीं, ते किंवा सहकारी कृष्ण किंवा कै. प्रभाकरपंत माळवे हे; " जन्मास आले व्यर्थचि गेले " या साधूक्तीप्रमाणें व्यर्थ न जातां, आपल्या पश्चात् आपल्या मायभाषेची केलेली सेवा, मागें ठेवून ते जात आहेत व आपणा सर्वांस व मराठी भाषेस ऋणी करीत आहेत, व हीच एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. परमात्मा त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो !

गेले पुस्तकाचे वेळीं केलेल्या विनंतीस मान देऊन बऱ्याच ग्राहकांनीं

६ रुपयांच्या सवलतीचा फायदा घेतला याबद्दल आम्ही त्यांचे पुनः एकवार आभार मानतों. सध्यां कगदाचे भाव ५ पांच पटीनें वाढले असून कागदाच्या असल्या " महागाईत जगावें कसें " हाच एक महत्त्वाचा प्रश्न सर्व प्रकाशकांपुढें दत्त ह्मणून उभा आहे. अशा वेळीं नूतन ग्राहक मिळवून देऊन किंवा ग्राहक नसणाऱ्या आपले मित्रमंडळींकरितां सोबत दिलेल्या सवलतीनें पुस्तकें मागवून मालेस साह्य करावें, अशी आमची आश्रयदात्यांना नम्र विनंती आहे. प्रस्तुत युद्ध, हीं महाआपत्ती आहे ती परमात्मा लवकर दूर करो ! आपणांकडून खात्रीनें कांहीं तरी नवीन ग्राहकांची मदत होईल या आशेनें सोबत कार्ड पाठविलें आहे तें भरून पाठविण्याची मर्जीनुरूप कृपा करावी अशी विनंति आहे.

मालेचें मागील एक पुस्तक, गतवर्षी झालेल्या पुण्याच्या प्लेगमुळें लांबणीवर पडत आलेलें आहे. तथापि पुढें एखादे खेपेस, दोन खेपेचीं मिळून पुस्तकें एकदम प्रसिद्ध करून, या उशीराची भरपाई करूं, असें आम्ही आश्रयदात्यांना आश्वासन देतों. येतें पुस्तक स्वदेशी कागदावर निघेल.

येत्या खेपेस " सैतानी चक्र " धारण करणाऱ्या व परोपकारार्थ केवळ गुन्हे करणाऱ्या एका धाडसी नायिकेच्या अजब करामतीनेंपूर्ण अशी कादंबरी, डिसेंबर अखेर किंवा जानेवारीच्या १ ले आठवड्यांत खास प्रसिद्ध होईल. त्याबरोबर " आजच्या एका सामान्य लोकनायक पुढाऱ्याचे चरित्रांतील कांहीं अपूर्व पण कर्तव्यपूर्ण व कादंबरीवजा बहारीचे असे बंदीवासांतील प्रसंग" आणि "महायुद्धाच्या तहाचा परिणाम ऊर्फ जर्मन कैसरचें नवीन अजब कारस्थान व त्यामुळें इंग्लंडचा जर्मनीस पडलेला पेंच, " हीहि, शक्य तों सादर करण्यांत येतील.

मालेवर रसिक आश्रयदात्यांची कृपादृष्टि असावी. ही विनंति.

ता. १५-११-१७ — आपला नम्र

गिरगांव-मुंबई. — तात्या नेमिनाथ पांगळ.

“ समर्पण. ”



तीर्थाप्रमाणें मला सदैव पूजनीय असे माझे परम वंद्य व परम प्रिय तीर्थरूप “ दादासाहेब ”

नेमिनाथ अनंतराज पांगळ

यांचे चरणकमलीं हें वाङ्मय-रत्न अत्यादरपूर्वक समर्पण करीत आहें.

नम्र बालक

—तात्या.

१८५७ चें कानपूर येथील बंड.

अर्थात्

साठ वर्षांपूर्वी.

प्रकरण १ लें.

आत्महत्या आणि खून.

(ब्रिगेडी सर्जन स्टीफनची जबानी.)

" सन १८५१ इसवीसालीं मी कानपूरच्या ब्रिगेडसर्जनच्या पदावर आरूढ होऊन तें काम पहात होतों. त्या वेळीं भरतभूमीच्या राजकीय नभःप्रदेशीं शिपाईविद्रोहरूप अशनिवृष्टीचें पूर्वलक्षण सुचवणारी मेघमाला हळुहळू डोकावीत होती. अत्यंत दूरदृष्टि कॅनिंगसाहेबांना या गोष्टीचें स्वप्न जणूं काय अगोदरच पडलें असून ते तिचा नायनाट करण्याच्या उद्योगांत गढले होते. या विद्रोहाचे परिणाम झाले त्याहून जास्त भयंकर किंवा शोचनीय झाले नाहींत आणि त्यामुळें ब्रिटिशसत्तेचा वृक्ष भारत-भूमींतून समूळ उन्मळून पडला नाहीं हें केवळ त्यांच्याच विलक्षण बुद्धीचें आणि अद्भुत दूरदर्शीपणाचें फळ होय. निरनिराळ्या गोरे लोकांच्या हालचाली पाहून कानपूर हें बंडखोर लोकांचें केंद्रस्थान होणार हें त्यांना अगोदरच कळून चुकलें असून त्याच कारणामुळें त्यांनीं कान-पुरांतील सैन्यांची संख्या वाढविली होती आणि त्याजवर जनरल हे, हा चतुर सेनापति नेमला होता. त्यांच्याबरोबरच माझीहि सैन्यांचा डॉक्टर या नात्यानें कॅनिंगसाहेबांनीं तिकडे रवानगी केली होती.

मी ज्या वेळीं कानपूरला जाऊन पोंहोचलों त्या वेळीं माझे पूर्व-परिचित दोस्त " जे. गॉर्डन "साहेबही तेथें होते. इंग्लडांत आह्मां दोघांचाही एकाच कॉलेजांत अभ्यास झाला होता आणि तेव्हांपासूनच आह्मां उभयतांत मैत्री जडली होती. मी भारतांत येण्यापूर्वीं दोन वर्षें त्यांनीं इंग्लंड सोडलें होतें आणि त्यानंतर ह्या वेळेपर्यंत मला त्यांची कांहींच बातमी लागली नव्हती. कानपूरसारख्या अपरिचित ठिकाणीं त्यांची अकस्मात भेट झाल्यानें मला अतिशय समाधान वाटलें. आणि माझ्या कामगिरींत त्यांच्यापासून थोडें बहुत साह्य मिळण्याची आशाहि मला उत्पन्न झाली.

औपचारिक कुशल प्रश्नोत्तरें संपल्यावर ते आपल्या पित्याच्या ईस्ट इंडिया कंपनीतले एक हिस्सेदार म्हणून इकडे आले आहेत. आणि त्यांना लाभही कल्पनातीत झाला या गोष्टी मला कळून आल्या त्या दिवसापासून परस्परांचें मित्रत्व पहिल्यापेक्षांही दृढ होत गेलें. त्या दिवशीं या जिवलग दोस्तानें मला मेजवानीहि केली.

वरील गोष्टीला कित्येक दिवस झाल्यानंतर मी एकेदिवशीं आपली सगळीं कामें आटोपून गॉर्डनसाहेबांची भेट घेण्यासाठीं त्याच्या बंगल्यावर गेलों. फाटकापाशीं त्यांची पत्नी उभी होती तिनें मोठ्या सन्मानानें मला आंत नेलें. यद्यपि या बाईचा आणि माझा फारसा परिचय नव्हता तरी तिनें एखाद्या बंधूप्रमाणें अत्यंत प्रेमळपणानें माझें स्वागत केलें. आम्ही आंत जातांच गार्डनसाहेबही आह्मांला भेटले. गार्डनसाहेबांचा बंगला अत्यंत उत्कृष्ट प्रकारें शृंगारिला असून त्याच्या सभोंवतालीं पुष्पवाटिका, कारंजीं आणि कृत्रिम गिरिशिखरें विलसत होतीं.

गार्डनसाहेबांनीं मला खुर्चीवर बसविल्यानंतर आपल्या रोज व हेलेन नामक दोघीं मुलींना तेथें बसवून घेतलें आणि त्यांच्याशीं माझा परिचय करून दिला. रोजचें वय या वेळीं २२ वर्षांचें असून हेलेनचें १९ वर्षांचें होतें. गार्डनला पुत्रसंतती कांहींच नव्हती; यामुळें या दोघी मुलीच त्याच्या पाठीमागें त्याच्या अतुल संपत्तीच्या वारसदारीण बनणार होत्या. रोजची सरल आणि लज्जाविनीत वृत्ति मला अतिशय आवडली.

याच्या उलट हेलेनची वृत्ति होती. तिच्या प्रकृतींत पराकाष्ठेचें चांचल्य आणि अस्थिरपणा भरला होता. यामुळें मला ती बिलकुल आवडली नाहीं. मीं रोजला तिच्या शिक्षणाच्या बाबतींत कांहीं प्रश्न विचारले. त्यांचीं तिनें जीं कांहीं उत्तरें दिलीं त्यावरून तिच्या शिक्षणांत आणि विचारांत बरीच उन्नती झाली असल्याचें मला आढळून आलें. हेलनलाही त्या बाबतींत मीं कांहीं प्रश्न विचारिले पण तिजकडून बेपर्वाईची उत्तरें येत गेल्यामुळें मी पुढें त्या भानगडींत विशेषसा पडलों नाहीं. असो. याप्रमाणें त्या दिवशीं गार्डनच्या कुटुंबांतील सगळ्या माणसांशीं माझा परिचय झाला. त्या दिवशीं रात्रीं माझें भोजनही तेथें झालें आणि रात्रीं बऱ्याच उशीरा मी घराकडे परतलों.

त्या दिवसापासून गार्डनच्या कुटुंबांतील मंडळीशीं माझा स्नेहभाव वरचेवर अधिकाधिकच वाढत चालला. त्या माणसांच्या सौजन्यामुळें माझें मन त्यांच्याकडे इतकें आकृष्ट होऊन गेलें कीं, दिवसांतून निदान एकदां तरी त्यांच्या भेटीला गेल्याखेरीज मला चैन पडेनासें झालें. विशेषतः रोजच्या सरळ आणि पवित्र वृत्तीनीं मला अगदीं मुग्ध करून टाकलें होतें आणि हेलेनचा स्वभाव जरी मला आवडत नव्हता तरी तिच्याकडेही मी स्नेहदृष्टीनेंच पहात होतों. गार्डनच्या परिवाराशीं माझा परिचय झाल्यानंतर तीन महिन्यांनीं एके दिवशीं रविवारीं मी, रोज आणि हेलेन यांच्याबरोबर चर्चमध्यें उपासनेसाठीं गेलों, रस्त्यांत रोज मला म्हणाली, " काय कारणामुळें असेल तें असो, आज हेलेनच्या मनाला अतिशय कष्ट होत असल्यासारखें दिसत आहे तुम्ही कोणत्याही रीतीनें तिला समाधान वाटण्याचा प्रयत्न केला तर बरें होईल. "

मीं हेलेनच्या चर्येकडे पाहिलें तों तिजवर खरोखरच विषादाची छाया पसरली होती. मला अतिशय वाईट वाटलें; कोणत्याही प्रकारें तिला सुखी करण्याविषयीं माझ्या मनाला जेवढी तळमळ वाटूं लागली, तेवढी तिच्या दुःखाचें कारण समजून घेण्यासाठीं वाटलें नाहीं ! हिच्या क्षुद्र पण सरळ हृदयांत कसला भयंकर कीटक घुसला असेल याची मला स्वतः-लाही कल्पना झाली नाहीं; आणि त्यासंबंधीं मीं तिलाही कांहीं विचा-

रलें नाहीं. वाटेनें जातांना मीं तिच्या मनाला समाधान देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं! उलट मी जसजसा जास्त प्रयत्न करूं लागलों तसतसें तिचें दुःख वाढत गेलें!

आम्ही चर्चमध्यें जाऊन पोहोचलों त्या वेळीं उपासनेला प्रारंभ झाला होता. प्रार्थना मंदीर जनसमुदायानें अगदीं खेंचून भरलें होतें. सुदैवानें सर्वांच्या पाठीमागें एक बेंच रिकामा राहिला होता त्यावर मी रोजसह बसलों. हेलेन आमच्या पुढच्याच बेंचावर एका कोंपऱ्यांत जाऊन बसली. सुमारें अर्ध्या घंट्यानें मीं हेलेनकडे पाहिलें तों ती स्थिर चित्तानें बसली असून तिच्या पाठीमागें उभा असलेला एक युवक तिजकडे तिरक्या दृष्टीनें पाहत होता! काळ्या मिशा आणि काळा चष्मा याच्याखालीं त्याचें तोंड बरेंच झांकून गेलें असल्यामुळें मला तें चांगलेंसें दिसलें नाहीं. त्याचें सर्व शरीर शोकसूचक काळ्या वस्त्रांनीं झांकलें होतें. तो तरुण हेलेनेकडे इतक्या तीव्र दृष्टीनें कां पाहात असावा हें समजून घेण्यासाठीं माझें मन अत्यंत व्याकुळ झालें होतें आणि उपासना संपल्यावर त्यासंबंधीं त्याच्याजवळ खुलासा करावयाचा असा मी मनांतल्या मनांत विचार केला होता.

कांहीं वेळानें उपासना समाप्त झाली पण तो तरुण अजूनही मघाच्यासारखा तीव्र दृष्टीनें हेलेनकडे पहात होता. बरोबर त्या वेळेला हेलेन उठुन उभी राहिली. पण तिची दृष्टि त्या तरुणावर जातांच तिच्या तोंडून एक मोठी किंकाळी बाहेर पडून ती पुन्हां बेंचवर बसली, आणि आपले दोन्हीही डोळे आपल्या दोन्ही हातांनीं गच्च धरून घेतले. मीं तत्काळ तिजकडे धांवत जाऊन तिला धरलें आणि रोज तिच्या तोंडावर वारा घालूं लागली. याच वेळेला "सूड," "सूड" म्हणून कोणी ओरडल्याचें माझ्या कानावर आलें त्याबरोबर मी अतिशय घाबरून जाऊन तो तरुण ज्या दिशेला उभा होता तिकडे दृष्टि फेंकली; पण तो मला दिसला नाहीं. तो ज्या दिशेला उभा होता तिकडूनच ते शब्द आले होते. याबद्दल माझी पूर्ण खात्री होती. कांहीं वेळानें हेलेन शुद्धीवर आली पण ती एकाद्या वेड्याप्रमाणें इकडे तिकडे पाहूं लागली.

त्या वेळीं मीं तिला म्हटलें, " हेलेन, तूं ज्या माणसास पाहून इतकी म्यालीस तो येथून निघून गेला आहे. "

माझे हे शब्द हेलेनच्या कानांवर पडतांच तिनें मजकडे मान वळवून पाहिलें. या वेळीं तिचा चेहेरा पिंवळा पडला होता आणि तिच्या अंगांतूनही सर्व रक्त नाहींसें झाल्याप्रमाणें दिसूं लागलें. तिची ही स्थिती पाहून मला थोडीशी भीती वाटली. इतकेंच नव्हे तर तिची हीच स्थिती जर आणखी कांहीं वेळ टिकली असती तर एकाद्या सांघातिक रोगांत पर्यवसान व्हावयाचें अशीही शंका माझ्या मनांत उत्पन्न झाली.

आम्ही चर्चमधून बाहेर पडलों त्या वेळीं रात्रीचे दहा वाजले होते. बाकीचे लोक आमच्या अगोदरच तेथून निघून गेले असल्यामुळें या वेळीं सर्वत्र शुकशुकाट झाला होता. रोजनें आणि मीं हेलेनला धरलें आणि आम्ही हळु हळू घराकडे चाललों. इतक्यांत एक भला गलेलठ्ठ यूरोपियन आमच्या जवळ आला आणि म्हणाला,

" तुम्ही लोक कोठें जात आहां ? "

" गार्डनसाहेबांच्या घराकडे. " मीं उत्तर दिलें.

" गार्डनसाहेबाशीं माझाही परिचय आहे. " तो गलेलठ्ठ युरोपियन म्हणाला, " तुम्हांला जर माझ्या सहाय्याची जरूर असेल तर मी मोठ्या आनंदानें द्यावयास तयार आहे. "

त्याच्या त्या आगंतुकी परोपकारवृत्तीचा मला संशय आला आणि मी मनांतल्या मनांत म्हणूं लागलों " हा गृहस्थ न बोलावतां आह्मांवर उपकार करण्यासाठीं पुढें येतो यांत याचा हेतु काय असावा ? यांत याचें कांहीं कपट असेल का ? कां याच्या मनोवृत्तीच नैसर्गिक दयाळूपणानें भरल्या आहेत ? बरें, हेलनची प्रकृति बिघडण्याची बातमी तरी याला कशी लागली ? हा देवळांत होतां ह्मणावें तर आम्हांला तेथें न भेटतां असा रस्त्यांत येऊन कां गाठतो ? "

याप्रमाणें माझ्या मनांत अनेक शंका आल्या. पण त्यांच्यासंबंधें अधिक विचार करण्याची ती वेळ नव्हती. कसें तरी करून एकदां हेलनला घरीं पोंहोंचते करावें या फिकिरींत आम्ही होतों. तथापि शिष्टाच

रास अनुसरून त्याच्या भाषणावर कांहीं तरी उत्तर द्यावें ह्मणून मीं त्याला म्हटलें " आपलें घर कुठें आहे ? "

" माझें घर जवळच आहे. " तो म्हणाला, " मी एका ऑफिसांत नोकर आहे. आपण आज्ञा देत असाल तर मी एक गाडी घेऊन येतों."

आपल्या या कळकळीबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोंत. " मीं त्याला म्हटलें " आमचें घर येथून जवळच आहे. गाडीची कांहीं विशेष आवश्यकता नाहीं. "

यानंतर तो गृहस्थ तेथून निघून गेला. पुढें रोजचें व माझें जें भाषण झालें त्यावरून तो तिच्या किंवा गार्डन साहेबांच्या कुटुंबांतील कोणाही माणसाच्या परिचयाचा नाहीं असें मला आढळून आलें !

खरा प्रकार असा असतांना आपण गार्डन साहेबांच्या परिचयाचे आहों असें या गृहस्थानें खोटेंच सांगितलें. त्यांत त्याचें काय धोरण असावें या विचारांत आतां माझें मन गढून जाऊन अनेक प्रकारच्या शंकांनीं माझ्या डोक्यांत गोंधळ उडवून दिला.

आम्ही गार्डन साहेबांच्या बंगल्यापाशीं येऊन पोंहोचलों त्या वेळीं बरोबर साडेदहा वाजले होते. बंगल्याच्या फाटकाजवळ जातांच माझी दृष्टि जवळच्या सडकेवर लागलेल्या कंदिलाकडे गेली. त्याबरोबर दोन युरोपियन गृहस्थ उभे राहून हळु हळु कांहीं बोलत असल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. मधून मधून ते आमच्याकडेहि इशारा करीत होते. यांपैकीं एकाला मीं ओळखलें. प्रार्थनामंदिरांत हेलेनकडे तीव्र दृष्टीनें जो गृहस्थ पहात होता तोच तो होय. त्याचा काळा चष्मा आणि काळ्या मिशा माझ्या पक्क्या ओळखीच्या होत्या. आतां माझ्या शंकातरंगांत सीमा राहिली नाहीं. माझें मन अतिशय अस्वस्थ झालें आणि मीं लागलेंच रोजला म्हटलें, " रोज, तूं हेलेनला घेऊन आतां जा. मला कांहीं जरूरीच्या कामाला जावयाचें आहे. मी इतक्यांत परत येतों. "

" छेः छेः " रोज ह्मणाली, " तुम्ही आतांच जाऊं नका. हिची प्रकृती कांहीं अजून ताळ्यावर आली नाहीं. आजची रात्र तुम्ही आमच्या येथेंच रहा. "

" भिऊं नकोस रोज. " मीं म्हटलें, " मी आतां दहा मिनिटांत परत येतों. "

एवढें बोलून ते दोघे युरोपियन बोलत उभे होते तिकडे मी निघालों. पण मला लांबूनच पाहून ते दुसरीकडे झटकले आणि प्रत्येकानें निरनिराळा मार्ग धरला.

मला त्या काळ्या मिशावाल्याला भेटावयाचें असल्यामुळें मीं त्याचाच पाठलाग सुरूं केला. पण मी मागून येतों आहें असें त्याला कळतांच तो फारच जलदीनें चालूं लागला. त्याच्या या वर्तनावरून तो मला भेटूं इच्छित नाहीं, हें माझ्या तात्काळ लक्षांत आलें. त्याबरोबर मी त्याचा पाठलाग करावयाचें सोडून रस्त्याच्या कडेला असलेल्या एका दुकानांत घुसलों. सुदैवानें या वेळीं त्याची नजर मजकडे नसल्यामुळें मी दुकानांत घुसलेलों त्याला दिसलों नाहीं. थोड्या वेळानें त्यानें मागें पाहिलें; पण मी त्याच्या मुळींच दृष्टोत्पत्तीस आलों नाहीं. मी कोठें गेलों असेन याचा विचार करीत तो कांहीं वेळ उभा राहिला आणि पुन्हां चालूं लागला. तो थोडासा पुढें गेल्यावर मी दुकानांतून बाहेर पडलों आणि तो कोठें जातो आहे, याचा तपास लावावा या हेतूनें मी त्याला न कळत हळु हळु त्याच्या मागें जाऊं लागलों. कांहीं वेळानें तो मुख्य रस्ता सोडून किल्ल्याच्या मैदानाकडे वळला आणि किल्ल्याच्या दाराशीं त्यानें सिटी वाजविली. ताबडतोब आंतून कोणीं किल्ल्याचा :दरवाजा उघडला आणि तो आंत घुसला. मी याच किल्ल्यांत राहणाऱ्या बंगाली रेजिमेंटचा सर्जन असल्यामुळें पलटणीचें कायदे मला चांगले ठाऊक होते. रात्रीं आकराच्यापुढें किल्ल्याचा दरवाजा उघडून बाहेरच्या माणसाला आंत घेणें प्रचलित कायद्याच्या विरुद्ध होतें. तसेंच कायद्यानें पलटणींतल्या कोणाही माणसाला इतक्या रात्रपर्यंत किल्ल्याच्या बाहेर रहातां येत नव्हतें. हा कायद्याविरुद्ध घडलेला गुन्हा आतांच्या आत्तां कमांडिंग ऑफिसर जनरलला जाऊन कळवावा असा विचार माझ्या मनांत आला पण इतक्या रात्रीं किल्ल्यांत प्रवेश होणें कांहीं सहज काम नव्हतें. ही गोष्ट ताबडतोब माझ्या लक्षांत येऊन मीं हें कार्य सकाळीं करण्याचें ठरविलें आणि त्याचक्षणीं तेथून निघून गार्डन साहेबांच्या घरीं येऊन दाखल झालों.

मी तेथें जाऊन पोंचल्याबरोबर गार्डनसाहेब माझ्या भेटीला आले. त्याचें मुख यावेळीं अत्यंत म्लान झालेलें दिसत होतें. मीं त्यांना थोडक्यांत हेलेनची हकीगत कळविली; पण इतर घटना मात्र कळवल्या नाहींत. यानंतर गार्डनसाहेब मला हेलेनकडे घेऊन गेले. ती एका पलंगावर पडली असून तिची बहीण आणि आई ह्या दोघीहि तिच्या जवळच बसलेल्या होत्या, मी तिची तपासणी करून पाहूं लागलों तों तिला ज्वर आलेला दिसला. तिला चहा पाजावयाचें सांगून मीं आपल्या घराकडे जावयास निघालों. रोज मला दारापर्यंत पोहोंचावयास आली. आणि सकाळीं पुन्हां येण्याविषयीं मला विनंति करून ती घरांत निघून गेली.

मी आपल्या घरीं जाऊन पोंहचलों त्या वेळीं रात्रीचे बारा वाजले होते. या वेळीं मी अतिशय गळून गेलों असून आतांपर्यंत घडलेल्या निरनिराळ्या अनेक घटनांनींहि माझें चित्त अत्यंत अस्वस्थ होऊन गेलें होतें. कांहीं थोडासा उपहार केल्यानंतर मी बिछान्यावर जाऊन पडलों, पण झोंप आली नाहीं. हेलनचें विषादपूर्ण मुख, त्या अपरिचित माणसाची भेट, रात्रीच्या वेळीं किल्ल्यांत बाहेरच्या माणसाचा प्रवेश इत्यादि गोष्टींनीं माझ्या डोक्याचा अगदीं गोंधळ उडून गेला होता. येथें हें सांगणें आवश्यक आहे, कीं, लहानपणापासूनच मला दीन, दरिद्री आणि दुःखी लोकांची अतिशय सहानुभूति वाटत असे. मी ज्या वेळीं डाक्तरची परिक्षा पास झालों आणि सरकारी नोकरी पतकरली त्या वेळींच गरिब लोकांपासून एक पैसाही घ्यावयाचा नाहीं अशी प्रतिज्ञा केली होती. माझी ही प्रतिज्ञा मीं आपल्या नोकरानांहि कळविली होती. कोणीही गरीब मनुष्य मजकडेस केव्हांही येवो त्याला मजकडे घेऊन येत जा, अशी माझ्या घरांतल्या एकंदर माणसांना सक्त ताकीद असे.

त्या रात्रीं एक वाजेपर्यंत मला झोंप आली नाहीं. ह्यानंतर मात्र माझा थोडासा डोळा लागला; पण इतक्यांत माझ्या खोलीच्या दारावर कोणीं ठोठावल्यामुळें, मी पुन्हां जागा झालों. दार ठोठावणारें माणूस दुसरें तिसरें कोणी नसून गार्डनसाहेबच होते. मीं त्यांना दार उघडून आंत घेतलें; पण त्याची ती वेड्यासारखी मूर्ती आणि कावरीबावरी मुद्रा

पाहतांच मी अतिशय घाबरून गेलों. मी त्यांना कांहीं प्रश्न विचारणार तोंच ते मला म्हणाले, " मिस्टर स्टिफन, माझ्या घरीं चला, मला तर वाटतें एव्हांना सगळें आटोपलें असेल. "

गार्डनसाहेबांचें तें भाषण ऐकून मी अगदीं स्तंभित झालों आणि त्या दिवशींच्या एकंदर घटना क्रमाक्रमानें माझ्या डोळ्यासमोर उभ्या राहूं लागल्या. हेलनची जी शोचनीय अवस्था झाली होती, त्यासंबंधींच कांहीं तरी कळविण्यासाठीं, गार्डनसाहेब मजकडे आले असावेत असें मला वाटून मी त्यांना बसण्यासाठीं खुर्ची पुढें केली आणि म्हटलें, " हेलनच्या बाबतींत विशेष फिकीर करण्याचें कांहीं कारण नाहीं. येतांना मी तिची प्रकृति पाहून आलों होतों. तरी पण थोडा वेळ थांबा, मी कपडे घालून तुमच्याबरोबर येतों. "

माझें भाषण संपतें न संपतें तोंच गार्डनसाहेब माझ्या पलंगावर पडले आणि लहान मुलाप्रमाणें स्फुंद स्फुंदून रडूं लागले. त्यांची ही स्थिती पाहून मी कांहीं वेळ कर्तव्यविमूढ बनलों आणि काय करावें तें मला निश्चित ठरवितां येईना.

या वेळीं माझ्या मनांत नाना प्रकारच्या शंका येऊं लागल्या. " हेलन मृत्यु तर पावली नसेल ? " मी आपल्या मनांतल्या मनांत म्हणूं लागलों कीं, " कां रोजवरच एकादें संकट आलें आहे ? " दुसरा प्रश्न माझ्या मनांत उभा रहातांच माझें हृदय विदीर्ण झालें. मला आतां स्थिर राहाणें अशक्य झालें. मीं चटकन गार्डनचा हात धरला आणि म्हटलें, " गार्डन-साहेब, खरा प्रकार काय आहे हें एकदां कळवा. तुमची ही स्थिति अवलोकन करून माझें काळीज अगदीं फाटून गेलें आहे. ईश्वर करो आणि तुमच्या तोंडून माझ्या कानांवर कांहीं वाईट बातमी न येवो ! तुम्ही इतके कां घाबरलांत तें मला कळवा. "

गार्डनः—ईश्वराची इच्छा पूर्ण झालीच पाहिजे. तींत अडथळा आण-ण्याचें सामर्थ्य कोणाचें अंगांत आहे ? तुम्ही मात्र आतां कांहीं विचार-ण्याच्या भानगडींत न पडतां इथून ताबडतोब चला. हाय ! माझ्या नाशिबांतच हेंच लिहिलें होतें काय ? स्वतःच्या डोळ्यांनीं असला भयंकर देखावा पाहण्यापेक्षां माझ्या डोक्यावर वीज कां पडली नाहीं ? "

एवढें बोलून गार्डनसाहेबांनीं माझा हात धरला आणि तावडतोब मला ते खालीं घेऊन गेले. आमच्या गडबडीनें एक नोकर जागा होऊन आमच्याकडे आला होता. त्याला मीं गाडी जुंपावयास सांगितली गाडीसाठीं आम्हांस फार वेळ उभें राहावें लागलें नाहीं. फाटकापाशीं जाऊन पोहोंचतों न पोहोंचतों तोंच तो गाडी घेऊन आला. आम्ही दोघेही तींत जाऊन बसलों आणि गार्डनसाहेबांच्या घराकडे गाडी नेण्याविषयीं मीं कोचमनास आज्ञा केली. गार्डनसाहेब सारखे स्फुंदत असल्यामुळें रस्त्यानें आम्हां उभयतांचें कांहीं बोलणें झालें नाहीं. ज्या वेळीं आम्ही गार्डनसाहेबांच्या बंगल्याजवळ जाऊन पोहोंचलों त्या वेळीं पाहाटेचे चार वाजले होते. फाटकापाशीं जातांच तेथें आठदहा पोलीस पहारा करीत असल्याचें मला दिसलें. आम्ही गाडींतून उतरून आंत जाऊं लागलों तों पोलिसांनीं आम्हांस मनाई केली. मीं या मनाईचें कारण त्यांना विचारलें तेव्हां त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, "आम्ही तुमच्या या प्रश्नाचें उत्तर देण्यास असमर्थ आहों. पोलिस इन्स्पेक्टरपासून तों कमिशनर साहेबापर्यंत सर्वांची आम्हांला अशीच सक्त ताकीद आहे." यावर "ही मंडळी कोठें आहे" हें मी विचारतांच "आंत आहे" ह्मणून त्यानें उत्तर दिलें. मीं आश्चर्यचकित होऊन गार्डनसाहेबांना याचें कारण विचारलें. तेव्हां ते म्हणाले, "मलाही कांहीं ठाऊक नाहीं." आज आमच्या येथें जो हृदयविदारक प्रकार घडला त्याची बातमी पोलीसला कळविणें आवश्यक असतांही मी त्यांच्याकडे न जातां तुमच्याकडे आलों. याचें कारण त्या वेळीं तुमच्या सहाय्याची जेवढी जरूरी होती तेवढी त्यांची नव्हती. कांहीं असो. ईश्वराच्या मर्जीप्रमाणें घडून आलें; आणि पुढेंही तसेंच होईल. पोलिस कमिशनराचा आणि माझा चांगला परिचय आहे, मी इतक्यांत त्याच्याकडे माझ्या नांवाची चिट्टी पाठवितों."

एवढें बोलून त्यांनीं मजजवळची शिस्पेनसील घेतली आणि एक चिठी लिहून ती आंत पोलिस कमिशनरकडे पाठविली. थोड्याच वेळांत तिघे साहेब फाटकापाशीं आले. गार्डनसाहेबांकडे दृष्टि जातांच त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, "आम्ही तुमचीच वाट पहात बसलों आहों. तुमची चिठी मिळाल्याबरोबर मी इन्स्पेक्टर आणि सुपरिन्टेन्डेन्ट या

दोघांना बरोबर घेऊन इकडे आलों. ठीक आहे. आतां लवकर आंत चला. तुह्माला पुष्कळ गोष्टी विचारावयाच्या आहेत. हेंच पोलिस कमिशनर होत."

त्यांचें भाषण ऐकून गार्डनसाहेब म्हणाले, "मीं तर तुम्हांस मुळींच चिट्ठी पाठविली नव्हती. हा जो प्रकार घडला तो अजून बाहेरच्या कोणाही माणसास कळला नाहीं. असें असून तुम्हाला या संबंधाची चिट्ठी आली होती म्हणतां तेव्हां आश्चर्य आहे."

गार्डनसाहेबांचें भाषण संपतें न संपतें तोंच पोलिस कमिशरनीं ती चिठी त्यांच्या हातांत दिली. ती वाचून पहातांच गार्डनसाहेब लटलटां कांपूं लागले. त्यांनीं खालीं पडूं नये ह्मणून मी त्यांना सावरून धरूं लागलों. मी हा सर्व प्रकार मुकाट्यानें पहात होतों. मला एकंदर गोष्टी स्वप्नतुल्य वाटूं लागल्या. आपण जागे आहों किंवा झोपेंत आहों हेंच मला प्रथम कळेना! काय भानगड आहे हेंहि मला अजूनपर्यंत कळलें नाहीं. थोड्या वेळानें मी गार्डनसाहेबाबरोबर आंत जाऊं लागलों. परंतु पोलिस कमिशरनीं मला मनाई केली. गार्डनसाहेब यावर कांहीं बोलणार होते; पण त्याच्यापूर्वींच मचि कमीशनरसाहेबांना म्हणालों, "महाशय, मी किल्ल्यांतल्या एकोणीस नंबरच्या पलटणीचा ब्रिगेड सर्जन आहें. तसेंच गार्डनसाहेबांची आणि माझी अत्यंत मैत्री आहे. यांची मुलगी अतिशय अजारी असल्यामुळें यांनींच मला येथें बोलावून आणलें. आपण कृपा करून लौकर आंत जाऊं या. नाहींतर तिच्या जिवास अपाय होण्याचा संभव आहे. योग्य वेळीं जर डाक्टरची मदत मिळाली नाहीं तर रोगी कायमचाच नाहींसा होतो हें आपण जाणूनच आहां."

पोलिस कमिशनरनी एक दीर्घ श्वास सोडून म्हटलें, "आपल्याला मीं ओळखलें नाहीं याबद्दल क्षमा करा. आम्हां पोलिसांना प्रसंगीं निष्ठुर बनावें लागतें त्यास इलाज नाहीं. आमचें कर्तव्यच तसें आहे. परिचय नसल्यामुळें आपल्याला मनाई केली होती. आतां आपण खुशाल आंत जा. आपण सरकारी नौकर आहां. तेव्हां आपल्यालाही साक्षीचें विशेष महत्त्व आहे. चला या आंत."

आंत गेल्याबराबरें तेथेंही कांहीं पोलिस मंडळी इकडे तिकडे फिरत

असल्याची मला दिसली. त्यांच्यांत जो प्रमुख होता, तो गार्डनसाहेबांच्या नौकरांच्या जबान्या घेण्यांत गढला होता. मी तिकडे जाऊं लागलों तोंच पोलिसकमिशनरनीं मला थांबविलें आणि म्हटलें, " आपण इकडे या. " नाइलाजानें मला त्यांच्या मागें जाणें भाग पडलें. थोडक्याच वेळांत आम्ही सर्व जण माडीवर जाऊन पोहोंचलों.

या सगळ्या भानगडी पाहून मी अगदीं ज्ञानशून्य झालों होतों. गार्डनसाहेबांची अवस्था तर फारच शोचनीय झाली होती. त्यांजकडे पोलिसकमिशनरची दृष्टी जाऊन ते त्यांना म्हणाले, "आतां असें घाबरून काय होणार आहे ? मिस्टर गार्डन ! जें व्हावयाचें तें झालें ! भवितव्य कोणाच्या हातीं आहे ? गार्डनसाहेबाच्या डोळ्यांस पाणी आलें आणि ते कंपित स्वरानें म्हणाले, " काय ? सगळे आटोपलें ? कांहीं कांहीं आशा राहिली नाहीं ? हेलन पुन्हां या अभागी पित्याला भेटणार नाहीं काय ? एवढें बोलून ते मूर्छित झाले ! "

हेलनचें नांव ऐकतांच विद्युत्संचार झाल्याप्रमाणें माझें सर्व शरीर कापूं लागलें. हृदयाचें धडधडणेंही बंद होण्याच्या बेतांत आलें. जिन्यावरून उड्या मारीत मारीतच मी हेलनच्या खोलींत जाऊन पोहोंचलों. इथेंही पोलिसाचा पहारा होताच. एखाद्या वेड्याप्रमाणें मी धांवत धांवत आंत घुसूं लागलों. तें पाहून त्यांनीं मला आंत जाण्याची मनाई केली. पण मी मनाईला न जुमानतां तसाच जबरदस्तीनें आंत घुसलों. आंत जातांच जो भयंकर देखावा मला दिसला त्याची मला अजून विस्मृति होत नाहीं आणि यांपुढेंहि त्याची विस्मृति होणें शक्य नाहीं. हेलनचा बिछाना रक्तानें थबथबलेला असून सर्व खोलीभर रक्त झालें होतें. हें भीषण दृश्य माझ्यानें पहावेना ! माझे हातपाय गार पडण्याची वेळ आली. मोठ्या धैर्यानें मीं हेलनच्या तोंडावरलें वस्त्र काढलें. पण त्या वेळीं मला जें कांहीं दिसलें त्याचें वर्णन करावयास माझी लेखणी अजूनही असमर्थ आहे. या गोष्टीला आज किती दिवस झाले ! पण तिचा ठसा माझ्या अंतःकरणावर अजून जशाचा तसा कायम आहे.

हेलनचें नरडें सुर्‍यानें कांपलें असून तो सुरा अजून तशाचा तसा तिथें कायम होता. तिचें तें मनोहर मुखमंडल निस्तेज झालें असून शरीर

थंड पडलें होतें. हिनें आत्महत्या केली असेल कां ? का खरोखर कोणीं मांगहृदयी माणसानें हिचा खून केला ? वगैरे प्रश्न माझ्या मनांत उभे राहिले. हाय ! ज्या निर्दयानें हें राक्षसी कृत्य केलें असेल त्याला ईश्वरी कठोर शासन प्राप्त झालेंच पाहिजे, " मी आपल्या मनांतल्या मनांत म्हणालों, " हें अघोर कृत्य करणाराचें हृदय दगडापेक्षांहि निष्ठुर असलें पाहिजे, असल्या नरपिशाचाच्या सहवासानें ईश्वराची ही प्रेमपूर्ण दृष्टि अत्यंत भेसूर बनून गेली आहे. "

हेलनच्या प्रेताजवळ बसून मी अश्रुमोचन करूं लागलों. तोंच पोलिस इन्स्पेक्टर आणि सुपरिंटेन्डेन्ट हे त्या ठिकाणीं येऊन पोहोंचले. थोड्या वेळानें कमिशनर आणि दोघे डॉक्टर तेथें आले.

ते दोघेही डॉक्टर हेलनची तपासणी करूं लागले. त्या कार्यांत मलाहि येण्याची त्यांनीं विनंति केली. पण मीं ती साफ नाकारून म्हटलें, "या मुलीवर माझें अतिशय प्रेम होतें. तिची ही दुर्दशा पाहून माझें हृदय फाटून गेलें आहे. या खुनाशीं संबंध असलेल्या कोणत्याहि कामांत पडण्याची माझी इच्छा नाहीं. "

दिवस उगवावयाची वेळ झाली होती. या घटनेचें रहस्य कसें बाहेर काढावें या विचारांत मी होतों इतक्यांत माझा चपराशी बरोबर दुसरा एक मनुष्य घेऊन तेथें आला आणि मला सलाम करून माझ्या हातांत त्यानें एक पत्र ठेवलें.

त्यानें बरोबर आणलेला माणूस जजसाहेबांचा नौकर होता आणि पत्रही त्यांच्याकडूनच आलें होतें. तें माझ्या हातांत ठेवीत असतांना नोकर म्हणाला, " जजसाहेबांनीं अगदीं लौकर आपणास बोलाविलें आहे. त्या मनुष्याबरोबर त्यांनीं गाडीहि पाठविली आहे. "

मीं पत्र फोडून पाहिलें त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होता.

रविवार सायंकाळ.

' प्रिय स्टिफन,

हेनरीनें विष प्राशन केलें आहे, तें काढावयाचीं यंत्रें घेऊन ताबडतोब यावें.

हॅमिल्टन "

पत्र वाचतांच मी मनांतल्या मनांत म्हणालों, " हाय ! एका कुटुंबावर कोसळलेली आकाशाची कुऱ्हाड पुरेशी न वाटून कीं काय, दैवानें या दुसऱ्या कुटुंबावरही तसाच घाला आणिला आहे ! अरेरे ! किती हें दुःखपूर्ण जग ! "

डॉक्टरांच्या पार्थिव कार्याखेरीज आणखी किती तरी कार्यें ईश्वरी सृष्टींत भरलीं आहेत. त्यांचा अनादर केल्यानें प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज कसें रहावें ? जाते वेळीं रोजला भेटून आणि तिच्या आईचा समाचार घेऊन जावें आणि तसेंच गार्डनसाहेबांचीहि जातां जातां भेट घ्यावी असा विचार मनांत आला. पण तसें करावयास धैर्य झालें नाहीं. तरी पण खालीं आल्यावर मी गार्डनसाहेबांच्या नोकराजवळ ते कोठें आहेत म्हणून चौकशी केली. जुळल्यास त्यांना भेटून जावें असें मला वाटलें पण दुर्दैवानें ह्मणा, अगर सुदैवानें, ह्मणा, ते घरांत नव्हते. त्यांना पोलिसकमिशनरांनीं आपल्या बंगल्यावर पाठविलें आहे. असें मला नोकरानें कळविलें.

फाटकाजवळ जज्जसाहेबांची गाडी उभी होती. मी तिच्यांत जाऊन बसतों न बसतों तोंच मॅजिस्ट्रेट हडसन तेथें येऊन दाखल झाले. त्यांच्याशीं माझा खूपच परिचय होता. त्यांनीं कृष्णवर्ण वेष परिधान केला असून त्यांची चर्याहि अगदीं मालिन दिसत होती. मजकडे त्यांची नजर जातांच त्यांनीं मला हेलनची हकीकत विचारली. त्याबरोबर मी ह्मणालों, " सगळें आटोपलें ! बिचारी हेलन इहलोकांतून चालती झाली. "

हडसन अतिशय दुःखी होऊन म्हणाले, " बिचारीला ईश्वराच्या घरीं निरंतर शांति लाभो ! आपण इतक्या लगबगीनें कोणीकडे चाललां आहां. "

" जज्जसाहेबावरही असाच एक प्रसंग भयंकर कोसळला आहे," मीं म्हटलें.

" काय झालें? " हडसन अतिशय घाबरून म्हणाले.

" त्यांच्या मुलानें विष खाल्लें ! काय होतें कोणास ठाऊक ! त्याचें

प्राण वांचविण्यासाठीं मी आपल्याकडून शक्य तितकी खटपट करून पहातों. ”

“ हडसन, केवढा हा घोर प्रसंग ! ठीक आहे ! तुम्ही निघा आतां. मी गार्डनसाहेबांना भेटतों. काल मला त्यांचें पत्र आलें होतें. ”

“ त्यांचें तुम्हांला काल पत्र आलें होतें ! ” मी आश्चर्यानें उद्गारलों, “ काल तर त्यांचा सगळा वेळ दुःखांतच गेला ! मग त्यांनीं तुह्मांला पत्र कोणत्या वेळीं पाठविलें ? आपल्या घरांत झालेली भानगड आपण अजूनपर्यंत कोणाला कळविली नाहीं असें इतक्यांत तेच पोलिसकमिशनरला सांगत होते. त्यांच्या नांवचें एक पत्र खुद्द पोलिसकमिशनरालाही गेलें होतें. पण तें आपलें नव्हे असें गार्डनसाहेबांचें ह्मणणें आहे. यावरून आपणाकडे आलेलें पत्र सुद्धां त्यांचें नसावें असें मला वाटतें.”

हडसन आश्चर्यचकित होऊन म्हणाले “काय म्हणता ? ही तर मग मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे ! बरें पण मी एकवेळ त्यांना भेटतोंच.”

मीं प्रथम आपल्या बंगल्याकडे गाडी नेण्याचें कोचमनास सांगितलें. तेथें गेल्यावर विष काढण्याचीं यंत्रें आणि औषधें वगैरे काय घ्यावयाचीं तीं घेऊन मी जज्जसाहेबांच्या बंगल्यावर गेलों. त्या ठिकाणीं माझ्या अगोदरच दोन बंगाली डॉक्टर येऊन बसले होते. त्यांच्याजवळ चौकशी केल्यावरून मला कळून आलें, कीं, त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केलें पण रोगी उठण्याचें कांहींच चिन्ह दिसत नाहीं. मी ताबडतोब रोग्याच्या खोलींत गेलों. तेथील देखावा हृदयविदारण करणारा होता. आपल्या प्रिय पुत्राचें मस्तक मांडीवर घेऊन जज्जसाहेब मोठमोठ्यानें रडत होते आणि त्यांच्या शेजारींच पुत्रशोक सहन न होऊन त्यांची पत्नी मूर्छित होऊन पडली होती. त्यांचीं बाकीचीं मुलेंहि त्यांच्याप्रमाणें तेथें जमून शोक करीत होतीं. मी आंत जातांच जज्जसाहेबांनीं मला आपल्याजवळ बोलावून घेतलें आणि अत्यंत करुणवाणीनें म्हटलें, “ स्टिफन, कसेंहि करून माझ्या ह्या मुलाला वांचीव. तुझ्या या मित्राचें जीवित आतां सर्वस्वीं तुझ्याच प्रयत्नावर आणि चातुर्यावर अवलंबून आहे. माझें सगळें सुख याच्यावर अवलंबून आहे. हेन्री जर उठला नाहीं तर मीं खरोखर आत्महत्या करीन. ”

"ईश्वरानें माझ्या हातांत जर एवढें सामर्थ्य दिलें असतें !" मीं ह्मटलें " तर हेन्रीलाच काय पण हेलनला देखील मीं उठवलें असतें ! पण ईश्वरानें ही अजब शक्ति आम्हां पामरांना न देतां आपल्या जवळच ठेवून घेतली आहे !"

माझ्या तोंडून हेलनचें नांव येतांच हेन्री डोळे उघडून आश्चर्यानें पाहूं लागला. त्याच्या चर्येवरून त्याला कांहीं तरी विचारावयाचें आहे असें दिसलें पण तसें करावयास त्याची जिव्हा समर्थ नसल्यामुळें त्याचा नाइलाज झाला आहे असें मला आढळून आलें.

हेलनचें नांव ऐकून जज्जसाहेबही मजकडे आश्चर्यानें पाहूं लागले आणि मला म्हणाले, " तिची काय हकीकत आहे मि. स्टिफन ? ती लौकरच बरी होईल अशी मला आशा आहे."

" हाय " एक दीर्घश्वास सोडून मीं म्हटलें, " ईश्वराची मर्जी तशी नव्हती तिला इलाज नाहीं. काल रात्रीं कोणी दुष्टानें तिचा खून केला, तिनें आत्महत्या केली असावी असें पोलिसचें ह्मणणें आहे; परंतु माझ्या मतानें खून झाला आहे."

माझें हें बोलणें संपतें न संपतें तोंच हेन्रीच्या तोंडून कांहीं शब्द बाहेर पडले, त्यानें हेलन हें नांव घेतलें तें दुसऱ्या कोणालाहि कळलें नाहीं. पण मीं तें ओळखलें. हेन्रीच्या तोंडचे हे अखेरचे शब्द होते. त्याच्या शरीरांतील प्राणवायु त्याच्या मागोमागच बाहेर पडला.

वृद्ध हॅमिल्टनसाहेब त्याला मिठी मारून एखाद्या मुलाप्रमाणें रडूं लागले. त्याच्या मुलामुलींच्या शोकाला तर पारावारच उरला नाहीं. मीं त्यांना समजूत घालविण्याचा प्रयत्न केला पण त्यामुळें त्यांचा शोक उलट अधिकच वाढूं लागला. हॅमिल्टन साहेबांची कानपूर शहरांत पहिल्या प्रतीच्या नागरीकांत गणना होत असे. त्यामुळें त्याच्या मुलाच्या मृत्युची बातमी शहरांत पसरतांच लोकांचे थवेच्या थवे त्यांच्या समाचाराकरितां येऊं लागले. आतां येथें आपल्याला राहण्याची कांहीं आवश्यकता नाहीं हें पाहून मी लवकरच घराकडे येण्यासाठीं तेथून बाहेर पडलों.

या वेळीं माझी चर्या अगदीं निस्तेज झाली होती. असला भयंकर

प्रकार माझ्या आयुष्यांत मला कधीं दिसला नाहीं. मला हें सगळें नवें होते. हेन्रीच्या तोंडू। हेलनचें नांव ऐकतांच माझा संशय अधिकच वृद्धिंगत झाला आणि पुष्कळ प्रयत्न करूनहि तो माझ्या मनांतून नाहींसा झाला नाहीं. या भानगडीच्या मुळाशीं कांहीं तरी भयंकर रहस्य असलें पाहिजे असें राहून राहून मला वाटूं लागलें. हे विचार माझ्या डोक्यांत घोळत असतांनाच मी जज्जसाहेबांच्या बंगल्याच्या फाटकापाशीं येऊन पोहोंचलों. मला घरीं नेऊन पोहोंचतें करावयास त्यांची गाडी तयारच होती. मी तिच्यांत जाऊन बसतों न बसतों तोंच एक युरोपियन मज-पुढें येऊन उभा राहिला आणि सलाम करून म्हणाला " आपण मला ओळखलें डॉक्टरसाहेब ?"

बराच वेळ डोकें खाजवून नंतर मला त्याची ओळख पटली. काल-रात्रीं देवळांतून घरीं परत येत असतांना आम्हाला अत्यंत उत्सुकतेनें सहाय्य करावयास जो गृहस्थ तयार झाला तो गृहस्थ हाच होय. मला त्या वेळीं त्याचा संशय आला होता. पण आज त्याची सौम्य आणि दयार्द्र मुद्रा पाहून माझा तो संशय पार नाहींसा झाला आणि त्याला म्हटलें " यद्यपि आपला माझा परिचय नाहीं तरी आजपासून आपण जें मजशीं सौजन्याचें वर्तन करीत आहां त्याबद्दल मी तुमची फार आभारी आहें."

" महाराज " तो म्हणाला " माझ्या हातून जर नकळत आपला प्रमाद झाला असेल तर त्याबद्दल आपण क्षमा करा. आपण एक अत्यंत थोर पुरुष आहां म्हणून आपल्याशीं परिचय करण्याची इच्छा झाली. विशेषतः गार्डनसाहेबाशीं माझा घनिष्ठ संबंध असल्यामुळें ही इच्छा अधिकच बळावली. रोजच्या सांगण्यावरून आपला गार्डनसाहेबाशीं मुळींच परिचय नसावा अशी माझी समजूत आहे. गार्डनसाहेबाशीं माझा परिचय आहे कीं नाहीं हें फक्त त्यांना किंवा मला माहीत आहे तिसऱ्या कोणालाहि माहीत नाहीं. तें कांहीं असो पण आज येथें रडारड कसली चालली आहे ? "

" जज्जसाहेबांच्या मुलानें विष खाऊन आत्महत्या केली, !"

" कोणीं हेन्रीनें. अरेरे ! त्याच्या हातून असें कसें झालें ? तो तर

अत्यंत धार्मिक वृत्तीचा होता ! " एवढें बोलून तो चालता झाला आणि त्याच्या मागोमाग मीही आपल्या घरीं आलों.

घरीं येऊन दाखल झाल्यावर कांहीं वेळानें मी गार्डनसाहेबाकडील हकीकत समजून घेण्यासाठीं माझा एक नौकर तिकडे पाठविला, तो थोडक्याच वेळांत परत आला आणि म्हणाला, " गार्डनसाहेबाची पत्नी आणि रोज या दोघींहि कमिशनरसाहेबांच्या बंगल्यावर आहेत. त्यांच्या घरीं पोलिस इन्स्पेक्टरशिवाय दुसरें कोणीहि माणूस नाहीं. हेलनचा अंत्यविधि आजच होणार आहे."

मी थोडासा उपहार करून झोंपलों. दोन वाजण्याच्या सुमारास हॅमिल्टनसाहेबांचा नोकर मजकडे त्यांची चिठ्ठी घेऊन आला. तींत मला येण्याविषयीं लिहिलें होतें. मी तावडतोब गाडी जुंपून त्यांच्या बंगल्यावर निघून गेलों. जातां जातां गार्डनसाहेबांच्या बंगल्याजवळ गाडी उभी करून तेथील थोडीबहुत हकीकत समजून घेतली.

मी जज्जसाहेबांच्या घरीं जाऊन पोहोंचलों त्या वेळीं चार वाजले होते. सर जॉर्ज हॅमिल्टन माझी वाट पहातच होते. मला पहातांच त्यांनीं प्रेमानें माझें स्वागत केले आणि आपल्या जवळ बसवून घेतलें. नंतर ते दुःखित स्वरानें म्हणाले " मिस्टर स्टिफन, गार्डनसाहेबांच्या कुटुंबांतील मंडळीशीं आपला अत्यंत स्नेह आहे असें मीं ऐकलें तें खरें काय ? "

" मीं होय म्हणून म्हटलें "

" मग कृपा करून " हॅमिल्टनसाहेब म्हणाले, " हेन्रीच्या मृत्यूची बातमी त्यांना आतांचे आतां जाऊन कळवा त्याबरोबर त्यांना असेंहि सांगा, कीं, हेलनच्या मृत्यूनें माझ्या हृदयावर मोठा जबर आघात बसला आहे. तुमच्या बरोबर मी कांहीं पत्रें देणार आहे तींहि तुम्ही त्यांच्या स्वाधीन करा. मात्र हीं पत्रें अगदीं काळजीपूर्वक तेथें कोणी नसतांना त्यांच्या जवळ द्या. "

एवढें बोलून त्यांनीं एक पत्राचें पुडकें माझ्या स्वाधीन केलें त्याबरोबर मी तें घेऊन तावडतोब बाहेर पडलों आणि गाडींत जाऊन बसलों. वाटेनें गाडीच्या हदरण्यानें पुडक्यांतील कांहीं पत्रें खालीं पडलीं

व तीं मी उचलून ठेवूं लागलों. इतक्यांत त्यांतलें एक पत्र उघडलें जाऊन त्यावर माझी दृष्टी गेली त्यांत पुढील मजकूर होताः—

" प्रिय हेन्री, तुम्हाला हें शेवटचें पत्र लिहीत असल्याप्रमाणेंच मला वाटत आहें. हा मजकूर वाचतांच माझें चित्त अतिशय व्याकूळ झालें."

हेलन.

मीं त्या पत्राची घडी करून पुनः पहिल्याप्रमाणें पुडक्यांत ठेविलें.

प्रकरण २ रें.

हा संन्यासी कोण ?

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

" माझें नांव रामपालसिंह. माझी जन्मभूमी लुधियाना शहर असून माझ्या पित्याचें नांव सरदार भगवानसिंह होतें. लुधियाना प्रांतात माझी बरीच मोठी जहागीर आहे. माझा पिता महात्मा रणजितसिंहाच्या आधिपत्याखालीं असलेल्या सैन्याच्या एका तुकडीवर मेजर होता. भगवानसिंहाचें नांव अजूनपर्यंत पंजाबांत प्रसिद्ध आहे. तो महाराज रणजितसिंहाचा म्हणजे केवळ उजवा हात असून अतिशय समरचतुर आणि कूटनीतिज्ञ होता. महाराज रणजितसिंहानीं त्याच्या याच गुणावर खूष होऊन त्याला आपल्या गुप्त हेराचें मुख्य पद आणि त्याबरोबरच बरीच मोठी जहागिरीही दिली होती. पंजाबांतील अट्टल चोर, बदमाश, दरोडेखोर, खुनी आणि राजद्रोही लोक ब्रिटिश लोकांच्या हातीं लागून त्यांना जबर शासन झालें हें केवळ माझ्या वडिलांच्या बुद्धिचातुर्याचें फळ होय. ईश्वरकृपेनें वडिलाचें हे सर्व गुण माझ्याही अंगांत उतरले होते. आणि तें ब्रिटिश सरकारच्या दृष्टोत्पत्तीस येऊन मलाही वडिलासारखीच या राज्यांत गुप्तपोलिसाची जागा मिळाली होती. महाराज रणजितसिंहाच्या मृत्युनंतर महाराज खड्गसिंहाचें वर्तन मला न आवडून मीं त्याच्या कामाचा राजिनामा दिला होता. त्याच्या अगोदर मी कि-

त्येक महिने त्याच्या सैन्यांत नोकर होतों. पंजाब दरबारचें काम सुट-ल्यावर मला ब्रिटिश राज्यांत नोकरी मिळाली. परंतु माझें मन संतुष्ट झालें नाहीं. कारण, पंजाबी लोकांसारखें स्वदेशावर प्रेम करणारे दुसरे कोणीही लोक नसतील याचे प्रत्यंतर शीख लोकांबरोबर इंग्रज लोकांचें युद्ध झालें त्यांत सर्वांना पहावयास मिळालें. हे लोक जेव्हां स्वातंत्र्या-साठीं रणक्षेत्रांत उतरले त्या वेळीं आपल्या राजाच्या विरुद्ध कोणतीहि गोष्ट करावयाची नाहीं अशी प्रत्येक शिखानें प्रतिज्ञा केली होती.

त्या वेळचे पंजाबचे गव्हर्नर-जनरल लॉर्ड हार्डिंज यांचें मजवर अतिशय प्रेम होतें. माझ्या अंगच्या गुणाचें ते फारच कौतुक करीत. शीखयुद्धांत मी ब्रिटिश सरकारला पुष्कळ मदत केली होती. यासंबंधानें थोडक्यांत एवढें सांगणें पुरें आहे, कीं, या भारतीय वाटर्लूच्या समरांत जर माझें सहाय्य ब्रिटिश लोकांना मिळालें नसतें तर त्यांना या देशाला कायमचा रामराम ठोकावा लागला असतां यांत बिलकूल शंका नाहीं. माझ्यामुळें पंजाबांतील आपली सत्ता बद्धमूल झाली हें पाहून बिटीश सरकारनें मला एक प्रशंसापत्रक पाठवलें होतें. व मला कळविण्यास मोठा आनंदहि वाटतो कीं—खुद्द महाराणी व्हिक्टोरिया यांनींहि आपल्या हातचें एक पत्र मला पाठवलें होतें. हें पत्र म्हणजे मी आपलें वैभव-सर्वस्व समजतों इतकेंच नव्हे तर माझ्या घराण्यांत वंशपरंपरेनें तें तसेंच समजलें जाईल अशी मला आशा आहे.

या विख्यांत शिखायुद्धानंतर मी पेनशन घेऊन स्वस्थ बसलों होतों पण मनुष्याच्या भाग्यांत निश्चित सुख लिहिलेंच नसावेंसें दिसतें. कारण सन १८५७ सालच्या नवंबर महिन्याच्या २५ तारखेस लॉर्ड क्यानिंगसाहेबांचें मला एक पत्र आलें त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होता—

" पत्र पाहतांच मला कलकत्त्यास येऊन भेटावें. तुमच्या साहाय्या-शिवाय आह्मांला कांहींच करतां येत नाहीं. "

पत्रावरून मला कांहींच अनुमान करतां येईना. मी मनांतल्या मनांत म्हणालों. पंजाब तर या वेळीं मृतप्राय झाला आहे. भारतीय हिंदुस्थानांतही अन्यत्र कांहीं चैतन्य राहिलें नाहीं. अशा वेळीं इंग्रजांच्या विरुद्ध कोण शस्त्र उपसणार ? नाहीं म्हणायला हिंदुस्तानच्या बाहेरच्या

शक्तीपैकीं रशियाचें या देशाकडे लक्ष्य वेधलें असून तो हळूहळू इकडे पाऊल टाकीत आहे. मग काय क्यानिंगसाहेब मला रशियांत पाठवणार? का एकदोन ठिकाणीं शिपायांचें बंड होण्याची जी बातमी पसरली आहे त्याचें दमन करण्यासाठीं ?

कांहीं असो. त्यांना माझी आवश्यकता वाटली ! व मीं पत्राप्रमाणें ताबडतोब कलकत्त्यास जावयाचें ठरवलें आणि त्याप्रमाणें घरच्या मंडळीस सूचनाही दिली. त्यांनीं विनाकारण काळजींत पडूं नये ह्मणून कोणत्या कारणाकरितां मला येथें जावें लागत आहे, याबद्दल मीं त्यांना कांहींच थांग लागूं दिला नाहीं. त्याच दिवशीं संध्याकाळीं एक हुशार माणसाला बरोबर घेऊन मी कलकत्त्याला रवाना झालों. त्या वेळेस आत्तांच्या सारखी आगगाडी नव्हती. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें असल्यास बैलगाडींतून किंवा घोड्यावरून जावें लागे. याप्रमाणें त्या वेळीं प्रवास करणें अत्यंत त्रासाचें काम होतें; पण क्यानिंगसाहेबांची मजवर कृपादृष्टि असल्यामुळें मला वाटेंत कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाहीं. कारण माझा उत्तम प्रकारचा बंदोबस्त ठेवण्याविषयीं त्यांनीं स्थानिक अधिकाऱ्यांना अगदीं सक्तीचे हुकुम पाठवले होते. या हुकूमाबरहुकूम प्रत्येक ठिकाणच्या अंमलदारानें माझी चांगली व्यवस्था ठेवली.

सहा दिवसांनीं मी दिल्लीस जाऊन पोहोंचलों. तेथल्या मुख्य इंग्रज अधिकाऱ्याची भेट झाल्यावर त्यानें मला क्यानिंगसाहेबांचें दुसरें एक पत्र दिलें. तें येणेंप्रमाणें होतें:—

“ प्रिय रामपाल ! कलकत्त्याला यावयाला तुम्हांला: बरेच दिवस लागणार असल्यामुळें कदाचित् आमच्या कामाची हानी होण्याचा संभव आहे. यासाठीं तुम्ही इकडे न येतां परभारेंच कानपूरला जाऊन तेथचे कमांडिंग जनरल ‘ हे ’ साहेबांना भेटावें. ते माझे प्रतिनिधी असून त्यांना मीं पत्रानें माझा सर्व अभिप्राय कळविला आहे. ते तुम्हाला सर्व कांहीं समजावून सांगतील. पंजाबच्या मागल्या युद्धांत जशी तुम्हीं आपली बुद्धिमत्ता, दूरदर्शीत्व आणि साहसीपणा वगैरे गुणांचा आम्हांला उपयोग करून संकटमुक्त केलें तसेंच या प्रसंगींही कराल अशी मला आशा

आहे. हें केवळ माझेंच म्हणणें नसून इंग्लंडची मंत्रीसभाही माझ्याद्वारें तुम्हांला हाच निरोप पाठवीत आहे. ” तुमचा शुभचिंतक

गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया क्यानिंग.

हें पत्र पाहतांच मी कानपूरला रवाना झालों. वाटेंत जेवणाच्या आणि झोंपेच्या बाबतींत बराच त्रास झाला; पण मीं त्याची बिलकूल पर्वा केली नाहीं. एखादें महत्त्वाचें काम हातीं घेतलें म्हणजे असल्या गोष्टीकडे मुळींच लक्ष्य द्यावयाचें नाहीं हा माझा स्वभाव आहे.

कानपूरला पोंचण्यापूर्वी वाटेंत एक चमत्कारिक घटना घडून आली. या घटनेचा पुढील कथानकाशीं जरा विशेष संबंध असल्यामुळें ती येथें नमूद करणें अवश्य आहे. एके दिवशीं सकाळीं मी गंगेवर स्नान करून पूजन करीत घाटावर बसलों होतों. माझ्या बरोबरचा माणूस जरा पलिकडल्या बाजूला विश्रांती घेत पडला होता. मी बसलों होतों, त्या घाटावर माझ्या निकटच एक संन्यासीही जप करीत बसला होता. त्याच्या डोक्यावर जटा, अंगावर भस्म आणि कपाळावर रक्तचंदनाचा त्रिपुंड्र शोभत होता. त्याच्याबद्दल कोणत्याही प्रकारचा विचार मनांत न आणतां मी आपल्या पूजनांत निमग्न झालों होतों.

पूजा संपल्यानंतर मी तेथून जाऊं लागलों. त्या वेळीं त्या संन्याशानें मला आपल्याजवळ बोलावलें. मीं मुकाट्यानें त्याच्याजवळ जाऊन त्याला प्रणाम केला. त्यानें मला आशीर्वाद देऊन मोठ्या प्रेमळपणानें विचारलें, “ बेटा! कुठें जाणार आहेस ? ”

“ कानपूरला ” मीं उत्तर दिलें.

यावर मस्तकावरील जटा थोड्याशा मागें सारून आणि मजकडे तीव्र दृष्टीनें पाहून संन्यासी मला म्हणाला, “ कां ? कशाकरतां कानपूरला जात आहेस ? ”

मी:—(कोणत्याही प्रकारची शंका न घेतां!) ब्रिटिश सरकारला सहाय करण्यासाठीं.

या वेळींही तो पुन्हां पहिल्याप्रमाणेंच मर्मभेदी दृष्टीनें मजकडे पाहूं लागला. त्याची ही दृष्टि माझ्या मर्मस्थानापर्यंत जाऊन पोंचली असावी असें मला वाटलें. आतां माझ्या पोटांत थोडासा संशय उत्पन्न झाला

आणि बिघडलेली गोष्ट पुन्हां सावरून घेण्याच्या उद्देशानें मीं त्यास म्हटलें, " आपल्याला न कळवण्याइतकीं कांहीं ती गोष्ट महत्त्वाची नाहीं."

संन्याशीः—कांहीं हरकत नसेल तर सांग.

मीः---तेथच्या ब्रिटिश सेनेला तुटवडा पडला आहे तो पुरवण्यासाठीं मी जात आहें. मी एक पश्चिमेकडचा व्यापारी आहें.

आमच्या व्यवसायांत खरें बोलणें घातक होत असल्यामुळें मला अशी थाप मारणें भाग पडलें. आह्माला आमचे उद्देश नेहमीं छपूनच ठेवावे लागतात.

संन्याशाच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं मीं खरी गोष्ट छपविली पण त्याच्या उत्तरावरून तो न फसतां मीच फसलों गेलों हें मला ताबडतोब कळून आलें.

संन्याशीः—तुम्ही खोटें बोलत आहां असें मला वाटतें. मला कानपूर सोडून आज केवळ तीनचारच दिवस झाले आहेत. तेथच्या इंग्रज सेनेची एकंदर व्यवस्था मला पूर्णपणें माहीत आहे. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें तिला रसदीचा तुटवडा पडला नाहीं. तुम्ही खरी गोष्ट छपवून मला कांहीं तरी खोटेंच सांगत आहां. कांहींही असो. मी संन्याशी आहे मला असल्या गोष्टींच्या उठाठेवी करून काय करावयाचें आहे ! तुम्ही खुशाल आपल्या मार्गानें जा.

हा संन्याशी म्हणजे कांहीं सामान्य पुरुष नव्हे हें माझ्या लक्षांत यायला फारसा उशीर लागला नाहीं. इंग्रज सेनेच्या व्यवस्थेपर्यंत याला सगळ्या भानगडी ठाऊक आहेत· तेव्हां हा असातसा नव्हे. माझ्या हृदयांतलें मर्म त्यानें केव्हांच काढून घेतलें. थोडा वेळ विचारांत घालवल्यानंतर मीं त्याला म्हटलें, " आपल्याला एकदोन गोष्टी विचारावयाची इच्छा आहे. आपली परवानगी असेल तर विचारतों. "

संन्याशीः—खुशाल पुसा. मी तुमच्यासारखा खोटें बोलणार नाहीं, किंवा खोटें लपविणारहि नाहीं.

मीः—आपल्याला संन्यासी होऊन किती दिवस झाले ?

संन्यासीः—फारच थोडे दिवस झाले. खरें म्हटलें तर मी संसारी

आहे. एका महाकार्यासाठीं मीं हा संन्याशाचा वेष घेतला आहे. तें संपल्यावर मी पुन्हां गृहस्थ बनणार.

मीः—आपलें राहण्याचें गांव कोणतें ?

संन्यासीः—विठूर.

मीः—इकडे कोणीकडून आलांत ?

संन्यासीः—कानपुराहून आलों म्हणून मघांच सांगितलें होतें.

मीः—बरें आपण संन्यासी असून आपल्याला सैन्याच्या हकीकती कशा ठाऊक ? विशेषतः आजच्या स्थितींत अशा गोष्टी आपल्यासारख्या संन्याशाला माहीत असणें ही गोष्ट सरकारच्या मनांत संशय उत्पन्न करणारी आहे.

पण माझें हें भाषण पूर्ण झालें नाहीं तोंच संन्यासी अस्वस्थ चित्तानें उठून उभा राहिला आणि एक वेळ मला आपादमस्तक न्याहाळून म्हणाला, " तूं कोणी सामान्य पुरुष नसावा हें स्पष्ट दिसतें. जी गोष्ट आजपर्यंत इंग्रज अधिकाऱ्याच्या लक्षांत आली नाहीं, ती तुला कळली यावरून निःसंशय तूं कोणी तरी गुप्तपोलीस असला पाहिजेस. असो. तुला कांहींहि वाटो. पण एक गोष्ट मी तुला कळवितों ती नीट लक्षांत ठेव. इंग्रजाच्या विरुद्ध कारस्थानें करणें, हा प्रस्तुतच्या हिंदु लोकांचा स्वाभाविक धर्म आहे. अशा स्थितींत तूं त्यांच्या प्रतिपक्षाला—इंग्रजाला साहाय्य करून नरकगामी होऊं नकोस ! "

एवढें बोलून संन्यासी तेथून निघून गेला. त्याच्या त्या वीरश्रीपूर्ण शब्दांनीं माझ्या हृदयाचा ठाव घेतला होता. आणि त्याची ती तेजस्वी मुद्रा माझ्या दृष्टीपुढून हलेना. थोड्या वेळानें मीं भानावर येऊन त्याला मनांतल्यामनांत प्रणाम केला आणि लागलीच आपल्या सोबत्याकडे परतलों.

या वेळीं हा संन्यासी कोण असावा हा प्रश्न माझ्या मनांत उभा राहिला. तो कोणी असाधारण पुरुष असला पाहिजे हें त्याच्या भाषणावरून स्पष्ट झालें होतें. ही घटना जेथें घडून आली. तो अश्वमेघघाट आग्र्यापासून पन्नास मैल दूर होता. तेथून कानपुरला पोहोंचायला मला

सहा दिवस लागले. यानंतर पुढें रस्त्यांत कोठें कांहीं भानगड उपस्थित झाली नाहीं.

कानपूरला पोंचल्याबरोबर मीं साहेबी वेष परिधान केला. गुप्त पोलिसाच्या धंद्यांत अनेक प्रकारचे वेष घेण्याची आवश्यकता असते. कधीं भिकाऱ्याचा वेष घेऊन दारोदार झोळी घेऊन फिरावें लागतें, तर कधीं राजासारखा उत्तम वस्त्रभूषणांनीं स्वतःचा देह नटवावा लागतो. कधीं कधीं तर वेड्यासारख्या अंगावर फाटक्या चिंध्या परिधान करून फिरावें लागतें. तशी आवश्यकता असल्यामुळेंच मीं साहेबी वेष धारण केला आणि त्याच्या जोरावर अनेक महत्त्वाच्या कामगिऱ्याहि बजावल्या. युरोपियन पोषाखाबरोबर मीं आपल्या डोकीवर युरोपियन तऱ्हेचे केंसहि ठेवले होते. तसेंच कोणाला ओळख पटूं नये म्हणून तोंडावर कृत्रिम दाढी—मिशांचें जंगल राखले होते. याप्रमाणें स्वतःच्या रूपांत शक्य तितका बदल करून मीं आपल्या कामाला आरंभ केला. अशा प्रसंगीं इंग्रजलोकांना देखील मला ओळखण्याची प्राज्ञा नसे. इंग्रजी भाषा बोलण्यांतहि मी अगदीं पटाईत असे. माझें इंग्रजी उच्चार खास इंग्लंडहून आलेल्या इंग्रजलोकांच्या उच्चाराप्रमाणें असत. चारी मुलखांत माझी एवढी कीर्ति झाली आहे त्याला कारण हेंच. माझ्या ठिकाणीं जर हे गुण नसते तर मी इतक्या प्रसिद्धीस येतों कीं नाहीं, याची शंकाच आहे.

इंग्रजीप्रमाणेंच फ्रेंच, अरबी, फारसी आणि मराठी वगैरे भाषाही मला उत्कृष्ट प्रकारें बोलता येत होत्या. महाराज रणजितसिंहाच्या सैन्यांत बरेच फ्रेंच लोक नोकर होते त्यांपैकीं मनासिल आणि बेंचर हे दोघे अधिकारी विलक्षण रणनीतिज्ञ आणि अनेकभाषाकोविद होते. या दोघांशींहि माझा लहानपणापासून अत्यंत परिचय असल्यामुळें, मी इंग्रजी आणि फ्रेंच भाषेंत इतका प्रवीण झालों.

कानपुरास स्वतःचे वेषांतर केल्यावर मीं आपल्या साथीदाराचा वेषही पालटला. त्याच्या तोंडावर भली लांबलचक दाढी ठेवून मीं त्याला मुसलमान बनवलें. जनरल हे साहेबांना मी याच वेषानें भेटलों. गांवांत शिरण्यापूर्वीं मी अगोदर किल्ल्यांत शिरलों; आणि त्याच्या दारांत उभें राहून हे साहेबाकडे आपल्या नांवाचें कार्ड पाठवून दिलें. माझें कार्ड

पोंहोचतांच हे साहेब बाहेर आले आणि मला आंत घेऊन गेले. तेथें गेल्यावर त्यांनीं लार्ड क्यानिंगचें पत्र माझ्या हातांत दिलें. त्यांत पुढील मजकूर लिहिला होता.

" सरदार रामपालसिंह यास पश्चिमेकडील प्रदेशाचे गुप्त पोलीसचें कमिशनर नेमिलें आहे, यद्यपि सरकारनें त्यांना पेनशनींत काढले आहे तरी सध्यांच्या आणिबाणीच्या प्रसंगीं त्यांचा अतिशय उपयोग होईल असें वाटल्यावरून त्यांना ही कामगिरी स्वीकारण्याची पुन्हां विनंति केली आहे. कानपुरच्या राजद्रोही आणि बंडखोर लोकांवर नजर ठेवण्याविषयीं त्यांना सुचवावें. विठूरचे नानासाहेब आमच्या विरुद्ध शस्त्र उपसतील असा संभव दिसतो. ह्यासाठीं त्यांच्या हालचालीवर लक्ष असूं देण्याविषयीं रामपालसिंहाला कळविणें. यापुढें काय करावयाचें तें मी वेळोवेळीं कळवीत जाईनच." पत्रांत विठूरचें नांव वाचतांच मी दचकलों. मला भेटलेल्या संन्याशाचें गांव विठूरच होतें. या गोष्टीचें मला त्या वेळीं स्मरण झालें. आणि मी आपल्या मनांत ह्मणालों, " हा संन्यासी तर नानासाहेब नसेल ना ?"

प्रकरण ३ वें.

गार्डन आणि मॅकेअर

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

" कांहीं वेळानें मी जनरल हे साहेबांचा निरोप घेऊन अधिकाऱ्यांनीं मला रहाण्यासाठीं जें घर घेतलें होतें त्या ठिकाणीं जाऊन पोंहोचलों. भोजन वगैरे संपल्यावर थोडीशी विश्रांति घेतली. नंतर संध्याकाळच्या किंचित् अगोदरच मीं साहेबी वेषानें कानपूर शहर पहाण्यास निघालों. या प्रसंगीं मीं कोणालाहि आपल्या बरोबर घेतलें नव्हतें.

मी शहरांत जाऊन पोंहोचलों त्या वेळीं संध्याकाळ झाली होती. मी इकडे तिकडे न पहातां मनांत विचार करीत सरळ चाललों होतों.

इतक्यांत दोघे साहेब बोलत बोलत मजजवळून अगदींच जोरानें गेल्याचें दिसलें. त्यांना पहातांच मी दचकलों. बाहेर पडून बराच वेळ झाला असल्यामुळें परत घराकडे जावें असें या वेळीं माझ्या मनांत आलें. पण गुप्त पोलिसाचें मन नेहमीं संशयपूर्ण असतें. त्या दोघां साहेबांना पाहून मला संशय आला आणि म्हणून घराकडे जाण्याचा बेत रहित करून ते काय बोलतात तें समजून घेण्यासाठीं त्यांच्या मागें गेलों. कांहींसें दूर गेल्यावर ते एका बागेंत घुसले. मीहि त्यांच्या पाठोपाठ बागेंत गेलों. बागेंतल्या अगदीं एकांत ठिकाणीं जाऊन ते उभयतां बोलूं लागले. त्यांचा संवाद त्यांच्या दृष्टोत्पत्तीला न येतां ऐकण्याची सोय मी शोधूं लागलों आणि सुदैवानें ताबडतोब ती माझ्या दृष्टोत्पत्तीलाहि आली. कारण त्यांच्या पाठीमागें वृक्षांचा एक कुंज बनला होता त्यांत जाऊन मी बसलों. याशिवाय माझ्या अंगांत असलेले कपडेहि काळे होते. ह्या कारणानें मी त्यांना दिसलों नाहीं.

मीं तेथें जाऊन पोंचण्यापूर्वीं त्या उभयतांचें काय भाषण झालें तें मला कळलें नाहीं. मला जो त्यांचा संवाद ऐकावयाला आला तो पुढीलप्रमाणें होता.

" गार्डन, " त्या दोघांपैकीं एकजण म्हणाला, " या फालतु गोष्टी नकोत, मला त्या ऐकावयाची गरज नाहीं. माझें ह्मणणें तुला कबूल आहे कीं नाहीं ? हें अगोदर मला सांग. कबूल असेल तर ठीक आहे. मग कांहीं तुझें पारिसचें रहस्य माझ्याकडून बाहेर फुटणार नाहीं; पण जर कां तूं तें कबूल करणार नसशील तर मी मात्र सेंट मेरीची शपथ घेऊन सांगतों कीं:—तुझें तें सर्व रहस्य मी ब्रिटिश सरकारच्या कानावर घालीन. मग पुढें त्याचा काय परिणाम होईल तो तूंच पहा. ब्रिटिश सरकार त्या गोष्टीचा विचार करण्यासाठीं तुला फ्रेंच सरकारच्या हवालीं केल्याखेरीज राहणार नाहीं आणि एकदां तूं त्यांच्या स्वाधीन झालास म्हणजे मृत्यूच्या स्वाधिन झालास म्हणून समज. "

यानंतर कांहीं वेळपर्यंत दोघेही स्तब्ध होते. सुमारें पंधरा मिनिटें झाल्यावर तो दुसरा मनुष्य—गार्डन—म्हणाला, " मॅकेअर, हेलेन मला प्राणाहूनही प्रिय आहे. तिच्या इतकी मला जगांत दुसरी कोणतीच वस्तु

प्रिय नाहीं. तुझ्यासारख्या भयंकर माणसाच्या स्वाधीन मी तिला केव्हांही करणार नाहीं. तुझ्या मनाला येईल तसें कर व तिच्याकरितां मी आपला प्राण देखील समर्पण करावयास तयार आहे. आणखी तूं माझें रहस्य ब्रिटिशसरकारला कळवल्यावर मीहि तुझें कळवायला मागें पुढें पाहावयाचा नाहीं. "

मॅकेअरः—तुझ्या असल्या डरावणीनें डरणारा गृहस्थ मी नव्हे. फ्रेंच गुप्त पोलिसासारख्या जगांतल्या अत्यंत चतुर गुप्तपोलिसांच्या हातावर ज्यानें तुरी दिल्या आणि ज्यांना अजूनपर्यंत स्वतःचा पत्ता लागूं दिला नाहीं त्याला इंग्रज लोकांच्या डोळ्यांत धुळ फेंकावयाला कितीसा उशीर लागणार ? तूं माझें रहस्य प्रकट केलें तरी माझी काडीइतकीहि नुकसान व्हावयाची नाहीं.

यानंतर ते दोघे पुन्हां कांहीं वेळ स्तब्ध राहिले. याच सुमारास त्यांचीं तोंडें पाहण्यासाठीं मी जरा उंच झालों. तो माझा पाय वाळलेल्या पानांवर पडून त्याचा खसखस असा ध्वनी निघाला, त्यासरसा मॅकेअर एकदम उठून उभा राहिला आणि गार्डनला म्हणाला, " मला पकडून नेण्यासाठीं तूं पोलिस आणलेस वाटतें ? खरें सांग, नाहींतर या पिस्तुलानें तुझा मेंदू बाहेर काढतों. "

एवढे बोलून त्यानें खरोखर गार्डनच्या मस्तकावर पिस्तुल धरला. " आपण शस्त्र न घेतां याचा पाठलाग केला ही मोठी चूक झाली हें आतां माझ्या लक्षांत आलें. मॅकेअर जर इकडे येऊन पाहील तर एका गोळींतच माझें काम काढील. मग इंग्रजसरकारची कामगिरीही आटोपली आणि सगळेंच आटोपलें ! " इत्यादि विचार या प्रसंगीं माझ्या मनांत घोळूं लागले आणि त्यामुळें मी अतिशय घाबरून गेलों; पण गार्डननें त्यांची ताबडतोब खात्री केली. तो त्याला म्हणाला, " तूं वेडा झालास कीं, काय मॅकेअर ? तुला पकडून देण्यांत स्वतः माझ्यावरही तोच प्रसंग नाहीं का गुजरणार ? तुला पकडून देण्यांत मला फायदा काय ? "

मॅकेअरः—ठीक आहे. तूं इथेंच बैस खरा प्रकार काय आहे तो मी पहातों.

एवढें बोलून मी बसलों होतों, त्या स्थानाकडे तो यावयास निघाला. मी जिवाची आशा सोडून हळूच जमिनीवर पडलों. त्या ठिकाणीं हात हात दीडदीड हात गवत उगवलें असल्यामुळें मी भुईसरसा होतांच त्यांत झांकून गेलों. माझ्या कृष्णवर्ण वेषानेंही मला या वेळीं एक प्रकारें सहायच केलें. मॅकेअर कुंजाजवळ आला आणि बराच वेळ न्याहाळीत राहिला; पण मी त्याला दिसलों नाहीं. त्याची पूर्णपणें खात्री पटल्यावर तो आपल्या जागेवर निघून गेला. तो जातांच मी ईश्वराचे आभार मानीत मानीत पुन्हां उठून बसलों. अशा प्रकारच्या धोक्याची मला संवयच झाली असल्यामुळें माझ्या मनावर या गोष्टीचा कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं. मी प्रसंग पडेल त्याप्रमाणें अशा प्रसंगीं वागत होतों. त्या मरणसंकटाची मला तावडतोब विस्मृति झाली आणि मी पुन्हां मोठ्या उत्कंठेनें त्यांचीं भाषणें ऐकूं लागलों. इतकेंच नव्हे तर तीं चांगलीं ऐकावयाचींत म्हणून पुन्हां उभा राहिलों व त्याचें भाषण पुनः ऐकूं लागलों.

गार्डनः--हें पहा मॅकेअर, हें आपलें भांडण मिटविण्याची मीं एक तोड काढली आहे.

मॅकेअरः—काय ?

गार्डनः--मी तुला कांहीं रुपये देतों ते घेऊन तूं निघून जा. आपणा उभयतांच्या अशा भेटी होणें बरें नाहीं. हा प्रकार मला अगदीं नापसंत आहे.

मॅकेअरः—मला रुपयांची बिलकुल गरज नाहीं. मागल्या सगळ्या गोष्टी विसरून आपलें उरलेलें आयुष्य गृहस्थाश्रमाच्या सुखांत घालवावें हीच माझी इच्छा आहे. फ्रान्स सोडून ब्रिटिश सरकारच्या आश्रया-खालीं मी येऊन राहिलों याचें कारण हेंच.

गार्डनः—पण तूं जो निश्चय केला आहेस त्याला तर पैशाची फारच आवश्यकता आहे. तूं नीट विचार करून पहा. शिवाय तूं दुसरें कांहीं मागितलें तरी तुला तें द्यावयाला मी तयार आहें; पण हेलनचें मात्र नखसुद्धां तुझ्या दृष्टीस पडूं द्यावयाचें नाहीं अशी माझी प्रतिज्ञा आहे.

मॅकेअरः—तुझें हें स्पष्ट उत्तर ऐकून मला अगदीं संतोष वाटला. पण मी फ्रान्सचा सुप्रसिद्ध रॉबर्ट मॅकेअर आहे हें मात्र लक्ष्यांत ठेव. ”

एवढें बोलून तो संतापानें उठला त्याची त्या वेळची मुद्रा अवलोकन करून गार्डन अगदीं भयाभीत झाला आणि विनीत स्वरानें त्याला पुनः म्हणाला, ‘ मॅकेअर, मी साठ हजार रुपये तुला देतों. हे घे मुकाट्यानें एवढ्या मोठ्या रकमेवर लाथ मारूं नकोस. शांतपणानें या गोष्टीचा विचार कर.

मॅकेअरः—ज्या वेळीं मीं तुला ही रकम मागितली होती त्या वेळीं जर तूं मला दिली असतीस तर तुझे माझ्यावर अतिशय उपकार झाले असते. कारण तात्या टोपे आज आठ दिवसांपूर्वींच कानपूर सोडून गेला. त्याला माझा सल्ला पसंत पडला आणखी कांहीं दिवसांनीं तो नानासाहेबांचें पत्र घेऊन मजकडे येणार आहे. त्या वेळीं जें काय ठरेल त्याप्रमाणें करतां येईल. बरें, तुम्हाला माझें आरंभींचें म्हणणें कबूल आहे कीं नाहीं ?

गार्डनः—नाहीं, जोपर्यंत माझ्या देहांत प्राण आहे तोंपर्यंत निदान माझ्या हातून ही गोष्ट घडणार नाहीं.

“ ठीक आहे, ” आपल्या कोटाची कॉलर नीट करीत करीत मॅकेअर म्हणाला “ पण तात्या टोपे आणि नानासाहेब जर माझ्या म्हणण्याला कबूल झाले तर तूं मला येऊन मिळशील कीं नाहीं ? ”

गार्डनः—मी गुप्तपणानें तुला सहाय्य करीन; पण उघड रीतीनें जर म्हणशील तर मला कांहीं करतां यावयाचें नाहीं.

मॅकेअरः—तुझ्या या कबुलीनें मला आनंद होत आहे. बरें मी आतां जातों. बरीच रात्र झाली आहे. पलटणीचे नियम तर तुला ठाऊक आहेत. नऊ वाजावयाच्या आंत जर हजर झालें नाहीं तर वरिष्ठाचें बोलणें ऐकून घ्यावें लागतें.

एवढें बोलून मॅकेअर तेथून निघून गेला. कांहीं वेळानें गार्डनहि बाहेर पडला. मीं हळु हळु गार्डनचा पाठलाग चालविला. तो बागेसमोरून जाणाऱ्या सडकेनेंच नीट चालला होता. या वेळीं मीं घड्याळ काढून पाहिलें तों साडेआठ वाजले होते. कांहीं दूर गेल्यावर गार्डननें एक

भाड्याची गाडी ठरविली आणि कोठें जावयाचें तें कोचमनला कळवून तो तिजवर चढला. मी लांब असल्यामुळें मला त्याचा पत्ता ऐकावयाला मिळाला नाहीं. तथापि लागलीच मींहि एक भाड्याची गाडी केली आणि तिच्या पाठोपाठच हांकण्याविषयीं कोचमनला सांगितलें. याबरोबरच मीं या कोचमनला असेंहि कळवलें कीं पुढची गाडी ज्या ठिकाणीं थांबेल तेथून दूर अंतरावर आपली गाडी थांबीव. तूं याप्रमाणें जर केलेंस तर मी तुला चांगलें इनाम देईन.

गाडीवान अगदीं खूष होऊन पहिल्या गाडीचा पाठलाग करण्यासाठीं जोरानें गाडी हांकूं लागला.

अर्ध्या घंट्यानें गाडी उभी राहिली. मी गाडींतून तोंड बाहेर काढून पाहिलें तों एका बागेच्या फाटकापाशीं गार्डनची गाडी उभी राहिली असून तो तिच्यांतून उतरत आहे. तो खालीं उतरल्याबरोबर आंत निघून गेला, तो बंगला गार्डनचाच असला पाहिजे हें मीं अनुमानानें ओळखिलें.

या वेळीं गार्डनला भेटून मॅकेअरसंबंधींची हकीकत त्याला आतांच्याआतांच विचारावी असें माझ्या मनांत आलें; पण त्याला जर ती हकीकत कळवणें पसंत नसली तर माझें एवढ्या वेळपर्यंतचें सगळे परिश्रम फुकट जातील हा विचार त्या वेळीं माझ्या मनांत उभा राहिला आणि ती गोष्ट मीं रहित केली.

मॅकेअरच्या भाषणानें गार्डनला अतिशय राग आला असूनहि तो त्याच्याशीं कलह करण्यास तयार झाला नाहीं. यावरून त्याचें रहस्य तो आपणास सांगणार नाहीं असें अनुमान मीं काढलें आणि माझें हें अनुमान पुष्कळ अंशांनीं खरें होतें. मी गार्डनच्या घराचा नंबर यानंतर टिपून घेतला आणि आपल्या बिऱ्हाडाकडे परतलों. पण जरासें पुढें गेलों नाहीं तोंच मीं कोचमनला गाडी थांबवावयाला सांगितली व घरीं जाण्यापूर्वीं एक वेळ गार्डनचें निवासस्थान चांगलें पाहून घ्यावें असा विचार त्या वेळीं माझे मनांत येऊन मीं गाडींतून तात्काळ उडी मारली. आणि सडकेवर उभा राहून त्याचें सूक्ष्मपणें निरीक्षण करूं लागलों.

एकाद्या राजाच्या बंगल्याप्रमाणें गार्डनचा बंगला शृंगारलेला होता.

त्याच्या पुढील बाजूच्या बागेंत एक रमणीय कारंजें उडत असून चोहों कडे दिव्यांचा लखलखाट केला होता. बंगल्यांतही अशीच दिव्यांची रोषनाई दिसत होती. पिआनोच्या आणि गाण्याच्या मधुर तानाही तेथून मधून मधून ऐकावयाला येत होत्या. या सर्व प्रकारावरून गार्डन फारच धनाढ्य मनुष्य असावा असें अनुमान मीं बांधलें. दुष्ट मॅकेअर ज्या धमक्या देत होता त्याचें कारणहि त्याची ही श्रीमंतीच असावी अशी माझी त्यानंतर खात्री झाली. असो, गार्डनच्या निवासस्थानाची सूक्ष्म टेहाळणी केल्यावर मी गाडींत बसून आपल्या बिऱ्हाडाकडे निघून गेलों.

मी बिऱ्हाडीं जाऊन पोंचलों त्या वेळीं रात्रीचे नऊ वाजले होते. माझा साथीदार माझ्यासाठीं अगदीं घाबरून गेला होता. मी पहिल्यानेंच कानपुराला आलों आहें ही गोष्ट त्याला ठाऊक होती. यामुळें मी ज्या अर्थीं अद्यापि घरीं आलों नाहीं, त्या अर्थीं कांहींतरी भयंकर संकटांत सांपडलों असेन अशी त्याची साहजिकच समजूत झाली. पण माझें आगमन होतांच त्याची सर्व काळजी दूर झाली. बिऱ्हाडीं येऊन पोंचतांच मीं आतांपर्यंत घडलेल्या सर्व हकीगती त्याला निवेदन केल्या आणि विठूरला जाऊन नानासाहेबांची माहिती काढून आणण्याची त्याला आज्ञा केली. अश्वमेधघाटावर भेटलेला संन्यासी तात्या टोपीच असला पाहिजे हेंहि मीं त्याला कळवलें. तात्या हा नानासाहेबांचा एक साथीदार आणि बंडवाल्यांचा नेता असावा असें माझें अनुमान होतें. नानासाहेब आणि तात्या टोपी या दोघांना जर अगोदर पकडलें तर इंग्रजद्रोहाचा विषवृक्ष समूळच उपटून काढल्याचें श्रेय आपल्याला मिळेल याविषयीं मला बिलकूल शंका नव्हती.

या बंडखोर लोकांना मॅकेअर नांवाच्या फ्रेंच दरवडेखोराचें सहाय्य आहे ही गोष्ट मी आपल्या साथीदाराला कळविण्यास विसरलों नाहीं. तो मनुष्य किती धाडसी, साहसी, चतुर आणि धूर्त आहे याचीहि मीं त्यांना थोडक्यांत माहिती करून दिली. माझ्या साथीदारांची आणि त्याची भेट होणें कधींच संभवनीय नाहीं असें जरी मला वाटत होतें तरी मीं त्याच्या खाणाखुणा आपल्या अनुयायाला कळविल्या. तो नेहमीं

सेंट मेरीची शपथ घेत असतो तें देखील मी त्यांस सांगितलें. शेवटीं "असा माणूस जर वाटेंत कोठें भेटला तर त्याजवर नजर ठेवून ती बातमी ताबडतोब कळीव" अशा प्रकारचा अखेरचा संदेश सांगून मी झोंप घेण्यासाठीं आपल्या खोलींत निघून गेलों.

ईशकृपेनें मी पहिल्याच दिवशीं आपल्या नूतन कामगिरींत इतका यशस्वी होईन याची मला बिलकूल कल्पना नव्हती. "नाना राजद्रोही आहे यासाठीं त्याजवर नजर असू द्या." असें क्यानिंगसाहेबाकडून मला कळलें होतें; पण तात्यासंबंधानें खुद्द त्यांनादेखील अजूनपर्यंत कांहींच माहिती नव्हती. त्यांनीं त्याचें नांव तरी ऐकिलें कीं नाहीं याची शंकाच आहे! तात्या टोपे हा राजद्रोही लोकांचा परात्पर गुरु असावा ही गोष्ट क्यानिंगसाहेबानांच काय, पण कोणत्याही इंग्रजाला ठाऊक नव्हती. ही गोष्ट मलाच काय ती आज कळली होती. अर्थात ही बातमी सरकारास कळविली तर आपली खूपच प्रशंसा होईल हा विचार माझ्या मनांत येऊन माझें हृदय आनंदानें भरून गेलें, आणि त्याच सुखमय घटकेला मला झोंप आली.

दुसरे दिवशीं कानपूर विभागांतील सर्व गुप्तपोलिस लोक मला भेटावयाला आले. मी त्यांच्या खात्याचा कमिशनर नेमलों गेलों आहें ही गोष्ट त्यांना कळली होती. माझ्या अंगावर नेहमींप्रमाणेंच साहेबी पोषाख होता आणि त्यांच्याशीं भाषणही मीं साहेब लोकांप्रमाणेंच केलें. घेतलेली भूमिका इतकी हुबेहुब रीतीनें पार पडल्यावर मी खरोखर साहेब आहें अशी जर त्या लोकांची खात्री झाली असली तर त्यांत आश्चर्य कसलें? ही मंडळी निघून गेल्यानंतर कमांडिंग हे साहेबांना भेटावयास मी गेलों.

ते या वेळीं आपल्या आफिसांतच होते. गार्डनची हकीगत वगळून मी एकंदर घटना त्यांच्या कानावर घातली. तात्या टोपीचें नांव ऐकून तेही अत्यंत विस्मीत झाले. या गृहस्थाचें नांव आपण आजपर्यंत ऐकलें नाहीं असें तें म्हणाले. यानंतर मी त्यांच्याशीं आणखी बराच वेळ गप्पा मारून बिऱ्हाडाकडे परतलों. त्याच दिवशीं मी गव्हर्नर जनरल लॉर्ड

क्यानिंग साहेबांना एक पत्र पाठवून त्यांनाही सर्व हकीगत कळवली. या पत्रांतही मी गार्डनसाहेबांच्या भानगडीचा उल्लेख केला नाहीं.

गार्डन अपराधी नाहीं असें मला वाटत होतें. कारण त्यानें केवळ नाइलाजामुळेंच मॅकेअरला सहाय करण्याचें कबूल केलें होतें. अर्थात या योगानें तो मोठासा दोषी ठरत नाहीं. शिवाय त्याजकडून मॅकेअर-संबंधाची बरीच माहिती आपल्याला मिळेल असेंही मला वाटत होतें. ह्मणून या कारणानेंही त्याचें नांव बाहेर फोडणें मला योग्य वाटलें नाहीं.

त्या दिवशीं संध्याकाळीं मीं गार्डनच्या बंगल्यावर जावयाचें ठरवलें असल्यामुळें साहेबी वेष टाकून पंजाबी वेष परिधान केला. चेहऱ्याचा गौर वर्णही रोगण लावून बराच काळसर करून टाकला. हें सगळें झाल्यावर डोकीला फेटा बांधला आणि नंतर हातांत एक भलें दांडगें सोडगें घेऊन मी तिकडे रवाना झालों.

गार्डनच्या बंगल्यावर पोंचावयाला अर्ध्या घंट्यापेक्षां मला ज्यास्त वेळ लागला नाहीं. फाटकापाशीं पोंचतांच पहारेवाल्यानें माझें नांव, गांव वगैरे विचारून मी कोणत्या कामासाठीं आलों आहें हीहि माहिती मला विचारली. मीं आपलें नांव लपवून भलतेंच नांव सांगून दिलें. आणि एका अत्यंत महत्त्वाच्या पण गुप्त कामासाठीं त्यांची भेट घ्यावयाची आहे असें त्यांस सांगितलें.

मालकाला वर्दी देण्यासाठीं पहारेकरी निघून गेला. मीं मनांतल्या मनांत या विषयाचा उपक्रम गार्डनसाहेबाजवळ कसा करावा या गोष्टीचा विचार करूं लागलों.

आज हें कार्य जर सिद्धीला गेलें नाहीं, तर उद्यांला निराळाच मार्ग काढावयाचा हें मीं ठराविलें. कांहीं वेळानें पहारेकरी परत आला आणि मला आंत घेऊन गेला. बंगल्याच्या बाहेरील भागावरून जशी गार्डन साहेबाची श्रीमंती मला दिसून आली तशी ती आंतील भागावरूनही दिसून आली. या आंतल्या भागावरून त्याचा नुसता धनाढ्यपणाच नव्हे तर शोकीनपणाही दृष्टिगोचर होत होता. अनेक प्रकारच्या मौल्यवान चिजा, सुंदर सुंदर चित्रें, आणि युरोपांत बनलेल्या संगमरवरी दगडांचे पुतळे वगैरे वस्तूंनीं त्याच्या निवासस्थानाचा आंतील भाग

एकाद्या राजवाड्याप्रमाणें विलसत होता. पहारेवाल्यानें मला ज्या खोलींत नेलें, तिच्या मध्यभागीं संगमरवरी दगडांचा एक मोठा राउंड टेबल असून त्याच्या भोंवतीं मखमलीनें मढविलेलीं सुंदर कोचें मांडिलीं होतीं. यांपैकीं एका कोचावर गार्डनसाहेब बसलेले होते. त्यांना पाहतांच हेच गार्डनसाहेब असावेत हें मीं ओळखलें. त्यांचें वय पन्नाशीच्या जवळ जवळ होतें. त्यांची सरळ आणि नम्रचर्या, त्यांच्या हृदयांतील महद्भाव व्यक्त करीत होती. मला पाहिल्याबरोबर ते उठून उभे राहिले आणि नंतर माझ्याशीं हस्तांदोलन करून त्यांनीं मला अत्यंत प्रेमळपणानें आपल्या शेजारच्या कोंचावर बसवून घेतलें.

औपचारिक प्रश्नोत्तरें संपल्यावर ते मला अत्यंत विनीत स्वरानें म्हणाले, " आपण आज कोणत्या हेतूनें मला आपलें दर्शन देण्याची कृपा केली ? "

मीं इंग्रजींतूनच बोलूं लागलों. मीं म्हटलें " माझ्या धृष्टतेची क्षमा करा. गार्डनसाहेब आपणच ना ? "

गार्डनः—होय.

मीः—मला एका माणसानें आपणाकडे पाठवलें आहे. फारच गुप्त काम आहे. कोणी येणार नाहीं अशी जर आपण व्यवस्था करीत असाल तर सगळी हकीगत मी आपल्याला सांगतों. "

गार्डनसाहेबांनीं खोलीचें दारच बंद करून घेतलें.

मीः—सुप्रसिद्ध फ्रेंच वीर मॅकेअर आपल्याला ठाऊकच असेल. मी त्याचा एक अत्यंत जिवलग दोस्त आहें. त्यानें कांहीं महत्त्वाच्या गोष्टीसाठीं मला आपणाकडे पाठवलें आहे. त्यानें ज्या महत्त्वाच्या कामाला हात घातला आहे, तें शेवटास जावयाला त्याला अनेक विश्वासुक माणसांचें सहाय मिळालें पाहिजे. आपण स्वतः त्याला सहाय देण्याचें कबूल केलें आहे. ही गोष्ट मला नुकतीच कळली. तुमच्याप्रमाणें मींहि त्यास सहाय करण्याचें वचन दिलें आहे. आपणाकडे जो मी आलों आहें, तो याच कामासाठीं.

गार्डनः—मॅकेअर साहेबाचे अत्यंत जिवलग दोस्त आहांत हें ऐकून मला अतिशय आनंद वाटतो—पण आपल्याला त्यांनींच मजकडे पाठवलें आहे ही गोष्ट खरी मानावयाला प्रमाण काय ?

आतां मात्र मी मोठ्या विचारांत पडलों! या प्रश्नाचें काय उत्तर द्यावें आणि त्यांचा विश्वास बसेल असें कोणतें प्रमाण त्याला दाखवून द्यावें, हेंच मला कळेना. अधिक विचार करावयालाही वेळ नव्हती. मी मोठ्या पेंचांत सांपडलों. इतक्यांत मॅकेअर प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगीं सेंट मेरीचें नांव घेत असतो ही गोष्ट माझ्या लक्षांत आली. कदाचित् हाच त्याचा संकेत शब्द असेल असें मला वाटलें आणि मी लागलेंच गार्डनसाहेबांना म्हटलें, "आपण ठीक विचारलेंत. यासंबंधीं मॅकेअर-साहेबांनींही मला सूचना दिली होती; पण बोलतांना तिचा उल्लेख करावयाला मी विसरलों. त्यांनीं आपला संकेत शब्द मला कळविला आहे. तो शब्द सेंट मेरी हा होय."

माझ्या तोंडून हा शब्द बाहेर पडतांच गार्डनसाहेब माझ्या तोंडाकडे पाहूं लागले आणि माझ्या अगदीं जवळ येऊन बसले.

मीः—आतां तर आपली कांहीं शंका राहिली नाहींना? ते आपल्या हातचें एक पत्रच माझ्याजवळ देत होते; पण अशा प्रकारचीं पत्रें प्रसंगीं गहाळ होऊन प्रतिपक्षाच्या हातांत पडण्याचा संभव असतो ह्मणून मींच त्यांना नको म्हटलें. तेव्हां त्यांनींच हा संकेत शब्द मला कळवला.

गार्डनः—मीं आपल्याबद्दल संशय प्रकट केला याबद्दल क्षमा करा. आतां आपल्याला जें काय विचारावयाचें असेल तें खुशाल विचारा—

अगदीं बरोबर याच वेळेला गार्डनसाहेबांना कोणीं हांक मारिली. तो स्वर ओळखीचा असावा असें मला वाटलें; पण कोणाचा तें निश्चितपणें लक्षांत येईना. गार्डनसाहेब निघून गेले आणि मी एकटाच विचार करीत बसलों.

गार्डनसाहेबांना जाऊन बराच वेळ झाला तरी ते परत आले नाहींत. माझ्या मनांत नानाप्रकारच्या शंका येऊं लागल्या. मी स्वतःला म्हणालों, "मजबद्दल त्यांना संशय तर आला नाहींना? पण असें म्हणावें तर त्यांच्या चर्येवर संशयाचें कांहींच चिन्ह दिसलें नाहीं. मग काय झालें असेल? मॅकेअरकडे चौकशी करण्यासाठीं एकादा मनुष्य पाठविला

असून त्याची वाट पहात राहिल्यामुळें तर त्यांना उशीर लागला नसेल ना ? मग आहे तरी काय हा प्रकार ? "

मीं पुष्कळच डोकें खाजविलें; पण कांहींच निश्चित ठरवतां आलें नाहीं. जसा जसा त्यांना उशीर होऊं लागला तसतसें माझें मन अधिकाधिकच अस्वस्थ होऊं लागलें. मीं फक्त आतां पांचच मिनिटें वाट पाहण्याचें ठरविलें. एवढ्या अवधींत जर ते आले नाहींत तर विनाकारण आपला वेळ न घालवितां घरीं निघून जावें असा मीं निश्चय केला. घड्याळ बाहेर काढून मी सारखा त्याजकडे पहात राहिलों; पण पांच सोडून सात मिनिटें झालीं तरी येथें कोणीच आलें नाहीं.

मी मुकाट्यानें खोलीचें दार उघडून बाहेर पडलों. पण त्यानंतर पुढें पाऊल टाकणार तोंच गार्डनसाहेबांच्या चपराशानें माझ्या हातांत एक चिटोरें दिलें आणि म्हटलें " साहेब, या बागेंतच दुसऱ्या एका ठिकाणीं आपली वाट पहात बसले आहेत तिकडे आपण कृपा करून जावें, त्यांनींच ही चिठ्ठी मजजवळ दिली आहे. "

मीं दिव्याच्या प्रकाशांत जाऊन ती चिठ्ठी वाचली. तींत पुढीलप्रमाणें मजकूर होता.

प्रिय महाशय,

ज्या विषयासंबंधानें आपण माझा सल्ला घेणार आहां. तो विषय अत्यंत महत्त्वाचा आहे हें आपण जाणतच आहां. तथापि ह्या कार्याला आपण बसलों होतों तें ठिकाण अगदीं गैरसोयीचें असल्यामुळें हें दुसरें ठिकाण निवडलें आहे. तरी आपण ही चिट्ठी घेऊन येणाऱ्या मनुष्याबरोबर जरूर इकडे निघून यावें. मी आपली वाट पहात आहें.

तुमचा विश्वासू बंधु—गार्डन.

हा मजकूर वाचतांच माझें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें आणि मी आपल्या मनांत म्हणूं लागलों, " गुप्त गोष्टी बोलायला ही खोली जर गैरसोयीची आहे तर तसें त्यांनीं पहिल्यानेंच आपल्याला कां सांगितलें नाहीं. तेव्हां तर तेथें अशा प्रकारच्या गोष्टी बोलायला त्यांची कोणत्याहीं प्रकारें नाखुषी दिसली नाहीं आणि आतां बाहेर कोणी हाक मारतांच असें सांगून पाठवतात ! याचा अर्थ काय ? मला तर हा

प्रकार अगदीं संशयपूर्ण आणि भानगडीचा दिसतो. आपण जर या वेळीं तिकडे गेलों तर खात्रीनें कांहीं तरी दगाफटका झाल्याखेरीज रहाणार नाहीं. "

अखेर तिकडे जाऊं नये असेंच माझ्या मनानें घेतलें; पण इतक्यांत कर्तव्याचे वेळीं तोंड फिरविणें हें पुरुषाचें काम नव्हे असा विचार माझ्या मनांत येऊन मीं आरंभींच्या भित्रेपणाच्या विचाराला रजा दिली आणि तिकडे जावयाचें ठरवलें. अशा भयंकर प्रसंगीं मीं अनेक वेळीं ईश्वरावर भरंवसा ठेवून त्या त्या कार्यांत विजयी झालों होतों. त्या गोष्टी या वेळीं माझ्या मनांत उभ्या राहिल्या आणि न जाणो या प्रसंगीं आपणास तसाच विजय मिळणार नाहीं कशावरून असे आशाजनक विचार माझ्या मनांत खेळूं लागले.

मी 'चल' म्हणतांच चपराशी मला गार्डनसाहेबाकडे घेऊन गेला. बागेंत गेल्यावर त्यानें एका दुसऱ्या माणसाला हांक मारली आणि त्याला एके बाजूस नेऊन त्याच्या कानांत कांहीं सांगितलें पण मीं तिकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. यानंतर सुमारें पंधरा मिनिटांनीं ते दोघे मला दुसऱ्या एका खोलींत घेऊन गेले. तिच्या दरवाजाजवळ जातांच पहिला चपराशी मला म्हणाला " याच खोलींत गार्डनसाहेब आपली वाट पहात बसले आहेत. आपण आंत जा. "

मी कांहींच न बोलतां मुकाट्यानें त्या खोलींत शिरलों. तेथें एक टेबल आणि एक खुर्ची होती पण गार्डनसाहेब मात्र कोठेंच दिसले नाहींत. मीं त्यांचें नांव घेऊन हांक मारली पण कोणींच ओ दिली नाहीं. अखेर माझें मन अतिशय शंकाकुल होऊन मीं तेथून जावयाचें ठरविलें आणि खोलीच्या दाराजवळ आलों तों तें बाहेरून बंद केलेलें.

माझी पुरी तिरपीट उडाली. चपराशाच्या नांवानें मीं पुष्कळ आरोळ्या मारल्या पण व्यर्थ ! माझ्या आरोळ्याला कोणींच प्रत्युत्तर दिलें नाहीं. गार्डनच्या चिटोऱ्यावर भरंवसा ठेवून मी इकडे आलों हा माझ्या हातून मोठा गाढवपणा झाला असें मला आतां वाटूं लागलें पण आतां या पश्चात्तापाचा काय उपयोग !

या कैदखान्यांतून कसें बाहेर पडतां येईल याचा मी विचार करूं

लागलों. पण कांहींच उपाय दिसेना. दरवाजा मोडण्याचा प्रयत्न करून पाहिला, त्यांजवर अनेक लत्ताप्रहर केले; पण त्याचा एक खिळाही वाकडा झाला नाहीं !

दरवाजा सोडून अन्य मार्गानें पळून जातां आल्यास पहावें म्हणून मी सभोंवतीं निरखून पाहूं लागलों. पण याही बाजूनें माझी बहुतेक निराशा झाली. भिंती जुन्या होत्या तरी त्या मजबूत होत्या. नाहीं म्हणावयाला एका भिंतीची एक वीट निघाली होती. तिला त्या ठिकाणीं भोंक पाडतां आलें तर पहावें म्हणून मीं खिशांतला सुरा काढून त्यानें ती खोदावयास आरंभ केला; आणि ईशकृपेनें मला त्यांत थोडें थोडें यशही प्राप्त होऊं लागलें. एकामागून एक याप्रमाणें मीं त्या भिंतीच्या चारी विटा काढल्या. आतां माझ्या मनांत बरीच आशा उत्पन्न झाली पण याच सुमारास तेथें कसलासा भयंकर दुर्गंध पसरून त्यानें मला चक्कर येण्याची वेळ आली !

मी नाकाला हातरुमाल लावून दरवाजाकडे धांवलों आणि पुन्हां गार्डनला हाक मारूं लागलों; पण याही खेपेला कोणीं ओ दिली नाहीं. मला आतां अतिशय चक्कर येऊं लागल्यामुळें मी अमळ खालीं बसलों. तों टेबलाखालीं कांहीं जळत असून त्याचा हा दुर्गंध पसरला असल्याचें मला आढळून आलें.

तो पदार्थ काय असावा याचा मी विचार करूं लागलों पण मला तो ओळखतां आला नाहीं. अखेर तो जोड्याखालीं रगडून विझ-वून टाकावा असा मीं विचार केला आणि त्याप्रमाणें उठूं लागलों. पण माझे हातपायच हालेनात. अखेर तशा स्थितींत मी कांहीं वेळानें बेहोष होऊन पडलों !

या ठिकाणीं मी किती वेळपर्यंत बेहोष होऊन पडलों होतों हें मला निश्चितपणें सांगतां येत नाहीं; पण पुन्हां ज्या वेळीं मी शुद्धीवर आलों त्या वेळीं दिवस बराच वर आला होता. मीं डोळे उघडून पाहिल्यावर ज्या घरांत मी बेशुद्ध होऊन पडलों होतों तें घर हें नव्हें असें मला आढळून आलें. या ठिकाणीं एक देखील खिडकी नव्हती. एक दार होतें. त्याच्या फटींतून थोडासा उजेड आणि हवा येत होती. मी आपल्या

मनांतल्या मनांत म्हणूं लागलों, " गार्डननें मला चांगलेंच फसवलें; पण या कामीं दुसऱ्या कोणीं तरी त्याला गुरुमंत्र दिला असला पाहिजे. कारण माझ्याविषयीं जर त्याच्या मनांत संशय असता तर तो आरंभापासूनच मला फसवण्याचा प्रयत्न करता आणि माझ्याशीं इतक्या मोकळ्या मनानेंही न बोलतां पण तसें कांहीं दिसलें नाहीं. त्याचें वर्तन इथून तिथून सरळ होतें. अर्थात् तो बाहेर निघून गेल्या वेळीं त्याचे मनांत कोणीं तरी संशय भरविला असावा आणि नंतर त्याच्या हातून ही गोष्ट घडली. बहुतकरून त्याला भेटलेला गुरु मॅकेअरच असावा. त्याच्याखेरीज इतकी पक्की माहिती दुसऱ्या कोणाला असणें शक्य नाहीं. आतां मला पक्कें आठवतें, कीं, त्याला हाक मारणाऱ्याचा स्वर मॅकेअरच्या स्वराशीं अगदीं जुळता होता. कांहीं असो, नशिबांत लिहिलें असेल तेवढें दुःख भोगलें पाहिजे. "

अशा प्रकारच्या चिंतनांत बराच वेळ निघून गेला. या वेळीं माझें डोकें ठिकाणावर नसल्यामुळें तेथून निसटण्याचा उपाय मला सुचेना. असळशानें किती वाजले हें पाहण्याकरतां मी खिशांतलें वॉच काढूं लागलों पण तेथें वॉचही नव्हतें आणि त्याची साखळीही नव्हती. साखळी सोन्याची होती. हें काम त्या चोराचें–मॅकेअरचेंच असलें पाहिजे याबद्दल आतां माझी बालंबाल खात्री झाली. गार्डन आपल्या हितासाठीं मला अखेर कोंडून ठेवील पण त्याच्यासारखा श्रीमंत माणूस एखाद्या दरवडेखोराप्रमाणें माझ्या जवळच्या जिनसा चोरून नेईल ही गोष्ट कालत्रयींहि होणें शक्य नाहीं. कांहीं असो, त्या कैदखान्यांतून सुटण्याची माझी आशा समूळ नष्ट झाली; इतकेंच नव्हे, तर एक आपल्या मार्गांतला कांटा असें समजून मॅकेअर माझा प्राण घ्यावयासहि कमी करणार नाहीं असा सुद्धां विचार या वेळीं माझे मनांत आला.

अशा प्रसंगीं ईश्वरावर भरंवसा ठेवण्याखेरीज मनाचें समाधान होण्याचा दुसरा कोणताच मार्ग नसल्यामुळें मीं अखेर तोच मार्ग अनुसरला. त्या खोलींत एक घोंगडी पडली होती. तिजवर मी ईशचिंतन करीत पडलों.

यानंतर सुमारें तीन तासांनीं माझ्या खोलीजवळ मनुष्याच्या पाव-

त्यांची चाहूल मला ऐकावयाला आली त्याबरोबर मी उठून खोलीच्या दाराजवळ गेलों. तो बाहेरच्या बाजूस दोन व्यक्ति आपसांत कांहीं बोलत असल्याचें मला आढळून आलें. मी दाराला कान लावल्यावर त्यांचा पुढील संवाद मला स्पष्टपणें ऐकावयाला आला.

पहिली व्यक्तिः--आपण म्हणाला ती गोष्ट इथें होणें शक्य नाहीं. याला हुसेनाबादालाच घेऊन गेले पाहिजे. तेथें शहरापासून बऱ्याच अंतरावर अगदीं ऐन जंगलांत माझ्या एका स्नेह्याचें घर आहे त्या ठिकाणीं नेऊन याला ठार केलें म्हणजे पोलिसाला किंवा दुसऱ्या कोणालाहि या गोष्टीचा सुगावा लागणार नाहीं.

दुसरी व्यक्तिः—असें होणें अशक्य आहे. हा फारच धूर्त माणूस आहे. याच्यासारखा चतुर गुप्त पोलिस माझ्या पहाण्यांत नाहीं. याला जर इतकी संधी दिली तर हा काय करील आणि काय नाहीं याचा नेम नाहीं. यासाठीं माझ्या मतानें याला येथल्या येथेंच ठार करणें बरें होईल. तूं जर हें काम करशील तर मी तुला भरपूर बक्षीस देईन. करीत नसशील तर तसें स्पष्ट सांग. मी दुसऱ्या कोणाकडून तें करून घेतों.

पहिली व्यक्तिः—मी आपल्या मर्जीच्या बाहेर आजपर्यंत कधीं गेलों आहें काय ? पण याला मारणें जितकें सोपें आहे तितकें हें कृत्य छपवून ठेवणें सोपें नाहीं एवढेंच माझें म्हणणें आहे. हीं कामें करतां करतांच माझे केंस पिकले आहेतना ?

दुसरी व्यक्तिः—याचा होईल तितक्या लौकर कांटा काढावा एवढीच गोष्ट मी जाणतों. मग पुढें कांहींहि होवो. असें जर झालें नाहीं तर हा आपल्या हातावर बोलतां बोलतां तुरी देईल. हा सरकारी नोकर असल्यामुळें याला साथिदारहि अनेक असतील. ते सध्यांयाच्या शोधांतच असतील आणि एकदां का त्यांना याचा पत्ता लागला कीं आपलीं सगळीं मनोराज्यें ढासळलींच म्हणून समजावीं. यासाठीं आजच्याआज याचा निकाल केला पाहिजे. दुसरी गोष्ट आज दुपारीं गार्डनहि येथें येणार आहे. याला जर आपला हा बेत कळला तर तो या कामीं विघ्न आणल्याखेरीज राहणार नाहीं.

पहिली व्यक्तिः—गार्डनसाहेबांची या गोष्टीला संमति मिळणार नाहीं

हें मी जाणून आहें इतकेंच नव्हे, तर पॅरिसरहस्य जर आपल्याला ठाऊक असतें, तर त्यांनीं मुळीं या भानगडींतच हात घातला नसता; तथापि या सगळ्या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी अशा महत्वाच्या कामीं इतकी घाई करणें बरें नाहीं, असें मला वाटतें. प्रथम आपल्या बचावाची सोय पहावी आणि नंतर या कामांत हात घालावा.

दुसरी व्यक्तिः—गार्डनला आपल्या काबूंत ठेवण्याच्या दृष्टीनेंहि मला याचा निकाल लावलाच पाहिजे. कारण याचें सहाय्य गार्डनला मिळालें तर तो मजविरुद्ध गेल्याखेरीज कदापि रहाणार नाहीं. याला ठार न करतां असें कैदेंतच ठेवावें अशी गार्डनची इच्छा आहे. गार्डनसंबंधानें अलिकडे माझ्या मनांत नाना प्रकारच्या शंका येऊं लागल्या आहेत. काल जर मी वेळेवर पोंचलों नसतों तर कसला भयंकर प्रसंग गुदरता ! कदाचित मी आज फांसावर लटकलेला तुह्मांला दिसलों असतों ! तें कांहीं असो. तूं हें काम आजचें आज करून टाक. त्याची क्लोरोफार्मची गुंगी अजून उतरली नसेल अशा स्थितींतच त्याला ठार करून टाकणें बरें होईल."

यानंतर चोहोंकडे गाढ शांतता पसरली हा संवाद ऐकल्यावर मॅकेअर माझा प्राण घेण्याकरतां टपला आहे ही गोष्ट मला स्पष्टपणें कळून चुकली. सांप्रत मी ज्या संकटांत पडलों होतों त्यांतून मुक्त होणें सोपें काम नाहीं हें माझ्या त्या वेळींच लक्षांत आलें. काल गार्डनला ज्यानें हाक मारली तो मॅकेअरशिवाय दुसरा कोणी नव्हता याविषयीं आतां बिलकूल शंका राहिली नाहीं; पण या प्राणसंकटांतून मी कसा सुटणार ? माझा प्राण कसा वांचणार ? हा विचार पुढें जोराजोरानें माझ्या डोक्यांत घोळूं लागला. " गार्डन जर आतां आला तरच आपला प्राण बचावण्याची आशा आहे, नाहीं तर सगळाच कारभार आटोपला " असें मी आपल्या मनांतल्या मनांत ह्मणालों. याच सुमारास माझ्या खोलीचें कुलूप उघडल्याचा आवाज माझ्या कानावर आला. त्याबरोबर मी घोंगडीवर मुकाट्यानें जाऊन पडलों. एक दोन मिनिटांच्या आंतच दोन माणसें माझ्या खोलींत घुसलीं आणि त्यांपैकीं एकजण दुसऱ्याला ह्मणाला
"अबदुल, बघ बरें त्याची कशी अवस्था आहे ती !"

वाचकहो, हा गृहस्थ मॅकेअरच होता.

अबदूल ताबडतोब मजजवळ आला आणि माझा श्वासोच्छ्वास चालतो कीं नाहीं हें पहाण्यासाठीं त्यानें माझ्या कानावर हात ठेवला, यानंतर माझ्या काळजाचे ठोके पडतात कीं नाहीं हें पहाण्यासाठीं त्यानें माझ्या छातीवरहि हात ठेवून पाहिलें. याप्रमाणें परीक्षा केल्यावर तो मॅकेअरला ह्मणाला, "हा आतां लवकरच शुद्धीवर येईल. माझ्या मतानें याला आणखी तें औषध हुंगावयाला द्यावें. मध्यंतरीं गार्डन येथें आलाच तर याला मारलें ह्मणून खुशाल सांगून टाकावें ह्मणजे मग तो मुकाट्यानें बसेल."

मॅकेअर—ठीक आहे असें कर.

ते अधम क्लोरोफार्मच्या द्वारें मला पुन्हां मूर्छित करणार हें पाहून माझी अगदीं घाबरगुंडी झाली. या वेळीं ईश्वराच्या कृपेशिवाय प्राण वांचावयाला कोणताच मार्ग नव्हता. मी मनांतल्या मनांत ईश्वराचा धांवा करूं लागलों, इतक्यांत अबदूलनें माझ्या नाकापुढें क्लोरोफार्मची बाटली धरलीच. ती मुकाट्यानें हुंगण्यापलीकडे मला दुसरा मार्गच राहिला नाहीं. हिचा दर्प माझ्या नाकांत जातांच माझें मस्तक फिरूं लागलें व त्या वासावरून तो नुसता क्लोरोफार्मच नसून त्यांत आणखीहि एकादें द्रव्य मिसळलें असावें, असें मला वाटलें. कारण मला क्लोरो-फार्मचें सामर्थ्य अपरिचित नव्हतें. सुमारें दहा मिनिटें मी श्वासनिरोध करून स्वस्थ पडलों. नंतर अबदुल निघून गेला. जाते वेळीं माझ्या नाकावर हात ठेवून श्वासोच्छ्वास चालू आहे कीं नाहीं हें त्यानें पाहिलें. जातां जातां तो मॅकेअरला ह्मणाला, "आतां आपल्याला कांहीं करण्याची जरूर पडली नाहीं. आतां तो पुन्हां जिवंत होण्याची आशा नाहीं. कसेंहि असो, या महासंकटांतून ईश्वरानें आपणास मुक्त केलें याबद्दल आपण त्याचे आभार मानले पाहिजेत."

एवढें बोलून अबदूल माझ्या खोलीच्या बाहेर निघून गेला. त्याच्या पाठोपाठ मॅकेअरनें प्रयाण केलें. जाते वेळीं खोलीच्या दरवाजाला कुलूप लावायला तो विसरला नाहीं.

ईश्वराच्या कृपेनें मी पुन्हां एकदां वांचलों. आज मला दिवसभर

अन्नपाणी नव्हतें तथापि डोकें विचार करून थकल्यामुळें थोड्याच वेळांत मला गुंगी आली.

प्रकरण ४ थें.

करुणा.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

पुन्हां पुष्कळ रात्र होतांच माझ्या खोलीचा दरवाजा उघडल्याचा अवाज माझ्या कानावर येऊन मी खडबडून उठलों. मला वाटलें कीं, अबदूल आणि मॅकेअर हीच दुकल मला कोणकिडे तरी घेऊन जाण्या-साठीं आली असावी; पण दाराकडे दृष्टी फेकतांच ही समजूत सपशेल चुकली असल्याचें मला आढळून आलें. दार उघडलेली व्यक्ति मॅकेअर किंवा अबदुल यापैकीं कोणीही नसून एक आंग्ल बालिका होती. तिच्या हातांत एक दिवा असून दार उघडतांच ती माझ्या खोलींत घुसली. जीवनाच्या अंतिम घटकेला त्या देवतेचें दर्शन झालेलें पाहून मला अति-शय आश्चर्य वाटलें आणि त्याबरोबर माझ्या हृदयांत थोडी आशाही उत्पन्न झाली.

ही बालिका खोलींत घुसली ती एकदम मजजवळ आली आणि माझा हात धरून मला अतिशय जोरानें हालवूं लागली. मी सावध आहे असे पाहतांच तिनें मला बाहेर जाण्याचा इशारा केला पण मी तिला निजल्या निजल्याच म्हणालों, “ तूं काय एकादी स्वर्गलोकाची देवता आहेस ? का एखादी यक्षकन्या आहेस ? सांग सांग ? तूं या पापी लोकांत कां आलीस ? मला वांचविण्यासाठींच तूं एवढें कष्ट घेतलेस काय ? ”

पण तिनें माझ्या प्रश्नाचें कांहींच उत्तर न देतां तोंडावर बोट ठेवून मला गप बसण्याचा इशारा केला. यानंतर मात्र मी कांहींच बोलण्या-च्या भानगडींत पडलों नाहीं. तिच्या पाठोपाठ त्या खोलीच्या बाहेर पडलों. बाहेर येतांच त्या बालिकेनें आपल्या हातांतला दिवा विझवला

आणि माझा हात धरून अंधेरांतूनच अगदीं जलदीनें चालावयास सुरवात केली.

प्रथम आम्ही एका जिन्यावर चढलों; पण वर गेल्यावर पुन्हां दुसऱ्या बाजूनें खालीं उतरलों. यानंतर आम्ही एका मोठ्या खोलींत शिरलों. येथें अंधेरच होता. पण शेजारच्या खोलींत दिवा जळत असून तेथें कांहीं माणसें बोलत बसलीं होतीं. त्यांच्यापैकीं एक गार्डन असावा असें मीं त्याच्या आवाजावरून ओळखलें. पण ती वेळ चौकशी करण्याची किंवा त्यांच्या गोष्टी ऐकण्याची नव्हती. आम्हांला पुन्हां एक जिना चढावा लागला आणि पुन्हां तेथून खालीं उतरावें लागलें. याप्रमाणें प्रवास करतां करतां अखेर आम्ही एकदांचें बागेंत येऊन पोंचलों, या ठिकाणीं आल्यावर ती बालिका उभी राहिली आणि मला मृदु स्वरानें ह्मणाली, " समोर फाटक आहे. त्याच्या वाटें आपण तावडतोब निघून जा. या वेळीं आपले प्राण अतिशय धोक्यांत आहेत. "

मीः—आपण कोण आहांत हें सांगितल्याखेरीज मी येथून मुळींच हालणार नाहीं.

बालिकाः—महाराज, माझें नांव हेलेन असून मी गार्डनसाहेबांची मुलगी आहें.

यानंतर मी तावडतोब फाटकाबाहेर पडलों आणि एका मोठ्या सडकेवर येऊन उभा राहिलों. मोकळ्या हवेचा लाभ झाल्यामुळें मला अतिशय आल्हाद वाटला. संबंध एक रात्र आणि एक दिवस उपाशी असल्यामुळें माझा देह अगदीं गळून गेलेला होता. शिवाय क्लोरोफार्मचा अम्मलही अजून सर्वस्वीं नाहींसा झाला नव्हता. तथापि अशा प्रकारें शरीराला त्रास होत असतांही मला तेथें उभें राहणें भाग पडलें. याचें कारण या वेळीं मॅकेअर त्या घरांत होता हें होय. मॅकेअर आणि गार्डन ज्या अर्थीं एकत्र जमले आहेत त्या अर्थीं कसलेंना कसलें तरी कारस्थान रचण्याचा उद्योग चालला असला पाहिजे अशी माझी समजूत झाली; आणि अशा स्थितींतच मॅकेअरला कैद करणें मला आपलें कर्तव्य वाटलें.

मी नुकतांच मृत्यूच्या दाढेंतून सुटलों असतां पुन्हां त्याच भानगडींत

पडत आहे हें वाचून वाचकांना आश्चर्य वाटेल पण तसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. गुप्तपोलीसाचा धंदाच असा धाडसी आणि विलक्षण आहे.

हें कसेंही असो, बाहेर येतांच माझे विचार पालटले. आटोक्यांत आलेल्या सावजाला पकडल्याखेरीज जाणें मला बरें वाटेना. प्राण गेला तरी फिकीर नाहीं. पण शत्रूला जाऊं द्यावयाचें नाहीं. असा माझा निश्चय ठरला. या वेळीं गार्डनविषयीं मला थोडीबहुत काळजी वाटूं लागली. कारण त्याच्याच मुलीनें माझा प्राण वांचविला होता. त्या कैदखान्यांतून नुकतीच माझी सुटका केली होती. मीं मॅकेअरला पकडलें आणि गार्डन जर त्याच्याविरुद्ध साक्ष द्यावयास तयार झाला नाहीं, तर मॅकेअरचा साथिदार ह्मणून त्यालाही आरोपी करणें मला भाग पडेल. असें झाल्यावर ज्या हेलननें माझे प्राण वांचविले तिला केवढें तरी दुःख होईल! ती जर माझी सुटका करावयाला पुढें न येती तर माझा प्राणदीप आज खरोखरच नष्ट झाला असता. मग जिनें माझा प्राण वांचविला त्या देवतेच्या दुःखाला मी कारणीभूत होऊं ? छेः असें माझे हातून होणें शक्यच नाहीं. हा अत्यंत अक्षम्य असा कृतघ्नपणाचा गुन्हा आहे आणि याचें प्रायश्चित्त मला जरी येथें मिळालें नाहीं तरी ईश्वराच्या घरीं मिळाल्याखेरीज कदापि रहावयाचें नाहीं!

या सर्व गोष्टीचा विचार केल्यानंतर गार्डन आणि हेलन निघून गेल्यावरच मीं मॅकेअरला कैद करण्याचें ठरविलें. मी ज्या ठिकाणीं उभा राहून या गोष्टीचा विचार करीत होतों तेथून जवळच एक वाण्याचें दुकान होतें. तेथें कांहीं फराळाला मिळालें तर पहावें ह्मणून मी त्याच्या दुकानांत शिरलों; पण दुर्दैवानें त्याच्याजवळ फुटाणे आणि मुरमुरे याखेरीज दुसरें कांहीं नव्हतें. पण मला या वेळीं अतिशय भूक लागली असल्यामुळें त्या दोन्हीही जिनसा मला पक्वान्नांपेक्षां ज्यास्त रुचकर लागल्या असल्यास त्यांत नवल कसलें ? त्या दोन्हींही जिनसांवर यथेच्छ ताव मारल्यावर मी पोटभर पाणी प्यालों. तहानेनें माझा घसा अगदीं कोरडा पडला होता. यामुळें पाणीही अगदीं अमृताप्रमाणें लागलें. याप्रमाणें थोडीशी उदरतृप्ति झाल्यावर माझ्या अंगांत थोडासा तकवा

आला. दुकानदाराजवळ चौकशी केल्यावरून जवळच एक पोलिसचौकी असल्याचें मला कळून आलें. त्या ठिकाणीं एक हवालदार व दहा कान्स्टेबल असत. मॅकेअरच्या घरासंबंधीं मीं त्याजजवळ चौकशी केली; पण रात्रीं कोणी एक साहेब आपल्या मित्रांसह येथें येऊन मजा उडवीत असतो, यापलीकडे या बाबतींत त्याच्याकडून मला अधिक बातमी मिळाली नाहीं. मीं त्याला नांव विचारलें; पण त्याचेंही त्यानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. नंतर मीं त्याला म्हटलें " माझे मालक आज येथें आले आहेत; पण ते आल्याबरोबर त्यांच्या येथें खूपच मोठी चोरी झाली. यासाठीं मी त्यांना बोलवावयास चाललों आहें. तरी तूं तोंपर्यंत या घरावर नजर ठेव. मी याबद्दल तुला चांगलें बक्षीस देईन. जातां जातां मी अगोदर पोलिसचौकीवर खबर देतों. माझ्या पाठीमागें जर एकादा साहेब या घरांतून बाहेर पडला तर मला कळीव. मी इतक्यांत येतों. "

पोलिसचें नांव काढतांच दुकानदार प्रथम कांकूं करूं लागला; पण बक्षिसाच्या लालचीनें माझें म्हणणें अखेर त्यानें कबूल केलें. त्याला पोलिसचौकीचा पत्ता विचारून मीं तेथून प्रयाण केलें.

त्याच्या दुकानापासून पोलिसचौकी फारच जवळ असून सुदैवानें तेथें या वेळीं हवलदार आणि आठ कान्स्टेबलही होते. हवालदाराला मीं आपली सर्व हकीगत कळविली. पण तो पुरावा मागूं लागला. यावर मीं त्याला म्हटलें " मी गुप्त पोलिस खात्याचा मुख्य आधिकारी आहें. मला सहाय देणें तुमचें कर्तव्य आहे. त्याप्रमाणें तुम्ही ते द्यावयास तयार आहां किंवा नाहीं हें मला सांगा ! "

यावर हवलदार कांहीं न बोलतां मुकाट्यानें सर्व कान्स्टेबल घेऊन मजबरोबर निघाला. आम्ही अगदीं झपाट्यानें चालूं लागलों. वाण्याच्या दुकानाजवळ येतांच चर्चमधील घड्याळाचे आठाचे ठोके ऐकूं आले. वाण्याला पुसल्यावरून घरांतून अजून कोणींही बाहेर पडलें नसल्याचें आम्हांस कळलें. चार दांडग्या कान्स्टेबलांना साधा पोषाक देऊन मीं त्यांना आपल्याबरोबर घेतलें. बाकी उरलेल्या मंडळीपैकीं दोघां कान्स्टेबलांना बाहेर खडा पहारा करण्याची कामगिरी सोपविली. " घरांतून जर कोणी माणूस बाहेर पडलें तर त्याला तात्काळ पकडा. मदतीची गरज

लागेल तर छपून बसलेल्या दोन कान्स्टेबलांना आणि हवलदारास हांक मारा. " असें मीं त्यांना कळविलें.

याप्रमाणें व्यवस्था केल्यावर मीं वाण्याला त्याच्या किल्लीचा गुच्छ मागितला. माझें तें कारस्थान आणि त्याला अनुरूप अशी चलाखी पाहून दुकानदार अगदीं गुंग होऊन गेला होता. त्यानें मुकाट्यानें माझ्या हातांत किल्ल्यांचा गुच्छ दिला. त्यांतली एक किल्ली निवडून मीं ती जोरानें फुंकली तों ती शिटीप्रमाणें स्वच्छ वाजूं लागली. त्याबरोबर मीं हवालदारास म्हटलें " मी चौघा कान्स्टेबलला घेऊन मॅकेअरला कैद करण्यासाठीं वर जात आहें. संकटाचा प्रसंग दिसला अगर आवश्यकता वाटली तर मी ही " शिटी " वाजवीन. ती ऐकल्याबरोबर तुम्ही आपल्याबरोबरच्या कान्स्टेबलासह मजकडे निघून या. "

यानंतर जिना कोठें आहे, कसा आहे, माझी भेट कशी होईल वगैरे गोष्टींची मीं त्यांना थोडक्यांत माहिती दिली आणि चौघां कान्स्टेबलांसह इष्ट स्थळीं जावयास निघालों. फाटकापासून पंधरासोळा हातांवर आपल्या बरोबरच्या चौघां कान्स्टेबलांना उभे करून मी एकटाच फाटकापाशीं गेलों आणि अगदीं गुपचुपपणें तेथें उभा राहिलों.

आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या वेळीं तेथें एक भला दांडगा पहारेकरी इकडून तिकडे फिरत होता. हेलननें मला बाहेर जाण्याचें सांगितलें, त्या वेळीं तेथें कोणी नव्हतें आणि आतांच हा माणूस कोठून आला ? याचें मला गूढ पडलें. खरोखरच हेलनच्या चातुर्याचें या प्रसंगीं मला मोठें कौतुक वाटलें. तिच्या बुद्धिकौशल्यानेंच माझी त्याची भेट झाली नसली पाहिजे. तिनें कांहीं तरी युक्तीनें त्याला कोठें लावून दिलें असावें आणि नंतर मला बाहेर पडावयास सांगितलें असावें ! हेलन, धन्य आहे तुझी !

पण सध्यांच्या पेचांतून कसें मुक्त व्हावें हा प्रश्न आतां माझ्यापुढें उभा राहिला. वाटेल तें करून त्याला येथून घालवून दिलें पाहिजे. त्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं हें मला समजून आलें. पण ती गोष्ट अमलांत आणावयाची कशी ? विचार करतां करतां मला एक उपाय सुचला; पण तो जसा भयंकर तसाच धाडसाचाहि होता. त्याचें तोंड एकदम बंद करून त्याला कोठें तरी उचलून टाकावयाचें हाच तो उपाय

होय. मीं आणखीहि पुष्कळ विचार केला परंतु याखेरीज दुसरा कोणताहि उपाय सुचेना. अखेर हवालदाराच्या सल्ल्यानें मीं हाच उपाय अमलांत आणण्याचें ठरविलें आणि एक जाड धोतर हातांत घेऊन पुढें सरकलों. बाकीची मंडळी मागून हळू हळू येत:होती.

पहारेकऱ्याजवळ जातांच मीं त्याला म्हटलें " बाबुसाहेब, हें कोणत्या साहेबांचें घर आहे. "

तो मजजवळ येऊन रूक्ष स्वरानें म्हणाला " मॅकेअरसाहेबांचें आहे. काय काम आहे ? "

पण यानंतर त्याच्या तोंडावाटें पुन्हां दुसरा म्हणून शब्द निघाला नाहीं. कारण याच वेळीं मीं त्याच्या तोंडावर धोतर फेंकून तें जोरानें आवळलें ! पडतां पडतां बिचाऱ्याच्या तोंडून एक अस्पष्ट अशी आरोळी बाहेर पडली. याच वेळीं माझ्याबरोबरच्या कान्स्टेबलांनी तेथें येऊन त्याचे हातपाय बांधले आणि धोतराचा बराच भाग त्याच्या तोंडांत जोरानें कोंबला.

याच्या तोंडून जरी अस्पष्ट आरोळी बाहेर पडली होती तरी ती माडीवर बसलेल्या मंडळीच्या कानावर गेली आणि तेथून एकजण ओरडला, " भगवानसिंह, कसली गडबड आहे खालीं ? "

ते शब्द अबदुलचे होते हें मीं ओळखलें. मी चटकन आपला आवाज बदलून उत्तर दिलें.

" खुदावंत, मी एक आंधळा मनुष्य आहें. मला आजची रात्र येथें राहण्याची परवानगी मिळावी; "

" चल निघ " अबदुल क्रुद्ध स्वरानें म्हणाला.

" जी हुकूम " म्हणून मी एका बाजूला झालों, आणि कोपऱ्यांत जाऊन लपलों. यानंतर बाहेर पहाऱ्यावर उभा केलेल्या कान्स्टेबलाच्या साह्यानें मॅकेअरच्या पहारेवाल्याला वाण्याच्या दुकानीं पोहोंचते केलें आणि त्याला ताकीद केली कीं, " आम्ही येईपर्यंत याला अशाच स्थितींत राहूं दे. त्याचप्रमाणें घरांतून कोणी पळून गेला तर त्यांजवर नजर ठेव. या कामीं जर तुजकडून कसूर झाली तर तुला जबर शासन मिळेल. "

यानंतर आम्ही पुन्हां फाटकापाशीं आलों. हवालदार मघांच्याचप्रमाणें दोन कान्स्टेबलांसह आपल्या पहिल्या जागेवर जाऊन लपला आणि मीही चार कान्स्टेबल घेऊन वर चढलों. जिन्याजवळ जातांच त्यांतील दोघा कान्स्टेबलांना आरंभींच्या पायरीजवळ उभें केलें आणि बाकी दोघांना घेऊन माडीवर गेलें. पण त्यांना वर नेल्यावर जी एक अंधारपूर्ण खोली आम्हांला मिळाली तिच्या एका कोपऱ्यांत उभें केलें.

पुढें मी एकटाच मॅकेअर आणि गार्डन ज्या ठिकाणीं बोलत बसले होते त्याच्या शेजारच्या खोलींत जाऊन लपलों. या खोलीचें दार आंतून बंद केलें असून तिच्यांत अगदीं गाढ अंधकार पसरला होता. येथून मला त्यांचीं भाषणें स्पष्ट ऐकूं येत होतीं. आरंभीं हेलेन ह्मणाली, " मॅकेअर, जरा विचार करून बोला, माझ्या पित्याला तुमचें म्हणणें नाकारतां येणें अशक्य असलें तरी तुमच्या म्हणण्याप्रमाणें वागावयास मी कांहीं बांधलेली नाहीं. तुह्मांला भेटण्यांत माझा उद्देश हा आहे, कीं, प्राण गेला तरी तुमच्यासारख्या नीच माणसाशीं लग्न करावयाचें नाहीं, अशी मीं प्रतिज्ञा केली आहे. ती तुम्हांला कळवावी आतां तुम्ही माझ्या पित्याला निष्कारण त्रास देऊं नका. "

तिचें हें भाषण ऐकतांच मॅकेअर संतापून म्हणाला, " बस ! बस ! हेलेन, केलास एवढा अपमान पुरें झाला. आजपर्यंत कोणींही माझा इतका अपमान केला नव्हता; पण ध्यानांत ठेव याचें प्रायश्चित्त तुला या हातचें या हातावर मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. सेंट मेरीची शपथ घेऊन सांगतों, कीं, तुझ्या नरडीचा घोट घेऊन मी हा सूड उगवीन, कधीं राहणार नाहीं. सूड उगविण्याच्या कामीं सगळ्या फ्रान्स देशांत माझी प्रसिद्धी आहे. आजपासून बरोबर—"

तो पुढें कांहीं बोलणार तोंच गार्डन त्याला थांबवून म्हणाला, "तुला मी वचन देऊन फसलों असलों तरी माझ्या अंगांत अँग्लोसाक्सन रक्त खेळत आहे हें लक्षांत ठेव. आमच्या समोर होत असलेला स्त्रीजातीचा अपमान सहन करण्याची आम्हांला सवय नाहीं. हेलेनशीं मी फक्त दोन शब्द बोलणार आहे असें तूं मला वचन दिलें असतांही तूं त्याचा भंग करून तिचा अपमान केलास आणि तिला धमक्याही देऊं लागला आहेस.

आणखी हें सर्व माझ्या समोर ! लक्षांत ठेव, याचें प्रायश्चित्त तुला या पिस्तुलानेंच देण्याचें सामर्थ्य माझ्या आंगांत आहे. तुझ्यासारख्या नीचाला मी आपली देवतातुल्य मुलगी केव्हांही देणार नाहीं हें मीं तुला पूर्वीं अनेक वेळां सांगितलें होतें आणि आजही पुन्हां सांगतों. शिवाय ती स्वतःहि या गोष्टीला राजी नाहीं. हेंही तुला इतक्यांतच तिच्या तोंडून कळून चुकलें आहे. आतांपर्यंत तुझा हा पाजीपणा चालूं दिला; पण आज मी तुला बजावून सांगतों, कीं, " यापुढें तूं जर या गोष्टीचा उच्चार केलास तर मिसेस गार्डनच्या अपमानाबद्दल जो सुरा काउंट लालीच्या हृदयांत घुसला तोच तुझ्याहि हृदयांत खुपसल्याखेरीज राहणार नाहीं. ईश्वराला साक्ष ठेवून मी आज ही प्रतिज्ञा करीत आहें. " इतकें बोलून गार्डन स्तब्ध राहिला.

त्याच्या संभाषणावरून पारीसच्या रहस्याची मला थोडीशी कल्पना आली. हाय ! गार्डनसारख्या सज्जनाचा हातही खुनाच्या रक्तानें माखला जावा काय ? ही गोष्ट मॅकेअरला ठाऊक असल्यामुळें ती उघडकीस आणण्याची तो त्याला दहशत घालीत होता; पण हें कांहीं जरी असलें तरी गार्डन या नीचाचा साथीदार नाहीं हें मला स्पष्ट कळून आलें. त्याचें रहस्य उघडकीला आणण्याची भीति घालून त्याला आपला साथीदार बनविण्याचा मॅकेअरचा प्रयत्न चालूं होता. इतकेंच. अर्थात एवढ्यावरून त्याला मॅकेअरसारखा गुन्हेगार समजणें अगदीं चुकीचें आहे.

याप्रमाणें माझें मन विचारतरंगांत हेलकावे खात आहे तोंच अबदूल मॅकेअरला ह्मणाला, " हुजूर, मलाही या प्रसंगीं दोन शब्द बोलावेसें वाटतें. आपला जो मुख्य उद्देश त्यांत ही हेलनची गोष्ट निष्कारण मध्यें घुसडून त्याच्या आपण पूर्ततेला अडथळा आणीत आहां. हें हेलनचें लफडें अशा प्रसंगीं पुढें आणणें बिलकुल उपयोगी नाहीं. आपण आजपर्यंत जो विचार केला आहे, आणि ज्या गोष्टी ठरविल्या आहेत त्या सर्व याच्यापुढें व्यर्थ होऊं पहात आहेत. या वेळीं बाकीच्या सर्व गोष्टी विसरून आपण सगळ्यांनीं एक विचारानें काम केलें पाहिजे. कारण नानासाहेबांचा दोस्त तात्या टोपे उद्यांच आपणाकडे सल्लामसलत घेण्यासाठीं येणार आहे. बंडखोरांचें नेतृत्व सुभेदार धनवल्लभसिंह यांना

देण्याच्या बाबतींत दिल्लीच्या बादशहाकडून सनद आणण्याची मीं जी प्रतिज्ञा केली आहे, ती कांहीं दिवसांनीं स्वतः तात्याच घेऊन येणार आहे. अशा स्थितींत आपण आपले विचारही निश्चित केले नाहींत तर आपण त्याला उद्यां काय जबाब देणार ? धनवल्लभसिंहांना जर बादशहाची सनद मिळाली नाहीं तर तो आणि त्याचे साथीदार आपणावर मुळींच विश्वास ठेवणार नाहींत आणि आम्हांला कोणत्याही प्रकारें मदत करणार नाहींत. ह्मणून मी ह्मणतों, कीं, अशा प्रसंगीं हा आपला आपसांतला झगडा उपयोगी नाहीं." अबदूलचें भाषण संपल्यावर गार्डन ह्मणाला, "अबदुलभाईचें ह्मणणें अगदीं रास्त आहे. कबूल केल्याप्रमाणें सहाय्य करावयास मी तयार आहें. तशीच तुम्हीं जी साठ हजार रुपयांची मागणी केली आहे ती मी भागवितों. मात्र यापुढें मला कोणत्याही प्रकारें त्रास देणार नाहीं अशी तुम्हीं शपथ घेतली पाहिजे. पुढें तुम्ही माझ्या भेटीला येतां उपयोगाचें नाहीं. हें जर तुम्हांस कबूल असेल तर आतां साठ हजार रुपयांचा आग्रा बँकेवर चेक लिहून देतों. तो नेऊन तेथें दाखवितांच तुमच्या पदरांत तेवढी रक्कम पडेल. यावर अबदूल ह्मणाला, "मी या गोष्टीस तयार आहें. आपण आमच्या पक्षांतले एक गृहस्थ आहां तेव्हां आपल्याकडून जें कांहीं सहाय्य मिळेल तें आम्हीं घेतलेंच पाहिजे. विशेषतः अशा प्रसंगीं काय मिळेल तें अवश्य घेतलेंच पाहिजे. या कामीं अनमान करणें बिलकूल शहाणपणाचें नाहीं. रुपयांची गोष्ट तर लांब राहो, पण अगदीं क्षुद्र सहाय्याकडे देखील तुच्छतेच्या दृष्टीनें पहाणें मूर्खपणाचें आहे. आपल्या सामान्य शक्तीवर भरंवसा ठेवून जगांतल्या अत्यंत महत्त्वाच्या कामास मनुष्य जेव्हां प्रवृत्त होतो तेव्हां ज्याकडून जेवढें सहाय्य मिळेल तेवढें घेणें अगदीं जरूर आहे. या मार्गाचा अवलंब केल्यानेंच मनुष्याच्या हातून थोर कार्यें सिद्धीला जातात. आमच्या लोकांचें सामर्थ्य अगदीं अल्प आहे ही गोष्ट मला अगदीं कबूल आहे आणि आपणाकडून मिळणारी साठ हजारांची मदत फारशी मोठी आहे असें नाहीं; पण असें असूनहि तिचा स्वीकार करावा असें मी म्हणतों. कारण थेंबाथेंबानेंच तळें साचतें, असल्या अनेक क्षुद्र सहाय्यांच्या जोरावरच ब्रिटिश साम्राज्य विध्वंस पावून भारतांत फ्रेंच साम्राज्य प्रस्था-

पित होणार नाहीं ह्मणून कोणीं सांगावें ? ह्मणून मी पुन्हां म्हणतों, कीं, आपण देत असलेलें सहाय्य कितीहि क्षुद्र असलें तरी आमचे पुढारी मॅकेअरसाहेबांनीं त्याचा स्वकार करावा."

अबदूलच्या भाषणावरून तो फार दूरदर्शी असून मनुष्यस्वभावाचीहि त्याला चांगली पारख आहे हें मला कळून आलें. मॅकेअर आणि गार्डन यांच्यांत तेढ सुरू होऊन आपल्या स्वार्थाचा मार्ग बंद पडूं पहात आहे असें दिसतांच त्यानें गार्डनच्या प्रशंसेला आणि त्याबरोबरच प्रच्छन्नपणें मॅकेअरच्या निर्भत्सनेला सुरवात केली. अबदूलचें सर्व जीवित केवळ पापमार्गांतच गेलें नसून त्यानें त्यांतील कांहीं भाग ज्ञान संपादण्याकडेहि घालविला असावा हेंहि मला आढळून आलें. बंडखोरांच्या पुढाऱ्यांत अबदुलही एक प्रमुख पुढारी आहे हें आतां मी पक्केंपणीं कळून चुकलों.

अबदुलला कैद करण्याचें मीं अगोदरच ठरविलें होतें; पण तो बंडखोरांतला एक प्रमुख पुढारी असेल अशी माझी कल्पना झाली नव्हती. मी त्याला नुसता मॅकेअरचा साथीदार समजत होतों. पण वास्तविक प्रकार कळून चुकल्यावर मॅकेअरबरोबरच त्याला कैद करणें मला अत्यंत जरूर वाटलें. असें जर केलें नाहीं तर ब्रिटिशसरकारचा एक कट्टा शत्रु मागें राहून पुन्हां ज्या भानगडी व्हावयाच्या त्या होणारच ह्मणून मीं आज त्या दोघां बदमाशांना अटक करण्याचें निश्चित केलें.

" गार्डन आणि हेलन हीं उभयतां लौकर निघून गेल्यास ठीकच आहे. नाहींतर त्यांच्या देखतही हें काम करावयास मागेंपुढें बघणार नाहीं" मी मनांतल्या मनांत पुटपुटलों.

" आम्ही तिघेजण आहोंत. " मी पुढें विचार करूं लागलों. त्या दोघांना एकदम पकडावयाचें ठरवून आम्ही तिघेच्या तिघे जर त्यांच्या अंगावर गेलों तर आत्मसंरक्षणार्थ ते लोक शस्त्र उपसल्याखेरीज रहाणार नाहींत आणि मग आम्हांलाही स्वतःच्या जिवावर उदार झाल्याखेरीज गत्यंतर रहाणार नाहीं. असले बदमाष लोक शस्त्रांना कधीं विसंबत नाहींत आणि या वेळीं त्यांच्याजवळ गोळ्या भरून सज्ज केलेलें पिस्तुल नसतील कशावरून ? "

याप्रमाणें विचार करित असतांना हें कार्य सुरळीत पाडावयास मला

एकच उपाय सुचला. अबदुलला जर कोणती तरी युक्ती करून बाहेर आणलें तर आह्मां तिघांना मॅकेअर कैद करांवयास मुळींच अडचण पडणार नाहीं. हाच तो उपाय होय. मॅकेअरला अशा रीतीनें पकडल्यावर दुसऱ्या कान्स्टेबलच्या सहाय्यानें अबदुललाही पकडणें तितकेंच सुलभ होतें.

ही युक्ति मला अतिशय पटली आणी यानंतर ती अमलांत कशी आणावी या विचाराला मी लागलों.

प्रकरण ९ वें.

भीषण हत्या !

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

अबदूलचें भाषण संपल्यावर दहा मिनिटांनीं त्या खोलींत अगदीं गाढ स्तब्धता पसरली. कोणाच्या तोंडून कांहीं निघालें नाहीं. यावरून मॅके-अरच्याहि हृदयावर तिचा बराच परिणाम झाला असावा असें दिसूं लागलें. थोड्याच वेळानें तो गार्डनला म्हणाला “ गार्डन, तुझ्या भाष-णाची तऱ्हा आणि इतर अपमानदर्शक व्यवहार हीं पाहून मला तुझ्या-विषयीं दाट संशय येऊं लागला आहे. काल ज्या गुप्त पोलिसाला आम्ही पकडलें त्याला तूंच नियुक्त केलें असावेंस असें मला वाटतें. हर-कत नाहीं. ह्या गोष्टीचा विचार करण्याची ही वेळ नव्हे. तूं जी रक्कम देत आहेस ती मी घ्यावयास तयार आहें. तुझ्या म्हणण्याप्रमाणें तुझ्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं ही अटही मी कबूल करतों. अबदूलच्या मताप्रमाणें वागणें हेंच मला आतां कर्तव्य वाटतें. तुझ्या साह्याची मी उपेक्षा करीत नाहीं. दे लिहून त्या साठ हजारांचा चेक पण... ...” ... इतक्यांत हेलन मध्येंच म्हणाली “ बाबा, तुम्ही हे पैसे निवळ पाण्यांत फेंकीत आहां. तथापि या सैतानाशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणार नाहीं अशी जर ईश्वरसाक्ष प्रतिज्ञा करीत असाल तर मी ह्या बाबतींत आड येत नाहीं; पण आजच्या आज

साठ रुजार रुपयांचा चेक लिहून देऊं नका तर तीस हजारांचा द्या आणि बाकीचे तीस हजार, काल जो गुप्त पोलिस यांनीं पकडून ठेविला आहे त्याच्या सुरक्षितेची जामीनगत म्हणून आपणाजवळ जमा असू द्या. ज्या दिवशीं मॅकेअर त्याला आपल्या घरीं आणून पोहोंचतें करील त्या दिवशीं ही राहिलेली रकम त्याच्या स्वाधीन करावी. माझी ही अट मॅकेअरसाहेबांना कबूल असेल तर ठीकच. नाहींतर त्यांना त्यांचा मार्ग मोकळा आहे. त्याच्या मर्जीला येईल त्याप्रमाणें त्यांनीं करावें."

हेलनचें हें भाषण ऐकून अबदुल ह्मणाला "ठीक आहे मिस बाबा ! आह्मी लोक तुमच्या याही गोष्टीला कबूल आहोंत, पण तीस हजारांच्या ऐवजीं दहाहजार ठेवून घ्या एवढेंच आमचें म्हणणें आहे. कारण तुह्मी इतके रुपये ठेवून घेतल्यावर आमच्या कामाचा फारच घोंटाळा होईल. तसेंच आमचें कार्य सिद्धीस जाईपर्यंत आह्मांला त्यास सोडतांही यावयाचें नाहीं. इतक्यावर जर तुह्मी आमचें ह्मणणें कबूल करीत नसाल तर तुमची अट आह्मांला कबूल नाहीं."

"तुमच्या मर्जीची गोष्ट आहे, बाकी तुह्मांला यावेळीं तीस हजारांपेक्षां अधिक कांहीं मिळणार नाहीं. माणसाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें एवढी रक्कम ठेवणें आवश्यक आहे. इतकी रक्कम तुम्हीं आमच्याजवळ ठेवल्यास तुम्ही त्याला वाटेल तेथें ठेवा. मग कांहीं आमचें म्हणणें नाहीं." हेलन म्हणाली.

"ठीक आहे.तुमच्या मर्जीप्रमाणें होऊं द्या. गार्डनसाहेब, छत्तीस हजारांचा चेक लिहून द्या" त्याचें हें सफाईचें भाषण ऐकून गार्डनसाहेबाला फसविण्याचा त्याचा विचार असावा असें मीं अनुमान बांधलें. बहुतकरून अगोदर हे तीस हजार रुपये पदरांत पाडून घेतल्यावर माझा प्राण घेण्याचें त्यानें ठरविलें असावें." मॅकेअर म्हणाला.

हेलेनः—ठीक आहे; पण यापुढें माझ्या पित्याला कोणत्याही प्रकारचा त्रास देणार नाहीं अशी बायबलवर हात ठेवून शपथ वहा म्हणजे तुह्मांला चेक मिळेल. तसेंच आमच्या अटीप्रमाणें शेवटपर्यंत गेल्यास राहिलेलें तीस हजार रुपये आम्ही तुम्हांस देऊं. यासंबंधीं हवी तर आम्हीही शपथ घेण्यास तयार आहों.

नंतर हेलेननें कपाटांतून बायबल काढून तें टेबलावर ठेविलें. कांहीं वेळानें मॅकेअर उभा राहिला आणि बायबलवर हात ठेवून म्हणाला, " मी मॅकेअर बायबलची शपथ घेऊन सांगतों, कीं, गार्डननें मला तीस हजारांचा चेक दिल्यानंतर मी त्यास कोणत्याही प्रकारचा त्रास देणार नाहीं. किंवा त्याची फिरून भेट घेण्याचाहि प्रयत्न करणार नाहीं. या प्रमाणें ज्या शत्रूला आम्ही कैद केलें आहे त्याच्या केसांसही धक्का लागूं देणार नाहीं. "

एवढें बोलून तो खालीं बसला. नंतर गार्डन उठला आणि त्याच्याप्रमाणें बायबलवर हात ठेवून म्हणाला " अँड्रू गार्डन पवित्र बायबलची शपथ घेऊन असें सांगतो, कीं, राबर्ट मॅकेअर यास यथाशक्ति सहाय करीन ह्मणून पारीसमध्यें तारीख २० नव्हेंबर बुधवार रोजीं रात्रीं, मीं जी शपथ घेतली होती तिच्यांतून आज रोजीं रात्रीं तीस हजारांचा चेक देऊन मी मोकळा होत आहें. आतां मी याच्याशीं कोणत्याही प्रकारें प्रतिज्ञाबद्ध राहिलों नाहीं. बाकी त्याचे राहिलेले तीस हजार, त्यानें कैद केलेला माणूस मजजवळ सुरक्षितपणें आणून हजर केल्यानंतर मी त्यास देऊन टाकीन. आतां त्याची माझी कोणत्याही प्रकारें देवघेव राहिली नाहीं अथवा मी त्याच्या वचनांत राहिलों नाहीं. " याप्रमाणें शपथ घेतल्यावर मॅकेअरनें चेकबूक घेतलें आणि ठरल्याप्रमाणें तीस हजार रुपयांचा चेक लिहून तो मॅकेअरचे स्वाधीन केला. मॅकेअर तो अबदुलच्या हातीं देऊन म्हणाला " उद्यां हा चेक आग्रा बँकेत नेऊन पटव–आपलें येथलें काम आतां संपलें. मात्र येथून जाण्यापूर्वीं त्या कैद केलेल्या माणसासही घेऊन गेलें पाहिजे. मीं त्याला दुसऱ्या एका निराळ्या ठिकाणीं ठेवण्याचें ठरविलें आहे. तेव्हां आतां आपण माडीवर जाऊं. "

वरील शब्द कानांवर येतांच मी अगदीं कोपऱ्यांत जाऊन दडलों. अबदूल खोलीच्या बाहेर पडल्याबरोबर मॅकेअरला कैद करण्याचा माझा कृतसंकल्पच झाला होता. हा विचार मीं माझ्या साथिदारासही कळविला होता आणि त्या बरोबरच त्यांना तयार राहण्याची सूचना केली होती. कांहीं वेळानें खोलीचें दार उघडल्याचा आवाज माझ्या कानांवर आला व दिवा घेऊन अबदूल एकटाच माडीवर गेल्याचें मला दिसलें.

ईश्वरकृपेनें मला पाहिजे होती तशी संधि सांपडली. मीं चटकन किल्लीची शिटी फुंकली आणि ताबडतोब मॅकेअर, गार्डन वगैरे मंडळी ज्या खोलींत बसली होती तिकडे घुसलों. मला पाहतांच मॅकेअर खुर्चीवरून उठूं लागला; पण मीं त्याला जागच्या जागीं दाबून खालीं पाडलें आणि त्याच्या छातीवर बसलों. मी जिवंत आहें हें पाहून त्याच्या हृदयाला जबरदस्त धक्का बसला व तो निचेष्ट होऊन पडला. माझ्या पाठोपाठ माझे दोन साथिदार आले होते. त्यांच्या सहाय्यानें मीं मॅकेअरला कैद केलें. या वेळीं त्यानें पळून जाण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्याचा उपयोग कांहीं झाला नाहीं.

माझ्या शिटीचा इशारा पोहोंचून हवालदार व त्याच्या बरोबरचे दोघे कान्स्टेबलही कांहीं वेळानें तेथें येऊन दाखल झाले.

हवालदारास पहातांच मी म्हणालों "वर एक इसम गेला आहे त्याला जाऊन कैद करा."

हवालदार कान्स्टेबलला घेऊन वर जाऊं लागला तोंच मॅकेअर मोठ्यानें ओरडून म्हणाला "अबदुल एरेनम्-एरेनम्-एरेनम्—"

अबदुलला सावध करावें ह्मणूनच मॅकेअरनें ही सांकेतिक भाषा वापरली. मीं मॅकेअरला, बरोबरच्या त्या दोघा कान्स्टेबलच्या हवालीं करून गार्डन आणि त्याच्या मुलीला तेथून बाहेर पडण्याची सूचना केली. ही असंभाव्य घटना पाहून तीं अगदी गुंग होऊन गेली होती. मीं बाहेर जाण्याचें सांगितल्यावरून ती तेथून हळूं हळूं जाऊं लागली. ती अतिशय घाबरलेली पाहून मी म्हणालों, "गार्डनसाहेब, आपण बिलकूल भिऊं नका. या प्रकरणांत आपल्याकडे कांहीं दोष नाहीं. काल ज्या उद्देशानें आपणास फसविलें होतें तो माझा उद्देश आज सिद्धीस गेला आणि आपण मला क्षमा करा. आपण मला कैद केलें होतें याबद्दल मला बिलकुल राग नाहीं. कारण आपल्या चतुर कन्येच्या बुद्धिकौशल्यानेंच माझें प्राण वांचले. तुमच्या मुलीला जर माझी दया न येती तर आज त्या संकटांतून मुक्त होऊन माझा उद्देश मुळींच सिद्धीस न जाता. ईश्वरकृपेनें आज आपला शत्रु कैद झाला आहे. त्या दुष्टांच्या कचाट्यांतून आपण मुक्त झालां याबद्दल मला आनंद वाटतो. आपल्या मुलीचे उपकार मी कधींहि

विसरणार नाहीं. मी आतां तिला साक्षात् आपल्या कन्येप्रमाणें समजून तिच्या कल्याणासाठीं निरंतर झटेन. आज मॅकेअरला पकडून मीं तिच्या ऋणाची अल्पांशानें तरी फेड केली आहे. कारण त्या नीचानें तिचा सत्यानाश करण्याची प्रतिज्ञा केली होती.

माझें हें भाषण ऐकून हेलन ह्मणाली, " महाराज, मीं आपल्याकरितां असें काय केलें आहे ह्मणून आपण माझे एवढे उपकार मानतां ? मनुष्य प्राण्याचें एक कर्तव्य यापलीकडे मीं विशेष कांहीं केलें नाहीं; पण त्याला आपण उपकार समजून जर त्याची फेड करण्याचा प्रयत्न करीत असाल तर मला मुळींच समाधान वाटावयाचें नाहीं. आपण कोणत्याही हेतूनें केलेलें असो, पण आजचें आपलें कृत्य मला विलकूल पसंत पडलें नाहीं. मॅकेअर आमचा केवढाही भयंकर शत्रू असला तरी तो आज आमच्याकडे मित्र या नात्यानें आला होता. आमच्या शब्दांवर विश्वास ठेवून त्यानें आमच्या दारांत पाऊल टाकलें होतें. त्याला आपण कैद करून आमच्या पवित्र आतिथ्यधर्मावर कुठाराघात केला. यावरून हें सगळें आमचेंच कारस्थान असावें अशा प्रकारची त्याची समजूत झाल्याखेरीज राहणार नाहीं. आणि याबद्दल तो आम्हांस दोषी धरील. आपण त्यांस जितके भितां तितकी मी त्यांस भीत नाहीं. तो आमची काय हानि करणार आहे ? आणि कांहीं एकादी गोष्ट केली तरी ईश्वर सहाय्य असल्यावर तिचें एवढें काय वाटावयाचें? हेंच विचार मनांत आणून तो इतका अपराधी असतांही त्याचा सूड उगविण्याचें आम्ही मनांत आणीत नाहीं. इतकेंच नव्हें, तर त्याला क्षमा करणें हेंच आम्ही आमचें कर्तव्य समजतों."

एवढें बोलून हेलन स्तब्ध राहिली. यद्यपि अनेक प्रकारच्या भयंकर भानगडींत पडून माझें हृदय प्रस्तराप्रमाणें कठोर बनलें होतें तरी हेलनच्या अंतःकरणांतून निघणाऱ्या सरल प्रतिध्वनीनें तें लोण्याप्रमाणें विरघळलें. त्या वेळीं ती एकादी स्वर्गस्थ देवताच आहे कीं काय असें मला वाटून मीं तिला मनांतल्या मनांत प्रणाम केला. तिच्या ह्मणण्याप्रमाणें मॅकेअरला सोडणें शक्य नव्हतें. कारण त्यांत तिची स्वतःची किंवा तिच्या बापाचीच नव्हे तर सरकारचीही हानि होणार होती. ह्मणून ती कितीहि नाखुश झाली तरी मला आतां कांहीं करतां येणें

शक्य नव्हतें. मी तिला म्हटलें, "हेलन, मॅकेअरला कैद करणें आतिथ्याच्या दृष्टीनें अन्याय्य असलें तरी सरकारच्या दृष्टीनें विचार केल्यास मीं केलें हें बरोबर आहें असें मला वाटतें, त्याला वाटेल त्या रीतीनें कैद करणें हें माझें कर्तव्यच होतें. ते माझ्या दृष्टीनें मुळींच अन्याय्य नाहीं. सध्यां मी त्याला बिन्हार्डी घेऊन जातों. मग पुढें तुमच्या आमच्या विचारानें जें होईल तें करूं."

हेलनचें व माझें भाषण चाललें असतांनाच तिचा बाप कांहींच बोलला नाहीं; पण त्याच्या या मौनेचें कारण मला कळलें नाहीं. आमचें बोलणें संपल्यावर हेलननें त्याला तेथून जाण्याविषयीं सांगितलें पण तिच्या या सूचनेकडे लक्ष न देतां तो मजकडे पाहूं लागला. त्याच्या चर्येवरून तो बराच घाबरल्याचें मला दिसलें. तसेंच त्याला कांहीं विचारावयाचें आहे असेंहि मला वाटलें. मी त्याच्याकडे पाहून ह्मणालों, " गार्डनसाहेब, मला जर कांहीं विचारावयाची तुमची इच्छा असेल तर खुशाल विचारा. मी त्याचा खुलासा करावयास तयार आहें."

" गार्डनः—(भयभीत मनानें) आपण कृपा करून मला आपलें खरें नांव गांव कळवाल ? का तसें करावयास आपणास कांहीं अडचण आहे."

" मी:—कांहीं नाहीं, माझें नांव रामपालसिंह. मी लुधियाना प्रदेशांतील रहाणारा. सध्यां ब्रिटिशसरकारच्या गुप्तपोलिसखात्यांत कमिशनर आहें."

गुप्तपोलिस हा शब्द ऐकतांच गार्डनच्या चर्येवरील रंग पालटल्याचें दिव्याच्या प्रकाशांत मला स्वच्छ दिसलें. त्याची ही स्थिति पाहून मीहि थोडासा घाबरलों. हेलनची नजर त्याच्याकडे होतीच. तिनें चटकन त्याच्या गळ्यांत मिठी मारून म्हटलें, " बाबा, आपण अगदीं भिऊं नका. रामपालसिंह हे आपले मित्र आहेत. तें आपलें कधींहि नुकसान करणार नाहींत."

एवढें बोलून तिनें बापाचा हात धरला आणि त्याला ती खालीं घेऊन गेली. मी त्या उभतांना सलाम करून मॅकेअरास ज्या खोलींत ठेविलें होतें तिकडे गेलों. हेलनशीं आणि तिच्या बापाशी बोलण्यांत पंधरा एक

मिनिटें निघून गेलीं होतीं; तरी अबदुलला पकडून खालीं आणलें नव्हतें. माझ्या मनांत नाना प्रकारचे विचार येऊं लागले. असो, यानंतर एका कान्स्टेबलच्या पागोट्यानें मॅकेअरला टेबलाच्या पायाशीं बांधिलें आणि त्या दोघां कान्स्टेबलांना तेथें पहारा करण्याचें सांगून मी एकटाच माडीवर निघून गेलों. माडीवर गेल्यावर हवालदाराच्या आणि त्याच्या साथीदाराचा मी तपास करूं लागलों पण तेथें अंधार अतिशय असल्यामुळें मला कोणाचाच शोध लागेना. शिवाय इतक्या अंधारांत शोध करणेंहि मला बरें वाटलें नाहीं. कारण अबदुल पकडला न जातां तेथेंच जर कोठें लपून बसला असला तर तो मला ठार केल्याखेरीज रहाणार नाहीं अशी शंका मला आली. मीं दोन चार वेळां जागच्या जागीं उभा राहून शिट्टी वाजविली पण उपयोग झाला नाहीं. मीं पुष्कळ विचार केला पण काय भानगड आहे त्याचें मला मुळींच अनुमान झालें नाहीं.

थोडक्याच वेळानें मी पुन्हां मॅकेअरच्या खोलींत आलों आणि तेथला दिवा घेऊन बाहेर पडलों. बाहेर पडते वेळीं मीं खोलीच्या दाराला कडी लाविली आणि कान्स्टेबलांना सावध रहाण्यास सूचना केली.

हातांत दिवा घेऊन मी अतिशय घाईघाईनें जिना चढूं लागलों. पण इतक्यांत एका पायरीवरून माझा पाय घसरून खालीं पडतांच मोठ्या शिताफीनें सांवरलों. पाय घसरण्याचें कारण मी दिव्याच्या प्रकाशांत तपास लावूं लागलों तों येथून तेथून सर्व पायऱ्यांवरून रक्ताचा पाट वहात असलेला मला दिसला. तो प्रकार पहातांच मी इतका धीट पण माझें अंगही भयानें लटलटा कापूं लागलें आणि पुन्हां वर जाण्याचें धैर्य न होऊन मी तत्काळ खालीं उतरलों.

मी परत आलेलों पहातांच कान्स्टेबल आश्चर्यचकित झाले. मी त्याच्या आश्चर्याची पर्वा न करतां रस्त्यावरून कांहीं कान्स्टेबल व दहापांच माणसें घेऊन येण्यास त्यांच्यापैकीं एकास सांगितलें.

त्या वेळीं शेजारच्या चर्चमधील घड्याळांत दहा वाजल्याचें मला ऐकावयास आलें. ही वेळ पहारा बदलण्याची होती. त्यामुळें मीं पाठविलेल्या कान्स्टेबलास बाहेर कोणी पोलिस भेटतील किंवा नाहीं याची

मला शंकाच होती. उभे राहिल्या राहिल्या मी या सर्व गोष्टींचा विचार करीत होतों. मी आपल्या मनांतल्या मनांत ह्मणूं लागलों, " हवालदार आणि त्याचे साथिदार अजून आले नाहीं तर याचा अर्थ काय ? अब्दुलनें त्यांचे खून तर केले नसतील ? पण तो एकटा इतके खून कसा करूं शकेल ? फार झालें तर एकादोघाला मारील. एकदम तिघांना मारणें कांहीं सामान्य गोष्ट नव्हे पण अजूनपर्यंत तिघांपैकीं कोणिहि परत आलें नाहीं. हीही गोष्ट तितकी खरी आहे ! "

या विचारानें माझें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें होतें. याच वेळीं कित्येक माणसांचा पावलांचा आवाज माझ्या कानांत येऊन मी समोर पाहतों तों दोन युरोपियन पोलिस ऑफिसर मजकडे येत असतांना मला दिसलें.

त्यांच्यापैकीं एकजण जवळ येतांच मला म्हणाला, " तुम्ही कोण आहां ? " " मी गुप्तपोलीसचा कमिशनर आहे. दोघां खुनी माणसांपैकीं एका माणसाला मीं नुकतेंच पकडून शेजारच्या खोलींत ठेवलें आहे. दुसरा मात्र वर पळाला तो अजून हातीं लागला नाहीं. त्याला पकडण्यासाठीं एक हवालदार आणि दोन कान्स्टेबल पाठवून अर्धा घंटा झाला; पण अजून कोणाचाच पत्ता नाहीं. यांचा शोध करण्यासाठीं मी स्वतः वर चाललों होतों तों मध्यंतरीच जिन्यांत रक्ताचा पाट वाहात असलेला मला दिसला. मला संशय उत्पन्न होऊन मी खालीं उतरलों आणि आणखी कांहीं पोलिसांना घेऊन येण्याविषयीं येथला एक कान्स्टेबल पाठविला आहे. आपण बहुतकरून त्याच्याच बोलावण्यावरून आले असावेत. "

मी अस्खालित इंग्रजीत बोलतों असें पाहून त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, " आम्हांला कोणी बोलवावयास आलें नाहीं. या घराच्या दारासमोरच एका कान्स्टेबलाचा खून होत असलेला पाहून आम्ही इकडे आलों. ज्यानें त्याचा खून केला होता तो आम्हांला पाहतांच पळून गेला. त्याच्या हातांत रक्तानें भरलेला एक सुराही होता. या भानगडीचा विचार नंतर करूं. आम्हांला अगोदर या घराच्या मालकाला भेटावयाचें आहे."

एका कान्स्टेबलाचा खून झाला हें ऐकून मी स्तंभितच झालों. मॅकेअरला पुढें कैद करण्यानें असा भयंकर परिणाम होईल हें जर मला अगोदर कळलें असतें तर मी या भानगडींत मुळींच न पडतों. हें सगळें काम त्या बदमाष अबदुलचें असावें हें आतां माझ्या लक्षांत आलें. त्यानेंच त्या सर्वांना दगा देऊन ठार केलें असलें पाहिजे. हे दोन साहेब जर या वेळीं इकडे न येते तर त्यानें त्यांच्याबरोबर आम्हालाही स्वर्गाची वाट दाखविली असती. मॅकेअरला कैद केलेलें पाहून आम्हां सर्वांना ठार करून त्याची सुटका करण्याचा त्याचा विचार असावा. थोड्या वेळानें मी माडीवर त्या भानगडीचे शोध करण्याचें त्या दोन पोलीस ऑफिसरांना कळविलें. त्या दोघांपैकीं एक इन्स्पेक्टर आणि दुसरा सार्जंट असल्याचें मला कळलें. आम्ही तिघेही जिन्यावर चढतों तों रक्ताचा पाट आमच्या पाहण्यांत आला. हाय ! कसलें भयंकर दृश्य तें ! आम्ही अगदीं जलदीनेंच जिना चढूं लागलों. अगदीं वरच्या पायरीपाशीं एका कान्स्टेबलाचें प्रेत उघडें पडलें होतें. आम्ही जवळ जाऊन पोहोंचतों तों त्याच्या छातींत आणि पाठींत सुरा भोसकल्याचें आम्हांला आढळून आलें. जिन्याच्या पायऱ्यावरून जो रक्ताचा पाट वहात होता, तो याच्याच शरीरांतला. बिचाऱ्याचे प्राण केव्हांच निघून गेले होतें ! आम्ही तें प्रेत तशाच स्थितींत टाकून पुढें गेलों; पण जरासें पुढें गेलों तोंच हवालदार रक्तबंबाळ होऊन पडलेला आह्मांस दिसला ! त्यानें आम्हांला खुणावून आपल्याजवळ बोलावून घेतलें. याच्या पाठींत सुरा भोकसला होता. त्यानें आम्हांजवळ पाणी मागितलें; पण तेथें पाणी मुळींच नव्हतें. आम्हीं तिघांनीं त्याला मोठ्या तजविजीनें उचलून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन निजाविलें आणि त्याची जखम एका फडक्यानें बांधून टाकली. यामुळें त्याच्या अंगातून रक्त वाहणें बंद झालें. तो वरचेवर आम्हांला हाताचा इशारा करून पाणी मागत होता; पण त्याला आम्ही पाणी द्यावयाचें कोठून ? आतां आम्ही त्या तिघांपैकीं उरलेल्या कान्स्टेबलाचा शोध करूं लागलों. पण त्याचा शोध लागला नाहीं ! अखेर निरुपाय होऊन आम्ही खालीं आलों. येतांना आम्ही हवालदराला खालीं उचलून आणलें; आणि जमादाराला लौकर पाणी

आणण्यास पाठविलें. दरम्यान मीं हवालदरांना पुष्कळ प्रश्न विचारले. पण अबदुलला पकडीत असतांना त्याची अशी अवस्था झाली. यापलीकडे त्याजकडून आम्हांला विशेष माहिती काढतां आली नाहीं.

यानंतर मीं हवालदाराला कांहीं विचारीलें नाहीं. मॅकेअरला घेऊन मीं घरीं जाण्याचें ठरविलें. या कामीं मीं इन्स्पेक्टरचें सहाय्य मागितलें आणि त्यांनींही तें देण्याचें कबूल केलें.

थोड्या वेळानें मीं मॅकेअरला त्या खोलीच्या बाहेर काडलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यानें या प्रसंगीं आम्हांला कोणताही त्रास दिला नाहीं. त्याचा आम्हीं झाडा घेतला त्या वेळीं त्याजवळ एक सातबारी पिस्तुल, एक क्लोरोफार्मची बाटली आणि आणखी कांहीं कागदपत्र निघाले. त्या सगळ्या वस्तु मीं आपल्याजवळ ठेवून घेतल्या. त्याचे हातपाय आणि कमर खूप कसून बांधल्यावर आम्ही त्याला घेऊन तेथून निघावयास तयार झालों. हवालदारालाही शिपायाकडून बाहेरच्या व्हरांड्यांत आणून ठेविलें. नंतर पहारेवाल्याची कशी काय स्थिती आहे ती पहावी म्हणून आम्ही आंत गेलों. त्याच्या खांद्यावर सुरीची जखम होऊन तिच्यांतून पुष्कळ रक्त गेल्यामुळें तो बेशुद्ध होऊन पडला होता. त्याला तेथून उचलून दुसरीकडे नेण्याची मीं व्यवस्था केली आणि त्याला व हवालदाराला दवाखान्यांत पोहोंचवण्याची कामगिरी इन्स्पेक्टरकडे सोपविली.

प्रकरण ६ वें.

मॅकेअरची सुटका.

(सरदार रामपालसिंगाची आत्मकथा.)

सुमारें एक घंट्याच्या आंतच मी मॅकेअरला घेऊन आपल्या बिऱ्हाडीं येऊन पोहोंचलों. इन्स्पेक्टर आणि सार्जंट या उभयतांचे मदतीनें मीं मॅकेअरला आंत नेण्याची व्यवस्था केली. माझ्या निजण्याच्या खोलीजवळच एक कोठीघर होतें. तें अगदीं भरभक्कम असून त्यांना एकही

खिडकी नव्हती. इन्स्पेक्टरचें नांव डेव्हिस असून त्याची शिराजगंज ठाण्यावर नेमणूक झाली होती. दुसऱ्या दिवशीं येण्याचें कबूल करून इन्स्पेक्टरनें माझा निरोप घेतला. आमच्यापैकीं जो एक कान्स्टेबल नाहींसा झाला होता त्याचा पत्ता लावण्याविषयीं मीं त्याला जातांना बजाविलें.

भोजन केल्यावर मी आपल्या बिछान्यावर पडलों. सर्व दिवसभर अतिशय श्रम झाल्यामुळें आंथरुणावर अंग टाकल्याबरोबर मला झोंप आली. पण माझ्या दुर्दैवानें ती फार वेळ टिकली नाहीं. थोडक्यांच वेळांत एक भयंकर आवाज माझ्या कानावर आला आणि मी खडबडून उठलों. बराच वेळ विचार केला तरी तो शब्द कोठून आला हें मला कळलें नाहीं. सगळें घर धुंडाळलें पण व्यर्थ! मॅकेअरला ज्या खोलींत ठेवलें होतें तिकडे जाऊन पाहिलें; पण तेथें सर्व ठीक होतें. पहारेकरी जाग्यावर असून सर्व भिंती सुरक्षित होत्या. बाहेर कोणीं बंदूक उडविली तिचा हा आवाज होता असें मला पहारेवाल्याकडून कळलें; पण ती कोणीं उडविली तें कळलें नाहीं. माझ्या एका साहसी साथिदाराला या गोष्टीचा तपास लावण्यासाठीं मीं बाहेर पाठविलें; पण बाहेर कुणी नाहीं असें तो मनुष्य सांगत आला. यानंतर मी निराश होऊन आपल्या खोलींत जाऊन निजलों. किती वेळ निजलों असेन हें मला नक्की सांगतां येत नाहीं; पण मी पुन्हा जागा झालों त्या वेळीं रात्रींचे तीन वाजले होते. या वेळीं दारावर कोणीं धक्का मारला होता. मीं निजल्या निजल्या घाबरून विचारलें "कोण आहे?"

हा माझा प्रश्न ऐकतांच बाहेरून कोणी ओरडून म्हणालें "लौकर बाहेर या. आपला मनुष्य पळून चालला आहे."

आवाजावरून हा मनुष्य माझा विश्वासू चाकर लक्ष्मण असावा असें मला वाटलें. मी घाईघाईनें बाहेर आलों. बरोबर याच वेळेला सडकेवर कित्येक माणसें 'पळाला पळाला' असें मोठ्यानें ओरडत धांवत होतीं. मीं पुन्हां मॅकेअरच्या खोलीजवळ जाऊन तपास केला; पण सगळें व्यवस्थित दिसलें. मग मनुष्य पळाला कसा? पण याही वेळेला पुन्हां लक्ष्मण-

प्रसाद सडकेवरून ओरडून म्हणाला " हुजूर, खरोखरच मनुष्य पळाला. दार उघडून पहा. "

मीं घाबऱ्या घाबऱ्या मॅकेअरच्या खोलीचें दार उघडून पाहिलें. तों तेथें खरोखरच त्याचा पत्ता नाहीं. मी अगदीं गुंग होऊन गेलों. इतक्यांत लक्ष्मणप्रसाद पुन्हां ओरडून म्हणाला, " बाहेर या बाहेर हुजूर, मीं त्याला पकडलें. "

पण मी बाहेर जाऊन पहातों तों तेथें कोणीच नव्हतें. " लक्ष्मण " " लक्ष्मण " ह्मणून मीं पुष्कळ हाका मारिल्या पण कोणींच ओ दिली नाहीं. मात्र थोड्या वेळानें, " अरे ! बेवकुबा ! तुझा लक्ष्मण येथें कोठें आहे ? " असे शब्द माझ्या कानावर आले.

मला या भानगडीची आरंभींच कल्पना झाली होती; पण अबदुलचा स्वर ओळखीपर्यंत माझें भ्रमपटल दूर झालें नाहीं. चतुर अबदुलनें मला सोळा आणें फसाविलें. " मॅकेअर तर पळाला, आतां काय करावयाचें ? " मी आपल्या मनाशीं ह्मणालों. यानंतर मीं लक्ष्मणप्रसादास हांक मारिली. तो डोळे चोळीत चोळीत मजपुढें आला. मीं त्याला विचारलें " लक्ष्मण, तूं एवढा वेळ कोठें होतास ? मॅकेअर पळाला हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ? "

लक्ष्मण—नाहीं बुवा ! मी आतांच झोपेंतून उठलों. घरांत कांहीं गडबड—

लक्ष्मणचें भाषण ऐकून मी आश्चर्यचकित झालों. अबदुलनें त्याच्या आवाजाप्रमाणें आवाज काढून येवढी भानगड केली तर ? मीं ज्या वेळीं खोलीचें दार उघडलें त्या वेळीं तो तेथेंच असला पाहिजे तर मग फिरून कसें शून्य झालें ? मॅकेअर प्रथम कवाडाच्या बगलेला उभा असावा आणि मी दार उघडतांच तो त्याच्या आड लपला पाहिजे. याच वेळीं अबदुलनें लक्ष्मणच्या आवाजाचें अनुकरण करून ' मनुष्य पळाला' अशी आरोळी ठोकली असेल आणि ही संधि साधून मॅकेअरनें पलायन केलें असावें. जाळ्यांत अडकलेलें पांखरूं निसटलें तर खरें ! आतां पुन्हां त्याला पकडावयाचें ह्मणजे सहज काम नव्हें.

या विचाराबरोबरच आपण आतां पुढें काय करावयाचें हा प्रश्न माझ्या मनांत उभा राहिला. दुसरे दिवशीं सकाळींच मी किल्ल्यांत

जाऊन जनरल हे साहेबांना भेटलों. त्यांनीं गेल्या दोन दिवसांत माझी भेट कां झाली नाहीं याचें कारण विचारलें. त्या अवधींत घडलेल्या एकंदर भानगडी मीं त्यांना थोडक्यांत कळविल्या त्यानंतर मीं त्यांना विचारलें "मॅकेअर नांवाचा कोणी शिपाई आपल्या पलटणींत आहे ?"

जनरल हे--नाहीं, आमच्या पलटणींत या नांवाचा कोणीच शिपाई नाहीं, मात्र कॅपटन रॉबर्ट नांवाचा एक मनुष्य काल संध्याकाळपासून नाहींसा झाला आहे.

त्यांचें हें भाषण ऐकून मीं सेनाविभागाचा आल्बम मागितला. त्या सैन्यांतील बहुतेक सर्व शिपायांचे आणि अधिकाऱ्यांचे फोटो होते. त्यांतला एक फोटो माझ्या दृष्टीस पडतांच मी आश्चर्यानें उद्गारलों, "अरे हाच तो चोर मॅकेअर !"

जनरल हे--काय म्हणतां ? हा तर आमच्या सैन्यांतला एक अत्यंत साहसी आणि विश्वासू वीर आहे. इतक्यांत मीं ज्याचें नांव घेतलें तोंच हा कॅपटन रॉबर्ट. याच्या कामगिरीबद्दल सरकारांत याची फार प्रशंसा झाली आहे. काल रात्रीपासून त्याचा पत्ता न लागल्यामुळें त्याच्या तपासासाठीं आम्हीं दहा घोडेस्वार पाठविले आहेत.

मी ह्मणालों, "वा ! जनरलसाहेब. हा तर फ्रान्स देशांतील एक प्रख्यात घोडेस्वार आहे. यानें आजपर्यंत किती दरोडे घातले असतील आणि किती खून केले असतील याचा पत्ता लागावयाचा नाहीं. येथें येऊन हा ब्रिटिशसरकारच्या नोकरीला राहिला आहे पण त्यांच्याविरुद्ध त्यानें कारस्थान चालविलें आहे. मीं त्यास काल पकडलें होतें पण अखेर तो माझ्या जाळ्यांतून निसटला. याच वेळीं अबदुल नांवाच्या एका बदमाषाच्या हातूस पोलिसचा एक इसम ठार झाला आणि दोघे जखमी झाले. आतां या बाबतींत पुढें काय करावयाचें यासंबंधीं आपला सल्ला घेण्यासाठींच मी आपणाकडे आलों आहें.

जनरल हे--(आश्चर्यानें) तो असा मनुष्य असेल अशी आजपर्यंत आम्हांला बिलकुल कल्पना नव्हती. बाह्यतः त्याचें वर्तन सर्वांशीं फार चांगलें असे ह्मणून त्याचा आम्हांला आजपर्यंत कधीं संशय आला नाहीं. असो. तो मनुष्य इतका भयंकर आहे त्या अर्थीं त्याला कैद करणें हें

आपलें कर्तव्य आहे; आणि ही कामगिरी कशा प्रकारें पार पडावी हें माझ्यापेक्षां आपल्याला चांगलें समजतें, ह्मणून आपणास योग्य वाटेल तसें करावें असा या बाबतींत माझा आपल्याला सल्ला आहे.

जनरल हेशीं अधिक वाटाघाट करणें व्यर्थ आहे, असें जाणून मी मॅकेअरचा फोटो घेऊन निघालों. घरीं जाऊन पोंहोचलों तों इन्स्पेक्टर डेव्हीस तेथें बसलेला होता. तो मला पाहून उभा राहिला. मीं त्याला आदरपूर्वक खालीं बसवून मॅकेअरच्या पलायनाची बातमी त्याच्या कानावर घातली. यावर तो कांहीं विचार करून मला ह्मणाला, "माझ्या मतानें मॅकेअरला पकडण्याच्या उद्योगांत अधिक काळ न घालवितां अगोदर अबदुललाच तावडतोब पकडावें. कारण खरा खुनी तोच असून त्याच्या विरुद्ध पुरावाही पुष्कळच आहे. उलटपक्षीं मॅकेअरच्या बाबतींत तसें नाहीं: तो जरी अपराधी असला तरी त्याच्या विरुद्ध कोणी साथीदार नाहीं. यावरून त्याच्यावर अपराध शाबीत करणें कठिण जाईल. त्याचा मुख्य साथीदार अबदुलच असल्यामुळें त्याला एकदा पकडल्यावर त्यालाही सहज पकडतां येईल. सारांश, अबदुलला पकडणें म्हणजे एका दगडानें दोन पक्षी मारण्यासारखें आहे. काल आपण मॅकेअरला पकडण्याच्या भानगडींत न पडतां अबदुलला जर पकडलें असतें तर इतकी भानगड न होती. असो. झालें तें झालें. आतां तसें करूं नका. अगोदर अबदुललाच पकडा."

इन्स्पेक्टर डेव्हीसचें हें भाषण माझ्या हृदयांत खोल जाऊन भिडलें. मात्र त्यावरून तो मोठा बुद्धिमान आणि दूरदर्शी माणूस आहे असें मला दिसून आलें.

याप्रमाणें बराच वेळ माझ्याशीं भाषण केल्यावर तो निघून गेला. त्याला मी जातेवेळीं विचारलें, "त्या कान्स्टेबलाचा कांहीं तपास लागला ?"

यावर तो अत्यंत दुःखानें म्हणाला, "त्या बिचाऱ्याची फारच वाईट स्थिती झाली आहे. त्याला खालीं ढकलल्यामुळें त्याचा एक पाय आणि एक हात मोडला आहे. अबदूलनें मला खालीं ढकललें असल्यानें

माझ्या प्रश्नाचें उत्तर देतांना सांगितलें. पण तें कसेंहि असो, विचारा अजून जिवंत आहे एवढी गोष्ट खरी. ”

यानंतर इन्स्पेक्टर निघून गेला.

अंमलशानें मी टेलिग्राफ ऑफिसांत गेलों. त्या वेळीं कानपुरांत गव्ह-र्नमेंट टेलिग्राफ ऑफिस उघडलें होतें. मात्र या आफिसांतून फक्त सरकारी काम काजाच्याच तारा जात येत असत, मी ऑफिसांत जातांच तेथच्या मुख्य अधिकाऱ्याला भेटलों आणि मी कोण आहें हें त्याला कळवून लार्ड क्यानिंगला एक जरूरीची तार पाठवावयाची आहे, म्हणून मीं त्यांस सांगितलें. त्या अंधिकाऱ्यानें मला प्रथम ओळखलें नाहीं, त्यामुळें अर्थातूच त्यानें नाकारलें; पण पुढें पंधरा मिनिटांच्या आंतच जनरल हे कडून मीं आपली ओळख जेव्हां त्याला पटविली तेव्हां तो मुकाट्यानें माझ्या म्हणण्यास कबूल झाला. लॉर्ड कॅनिंग साहेबांना मीं पुढील आशयाचा विद्युत्संदेश (तार) पाठविला.

“ रॉबर्ट मॅकेअर नांवाचा फ्रेंच दरोडेखोर आपलें नांव बदलून कान-पूरच्या ब्रिटिश सैन्यांत नोकरीला राहिला आहे. तो पहिला बंडखोर असून हिंदुस्थानांतून ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याचें एक भयंकर कार-स्थान त्यानें रचलें आहे. विठूरचे नानासाहेब आणि तात्या टोपेहि त्याच्या या कटांत सामील आहेत. काल रात्रीं मीं त्यांना पकडलें होतें; पण अबदूल नांवाच्या एका साथिदाराच्या सहाय्यानें तो पुनः निसटला. काल रात्रीं याच अबदूलनें एका कान्स्टेबलाला ठार मारून दोघांना जखमी केलें. आपण चंद्रनगरच्या फ्रेंच अधिकाऱ्याकडून त्याला पकडण्याचा परवाना आणून तो मजकडे जरूर पाठवावा. याच वेळीं रॉबर्ट मॅकेअर नांवाचा दरोडेखोर फ्रान्स देशांत आहे किंवा नाहीं हेंही त्यांना विचारून घ्यावें. ”

याप्रमाणें तार देऊन मी जेम्स नांवाच्या एका इंग्रज फोटोग्राफरच्या घरीं गेलों. त्या वेळीं मॅकेअरचा फोटो मजजवळ होता. तो त्याच्या स्वाधीन करून त्याच्या दोन डझन प्रति बनविण्याचें मीं त्याला सांगि-तलें आणि त्याच वेळीं त्याला असेंहि सांगितलें कीं, “ जर तूं हें काम

दोन दिवसांच्या आंत करून देशील तर त्याच्या ठरलेल्या दामाशिवाय मी आणखी दहा रुपये जास्त इनाम देईन. ”

त्यानें माझें म्हणणें मोठ्या आनंदानें कबूल करून माझा पत्ता टिपून घेतला. यानंतर मी आपल्या बिऱ्हाडीं निघून आलों आणि हेलनला पुढील आशयाचें पत्र लिहून सावध केलें.

“ मॅकेअर पळून गेला. कालरात्रीं अबदूलनें एक पोलिस ठार करून तिघे जखमी केले. मॅकेअरशीं कोणत्याहि प्रकारें संबंध न ठेवण्याविषयीं तुम्हीं आपल्या वडिलांना सूचना द्यावी. त्याचप्रमाणें तुम्हीं स्वतः नेहमीं सावध रहावें. मॅकेअर फार अधम मनुष्य आहे. तो कोणत्या वेळीं काय करील याचा नेम नाहीं. त्याला आणि अबदूलला पकडण्याच्या मी प्रयत्नांत आहें.” सुमारें एका घंट्यानेंच मला हेलनकडून या पत्राचें उत्तर मिळालें तें पुढील आशयाचें होतें.

“ आपलें पत्र पोहोंचलें. आपण तिसरेंप्रहरीं मला अवश्य येऊन येऊन भेटावें. ”

चार वाजण्याच्या सुमारास मी गार्डनच्या घरीं गेलों. माझी वाट पहात हेलन वाटेंतच बसली होती. ती मला पहातांच मजकडे धांवत आली आणि माझा हात धरून म्हणाली “ महाराज, कसेंहि करून माझ्या बापाला वांचवा. माझ्या हातून जर तुमचें थोडेंबहूत हित झालें असेल तर त्याचा मोबदला मला माझ्याच प्राणदानानें द्या. ”

एक अल्पवयस्क सरल बालिका मजजवळ आपल्या पित्याच्या प्राणाची भिक्षा मागत होती. हें पुण्यमय दृश्य पाहून माझें मन विरघळल्यावांचून राहिलें नाहीं. तिच्याबरोबर माझ्याही नेत्रांतून अश्रुबिंदु ठबकूं लागले. अखेर मीं मोठ्या मुष्कीलीनें स्वतःच्या मनोवृत्ति आवरून धरून तिला म्हटलें, “हेलेन, रडूं नकोस. तुझ्या बापाचें रहस्य मी कोणाजवळही प्रकट करणार नाहीं याबद्दल मी तुला वचन देतों. त्यांचें पारीसचें रहस्य सर्व मला कळलें आहे; पण तूं जें मला प्राणदान दिलेंस त्याला स्मरून तें तसेंच्या तसें माझ्या हृदयांत कायम राहील. त्याचा उच्चार माझ्या मुखावाटें कधींहि होणार नाहीं. तुझ्या कुटुंबांतील कोणाही माणसाचें माझ्या हातून अकल्याण होणार नाहीं असें तुला वचन देतों. ”

हेलनः—(दीर्घ निश्वास सोडून) कालपासून माझ्या बाबांची तबियत फारच बिघडलेली आहे. त्यांना ज्वर येत आहे. याचमुळें मॅकेअरची हकीगत मीं त्यांना अजून कळविली नाहीं. आपण गुप्त पोलिस आहां हें त्यांना समजल्यामुळें ते अत्यंत भयभीत झाले असून त्यांना आपले प्राण जाण्याची भीति वाटत आहे. या सर्व गोष्टी आपल्याला कळवून या बाबतींत आपल्याला प्रत्यक्ष विनंति करावी, म्हणूनच मीं आज आपल्याला बोलाविलें होतें. आपणास जी तकलीफ दिली त्याबद्दल मी आपली क्षमा मागतें. माझ्या विनंतीला मान दिला याबद्दल मी आपली अत्यंत आभारी आहें.

एक वेळ गार्डनला भेटावें अशी माझी इच्छा होती; परंतु त्याची प्रकृति बिघडल्याचें ऐकून मीं ती जागच्या जागीं दाबली, व यानंतर पुन्हां लौकरच भेटेन असें हेलनला आश्वासन देऊन तिचा निरोप घेतला.

याच दिवशीं रात्रीं लॉर्ड कॅनिंग साहेबांकडून मला तार आली त्यांत पुढील मजकूर होता—

" राबर्ट मॅकेअर हा फ्रान्स देशांतला एक प्रख्यात दरोडेखोर आहे. त्यास तिकडे फांशीची शिक्षा झाली होती; पण १८५० मध्यें तो तेथील तुरुंगांतून पळून गेला. फ्रेंच सरकारनें त्याला पुष्कळ दिवसांपासून वारंट काढिलें आहे आणि त्याला पकडून देणाराला दहा हजारांचें बक्षिस ठेविलें आहे. आपण त्याला शक्य तितक्या लौकर पकडावें; त्याच्या कारस्थानामुळें ब्रिटिश राज्यास पुष्कळ त्रास होण्याचा संभव आहे. "

लॉर्ड कॅनिंग.

फोटोग्राफर जेम्सकडून मला दुसरेच दिवशीं मॅकेअरचे फोटो मिळाले. त्याची एकेक प्रत आमच्या हाताखालच्या नौकरास देऊन त्यांना दहा हजारांच्या बक्षिसाचीही माहिती करून दिली. यानंतर आपले चार-पांच साथिदार घेऊन मी बाहेर पडलों. गार्डननें मॅकेअरला जो तीस हजारांचा चेक दिला होता. तो अबदुलनें वटवून आणण्याचें ठरलें होतें. तेव्हां तो आग्रा बँकेकडेसच गेला असावा असें मला वाटून त्याला तेथेंच पकडावा या हेतूनें मीं आपला मोर्चा तिकडे फिरविला. "

प्रकरण ७ वें.

समाधिक्षेत्र.

(ब्रिगेड सर्जन स्टिफनची जबानी.)

"मी जज्ज हॅमिल्टनच्या घरांतून परतलों त्या वेळीं पांच वाजले होते. माझा नाइलाज होऊन मी आपल्या घराकडे न जातां गार्डनच्या बंगल्याकडे वळलों. तेथें त्याची बरीच मित्रमंडळी जमली होती. कफनाची तयारी चालली होती; पण मुर्दा मात्र खालीं अजून आणला नव्हता. याचें कारण पाद्रीसाहेब अजून आले नव्हते हें होय.

दारुण दुःखामुळें गार्डनची अवस्था शोचनीय झाली होती. मी त्याला भेटण्यासाठीं वर गेलों. हेलनच्या खोलीच्या दारावर स्वतः पोलिस-इन्स्पेक्टर आणि तीन सार्जंट पहारा करीत होते. त्यांना विचारल्यावरून गार्डन शेजारच्याच खोलींत असल्याचें मला कळलें. त्या खोलीचा दरवाजा आंतून बंद होता. मी हळू हळू दारावर धक्के मारूं लागलों. पहिल्यानें मला कांहीं ऐकावयास आलें नाहीं. पण मागून क्षीण स्वरानें " कोण आहे ? " असा ध्वनि माझ्या कानांवर आला. " मी स्टिफन आहें. एका महत्त्वाच्या कामासाठीं आलों आहें. "

माझ्या या उत्तरानें गार्डननें दरवाजा उघडला ! अरे बापरे ! गार्डनचा चेहरा किती तरी पालटून गेला होता. त्याचा शोक अजूनही थांबला नव्हता. जज्ज हॅमिल्टननें दिलेलें पत्राचें पुडकें मीं त्यांच्या हातांत देऊन त्यांना म्हटलें, " जज्ज साहेबांच्या येथेंही काल एक भयंकर प्रकार घडून आला. त्यामुळें त्यांना इकडे येणें अशक्य होऊन त्यांनीं हें पत्राचें पुडकें मजबरोबर पाठविलें आहे. "

गार्डन--(घाबरून) काय झालें ?

पण हेन्रीच्या मृत्यूची बातमी त्यांना कळविणें मला बरें न वाटून मीं म्हटलें " जाऊं द्या कीं, या वेळीं आपण ती हकीगत ऐकून काय करणार ?"

गार्डन--हेलनच्या मृत्यूची बातमी हॅमिल्टन आणि हेन्री या दोघांना कळली काय ?

मी—होय. हॅमिल्टनसाहेबांना कळली आणि तिजमुळें त्यांना पराकाष्ठेचें दुःख झालें !

गार्डन कांहीं वेळ स्तब्ध राहून म्हणाले, "हॅमिल्टनसाहेबांनीं हीं पत्रें माझ्याकडे कां पाठविलीं ? "

नंतर त्यांतील एक पत्र वाचतांच गार्डन रडूं लागला आणि रडतां रडतां मला ह्मणाला, " स्टिफन स्टिफन, मी खरोखरच अतिशय निर्दय आहें. मी हेलेनासारख्या स्वर्गीय देवतेचा पिता व्हावयाला बिलकूल लायक नाहीं. मींच तिला दुःखांत लोटलें ! ही सुंदर आणि पवित्र कलिका अकालींच सुकली याचें कारण हाच अधम ! हाय ! आज माझ्या हृदयांत भयंकर आग पेटली आहे'.'

याच वेळीं मला पोलिसकमिशनरनें बाहेर बोलाविलें. मी ताबडतोब बाहेर पडलों. तेथें पाद्री विल्सनसाहेब आणि इतर कांहीं पोलिस अधिकारी हेलनचें प्रेत नेण्याच्या उद्योगांत गढले होते.

मला पहातांच पोलिसकमिशनर म्हणाले, "गार्डनसाहेबांना विचारा. हेलनचें प्रेत अजून न्यावें का नाहीं तें ? "

मीं ताबडतोब आंत जाऊन गार्डनला विचारलें. पण कांहींच उत्तर न देतां ते स्वतःच मजबरोबर बाहेर आले. यावेळीं त्याचें रडणें आतां थांबलें असून त्यांनीं अत्यंत शांतता धारण केली होती.

गार्डन बाहेर येतांच नीट हेलनच्या खोलींत गेला. मीहि ताबडतोब त्याच्या मागोमाग तिकडे गेलों.

गार्डननें हेलनच्या तोंडावरील कपडा काढला. ती आतां शुद्ध प्रेत बनली होती. तरी तिच्या मुखमंडळावरील ती अपूर्व सरलता अजून जशीच्या तशी कायम होती, तथापि मला तिजकडे अधिक वेळ बघवेना. ती अजून झोंपलीच असावी असें मला वाटत होतें. पण ही झोंप कायमची होती. या झोंपेच्या स्वाधीन झालेल्या माणसाला मृत्युलोकांतील आनंदाचा अनुभव पुन्हां घेतां येत नाहीं.

त्या मनोहर पण निश्चल मूर्तीकडे कांहीं वेळ पाहिल्यानंतर गार्डन ह्मणाला, "माझ्या खोलींत जाऊन एक कातरी घेऊन या बरें."

मीं कातर आणून दिली. ती घेऊन गार्डननें तिच्या केंसांचा एक गुच्छ

कातरला आणि तिची स्मृति अंतःकरणांत कायमची रहावी ह्मणून तिला एकदां पोटभर पाहून घेतलें.

नंतर कांहीं वेळानें गार्डन मजकडे पाहून रडत रडत ह्मणाला, "स्टिफन, मी आज हेलनचें शेवटचें दर्शन घेत आहें."

एवढें बोलून गार्डन त्या खोलीच्या बाहेर पडला आणि दुसऱ्या एका खोलींत जाऊन त्यानें तिचें दार लावून घेतलें. यानंतर पाद्री विल्सन हेलनच्या प्रेताजवळ येऊन तिच्या आत्म्याला समाधान मिळण्याकरितां ईश्वराची प्रार्थना करूं लागला.

" ही प्रार्थना संपल्यावर पोलिसकमिशनरप्रभृति पोलिस ऑफिसरांनीं हेलनचें प्रेत बाहेर आणलें आणि तें स्मशानाकिडे घेऊन निघाले. या प्रेतयात्रेबरोबर मीहि तिकडे गेलों. पाठीमागें गार्डनच्या घरांत पोलिस इन्स्पेक्टर आणि इतर दोन चार मंडळी राहिली.

सुमारें एका घंटयानें आम्ही सर्व मंडळी स्मशानभूमींत जाऊन पोंहोचलों, पण तेथें जातांच दुसरा एक तितकाच शोचनीय देखावा आह्मांस दिसला. जज्ज हमिल्टन आणि आणखी कांहीं मंडळी हेनरीचें प्रेत घेऊन त्याच वेळीं तेथें येऊन दाखल झाले होते. मला पाहिल्याबरोबर हमिल्टनसाहेब मजजवळ आले आणि अत्यंत दुःखानें ह्मणाले, " मी आपलीच वाट पहात होतों. जिवंत असतांना जें जोडपें प्रणयसूत्रानें बद्ध झालें होतें आणि आपण निरंतर एकाच ठिकाणीं रहावें अशी ज्यांची इच्छा होती तें मेल्यावरही एकाच ठिकाणीं पुरलें जावें अशी माझी इच्छा आहे आणि मला अशी आशा आहे, कीं, गार्डनसाहेब माझ्या या इच्छेच्या आड येणार नाहींत."

जज्जसाहेबांचें हें भाषण ऐकून मीं म्हटलें, " गार्डनसाहेब आपल्या या इच्छेच्या आड काय ह्मणून येतील ?"

यानंतर त्या प्रेमबद्ध जोडप्याचीं नश्वर शरीरें एकाच ठिकाणीं पुरलीं! आणि सर्व मंडळी अश्रु गाळीत गाळीत घराकडे परतली !

मी आपल्या घरीं येऊन पोहोंचलों. त्या वेळीं रात्रीचे साडेआठ वाजले होते. साऱ्या दिवसभर पडलेल्या दगदगीमुळें मी अगदीं थकून गेलों होतों. ह्मणून कधीं आंथरुण गाठीन असें मला झालें होतें. जेव-

णाची तयारी होतीच. कसे तरी दोन घास खाऊन मी बिछान्यावर जाऊन पडलों. पण काय आश्चर्याची गोष्ट! झोंप ह्मणून मुळींच आली नाहीं. माझ्या मनांत सारखे हेलनच्या मृत्यूसंबंधीं विचार घोळूं लागले. तिला कोणीं मारलें? ज्या गृहस्थाला मीं चर्चमध्यें पाहिलें त्यानेंच तिचा खून केला असावा का? रस्त्यामध्यें जो मनुष्य भेटला त्याचे नीच हात तिच्या रक्तानें रंगले असावेत काय? पण तो मनुष्य कोण असावा? इत्यादि प्रश्नमालिका माझ्या डोक्यांत उत्पन्न होऊन तें अगदीं गोंधळून गेलें.

अशा विचारांत रात्रीचे सुमारें अक्रा वाजले असतील. या वेळीं माझा चपरासी माझ्या खोलीजवळ आला आणि तिचें दार ठोठावूं लागला. मीं त्याला दार उघडलें, त्याबरोबर त्यानें आंत येऊन माझ्या हातांत एक चिठी दिली. या चिट्टींत पुढीलप्रमाणें मजकूर होता—

"महाशय, काल रात्रींपासून मला ज्वर येऊं लागला आहे आणि या वेळीं त्यांना जो कांहीं विकार झाला आहे त्याचीं कांहीं कांहीं चमत्कारिक लक्षणें दिसूं लागलीं आहेत. तरी पण एक वेळ येऊन त्यांना पाहून गेल्यास मी आपला अतिशय आभारी होईन. आपणासाठीं गाडी पाठवीत आहें."

"जोसेफ फ्रांकलीन"

जोसेफ फ्रांकलीन हा येथल्या एका एंजिनिअरचा मुलगा होता. त्याच्या पित्याशीं माझा अत्यंत परिचय होता. ती चिठी वाचतांच मी कपडे घालून बाहेर पडलों आणि जोसेफ फ्रांकलीनच्या घराकडे रवाना झालों. बरोबर मात्र मीं कोणालाच घेतलें नाहीं. रोग्याकडे मी कधीं कधीं रात्रीं जाई; पण बरोबर कंपाउंडर अथवा चपरासी घेत असे पण दुर्दैवानें आज कोणीच बरोबर घेतलें नव्हतें. फ्रांकलीनसाहेब आपले स्नेही आहेत तर त्यांच्या घरीं जावयाला बरोबर मनुष्य कशाला असा मी आपल्या मनांत विचार केला आणि एकटाच तिकडे निघालों.

जोसेफच्या चिट्टींत लिहिल्याप्रमाणें त्याची गाडी उभी होती. तिजवर मी चढलों. गाडी चालूं झाली. सुमारें एका घंट्यानें ही गाडी निर्जन स्थानीं जाऊन पोहोंचली. त्या वेळीं माझ्या मनांत संशय उत्पन्न होऊन

फ्रांकलीन साहेबाचें घर कोठें आहे ह्मणून मीं कोचमनला विचारलें; पण त्यानें माझ्या या प्रश्नाचें कांहींच उत्तर न देतां घोड्याला जोरानें चाबूक लगावला व त्याबरोबर गाडी पुन्हां वेगानें चालूं लागली. आतां मात्र माझा संशय खरा ठरून मीं गाडीच्या खालीं उडी मारण्याचा बेत केला. इतक्यांत कसल्याशा दुर्गंधी पदार्थांची घाण मला येऊन मी बेहोष होऊन पडलों ! हा पदार्थ मुद्दाम माझ्या नाकाजवळ कोणीं तरी धरला होता. "

(स्टिफनच्या डायरींत या घटनेपलीकडे दुसरा कांहींच मजकूर लिहिला नव्हता. यामुळें आम्हांला आतां अन्यत्र वळणें भाग पडत आहे.)

प्रकरण ८ वें.

हें काय अबदुल ?

(मिस रोजची कहाणी.)

"हेलनच्या मृत्यूनंतर मी पंधरा दिवस सारखी रडत होतें. रडून रडून आईचेही डोळे जाण्याची वेळ आली होती. आम्ही तिला नानाप्रकारें समजवीत होतों; पण तिच्या मनाचें बिलकुल समाधान होत नव्हतें. या दारुण दुःखानें तिची अवस्था एकाद्या वेड्याप्रमाणें झाली होती. ती कोणाचें ऐकत नव्हती. रात्रंदिवस रडत राहणें हेंच तिच्या आयुष्याचें ध्येय होऊन राहिलें होतें. कांहीं दिवसांनीं आम्ही तें घर सोडून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन राहिलों.

पुष्कळ दिवस झाले तरी स्टिफन आमच्याकडे येत नाहीं. हें पाहून मी अतिशय काळजींत पडलें. पहिल्यानें ते आजारी असतील असें मला वाटलें; पण जसजसें जास्त दिवस लोटत गेले तसतशी माझी ही समजूत पालटत जाऊन मी अधिकच घाबरलें. अखेर खरा प्रकार काय आहे. याचा शोध लावण्यासाठीं मीं त्यांच्या घराकडे जावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें एके दिवशीं तिसरे प्रहरीं तिकडे रवाना झालें. यापूर्वी हेलेनबरोबर मी अनेक वेळा त्यांच्या घराकडे गेले असल्यामुळें मला त्यांचें घर ठाऊक होतें.

यांप्रमाणें मी त्यांच्या बाबतींत विचार करीत करीत रस्त्यानें चालले असतांना समोरून एक भला दांडगा आणि काळाकुट्ट मुसलमान आला आणि मला जोरानें धक्का देऊन निघून गेला. हा प्रकार पाहून मी अतिशय घाबरलें. साहजिक धक्का लागला असावा असें आरंभीं मला वाटलें; परंतु माझा हा भ्रम लौकरच दूर झाला. कारण तो अधम मनुष्य पुढें निघून गेला तरी मागें वळून मजकडे सारखा पहात होता. थोड्या वेळानें तो जवळच्या एका गल्लींत शिरला; पण मीं गल्लीच्या शेजारीं जाऊन पाहिलें तो त्याची नजर तेथूनसुद्धां मजवर होतीच.

आतां येथें उभें राहण्यांत अर्थ नाहीं. हा विचार माझे मनांत उत्पन्न होऊन मी तेथून निघालें; पण थोडीशी पुढें जाऊन पहातें तों तो माझ्या पाठोपाठच येत असलेला मला दिसला. मी जरा उभी राहिलें. तों तोही एका माणसाशीं बोलण्याचें मिष करून उभा राहिला. आतां मात्र हा आपल्याच पाठीमागें लागला यासंबंधीं माझी पूर्ण खात्री झाली आणि त्याबरोबरच स्टिफनच्या घराकडे जाण्याचा विचार मला सोडून द्यावा लागला. तिकडे जाण्याची मला मुळींच हिंमत होईना. मी उभी राहिलें होतें, त्याच ठिकाणीं जवळपास "कानपूर टाइम्स"च्या संपादकाचें घर होतें. त्यांची माझी चांगली ओळख होती. यामुळें मी मागें पुढें न पाहतां एकदम त्यांच्या घरांत शिरलें. संपादक मि. मार्लीसाहेब घरांतच होते. त्यांना मीं सगळी हकीकत कळविली. त्यांनीं ती ऐकून घेतल्यावर मला आपल्या गाडींत बसवून व स्वतः आपणही मजबरोबर येऊन त्यांनीं मला माझ्या घरीं नेऊन पोहोंचतें केलें. दुसरे दिवशीं कानपूर टाईम्समध्यें पुढीलप्रमाणें मजकूर प्रसिद्ध झाला.

"कानपूर किल्ल्यांतले ब्रिगेड सर्जन मि. स्टिफनसाहेब हे गेल्या दोन आठवड्यांपासून बदमाष लोकांच्या तावडींत सांपडल्यासारखे दिसतात. गेल्या तारीख ७ सोमवारपर्यंत ते आपल्या घरींच होते; पण त्याच दिवशीं रात्रीं कोणी तिघे बदमाष फ्रॅंकलीन नांवाच्या कोणा एका साहेबांची चिठी घेऊन त्यांच्याकडे आले आणि रोगी दाखविण्याचें निमित्त करून त्यांना कोणीकडे घेऊन गेले. त्यांचा अजूनपर्यंत तपास लागत नाहीं. त्याच रात्रीं किल्ल्याच्या मैदानांतून एक गाडी जात होती. ती

पहारेवाल्यानें रोंकली; पण तिजवरच्या माणसांनीं आम्ही फ्रॅकलीनसाहेबाचे नौकर असून त्यांच्याच एका नातलगाला शहरांत पोंचवायाला गेलों होतों असें सांगितल्यामुळें त्यानें ती सोडून दिली. फ्रांकलीनसाहेब शहरांतच राहत असून ही सगळी हकीकत खोटी असल्याचें त्यांनीं आह्मांस पत्रानें कळाविलें आहे. स्वर्गवासी हेलनची आणि स्टिफसाहेबांची बरींच मैत्री होती. त्यामुळें हेलेनचा ज्या तिघांनीं खून केला त्यांच्याच हातून स्टिफनसाहेबांचाही घात झाला असावा अशी लोकांची सामान्यतः समजूत आहे. "

ही हकीगत वाचतांना मी दुःखानें वेडी झालें आणि माझें अंग भयानें थरथर कांपूं लागलें. याच वेळीं आदले दिवशीं ज्या बदमाष मुसलमानानें माझा पाठलाग केला होता त्याचें मला स्मरण होऊन तोही एक त्या चांडाळचौकडींतला माणूस असावा असें मला वाटलें.

तें वर्तमानपत्र मीं आपल्या वडिलांना नेऊन दिलें. त्यांतील मजकूर वाचून तेही अत्यंत चिंताक्रांत झाले; पण माझें समाधान करावें म्हणून ते मला म्हणाले, " स्टिफन अजूनपर्यंत सुरक्षित असावा अशी माझी खात्री आहे. त्यांचा शोध लावण्याच्या कामावर एखाद्या योग्य माणसाची योजना करावयाचा माझा विचार आहे. तो त्यांची खात्रीनें सुटका करून त्यांना घेऊन येईल. "

एवढें बोलून ते बाहेर जाण्यासाठीं कपडे चढवूं लागले; आणि मला वर जाण्याचें सांगून ते लागलेंच बाहेर पडले. यानंतर सुमारें तीन घंट्यानंतर ते परत आले; आणि मला हांक मारून म्हणाले, "रोज, उद्यां तिसरे प्रहरीं तुला मजबरोबर एका विख्यात गुप्त पोलिसाकडे यावें लागेल. तो स्टिफनच्या बाबतींत तुला कांहीं विचारणार आहे. "

दुसरे दिवशीं ठरलेल्या वेळीं आम्ही उभयतां त्या गुप्तपोलिसाकडे गेलों. राजप्रासादतुल्य अशा एका भव्य इमारतीजवळ आमची गाडी उभी राहिली. या इमारतीच्या भिंतीवरील संगमरवरी दगडावर सोनेरी रंगानें **'सरदार रामपालसिंह'** हीं अक्षरें अत्यंत जाड्या टाइपांत लिहिलीं होतीं.

आम्ही आल्याची वर्दी पहारेकऱ्यानें मालकाला जाऊन कळविली

आणि पुढें थोड्याच वेळानें तो आम्हांला आंत घेऊन गेला. आंत एक गौरवर्णाचा मनुष्य वर्तमानपत्र वाचीत बसला होता. आम्ही आंत जातांच तो उठून उभा राहिला; आणि अत्यंत आदरानें त्यानें आम्हांस खुर्चीवर बसविलें. माझ्या वडिलांनीं आह्मां उभयतांचा परिचय करून दिला. सरदार रामपालसिंहाची चर्या पाहिल्याबरोबर त्यांची योग्यता कळून येणार होती. त्यांचें नेत्र अत्यंत तेजःपुज आणि त्यांची दृष्टि पराकाष्ठेची भेदक होती. त्यांना पाहिल्याबरोबर तो अत्यंत बुद्धिमान् आणि कर्तबगार मनुष्य असावा असें दिसून आलें. ते मला ह्मणाले, "मिस रोज, तुम्ही मला ओळखतां ?"

मी—आपल्याला कुठें तरी पाहिलें असावें असें मला वाटतें.

खरोखरच त्यांची चर्या दृष्टीस पडल्याबरोबर त्यांना कोठें तरी पाहिलें असावें असें मला वाटूं लागलें.

रामपालसिंह पुन्हां ह्मणाले, "एके रविवारीं रात्रीं तुम्ही, हेलन आणि स्टिफनसाहेब अशी तिघेजण किल्ल्याच्या रस्त्यानें जात असतांना गाडी आणूं का ह्मणून मीं तुह्मांला विचारलें होतें पण स्टिफनसाहेबांना माझा संशय येऊन त्यांनीं माझी मदत नाकारली."

आतां मला त्या प्रसंगांची आठवण झाली. मलाही स्टिफनसाहेबाप्रमाणेंच त्या वेळीं संशय आला होता. तथापि त्याबद्दल लाज वाटून मी रामपालसिंहाला म्हणालें, " महाशय, तुमच्याबद्दल त्या वेळीं संशय दाखविला याचें मला अतिशय वाईट वाटतें. त्या अपराधाची क्षमा करा. तुह्मांला कुठें पाहिलें होतें हें आतां माझ्या चांगलें लक्षांत आलें; पण माझी आपली ओळख कुठली ? आपण मला कसें ओळखलेंत हें सांगण्याची कृपा कराल तर फार बरें होईल."

यावर रामपालसिंह मोठ्या प्रेमळपणानें म्हणाले, "तुह्मांला ठाऊक नाहीं; पण तुमच्या वडिलांच्या आणि हेलनच्या प्रयत्नानें एक वेळ माझे प्राण वांचले आहेत, तेव्हांपासून पोटच्या पोरीपेक्षांहि मी तिला अधिक समजत होतों आणि छायेप्रमाणें तिच्या मागें मागें राहून तिचें संरक्षण करीत होतों; पण दैवलिखित कोणाला चुकवितां येणार आहे ? मी इतकी खबरदारी घेऊनही अखेर जें व्हावयाचें तेंच झालें; पण

याबद्दल त्या बदमाषाचा सूड उगविल्याखेरीज रहावयाचें नाहीं अशी मीं प्रतिज्ञा केली आहे."

या वेळीं त्याच्या नेत्रांतून अश्रूंचें दोन चार थेंब त्याच्या हातांतल्या वर्तमानपत्रावर पडल्याचें मला दिसलें. मी मोठ्या विस्मयानें ही हकीकत ऐकत होतें; पण तिच्यासंबंधीं अणुमात्रही माहिती मला अजून पर्यंत नव्हती, व ही त्याहूनही विस्मयजनक गोष्ट होय. माझ्या वडिलांनीं ती मुद्दामच मला कळूं दिली नसावी असें मला आतां वाटलें. हें कसेंहि असो, सरदार रामपालसिंहानीं मला यापुढें तिजसंबंधीं विशेष कांहीं न कळवितां स्टिफनसंबंधी दोन चार प्रश्न विचारले. त्या बाबतींत मला जें काय ठाऊक होतें तें सर्व मीं त्यांना कळविलें. आणि त्याबरोबरच मागें लागलेल्या धटिंगण मुसलमानाचीहि हकीगत मीं त्यांना कळविली.

मुसलमानासंबंधाची ही हकीगत ऐकून त्यांनीं त्याच्या रूपरंगाची मजजवळ चौकशी केली. नंतर ते माझ्या पित्याला म्हणाले, "रोजची हकीगत ऐकून तो धटिंगण मुसलमान अबदुलच असावा असा मला दाट संशय येऊं लागला आहे. हें कांहींहि असो, आपण या बाबतींत अगदीं सावध असावें."

कांहीं वेळानें सरदार रामपालसिंहाचा आम्हीं निरोप घेतला. वाटेनें जात असतांना हा अबदुल कोण ? याचा मी आपल्या मनाशीं विचार करूं लागलें.

दररोज ज्या वेळीं माझा निजण्याचा परिपाठ असें त्याच वेळीं आजही मी अंथरुणावर जाऊन पडलें. माझा एक आवडता कुत्रा होता. तो ज्या खोलींत निजत असें तेथेंच निरंतर पडून असें. आज बरीच रात्र झाल्यावर तो एकाएकीं मोठ्या मोठ्यानें भुंकूं लागला. त्याबरोबर मी जागी होऊन पहातें तों माझ्या उशाची खिडकी उघडली असून मजसमोर एक भयंकर मनुष्य उभा आहे. त्याला पाहतांच मी मोठ्यानें ओरडलें. त्यासरसा खिडकीवाटें उडी टाकून तो मनुष्य नाहींसा झाला."

प्रकरण ९ वें.

कैदखान्यांत मी आणि स्टिफन.

(मिस रोजची कहाणी.)

" हा प्रकार घडल्यापासून मी पुढें आपल्या खोलींत अत्यंत सावधगिरीनें निजत असें. चार हत्यारबंदी शिपाई दररोज रात्रीं माझ्या खोली, च्या भोंवतीं पाहरा करूं लागले. माझ्या बापानें मुद्दाम याच कामासाठीं त्यांना नोकरीवर ठेविलें होतें. घरांतून कोठें तरी बाहेर जावयाचें असलें तरी मी अशीच सावधगिरी घेई. बरोबर कोणी मनुष्य घेतल्याखेरीज मी दाराच्या बाहेर पाऊलही टाकण्याचें साहस करीत नव्हतें. सरदार रामपालसिंहांनीं मला अत्यंत खबरदारी घेण्याविषयीं सूचना केली होती.

यानंतर एका आठवड्यानें मी लेडी रॉजर्सबरोबर एके रविवारीं गाडींत बसून चर्चमध्यें उपासना करण्यासाठीं गेलें. एक महिन्यापूर्वी लेडी राजर्सची आणि माझी ओळख झाली होती. तथापि तिच्यासंबंधीं मला किंवा आमच्या घरांतील कोणालाच कांहीं विशेष माहिती नव्हती. त्या बाबतींत तिला विचारलें तर ती त्याचें उत्तर देण्याऐवजीं टाळाटाळी करी. जयपूर राण्याचे रेसिडेंट मि. रॉजर्स यांची ती विधवा स्त्री आहे एवढी एक गोष्ट मात्र तिच्यासंबंधीं आम्हांस ठाऊक होती. या वेळीं तिचें वय अठ्ठावीस वर्षांचें असेल.

ती अत्यंत सरल आणि धार्मिक स्त्री असावी असें इतक्या दिवसांच्या परिचयानें मला वाटूं लागलें. तिचें घर आमच्या घराजवळच होतें. चर्चमध्यें जातांना तिच्याखेरीज आणखी दोघे चपराशीहि मजबरोबर होते. चर्चमध्यें आम्हीं दोघांनीं शेजारीं शेजारीं बसून उपासना केली. थोड्या वेळानें एक युरोपियन गृहस्थ माझ्या पुढच्या बेंचवर येऊन बसला. तो तेथें येऊन बसतांच मला दारूची वसकन् घाण आली. तेथें बसल्या बसल्या त्यानें दोनचार वेळां लेडी रॉजर्सकडे पाहिलें. नंतर तो तेथून निघून गेला.

मला याचें कारण कांहींच कळलें नाहीं. थोड्या वेळानें मला कांहीं न बोलतां लेडी रॉजर्सहि तेथून निघून गेली. माझ्या मनांत संशय उत्पन्न झाल्यामुळें मी तिच्या मागोमागच बाहेर निघून आलें. तों ती एका खांबाच्या आड उभी राहून त्या गृहस्थाशीं बोलत असलेली मला दिसली. हा प्रकार पाहून माझ्या मनांत संशय उत्पन्न झाला; पण त्याच्या भाषणाकडे लक्ष्य न देतां मीं तावडतोब घरीं जाण्याचें ठरविलें. आणि त्या उद्योगाला लागलें. मजबरोबर जे दोघे चपराशी आले होते ते मजजवळच बसले होते. त्यांना मीं गाडी आणावयास सांगितलें. हे दोघे चपराशी आमचे जुने नोकर होते. प्रसंग पडल्यास मजसाठीं प्राणही द्यायला देखील त्यांनीं मागें पुढें पाहिलें नसतें. ते अत्यंत बळवान्, कर्तव्यपरायण आणि साहसी होते. त्यांच्या जवळचें पिस्तुल निरंतर भरलेलें असे. या अवधींत लेडी राजर्स मला म्हणाली, " या माणसाला आपण ओळखतों काय ? "

पण या प्रश्नाचें माझ्या तोंडून कांहीं उत्तर निघण्यापूर्वींच त्या गृहस्थानेंच ' नाहीं ' असें उत्तर दिलें. यामुळें माझा संशय अधिकच वृद्धिंगत झाला.

कांहीं वेळानें माझी गाडी फाटकाजवळ आली. त्या वेळीं लेडी रॉजर्स हंसत हंसत मजजवळ येऊन म्हणाली, " बाहेर एक माझ्या ओळखीची स्त्री आली होती. तिच्याशीं बोलण्यांत किती वेळ गेला याचें भान न राहिल्यामुळें मला तुझ्याकडे यावयाला उशीर लागला. तथापि याबद्दल तूं मनांत कांहीं आणणार नाहींस अशी मला आशा आहे. हें कांहींहि असो; पण अजून उपासना कांहीं संपली नाहीं. मग तूं एवढी घरीं जाण्याची घाई कां करतेस ? शिवाय मला न विचारतां तूं जातेस तें तरी तुला बरें वाटतें ? "

यावर मीं तिला सरळ भावानें म्हटलें " तुम्हाला सोडून मुळींच जात नव्हतें. गाडींत बसल्यावर मी तुम्हाला हाक मारणार होतें. शिवाय आज लौकर घरीं जावयाला तसेंच महत्त्वाचें कारण आहे तें मी तुम्हास नंतर सांगेन. "

एवढें बोलून मी लेडी रॉजर्सचा हात धरून गाडींत बसलें. तीहि यानंतर कांहीं बोलली नाहीं. मात्र तिनें आपल्या जवळची एक शिटी

काढून ती जोरानें फुंकली आणि गाडीवर चढून ती माझ्या शेजारीं बसली. बरोबर याच वेळीं एक साहेब शिटी फुंकीत एके बाजूला निघून गेला. अद्यापि त्यानें आपल्या तोंडावर टोपी ओढून घेऊन तिच्या खालीं अर्धे अधिक तोंड झांकून घेतलें होतें, तरी तो माझ्या समोरच्या बेंचावर बसलेला साहेब आणि बाहेर लेडी राजर्सशीं बोलत असलेलाच साहेब असावा असें मीं ओळखलें. आतां मला लेडी राजर्सविषयींही संशय वाटून आपल्या चपराशाला सावध रहाण्याची सूचना देऊन गाडी जोरानें हांकण्याचा मीं त्याला हुकूम केला.

चर्चपासून आमचें घर सुमारें चार मैल असून शिवाय मध्यंतरीं एक निर्जन मैदान होतें; पण आमची गाडी अर्ध्या रस्त्यावर गेली असेल नसेल तोंच एकदम पिस्तुलाचा आवाज होऊन आमचा कोचमन खालीं पडला.

आतां गाडीचे घोडे एकदम थबकले. त्याबरोबर माझे: दोन्हीही चपराशी पिस्तुल बाहेर काढून गाडीच्या दोन्ही तोंडाशीं उभे राहिले; पण याच वेळीं पुन्हां एक पिस्तुलचा आवाज होऊन चपराशांपैकीं एकजण जमिनीवर लोळला. यानंतर विचित्र वेष धारण केलेलीं दहाबारा माणसें येऊन त्यांनीं आमच्या गाडीला वेढा दिला आणि त्यांच्यापैकीं कांहींजणांनीं दुसऱ्याही चपराशावर आक्रमण केलें. त्या चपराशानें या वेळीं एका मागून एक चार बार काढले; पण मीं अगदीं घाबरून गेलें असल्यामुळें त्या बारामुळें कोणी जायबंदी झालें कीं नाहीं हें मला कळलें नाहीं. त्या चपराशावर जेव्हां त्या दुष्टांनीं हल्ला केला त्या वेळीं मीं मोठमोठ्यानें किंकाळ्या मारूं लागलें; पण याच वेळीं लेडी राजर्सनें माझा गळा जोरानें दाबून माझ्या तोंडांत बोळा कोंबला ! त्यानंतर मीं बेहोष होऊन पडलें !

थोड्या वेळानें मीं शुद्धीवर आलें त्या वेळीं मला ते दुष्ट कोणीकडे तरी नेत असल्याचें माझ्या लक्ष्यांत आलें; पण माझ्या तोंडांत बोळा असल्यामुळें मला ओरडतां आलें नाहीं. यानंतर एका घंट्यानें मला घेऊन ते एका मोठ्या घरांत शिरले आणि तेथल्या एका अंधारकोठडींत

त्यांनीं मला कोंडून ठेविलें. भयानें आणि चिंतेनें माझें शरीर अगदीं गळून गेलें असल्यामुळें मीं आंगावरची शाल आंथरून तिजवर पडलें.

थोड्या वेळानें मी स्वप्नांत स्टिफनला पाहिल्याप्रमाणें वाटलें; पण डोळे उघडून पाहिलें तों खरोखरच ते माझ्या उशाशीं बत्ती घेऊन उभे!"

प्रकरण १० वें.

फकिराची अभिसंधि.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

ज्या दिवशीं मिस रोज मला भेटावयाला आली: त्याच्या दुसऱ्या दिवशीं गार्डननें मला बोलावणें पाठवलें. तेथें गेल्यावर आदले दिवशीं रात्रीं घडलेला सर्व प्रकार मला रोजच्या तोंडून कळला. ती माझ्या हातांत भयंकर एक सुरा देऊन ह्मणाली, " हा रात्रीं माझ्या खोलींत सांपडला. " त्या सुऱ्याची मीं सूक्ष्मपणें परीक्षा केली. आतां ज्या खोलींत तो सांपडला ती जागाही मीं पाहिली. ज्या खिडकीवाटें तो मनुष्य पळून गेला त्या खिडकीचीही मीं बारकाईनें तपासणी केली. ती खिडकी दुसऱ्या मजल्यावर असून तेथून खालीं उडी मारावयास एकादें सोयीचें ठिकाण नव्हतें. मी अतिशय आश्चर्यचकित झालें आणि या बाबतींत रोजला अनेक प्रश्न विचारले; पण तो खिडकींतून पळून गेला आणि यापलीकडे आपल्याला कांहीं माहीत नसल्याचें तिनें सांगितलें. नोकराचाकराजवळहि चौकशी करून कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर निरुपायानें मी घराकडे जावयाला निघालों. जातां जातां रोजच्या खोलीवर कडक पहारा ठेवण्याची मीं गार्डनला सूचना दिली.

गार्डनच्या घरांतून मी ज्या वेळीं बाहेर पडलों त्या वेळीं एका साहेबावर माझी दृष्टि गेली. तो गार्डनच्या घराची टेहळणी करीत होता. माझ्या मनांत संशय उत्पन्न झाल्यामुळें मी आपल्या घराकडे न जातां दुसरीकडे वळलों; पण थोड्या वेळानें मीं मागें वळून पाहिलें तों तो

साहेब माझ्या मागें येत आहे असें मला दिसलें. तावडतोब जवळच असलेल्या एका रिकाम्या घरांत मी शिरलों आणि खिडकीवाटें त्या साहेबाकडे पाहूं लागलों. त्या वेळीं तो एका झाडाखालीं उभा राहून चिरूट पीत पीत त्या गल्लीकडे पहात होता.

वेष बदलण्याचें साहित्य मी नेहमीं चवळ ठेवीत असल्यामुळें मी तात्काळ फकीर बनलों आणि माझ्या अंगावरच्या कोटपाटलूनची गठडी बनवून ती खांद्यावर टाकिली आणि त्या घराच्या बाहेर पडलों. तो साहेब अजूनही त्या झाडाखालीं चिरूट पीत उभा होता.

जवळच एक स्टेशनरी दुकान होतें त्यांत शिरून मीं एक कांचमण्याची जपमाळ विकत घेतली आणि तो साहेब उभा होता त्या बाजूला आपला मोर्चा फिरविला. त्यानें मला ओळखलें नाहीं. भिक्षा मागण्याच्या मिषानें मीं जरा पलीकडल्या दुकानावर जाऊन उभा राहिलों. साहेबानें गल्लीच्या टोंकापर्यंत जाऊन माझा तपास केला; पण त्या कामीं त्याची निराशा झाल्यामुळें तो तेथून फिरला. आतां मीं त्याचा पाठलाग करावयास सुरवात केली.

तो अगदीं घाईघाईनें चालत होता आणि मीहि ईश्वरचिंतन करीत करीत तितक्याच वेगानें त्याचा पिच्छा पुरवीत होतों. सुमारें एक मैल गेल्यावर तो एका घराच्या दाराशीं उभा राहिला. त्यानें त्या दारावर धक्का मारतांच आंतून कोणीं दार उघडलें. तो आंत गेल्याबरोबर दार पुन्हां बंद झालें.

प्रथम मीं त्या घराचा नंबर टिपून घेतला आणि नंतर दाराला धक्का दिला त्याबरोबर एका मुसलमान खानसाहेबानें दार उघडलें आणि मला पाहून संतापानें म्हटलें, "येथें कांहीं मिळणार नाहीं, चालता हो."

मी नम्रतेनें त्याला ह्मणालों, "भाई, मी एक म्हातारा फकीर मक्केला जात आहें. तूं माझा धर्मबंधु असून माझ्याशीं अशा रीतीनें वर्तन करतोस ?"

माझें हें भाषण ऐकतांच तो शरमून ह्मणाला, "ठीक आहे. थोडा उभा रहा. मी तुला कांहीं पैसे आणून देतों."

एवढें बोलून तो आंत गेला. मी दाराच्या फटींतून आंतील प्रकार पाहूं लागलों. अंगणांत दोघे साहेब आणि एक मडम बोलत असल्याचें मला दिसलें. मीं ज्याचा पाठलाग केला होता तो साहेबही त्यांत होतांच. त्यांचा संवाद ऐकण्याची मला अतिशय जिज्ञासा लागून मी आंत जाण्याचा उपाय शोधूं लागलों. इतक्यांत तो मुसलमान खानसाहेब परत आला आणि माझ्या हातांत कांहीं पैसे ठेवून मला ताबडतोब निघून जा ह्मणाला; पण मी तेथेंच उभा राहून ह्मणालों, "मी तुझ्यावर फार खूष झालों आहें. मी एक जुना हकीम असून मजजवळ नाना प्रकारच्या औषधी आहेत. तुला एखाद्या औषधाची जरूर असेल तर मला सांग, मी तुला ती फुकट देतों."

माझें हें भाषण ऐकतांच तो खालीं बसला. हें पहातांच आपलें औषध लागूं पडलें हें मीं ओळखलें. नंतर मी त्याला म्हणालों. "मला अनेक प्रकारचें मंत्रतंत्रही माहीत आहेत."

तो मला म्हणाला, "साईजी, माझी स्त्री फार दिवसांपासून आजारी आहे. मीं तिला अनेक हकिमांचीं औषधें दिलीं; पण तिला गुण आला नाहीं. आपण जर तिला बरें कराल तर मजवर आपले फार उपकार होतील. मग औषधानें करा, कीं मंत्रतंत्रानें करा."

यावर मी मोठ्या गंभीरपणानें ह्मणालो, "कांहीं हरकत नाहीं. मी तिच्याकरतां एक ताईत देतों. तो तूं तिच्या गळ्यांत बांध म्हणजे ती लौकर बरी होईल. मला या घरांतल्या एकाद्या एकांत ठिकाणीं ने, म्हणजे मी तुला ताईत तयार करून देतों. मात्र त्या ठिकाणीं मजवर कोणाचीही दृष्टी जातां उपयोगी नाहीं. नाहीं तर तो ताईत बिलकूल उपयोगाला पडावयाचा नाहीं."

त्यानें माझा हात धरून त्या घराच्या मागल्या दरवाजानें मला आंत नेलें; पण मला ज्या ठिकाणीं त्यानें बसविलें तेथून त्या साहेबाचें आणि मडमेचें भाषण मला बिलकूल ऐकावयाला येत नव्हतें. मी तेथून त्याच्या शेजारींच असलेल्या खोलींत घुसलों. तो माणूसही कांहीं न बोलतां मुकाट्यानें माझ्या मागें येत होता. त्याच्या डोक्यांत ताईतासंबंधींचे विचार घोळत असल्यामुळें मी दुसऱ्या कोठडींत कां घुसलों या

गोष्टीकडे त्याचें लक्षही नव्हतें. त्या कोठडींत गेल्यावर मी त्या माणसाला दौत, लेखणी कागद वगैरे लेखनसाहित्य घेऊन यावयास सांगितलें. तो हें साहित्य आणण्यासाठीं बाहेर निघून गेला. तेव्हां मी दरवाजाजवळून साहेबाचें भाषण ऐकूं लागलों.

एक साहेब म्हणाला, " नाहीं—नाहीं, असें केल्यानें आपण पकडलों जाण्याचा विशेष संभव आहे. रामपाल फारच धूर्त माणूस आहे. त्याच्या डोळयांत धूळ फेंकणें म्हणजे कांहीं सोपी गोष्ट नव्हे. माझ्या मतानें तर आपण आणखी दोनचार दिवस स्वस्थ रहावें हेंच चांगलें. कोणत्या ना कोणत्या तरी उपायानें आपण तिला पकडूंच. एका अबलेला फसवायाला काय उशीर लागतो. "

यावर दुसरा म्हणाला, " आतांच पकडूं नये असें माझेंही मत आहे. रामपाल जर आपल्या मागें लागला असेल तर त्याला खुशाल लागूं द्या. असे त्याच्यासारखें मूर्ख गुप्तपोलिस मी पुष्कळ पाहिलें आहेत. तो जर आज आपल्या हातून न निसटतां तर त्याचा शहाणपणा धुळिलाच मिळवून टाकला असतां. हो, आज रात्रीं बारा वाजतां मला स्वीड पार्कमध्यें जावयाचें आहे तेथें त्यांची गाठ पडणार आहे. "

यानंतर तिसरी एक व्यक्ती आणखी कांहीं बोलली; पण मला तें ऐकावयाला आलें नाहीं. कारण याच वेळीं खानसाहेब लिहिण्याचें साहित्य घेऊन तेथें आला होता. मी खूप आवडंबर घालून एक कसलें तरी यंत्र लिहून दिलें आणि तें रुप्याचें ताईतांत घालावयाचें त्याला सांगितलें. त्या घरांतून बाहेर पडतांच मी रात्रीं बारा वाजतां स्वीडपार्कमध्यें जावयाचें ठरविलें. "

——————

प्रकरण ११ वें.

शत्रूचा परामर्ष.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

" त्या दिवशीं मी आणि लक्ष्मणसिंह मुसलमान मौलवीचा वेष धारण करून घराच्या बाहेर पडलों. वेष बदलण्यांत माझ्या इतका पटाईत कोणीच नसेल. या कामीं मला कोणत्याही गोष्टीची अडचण पडत नव्हती; आणि हें काम मी इतकें बेमालूमपणानें करी, कीं, माझ्या अत्यंत स्नेहांतल्या माणसांला देखील मला ओळखण्याची प्राज्ञा नव्हती.

आम्ही दोघें अरबी भाषेंत बोलत फिरूं लागलों. आमच्या भाषणाचा विषय कुराण हा होता. आम्ही त्याची समालोचन करीत होतों. रस्त्यांत एका मुसलमानाकडून आम्ही स्वीडपार्कचा पत्ता काढला आणि थोड्या वेळानें तेथें जाऊन पोहोंचलों.

लक्ष्मणप्रसादला एके बाजूस बसावयाला सांगून मी बागेंत घुसलों. आमच्याजवळ एक सातबारी पिस्तुल आणि प्राण वांचविण्यास उपयोगीं पडणारीं दुसरींही अनेक हत्यारें होतीं. याशिवाय एक पॉकेट इलेक्ट्रिक-कंदील आणि एक क्लोरोफार्मची बाटलीही होती.

मी बागेंत घुसलों त्या वेळीं रात्रींचे आठ वाजण्याचा सुमार होता. तेथें लोकांची येण्याजाण्याची सारखी गर्दी चालू होती. ही सगळी रहदारी बंद होऊन पूर्ण शांतता झाल्याखेरीज ते लोक येथें येणार नाहींत हें मी पूर्णपणें जाणून होतों. हें कांहींही असो, पण ते बागेंत कोणत्या ठिकाणीं बसून गोष्टी करीत असतील ह्या गोष्टीचा शोध करणें हेंच माझें सध्यांचें कर्तव्य होतें. त्याप्रमाणें त्या हेतूनें मीं बागेंत फिरूं लागलों. या बागेंत एक तलाव असून त्याच्या सभोंवतीं अनेक लहान लहान वृक्ष उगवले होते आणि दिसावयालाही हें स्थान जरा निराळें दिसत होतें. फिरतां फिरतां मी या ठिकाणच्या दक्षिणेकडे पोहोंचलों. त्या वेळीं तेथें बेंचावर एक साहेब बसलेला मला दिसला. या जागेंसभोंवतीं दाट वृक्ष उगवले असल्यामुळें त्या ठिकाणीं बराच अंधेर पसरला होता. याप्रमाणें

शून्य स्थानीं तो युरोपियन बसलेला पाहून तो त्याच कंपूतला असावा अशी माझी खात्री झाली; पण तिकडे विशेष लक्ष न देतां मी चटकन तेथून झटकलों.

मी तेथून जों निघालों तों बागेच्या माळ्याजवळ येऊन दाखल झालों. दोघेही माळी या वेळीं एके ठिकाणींच बसले होते. त्यांच्याजवळ थोडीशी विचारपूस केल्यानंतर रात्रीं नवाच्या पलीकडे बागेंत कोणालाही राहूं देण्याचा हुकूम नाहीं असें मला आढळून आलें. मीं घड्याळ काढून पाहिलें तों रात्रींचे नऊ वाजून नऊ मिनिटें झालीं असल्याचें मला दिसून आलें. यानंतर, "बेंचावर बसलेल्या साहेबाला बाहेर कां घालवलें नाहींस" म्हणून मीं माळ्याला विचारलें. तेव्हां तो म्हणाला, "आज रात्रीं नवाच्यापुढें आपण आपल्या कांहीं दोस्तांसह येथें येणार आहों असें एक साहेब मला सकाळींच सांगून गेला होता व त्यामुळें मीं त्याला येथें बसूं दिलें आहे."

माळ्याचें उत्तर ऐकून एकंदर प्रकार माझ्या लक्षांत आला आणि मीं त्याला लागलेंच म्हटलें, "हे जे लोक आज येथें येणार आहेत ते सगळे बदमाष आहेत. मी एक पोलिस अधिकारी असून या लोकांना पकडण्यासाठींच आज येथें आलों आहें."

माझें भाषण ऐकतांच माळी भेदरला आणि त्यानें एकदम उभे राहून मला सलाम केला. मीं त्याला बऱ्याच मोठ्या बक्षिसाची लालूच दाखवून म्हटलें, "सध्यां हे माझे कपडे तूं घाल आणि तुझे मला दे." त्यानें माझें म्हणणें मुकाट्यानें कबूल केलें. नंतर आम्ही दोघांनींही आपापलीं वस्त्रें बदललीं. माळ्याचा वेष परिधान केल्यावर मीं त्याजकडून एक घोंगडी घेऊन तिच्याखालीं आपलें सर्व शरीर झांकून टाकलें आणि लागलाच त्या साहेबांकडे गेलों. साहेब अजून जागच्या जागींच होते. मीं त्यांना सलाम करून म्हटलें, "हुजूर, मी या बागेचा मालक आहें. येथें नवाच्या पुढें कोणालाही राहूं देऊं नये असा सरकारचा कडक हुकूम आहे, तेव्हां कृपा करून आपण येथून बाहेर पडावें. मला बागेचा दरवाजा बंद करून घ्यावयाचा आहे."

माझें हें भाषण ऐकतांच साहेब अतिशय संतापले आणि मला

म्हणाले " तूं फाजील पंचायतींत पडूं नकोस. तुझ्या सोबत्याला आणि तुला भरपूर इनाम देईन. आम्ही येथें बारा वाजेपर्यंतच राहणार आहोंत. तूं मात्र सावध रहा, जेंकीनसाहेबांचे जो नांव घेईल त्यालाच फक्त आंत घे. दुसऱ्या कोणाला घेऊं नकोस समजलास ? "

" जी हुकूम " ह्मणून मी तेथून निघालों आणि माळ्याजवळ येऊन दाखल झालों. त्यांचे कपडे त्यांना परत दिल्यावर मीं त्यांपैकीं एका फाटकाजवळ जाऊन उभें राहण्याचें सांगितलें. त्याच वेळीं कोणी आल्याबरोबर मला वर्दी दे; ह्मणून मीं त्यास बजावलें आणि मीं तेथेंच बसलों.

रात्रीं अकरा वाजण्याच्या सुमारास चौघे युरोपियन बागेंत आल्याची वर्दी मला माळ्यानें दिली. त्याबरोबर मी त्याची घोंगडी पांघरून त्यांच्या बैठकीच्या ठिकाणाकडे जावयाला निघालों, आणि हलु हलु ती चांडाळचौकडी बसली होती त्यांच्याजवळ जाऊन तेथल्याच एका वृक्षाच्या आड दडलों.

याच वेळीं त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, " आतां दुसऱ्या तिसऱ्या गोष्टी सोडून कामाच्या गोष्टीला आरंभ करा. मी एकदां चोहोंकडे टेहळणी करून येतों. "

एवढें बोलून तो हातांत कंदील घेऊन चोहोंकडे फिरूं लागला मी आतां मोठ्या पंचायतींत पडलों; पण लागलेंच प्रसंगावधान करून मी त्या झाडावर चढलों आणि घोंगडीनें आपलें शरीर झांकून घेतलें. मला तेथून ऐकावयाला जरी चांगलें येत होतें तरी खालची वस्तु म्हणून बिलकुल दिसत नव्हती.

आतां त्यांच्या भाषणाला आरंभ झाला. त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, " तुम्हीं मजवर जी कामागिरी सोपविली आहे, ती मी कांहीं दिवसांत पार पाडीन. आतां अबदुल आपल्या कार्यांत यशस्वी होतो कीं नाहीं हें पाहाणें आहे. आपल्याला प्रथम रुपयांची अतिशय जरूर आहे. आबदुलनें जी भानगड सुरूं केली आहे, ती जर पैशाच्या दृष्टीनें फलप्रद झाली नाहीं तर आपलें काम चौपट वाढले म्हणून समजा. रोज

जवळ ज्या पन्नास हजारांच्या नोटा होत्या त्याहि आपल्याला तिच्याजवळून घेतां आल्या नाहींत. मग करायचें कसें ?"

यानंतर दुसऱ्यानें थोडा विचार करून म्हटलें, "आज सकाळींच तो मला भेटला होता. त्या वेळीं रुपयांची शक्य तितक्या लवकर व्यवस्था होईल असें त्यानें मला सांगितलें. त्यानें स्टिफनजवळून चाळीस हजार रुपये घेण्याचा करार केला आहे. इतकेंच नव्हे तर रुपये दिल्याखेरीज आपली सुटका होणार नाहीं अशा आशयाचें स्टिफननें गार्डनला एक पत्रहि लिहिलें आहे."

यावर तिसरा एकजण म्हणाला, "वा: अबदुलनें तर बऱ्याच भानगडी चालवल्या आहेत. बडबड्या माणसांना कैद करणें हा एक पैसे मिळवण्याचा सोपा मार्ग आहे म्हणायचा."

चौथा:—पण या गोष्टीची पंचाईत आपल्याला पाहिजे आहे कशाला ? आपलें फक्त रुपयांशीं काम. रुपये मिळाले नाहींत तर आपल्याला कांहीं करतां यावयाचें नाहीं.

तिसरा:—ते खरें, पण रुपये मिळवावयाचें कोठें आणि कसें ? इतकी खटपट करूनहि मॅकेअरपासून आतांपर्यंत सारे पांचशेंच रुपये मिळाले. तुम्हीं माझ्या मागें रुपयांचा तगादा लावला आहे पण मी ते आणावयाचें कोठून ?

त्याचें तोंडून मॅकेअरचे नांव निघतांच मी अतिशय आश्चर्यचकित झालों. स्टिफनला कोणत्या ठिकाणीं धरून ठेवलें आहे हें या लोकांना ठाऊक होते. "मग नुसतें त्यांना कैद केलें म्हणजे आपलें काम झालें" मी आपल्या मनांतल्यामनांत म्हणालों; पण त्यांना लागलेंच "त्यांनीं तें ठिकाण सांगितलें नाहीं तर आपला सगळाच डाव फिसकटेल" हा विचार माझ्या मनांत उभा राहिला आणि मीं तो बेत रहित केला. कारण त्यांना कैद करतांच अबदुल आणि मॅकेअर या दोघांना सूचना मिळून ते पळूनसुद्धां जातील आणि कैदखान्याचें ठिकाण आपल्याला न कळल्यामुळें स्टिफनहि निष्कारण तुरुंगांत सडून मरेल. त्यापेक्षां यांच्या पाळतीवर राहिलेलें बरें, असें मला वाटलें आणि मी ताबडतोब झाडावरून खालीं उतरलों.

आतां येथें थांबण्याची मला कांहीं आवश्यकता नव्हती. मी चटकन् माळ्याच्या झोंपडींत शिरलों आणि फकिराचा वेष धारण करून बागेच्या बाहेर पडलों. जातांना माझ्या बाबतींत त्या युरोपियनांना कांहींच न कळविण्याविषयीं मीं माळ्यांना ताकीद दिली. सडकेवर येतांच विशिष्ट प्रकारचा शिटीचा इषारा केला. त्याबरोबर लक्ष्मणप्रसाद एका गल्लींतून निघून माळ्याजवळ आला. साहेबाचा पाटलाग करण्याविषयींचा मी आपला विचार थोडक्यांत कळवून त्यास तेथेंच छपून राहण्याचें सांगितलें आणि लागलाच पुढच्या एका झाडाजवळ जाऊन मी उभा राहिलों.

बागेपासून आतां जरी मी बऱ्याच अंतरावर होतों तरी माझी दृष्टी सारखी त्यांच्या फाटकाकडे होती. बागेंत बसलेल्या साहेबांपैकीं दोघेजण अर्ध्या घटकेच्या आंतच बाहेर पडले आणि मजकडे येऊं लागले. या वेळीं मीहि आपल्या वेषाला साजेसें गाणें म्हणत म्हणत पुढें जाऊं लागलों; पण ते दोघेजण साहेब मजजवळ येतांच मीं त्यांना सलाम करून खैरात मागितली. त्याबरोबर त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, " एवढ्या रात्रीं तुला खैरात द्यायला कोण बसला आहे. चालता हो. "

यावर मी कांहींच न बोलतां मुकाट्यानें पुढें जाऊं लागलों. इतक्यांत त्यांच्यापैकीं एकजण इंग्रजींत म्हणाला, " हा बेटा रामपाल तर नसेल ?"

यावर दुसरा मजकडे पाहून म्हणाला, " चल नीघ मूर्खा. तो कांहीं इतका मूर्ख नाहीं, कीं, अशा भलत्याच वेळीं इकडे तिकडे भटकत राहील. तो सध्यां आपल्या शय्येवर झोंपला असून त्याला पुढची स्वप्नें दिसत असतील ! "

सुमारें पंधरा मिनिटांच्या आंतच ते शहरांतल्या एका पातळ वस्तीच्या भागांत शिरले त्या वेळीं मीं त्यांना अत्यंत नम्रतेनें म्हटलें, " तुम्ही जर रात्रीच्या रात्र या गरीब फकिराला आपल्या घरीं रहावयाला जागा द्याल तर ईश्वर आपलें कल्याण करील. मी थंडीनें मरतों आहें. "

माझें हें भाषण ऐकून त्यांपैकीं एकजण संतापानें म्हणाला, " चल नीघ चोरा. जागा तुझ्या बापानें ठेविली आहे ! पण यावर त्याच्या

सोबत्यानें त्याची समजूत करून मला आपल्याबरोबर येण्याविषयीं सांगितलें."

मी त्याच्या मागें मागें जाऊं लागलों. थोड्या वेळानें ते एका घरांत शिरले; आणि त्यांच्या दाराशीं असलेल्या एका खोलींत मला जावयास सांगितलें. मी मुकाट्यानें आंत गेलों. त्याबरोबर त्यांनीं तिचें दार बाहेरून बंद करून त्याला कुलूप लाविलें; आणि आपण माडीवर निघून गेले, ते गेल्यानंतर त्या खोलीचें मीं एक वेळ निरीक्षण केलें. या वेळीं प्रकाशासाठीं मीं इलेक्ट्रिक कंदीलाचा उपयोग केला. रात्रीचा एक वाजून गेला होता. जिकडे तिकडे अगदीं सामसूम झाली होती. मी कांहीं वेळ खोलींत अगदीं स्तब्ध बसलों होतों. इतक्यांत बाहेर एका माणसाचा मला शब्द ऐकावयाला आला आणि त्याच्या पाठोपाठच शिटचिाही ध्वनी माझ्या कानावर पडला, शिटीच्या ध्वनीच्या विशेष प्रकारावरून :ती लक्ष्मणप्रसादाचीच असावी हें मीं ओळखलें; आणि लागलीच खोलीची खिडकी उघडली. माझें अनुमान बरोबर ठरलें. तो लक्ष्मणप्रसादच होता, मजजवळ असलेल्या सुरीनें मीं खिडकीचे गज कापिलें; आणि त्याला आंत घेतलें. स्टीफनचा शोध करावा हाच या वेळीं माझा उद्देश होता.

रात्रीं तीन वाजण्याच्या सुमारास लक्ष्मणप्रसादाचें साह्य घेऊन एका चोराप्रमाणें मी वर चढलों. प्रथम कान लावून कांहीं चाहुल लागते कां म्हणून पाहूं लागलों; पण कोणाचाच शब्द कानावर आला नाहीं. यानंतर आम्ही दोघें हातांत पिस्तुल घेऊन एका खोलींत शिरलों; पण इथेंही चाहूल ऐकावयास आली नाहीं. आतां मीं आपला कंदील पेटविला. हें सैपाकघर होतें. येथें एक पेंव आणि कित्येक खुर्च्या यांखेरीज कांहीं नव्हतें. लक्ष्मणप्रसादाला या ठिकाणीं पहारा करावयाला सांगून मी दुसऱ्या एका खोलींत घुसलों. याप्रमाणें दोनचार खोल्या तपासल्या, वर एका खोलींत दोन साहेब निजलेले मला आढळलें. त्यांना अगदीं गाढ निद्रा आली होती; पण मीं त्याच्यावर क्लारोफार्मचा प्रयोग करून त्यांना आणखी ज्यास्तच बेहोष करून टाकलें. यानंतर मी त्यांच्या पेट्या उघडून त्या तपासूं लागलों. तेव्हां एका पेटींत मॅकेअरच्या सहा

चिठ्या सांपडल्या तिच्यापैकीं एकींत पुढीलप्रमाणें मजकूर होता. " नुसता हेलनचा खून करूनच काय वैराग्नि शांत होणार आहे ? मुळींच नाहीं. गार्डनचा निर्वंश होईपर्यंत मला समाधान वाटणार नाहीं. तुम्ही लोक जर हें काम कराल तर मी तुम्हांस भरपूर इनाम देईन. "

हा मजकूर वाचतांच " मॅकेअर केवढा भयंकर माणूस आहे. " हे उद्गार माझ्या तोंडून आपोआप बाहेर पडले. मी आतां दुसरी चिठ्ठी वाचूं लागलों. तींत लिहिलें होतें. " रोजला धरण्यासाठीं तुम्हीं कोणता उपाय काढला आहे, तो ताबडतोब मला कळवा. स्वीडपार्कमध्यें माझी भेट होईल. "

तिजवरील तारखेवरून ही गेल्या आठवड्यांतील हकीकत असावी असें मला वाटलें.

तिसऱ्या चिठ्ठींत मजकूर होता तो असाः—" तुम्ही आपलें कार्य लवकर पुरें करा. बंडाचा वणवा थोड्याच दिवसांत पसरणार आहे. नानाजवळचीं बरींच पत्रें मला मिळालीं आहेत. "

बाकीच्या चिठ्या न वाचतांच खिशांत ठेवल्या; आणि बेहोष पडलेल्या साहेबावर पुन्हां एक वेळ क्लोरोफार्मचा प्रयोग करून आम्ही त्याच्या खोलींतून बाहेर पडलों. यानंतर वरच्या एकंदर खोल्या आम्हीं तपासल्या; पण कोठेंच कांहीं आढळलें नाहीं. खालच्या खोलींत कित्येक मुसलमान नोकर निजले होते. त्यांपैकीं एक माझ्या ओळखीचा होता. त्यानें सकाळींच मजकडून ताईत नेला होता; पण तो येथें आला कसा ? पण या गोष्टीचा अधिक विचार न करितां आम्ही दोघें त्या घरांतून बाहेर पडलों. "

प्रकरण १२ वें.

ही काय भुताटकी आहे ?

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

" आम्ही घराच्या बाहेर पडतों न पडतो तोंच दोघे गृहस्थ आश्चर्य चकित झाल्यासारखें होऊन तेथून निघून गेले. ते युरोपियन होते कीं, इंडियन होते, हें अंधारांत आम्हांला कळलें नाहीं. ते आरंभापासूनच दारांत उभे असले पाहिजेत, अशी माझी समजूत झाली; पण या गोष्टीचा विशेष विचार न करतां आम्ही तेथून निघालों. थोड्याच वेळानें आमचा कोणी पाठलाग करीत असावेसें आम्हांला वाटलें. अजूनही अंधेराचें प्राबल्य बिलकूल कमी नसल्यामुळें आम्ही तेथेंच थांबलों आणि सडकेवरच्या कंदीलाजवळ उभे राहिलों; पण मागें कोणी दिसलें नाहीं. नंतर आम्हीं पुन्हां हळु हळूं पुढें जाऊं लागलों. सडकेवर फिरण्यांतच सर्व रात्र घालवावी असा विचार त्या वेळीं माझ्या मनांत आला.

आमचा पाठलाग करण्याचा हेतू निर्फळ करावयाला हीच एक रामबाण युक्ति होती. हातांत पिस्तुल घेतलेला लक्ष्मणप्रसाद माझ्या मागोमाग येत होता. शहरांतला अर्धाएक भाग ओलांडल्यावर आम्ही एका चौकांत आलों, या वेळीं एकदम पिस्तुलाचा आवाज होऊन एक गोळी सूं सूं करीत माझ्या कानाजवळून निघून गेली. माझ्या बाबतींत ईश्वरानें खैर केली. तरी पण लक्ष्मणप्रसादाच्या बाबतींत तसें घडलें नाहीं. त्याच्या पायाला गोळी लागून तो मटकन खालीं बसला. मीं त्याला तसेंच खालीं पडावयाचें सांगून स्वतःही त्याचप्रमाणेंच केलें. जणूं काय त्याच्याप्रमाणें मींहि जखमी झालों आहे. आम्हावर गोळ्या झाडणारा माणूस आमच्याजवळ येईल अशी समजूत होती आणि ती लौकरच खरी ठरली. काळे कपडे परिधान केलेल्या दोन व्यक्ति थोड्याच वेळांत आमच्या जवळ आल्या. लक्ष्मणप्रसादाला पिस्तुल उचलण्याचा इशारा करून मींहि आपलें पिस्तुल हातांत घेतलें आणि त्या व्यक्ति आमच्या

जवळ येतांच आम्हीं दोघांनींहि एकदम गोळ्या झाडल्या. मी लागलाच उठून उभा राहिलों; पण आश्चर्याची गोष्ट ही, कीं, त्या दोन्हीहि व्यक्तींपैकीं आह्मांला येथें कोणीच दिसलें नाहीं. यानंतर कांहीं थोडे वेळानें साफ उजाडलें आणि आम्हीं आपल्या घरीं निघून आलों. लक्ष्मण-प्रसादला मोठी ह्मणण्यासारखी जखम झाली नव्हती. पायाचें थोडेंसें कातडें निघालें होतें इतकेंच.

घरीं गेल्यावर मीं रोजला पत्र पाठवून तिला सावध रहाण्याचा इशारा दिला. त्याचप्रमाणें गार्डनलाहि आपले शत्रू आपलीं पाळेंमुळें खणून काढण्याच्या प्रयत्नांत आहेत अशी सूचना दिली. यानंतर दोघे अगदीं हुशार गुप्तपोलिस मीं त्याच्या दारावर पहारा करण्यासाठीं ठेविले. जेवण वगैरे उरकल्यावर मीं बंगाली बाबूचा वेष परिधान केला आणि रात्रीं ज्या घरीं गेलों होतों तिकडेच गेलों; पण या वेळीं त्या घरांत कोणीच नव्हतें. इतकेंच नव्हे तर दारावर घर भाड्यानें देणें आहे. विशेष चौकशी शेजारच्या घरीं करावी, अशा आशयाची एक पाटीहि लट-कत होती.

शेजारच्या घराचा मालक एक युरोपियनच होता. मी त्यांत शिर-तांच एक नोकर मजकडे आला आणि त्यानें माझें नांव विचारलें. मीं एक खोटेंच नांव त्याला सांगून दिलें आणि शेजारचें घर आपल्याला भाड्यानें घ्यावयाचें आहे असें त्यांस सांगितलें. नोकरानें माझा निरोप मालकाला पोंचता केला. त्यानंतर थोड्याच वेळांत एक मडम मजकडे आली आणि मला ह्मणाली:—

" काय बाबुसाहेब, आपल्याला तें घर भाड्यानें हवें आहे का ? "

मी—होय. कांहीं महिन्यांकरितां हवें आहे. किती दिवसांपासून त्यांत भाडेकरी नाहीं ?

मडम—सरासरी दोन महिन्यांपासून तें खालींच आहे.

ती अगदीं धडधडीत खोटें बोलत आहे असें मला वाटलें. काल रात्रीं तेथें एवढी भानगड झाली आणि ही म्हणते दोन महिन्यांपासून मोकळी आहे, तेव्हां याचा अर्थ काय ?

आतां मीं तिला निराळ्याच मार्गानें प्रश्न विचारावयास आरंभ केला.

मी——घराचें भाडें काय आहे ?

मडम——कांहीं थोडक्या दिवसांकरतांच पाहिजे असेल तर पन्नास रुपये भाडें पडेल. ज्यास्त दिवसांकरतांच हवें असेल तर मग यांत थोडें कमी करूं.

मी——भाड्याची तक्रार नाहीं. तुम्ही सांगाल तें भाडें देतों; पण या घरांत कांहीं भुतेंबितें आहेत कां तें अगोदर मला सांगा. कारण आह्मां लोकांचा भुतांवर पक्का विश्वास आहे आणि जीं घरें अशीं पुष्कळ दिवस रिकामीं पडतात त्यांत हटकून भुतें असावयाचीं अशी आमची समजूत असते.

मडम——छे. छे. या घरांत तसा कांहीं प्रकार नाहीं. नुकतीच आमची कांहीं स्नेही मंडळी या ठिकाणीं राहून गेली; पण कोणालाच तसें कांहीं दिसलें नाहीं.

मी——ते लोक मग कां निघून गेले ? मला वाटतें त्यांना कांहीं तरी दिसलें असेल म्हणूनच त्यांनीं हें घर सोडलें असावें.

मडम——बंगाली लोक भुतांना फार भितात हें मी जाणून आहें; पण आमच्या घरांत भुतबीत कांहीं नाहीं. हें हवें तर मीं तुह्मांला लिहून देतें. इतक्यावरही जर तुह्मांला तसा प्रकार दिसून आलाच तर आह्मांला भाडें देऊं नका.

यावर मीं तिला हंसत हंसत म्हटलें, " मडमसाहेब मीं आपलें घर भाड्यानें घ्यायला तयार आहें; पण ते लोक कां त्यांतून निघून गेले हे मात्र खरें खरें सांगा."

मडम जरा अडखळत अडखळत ह्मणाली, " त्यांचा कोणी आप्त-संबंधी वारल्यामुळें ते निघून गेले."

मी——त्या गृहस्थाचें नांव काय बरें ?

मडम——(संतापानें) तुह्मांला त्याची चौकशी करून काय करावयाचें आहे? तुह्मांला घर भाड्यानें घ्यावयाचें आहे या गोष्टीशीं त्यांच्या नांवाचा काय संबंध पोंचतो तो मला कळत नाहीं.

मडम त्याचें नांव सांगू इच्छीत नाहीं हें पाहून मी निरुपायानें तिला ह्मणालों,

" आपण तर मला भीति दाखवीत आहां. या घरांत मूळचें जरी भूत नसलें तरी येथें राहणाऱ्या गृहस्थाचा नातलग जो नुकतांच मरण पावला तो तरी खात्रीनें भूत झाला असला पाहिजे. तो आतां येथें राहणाऱ्या माणसाला त्रास दिल्याखेरीज खात्रीनें राहणार नाहीं. म्हणून मला हें तुमचें घर मुळींच नको आहे. "

याप्रमाणें तिला सडेतोड उत्तर देऊन मी घराच्या बाहेर पडलों. आणि तेथें जवळच असलेल्या एका दुकानदाराजवळ मी त्या घरासंबंधीं चौकशी करूं लागलों. इतक्यांत मीं ज्याला पत्र लिहून दिलें होतें तो खानसाहेब हातांत एक चिट्ठी घेऊन मडमेच्या घरांत घुसला. मी तो परत येण्याची वाट पाहत तेथेंच उभा राहिलों. दुकानदाराला त्या घरासंबंधीं विशेष कांहीं माहिती नसल्याचें मला आढळून आलें. सुमारें अर्ध्या घंट्यानें खानसाहेब हातांत एक चिट्ठी घेऊन मडमेच्या घरांतून बाहेर पडला. तो पुढें जाऊं लागला. तसा मीं त्याचा पाठलाग चालविला.

त्याच्या हातांतली चिट्ठी वाटेल त्या रीतीनें हस्तगत करून घ्यावी हाच त्याचा पाठलाग करण्यांत माझा हेतु होता, यामुळें मीं अगदीं जलदीनें त्याच्या पुढें गेलों आणि एका झाडाखालीं उभा राहून एखाद्या अडाणी माणसाप्रमाणें रस्त्याची चौकशी करूं लागलों. मजजवळ चार पांच माणसें गोळा झालीं. त्यांत खानसाहेबही आला. या वेळीं मी एका माणसाला उद्देशून म्हणालों " मी पराठिकाणचा माणूस आहें. मला येथली कांहींच माहिती नाहीं. इतकेंच नव्हे तर मीं ज्या ठिकाणीं उतरलों होतों तें ठिकाण देखील सांपडेनासें झालें आहे. तेव्हां कृपा करून तुम्ही मला एकादें चांगलें दुकान दाखवाल तर मी तुमचा अतिशय आभारी होईन आणि माझ्या शक्तीप्रमाणें तुम्हाला बक्षिसदेखील देईन. "

माझें हें भाषण ऐकतांच खानसाहेब पुढें येऊन म्हणाला " बाबुसाहेब, हे लोक बिचारे काय तुम्हाला चांगलेंसें दुकान दाखवतात ? तुम्ही मजबरोबर चला म्हणजे मी तुम्हाला हवें तसें उत्तम दुकान दाखवितों. मी एका साहेबाचे येथें नोकर आहें. मला थोर लोकांच्या रीतिरिवाजाचा आणि राहण्याचा चांगला परिचय आहे. "

मला हेंच पाहिजे होतें. मी मुकाट्यानें त्याच्याबरोबर निघालों.

रस्त्यानें त्याच्या हातांत पांच रुपयांची एक नोट ठेवून मीं त्यास म्हटलें, " तूं मला सहाय करावयाचें कबूल केलेंस याबद्दल हें इनाम घे. "

त्यानें ती नोट हातांत घेऊन म्हटलें " हुजूर, गरिबाचे मायबाप आहेत. मी आपल्या हुकुमाप्रमाणें वागावयाला तयार आहें. "

यानंतर मी त्याला कानपूर शहराची माहिती विचारूं लागलों आणि तोही त्याला ठाऊक असलेल्या गोष्टी मला मोकळ्या मनानें सांगूं लागला. थोड्या वेळानें तो एका दुकानांत शिरला आणि आंतून एक खुर्ची आणून मला तिजवर बसावयाला सांगितलें. या दुकानांत अनेक प्रकारच्या चिजा विक्रीकरितां ठेवल्या होत्या. ते हिवाळ्याचे दिवस असून या वेळीं कानपुरास अतिशयच थंडी असल्यामुळें मला एक शाल घ्यावयाची होती. मी तेथली एक उचलून दुकानदाराला तिचा भाव विचारूं लागलों.

मुसलमान खानसाहेब ऊर्फ खानसामा दुकानदाराला धमकावून म्हणाला "तुला ठाऊक आहे ना ? मीं एक पलटणींतल्या साहेबाचा नोकर आहें. माझ्याशीं जर कांहीं लटपटपंची करशील तर मी तुला पोलिसच्याच स्वाधीन करीन. हे माझ्या ओळखीचे गृहस्थ आहेत. यांच्यापासून ज्यास्त पैसे घेऊं नकोस. "

हा एका पलटणींतल्या साहेबाचा नोकर आहे हें मला आतां कळून आलें. त्याच्या मालकाला मीं यापूर्वीच पाहिलें असून तो पलटणींत नोकर आहे हेंही मला ठाऊक होतें. किल्ल्यांत जाऊन त्याचा तपास करावयाचा एवढेंच माझें कर्तव्य होतें. शालीची किंमत पन्नास रुपये ठरली. मी दुकानदाराच्या हातांत शंभर रुपयांची नोट ठेवून बाकीचे पन्नास रुपये परत मागितले; पण त्याच्याजवळ तितके रुपये नसल्यामुळें त्यानें ती नोटच परत माझ्या हवालीं केली. मीं खानसामाजवळ ती नोट दिली आणि त्याला ती नोट मोडून आणावयास सांगितलें. ती नोट तो घेऊन निघाला इतक्यांत मीं त्याला परत बोलावून म्हटलें " मी परदेशी माणूस. शिवाय तुझी माझी ओळख नाहीं. तेव्हां तुझ्या स्वाधीन एवढी मोठी रक्कम करावययाला मला जरा भीति वाटते. मी स्पष्ट बोलतों याबद्दल राग येऊं देऊं नकोस. "

खानसामा—हुजूरचें म्हणणें खरें आहे. आपल्याला विश्वास येण्या-साठीं मीं ही चिट्टी तुमच्या स्वाधीन करतों. एकाद्यानें हजार रुपये दिले असते तरी ही चिट्टी त्याच्या स्वाधीन केली नसती; पण थोड्या वेळे-पुरतें काम असल्यामुळें मी ही चिठ्ठी तुमच्या जवळ ठेवतों. ही जर गहाळ झाली तर माझ्या प्राणालाच धोका बसेल हें ध्यानांत ठेवा.

"ठीक आहे" ह्मणून मीं ती चिठ्ठी आपल्याजवळ घेतली. त्यालाही माझा बिलकूल संशय आला नाहीं. तो गेल्याबरोबर मी दुकानाच्या बाहेर येऊन उभा राहिलों. दुकानांत या वेळीं गिऱ्हाइकांची गर्दी होऊं लागली होती. ही योग्य संधि पाहून मी त्या चिठ्ठीचा लिकाफा फोडून पाहिला. लिफाफ्यावर कोणाचेंच नांव नव्हतें. त्याजवर पत्ता वगैरे कांहीं नव्हता. त्यांतलें पत्र मीं बाहेर काढलें खरें; पण त्यांची लिपी चमत्कारि-कच असल्यामुळें मला तें वाचतां येईना. मीं निरुपायानें खिशांतलें नोट-बुक काढून त्यावर त्याची नक्कल करून घेतली आणि जवळचा एक तसाच लिकाफा काढून त्यांत तें पत्र बंद केलें.

यानंतर मी दुकानांत गेलों आणि आणखी कांहीं चीजा घेतल्या. कांहीं वेळानें तो मुसलमान खानसामा नोटेचे रुपये घेऊन आला. त्यां-तले पन्नास रुपये दुकानदाराला देऊन आम्ही दोघेही तेथून निघालों. वाटेंत खानसामाजवळ मीं त्याच्या मालकासंबंधीं पूसतपास केली. त्याज-वरून तो पायदळ पलटणींत कर्नल असून जनरल हेच्या हाताखालीं कान-पूर किल्ल्यांतच असतो हें मला कळून आलें. त्याच्या मनांत संशय उत्पन्न होईल म्हणून पत्राच्या बाबतींत मीं त्याला कांहींच विचारलें नाहीं. थोड्या वेळानें आम्ही एका घरापाशीं जाऊन पोहोंचलों. हें घर एकमजलीच होतें. तेथें पोंचताच खानासामा मला सलाम करून म्हणाला, "माझ्या मालकाचें घर हेंच. तुम्ही कांहीं वेळ येथें थांबत असाल तर मी इतक्यांत आंतून चिठ्ठी येऊन येतों. मग मी तुम्हांला तुमच्या बि-ऱ्हाडीं नेऊन पोंचतें करीन."

त्याचें हें भाषण ऐकून मी त्याला म्हणालों "तुला आतां तकलीफ घेण्याची जरुरी नाहीं. मी आतां पुसत पुसत तिकडे जाऊं शकेन."

एवढें बोलून मीं त्याच्या हातांत एक रुपया ठेवला. नंतर तो

मला सलाम करून आंत गेला. तो आंत गेल्यावर मीं त्या घराचा नंबर टिपून घेतला. या ठिकाणीं एवढें सांगणें अवश्य आहे, कीं, पूर्वी तो खानसामा ज्या ठिकाणीं दिसला होता तें घर कांहीं हें नव्हतें."

प्रकरण १३ वें.

रामपाल कैदी बनला.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

आकरा वाजण्याच्या सुमारास मी घरीं जाऊन पोंचलों आणि भोजन वगैरे उरकून त्या पत्राची नकल वाचण्याचा प्रयत्न करूं लागलों. अशा प्रकारचीं गुप्त मजकुराचीं पत्रें लिहावयाचीं असलीं म्हणजे पाश्चात्य लोक नेहमींच्या वर्णमालेंत विलक्षण फेरफार करून टाकतात. अर्थात हें मर्म ज्याला ठाऊक आहे त्यालाच असल्या पत्रातला मजकूर समजावयाचा आहे. मी ज्या पत्राची नकल करून घेतली होती तें पत्र या जातीचें होतें. यापूर्वींहि अशाच मासल्याचीं पत्रें माझ्या पहाण्यांत आलीं होतीं. त्यामुळें तीं उलगडण्याच्या कामांत मीं थोडाबहुत तरबेज झालों होतों. बारा वाजेपासून चार वाजेपर्यंत परिश्रम केल्यानंतर या पत्राचेंहि रहस्य मला कळलें. याप्रमाणें माझा हेतु सफल होतांच माझ्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. पण तें पत्र सबंध वाचतांच माझें हृदय कांपूं लागलें. त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होता.

" प्रिय मॅकेअर,:—आपल्या आज्ञेप्रमाणें आपली कामगिरी बजवीत आहें. रोजबरोबर माझी आतां इतकी दाट मैत्री जमली आहे, कीं, तें काम आजच समाप्त होईलसें वाटतें. माझ्या अटकळीप्रमाणें ती जर आजच आपल्या जाळ्यांत अडकली तर तुमच्याशीं विवाह करण्यासंबंधाची गोष्ट मी तिच्याजवळ काढीन. ती या गोष्टीस सरळपणानें कबूल झाली तर ठीकच आहे; नाहींतर मी तिला भीति घालून तिला ही गोष्ट करावयास प्रवृत्त करीन. इतक्याउपरहि ती वळलीच नाहीं तर आपल्या आज्ञेप्रमाणें मी तिला हेलनकडे पाठवीन. कबूल केलेले

रुपये द्यावयाला स्टिफन आतां तयार नाहीं असें अबदूल काल मजजवळ म्हणत होता. आतां त्याची व्यवस्था काय करावयाची हा प्रश्न राहतो. रोजच्या समोर त्याला ठार करण्याचा जो सल्ला तुम्हीं काढला आहे तो मला अगदीं पसंत आहे. यायोगानें तीहि आपलें म्हणणें मुकाट्यानें कबूल करील; परंतु हीं सगळीं कामें बंडाचा वणवा पेटण्यापूर्वी झालीं पाहिजेत. गार्डनची कामगिरीहि मजवरच सोंपवा. मी त्याला ताबडतोब निर्वाणपदाला पोहोंचवतों. अबदूलच्या हातून हें कार्य होणार नाहीं, त्याला या कामीं दोन वेळां अपयशच आलें असल्याचें मीं ऐकलें आहे. परवांच्या दिवशीं मी खुद्द त्याच्या भेटीलाच गेलों होतों. त्यावेळीं त्याचें माझें जें भाषण झालें त्यावरून मला या गोष्टीची कल्पना आली. पण त्यानें आतां कांहीं जरी केलें तरी तो आतां आमच्या सपाट्यांतून वांचत नाहीं हें खास. आज तुम्ही जर मला येऊन भेटलांत तर फार छान होईल. रात्रीं बारा वाजण्याच्या वेळीं घर नंबर २०४ या ठिकाणीं येऊन मला भेटणें. स्टिफनहि या वेळीं येऊन तुम्हाला भेटेल. आज कांहींना कांहीं तरी केलें पाहिजे. आतां या वेळीं वेळ लावणें उपयोगी नाहीं. रामपालच्या हालचालीवर नजर ठेवा !"

"काल एक विलक्षण घटना घडून आली. रामपाल वृद्ध फकिराच्या वेषानें रॉबीन आणि जेम्स यांच्या मागें लागला होता. पण ते इतके मूर्ख, कीं, त्याला त्यांनीं बिलकुल ओळखलें नाहीं. उलट त्या गद्ध्यांनीं त्याला आपल्या घरांत आणून निजवलें. या संधीचा फायदा घेऊन रामपाल कित्येक आपले महत्त्वाचे कागदपत्र घेऊन पळाला, माझ्या माणसांनीं या वेळीं त्याचा पाठलाग केला; पण तो हातीं लागला नाहीं. रॉबीन आणि जेम्स ज्या घरांत रहांत होते तें घर भाड्यानें घेण्यासाठीं आज सकाळीं एक बंगाली गृहस्थ आला होता. या गृहस्थाचा अर्थातच मला संशय येऊन मीं त्याच्या पाळतीवर एक माणूस ठेवला आहे."

"बाकी सर्व गोष्टी ठीक आहेत. रुपयांची फार जरूर आहे. सध्यां पांचशें असले तरी पुरे आहेत. तात्या टोपे याची थोडीशी बातमी मला कळली आहे. नाना पेशवे ऊर्फ धोंडोपंत लौकरच तुम्हांला भेटतील. मी सुप्रसिद्ध मृत रेसिडेंट राजर्स

यांच्या पत्नीच्या नांवानें येथें स्वतःचा परिचय करून दिला आहे. गार्डनसाहेबांच्या कुटुंबांतील एकंदर मंडळी याच नांवानें मला ओळखतात; आणि सगळ्यांशीं माझी दाट मैत्री जमली आहे. माझा कपटवेष फारच सुरेख साधला आहे. या वेषांत असतांना मी पुरुष आहे असें ह्मणण्याची कोणाचीच प्राज्ञा नाहीं.

आपला विश्वासू मित्र **टी. पीटर्स.**

पत्र वाचून मी स्तंभितच झालों. या वेळीं संध्याकाळचा सुमार झाला होता. पुढें काय करावें यासंबंधीं कांहींच निश्चित झालें नव्हतें. चिंतनें चित्त अगदीं व्याकुळ होऊन गेलें होतें. रोजचा प्राण आजच बचावणें शक्य होतें, तिला जर वांचवतां आलें नाहीं तर तिजबरोबर स्टिफनचाही घात झालाच ह्मणून समजावें. माझ्या घरापासून गार्डनचा बंगला सुमारें तीन कोस दूर होता, तेथें जाऊन पोहोंचावयाला कमींत कमी एक घंटा तरी अवश्य पाहिजे होता. तर मग काय रोजचा प्राण आपल्याला वांचवितां येणें शक्य नाहीं ! मी मनांतल्या मनांत पुटपुटलों; पण यापुढें एक क्षणाचाही विलंब न लावतां प्राणरक्षणास उपयोगी पडणारीं आवश्यक तीं शस्त्रें बरोबर घेऊन साहेबी वेषानें मी घराच्या बाहेर पडलों आणि योग्य वेळीं गार्डनच्या बंगल्यावर जाऊन पोहोंचलों. या वेळीं रात्रींचे साडेसात वाजले होते; पण जिच्याकरितां मीं इतकी धांवपळ केली ती रोज घरांत नव्हती. चौकशीअंतीं मिसेस राजर्स नामक एका स्त्रीबरोबर ती उपासनामंदिरांत गेली असल्याचें मला कळलें. मी आतां क्षणभरही तेथें न थांबतां उपासनामंदिराकडे निघालों. गार्डननें मला थांबविण्याचा प्रयत्न केला; पण मीं तिकडे दुर्लक्ष्य केलें.

मी गार्डनच्या बंगल्यांतून बाहेर पडतों न पडतों तोंच एक मुसलमान चपराशी मजकडे धांवत धांवत आला आणि मला म्हणाला, " हुजूर, गार्डनसाहेबांचा बंगला हाच कां ? "

मीः—कां बरें ?

चपराशीः—मीं उपासनामंदिरांतील पाद्र्याचा नोकर आहें. गार्डनसाहेबांची मुलगी फार संकटांत सांपडली आहे. ही बातमी घेऊन मी आलों आहें.

मी:-(उद्विग्नतेनें) ही बातमी त्यांना कांहीं सांगण्याची जरूर नाहीं; अगोदरच कळली आहे. मी तिकडेच निघालों आहें. तूंही मजबरोबर परत चल.

माझें भाषण ऐकतांच तोही मजबरोबर फिरला. मी अगदीं झपाट्यानें चालूं लागलों. अमळ दूर गेल्यावर तो मला म्हणाला, " हुजूर, उपासना-मंदिराकडे जाऊन उपयोग नाहीं. ज्या ठिकाणीं त्या बिचारीवर हल्ला झाला आहे तिकडेच चला ! "

मी:—तुला तें ठिकाण कसें कळलें ?

माझ्या या प्रश्नाचें उत्तर द्यावयाला तो जरासा अडखळला. त्याबरोबर मला त्याचा संशय येऊन त्या गुप्त पत्रांतला मजकूर माझ्या ध्यानांत आला. माझ्या पाळथीवर एक मनुष्य ठेवला आहे, असें पिटर्सनें त्या पत्रांत लिहिलें होतें. मीं एकदम त्याची मानगुटी धरली आणि दुसऱ्या हातानें त्याच्या कपाळावर पिस्तुल रोखून मीं त्याला म्हटलें " अरे बद-माषा ! पिटर्सनें माझ्या पाळथीवर ठेवलेला माणूस तूंच ना ? "

माझ्या तोंडचें हें भाषण ऐकतांच तो मला हात जोडून जीवदान मागूं लागला. आतां माझा संशय जास्तच बळावला. मीं एकदम त्याला जमिनीवर पाडलें आणि त्याच्या छातीवर बसलों. इतक्यांत एकदम जव-ळच पिस्तुलांचा आवाज होऊन एक मनुष्य धांवत धांवत माझ्याजवळ आला आणि +ठगाप्रमाणें त्यानें एकदम माझ्या तोंडावर रुमाल फेंकला. त्यानें हें काम इतक्या चपळाईनें केलें कीं, मला नुसती मान हालवायाला सुद्धां फुरसत मिळूं दिली नाहीं. माझ्या तोंडावर रुमाल फेंकतांच त्यानें तो इतक्या जोरानें आवळला, कीं, मी लागलीच बेहोष होऊन पडलों. त्याच स्थितींत आपल्याला दोन-पांच मनुष्यें उचलून नेत आहेत असें अंधुक अंधुक मला वाटूं लागलें आणि त्यानंतर रोजचेंही स्मरण झालें. पण त्याच्या पुढें काय झालें तें मला कांहीं आठवत नाहीं !

टीपः— +ठग लोक कोण होते आणि त्यांचीं कृत्यें किती भयंकर होतीं हें ज्यांना समजून घ्यावयाचें असेल त्यांनीं " ठगाची जबानी " हें पुस्तक अवश्य वाचावें.

प्रकरण १४ वें.

बंडाच्या भानगडी !

(जनरल हे यांच्या डायरीवरून)

" ता० २२ मे सन १८५७ इ० सोमवार मि. गार्डनची मुलगी मिस रोज हिचा प्राण वांचविण्याच्या प्रयत्नांत असतां सुप्रसिद्ध डिटे-क्टिव्ह कमिशनर सरदार रामपालसिंह हे बंडवाल्याच्या कचाटींत सांप-डले असें आज सकाळीं लक्ष्मणप्रसादाकडून कळलें. ही भानगड काल रात्रीं घडून आली. ही बातमी कळल्याबरोबर त्यांचा तपास लावण्या-साठीं अत्यंत हुशार असे वीस पोलिस रवाना केले. रामपालसिंहाकडून सरकारला फारच सहाय्य मिळत होतें. यामुळें व त्यांच्यावर कोसळलेल्या या संकटामुळें सरकारची अतिशय हानि झाली आहे. चोहोंकडे जो बंडाचा वणवा पसरूं पहात आहे त्याच्यासंबंधींच्या एकं-दर बातम्या आह्मांला रामपालसिंहाकडून मिळत होत्या. विश्वासघातकी नानाचें चातुर्य आणि त्याचें महत्त्व, याचप्रमाणें फ्रेंच दरोडेखोर मॅकेअर यांचें इंग्रजी सत्तेविरुद्ध कारस्थान इत्यादि गोष्टींची माहिती आह्मांला त्यांच्याकडूनच लागली. रामपालसिंहांना कैद करणारा हाच चोर मॅके-अर ! या उभयतांचें अत्यंत शत्रुत्व होतें; पण दुर्दैवानें आमचे सरदार आज त्याच्या हातांत पडले ! ईश्वरानें त्यांच्या कपाळीं काय लिहिलें आहे कोण जाणें ! त्यांच्या साहाय्याच्या जोरावर आम्ही बंडाचीं पाळें-मुळें त्याच्या गर्भावस्थेंतच खणून काढूं अशी आह्मांला मोठी आशा होती; पण त्याच्यावर कोसळलेल्या संकटामुळें आतां ती सर्वस्वी नाहींशी झाली आहे. मी आपल्या कुटुंबांतील माणसांना लौकरच कलकत्त्याला पाठविण्याच्या विचारांत आहे. लार्ड कॅनिंग यांना आज पुढीलप्रमाणें तार पाठविली आहे.

" डिटेक्टिव्ह कमिशनर सरदार रामपालसिंह यांना काल रात्रीं बंड-वाल्यांनीं कैद केलें. हा प्रकार घडून आल्यानें आमची मोठीच हानि झाली आहे. ते कैद झाल्यामुळें कालपासून बंडवाल्यासंबंधीं कांहींच

खबर आह्मांला कळली नाहीं. त्याचा तपास करण्याच्या कामीं पोलिसकमिशनर आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न करीत आहेत."

सर टॉमस हे के. टी. जे. सी. बी.
कमांडिंग ऑफिसर

ही तार रवाना झाल्यानंतर दोन तासांनींच लार्ड क्यानिंगकडून तिचें उत्तर आलें तें असें होतें:—

कलकत्ता गव्हर्नमेंट पॅलेस
ता. २२ मे. सन १८५७

"प्रस्तुतच्या आणीबाणीच्या प्रसंगीं सरदार रामपालसिंह हे केवळ आमचा उजवा हात होते असें म्हटलें तरी चालेल. त्यांना कानपूरला पाठवून मी एक प्रकारें निश्चित झालों होतें. तुम्हीं त्यांचा शक्य तितका तपास लावावा हेंच तुह्मांला माझें वरचेवर सांगणें आहे. पोलिसकमिशनर मि. हेलर हे फारसे चतुर नाहींत. यासाठीं हें काम तुम्हीं स्वतः शिरावर घ्यावें. मॅकेअरकडून तुह्मांला त्रास होईल ही गोष्ट मीं त्यांना अगोदरच सुचवून ठेवली होती. नानांच्या हालचालीवर विशेष लक्ष असूं द्यावें. बंडाचा वणवा लौकर भडकण्याचा संभव दिसतो. रामपालच्या जिवावर आम्ही उत्तर आणि पश्चिम प्रदेशांत अगदीं बिनघोर होतों; पण मला आतां तिकडे जाण्याचा प्रसंग येणार असा अदमास दिसतो. माझ्या येण्याची आवश्यकता आहे कीं काय याबद्दलचा जरूर खुलासा करावा. त्याचप्रमाणें डॉक्टर स्टिफनचीही हकीकत मला कळवावी. सरदार रामपालसिंहाचें वर्तमान रोजचे रोज कळविण्यास हयगय करूं नये."

लॉर्ड कॅनिंग.
गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया.

ता० २३ मे सन १८५७ इ० मंगळवार—आज पोलिसकमिशनर मि. हेलर यांना रामपालसिंहासंबंधानें जी बातमी लागली आहे ती फारच भयंकर आहे. तिजवरून बंडवाल्यांनीं त्यांचा खून केला असावा असा निष्कर्ष निघतो. सेंटपाल कॅथेड्रिलच्यासमोर त्यांच्या अंगावरचे कपडे आणि हातांतली कांठी सांपडली. लक्ष्मणप्रसादानें या सर्व वस्तु ओळखल्या. जेथें या वस्तु सांपडल्या तेथेंच जवळपास असलेल्या एका

खेड्यांत एक रक्तानें भरलेला सुराहि सांपडला आहे. या एकंदर गोष्टीवरून रामपालसिंहाचा खून झाला असावा असेंच सर्वांना वाटत; आणि स्वतः माझीहि अशीच समजूत आहे; पण लक्ष्मणप्रसादाचें मत याविरुद्ध आहे. अजून त्याचा तपास चालूच आहे. ईश्वर करो आणि ते आह्माला जिवंत परत भेटोत ! त्यांचा घात झाला तर आमचाही घात झाला ह्मणून समजावें. आज गंगातीरावर एक नाव येऊन लागली आहे. तींत चार पांच संन्यासी आणि त्यांचें वीस पंचवीस शिष्य आहेत, हे सगळे महाराष्ट्रीय लोक आहेत. त्यांत **तात्या टोपे** आणि **नाना**ही असावा असा आह्मांला संशय आहे; पण आमचे सरदार रामपालसिंह आज नाहींत म्हणून निश्चित कळावयाला कांहीं मार्ग नाहीं. कॅनिंगसाहेबांना आज पुढीप्रमाणें तार केली आहे—

कानपूर–किल्ला–ता. २३ मे सन १८५७ इ.

“ रामपालसिंहाचा खून झाला असावा असा तपास लागला आहे; पण अजून शोध चालूं आहे. गुप्तपोलिसाप्रमाणें दिसणारे चाळीस पन्नास संन्याशी गंगातीरावर उतरले आहेत. रामपालसिंह नाहींसे होण्यापूर्वी त्यांनीं मला एक पत्र लिहिलें होतें त्यांत नाना आणि तात्या हे उभयतां लौकरच इकडे येणार आहेत, अशी बातमी त्यांनीं मला कळविली होती. या संन्याशाच्या दळांत ते असावेत अशी माझी समजूत आहे. कांहींही असो. आम्ही या गोष्टीच्या शोधांतच आहोंत. ”

सर टॉमस हे.

ता. २४ मे सन १८५७ इ० बुधवार–आज फारच भयंकर वर्तमान आहे. गेल्या १० तारखेळा मिरजचें शिपाई फितूर होऊन बंडवाल्याला मिळाले आहेत. तेथें असलेल्या रामपालसिंहाच्या एका अनुयायानें मला ही बातमी कळविली. रामपालसिंहाचें वर्तमान आजही कांहीं कळलें नाहीं. बंगाल रेजिमेंटचे क्यापटन लुई आणि ब्यूलो यांचें वर्तन संशयास्पद दिसत आहे. तें बंडवाल्यांना मिळण्याचा संभव आहे. त्यांच्या कामावर सर्वांचें लक्ष्य आहे. मॅकेअरचा एक साथीदार काल पकडला. रामपालसिंहांच्या अनुयायांनींच ही कामागिरी बजावली. त्याला अटकेंत ठेविलें आहे. मॅकेअरच्या हातचें एक हिंदी पत्र मिळालें आहे.

तें त्यानें कलकत्तानजिकच्या बराकपूर येथील जमीनदाराला लिहिलें असून तुम्ही बंडवाल्याला केव्हां मिळणार असें त्यांत त्यानें त्यांना विचारलें आहे. मॅकेअर फार भयंकर मनुष्य आहे ! तो आंतून इतकी गुप्त कारस्थानें चालवीत असेल याची आम्हांला आतांपर्यंत कल्पनासुद्धां नव्हती. रामपालसिंहांनीं यासंबंधीं मला अनेक वेळां सूचविलें होतें; पण माझा त्यांच्या बोलण्यावर भरंवसा बसला नाहीं. तथापि त्यावेळीं केवढ्या मी भ्रमांत होतों, हें आज मला चांगले कळलें. आज लॉर्ड क्यानिंगला पुढीलप्रमाणें तार पाठविली.

कानपूर किल्ला—

ता० २४ मे सन १८५७ इ.

मेरठ येथील नेटिव्ह पलटणी बंडवाल्यांना फितूर होऊन त्यांनीं अनेक इंग्रज स्त्रीपुरुषांना ठार केलें आहे; आणि आतां तें दिल्लीकडे येऊं लागलें आहेत. अशा प्रसंगीं रामपालसिंह नाहींत ही फार दुःखाची गोष्ट आहे. बराकपुरच्या पलटणीही फितूर झाल्या काय ? आज दरोडेखोर मॅकेअरचा एक अनुयायी पकडला आहे. त्याच्याजवळ बराकपुरच्या जमीनदाराचें पत्र सांपडलें आहे. त्यांत तुम्ही बंडाला प्रवृत्त कधीं होणार असें मॅकेअरनें त्याला विचारलें आहे. हा बंडाचा वणवा मॅकेअरनेंच पेटविला आहे. तो कोणत्या ठिकाणीं छपून राहून ही कारस्थानें चालवीत आहे याचा तपास लागत नाहीं. येथल्या किल्ल्यांत लुई आणि बुलो नांवाचे दोन फ्रेंच सैनिक आहेत. त्यांच्या वर्तनाविषयींही आम्हांला शंका आहे. त्यांच्या बाबतींत काय करावें हें आपण लौकर कळवावें. स्टिफनचे वर्तमान अजूनपर्यंत कळलें नाहीं.

नम्रः—सर टॉमस हे. '

त्यानंतर कानपुरांतच बंडाचा भयंकर वणवा पेटला त्यानंतरच हकीकत टामस हेच्या डायरींत कांहींच मिळाली नाहीं.

प्रकरण १९ वें.

मॅकेअरचें पलायन.

(गार्डनची जबानी.)

" त्या दिवशीं रामपालसिंहानें रोजसंबंधीं मजजवळ चवकशी केली. त्या वेळीं माझ्या मनांत भयंकर संशय उत्पन्न झाला. तो उपासनामंदिराकडे धांवत गेल्यावर तर मला बिलकूल चैन पडेना. मिसेस गार्डनकडे जाऊन मीं तिला ही हकीकत कळविली. हेलेनच्या मृत्यूनंतर ती मृताप्रमाणें आपल्या आयुष्याचे दिवस घालवीत होती. तिच्या डोळ्यांतून पाणी निघालें नाहीं, असा एकही दिवस गेला नाहीं. हेलनच्या मृत्यूनंतर तिच्या एकंदर प्रेमाचें स्थान रोज बनली; पण त्या दिवशीं माझ्या तोंडून तिजबद्दलची ही तशी हकीकत ऐकतांच ती बेशुद्ध झाली. तिला सावध करण्यांत माझा कांहीं वेळ निघून गेला. नंतर तिच्या शुश्रूषेची कामगिरी घरांतल्या एका मोलकरणीवर सोपवून मी रोजच्या तपासासाठीं रवाना झालों.

मी निघालेलों पाहून मिसेस गार्डन ह्मणाली, " आज जर रोज तुमच्याबरोबर आली नाहीं तर मी जिवंत राहावयाची नाहीं. "

तिचें हें भाषण सुरीप्रमाणें माझ्या हृदयांत घुसलें. तथापि मी ईश्वराचें नांव घेऊन घराच्या बाहेर पडलों ! एका विलक्षण शंकेनें माझें हृदय कांपूं लागलें; आणि जणूं काय, मी एक शोकपर्यवसायी नाटकच पहात आहें असें मला वाटूं लागलें. मीं आपल्याबरोबर चार सशक्त पहारेकरी घेतले होते. माझ्या घरापासून मंदिर जरा दूर होतें, तथापि मी पायींच निघालों. आम्ही उपासनामंदिरांत जाऊन पोंहचण्यापूर्वी उपासना समाप्त झाली होती.

प्रथम आम्हीं उपासनामंदिरांतच रोजचा तपास केला; पण तेथें आम्हाला तिचा शोध लागला नाहीं. यामुळें माझें मन अतिशयच उद्विग्न झालें. सरदार रामपालसिंहहि या ठिकाणीं आम्हाला आढळले नाहींत. तेथल्या पहारेवाल्याला येथून कोणाची गाडी गेली कां ? म्हणून

आम्हीं विचारलें. तो आमच्याच ओळखीचा होता. त्याच्या उत्तरावरून रोजही, सर्वांच्या आधीं एका मडमेच्या बरोबर निघून गेल्याचें आम्हांला कळलें. मग आम्ही तेथें अधिक वेळ न थांबतां घराकडे निघून आलों. पण रोज अजून घरीं आली नव्हती. तिच्या बरोबरच्या माणसाचाहि पत्ता नव्हता. माझें मन आतां अगदींच उद्विग्न झालें. मी माडीवर न जातां खालींच बसलों. हेलन तर आम्हांला मुकलीच होती; पण रोजच्याही बाबतींत तोच प्रसंग कोसळण्याची भीति वाटूं लागली. "मॅकेअर, तुझ्या हृदयांत खरोखरच दयेचा लेशही नाहीं काय? तुझी सुडाची बुद्धि इतकी जर दांडगी होती तर तिचा प्रभाव तूं खुद्द मजवरच कां गाजवला नाहींस? बिचाऱ्या रोजनें आणि हेलननें तुझी काय नुकसानी केली होती? परमेश्वरा, हें दुःख सहन करण्याचें मला सामर्थ्य दे. अनेक विघ्नें उत्पन्न झालीं तरी तुझ्या इच्छेचाच अखेर विजय होतो म्हणून तीं विघ्नें सोसण्याची शक्ति माझ्या हृदयांत निर्माण कर."

अशा प्रकारच्या विचारांत घंटा निघून गेला असेल; पण माझी लाडकी रोज अजूनही परत आली नाहीं. तिचा तपास करण्यासाठीं मीं आतां पोलिसकमिशनरला पत्र पाठविलें. मी पुन्हां मिसेस गार्डनला भेटलों नाहीं. इतकेंच नव्हे, तर, रोजचा तपास न लागतां मी एकटाच घराकडे परतलों आहें ही बातमी तिच्या कानांवर जाऊं न देण्याची मीं खबरदारी घेतली. त्या दिवशीं मी मुळींच जेवलों नाहीं.

बरीच रात्र झाल्यावर पहारेवाल्यानें माझ्या खोलीच्या दाराला धक्का दिला. मीं दार उघडल्यावर त्यानें एक कागदाचें चिटोरें माझ्या हातीं दिलें आणि म्हटलें "बाहेर एक साहेब उभा आहे तो आपली भेट घेऊं इच्छितो." मीं दिव्यापाशीं तें चिठोरें नेऊन पाहिलें तों त्यावर रॉबर्ट मॅकेअरचें नांव. संतापानें माझ्या अंगाची आग होऊन गेली! तो रोजची हकीगत कळवण्यासाठीं मजकडे आला असावा असें वाटलें; पण त्याची भेट घेतली नाहीं तर तो आपल्याला ज्यास्तच संकटांत घालवयाचा. हा विचार माझ्या मनांत उभा राहून मीं निरुपायानें त्याला आंत पाठवून देण्याविषयीं माझ्या नोकराला सांगितलें. थोड्या वेळानें एक वेषधारी वृद्ध पादरी माझ्या खोलींत आला आणि त्यानें खोलींचें

दार बंद करून घेतलें. माझ्या जवळच एक खुर्ची होती तिजवर तो बसला आणि मला म्हणाला " मिस्टर गार्डन, आज पुष्कळ दिवसांनीं आपली भेट होत आहे. "

त्याच्या आवाजावरून तो मॅकेअरच आहे हें मीं ओळखलें. यानंतर मीं पटकन त्याचा हात धरून त्याला म्हटलें, " मॅकेअर, मीं तुझा असा कोणता अपराध केला आहे म्हणून तूं माझ्या प्राणापेक्षांही प्रियवस्तु एकांमागून एक हरण करीत आहेस. हेलनला ठार करूनही तुझी सूड उगविण्याची लालसा थंडावली नाहीं काय ? काय करूं ! मी शपथ वाहून चुकलों आहे; नाहींतर आज तुझे तुकडे करून टाकिले असते."

मॅकेअरः—गतगोष्टीचा शोक करण्यांत काय अर्थ आहे ? जें झालें तें झालें. पहिल्यापासूनच तूं माझें म्हणणें ऐकतास तर आज अशा थराला गोष्टी कशाला येत्या ? असो. आतां तरी तूं वेडेपणा करूं नकोस. तूं मजबरोबर रोजचा विवाह करण्याला तयार आहेस कीं, नाहीं हेंच मीं तुला विचारावयाला आलों आहे. या गोष्टीला जर तूं कबूल नसशील तर हेलनप्रमाणेंच हिचीही वाट लागेल हें ध्यानांत ठेव.

त्या दुरात्म्याचे असले नीचपणाचें भाषण ऐकून माझ्या सर्वांगाची लाही झाली; पण या संतापापासून वाईट परिणाम होण्याची भीति असल्यामुळें मीं ती मनांतल्या मनांत गिळली आणि त्याचे पाय धरून त्याला म्हटले, " मॅकेअर, मी तुझ्या पायां पडतों माझ्या रोजला मारूं नकोस. तिला सोडून दे. ईश्वर तुझें कल्याण करील ! "

पण माझें हें भाषण ऐकतांच तो संतापानें लाल होऊन मला म्हणाला, " मी तुझ्याजवळ धर्मोपदेश घ्यावयाला आलों नाहीं. रोजचा मजबरोबर विवाह करावयाला तूं तयार आहेस कीं नाहीं ? एवढ्याच गोष्टीचें तुजकडून मला उत्तर पाहिजे. "

आतां मलाही आपला संताप आवरणें अशक्य झालें; आणि त्या भरांत मी त्याला म्हणालों, " अरे नीचा ! नराधमा ! तुझ्यासारख्या राक्षसाच्या हातांत पडण्यापेक्षां हेलननें अत्यंत आनंदानें मरण पतकरलें; पण त्याचा मला बिलकुल खेद झाला नाहीं. तोच प्रकार हिच्याही बाबतींत होत असेल तर खुशाल होऊं दे. असलें पवित्र पुष्प तुझ्यासा-

रख्या पाप्याच्या हातांत जाण्यापेक्षां तें दग्ध झालेलेंच बरें. माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तरी मी या गोष्टीला संमती देणार नाहीं !"

याच सुमारास बाहेरून कोणाचीशी चाहूल ऐकावयाला आली आणि लागलाच माझ्या खोलीच्या दाराला धक्का बसला. त्याबरोबर " कोण आहे. " म्हणून मीं विचारिलें.

त्याचें 'टेलर' असें उत्तर मिळालें.

मी अतिशय आश्चर्यचकित होऊन दरवाजा उघण्यासाठीं उठलों. तोंच मॅकेअरनें मजवर पिस्तुल रोखून म्हटलें, " खबरदार एकही पाऊल पुढें टाकशील; तर नाहींतर एका क्षणांत तुझ्या डोक्याचे तुकडे तुकडे उडाले ह्मणून समज. "

मी स्तंभित होऊन जागच्या जागीं उभा राहिलों. मॅकेअर पलीकडच्या एका खिडकीजवळ गेला. तो अजूनही मजकडे संतप्त दृष्टीनें पहात होता. तो आतां पळून जाईल असें मला वाटलें. याच सुमारास टेलरनें दाराला पुन्हां एक धक्का दिला. माझी किंकर्तव्यमूढता अजून जशीच्या तशीच कायम होती ! मला काय करावें हें सूचेना !

मॅकेअरनें खिडकी उघडली हें मीं पाहिलें आणि तिच्यावाटें त्यानें बाहेर उडी मारली हें देखील मला दिसलें. तरी पण मी भानावर आलों नाहीं. मॅकेअर बाहेर उभा राहून मला ह्मणाला, " गार्डन, लक्षांत ठेव, मॅकेअरची आज्ञा उल्लंघन करून आजपर्यंत कोणीहि जिवंत राहिला नाहीं आणि यांतून तुझीहि सुटका होणार नाहीं; तुझा वंशच्छेद करण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे. ' ती वाटेल तें झालें तरी मी शेवटाला नेणारच !"

यानंतर त्याचा शब्द माझ्या कानावर आला नाहीं. टेलर आतां दाराला जोराजोरानें धक्के मारूं लागला. मीं हळुहळू जाऊन दार उघडलें. टेलरबरोबर कांहीं पोलिसशिपाईही होते, ते दार उघडतांच माझ्या खोलींत घुसलें. त्यांना एकंदर स्थिति कळून आली होती. माझें पत्र पोंचण्यापूर्वींच टेलरसाहेबांना सर्व हकीगत कळवून ते आपल्या घरून इकडे आले. माझा एक नोकर घायाळ होऊन हॉस्पिटलांत पडला असल्याचीहि बातमी त्यांना लागली होती. रोजचा तपास त्यांना लागला

नाहीं हें मॅकेअरच्या भाषणावरूनच मला समजलें होतें व टेलरनीं विचारल्यावरून मीं त्यांना सांगितलें, कीं, "मॅकेअर इतक्यांत येथेंच होता; पण आपली चाहूल लागल्याबरोबर तो पलीकडच्या खिडकींतून पळून गेला !"

माझें हें भाषण ऐकून टेलरसाहेब आश्चर्यचकित झाले; पण मी त्यांना ह्मणालों, "साहेब, यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं, योग्य वेळीं मी त्याच्यासंबंधाची सर्व हकीकत तुह्मांला कळवीन. तो माझा कट्टा शत्रु आहे. रोजला ह्यानेंच पकडून ठेवलें आहे. तुम्ही शक्य ती खटपट करून तिला त्याच्या कचाट्यांतून सोडवा. सरदार रामपालसिंह हे माझे खरें हितचिंतक दोस्त आहेत; पण तेहि या सैतानाच्या तावडींत सांपडल्यासारखे दिसतात."

यानंतर टेलरसाहेबाबरोबर माझें आणखीहि पुष्कळ भाषण झालें; पण तें सर्व हेलनच्या शोककारक मरणासंबंधाचें होतें. माझी ही शोककहाणी ऐकून त्यांचाही कंठ भरून आला. त्या रात्रीं त्यांनीं माझ्याच घरीं मुक्काम केला. सकाळीं मिसेस गार्डन रोजच्या दुःखानें अत्यंत विव्हळ झाली; पण तिच्यासमोर जाऊन तिचें सांत्वन करण्याचें धैर्य मला होईना. अखेर ही कामगिरी मीं टेलरसाहेबांवरच सोपविली. त्या दिवशीं तिचा ज्वर फारच भडकला ! डॉक्टरनेंहि तिच्या बाबतींत निराशाच प्रगट केली. या एकंदर प्रकारामुळें माझ्या दुःखाला आतां पारावारच उरला नाहीं. आज पुष्कळ दिवसांनीं पाषाणतुल्य बनलेलें माझें हृदय दुःखाघातानें विस्कळलें आणि मला आपले अश्रु रोकणें अशक्य झालें.

या प्रसंगीं माझ्या हृदयांतील ईश्वरी निष्ठा पार ढासळण्याच्या बेतांत आली होती; पण इतक्यांत जणुं काय कोणीं माझ्या हृदयावर आघात करून मला म्हटलें, "गार्डन ! सांभाळ ! हा संसार म्हणजे एक परीक्षालय आहे !"

प्रकरण १६ वें.

लक्ष्मणाची फकिरी

(लक्ष्मणप्रसादाची जबानी)

" ज्या दिवशीं संध्याकाळीं सरदार रामपालसिंह रोजचा प्राण संरक्षण करण्यासाठीं आपल्या बिऱ्हाडांतून बाहेर पडले त्या वेळीं त्यांनीं मला सांगितलें होतें, कीं, मी रात्रीचे दहा वाजेपर्यंत जर बिऱ्हाडीं आलों नाहीं तर विठूर रोडवरील ४०० नंबरच्या घरांत माझा तपास कर. त्याप्रमाणें ती वेळ टळतांच त्यांचा शोध करण्यासाठीं मी वेष पालटून घराच्या बाहेर पडलों आणि त्यांनीं सांगितलल्या घराचा पत्ता लावला; पण हें घर बंद असल्यामुळें माझा आंत प्रवेश होणें शक्य नव्हतें. आंतील माणसाची चाहूल बाहेर ऐकावयाला येत होती. आंत कसें घुसावें याचा आतां मी विचार करावयास लागलों. मी वृद्ध मुसलमान फकिराचा वेष घेऊन फिरत असल्यामुळें मला हाच वेष घेणें इष्ट वाटलें. आंत घुसण्याचा मला दुसरा कांहीं उपाय सुचेना. तेव्हां मी त्या घरापासून जरा दूर होऊन मोठ्यानें रडूं लागलों. आणि जमिनीवर लोळण घेऊन सर्वांगाला माती लावून घेतली. माझा रुदनध्वनी त्या घरांत घुसतांच आंतून एक म्हातारा साहेब बाहेर आला आणि म्हणाला " अरे बुड्ढया, रडतोस काय ? "

मीं रडत रडत म्हटलें " पोलिस शिपायानें मला फार मारलें. " वृद्ध-साहेब म्हणाले, " का बरें ! " मीं म्हटलें "सरदार रामपालसिंह नांवाच्या एका बदमाषाचा मीं मित्र असावा असा त्यांना संशय आला; पण मी वास्तविक एक गरीब फकीर आहें. "वृद्ध साहेब म्हणाले, आणि एवढ्या-वरूनच त्यांनीं तुला मारिलें ? " मीं म्हटलें " होय साहेब. मारून मारून त्यांनीं माझा पाय तोडला आणि मजजवळचे पैसेहि हिसकावून घेतले." माझ्या तोंडून रामपालसिंहाचें नांव ऐकताच तो वृद्ध साहेब फार आश्चर्यचकित झाला; पण मला पुनः कांहीं न बोलतां तो आंत निघून गेला आणि थोड्याच वेळानें आणखी दोन साहेबांना घेऊन तो परत

मजकडे आला. ही नवीन मंडळी मला पोलिससंबंधीं बरीच माहिती विचारूं लागली. पण मीं त्यांना म्हटलें व जोंपर्यंत माझें मन स्थिर झालें नाहीं, तोंपर्यंत तुमच्या प्रश्नाचें कांहींच उत्तर देतां यावयाचें नाहीं. यासाठीं कृपा करून मला आंत न्या आणि थोडें पाणी प्यावयाला द्या म्हणजे मी सगळी हकीकत तुम्हाला सांगतों."

माझें हें भाषण ऐकल्यावर त्यांनीं मला आंत येण्यास सांगितलें. पण मी म्हटलें "हुजूर, कृपा करून मला उचलून न्या. माझ्या अंगांत उठावयाचीसुद्धां शक्ति नाहीं !" माझें हें भाषण ऐकून त्यांनीं मला आंत उचलून नेलें आणि एका खोलीच्या पुढच्या पडवींत ठेवलें. नंतर शिपायाकडून पाण्याचा एक ग्लास मागवून तो मला प्यावयाला दिला. मीं याबद्दल त्यांचें आभार मानले. थोड्या वेळानें एक साहेब मला म्हणाला, "बुड्ढया, तूं आतां जरा विश्रांति घे. तुला काय पुसावयाचें तें आम्ही मग पुसूं."

इतक्यांत दुसरा साहेब म्हणाला, "बरें पण मी विचारतों या प्रश्नाचें उत्तर मला दे पाहूं ? तुला मारल्यानंतर ते पोलिस कोणीकडे गेले ?

मीः—ते इकडेच आले.

यानंतर कांहींच न बोलतां मी निजलों आणि थोड्याच वेळानें घोरूं लागलों. पुढें एका घंट्यानंतर त्या घरांत चोहोंकडे सामसूम झाली. यावरून तेथचीं सर्व माणसें निजलीं असावींत असें मला वाटलें. अशा स्थितींत आणखीहि एक घंटा गेला. आतां तर तेथें अगदींच शांतता पसरली होती. मी हळूच उठून बसलों. इतक्यांत कोणी रडल्याचा मला भास झाला. मी लक्षपूर्वक ऐकूं लागलों. पुनः तसाच ध्वनी माझ्या कानावर आला. तो आवाज स्त्रीचाच असावा हें मीं ओळखलें आणि एवढें ओळखल्यावर तो रोजचा असला पाहिजे हें ओळखायला मग किती उशीर लागणार होता ?

मी निजलों होतों त्या पडवींतच साहेबांचे कांहीं नोकर निजले होते. मी जागा झालों त्या वेळीं ते घोरत होते. माझ्याजवळ क्लोरोफार्मची बाटली होतीच तिचा मी त्या सर्वांवर प्रयोग केला. हें काम पूर्ण केल्यावर मी तेथून माडीवर गेलों. तेथें पहिल्याच खोलींत दोघे साहेब

निजले होते आणि त्यांच्या उशाशीं एक पिस्तुल ठेविलेला होता. या साहेबावरहि मीं क्लोरोफार्मचा प्रयोग केला आणि त्यांच्या उशालगतचें पिस्तुल काढून घेतलें. याच वेळीं रोजचें रोदन माझ्या कानावर आलें आणि तिला धमकी घालणाराचा अवाजहि मला ऐकावयाला आला. यानंतर मी चटकन उठून दुसऱ्या खोलींत घुसलों, पण तेथें निजलेल्या सर्व व्यक्ति गाढ निद्रेंत निमग्न झाल्या होत्या. या मंडळींत माझ्या ओळखीचाहि एक साहेब होता. आम्ही ज्या वेळीं डॉक्तर स्टिफनचा शोध करीत होतों त्यावेळीं यांच्यावर मीं क्लोरोफार्मचा प्रयोग केला होता. आतांहि मला पुनः त्याच मार्गाचा अवलंब करणें भाग पडलें. सर्व मंडळीबरोबर त्यांच्याहि नाकाजवळ क्लोरोफार्मची शिशी धरल्यावर मी त्यांचे खिसे तपासूं लागलों तों त्याच्या एका खिशांत एक पिस्तुल आणि दुसऱ्या खिशांत एक बाटली सांपडली. तिच्यांत " हायड्रोसेनि ॲसिड " नांवाचें भयंकर विष होतें. ही बाटली मीं आपले खिशांत घातली आणि पिस्तुल एके बाजून ठेवून दिलें. टेबलावर बरीच पत्रें होतीं. तींहि मीं सगळीं घेतलीं त्यांपैकीं एका पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर होता:—

" मि. जोन्स, धोंडोपंत नाना आले आहेत. इकडे आमचीहि सर्व तयारी आहे. आतां बंडाची ज्वाला उठण्यास उशीर लागणार नाहीं. आज जाळ्यांत सांपडलेलीं पांखरें आपलें म्हणणें ऐकावयास तयार नसतील तर त्यांचा ताबडतोब निकाल लावून टाकावा. मी आज गार्डनला भेटावयाला जात असून त्याच्या दैवांत अखेरचें जें काय लिहिलें असेल त्याचीहि प्राप्ती आज त्याला करून देणार ! रामपालाच्या बाबतींत आतां अधिक चौकशी करण्याची गरज नाहीं. त्या बदमाषाचा कायमचाच कांटा निघाला आहे. "

शेवटची ओळ वाचतांच मी अतिशय घाबरलों आणि आपल्या मनाशीं म्हणालों " या नीचांनीं सरदार रामपालसिंहाचा खरोखर खून केला असेल काय ? हाय रे देवा ! त्यांच्या आश्चर्यकारक जीवनाचा अखेर शेवट याप्रमाणें लागावा काय ? "

यानंतर त्या खोलींत एक क्षणभरही न थांबतां रोदनाचा ध्वनि जिकडून ऐकावयाला येत होता तिकडे मीं आपला मोर्चा फिरविला आणि

क्रमानें तीन खोल्या ओलांडल्या व चौथ्या खोलीपाशीं गेलों. येथें अतिशय गडद अंधार होता; पण मी कांहीं वेळ तेथें थांबलों तों पुढील संवाद माझ्या कानांवर आला.

एकः–छेः बुवा ! आपला हात कांहीं त्या पोरीला मारावयाला धजत नाहीं. ही कामगिरी तुम्हीच संपवा. मी हवी तर स्टिफनची कामगिरी आपल्याकडे घेतों.

दुसराः–तें कांहीं नाहीं. ज्याचें काम त्यानेंच केलें पाहिजे. रोजच्या समोर स्टिफनला मारावयाचें काम मजवर सोंपविलें आहे. तेंच मी करणार. इतक्यांत तिनें जर आमचें म्हणणें ऐकलें तर तुला कांहींच करावें लागणार नाहीं. ह्मणून मी ह्मणतों कीं, माझें काम मला करूं दे, आणि तुझें तूं कर. तुझें काम मीं घेतलें आणि तिनें आमचें ह्मणणें कबूल केलें तर माझी मनुष्यहत्येची लालसा तशीच अतृप्त राहील. तिच्या डोळ्यादेखत स्टिफनचा खून होऊं लागला म्हणजे आमचें ह्मणणें ती मुकाट्यानें कबूल करील असें मला वाटतें.

एकः–आपलें ह्मणणें म्हणजे तिनें मॅकेअरशीं विवाह करावा हेंच ना ?

दुसराः–होय.

एकः–ठीक आहे तर. ती या गोष्टीला कबूल आहे कीं, नाहीं हें मी पाहातों.

एवढें बोलून त्या माणसानें दिवा लावला आणि समोरचें दार उघडलें. मी चटकन अंधेरांत दडलों. दिव्याच्या उजेडांत त्या दोघांपैकीं एक हिंदु आणि एक मुसलमान असल्याचें मला दिसलें. उभा होता तो हिंदू होता. तो दिवा लावून आंत घुसला. दुसरा मनुष्य अंथरुणावर पडला होता. मी क्लोरोफार्मची शिशी बाहेर काढून त्याच्या बिछान्याजवळ गेलों. अंधेर असल्यामुळें त्याला हें कळलें नाहीं. मीं मोठ्या सावधपणानें शिशी त्याच्या नाकाजवळ धरली. त्याबरोबर त्याचें सर्वांग थरारून तो एकदम बेहोष झाला. त्यानें लौकर शुद्धीवर येऊं नये ह्मणून मीं त्याच्या नाकावर एक क्लोरोफार्मांत भिजवलेला कागदाचा तुकडा ठेवला. हें काम संपल्यावर आंतल्या मनुष्याची कशी वाट लावावी या विचारांत पडलों. सामना करून उपयोगी नव्हतें. कारण, तशा प्रसंगीं तो शस्त्राचा तरी उपयोग

करावयाचा. किंवा तें न साधल्यास मोठ्यानें ओरडावयाचा आणि असें झालें म्हणजे त्याच्या ऐवजीं माझीच गठडी वळावयाची.

याप्रमाणें विचार करून तो बाहेर आल्यानंतरच त्याला पकडावयाचें मीं ठरविलें आणि दाराशीं जाऊन छपलों. अंगावरच्या उपरण्याला पीळ घालून मीं तें दोरीसारखें बनविलें आणि एका हातानें दुसऱ्या हातांत पिस्तुल घेतलें. दाराच्या फटींतून मला आंतील सर्व प्रकार दिसत होता. रोज खुर्चीवर बसून रडत होती आणि आपल्या दोन्ही हातानें तिनें आपले डोळे झांकून घेतलें होतें. आंत गेलेल्या मनुष्यानें तिला धमकावून कांहीं विचारलें; पण तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

कांहीं वेळानें तो पुन्हां तिला दरडावून म्हणाला, " रोज, नीट विचार कर. तूं जर आमचें ह्मणणें कबूल केलें नाहींस तर तुझ्या डोळ्यादेखत तुझ्या प्रिय दोस्ताला–स्टिफनला आम्ही ठार करूं. तुझ्याकरतांच आज त्याचा घात होणार हें ध्यानांत ठेव. असें होऊं नये, असें जर तुझ्या मनांत खरोखरच असेल तर तूं महात्म्या मॅकेअरबरोबर लग्न करावयाला मुकाट्यानें कबूल हो. माझें नांव अबदूल आहे. हेलनला यमलोकीं मींच पाठविलें आणि त्याचें कारण तुला ठाऊक आहेच. मॅकेअरशीं लग्न लावावयाला ती कबूल झाली नाहीं ह्मणून तिची अशी स्थिति झाली आणि तूंही जर असलाच वेडेपणा करशील तर माझा हा सुरा तुझ्या काळजाची भेट घ्यावयाला बिलकूल मागेंपुढें पहाणार नाहीं. त्याचप्रमाणें स्टिफनलाही तुझ्या डोळ्यादेखतच यमलोकीं पाठवीन पहा ! माझें ह्मणणें ऐकलेंस तर तुह्मां दोघांचेहि प्राण वांचतील आणि आपलें स्वतःचें जीवन मॅकेअरबरोबर तुला अतिशय सुखानें घालवितां येईल ! "

त्यानें इतकी धमकी दिली तरी रोज कांहींच न बोलतां मोठमोठ्यानें रडूं लागली. अबदुल हें नांव माझ्या कानांवर येतांच मी दचकलों. हेलनचा घात करणारा–मॅकेअरचा नीच दोस्त अबदुल हाच. आतांपर्यंत अनेक प्रकारचीं पापकर्मे करून पुन्हां रोजचा आणि स्टिफनचा घात करावयाला त्याची तयारी होती. या वेळीं पिस्तुल उडवून एकदम त्याचें डोकें फोडावें असें माझ्या मनांत आलें; पण यामुळें घरांतले बाकीचे लोक सावध होऊन स्टिफनला आणि रोजला मुक्त करण्याच्या आपल्या

मार्गांत अडथळा उत्पन्न होईल हा विचार त्याच वेळीं माझ्या डोक्यांत येऊन मीं तो बेत रहित केला आणि आपल्या पहिल्याच युक्तीचें अवलं॰ बन करावयाचें कायम केलें. अबदुल आतां बाहेर यावयास निघाला होता. यामुळें मी थोडा एकीकडे झालों आणि तो बाहेर येतांच त्याच्या गळ्यांत उपरण्याची दोरी नेमकी अडकवून ती इतक्या जोरानें खेंचली कीं, तो मूर्च्छा येऊन खालींच पडला. या वेळीं त्याच्या तोंडून अस्पष्ट शब्द बाहेर पडले; पण ते कोणालाच ऐकूं गेले नसतील. यानंतर क्लोरोफार्मची शिशी त्याच्या नाकाशीं धरून मीं त्याला पकें बेहोष करून टाकिलें आणि मग त्याच्या नरडीचा फांस काढून घेतला. याच उपरण्यानें मीं त्याचे हातपाय पक्के बांधून टाकिले. पुढें मी इलेट्रिकचा कंदील पेटवून रोजच्या खोलींत गेलों. ती बिचारी अजूनही रोदन करीत उभी होती. मीं आंत गेल्याबरोबर तिला म्हटलें " रोज, तुला जर आपले प्राण वांचवावयाचे असतील तर मजबरोबर लवकर चल. मी सरदार रामपालसिंहाचा एक सेवक आहें. "

रामपालसिंहाचें नांव ऐकतांच तिनें मजकडे पाहिलें आणि म्हटलें, " तुम्ही त्यांचेच सेवक आहां याला प्रमाण काय ? "

मीः—इथें मी तुम्हांला काय प्रमाण देऊं ! तुम्ही मजबरोबर बाहेर चला, म्हणजे तुम्हांस हवीं तितकीं प्रमाणें देतों. तुमचे प्राण वांचवावेत या सदिच्छेनेंच मी तुमचेकडे आलों आहें. सरदार रामपालसिंहाची तुम्हाला कांहीं हकीगत माहित असल्यास कळवा. तुमचे प्राण वांचवावे या हेतूनें येऊन ते शत्रूच्या तडाक्यांत सांपडले आहेत आणि मीही आरंभीं त्यांचाच शोध लावण्याचें उद्देशानें येथें आलों होतों.

माझें हें भाषण ऐकून रोज रडत रडत ह्मणाली, " हाय ! तेदेखील या नीचांच्या हातीं सांपडले ना ! आतां पित्याचें रक्षण कोण करील ?

मी—आतां रडून उपयोगाचें नाहीं. शिवाय येथून बाहेर पडावयाला तुम्ही जर उशीर कराल तर मला तुमचेहि प्राण वांचवितां येणार नाहींत.

यानंतर ती उठली आणि बाहेर यावयास सिद्ध झाली. मीं एका हातांत कंदील आणि दुसऱ्या हातांत पिस्तुल घेऊन दाराच्या बाहेर

आलों. मजबरोबर रोजही आली; पण बाहेर येऊन पाहतों तो अबदूल नाहीं. हें पाहून मी अतिशय घाबरलों. ज्या अवस्थेंत मीं त्याला ठेविलें होतें, त्या अवस्थेंत त्याला दुसऱ्याच्या सहाय्यावांचून तेथून उठणें शक्यच नव्हतें. त्या प्रकारांवरून घरांतील माणसें सावध झालीं असावींत असा मीं तर्क केला. अशा स्थितींत रामपालसिंहाचा शोध करणें किंवा रोजचा प्राण वांचाविणें या गोष्टी तर लांब राहिल्या; पण आपली स्वतः-चीच येथून धडपणीं सुटका होणें अशक्य आहे असें आतां मला वाटूं लागलें; पण अशा प्रकारें विचार करण्यांत अधिक वेळ न घालवितां मीं रोजला तेथेंच उभें केलें, आणि रोजच्या खोलींत घुसलों; पण तेथें कोणींच नव्हतें. या खोलींतून मग मी बाहेर पडलों आणि तिच्या शेजारच्या खोलींत घुसलों. तथापि आश्चर्याची गोष्ट ही कीं, या ठिकाणीं जीं माणसें बेहोष करून टाकलीं होतीं तींही आतां येथें नव्हतीं. हा विलक्षण प्रकार पाहून तर माझें मन फारच उद्विग्न झालें; पण या खोलींत जाऊन मला थोडा वेळ झाला असेल नसेल तोंच दहापंधरा सशक्त माणसें मजवर चाल करून आलीं. त्यांच्या डाव्या हातांत बंदुक होती. मी आतां अधिक वेळ न लावता तेथें जळत असलेल्या दिव्याकडे पिस्तुल झाडला आणि स्वतःच्या हातांतील कंदील विझवून टाकला. दिव्याचे तुकडे तुकडे होऊन घनघोर अंधकार पसरला; आणि त्यानं-तर सर्व खोलीभर पिस्तुलाचा आवाज घुमूं लागला. या प्रसंगीं कोण कोणावर चालुन जात होता हें कळण्यास मार्ग नव्हता. या संधीचा फाय-दा घेऊन मी तेथून बाहेर निसटलों; पण या वेळीं रोजचें काय झालें या संबंधीं विचार करावयाला मला बिलकूल सवड मिळाली नाहीं."

प्रकरण १७ वें.

हें काय स्वप्न आहे !

(रोजची जबानी.)

" लक्ष्मणप्रसादाला भेटण्यापूर्वींच स्टिफन मजकडे आले होते. मी स्वप्नांत त्यांची मूर्ति पहात होतें; पण मला त्यांनीं जागें करतांच मी दचकुन उठलें; आणि आपण कैदेंत आहों या गोष्टीची मला क्षणभर विस्मृति झाली ! "

स्टिफन माझा हात धरून अत्यंत करुण स्वरानें म्हणालें, " रोज, मी या वेळीं तुझी शेवटची भेट घेण्याकरितां आलों आहें. तो दुष्ट माझा प्राण घेतल्याखेरीज सोडीत नाहीं; आणि ही गोष्ट तुझ्या डोळ्यासमोरच करावयाचा त्याचा संकल्प आहे. अशा प्रकारें तुला भीति दाखविली म्हणजे तूं मॅकेअरबरोबर विवाह करण्यास तयार होशील असा त्यांचा हेतु असावा. कांहीं असो. त्यांनीं कांहीं केलें तरी तूं या गोष्टीस कबूल करणार नाहीं अशी मला आशा आहे. "

एवढें बोलून स्टिफन माझ्या तोंडाकडे पहात स्तब्ध राहिले. याच सुमाराला त्यांच्या नेत्रांतून एक अश्रुबिंदु माझ्या हातावर पडला. किती वेळपर्यंत काय बोलावें हें मला कांहींच सूचेना मी अगदीं किंकर्तव्य-मूढ होऊन गेलें.

याच वेळीं बाहेरून कोणी म्हणालें, " चल, काय बोलावयाचें असेल तें बोलून लौकर बाहेर ये. आतां अधिक वेळ राहिला नाहीं. "

य नंतर स्टिफन मला म्हणाले, " रोज, मला मॅकेअरनेंच याच वेळीं तुजकडे पाठवलें आहे. माझ्याखेरीज दुसऱ्या कोणावरही तुझें प्रेम नाहीं ही गोष्ट त्याला ठाऊक आहे. यामुळेंच या बाबतींत तो आपला मार्ग निष्कंटक करावयास पहात आहे. तुझ्या कल्याणासाठीं मीं आपलें जीवित समर्पण करावयासही मागें पुढें पहावयाचा नाहीं; पण तितकें करूनही तुझे प्राण वांचतलिच अशी आशा नाहीं."

"तुला दुर्मार्गावर नेईपर्यंत नीच मॅकेअरच्या मनाला समाधान वाटणार

नाहीं. तूं त्याचें म्हणणें कबूल केलें नाहींस तर तूं, तुझा पिता आणि मी असे आपण तिघेही या जगांतून नाहींसे होऊं. यांत बिलकूल शंका नाहीं. मॅकेअरचा तसा निर्धारच झाला आहे; पण मी म्हणतों असें झालें तरी कांहीं हरकत नाहीं; पण तूं त्या दुष्टाचें म्हणणें कबूल करूं नकोस. तुला हाच शेवटचा निरोप कळवण्यासाठीं मी येथें आलों आहें. "

बाहेरच्या माणसानें पुन्हां एकदां स्टिफनला जोरानें बाहेर येण्यास सांगितलें. स्टिफनही आतां माझा हात सोडून बाहेर पडले. जातां जातां मला इतकेंच म्हणाले, "रोज, आतां अधिक शोक करूं नकोस. ईश्वरावर भरंवसा ठेवून आपलें मन खंबीर कर. मनाचें धैर्य दाखवावयाला हीच उत्तम संधि आहे. मरावयास तयार हो. हा मार्ग आनंदानें कसा आक्रमण करावा हें मी तुला अगोदर दाखवितों. "

स्टिफन मजकडे आल्यापासून पुन्हां परत जाईपर्यंत मी अगदीं स्तब्ध होतें; पण मजजवळून निघून जातांच माझें काळीज कांपू लागलें. मला आतां स्वस्थ बसणें अशक्य झालें. कोण जाणें काय तें ! पुष्कळ प्रयत्न करूनही मला माझें मन स्थिर करतां येईना. याप्रमाणें मी रडत राहिलें. इतक्यांत लक्ष्मणप्रसाद मजकडे आले.

लक्ष्मणप्रसाद दिव्यावर पिस्तुल झाडून ज्या वेळीं पळाले त्या वेळीं आपली सुटका होणें आतां अशक्य आहे असा विचार माझ्या मनांत आला. इतकेंच नव्हे तर, स्टिफन आणि आपण बरोबरच मरणार अशी माझी खात्री झाली.

त्या दुष्टांनीं पुन्हां दिवा लावला आणि माझे हातपाय बांधून टाकले. यानंतर त्यांनीं मला एका अंधारकोठडींत नेऊन टाकलें. तिचा दरवाजा बंद त्यांनीं केला आणि मी दुःखसागरांत निमग्न होऊन ईश्वराची प्रार्थना करूं लागलें.

मीं याप्रमाणें ती रात्र घालविली. मजवर त्यांनीं यापलीकडे दुसरा कोणताहि अत्याचार केला नाहीं. दुसरें दिवशीं सकाळीं राजर्सबाई माझ्या भेटीला आली. मी तिला म्हटलें, " धर्मावर तुझा मुळींच विश्वास नाहीं ! तूं स्वतः कुलस्त्री असून मजसारख्या एका कुलकन्येला दुर्मा-

गोंत घालण्याचा प्रयत्न करतेस याचा अर्थ काय ? ईश्वराचें शासन नाहींसें झालें नाहीं. पापपुण्याचा विचार अजूनही होत असतो हें नीट ध्यानांत धर."

पण ती माझ्या बोलण्याकडे बिलकूल लक्ष न देतां मॅकेअरशीं विवाह करण्याच्या बाबतींत माझें मन वळवूं लागली. या वेळीं तिनें मला किती तरी भीति घातली आणि केवढा तरी लोभ दाखविला; पण मीं कशालाच भीक घातली नाहीं.

आपले सर्व प्रयत्न फुकट गेले असें पाहून ती मला संतापानें ह्मणाली, "तुझ्या या हट्टीपणाचें फळ तुला लवकरच मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं. ध्यानांत ठेव. आजच्या आज तुझा देह कोल्ह्याकुत्र्यांच्या भक्ष्य-स्थानीं पडेल."

मी—या गोष्टीनें मला समाधान वाटलें.

राजर्सचें हें कठोर भाषण ऐकून तिच्या स्त्रीत्वाविषयीं मला संशय येऊं लागला व ती स्त्री वेषधारी पुरुष असेल असें मला वाटलें.

त्या दिवशीं मी जेवलें नाहीं, सबंध दिवस ईश्वराच्या प्रार्थनेंतच घालविला. आईबापाबद्दल विचार माझ्या मनांत येऊन मला अतिशय दुःख झालें; पण या वेळीं माझ्या हृदयांत बरेंच सामर्थ्य आलें. स्टिफनचा उपदेश माझ्या प्रत्येक धमनींतून वाहूं लागला.

रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास एक पाद्री बत्ती घेऊन मजजवळ आला. त्याबरोबर माझ्या अंताचीही वेळ समीप आली असें मला वाटूं लागलें. परंतु स्टिफनविषयीं माझें मन उद्विग्न झालें. हाय ! ते या वेळीं कोठें असतील ?

थोड्या वेळानें एका हातांत नागवी तरवार आणि दुसऱ्या हातांत शृंखलाबद्ध स्टिफनचा दंड धरलेला अबदुल तेथें येऊन या पवित्र कार्यांत विलीन झाले. या वेळीं अबदुल मला ह्मणाला, "मिस रोज, अजूनही आमचें म्हणणें कबूल कर. आपलें अमोल यौवन व्यर्थ घालवूं नकोस."

त्याचें हें भाषण ऐकतांच मीं संतापानें म्हटलें, "या माझ्या अखेरच्या कार्यांत तरी विघ्न करूं नकोस."

स्टिफन प्रार्थना करतांना म्हणाले, " हे प्रभो, धर्मासाठीं आम्ही या तुच्छ जीवनाचा परित्याग करून तुझ्या न्यायी राज्यांत प्रवेश करीत आहेत. हे बापा ! तूं आपल्या पवित्र जलाच्या योगानें आमच्या आत्म्याचा मैला धुवून आह्मांला तुझ्या अखंड शांततामंदिरांत चिरकाल निवास करूं दे. "

यावर पाद्री " तथास्तु " म्हणाला.

या वेळीं माझ्या तोंडून प्रार्थनेचा एकहि शब्द कां निघाला नाहीं तें मला कळलें नाहीं; नाहीं म्हणावयाला मी फक्त एवढेंच म्हणालें, " देवा, तूं या अनाथाचें तूंच रक्षण कर " याहि वेळीं पाद्रीच्या तोंडून " तथास्तु " असा शब्द बाहेर पडला.

बरोबर याच वेळीं खोलीचें दार खाडकन उघडलें आणि हातांत नागवी तरवार घेतलेले वीरश्रेष्ठ सरदार रामपालसिंह तेथें प्रकट झाले. "

प्रकरण १८ वें.

झांशीचे राणीचा गुरु—तात्या टोपे.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

" त्या रात्रीं मॅकेअरच्या अनुचरांच्या हातांत सांपडून माझी काय अवस्था झाली तें स्वतः मला कळलें नाहीं. त्यानें माझ्या गळ्यांत फांस अडकवून तो जोरानें आवळल्याबरोबर मी बेहोष होऊन गेलों होतों, नंतर मी पुनः भानावर आलों त्यावेळीं आपण एका नावेंत पडलों असून आपल्या सभोंवतीं आठ दहा महाराष्ट्र संन्यासी बसले असल्याचें मला आढळून आलें. त्यांतला तेजःपुंज संन्यासी तर माझ्या स्मरणांतून केव्हांच नाहींसा होणार नाहीं ! त्यांना मीं यापूर्वींहि एकदां पाहिलें होतें, तो प्रसंग वाचक विसरले नसतीलच. कानपुरला येतांना गंगातटाकीं जो संन्यासी मला आढळला होता तोच हा संन्यासी होय. त्याला पाहतांच इतरांच्या मनांत जसा त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न होत असे तसाच या वेळीं माझ्या मनांत उत्पन्न झाला. मी उठून बसल्याबरोबर त्यांना नमस्कार केला. त्यांनींहि मला उलट नमस्कार करून म्हटलें " सरदार

रामपालसिंह, तुम्ही मला ओळखतां ? मी अजून पूर्णपणें शुद्धिवर नस-ल्यामुळें मला त्याच्या प्रश्नाचें उत्तर देतां आलें नाहीं. मला चांगलें शुद्धीवर यायला एक तास लागला. तेवढ्या अवधींत तो संन्याशी मज-जवळच बसला होता. नौका या वेळीं गंगेच्या मध्यभागीं आली होती.

मी पूर्णपणें शुद्धीवर आल्याची खात्री झाल्यावर तो संन्याशी मला म्हणाला, "सरदारसाहेब, मीं आज तुमचे प्राण वांचविले आहेत. याबद्दल तुम्ही माझा एकादा शब्द पाळाल ?" मीं कृतज्ञतेनें म्हटलें, "हो, मी आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न करीन."

या वेळी मंत्रमुग्ध बनलेल्या माणसाप्रमाणें मागचा पुढचा विचार न करितां मीं अशी प्रतिज्ञा केली खरी; पण तिचा जो वाईट परिणाम झाला, त्याजकडे लक्ष्य गेलें म्हणजे मला अजूनहि पराकाष्ठेचा पश्चात्ताप होतो. त्या संन्याशाला मी अशा प्रकारचें वचन देऊन न चुकतो तर बंडाच्या वणव्यांत त्यायोगें हजारों निरपराध इंग्रज स्त्रीपुरुषांची जी आहुती पडली ती मला खात्रीनें टाकतां आली असती. त्या संन्याशाच्या मनांत या वेळीं भयंकर विचार घोळत असतील याची मला बिलकूल कल्पना झाली नाहीं.

थोड्या वेळानें संन्याशी मला म्हणाला, "रामपाल, स्वदेशासारखी प्यारी वस्तु दुसरी कोणतीच नाहीं. आईबाप, बहिणभाऊ, बायको वगैरे आपल्या आवडत्या वस्तु आहेत. त्या सर्व या देशमातेच्या पोटीं पैदा झालेल्या आहेत. जर तुमचें आपल्या आईबापावर खरें प्रेम असेल, तुमच्या भाऊबहिणीविषयीं तुह्मांला कळवळा वाटत असेल तर तुम्ही आपला देश परक्यांच्या स्वाधीन करूं नका. वीरवर गुरुगोविंदसिं-हाच्या चरित्राकडे नजर फेंका; आणि त्यांचा महामंत्र पाठ करा. त्यानें स्वदेशासाठीं आपल्या मानवजीवनाचा त्याग केला आणि स्वर्गांतूनही तें तुमच्याकडे आशापूर्ण दृष्टीनें पहात आहेत. आम्ही सांमत स्वदे-शाचा उद्धार करण्यासाठीं प्रवृत्त झालों आहों. या कार्याला तुम्ही मदत करा. निदान विरुद्ध जाऊं नका. तुमच्या माताभगिनींच्या रक्षणाची जर तुम्हांला काळजी असेल तर तुम्ही आमचें म्हणणें ऐका. यांत तुम्हां-ला स्वधर्मपालनाचें श्रेय मिळेल. आणि देवताहि तुम्हांवर संतुष्ट होतील. त्यानेंच तुमचे पूर्वज तुम्हांला शुभ आशीर्वाद देतील आणि गुरुगोविं-

दसिंहही स्वर्गातून तुमच्या मस्तकावर पुष्पवृष्टी करतील. एकाद्या पद्धप्रमाणेंच नव्हे तर सर्वश्रेष्ठ गुरूप्रमाणें हा तात्या टोपे तुम्हांला उपदेश करीत आहेत. तो तुम्ही ग्रहण करा."

हाच तो झांशीच्या राणीचा गुरु तात्या टोपे आहे; हें कळून मला अतिशय आश्चर्य वाटलें. या वेळीं त्याचें नांव अखील भरतखंडांत दुमदुमत होतें. प्रबल ब्रिटिश सत्ताही त्याला वचकून होती. मध्य प्रदेशांत त्याचें सामर्थ्य या वेळीं अतिशय वाढलें होतें. धोंडोपंत नानाचा पाठिंबा आणि बंडवाल्यांचा नेता हाच तात्या होता. त्याच्या ठिकाणचे अजब गुण पाहून मी अगदीं गुंग होऊन गेलों होतों. तथापि मला त्याच्या देशभक्तीचा मार्ग अगदीं मूर्खपणाचा, अधर्मपूर्ण आणि अव्यापमूलक वाटला. मीं त्याला म्हटलें "आपल्या देशभक्तीचा उपयोग कितीहि मौल्यवान् असला तरी आपला मार्ग मला बिलकुल पसंत नाहीं. शिवाय मी इंग्रजराज्याचें मीठ खात आहें, हें लक्ष्यांत ठेवा. या राज्याचें हित करण्याविषयीं मी नुसत्या प्रतिज्ञेनेंच नव्हें तर कर्तव्यानेंही बद्ध झालों आहें, अशा स्थितींत मला त्यांचे विरुद्ध कसें जातां येईल? प्रतिज्ञा पालन करणें आणि ज्याचें मीठ खातों त्याची इमानानें नौकरी करणें हा अगदीं हिंदूचा धर्म नाहीं काय? तर मग मीं तुमचें ह्मणणें कसें कबूल करावें? एवढी गोष्ट सोडून जर आपण दुसरें कांहीं सागत असाल तर मग मात्र मी त्याचा विचार करीन."

संन्यासीः–सरदारसाहेब, माझें ह्मणणें तुम्हाला पसंत नाहीं ही गोष्ट मोठ्या दुःखाची आहे. तथापि आज मीं तुमचे प्राण वांचाविले. त्याचा मोबदला ह्मणून कोणती ना कोणती तरी गोष्ट कबूल केलीच पाहिजे.

मीः–योग्य असेल ती गोष्ट मी मोठ्या आनंदानें कबूल करीन.

संन्यासीः–ठीक आहे. तुम्ही आह्मांला येऊन मिळावयास कबूल नाहींत तर निदान आमच्या विरुद्ध तरी जाऊं नका. ही अगदीं साधी, तुमच्या कोणत्याही तत्त्वाला बाध न आणणारी गोष्ट आहे. करा तर तुह्मांला कबूल आहे ह्मणून प्रतिज्ञा!

मीः–पण हेंही आपल्याला साध्य करण्यासारखेंच आहे. ह्मणून ही गोष्ट देखील मला पसंत नाहीं. दुसरी असेल तर सांगा!

संन्यासीः–हीही गोष्ट पसंत नाहीं ह्मणतां ? तर मग एवढें तरी करा कीं, आम्ही या प्रांतांत आहों तोंपर्यंत खुद्द आमच्या स्वतःविरुद्ध कांहीं करूं नका आणि आम्ही इकडे आलों आहें ही बातमी सरकारांत देऊं नका.

मीः–हीही गोष्ट पसंत करणें मला बरें वाटत नाहीं; पण तुमचें कोणतें तरी ह्मणणें कबूल करीन अशी प्रतिज्ञा मीं तुह्माजवळ केली असल्यानें आणि आज तुम्हीं मला जीवदान दिलें आहे त्या अर्थी, तुमची ही प्रतिज्ञा मी कबूल करतों.

संन्यासीः–ठीक आहे. तुमच्या या कृतज्ञतेनें मी खूष झालों आहें. तरी पण अजून कांहीं दिवस तुह्मांला कैदी या नात्यानें राहिलें पाहिजे.

मीः–दोघां माणसांची प्राण वांचविण्याची जबाबदारी माझ्यावर नसती तर मीं तुमचें हें ह्मणणें मोठ्या आनंदानें कबूल केलें असतें. याच कारणानें मी तुमच्या पेचांत पडलों. ती बिचारी अजून प्राणास मुकली नसली तरी लौकरच त्यांच्यावर असा भयंकर प्रसंग ओढवेल. इतक्या आणीबाणीची ही वेळ आहे. आपण ज्या अर्थी माझा प्राण वांचविला त्या अर्थी आपल्या कैदेंतून मला मुक्त करा. दोन मानवी प्राण्यांचे जीव वांचविण्याचें श्रेय तुह्मांस मिळेल. मी आपणाबद्दल सरकारांत कांहीं बातमी देणार नाहीं, याबद्दल वचन दिलेंच आहे.” यावर संन्यासी ह्मणाला, “हें काम आम्हीं केलें तर नाहीं कां चालावयाचें ? तुम्ही माणसांचीं नावें आणि पत्ता मला कळवा म्हणजे मी त्यांचे प्राण वांचविण्याची परभारें व्यवस्था करितों. कांहीं विशेष कारणामुळें तुह्मांला उद्यां संध्याकाळपर्यंत सोडतां येत नाहीं. इतक्यावरही तुह्माला त्या माणसांचें प्राण वांचविण्याबद्दल खात्री वाटत नसेल तर त्यांचीं नांवें मला कळवा म्हणजे मी स्वतः जाऊन हें काम करतों.”

मॅकेअर आणि अबदुल हे ज्या अर्थी बंडवाल्यांचे पुढारी आहेत त्या अर्थी तात्याचा त्याजवर पूर्ण भरंवसा असला पाहिजे, ही गोष्ट माझ्या लक्षांत आली; आणि याच दृष्टीनें यांच्याजवळ त्या दोघांचीं नांवें कळविणें मला इष्ट वाटलें नाहीं. स्टिफन आणि रोजचा प्राणसंरक्षणाचा भार देवावर टाकून मीं ती रात्र तशीच घालविली. यानंतर त्या संन्याशासी म्हणजे

तात्याशीं मी कांहीं बोललों नाहीं. दुसराही दिवस मीं नौकेंत घालविला. या अवधींत रोज आणि स्टिफन यांच्यासंबंधानें विचार माझ्या मनांत येऊं लागून माझें मन प्रत्येक क्षणीं व्याकुळ होत होतें. त्यांचा समाचार केव्हां कळेल असें मला होऊन गेलें. अखेर कांहीं घंटेपर्यंत मला मोकळीक देण्याविषयीं मीं त्या संन्याशाला विनंती केली.

माझें हें भाषण ऐकून तो म्हणाला, " ठीक आहे. तुह्मांला तिकडे जावयाचें आहे तर जा; पण तुमचेबरोबर मीही येईन. तुमचें कार्य झाल्याबरोबर मजबरोबर आलें पाहिजे. "

मीं त्याला ही अट कबूल केली आणि संध्याकाळीं तो व त्याचा एक साथीदार यासह बरोबर शस्त्रास्त्रें घेऊन मी गुप्तपणें शहरांत शिरलों.

रोजला ज्या घरांत अडकवून ठेविलें होतें त्याचा नंबर मला ठाऊक होता. मी त्या मंडळीसह त्या घराच्या समोरील फाटकापाशीं जाऊन पोहोंचलों. फाटक बंद होतें. मी उभा राहिलों तें पाहून तात्या म्हणाला, " सरदार साहेब, हेंच कां तें घर ? "

यावर मीं " होय " ह्मणून उत्तर दिलें.

तात्या (आश्चर्यानें):—हें तर मॅकेअरचें घर दिसतें ! ठीक आहे. आंत काय आहे तें पाहूं !

एवढें बोलून त्यानें कांहीं इशारा केला. प्रथम तर कोणी आलें नाहीं; पण त्याजकडून पुन्हां दुसऱ्यानदां इशारा होतांच फाटकाचें दार उघडून तीन साहेब बाहेर आले. तात्या त्यांपैकीं एकजणाला उद्देशून म्हणाला, " जोन्स, मॅकेअर कोठें आहे ? "

जोन्सनें अत्यंत सन्मानपूर्वक तात्याला प्रणाम केला आणि तो आम्हां सर्वांना घेऊन माडीवर गेला. नंतर मॅकेअरकडे आम्ही गेलों; पण तात्याबरोबर मला पहातांच त्याचा चेहरा हिरवापिवळा पडून गेला आणि तो खुर्चीवरून एकदम उभा राहिला आणि मला उद्देशून ह्मणाला, "अरे बापरे ! हें काय ! सरदार रामपालसिंहाला तर मीं आपल्या हातानें गंगेच्या प्रवाहांत टाकिलें होतें ! आणि तो पुन्हां जिवंत होऊन आला ! तें त्याचें भूत तर नव्हे ! "

एवढें बोलून आपले दोन्ही डोळे झांकून तो स्तब्ध बसला ! पण

तात्यानें तिकडे लक्ष न देतां त्याला म्हटलें, "मॅकेअर, तुझें हेंच तर काम वाईट आहे. तूं पक्कें लक्षांत ठेव, कीं, मी जरी बंडवाल्यांचा पुढारी आहें, तरी आपल्या डोळ्यासमक्ष मी असलें नीच काम कधींहि होऊं देणार नाहीं. तूं ज्यांना कैद केलेंस तीं माणसें जिवंत आहेत कीं नाहीं ? असतील तर मला त्यांचेकडे घेऊन चल."

मॅकेअर आपले डोळे न उघडतांच म्हणाला, "क्षमा करा ! तीं माणसें माझीं हाडवैरी आहेत. मी त्यांना मुळींच जिवंत सोडाव याचा नाहीं."

तात्या—"तूं मला एकदां त्यांच्याकडे घेऊन चलच म्हणजे पहातों त्यांनीं तुझें काय घोडें मारिलें तें. त्या गोष्टीचा निर्णय आपण तेथेंच करूं."

मॅकेअरः—चला आतांपर्यंत त्यांची जीवितयात्रा संपली असली पाहिजे असें माझें अनुमान आहे. त्याचें तोंडचें हें शेवटलें वाक्य ऐकून माझें हृदय कांपूं लागलें. तो आह्मांला घेऊन रोजच्या खोलीकडे जावयाला निघाला. तिच्या खोलीजवळ जाईपर्यंत माझें काळीज ठिकाणावर नव्हतें; पण तेथें जातांच आंतील भाषणाचा ध्वनि माझ्या कानावर येऊन मला पराकाष्ठेचा आनंद झाला आणि म्यानांतील तरवार बाहेर काढून मी एकदां आत घुसलों—तेथें अबदुल हातांत तरवार घेऊन व पाद्री बायबल घेऊन उभा होता. त्यांच्यासमोर रोज आणि स्टिफन गुढघे टेंकून ईश्वरोपासना करण्यांत मग्न झालीं होतीं.

मला पहातांच रोज धांवत आली आणि माझा हात धरून ह्मणाली, "सरदारसाहेब ! अखेर ईश्वरानें आमची प्रार्थना ऐकली."

यानंतर रोज आणि स्टिफन या उभयतांच्या तोंडून मॅकेअरसंबंधीं सर्व हकीगत ऐकून तात्या त्याला आणि अबदुलला उद्देशून ह्मणाला, "अरे दुरात्म्यांनों ! तुमच्यासारख्या पिशाच्याच्या सहाय्यानें भारतराष्ट्र स्वतंत्र होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. माझ्या आधीन असतांनाहि तुम्हीं अशीं नीच कर्में केल्याबद्दल मीं तुह्मांला योग्य शासन केल्याखेरीज रहाणार नाहीं."

एवढें बोलून तात्या जोन्सला ह्मणाला, "बघतोस काय जोन्स? कर या हरामखोरांना कैद."

तात्याच्या हुकुमाप्रमाणें जोन्सनें त्या दोघांनाहि कैद केलें. यानंतर आम्ही सर्वजण तेथून बाहेर पडलों. तात्याच्या हुकुमावरून त्या घरांतले चौघेही साहेब आमच्याबरोबर आले.

रस्त्यांत तात्या टोपे मला ह्मणाला, " सरदारसाहेब, स्टिफन आणि रोज यांना त्यांच्या बिऱ्हाडाकडे जाऊं द्या आणि तुम्ही आमच्याबरोबर चला. तुमचें काम झालें. आतां आमच्याबरोबर बिऱ्हाडीं यावयास तुह्मांला काय हरकत आहे ? "

" ठीक आहे ! " मीं म्हटलें.

त्या दिवशीं रोजशीं किंवा स्टिफनशीं माझें कांहीं विशेष बोलणें झालें नाहीं. त्यांनीं आपल्या बिऱ्हाडाचा रस्ता धरल्यावर मी तात्याबरोबर त्यांच्या नावेकडे आलों. "

प्रकरण १९ वें.

रोजच्या आईची अंतिम स्थिति.

(ब्रिगेडी सर्जन स्टीफनची जबानी.)

" सरदार रामपालसिंह त्या संन्याशाबरोबर निघून गेले आणि कैदी बनलेल्या अबदुलाला आणि मॅकेअरलाहि तिकडेच नेलें; पण हा एकंदर प्रकार काय आहे तें मला कांहींच कळलें नाहीं. पुष्कळ दिवस कैदखान्यांत पडून राहिल्यामुळें माझें शरीर अगदीं निस्तेज बनून गेलें होतें. आतां खुली हवा मिळाल्यामुळें मला जरा बरें वाटलें आणि त्याजबरोबर रामपालाचे मनःपूर्वक आभार मानले. रोज मजबरोबर चालत होती. तिचें मुख प्रफुल्ल बनलेलें पाहून मला अतिशय आनंद झाला. आमचा आज खरोखरच पुनर्जन्म झाला होता; पण हें सर्व ईश्वराच्या कृपेचें फळ ! थोड्या वेळापूर्वी आम्ही परलोकच्या मार्गावर

जाऊन उभे राहिलों होतों त्या वेळीं आम्ही फिरून इहलोकच्या मार्गावर विहार करूं याची कल्पना सुद्धां नव्हती; पण ईश्वराच्या कृपेनें कधीं कधीं कल्पनातीत गोष्टी घडून यावयाला वि लकूल वेळ लागत नाहीं त्याची क्षुद्र मानवी बुद्धीला कोठून समज पटणार !

रस्त्यानें जातांना आम्ही दोघेहि स्तब्ध होतों. नंतर रोज मला ह्मणाली, " स्टिफन, आपल्याला एक गाडी पहा. अशा रीतीनें घरीं जाऊन पोहोंचावयास बराच वेळ लागेल, आईला कधीं पाहीन असें मला झालें आहे. " रोजच्या या भाषणानें मला तिच्या आईचें स्मरण झालें. या पूर्वी तिच्या आईसंबंधीं अथवा बापासंबंधीं विचार माझ्या मनांतच आला नाहीं. हेलनचे मृत्यूनंतर मिसेस गार्डनचें सर्व प्रेम रोज-वर जडलेलें होतें. यामुळें रोजवर अशा रीतीनें अचानक घाला पडलेला पाहून तिला किती तरी दुःख झालें असेल याची कल्पना केलेली बरी. थोड्या वेळानें मीं एक भाड्याची गाडी केली आणि तिजवर आम्ही दोघे आरूढ होऊन पंधरा मिनिटांच्या आंतच तिच्या बापाच्या बंगल्यावर येऊन पोंहोचलों. गार्डनसाहेब खालच्या खोलींत दोघां नामांकित डॉक्त-राबरोबर बोलत बसले होते.

आम्हांला पाहतांच गार्डनसाहेब आश्चर्यानें जवळ जवळ वेडेच झालें ! त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु गळूं लागले. तें आपल्या हातरुमा-लाला पुसून ते आम्हांला म्हणाले, " स्टिफन व रोज, तुम्ही या वेळीं खरोखर माझ्यापुढें येऊन उभे आहांत काय ? कां मला भ्रम झाला आहे ? मी जागा आहे किंवा स्वप्न पडत आहें ! दुःख सागरांत ही सुखाची खाण मला कशी दिसूं लागली ? मला तर हा सगळा असंभव-नीय प्रकार दिसतोच ! "

रोजच्यानें आतां दूर उभें राहवेना. ती चटकन धांवत धांवत आप-ल्या पित्याजवळ गेली आणि त्याच्या गळ्यास मिठी मारून ह्मणाली, " बाबा ! मी खरोखरच तुमची रोज आहे ! ईश्वराच्या कृपेनें मी तुझ्या-कडे पुन्हां परत आलें. "

परंतु हाय ! अभागी गार्डनला अजूनही ती गोष्ट खरी वाटेना ! दैवाचे भयंकर आघात वरचेवर होत गेल्यामुळें त्याचें सर्व सुखसमाधान

आणि बुद्धीही नष्ट झाली होती. तो एकाद्या उन्मत्ताप्रमाणें बनला होता. रोज किती रडली ओरडली तरी त्याचा तिच्या बोलण्यावर भरंवसा बसेना. ते म्हणाले, " छे ! मला ही गोष्ट खरी वाटत नाहीं. जिकडे माझी हेलन गेली तिकडेच माझी रोज गेली; आणि स्टिफनही तिकडेच गेले. तूं रोज आहेस. छे ! तुला कोणीं तरी सोंग देऊन मजकडे आणलें ! काय ! रोज अशी आहे ! छे असल्या ठकबाजीनें मी मुळींच फसणार नाहीं. "

मला आतां स्वस्थ राहणें अशक्य झालें ! तो हृदयविदारक दुःखपूर्ण देखावा पाहून मी आपल्या मनांतल्या मनांत म्हणालों, ' देवा ! असले प्रसंग पाहण्यासाठींच तूं मला जन्माला घातलेंस काय ? "

या वेळीं रोज माझे पाय धरून मला म्हणाली, " स्टिफन, कृपा करून माझ्या बाबांना वांचवाहो ! वांचवा ! पण अशा प्रसंगीं मी तरी काय करावयाचें ! परम सामर्थ्यशाली भगवदिच्छेला टक्कर देण्याचें सामर्थ्य कोणत्या मानवी प्राण्यांत आहे ? रोजचा हात धरून मीं तिला उठविलें." डॉक्टर व्यग्र चित्तानें गार्डनची नाडी पाहूं लागले; पण त्यांचे प्रयत्न सर्व व्यर्थ गेले. गार्डनची ज्ञानशक्ती त्यांना केव्हांच सोडून गेली होती. मनुष्याचें धन, सौख्य, यश वगैरे सर्व नष्ट झालें तर हरकत नाहीं; पण त्याची ज्ञानशक्ती नष्ट होऊं नये. कारण तिच्या जोरावर त्याला पूर्वोक्त सर्व गोष्टी पुन्हां मिळवितां येतील; पण ज्ञानशक्ति गेली कीं सगळें आटोपलेंच. मग त्याच्या ठिकाणीं त्याचें मनुष्यत्वही राहत नाहीं. परंतु विधात्यानें दुर्दैवी गार्डनच्या कपाळीं ही दारुण आपत्तीदेखील लिहिली होती. कांहीं वेळानें माडीवरून एक तरुण खालीं आला; पण रोजवर दृष्टी जातांच तो अतिशय आश्चर्यचकित झाला. त्याला पाहिल्याबरोबर रोज त्याकडे धावत गेली; आणि रडत रडत म्हणाली, " जेम्स, आईची स्थिती कशी आहे ? मला लौकर तिजकडे घेऊन चल. तिला पाहिल्याशिवाय माझ्या मनाला बिलकूल चैन वाटणार नाही. तिची अनेक प्रकारें समजूत करून जेम्स तिला म्हणाला, " प्रिय रोज, मी तुला तिजकडे घेऊन जातों; पण मला एकदां या बाबतींत डॉक्टरचा सल्ला घेऊं दे."

यानंतर जेम्स एका डॉक्टरला घेऊन शेजारच्या खोलींत गेला. त्या दोघांचीं तेथें काय भाषणें झालीं तें कळलें नाहीं; पण रोजला तिच्या आईकडे घेऊन जावयाला डाक्टरांची संमती मिळाली नाहीं, एवढी गोष्ट मात्र खरी. त्याच्या सामान्य उद्गारावरून रोजच्या आईची स्थिति फारच भयंकर असावी असें दिसून आलें.

त्या दोघा डॉक्टरांपैकीं डाक्टर हें माझ्या परिचयाचे होते. त्यांनीं मला एकट्यालाच एका बाजूस नेलें आणि म्हटलें, " प्रिय मित्रा, तुम्ही उभयता त्या अधमाच्या हातून धडपणीं सुटून आला याबद्दल ईश्वराला अगणित धन्यवाद देतों. मात्र रोज फारच वाईट वेळेवर आली असें मला म्हणावें लागतें. कारण सांप्रत तिच्या आईची स्थिति फारच भयंकर आहे आणि तिचा बापही मनुष्यांत राहिला नाहीं. बिचारा निखालस वेडा बनल्यासारखा दिसतो. त्याच्या संबंधींचा विचार माझे मनांत आला म्हणजे काळीज फाटून जातें. जेम्स तिचा भाचा. तो तिची प्रकृति बिघडण्याचें ऐकून दिल्लीहून येथें धांवत आला; पण त्यानें एकट्यानें काय करावें ? यासाठीं त्याच्या साहाय्यार्थ कांहीं दिवस येथें रहाण्याची तुम्हांलाही माझी सूचना आहे. तुम्ही येथें राहिलां म्हणजे त्या दोघांचीही व्यवस्था चांगली लागेल.

मला डॉक्टराची ही सूचना अमान्य करणें अशक्य होतें. कारण माझा गार्डनच्या कुटुंबाशीं तसाच निकट संबंध होता. अशा संकट काळीं ह्या मंडळीला सहाय करणें माझें कर्तव्य होतें. परंतु तुम्ही सरकारी नौकर असल्यामुळें माझें तेथें राहणें कायमचेंच होईल असा भरंवसा नव्हता. या सर्व गोष्टीचा विचार करून डाक्टरच्या प्रश्नाला मीं कांहींच उत्तर दिलें नाहीं.

थोड्या वेळानें डॉक्टर ग्रे मला म्हणाले, "तुम्ही जरा माडीवर जाऊन मिसेस गार्डनला पाहून याल तर बरें होईल. त्या बिचारीचा अंतिम समय येऊन पोहोंचला असावेंसें वाटतें. "

या वेळीं मीं आपल्या मनांतल्य मनांत म्हणालों " ही बाई जर या आजारांतून न उठली तर रोजची स्थिति काय होईल ? " तिच्या कोमल हृदयाला हें दुःख सहन होणार नाहीं. माझें रोजवर अत्यंत प्रेम असल्या-

मुळें तिच्यासाठीं माझा प्राण व्याकुळ होऊं लागला. तथापि इच्छेवर भरंवसा ठेवून मी स्वस्थ राहिलों.

थोड्या वेळानें जेम्स खालीं आला आणि डॉक्टर ग्रेना एका बाजूस नेऊन त्यांना कांहीं सांगूं लागला. दोघांच्याहि चर्येवर यावेळीं विषादाची छाया पडली होती. यावरून एकादा प्रकार आटोपला असावा, मग तर आशेला कांहीं जागा उरली नसावी अशी माझी कल्पना झाली. कांहीं औषधाच्या बाटल्या घेऊन ग्रे वर गेले. त्यांनीं आपल्याबरोबर त्यालाहि नेलें. यावेळीं रोज आपल्या पित्याच्या पायाजवळ बसून रडत होती. मी वर जात आहें हें पाहून ती मजकडे धांवत आली आणि माझा हात धरून रडत रडत म्हणाली " स्टिफन, तुमचेंहि माझ्यावर आतां प्रेम राहिलें नाहीं काय ? माझ्या प्रार्थनेकडे तुम्हीसुद्धां कसें दुर्लक्ष्य केलें ? मला एवढें माझ्या आईकडे घेऊन चला. माझी ही विनंति तुम्हाला ऐकलीच पाहिजे."

एवढें बोलून ती मजबरोबर निघाली. डॉक्टर ग्रेनें तिला येण्याची मनाई केली आणि इतर प्रकारेंहि तिला पुष्कळ समजावून सांगितलें. पण तिनें आमचें म्हणणें ऐकलें नाहीं. तिच्या कोमल हृदयांत दुःखाचा डोंब पेटला होता. तिला त्याचें म्हणणें कसें रुचावें ? या प्रसंगीं उपदेशानें तिच्या मनाचें समाधान होणें शक्य नव्हतें. अखेर आमचा निरुपाय होऊन आम्ही तिला वर घेऊन गेलों.

पण मिसेस गार्डनच्या खोलीजवळ जातांच डॉक्टर ग्रेनें मला आणि रोजला बाहेर उभें राहण्यास सांगितलें आणि आपण जेम्सला घेऊन आंत गेले. मीं या वेळीं रोजला उपदेश केला पण तिच्या ठिकाणीं एकाएकीं तत्त्वज्ञान कोठून आलें न कळे. ती मला म्हणाली " हो ! मी सगळें समजून चुकलें. माझी प्रिय माता मला सोडून हेलनच्या भेटीला गेली. पण अशा दारुण दुःखाच्या प्रसंगीं ईश्वराच्या मर्जीला मान देऊन त्याचें आज्ञाधारक संतान बनणें हें माणसाचें कर्तव्य आहे असें तुम्हीं मला सांगितलें होतें. तें मी विसरलें नाहीं. मी त्याचीच शपथ घेऊन सांगते कीं, दारुण दुःखाचा परिहार मी आतां शांत चित्तानें सहन करीन."

तिचें हें भाषण ऐकून मला अतिशय नवल वाटलें, इतकेंच नव्हे

तर तिच्या हृदयांत ईश्वरी सामर्थ्याचा संचार झाला अशीहि माझी खात्री झाली.

कांहीं वेळानें जेम्स खोलीच्या बाहेर येऊन मला आंत जाण्याचें सांगूं लागला. पण रोज मला जाऊं देईना. तेव्हां मीं त्याला म्हटलें “ हिला एकदां आंत जाऊं दे. वाटेल तेवढा दुःखभार सहन करावयास तिनें आपलें मन तयार केलें आहे. ”

यावर तो कांहीं बोलणार पण रोज मध्येंच म्हणाली, “ जेम्स, तुझेंहि हृदय इतकें निष्ठुर बनलें ? आईची भेट मुलीला घेऊं देत नाहीं ? अशा प्रकारचा निष्ठुरपणा करण्याचें कारण काय ?

जेम्स अडखळत अडखळत म्हणाला, “ रोज ! मी तुझ्याशीं आज-न्मांत तरी निष्ठुरपणानें वागलों आहे काय ? पण आजची वेळ तशीच आहे. त्याला माझा इलाज नाहीं. तुला जर त्यावेळीं तुझ्या आईकडे जाऊं दिलें तर फायद्यापेक्षां नुकसान अधिक होण्याचा संभव आहे. तूं एकाएकीं आलेली पाहून तुझ्या आईचा रोग कदाचित् जास्त वाढेल इतकेंच नव्हे तर त्यामुळें ती कदाचित मरण्याचाहि संभव आहे. तेव्हां अशा स्थितींत तुला तिजकडे जाऊं देणें बरें आहे काय ? याचा तूंच विचार कर.

रोज—पण माझ्या भेटीनें रोग वाढण्याचा जसा संभव आहे तसा कमी होण्याचा नाहीं का ?

जेम्स–तें कोणीं सांगावें ?

रोज—[illegible] मग तुझा एवढा हट्ट कां ?

तिची स[illegible]मजूत घालणें व्यर्थ आहे अशी जेम्सची खात्री होऊन तो तिला म्हणाला “ ठीक आहे. तुझ्या मर्जीप्रमाणें होऊं दे; पण तिच्याजवळ तरी जाऊं नको. लांबूनच [illegible] हो. ”

यानंतर आम्ही सर्वजण खोलींत गेलों. येथें मिसेस गार्डन एका पलंगावर पडली असून तिच्या जवळ डॉक्टर ग्रे उभे होते आणि एक आया तिची शुश्रुषा करीत बसली होती. रोज दरवाज्याजवळ जाऊन उभी राहिली. मीहि तिच्या जवळ उभा होतों. मिसेस गार्डनचे डोळे अतिशय लाल झालेले होते. त्याजवरून तिचा आजार पराकाष्ठेला

पोहोंचला असावा हें मीं ओळखलें. नाडविरून ज्वर भयंकर असल्याचें मला कळून आलें. ती अतिशय जोरानें चालत होती. ही स्थिति ठीक नाहीं हें मला उघड दिसलें. पंधरा मिनिटें सारखी मजकडे पहात राहिल्यावर मिसेस गार्डन मला म्हणाली " तुम्ही कोण आहां ? "

मी—तुम्ही मला ओळखत नाहीं ? मी आपला स्टिफन आहें.

ती कांहीं वेळ थांबून नंतर मला म्हणाली, " हं आतां आलें माझ्या लक्ष्यांत. तुम्ही मॅकेअर आहां. रोज तुमच्याबरोबर आली आहे ना ? "

आतां रोजच्यानें लांब उभे राहवेना. ती चटकन पुढें धांवत आली आणि तिनें आपल्या आईच्या गळ्यांत मिठी मारली. " तूं कोण आहेस? अशी काय करतेस ? सरदार रामपालसिंह आणि गार्डन माझ्या रोजला आणावयास गेले आहेत ते कां बरें अजून येत नाहींत ? तूं एकवेळ खिडकींतून पहा बरें! मला वाटतें ते येऊं लागले आहेत. पण त्यांचे-बरोबर रोज कां बरें दिसत नाहीं ? ही कोण हेलन, तूं इतके दिवस मला कशीग विसरली होतीस ? आतांशी आलीस काय ? बरें झालें. एक वेळ रोजला हाक मार पाहूं. तुम्हा दोघींना मला एकदां डोळेभरून पाहूं द्या. "

डॉक्टर ग्रे या वेळीं तिच्या डोक्यावर आणि डोळ्यावर बर्फ ठेवीत होते. रोज आईची मिठी सोडून बाहेर निघून गेली. मीहि तिच्या मागोमाग रडत रडत बाहेर पडलों.

रात्रभर मी तेथेंच होतों. रोज आतां अधिक उद्विग्न दिसली नाहीं. गार्डनला वर आणून निजाविलें. त्याच्या शुश्रूषेचें कार्य स्वतः रोजनें अंगावर घेतलें. आम्हीं सर्व रात्र जागून काढली. मी मिसेस गार्डनची शुश्रुषा करीत होतों. दोघे डॉक्टरहि तेथेंच राहिले. जेम्सला सर्व दिवसभर श्रम झाले असल्यानें आम्ही त्याला विश्रांती दिली होती. मिसेस गार्डनची अवस्था वरचेवर वाईट होत चालली होती आणि रात्रीं बारा वाजण्याच्या पलीकडे ती अगदींच भयंकर होऊन गेली, अशा दारुण स्थितींतून तिला वांचविणें मनुष्याच्या हातीं नाहीं हें मीं आतां ओळखलें. या बाबतींत फक्त ईश्वरीकृपेचीच आशा उरली होती. तिच्या शुश्रूषेंत आणि औषधपाण्यांत सर्व रात्रभर मजकडून कोणत्याहि

प्रकारें हयगय झाली नाहीं. पहाटे पहाटे तिचा ज्वर उतरण्यास आरंभ होऊन तिचें अंग थंड होत चाललें. या वेळीं मला अतिशय चिंता वाटूं लागली. डॉक्टरहि उद्विग्न चित्तानें तिची नाडी वरचेवर तपासूं लागले. हें सगळें व्यर्थ आहे याविषयी माझी पूर्ण खात्री झाली. या दुःखपूर्ण संसारांतून तिचें विषादग्रस्त जीवन लवकरच नाहींसें होणार अशी चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. संसारांतील सर्व दुःखें, आशा आणि बंधनें यांचा नाश करून ती स्वर्गलोकींच्या विश्राममंदिरांत जाव-यास उत्सुक झाली होती. पहाटे चार वाजण्याच्या सुमारास मिसेस गार्डन जरा भानावर आली. यावरून मनुष्य इहलोकांचा त्याग करावयास तयार होतो त्यावेळीं त्याची ज्ञानशक्ति क्षणभर कां होईना पुनः त्यास लाभत असली पाहिजे अशी माझी कल्पना झाली. ती माझ्याकडे पाहून म्हणाली, " तुम्ही स्टिफन आहां ना ? "

मी तिच्या जवळ जाऊन म्हणालों, " आपण काय मला ओळखूं शकत नाहीं ? मीच तो स्टिफन."

ती म्हणाली " माझ्या पतीस एकदां मजकडे बोलवा बरें ?"

मी गार्डनकडे गेलों त्यांना ही हकीकत कळतांच ते एकसारखे मज-कडे पाहूं लागले. त्या वेळीं त्यांच्या तोंडून एक शब्दसुद्धां बाहेर पडला नाहीं. तेव्हां मी आणि रोजनें त्यांचा हात धरून त्यांना मिसेस गार्डन-जवळ नेलें. मिसेस गार्डन या वेळीं डोळे झांकून पडल्या होत्या. सुमारें पंधरा मिनिटें अशा स्थितींत गेल्यानंतर त्यांची आपल्या पतीकडे दृष्टी जाऊन त्यांना त्या म्हणाल्या " प्रियकरा, आतां मी तुमचा शेवटचा निरोप घेतें. मॅकेअरला क्षमा करा. हेलेनला भेटण्यासाठीं माझें मन अगदीं उत्कंठीत झालें आहे. मी तिच्याकडे जातें. तुम्ही आतां रोजला सांभाळा. "

रोजला आतां स्वस्थ बसणें अशक्य झालें. तिनें आईच्या गळ्याला मिठी मारली आणि ती मोठमोठ्यानें रडूं लागली. हाय ! या जगांतून जो जातो तो सर्व विसरूनच जातो; पण पाठीमागें राहतात त्यांच्या हृदयावर या गोष्टीचा भयंकर परिणाम होतो. मिसेस गार्डननें आतां

आपल्या मुलीला ओळखलें आणि तिला म्हटलें " आ ! कोण ! रोज ! माझी रोज ! "

यानंतर तिच्या तोंडून एक अक्षरहि बाहेर पडलें नाहीं. तिची वाक्-शक्ति कायमची नष्ट झाली. तिचा पवित्र आत्मा नश्वर मानवी देहाचा त्याग करून स्वर्गलोकीं निघून गेला. "



द्वितीय खंड.

प्रकरण २० वें.

पुनः संकट.

(ब्रिगेड सर्जन स्टिफनची जबानी)

"मिसेस गार्डनचा अंत होऊन आज कित्येक दिवस लोटले होते. रोज आपल्या आईच्या मृत्युसमयीं थोडीबहुत रडली; पण यानंतर तिच्या वृत्तींत अगदींच फरक पडला. संसारांतील दारुणतर आघात सोसावयाला तिचें अंतःकरण अगदीं खंबीर झालें. यावेळीं ती अगदीं स्थिर आणि निश्चल होती. तिच्या स्थितिकडे पाहिलें म्हणजे कठीण वज्र-देखील तिच्यांत चलविचल करावयास समर्थ होणार नाहीं असें वाटे.

परमेश्वरा, तुझी धन्य आहे. अगदीं भग्न झालेल्या हृदयांत देखील तूं असीम बळ निर्माण करतोस ! आणि ही गोष्ट आज माझ्या प्रत्यक्ष अनुभवास आली.

कांहीं वेळानें रोज मजकडे येऊन तिनें माझ्या प्रकृतीसंबंधानें चौकशी केली त्यावेळीं जेम्स तेथेंच होता. त्यानें मला अभिवादन केलें. गार्डनची अवस्था जशी निश्चीत तशी होती. मी त्यांच्याजवळ गेलों; पण तो माझ्याशीं कांहींच बोलला नाहीं. किंवा माझ्या प्रश्नाचें त्यांनीं उत्तर दिलें नाहीं. कांहीं थोड्या वेळानें मी त्याच्यासाठीं ईश्वरप्रार्थना करूं लागलों; पण काय आश्चर्याची गोष्ट ! या वेळीं ते माझ्या प्रार्थनेंत सामील झाले. विझूं पाहणारा दिवा जसा शेवटीं एकदम मोठा होतो त्याप्रमाणें चिरनष्ट होऊं पाहणारी गार्डनची ज्ञानशक्ति या प्रसंगीं एकदम जागृत झाली असावी असें मला वाटलें. प्रार्थनेनंतर गार्ड-

नची अवस्था पहिल्याप्रमाणेंच झाली. अमळशानें आम्ही बाहेरच्या पडवींत येऊन बसलों. रोजनें मला सरदार रामपालसिंहाच्या बाबतींत बरेच प्रश्न विचारले; पण सध्यां ते कोठें आहेत ? आणि काय आहेत, याची मला कांहींच माहिती नसल्यामुळें मला तिच्या प्रश्नांचीं उत्तरें देतां आलीं नाहींत.

आज जूनची तिसरी तारीख. शिपायांचें बंड होण्याचें चिन्ह आज शहरांत दिसूं लागलें होतें. परेडीच्या वेळीं पहिल्या सपाट्यांतच पन्नास नंबरच्या बंगाली पलटणीनें कर्नल मन्रोची आज्ञा पाळण्याचें नाकारलें. जनरलनें या लोकांना साधारण शिक्षा देऊन दिवसभर नजरकैदेंत ठेविलें. सगळे सरकारी अमलदार आणि शहरांतील लोक आज अगदीं चिंताक्रांत झाले होते. कोणत्या वेळेस बंडाचा भडका उडेल याचा नियम राहिला नव्हता. सर्व इंग्रज लोकांच्या बायकांमुलांनीं कानपूरचा किल्ला भरून गेला. दुपारीं रोजला दोन वाजावयाचे आंतच किल्ल्यांत येण्याविषयीं मीं सूचना दिली होती; पण त्याप्रमाणें ती किल्ल्यांत आली किंवा नाहीं; किंवा माझ्या प्रश्नाचें उत्तरही तिजकडून आलें नाहीं. यामुळें मला तिच्याविषयीं अतिशय काळजी वटूं लागली. तो सगळा दिवस याप्रमाणें मोठ्या काळजींत आणि गोंधळांत गेला. संध्याकाळच्या सुमारास मी सुटी घेऊन घरीं आलों आणि तेथें कांहीं वेळ विश्रांती घेऊन नंतर रोजकडे जावयास निघालों. बरोबर याच वेळेला चपराशानें माझ्या हातांत एक कार्ड आणून दिलें. त्यांवर "जेम्स विल्सन" हें नांव होतें. तो रोजकडून माझ्या भेटीला आला असावा अशी माझी समजूत होऊन मीं त्याला मजकडे घेऊन येण्याचें चपराशास सांगितलें. तो मजजवळ येतांच मला म्हणाला " महाशय, आपण जें रोजला पत्र पाठविलें, त्यांत कानपुर येथें लवकरच बंडाचा भडका उडणार आहे, अशा आशयाचा मजकूर लिहून तिच्या मनांत भय उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. या बाबतींत माझें आपल्याला एवढें सांगणें आहे, कीं, ही बातमी जरी खरी असली तरी तिला हें कळविण्याचें कारण नाहीं. आणि याच कारणामुळें आपलें तें पत्र मीं आपणाजवळ ठेवून घेतलें आहे. याच प्रसंगीं दुसरीही एक गोष्ट आपणास कळवावयाची, कीं, गार्डनसाहे-

बांच्या परिवाराशीं आपला अत्यंत परिचय आहे आणि आपण त्यांचे हितचिंतकही आहां. तेव्हां त्यांच्या हिताची एकादी गोष्ट असली तर आपणही ती कबूल कराल अशी मला आशा आहे, शिवाय देखरेख करणारें दुसरें कोणी कळकळीचें माणूस नसल्यानें तिचीही दिवसानुदिवस अवस्था वाईट होत आहे. माझ्या मामांची म्हणजे गार्डनसाहेबांची स्थिती सध्यां किती भयंकर आहे हें आपण आपल्या डोळ्यांनीं पाहिलेंच आहे. त्यांची ही अवस्था रोजलाही चिंतेंत बुडवावयास कारण झाली आहे. तेव्हां अशा स्थितींत रोजचा कोणातरी योग्य माणसाबरोबर विवाह लावून देणें आपलें कर्तव्य आहे. तेव्हां यासंबंधीं नीट विचार करून आपलें मत मला कळवावें. " जेम्सचें हें भाषण ऐकून मस्तकावर वज्र पडल्याप्रमाणें मी स्तंभित झालों. हृदय धडधड करूं लागलें आणि मस्तकाची कुंभाराच्या चाकाप्रमाणें अवस्था झाली ! डोळ्यांना तर कांहींच दिसेनासें झालें. जिकडे तिकडे गडद अंधकार ! असें कां होऊं लागलें तें माझें मला कळेना ! रोजवर माझें अतिशय प्रेम होतें, यांत बिलकुल शंका नाहीं. ती मला प्राणापेक्षांही प्रिय वाटत होती आणि तिच्या कल्याणाचेच विचार माझ्या मनांत नेहमीं घोळत असत. एकादा सुपात्र वर तिला मिळत असेल तर यांत तिचेंच कल्याण होतें; पण हें सर्व मला कळत असूनही त्या बातमीनें मला इतकें दुःख कां झालें कळत नाहीं. कांहीं वेळ स्तब्ध राहिल्यावर मीं जेम्सला म्हटलें " कोण आहे तो ? त्याचें नांव कळवावयास कांहीं हरकत आहे काय ? "

जेम्सः—विशेष हरकत नाहीं. पण प्रथम तुमची संमति विचारलेली बरी असें मला वाटलें.

मीः—त्या मनुष्याचें जर रोजवर प्रेम असेल आणि तिच्या वडिलांना तो नापसंत नसेल तर त्याच्या बाबतींत माझी संमती मिळावयास कांहींही अडचण पडणार नाहीं.

जेम्सः—तुम्ही ह्मणतां तसाच तो माणूस आहे. पहा खुद्द रोजनेंच त्याला काय लिहिलें आहे तें !

एवढें बोलून त्यानें माझ्या हातांत एक पत्र दिलें. तें याप्रमाणें होतें.

" प्रिय जे—

वडिलांच्या इच्छेविरुद्ध जाण्याची माझी इच्छा नाहीं. त्यांना जी गोष्ट माझ्या हिताची वाटतें तीच मला कबूल आहे. तुमच्या प्रश्नाचें उत्तर ह्या वाक्यांत आलें आहे. विशेष खुलासा आपण येथें आल्यानें होईल.

—आपली रोज. "

हें पत्र वाचल्यानंतर माझ्या मनांत कोणत्याही प्रकारची शंका राहिली नाहीं. मला सर्व गोष्टी सूर्यप्रकाशाप्रमाणें स्पष्ट दिसल्या. आतां मला दुःख वाटण्याचें तरी काय कारण होतें ? कारण रोजचें सुख तेंच माझें सुख होतें. तिच्या सुखमय भावी जीवनांत मी काय म्हणून विघ्न करूं ? पण माझें तिच्यावर इतकें प्रेम असूनही तिनें ही गोष्ट मजपासून छपवून ठेवावी, हें तिचें कृत्य अन्यायास्पद नव्हे काय ? मी यानंतर जेम्सला म्हटलें. "या गोष्टीला माझा कोणत्याही प्रकारचा अडथळा नाहीं; परंतु त्या माणसाचें नांवही मला कळेल तर बरें होईल."

याच वेळीं माझ्या डोळ्यांतून न कळे अश्रूचे दोनचार थेंब गळले. ते जेम्सनें पाहिले नाहीं असें मला वाटतें. कांहीं वेळानें जेम्स ह्मणाला, "महाशय, माझ्या धृष्टतेची क्षमा असावी. तो मनुष्य दुसरा तिसरा कोणी नसून स्वतः मीच आहें. तथापि आपण आपले शब्द बदलणार नाहींत अशी मला आशा आहे."

क्षणभर माझी ज्ञानशक्ति नाहींशीच झाली ! याच सुमारास माझ्या खोलींत एक मनुष्य आला. तो एक हिंदू संन्यासी होता. रामपाल-बरोबर मॅकेअरच्या कारागृहांत येऊन ज्यानें आमची सुटका केली तोच हा संन्यासी होय. त्याला मीं मोठ्या अदबीनें बसवून घेतलें.

खुर्चीवर बसल्यानंतर तो मला इंग्रजींत ह्मणाला, "स्टिफन, तुम-च्याशीं मला दोन गोष्टी बोलावयाच्या आहेत. जरा एकीकडे या पाहूं." त्याची इंग्रजी भाषा शुद्ध आणि अस्खलित होती.

त्याचें भाषण ऐकतांच मी खुर्चीवरून उठलों आणि त्याच्याबरोबर खोलीच्या बाहेर पडलों. बाहेर आल्यावर संन्यासी मला म्हणाला, "तुम-च्या खोलींत जो माणूस बसला आहे त्याला तुम्ही ताबडतोब बाहेर घालवूं शकाल काय ? "

मी---काय हरकत आहे ? तुम्ही सांगाल तर मी याच क्षणीं त्याला निरोप देतों.

संन्यासी म्हणाला, “ द्या तर. ”

यानंतर मीं जेम्सपाशीं येऊन म्हटलें, “ तुम्ही सध्यां येथून जाल तर बरें होईल. त्या संन्याशाला माझ्याशीं कांहीं बोलावयाचें आहे; पण तुमच्यासमक्ष बोलण्याची त्याची इच्छा नाहीं. यामुळें आपणास असें स्पष्ट सांगावें लागत आहे. याची मला क्षमा करा. आपण ज्या गोष्टी संबंधानें मला सल्ला विचारला ती जर सर्वांनाच मान्य असेल तर मलाही ती पसंत आहे ह्मणून समजा. हवें तर आपण तिच्यासमक्ष या गोष्टी बोलूं. ”

माझें हें भाषण ऐकून जेम्स निघून गेला. तो तेथून जातांच संन्यासी मला ह्मणाला, “ रामपालाच्या तोंडून तुमची ही हकीकत ऐकून मला तुमची अतिशय कींव आली आहे. तुम्ही हें रामपालाला कळवाच. उद्यां कानपुरांत बंडाचा भडका उडणार आहे. त्यांतून एकही इंग्रजी स्त्री, पुरुष जिवंत निघणार नाहीं. तथापि या प्रसंगीं आपण आणि गार्डनच्या कुटुंबांतील एकंदर माणसें यांना बिलकूल धक्का लागूं नये अशी माझी इच्छा आहे. यासाठीं आपण सर्वजण मिळून मजबरोबर चला. माझ्याजवळ असल्यावर तुमच्या एका केंसालाहि धक्का लागणार नाहीं. उद्यां रात्रीं दहा वाजतां सगळे येथेंच जमा म्हणजे त्या वेळीं मी स्वतः येऊन तुम्हांस घेऊन जाईन. ”

संन्यासी जें कांहीं बोलला तें अगदीं खरें आणि मनापासून बोलला यासंबंधीं शंका घेण्याचें काहींच कारण नव्हतें. मीं संन्याशाला म्हटलें, “ रोजची या गोष्टीला जर संमति मिळाली तर आम्ही तुमच्या सांगण्या प्रमाणें अवश्य करितों.”

याच वेळीं किल्ल्यांतून तोफेचे दणदण आवाज ऐकूं येऊं लागले. मी त्याचें कारण समजून घेण्यासाठीं अतिशय उत्सुक होऊन गेलों. संन्यासी दुसरे दिवशीं येण्याचे कबूल करून निघून गेला आणि त्यानंतर मीं किल्ल्याकडे प्रयाण केलें.

आज जूनची पांचवी तारीख. कानपुरला हा दिवस फारच भयंकर

उगवला. आदले दिवशीं संध्याकाळपासूनच बंडखोर शिपायांच्या भीतीनें लोकांची पांचावर धारण बसली होती. तो सबंध दिवस मी किल्ल्यांतच घालविला. नंतर सायंकाळीं घोड्यावर बसून मीं गार्डनच्या बंगल्याकडे गेलों. तेथें जाऊन पोहोंचल्याबरोबर मी प्रथम रोजच्या खोलीकडे वळलों. तोंच " संसारांत जर माझा कोणी असेल तर तो जेम्स " असें खुद्द तिच्याच तोंडचें निघालेले शब्द माझ्या कानावर आले. या वेळीं तिच्या खोलींत कांहीं पडल्याचा आवाज झाला त्याबरोबर मी एकदम आंत घुसलों. "

प्रकरण २१ वें.

नाना आणि तात्या टोपे.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

" स्टिफन आणि रोज यांना निरोप दिल्यानंतर मी तात्याबरोबर पुन्हां नौकेकडे आलों. मॅकेअर, अब्दुल आणि दुसरे दोघे साहेब यांनाही तात्याच्या हुकुमावरूनच नावेंत बसावें लागलें. अब्दुल आणि मॅकेअर यांचे हातपाय बांधले असून त्यांना एका निराळ्याच खोलींत ठेविलें. या अशा स्थितींत सर्व रात्र काढावी लागली. त्यांच्यावर पहारा करण्यासाठीं हत्यारबंद शिपाई ठेविले होते. त्यांच्या बाबतींत सावध रहाण्याविषयीं मी त्याला सूचना केली होती.

दुसरे दिवशीं सकाळीं तात्याची भेट झाल्यावर मीं त्याला दुरात्मा मॅकेअरचें सर्व पूर्वचरित्र सांगून त्याबरोबरच केवळ त्याचा उजवा हात असलेल्या अब्दुलचीहि एकंदर दुष्ट कृत्येंहि मीं त्यांस निवेदन केली. तात्या असल्या लोकांच्या सहाय्यावर भारतोद्धाराचें काम करावयास तयार झाला होता ! पण अशा नीच लोकांच्या योगानें त्यांचें कार्य कितपत यशस्वी होणार तें त्याला मीं चांगलें समजावून सांगितलें. तात्याचें चरित्र विशिष्टच घाणेरडें दिसावयास असल्या लोकांची संमतीहि पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली असावी अशी माझी समजूत आहे. मॅकेअरची

हकीकत तात्याला सांगतांना त्या दुष्टानें हेलनसारख्या कोमल बालिकेचा घात कशा निर्दयतेनें केला ही हकीकत तरी मी कळविण्यास विसरलों नाहीं.

माझ्या तोंडून मॅकेअरचें हें चरित्र ऐकतांच तात्याचें मन दुःखानें आणि संतापानें भरून गेलें; आणि त्या विकाराच्या भरांतच तो मला म्हणाला, " सरदारसाहेब, या भानगडी मला आतांपर्यंत मुळींच ठाऊक नव्हत्या. दुर्बलावर बलवानांनीं जुलूम करणें या गोष्टीची मला अतिशय चीड आहे. मी मॅकेअरला चांगला समजत होतों; पण तो किती नीच आहे. याबद्दल माझी आज पूर्ण खात्री झाली आहे. हें कसेंहि असो, पण ज्या अर्थीं त्याचा नीचपणा मला कळला आहे त्या अर्थीं मीं त्याला योग्य शासन केल्याखेरीज मुळींच राहणार नाहीं.

त्याचें हें भाषण ऐकून मीं त्याला म्हटलें. " त्याला पकडण्याची कामगिरी ब्रिटिश सरकारनें मजवर सोपविली आहे. तेव्हां तुम्ही त्याला जर खरोखरच अपराधी समजत असाल तर माझ्याच स्वाधीन करा म्हणजे झालें. "

पण माझें हें म्हणणें तात्याला रुचलें नाहीं. तो ह्मणाला, " तुमचें म्हणणें जरी योग्य असलें तरी धर्माच्या दृष्टीनें मला तसें करतां येणार नाहीं. तो दोषी आहे हें मी कबूल करतों; परंतु आम्ही दोघे एकाच ध्येयानें परस्परांचे साथीदार बनलों आहोंत म्हणून अशा स्थितींत त्याला शत्रूला स्वाधीन करणें मला उचित दिसत नाहीं. "

यानंतर मी त्यांच्याशीं कांहीं बोललों नाहीं. त्या दिवशीं दुपारीं नाना तात्याच्या भेटीला येणार आहे हें मला त्यांच्याकडूनच कळलें. या वेळां मॅकेअरसंबंधीं विचार व्हावयाचा होता. कारण नाना तो बंडखोराचा पुढारी म्हणून समजत असे. बंड जर यशस्वी झालें तर नानाला पेशवा करण्याचें ठरलें होतें, नाना किती क्रूर आणि नीच माणूस होता ही गोष्ट माझ्यापासून झांकलेली नव्हती. त्याच्या समोर अबदूल आणि मॅकेअर यांच्या बाबतींत योग्य व्यवस्था लागणें अशक्य होतें. ही गोष्ट तात्याच्या प्रथम लक्षांत आली नाहीं; पण मागून ती त्याला कळून त्याचें मन पश्चात्तापानें दग्ध झालें. ठरल्याप्रमाणें नाना तात्याच्या भेटीला

आला. त्या वेळीं तात्यानें मला दूर बसविलें, यामुळें माझ्या तो पाहण्यांत आला नाहीं. हाय ! ज्या नानाच्या निष्ठुरतेमुळें अजूनही कित्येकांचे अश्रू वाळले नाहींत, ज्याच्या नीच वैराग्नींत शेंकडों निरपराधी मानव प्राण्याचा संहार झाला आणि जो कंटक दूर करण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें माझी नेमणूक केली होती, तोच अधम नाना आणि मी एकाच नावेंत बसलों होतों. कानपुरांतील बंडाचा वणवा अजूनही पेटला नव्हता. साऱ्या पलटणींतल्या फितुरीची आग अजूनहि भडकली नव्हती. अशा स्थितींत त्या नीचाला जर मी पकडलें असतें तर खरोखरीच ह्या गोष्टी कदाचित् न घडत्या ! पण तात्याला अगोदरच वचन देऊन चुकलों असल्यामुळें माझा नाइलाज झाला ! शीख गुरूची शपथ मीं घेतली होती. तिच्या परिपालनार्थ माझा प्राणही गेला असता तरी मीं मागेंपुढें पाहिलें नसतें. सारांश, अशा कारणामुळें तो सर्प हातीं लागण्याची संधी आली असूनही मला ती सोडून द्यावी लागली.

नानाचीं आणि तात्याचीं काय काय भाषणें झालीं हीं मला कळलीं नाहींत. तथापि त्या दोघांत एका महत्त्वाच्या बाबतींत जबर मतभेद झाला एवढेंच मात्र समजलें. त्यासंबंधीं पुन्हां एकदां विचार करण्यासाठीं नाना फिरून दुसरे दिवशीं त्याजकडे येणार होता.

तात्याची माझी भेट झाली तेव्हां तो मला म्हणाला, " नानाला मीं अबदूल आणि मॅकेअर या दोघासंबंधीं ही सर्व हकीकत सांगितली. त्यानें माझ्या समोरच त्या दोघांना शिक्षा देण्याचें कबूल केलें आहे. पाहूं आतां उद्यां काय करतो तें. "

दुसरे दिवशीं योग्य वेळीं नाना आला. या खेपेला त्याजबरोबर वेषांतर केलेली दहापंधरा माणसें होतीं. आधले दिवसाप्रमाणेंच आजही तात्यानें मला दूर बसविलें, याप्रसंगीं त्या उभयतांचीं काय भाषणें झालीं असतील तीं असोत; पण त्यांच्यातला मतभेद नाहींसा न होतां उलट अधिकच बद्धमूल झाला. मॅकेअर आणि अबदूल या दुकलीची काय व्यवस्था करावयाची ती नानानें आपल्या मर्जीवर ठेवली !

नाना गेल्यावर तात्या मला म्हणाला, " पहा सरदारसाहेब ! नाना बदसल्ल्याला बळी पडून वाईट मार्गानें जाऊं पहात आहे. आतां

त्याच्याशीं संबंध ठेवण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. तो पेशवा व्हावयाला लायक पुरुष आहे असें समजून मीं त्याच्याशीं संबंध ठेविला होता; पण माझी ही कल्पना चुकीची होती, असें आतां मला आढळून आलें. अगोदरच या कामाला एकादा योग्य मनुष्य असतां तर बरें होतें; पण आतां त्याचें काय ? झालेली चूक आतां दुरुस्त होणें शक्य नाहीं. मी आतां एकदोन दिवसांच्या आंतच दिल्लीला जावयाचें ठरविलें आहे. तुह्मांलाही मी येथें अडकून ठेवित नाहीं. अबदूल आणि मॅकेअर यांना शिक्षा करण्याच्या हेतूनें नानानें त्यांना येथून नेलें; पण त्यांना शिक्षा करणें तर लांबच राहिलें परंतु उलट त्याच्या नीच सहाय्याप्रमाणें तो वागेल अशी माझी पूर्ण खात्री आहे. मीं जर मनांत आणिलें असतें तर दोघांनींही मीं माझ्या इच्छेप्रमाणें शासन केलें असतें; पण नानाला मी वचन देऊन चुकलों असल्यामुळें माझा नाइलाज झाला ! मीं त्याला पेशवा मानला असल्यामुळें त्याचा हुकूम ऐकणें आजपर्यंत माझें कर्तव्य होतें. आतां स्टिफन आणि रोज यांच्या उपयोगीं मला कसें पडतां येईल, हें मला पहावयाचें होतें. असो. नाना ज्या अर्थीं माझ्या सल्ल्याप्रमाणें वागत नाहीं त्याअर्थीं कानपुरास कांहींतरी भयंकर प्रकरण घडून येईल यांत बिलकुल शंका नाहीं. अशा स्थितींत रोज व स्टिफन अशा आपल्या प्रेमांतील मंडळींना आगाऊ सूचना देणें माझें कर्तव्य आहे.

मॅकेअरची आणि अबदूलची सुटका झाली हें तात्याचें तोंडचें वर्तमान ऐकतांच मी फारच घाबरलों. ती दुक्कल तात्याच्या नियंत्रणाखालीं असती तर मला इतके भिण्याचें कारण नव्हतें; पण दुष्ट नानाच्या सहवासांत गेल्यावर ते काय करतील आणि काय नाहीं याचा नियमच राहिला नाहीं.

मॅकेअरची सुटका झाली, ही गोष्ट स्टिफनला आणि रोजला कळविणें माझें कर्तव्य होतें. त्याबरोबरच ती बातमी सरकारांतहि कळवून त्यांना पकडणें तितकेंच अवश्यकहि होतें.

या सर्व गोष्टीचा विचार करून मीं तात्यास म्हटलें, " ज्याअर्थीं येथपर्यंत मजल येऊन ठेपली आहे त्याअर्थीं मला शक्य तितक्या लौकर

सोडणें हेंच तुमचें कर्तव्य आहे. अजून वेळ आहे. आतां न जाणों माझ्या मुक्ततेनें किती तरी प्राण्याचे प्राण वांचतील. मी आपल्या बिऱ्हाडाचा तुम्हांला पत्ता देतों. त्या ठिकाणीं उद्यां मला येऊन भेटा. मी स्टिफनला आणि रोजला भेटून तुमच्या बरोबर जाण्याविषयीं त्यांची मनें वळवितों. इतकेंच नव्हे तर त्यांचें या बाबतींत काय म्हणणें आहे हें मी तुम्हाला उद्यांच कळवितों. तात्याला माझें म्हणणें पसंत पडून त्यानें लागलीच माझी सुटका केली. तेथून निघाल्यावर मीं घरीं येऊन थोडीशी विश्रांति घेतली व नंतर किल्ल्याकडे प्रयाण केलें. या वेळीं रात्रीचे सात वाजले होते. बंडाचीं पूर्वचिन्हें शहरांत दिसूं लागलीं होतीं. भयानें प्रत्येक नागरिकाच्या चेहेऱ्यावर प्रेतकळा आली होती. किल्ल्यांत जावयास मी निघालों होतों खरा;पण आंत प्रवेश कसा करावयाचा ? हा प्रश्न माझे मनांत उभा राहिला. परवलीचा शब्द ठाऊक असल्याखेरीज आंत कोणाचाहि प्रवेश मी मोठ्या फिकिरींत पडलों. इतक्यांत किल्ल्यांतून दोन माणसें मोठ्या वेगानें बाहेर पडलीं. त्यांना पाहतांच मी झाडांच्या छायेंत दडलों. बाहेर एक तिसरा मनुष्य उभा होता त्याच्याजवळ हीं दोन माणसें गेलीं आणि हळूं हळूं बोलूं लागलीं. मीं पुष्कळ प्रयत्न केला पण त्याचें भाषण मला ऐकूं आलें नाहीं. नाहीं म्हणावयाला तीं मधून मधून माझें आणि नानांचें नांव घेत, तेवढें मात्र ऐकावयास आलें; पण त्यामुळें माझा संशय मात्र वाढला. मी त्यांच्या हालचालीवर लक्ष्यपूर्वक पाहूं लागलों. थोड्या वेळानें आणखी दोघे साहेब आले आणि ते सर्वजण मिळून किल्ल्याच्या मैदानाकडे निघून गेले. ते तिकडे जातांच किल्ल्याचा दरवाजा बंद झाला आणि पूर्ववत पहारेकऱ्यांच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. यानंतर मी आपल्या अंगावरचे सर्व कपडे काढून ठेवून सर्वांगाला काळा रंग फासला आणि ती मंडळी ज्या झाडाखालीं बसली होती, त्याच्या मागें छपत छपत जाऊन बसलों. या ठिकाणाहुन मला त्यांचीं भाषणें स्पष्ट ऐकावयास येत होतीं. त्यांपैकीं एकजण इंग्रजींत म्हणाला, " महाशय आम्ही सगळे येऊन दाखल झालों आहोंत. आतां आपली काय आज्ञा आहे हें सांगा. "

ज्या गृहस्थाला उद्देशून हें भाषण केलें होतें तो इंग्रजींत म्हणाला

" ठीक आहे. " त्याच्या उत्तरावरून तो कोणी देशी मनुष्य असावा असें मला वाटलें. तो पुढें म्हणाला " लुई, तुझ्या भाषणानें मी संतुष्ट झालों आहें. परवांपासून कार्याला आरंभ करूं. अजूनपर्यंत माझें शत्रुत्व कळून आलें नाहीं; पण आतां लौकरच येईल असें मला वाटतें, बरें. आतां रॉबर्ट मॅकेअरकडे चला. तो फुलबागेंत आमची वाट पहात असेल. तात्याचा आणि माझा मतभेद झाला आहे हें तुम्हां सर्वांना कळलेंलेंच आहे. "

एवढें बोलून ते सर्वजण फुलबागेंत जाण्यास निघाले. मीहि त्यांच्या पाठोपाठ जाऊं लागलों ज्यांना महाराज असें म्हणतात तोच नाना असला पाहिजे हें माझ्या तेव्हांच लक्ष्यांत आलें. एका घंट्याच्या आंत ही मंडळी इष्ट स्थळीं जाऊन पोहोंचली. मॅकेअर त्यांची तेथें वाट पहात बसलाच होता. मी त्यांच्या मागोमाग हळू हळू जाऊन दाखल झालों. पण तेथें जातांच माझ्या खांद्यावर कोणीसा हात ठेविला मी मागें वळून पाहतों तों एक महाराष्ट्रीय तरुणी ! मीं तावडतोब तिच्या मस्तकावर पिस्तुलाचें निशाण रोखून म्हटलें बोल " कोण आहेस ? "

तरुणीः——माझें नांव मैना आहे.

मींः—मैना हें नांव तर अजूनपर्यंत ऐकिलें देखील नाहीं आणि तुझी माझी ओळखहि नाहीं. मग तूंच मला कशी ओळखतेस ?

मैनाः—मी तुम्हांला पुष्कळ दिवसांपासून ओळखतें; पण तो खुलासा करावयास सध्यां वेळ नाहीं. आपले एक मित्र आपल्याला बोलावतात. त्यांच्याकडे आपण अगोदर चला.

मीः—तुझी माझी मुळीं ओळखच नाहीं तर तुझ्या बोलण्यावर मी भरंवसा ठेवूं तरी कसा ? आणि अशा भलत्याच वेळीं माझा कोणता मित्र बोलावतो आणि त्याचें कारण तरी काय ?

मैना–आपल्या मदतीखेरीज आणखी दुसरें कोणतें कारण असावयाचें? मी एक मोठ्या विलक्षण भानगडींत पडलें आहे; पण हें कार्य आपल्या मदतीशिवाय पार पडणें शक्य नाहीं, अशी आतां माझी पूर्ण खात्री झाली आहे. सुदैवानें अशा प्रसंगीं आपली भेट झाली हें फार छान झालें. तात्या टोपे आपणाला बोलावत आहेत.

तात्याचें नांव ऐकतांच मी अगदीं आश्चर्यचकित झालों ! तो या वेळीं माझी कशाकरतां वाट पहात असेल बरें ? मी आपल्या मनाला प्रश्न केला. "कांहींही असो, त्या तरुणीच्या सरळ भाषणाचा मला विश्वास वाटला; आणि तिजबरोबर जावयास निघालों; पण पुन्हां मागील संकटाचें स्मरण होऊन मला संशय आला, आणि मी पुन्हा थांबलों. न जाणो ही आपल्या शत्रूकडून आली असली तर! अशा प्रकारचा संशय मला मैनेविषयीं आला. आतां माझें मन अगदीं अस्वस्थ झालें आणि मीं तिला म्हटलें, "तूं मला ज्या अर्थी ओळखत आहेस त्या अर्थी मी एक गुप्तपोलीस आहें हेही तुला ठाऊक असलें पाहिजे."

मैना—होय.

मी—तर आम्ही लोक कोणाच्याही भाषणावर विश्वास ठेवीत नाहीं.

मैना—तें सर्व खरें आहे; पण माझ्या शब्दावर भरंवसा ठेवावयास तुम्हांस हरकत नाहीं. केवळ नाइलाज झाल्यामुळेंच मला आपणाशीं भाषण करण्याचा प्रसंग येत आहे. तथापि आपली खात्री होत नसेल तर आपण इथें उभे रहा, मी तात्यांना बोलावून आणतें."

एवढें बोलून मैना निघून गेली. मी तेथेंच उभा राहिलों. तेथून जवळच नाना आणि त्याचें साथीदार बोलत बसले होते.

मी आपल्या मनाशीं म्हणूं लागलों, "ही दक्षिणी मुलगी कोण असेल बरें ? ही मला केव्हांपासून ओळखतें; आणि तात्याशींही हिचें ओळख असण्याचें काय कारण ?" याप्रमाणें एक समयावच्छेदेंकरून अनेक प्रश्न माझ्या मनांत उभे राहिलें. तथापि या वेळीं नाना आणि त्याचें साथीदार काय बोलत आहेत. हें समजून घेण्यासाठीं माझें मन अगदीं व्याकुळ झालें होतें. थोड्याच वेळानें मैना एका गृहस्थासह मजवळ येऊन दाखल झाली. हा इसम तात्याच होता. या वेळीं त्यानें आपली भगवी वस्त्रें उतरून लष्करी पोषाक धारण केला होता. तो अत्यंत नम्रपणानें मला म्हणाला, "सरदारसाहेब, आपण या वेळीं इकडे कशाकरतां आला आहांत ? मला वाटतें मैना आणि मी ज्या हेतूनें येथें आलों आहों त्याच हेतूनें तुम्ही इकडे आला असाल. कृपाकरून आमचें एक काम करा. करालना ?"

मी—कोणतें काम ? शक्य असल्यास अवश्य करीन.

तात्या—नाना, अबदुल, मॅकेअर वगैरे चांडाळचौकडी येथें खलबतें करीत बसलीं आहे हें तुम्हांला ठाऊकच आहे. त्यांपैकीं नानाला सोडून बाकी सर्वांना कैद करावें असा माझा विचार आहे. त्या नीच लोकांच्या नादीं लागून नाना देशाचें अहित करावयास प्रवृत्त झाला आहे. त्यांत तो यशस्वी तर होणार नाहींच; पण उलट इंग्रजांच्या हातीं लागून त्याची दुर्दशा मात्र होईल. त्याला कोणत्याही प्रकारें साह्य करावयाचें नाहीं याचें कारण तरी हेंच. या वेळीं माझ्या प्रेमाचें निधान एक मैना मात्र आहे. मी संन्याशी असूनही माझें मन संसारांत आकृष्ट करणारी एक मैना आहे; हिच्यासाठींच मीं नानाला पेशवा बनवण्याचें ठरविलें होतें; आणि हिच्या डोळ्यांत अश्रु आलेले पाहूनच मी त्याला त्याच्या धोक्याच्या मार्गापासून दूर करावयाला प्रवृत्त झालों आहें. हें काम मीं एकट्यानेंच करण्याचें ठरविलें होतें; पण अनायासें तुम्ही येथें आलां तर तुमचेंहि या कामीं साहाय्य मिळावें. माझी ही विनंती फुकट जाणार नाहीं, अशी आशा आहे.

या वेळीं मीं मैनेकडे पाहिलें तों ती रडत असलेली मला दिसली. ती रडतें कां ? नानाविषयीं तिला एवढी कां कळकळ वाटतें ? आणि तात्याचेंही तिच्यावर इतकें प्रेम कां असावें, इत्यादि अनेक प्रश्न माझ्या मनांत उभे राहिले. मीं तात्याला म्हटलें, “ आपली कांहीं हरकत नसेल तर मैनेचा परिचय मला करून द्या. तिची हकीकत ऐकण्यासाठीं माझें मन अतिशय उत्सुक झालें आहे ! तसेंच तिचा आपला संबंध काय आहे, याचाही खुलासा करावा. या सगळ्या गोष्टी कळल्या म्हणजे प्रसंगीं तिला साह्य करावयास मजकडून हयगय होणार नाहीं. ”

नाना—ही मैना दुसरी तिसरी कोणी नसून खुद्द नानाची मुलगी आहे. नानाचे वडील २ रे बाजीराव यांचें माझेवर अतिशय प्रेम होतें. त्यांनीं मजवर अनेक प्रकारचें उपकार केले. नानाची आणि माझी बालपणापासून मैत्री आहे. त्याला हरएक प्रकारें आणि हरएक प्रसंगीं सहाय्य करीन, असें त्यांच्या वडिलांना—बाजीरावसाहेबांना मीं मरतेसमयीं वचन दिलें होतें; पण त्याच्या मूर्खपणामुळेंच सांप्रत मला वचन मोडावें

लागत आहे. मैनेवर माझें लहानपणापासून मुलीसारखें प्रेम होतें. तिच्या हृदयाची सरळता आणि तिचा प्रेमळपणा पाहून तिनें आपलें मन मजकडे अगदीं आकृष्ट करून टाकलें आहे. तिची थोडक्यांत अशी हकीगत आहे. आतां—"

पण त्याच्या तोंडून पुढील शब्द निघण्यापूर्वीच नाना वगैरे मंडळी बसली होती त्या बाजूनें बंदुकीचे ध्वनि ऐकावयास येऊं लागले आणि त्याबरोबरच मोठ्यानें कोणीं ओरडलें. एकाएकीं हा प्रकार झालेला पाहून मी अगदीं गांगरून गेलों!"

प्रकरण २२ वें.

मॅकेअर आणि अबदुल.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

"माझी घाबरगुंडी उडालेली पाहून तात्या मला ह्मणाला, "घाबरूं नका. हीं सगळीं माणसें आहेत. त्यांनीं नानाला आणि त्याच्या साथीदाराला वेढा घातला आहे. आतां आपण तिकडेच जाऊं. चला लौकर."

एवढें बोलून तात्यानें मैनाला तेथेंच थांबावयाला सांगितलें आणि माझा हात धरून तो तिकडे जावयास निघाला. आम्ही अगदीं धांवतच जात होतों असें म्हटलें तरी चालेल. तेथें जाऊन पहातों तों पंचवीस हजार महाराष्ट्र शिपायांनीं त्या चौकडीभोंवतीं वेढा घातला आहे. त्या वेढ्यांतून पळून जाण्याची त्या दुष्टांपैकीं कोणाचीहि प्राशा नव्हती. सर्वजण आत्मसंरक्षणार्थ हातांत पिस्तुल घेऊन उभे होते; पण त्यांच्याभोंवतीं वेढा घातलेल्या शिपायांनींहि त्यांच्यावर आपल्या बंदुका रोखल्या होत्या. त्या वेळीं त्या शिपायांपैकीं एकजण त्या चांडाळचौकडीला उद्देशून ह्मणाला, "तुम्हांपैकीं कोणीहि पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागला तर तात्या टोपे यांच्या हुकुमावरून त्यास ठार केलें जाईल."

मी—कोणतें काम ? शक्य असल्यास अवश्य करीन.

तात्या—नाना, अबदुल, मॅकेअर वगैरे चांडाळचौकडी येथें खलबतें करीत बसलीं आहे हें तुम्हांला ठाऊकच आहे. त्यांपैकीं नानाला सोडून बाकी सर्वांना कैद करावें असा माझा विचार आहे. त्या नीच लोकांच्या नादीं लागून नाना देशाचें अहित करावयास प्रवृत्त झाला आहे. त्यांत तो यशस्वी तर होणार नाहींच; पण उलट इंग्रजांच्या हातीं लागून त्याची दुर्दशा मात्र होईल. त्याला कोणत्याही प्रकारें साह्य करावयाचें नाहीं याचें कारण तरी हेंच. या वेळीं माझ्या प्रेमाचें निधान एक मैना मात्र आहे. मी संन्याशी असूनही माझें मन संसारांत आकृष्ट करणारी एक मैना आहे; हिच्यासाठींच मीं नानाला पेशवा बनवण्याचें ठरविलें होतें; आणि हिच्या डोळ्यांत अश्रु आलेले पाहूनच मी त्याला त्याच्या धोक्याच्या मार्गापासून दूर करावयाला प्रवृत्त झालों आहें. हें काम मीं एकट्यानेंच करण्याचें ठरविलें होतें; पण अनायासें तुम्ही येथें आलां तर तुमचेंहि या कामीं साहाय्य मिळावें. माझी ही विनंती फुकट जाणार नाहीं, अशी आशा आहे.

या वेळीं मीं मैनेकडे पाहिलें तों ती रडत असलेली मला दिसली. ती रडते कां ? नानाविषयीं तिला एवढी कां कळकळ वाटते ? आणि तात्याचेंही तिच्यावर इतकें प्रेम कां असावें, इत्यादि अनेक प्रश्न माझ्या मनांत उभे राहिले. मीं तात्याला म्हटलें, “ आपली कांहीं हरकत नसेल तर मैनेचा परिचय मला करून द्या. तिची हकीकत ऐकण्यासाठीं माझें मन अतिशय उत्सुक झालें आहे ! तसेंच तिचा आपला संबंध काय आहे, याचाही खुलासा करावा. या सगळ्या गोष्टी कळल्या म्हणजे प्रसंगीं तिला साह्य करावयास मजकडून हयगय होणार नाहीं. ”

नाना—ही मैना दुसरी तिसरी कोणी नसून खुद्द नानाची मुलगी आहे. नानाचे वडील २ रे बाजीराव यांचें माझेवर अतिशय प्रेम होतें. त्यांनीं मजवर अनेक प्रकारचें उपकार केले. नानाची आणि माझी बालपणापासून मैत्री आहे. त्याला हरएक प्रकारें आणि हरएक प्रसंगीं सहाय्य करीन, असें त्यांच्या वडिलांना—बाजीरावसाहेबांना मीं मरतेसमयीं वचन दिलें होतें; पण त्याच्या मूर्खपणामुळेंच सांप्रत मला वचन मोडावें

लागत आहे. मैनेवर माझें लहानपणापासून मुलीसारखें प्रेम होतें. तिच्या हृदयाची सरळता आणि तिचा प्रेमळपणा पाहून तिनें आपलें मन मजकडे अगदीं आकृष्ट करून टाकलें आहे. तिची थोडक्यांत अशी हकीगत आहे. आतां—"

पण त्याच्या तोंडून पुढील शब्द निघण्यापूर्वींच नाना वगैरे मंडळी बसली होती त्या बाजूनें बंदुकीचे ध्वनि ऐकावयास येऊं लागले आणि त्याबरोबरच मोठ्यानें कोणीं ओरडलें. एकाएकीं हा प्रकार झालेला पाहून मी अगदीं गांगरून गेलों!"

प्रकरण २२ वें.

मॅकेअर आणि अबदुल.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

"माझी घाबरगुंडी उडालेली पाहून तात्या मला ह्मणाला, "घाबरूं नका. हीं सगळीं माणसें आहेत. त्यांनीं नानाला आणि त्याच्या साथीदाराला वेढा घातला आहे. आतां आपण तिकडेच जाऊं. चला लौकर."

एवढें बोलून तात्यानें मैनाला तेथेंच थांबावयाला सांगितलें आणि माझा हात धरून तो तिकडे जावयास निघाला. आम्ही अगदीं धांवतच जात होतों असें म्हटलें तरी चालेल. तेथें जाऊन पहातों तों पंचवीस हजार महाराष्ट्र शिपायांनीं त्या चौकडीभोंवतीं वेढा घातला आहे. त्या वेढ्यांतून पळून जाण्याची त्या दुष्टांपैकीं कोणाचीहि प्राज्ञा नव्हती. सर्वजण आत्मसंरक्षणार्थ हातांत पिस्तुल घेऊन उभे होते; पण त्यांच्याभोंवतीं वेढा घातलेल्या शिपायांनींहि त्यांच्यावर आपल्या बंदुका रोखल्या होत्या. त्या वेळीं त्या शिपायांपैकीं एकजण त्या चांडाळचौकडीला उद्देशून ह्मणाला, "तुम्हांपैकीं कोणीहि पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागला तर तात्या टोपे यांच्या हुकुमावरून त्यास ठार केलें जाईल."

तात्याचें हें भाषण संपतें न संपतें तोंच तात्यानें म्यानांतून तरवार काढून कसलासा इशारा दिला. त्याबरोबर पंचवीसहजारांच्या पंचवीसहजार बंदुकांतून एकदम प्रचंड ध्वनि निघून त्यानें सभोंवारची गाढ शांतता कांहीं वेळ भंग करून टाकली.

धूर नाहींसा झाल्यावर मीं त्या चांडाळचौकडीकडे पाहिलें. तों नाना शिवाय सर्व कैद झाल्याचें मला दिसलें. त्यांना गोळ्या लागूनच ते पडले असावेत असें मला आरंभीं वाटलें; पण त्यांच्याजवळ गेल्यावर माझा हा भ्रम नाहींसा झाला. त्यांचे हातपाय बांधल्यामुळें ते असे पडले आहेत असें मला कळून आलें. या कामांत मराठी शिपायांची खूपच चलाखी दिसून आली. तात्या स्वतःच्या कामांत इतका दक्ष असतांना त्यानें माझें सहाय्य कां मागितलें याचें मर्म माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं.

तात्या नानाजवळ गेल्यावर नंतर नाना त्याला ह्मणाला, "दुष्टा! तुझें तोंड मला दाखवूं नकोस. चल नीघ. तुझा नीचपणा आज पूर्णपणें माझ्या लक्ष्यांत आला. मी पेशवा झालों तर आपल्या महत्त्वाकांक्षा सफल होणार नाहींत अशा प्रकारच्या अधम विचारानेंच तूं आज माझा खून करावयास प्रवृत्त झाला आहेस काय?"

त्याचें हें भाषण तात्याच्या हृदयाला सहन होणें शक्य नव्हतें. तरी तो आपली शांतता कायम ठेवून ह्मणाला, "नीचपणा आणि अधमपणा अजून तात्याला शिवला नाहीं. मी तुमचा सहकारी बनलों तों माझ्या स्वार्थाच्या हेतूनें नव्हे तर, तुम्ही थोर पुरुष असाल असें समजून तुह्मांला पेशवा बनविण्याचें मीं ठरविलें होतें; पण माझा हा भ्रम तुह्मीं वेळेवर दूर केला. भस्मानें झाकलेलें तुमचें अंतःकरण किती काळेकुट्ट आहे याची मला आतां पुरती कल्पना आली आणि याच कारणामुळें मला माझें वचन परत घ्यावें लागलें. तुमच्या दुष्ट हेतूला मजकडून सहाय्या होणें शक्यच नाहीं. वीराप्रमाणें युद्ध करणें निराळें आणि या नीचांच्या नादीं लागून बायकांमुलांची कत्तल करण्याचा नामर्दपणा करणें निराळें. हा अधमपणा मला मुळींच पसंत नाहीं. आपण आपल्या पूर्वजांच्या निर्मळ यशाला कलंकित करीत आहां.

धिक्कार असो अशा आपल्या वर्तनाला ! बुद्धिः कर्मानुसारिणी म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आपल्या हातून अधम कर्मे घडलीं असेंच जर आपल्या कर्मांत लिहिलें असेल तर त्याला आपण काय करणार ? आपला संबंध जरी सोडला आहे, तरी आपलें कल्याण व्हावें अशी माझी इच्छा आहे, आणि याच इच्छेनें मी आज आपल्याकडे आलों आहें. तात्याच्या हातून आपलें कधींहि अहित होणार नाहीं. माझें आपणास शेवटचें हेंच सांगणें आहे, कीं, आपण हें नीच कर्म सोडून इंग्रजांबरोबर उघड सामना करा. गैरसावध असतांना त्यांची कत्तल करणें हा कांहीं मर्दपणा नव्हे; आणि यापासून देशाचा काय फायदा होणार ? मॅकेअरसारख्या दहापांच फ्रेंच दरोडेखोरांच्या जोरावर आपण इंग्रजांना हांकून देऊं अशी जर तुमची इच्छा असेल तर ती निखालस खोटी आहे. आपण जर योग्य मार्गानें जातां तर मीं तुह्मांस दक्षिणेंतील राजेरजवाड्यांचें: सहाय मिळवून दिलें असतें. त्यामुळें आपली इच्छा पुरी होण्याचा पुष्कळ संभव होता; पण आतां या गोष्टीची चर्चा करून काय उपयोग ? आपण अगदीं दूर भटकत आहांत, पण या मार्गानें आपणास यश येणार नाहीं. हें मी अगोदरच भाकीत करून ठेवितों. अनाथ बायकामुलांची कत्तल करावयाचें जें आपण ठरविलें आहे, त्याबद्दल परमेश्वर आपणाला योग्य शासन केल्याखेरीज राहणार नाहीं. ”

तात्याचें हें भाषण ऐकून नाना संतापानें म्हणाला, “ मला तुझ्या उपदेशाची जरूरी नाहीं. तूं माझ्या वैभवप्राप्तीच्या आड येत आहेस. तूं जर माझा खरोखरच हितचिंतक असशील तर या पकडलेल्या माझ्या दोस्ताला सोड, त्याच्याकडून जें सहाय होईल तें तुजकडून होणार नाहीं, याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. ”

याच सुमारास मैना तेथें आली. तिला पाहून नाना आश्चर्यानें म्हणाला, “ पोरी, तूं अशा भलत्या वेळीं इथें कां आलीस ? मला वाटतें, माझीं गुप्त कारस्थानें तूंच त्याला कळवून आपली आद्वितीय पितृभक्ति व्यक्त केलीस. तूं माझी मुलगी नव्हेस; वैरीण आहेस. चल जा. माझ्यासमोर उभी राहूं नकोस. ”

पण यावर बिचारी मैना कांहीं न बोलतां आपल्या पित्याजवळ गेली; आणि तिनें त्याच्या पायावर लोटांगण घेतलें; पण नानाचा संताप मुळींच कमी झाला नाहीं. तो पुन्हां तिला म्हणाला, " आजपासून तूं माझी नव्हेस; आणि मी तुझा नव्हें. यापुढें मी तुझें तोंडही पाहणार नाहीं. तुला वाटेल तिकडे चालती हो. माझ्या घरांत यापुढें पाऊल टाकलें तर खबरदार ! जन्मल्याबरोबरच तूं मेली असतीस तर फार छान झालें असतें ! निदान तूं पुढें असे गुण उधळणार आहेस, हें जर मला अगोदर कळतें तर मींच तुला त्या वेळीं ठार केलें असतें."

यावर मैना रडत रडत ह्मणाली, " बाबा, सामर्थ्यवान् इंग्रज लोकांच्या विरुद्ध जाऊन तुमचा काय फायदा होणार आहे ? नीच लोकांच्या सांगण्यावरून खुनासारखीं अधम कृत्यें करण्यास प्रवृत्त होणें हें शहाणपणाचें कृत्य नव्हे. त्याचा परिणाम कसा होणार याची कल्पना माझ्या पुढें आजच उभी राहून माझें हृदय कांपत आहे ! नका ! नका ! बाबा ! तुम्हांला मी हात जोडतें ! तुमच्या पाया पडतें ! तुम्ही या कृत्यापासून दूर व्हा. अजून वेळ गेली नाहीं. तात्या काय म्हणतात तें ऐका, आणि त्यांच्याच सल्ल्याप्रमाणें वागा. यांत आपलें खरें कल्याण आहे; नाहींतर आपणा सर्वांचा नायनाट होईल हें लक्षांत घ्या."

मैनेच्या करुण वाणीनें माझ्या डोळयास पाणी आलें; पण नानाचें प्रस्तर हृदय लवमात्र द्रवलें नाहीं. उलट त्या नीचानें या वेळीं तिजवर लत्ताप्रहार केला.

जोरानें लाथ बसल्यामुळें मैना बरीच दूर झुगारली गेली. मी तिला उठवण्यासाठीं जात होतों; पण तें काम तात्यानेंच केलें.

मैना पुन्हां नानाचें पाय धरावयास जात होती; पण त्यानें तिला लांबचे लांब रोखून ह्मटलें, " हं ! खबरदार पुढें येशील तर ! या हातांतल्या तलवारीनें तुकडे तुकडे करून टाकीन. "

मैना तात्याजवळ जाऊन रडूं लागली. मी हा सर्व प्रकार पहात स्तब्ध उभा होतों; आणि तात्याचें सर्व सैन्यही अगदीं गुंग होऊन बिलकूल हालचाल न करितां चित्राप्रमाणें जागच्या जागीं निश्चल राहिलें होतें.

थोड्या वेळानें तात्यानें मला आपल्याजवळ बोलाविलें आणि ह्मटलें,

“ या वेळीं मॅकेअर वगैरे सर्व कांहीं तुमच्या स्वाधीन करतों. तुम्ही या
बदमाषांना इंग्रजांकडून योग्य शासन करवा. तोंपर्यंत त्यांची आणि नानाची
फिरून भेट होणार नाहीं अशा प्रकारची व्यवस्था ठेवा. ”
माझे सैनिक यांना तुमचे बिऱ्हाडीं आणून पोहचतें करील. मात्र
आजच्या या घटनेसंबंधानें कोणाजवळ चकार शब्दही काढूं नका;
आम्ही एकदोन दिवसांच्या आंतच जाणार आहों. आजच तुमची वाट
न पाहतां स्टिफनला जाऊन भेटलों आणि पुढचा एकंदर कार्यक्रम त्याला
कळविला. उद्यां फिरून त्याला आणि तुह्मांलाही भेटेन. ”
मीः—ठीक आहे. मात्र या कैद्यांना किल्ल्याकडे नेऊन पोंचवा.
त्यांना माझ्या बिऱ्हाडीं ठेवणें मला बरें दिसत नाहीं. कारण अशा
बाबतींत मला चांगलाच खडतर अनुभव आला आहे. यांचे अनेक
हेर गांवभर भटकत असल्यामुळें माझ्या बिऱ्हाडांतून हे केव्हां पलायन
करतील आणि केव्हां नाहीं याचा नियमच नाहीं. म्हणून तुम्ही यांना
आपल्या सैनिकांबरोबर किल्ल्याकडे नेऊन पोहोंचतें करा आणि हें जर
तुम्हाला कबूल असेल तर माझी यांना ताब्यांत घेण्याची तयारी आहे.
तात्याः——ठीक आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणें यांना मी किल्ल्याकडे
पोहोंचतें करतों. पण ह्यांना पोहोंचवायाला येणारे सैनिक माझे आहेत या
गोष्टीचा सुगावा मात्र कोणालाच लावूं देऊं नका !
मीः——या बाबतींत आपण अगदीं निश्चिंत असा.
यानंतर सर्व कैद्यांचीं शस्त्रास्त्रें काढून घेतलीं. आणि त्यांचे हातपाय
पुनः एकदा बळकट बांधले. हें सगळें झाल्यावर मी त्यांना घेऊन
कित्येक सैनिकांसह किल्ल्याकडे रवाना झालों. तात्या, मैना आणि नाना
हे तिघेजण तेथेंच राहिली.
जाते वेळीं पुनः एकवार मीं मैनेकडे पाहिलें तों ती तात्याच्या पाया-
वर डोकें ठेवून रडत होती. आम्ही किल्ल्याच्या दरवाजाजवळ जाऊन
पोहोंचलों त्या वेळीं दहा वाजले होते. नियमाप्रमाणें किल्ल्याचा दरवाजा
बंद होता. मीं पिस्तुलाचे बार उडवून किल्ला उघडण्याचा इषारा दिला.
थोडक्याच वेळानें ब्युगलचा ध्वनी निघाला. त्याबरोबर एका पहारे-
कऱ्यानें मला विचारलें; “ कोण आहे ? ”

त्याचा प्रश्न ऐकून मीं त्यास म्हटलें " मी डिटेक्टिव कामिशनर सरदार रामपालसिंह आहें. पळून गेलेल्या मॅकेअर, अबदूल वगैरे बद-माषांना मीं पकडून आणलें आहे असा जनरल हे साहेबांना माझा निरोप कळीव. "

पहारेवाला त्याचेकडे ताबडतोब निघून गेला. तो गेल्यानंतर थोड्या वेळानें दरवाजा उघडल्याचा ध्वनी माझ्या कानावर आला आणि त्याच्या मागोमाग जनरल हे कित्येक सैनिकांसह माझ्याजवळ येऊन दाखल झाले.

मजकडे पाहून हे साहेब विस्मयानें म्हणाले " काय सरदारसाहेब, तुम्ही पुनः आह्माला जिवंत भेटाल अशी मला आशा नव्हती. दुष्ट मॅके-अरनें तुम्हाला ठार केलें असावें अशीच आमची सर्वांची समजूत झाली होती. पण ईश्वरकृपेनें असें कांहीं झालें नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे. "

यावर मीं त्यांना म्हटलें तसा प्रसंग आलाच होता. पण त्यांतून ईश्वराच्या कृपेनें निभावलों. या प्रसंगीं ज्या एका माणसानें मला सहाय्य केलें त्याचे उपकार मी कधींहि विसरणार नाहीं. असो. सध्यां मीं आपल्याबरोबर मॅकेअर आणि अबदूलला कैद करून आणलें आहे-मॅकेअरचें नांव घेतांच जनरल हे विस्मयानें म्हणाले, " कां तुम्ही खरो-खरच म्हणतां हें ? "

मीः—होय. आणखी त्याजबरोबर त्याचे साथीदारहि पकडले आहेत.

यानंतर जनरल हे यांच्या हुकुमावरून त्याचे सैनिक मजजवळच्या कैद्याला घेऊन आंत गेले. तात्याच्या महाराष्ट्रीय सैन्याला आतां तेथें थाबवून ठेवण्याचें मला कांहींच कारण नव्हतें. मीं त्यांना ताबडतोब रवाना केले आणि जनरल हेबरोबर किल्ल्यांत शिरलों. महाराष्ट्रीय सैनिकाच्या बाबतींत मला हे साहेबांनीं अनेक वेळ विचारलें. पण " त्याच्यासंबंधाची माहिती मी योग्य वेळीं तुम्हांस कळवीन " एवढेंच मीं त्यांना या बाबतींत कळविलें. ती सबंध रात्र मीं किल्ल्यांत घाल-विली. त्या अवधींत नानासंबंधींचेच सर्व विचार माझ्या डोक्यांत घोळत होते. दुसरे दिवशीं लॉर्ड कॅनिंग साहेबांनीं पुढीलप्रमाणें तार पाठविली.

" गार्डनची कन्या हेलेन हिला मारणारा फ्रेंच दरोडेखोर मॅकेअर व त्याचे साथीदार अबदुल वगैरे मंडळीस मीं पकडलेलें आहे, बंडासंबंधीं चोहोंकडून ज्या बातम्या येतात त्यावरून लौकरच ही आग भडकेल असा सुमार दिसतो; पण मॅकेअरला पकडल्यामुळें कदाचित ती दबण्याचाहि संभव आहे. बंडखोरांच्या प्रमुखतेंत नाना असून मॅकेअर हा त्याचा उजवा हात होता."

याच दिवशीं बंडखोर शिपाई कानपूरकडे रवाना झाल्याची तार दिल्लीहून आली."

प्रकरण २३ वें.

बंड आणि पलायन

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

"दुसरे दिवशीं सकाळीं जनरल हे साहेबांनीं सैन्याची परेड घेतली. त्या वेळीं मी तेथेंच हजर होतों. नंबर एक पायदळ पलटणींतील लोकांचा एकंदर रंगराग पाहून ते फितूर व्हावयाला बिलकुल वेळ लागणार नाहीं हें मीं तेव्हांच ओळखलें आणि त्याचक्षणीं ती गोष्ट साहेबांच्या कानावर घातली पण त्यांना ती खरी वाटली नाहीं. ते मला म्हणाले, " तुम्ही म्हणतां पण मला कांहीं या लोकांचा तसा रंग दिसत नाहीं." यानंतर मी स्तब्ध राहिलों; पण अखेर अनुभवाअंतींहि माझेंच ह्मणणें खरें ठरलें. या वेळीं हे साहेबांना पुष्कळ पश्चात्ताप झाला पण त्याचा काय उपयोग ? माझ्या ह्मणण्यावर त्यांचा भरंवसा बसला असता आणि त्याच वेळीं त्या सैन्यांतील लोकांचीं शस्त्रास्त्रें ते काढून घेते तर १८५७ सालच्या बंडाचें स्वरूप इतकें भयंकर झालें नसतें.

मी सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास किल्ल्यांतून निघून घरीं आलों. तेथें लक्ष्मणप्रसाद माझी वाट पहात बसलाच होता. त्यानें मी घरांत पाऊल ठेवतांच माझ्या हातांत एक पत्र दिलें आणि म्हटलें,

"काल एक संन्यासी आपल्या भेटीला आला होता; पण आपली भेट न झाल्यामुळें त्यानें हें पत्र आपल्या स्वाधीन करावयास सांगितलें."

पत्र इंग्रजींत लिहिलें होतें. संन्याशानें दिलें एवढे शब्द ऐकतांच तें तात्याचें असलें पाहिजे हें मीं ओळखलें. मीं ताबडतोब तें पत्र फोडलें. त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होता.

" नानानें अखेर माझें ह्मणणें ऐकलें नाहीं. लौकरच कांहीं तरी भयंकर प्रकार घडून येईल असें वाटतें. अबदुल, मॅकेअर वगैरे बदमाषांवर सक्त नजर असूं द्या. बंडखोर किंवा फितुरी लोकांची आणि त्यांची भेट होणार नाहीं अशी खबरदारी घ्या."

पत्र वाचल्यावर नानाला पकडणें मला अगदीं आवश्यक वाटूं लागलें. तसें जर केलें नाहीं तर कानपुरांत वाटेल ते अत्याचार झाल्याखेरीज रहाणार नाहींत अशी माझी मनोदेवता मला सांगूं लागली; पण त्याला धरण्याचा विचार मनांत उभा रहातांच बिचाऱ्या मैनेची मूर्ति माझ्या डोळ्यापुढें उभी राहिली ! तो सरकारच्या हातीं पडल्यावर तें त्याला देहांतशासन केल्याखेरीज रहाणार नाहीं. त्या प्रसंगीं मैनेची स्थिति काय होईल ? तात्या सुद्धां यामुळें असंतुष्टच होईल; पण हें कांहीं जरी असलें तरी कर्तव्याच्या दृष्टीनें त्याला पकडणें मला अगदीं अपरिहार्य होतें.

यासंबंधीं विचार करीत असतांना मी आपल्या मनांतल्या मनांत ह्मणालों, " त्याला पकडल्यावर प्रथम आपल्याजवळच ठेवावें. नंतर बंड शांत होऊन सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर त्याला सरकारच्या स्वाधीन करावें. हो ! असेंच करणें बरें. त्याचप्रमाणें त्याला पकडण्यापूर्वीं आपण तात्याचाही सल्ला अवश्य घेतला पाहिजे. आपण ज्या अर्थीं त्याला आपल्याजवळ ठेवून घ्यावयाचें योजिलें आहे त्या अर्थीं या गोष्टीला तो मान्यता देईल असें वाटतें."

याच वेळीं मीं त्याला एक पत्र लिहिलें. ते त्याला नेऊन पोंचतें करण्याचें काम लक्ष्मणप्रसादाला सांगितलें. त्याचा पत्ता वरच्या लिफाफ्यावर लिहिला होताच. तसेंच त्याच्या बिऱ्हाडांत प्रवेश व्हावयाला ज्या सांकेतिक शब्दाची जरूरी होती तोहि मीं लक्ष्मणप्रसादाला कळविला.

लक्ष्मणप्रसाद गेल्यावर मीं शयन करून थोडीशी झोंप घेतली. अडीचे वाजेपर्यंत त्याची वाट पाहिली; पण तो परत आला नाहीं. त्यानंतर मी किल्ल्याकडे निघून गेलों; सुदैवानें लक्ष्मणप्रसाद वाटेंत भेटला. त्याच्या सांगण्यावरून नानासंबंधाची कोणतीच गोष्ट कळवावयाला तात्या नाखुष आहे, असें मला कळून आलें. मला या गोष्टीची थोडीबहुत कल्पना होती. असो. लक्ष्मणप्रसादाला सावध रहाण्याचें बजावून मी पुढें निघून गेलों व कानपुरांत नानाचें एक घर होतें, तेथें तो पूर्वीं आपल्या युरोपियन मित्रांना पार्ट्या देत असे; अलीकडे तो या घरांत रहातच नव्हता. या कारणामुळें मला त्याचें निवासस्थान शोधून काढण्याची फार तळमळ लागून गेली होती.

तीन वाजण्याच्या सुमारास मी किल्ल्यांत जाऊन पोंचलों. मॅकेअर आणि अबदुल या दुकलीची कशी काय व्यंवस्था आहे ती पहावी ह्मणून मी त्यांच्याकडे गेलों; पण मला पहातांच मॅकेअर संतुष्ट दृष्टीनें पाहूं लागला. त्याच्याविषयीं पराकाष्ठेचा तिटकारा वाटत असल्यामुळें मी त्याला कांहींच बोललों नाहीं. अखेर थोड्या वेळानें तो मला ह्मणाला, "वाघाला असें बांधून घालण्यापेक्षां ताबडतोब गोळी घातलेली बरी."

पण त्यांच्या ह्या भाषणाला मी कांहीं उत्तर न देतां मुकाट्यानें हे साहेबाकडे निघून गेलों. तिकडे जातांना मध्यंतरीं पुन्हां लक्ष्मणप्रसादाची भेट झाली. कित्येक महाराष्ट्र संन्यासी जंगलांत येऊन उतरले आहेत ही महत्त्वाची बातमी कळविण्यासाठीं तो इकडे मुद्दाम आला होता.

मला ही बातमी कळल्याबरोबर जनरल हे साहेबांकडून शीख घोडेस्वार पलटणींतले तीस जवान बरोबर घेऊन मी तिकडे धांवलों.

पण लक्ष्मणप्रसादानें सांगितलेलें सर्व जंगल धुंडाळलें तरी महाराष्ट्रीय संन्यासी ह्मणून आम्हांला कोठेंच दिसले नाहींत. जंगलांच्या भोंवतालचीं गांवेंहि आम्हीं तपासलीं. सर्व कांहीं केलें; पण व्यर्थ! माझा संशय आतां अधिकच वाढला. या टोळींत नाना असावा असें मला वाटूं लागलें. जंगलातील शोध निष्फळ ठरल्यावर आम्ही नानाच्या घराकडे गेलों; पण तेथेंही कोणी नव्हतें.

याच सुमारास लांबून तोफेचा ध्वनि माझ्या कानावर आला. तो

किल्ल्याच्या बाजूनें आला असावा असें मला वाटलें. नानाचें निवासस्थान किल्ल्यापासून दोन मैल लांब होतें. आतां आम्ही या ठिकाणीं न थांबतां किल्ल्याकडे जावयास निघालों आणि मोठ्या त्वरेनें तिकडे गेलों. या वेळीं सायंकाळचे सात वाजले असतील. जसजसें आम्ही गांवाजवळ जाऊं लागलों तसतसा अधिकच कोलाहल आमच्या कानावर येऊं लागला. हें सगळें बंडाचें प्रकरण असावें हें आतां माझ्या लक्षांत आलें. याच वेळीं मीं गुरुदरबाराकडे (देवाकडे) तोंड करून इंग्रजी राज्याच्या संरक्षणासाठीं प्राणसमर्पण करण्याची प्रतिज्ञा केली. माझ्या या प्रतिज्ञेनें माझ्याच नव्हे तर मजबरोबर असलेल्या एकंदर शीख जवानांच्याहि अंगांत विलक्षण स्फुरण उत्पन्न झालें आणि आम्हीहि पहिल्यापेक्षांहि ज्यास्त वेगानें किल्ल्याकडे जाऊं लागलों. रस्त्यांत कांहीं लोक पळत असलेले आम्हांस दिसले. त्यावरून शहरात बंडाची आग पेटली असल्याची आमची पूर्ण खात्री झाली.

कांहीं वेळानें आम्ही किल्ल्याजवळ पोंचलों; पण तेथें पहातों तर किल्ल्याचें दार बंद असून बाहेर प्रेताचे ढीगच्या ढीग पडले आहेत, किल्ल्याच्या बाहेर अजूनहि तोफांचा वर्षाव होत होता.

मजबरोबरच्या सैनिकांनीं ब्युगल वाजवलें. त्याबरोबर एक इंग्लिश शिपाई निशाण घेऊन किल्ल्याच्या भिंतीवर उभा राहिला. नंबर १ ची पलटण फितूर होऊन तिनें बंड उभारलें आहे असें या शिपायाकडून आम्हांस कळलें. तसेंच ती सध्यां नबाबगंजाकडे गेली असून हिनें किल्ल्यांतून मॅकेअर, अबदुल वगैरे मंडळीला सोडून नेलें हें खेदकारक वर्तमान या शिपायानें आम्हांला विदित केलें. मॅकेअरचें पलायन मला अत्यंत भयंकर वाटलें. तथापि त्या गोष्टीचा विचार करण्यांत फारसा वेळ न घालतां मी लक्ष्मणप्रसादाबरोबर दहा सैनिक देऊन त्याला माझ्या बिऱ्हाडाकडे पाठवलें आणि बाकी उरलेल्या मंडळीसह मी गार्डनच्या घराकडे रवाना झालों."

प्रकरण २४ वें.

भयंकर प्रसंग.

(सरदार रामपालसिंगाची आत्मकथा.)

"गार्डनच्या घरीं जाऊन आम्ही पोंचलों पण तेथें आतां काय होतें ? चोहोंकडे शून्य. शीख स्वारांना खालींच उभे करून मी रोजच्या माडीवर गेलों; पण तेथेंही कोणी नव्हतें. आतां मी फारच घाबरलों. रोजच्या खोलीसमोरील भिंतही पडली होती. एकाएकीं हें असें झालें तरी कसें ? मी आपल्या मनाशीं मोठा आचंबा करूं लागलों. खोलींतले बाकी सर्व पदार्थ जागच्या जागींच होते; पण माणसाचा म्हणून कोठेंच पत्ता नव्हता. रोज नाहीं, गार्डन नाहीं कीं कोणी नाहीं ! मग काय, मॅकेअर बंडवाल्यांना घेऊन याच सुमारास येथेंही आला होता ? खोलींत उभे राहिल्या राहिल्या गोष्टींचा मी या विचार करूं लागलों. याच सुमारास टेबलाच्या खालीं रक्तानें भरलेला दुर्दैवी स्टिफन मला दिसला. मीं त्याला उठवून बसवावें म्हणून पुढें झालों. त्याचे सर्व कपडे रक्तानें भिजले होते.

मीं तावडतोब स्टिफनला उठवून बसविलें आणि त्याच्या छातीला हात लावून पाहिलें. तों अजून धुगधुगी असल्याचें मला आढळून आलें. त्याचा श्वासहि अतिशय हळुहळू चालत होता. त्याच्या अंगांत दुर्बलता इतकी आली होती, कीं, त्याला जरा मीं धरलें नसतें तर तो एकदम खालीं पडता ! त्याच्या शरीरांतल्या चार पांच ठिकाणाहून रक्त वहात होतें. मीं खालून कांहीं स्वारांला वर बोलावलें आणि त्यांच्या सहाय्यानें त्याला एका कोंचावर निजवून त्याच्या जखमा बांधिल्या आणि थोडेंसें पाणी आणवून तें त्यांच्या तोंडावर शिंपडलें. यानंतर अर्ध्या घंट्यानें तो शुद्धीवर आला. त्या वेळीं मीं त्याला थोडेंसें पाणी पाजलें. त्याचें मन जरासें स्वस्थ झाल्यावर मीं त्याला विचारलें, " तुह्मांला इतकें कोणीं मारिलें ? "

पण माझ्या या प्रश्नाचें उत्तर न देतां तो मला क्षीण स्वरानें ह्मणाला, "मॅकेअर आणि त्याचे साथीदार तुह्मांला भेटले होते का ? "

मी—छे, मी इतक्यांतच येथें आलों; पण येथें किंवा वाटेंत त्यांच्यापैकीं कोणीच भेटले नाहींत. हा सगळा मॅकेअरचाच प्रताप काय?

स्टिफन—होय. तो आणि त्याचे साथीदार येथें येऊन त्यांनीं आमच्यावर हल्ला केला. या वेळीं मीं रोजचें संरक्षण करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण शस्त्र नसल्यामुळें नाइलाज झाला. तिला आणि जेम्सला या लोकांनीं धरून नेलें.

मीः—जेम्स कोण आहे? त्याला मीं अद्यापपर्यंत पाहिलें नाहीं किंवा त्याचें नांवहि ऐकलें नाहीं. त्याचा आणि रोजचा कांहीं संबंध आहे?

स्टिफनः-(उदासीनपणानें) या बाबतींत मलाहि कांहीं विशेष ठाऊक नाहीं. तो तिचा आतेभाऊ आहे एवढें मात्र मी ऐकलें आहे.

एवढें बोलून स्टिफन पुनः निजला. त्याच्या जखमांतून पुनः जोरानें रक्त वाहूं लागलें. मीं पुनः त्या जखमा बांधल्या आणि त्याला किल्ल्यावर नेण्यासाठीं दोघा स्वारांना गाडी आणावयास सांगितलें.

यानंतर स्टिफनजवळ कांहीं स्वार बसवून मीं गार्डनचा शोध करूं लागलों, पण माडीवरच्या सगळ्या खोल्या धुंडाळल्या तरी त्याचा पत्ता लागला नाहीं. अखेर मी खालीं आलों आणि तळमजल्याच्या खोल्यांत त्याचा तपास करावयास सुरवात केली. येथें मात्र माझा प्रयत्न यशस्वी झाला. येथील एका खोलींत ते बसलेले आढळले. यांच्या चर्येंत बरेंच परिवर्तन झालें असल्याचें मला आढळून आलें; पण त्याचें कारण माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं. त्यांनीं मला पाहिलें. पण ते माझ्याशीं बोलले नाहींत. मीं रोजच्या बाबतींत त्यांच्या जवळ चौकशी केली. त्यांचेंहि त्यानें उत्तर दिलें नाहीं. ते माझ्याकडे सारखे पहात होते; पण बोलेनात. हा सगळा प्रकार पाहून ते वेडे बनले आहेत कीं काय असा मला संशय आला. आतां मी अगदीं त्यांचे जवळ गेलों. याच सुमारास मीं पाठविलेले स्वार म्याना घेऊन तेथें आले. गांवांत चोहोंकडे दंगल माजल्यामुळें त्यांना गाडी मिळाली नाहीं. म्यानाच मोठ्या सुदैवानें मिळाला; पण तो न्यावयाला देखील दोघां भोयांच्या पलिकडे भोई मिळाला नाहीं.

मी पुनः स्टिफनकडे गेलों त्यावेळीं तो शुद्धीवर आला होता. आतां

त्याला कांहीं माहिती विचारावयाला योग्य संधी आहे हें पाहून मीं त्याला म्हटलें " गार्डनसाहेब असे वेड्यासारखे का दिसतात? त्याचप्रमाणें मिसेस गार्डन कोठें आहेत?"

या बाबतींत स्टिफनकडून मला जी माहिती मिळाली त्यामुळें मला अतिशय दुःख झालें; पण आश्चर्य मात्र वाढलें नाहीं. मिसेस गार्डन ज्या मानसिक वेदनेंत दिवस घालवीत होती त्या अवस्थेंत तिला मृत्यु प्राप्त होणें कांहीं अस्वाभाविक नव्हतें, तोंच प्रकार गार्डनसाहेबासंबंधीं असल्या दुःखमय स्थितींत त्यांना वेड लागणें क्रमप्राप्तच होतें. त्याची प्रिय पत्नी त्याच्या डोळ्यादेखत कन्याविरहानें अकालीं मृत्यु पावली त्यांना प्राणाहून हि प्रिय असलेल्या हेलनचा मॅकेअरच्या हातून शोचनीय अंत झाला आणि रोजलाहि तो वाटेल तसा त्रास देऊं लागला होता. अशा स्थितींत त्यांना वेड लागावें यांत काय आश्चर्य आहे? असो. थोड्या वेळानें मी स्टिफनला आणि गार्डनला म्यानांत बसवून त्यांच्यासह किल्ल्याकडे रवाना झालों. गार्डनच्या घरांत चाकरमाणसें कोणीकडे गेलीं त्याचा पत्ता नव्हता आणि त्यांची परत येण्याचीहि आशा नव्हती म्हणून मीं त्यांची वाट पाहिली नाहीं. रात्रीं आठाच्या सुमारास आम्ही किल्ल्याजवळ येऊन पोहोंचलों. जनरल हे स्वतः किल्ल्याच्या दाराजवळ येऊन त्यांनीं मला ओळखल्यानंतर किल्ल्याचें दार उघडलें गेलें. नंतर आमचा आंत प्रवेश झाला हें सांगणें नकोच.

किल्ल्यांतून परत मी घरीं जावयास निघालों तों एका आंब्याच्या झाडाखालीं एक संन्यासी दिसला. मजवर त्याची दृष्टी जातांच मला जवळ येण्याचा त्यानें इषारा केला मी त्याला चटकन ओळखलें.

तो मला म्हणाला, " सरदारसाहेब, मीं जें तुम्हाला म्हटलें होतें तसेंच अखेर घडून आलें. रोज पुनः त्या नीच मॅकेअरच्या कचाट्यांत सांपडली! मी इतक्यांतच गार्डनच्या घराकडून आलों; पण मला तेथें कोणीच दिसलें नाहीं. तुम्ही जे दोन स्वार घर संभाळण्यासाठीं म्हणून ठेविले होते त्यांजकडून स्टिफनला आणि गार्डनला तुम्हीं किल्ल्यावर पोहोंचते केल्याची बातमी मला कळली. पण त्या ठिकाणींहि ते सुरक्षित राहतील असें मला वाटत नाहीं. आज किती तरी पलटणी फितुर झाल्या

आणि यापुढेंहि आणखी बऱ्याच होण्याचा संभव आहे. हे लोक किल्ला हस्तगत केल्याखेरीज राहणार नाहींत असें मला वाटतें. कांहींहि होवो ! मी तुम्हाला अगोदरच सावध करून ठेवतों. मी आजच दिल्लीस जाणार आहें. "

मी:--या भयंकर प्रसंगीं तुम्ही येथें असता तर बरें होतें. निदान रोजच्या दृष्टीनें तुम्ही येथें राहण्याची आवश्यकता आहे. तात्या येथें राहिल्यानें माझ्या कामांत फार घोटाळा होतो; म्हणून मला येथें रहातां नाहीं. तथापि दिल्लीहून झांशीला जातांना मी आपली अवश्य भेट घेईन. त्याचप्रमाणें रोजचा तपास करण्याच्या कामींहि मजकडून हयगय होणार नाहीं. माझ्या माणसाला तिचा शोध लागला तर मग मी तुम्हाला त्यासंबंधीं योग्य वेळीं बातमी देईनच. यानंतर मी तात्यांशी कांहीं बोललों नाहीं आणि तोहि तावडतोब निघून गेला.

तात्या ज्याअर्थीं येथून जाणार आहेत त्या अर्थी तो मैनेला तिच्या निष्ठुर बापाजवळ ठेवणार नाहीं असा विचार माझे मनांत आला आणि तो आतां तिला घेऊन जाण्यासाठीं बहुधा तिच्या निवासस्थानाकडे जाईल तेव्हां यावेळीं आपण त्याचे मागें गेलों तर आपणाला तें ठिकाण दिसणें शक्य आहे, याहि गोष्टी माझे मनांत याच वेळीं उभ्या राहिल्या. मानाचें निवासस्थान सांपडल्यावर रोजचा शोध लागावयाला अडचण पडणार नाहीं असें मला वाटलें. तात्याच्या एकंदर वागणुकीवरून तो मानासंबंधीं कोणत्याहि प्रकारची हकीकत मला कळवावयाला नाखुष आहे हें स्पष्ट दिसून येत होतें. असो. तात्याच्या पाळतीवर राहण्याचा माझा निश्चय अखेर कायम झाला. त्या रात्रीं मीं मुळींच घरीं गेलों नाहीं. मजबरोबरच्या स्वारांना लांबून लांबून येण्याची सूचना करून मीं तात्याचा पाठलाग चालविला. या वेळीं मीं आपला लष्करी वेष टाकून अगदीं सामान्य नागरिकाचा वेष घेतला होता. सरदार रामपालसिंह आपला पाठलाग करीत असेल ही गोष्ट तात्याच्या स्वप्नांतही येणें शक्य नव्हतें. त्याला फसविण्याची माझी इच्छा नव्हती; पण कर्तव्याकडे लक्ष्य देऊन असें करणें भाग पडलें.

सारखा घंटाभर मी तात्याच्या मागून मागून चाललों होतों. तो

अगदींच लगबगीनें जात होता. तसेंच त्यानें रस्त्यांत कोठें विश्रांती घेतली नाहीं किंवा मागें वळूनही पाहिलें नाहीं. शहरची हद्द संपल्यावर तो एका जंगलांत घुसला. मींही त्याच्या मागेंच गेलों. या जंगलांत एक भला मोठा वाडा होता. त्याच्यांतील दिव्याचा प्रकाश एका खिडकींतून बाहेर पडला होता. तात्या या वाड्यानजीकच्या एका झाडाखालीं उभा राहिला. तो तेथें उभा राहिलेला पाहून हेंच नानाचें गुप्त निवासस्थान असावें हें मीं ओळखलें.

थोड्या वेळानें एक सुंदर बालिका त्या उघडलेल्या खिडकीजवळ येऊन उभी राहिली. ही बालिका कोण असेल बरें ?"

प्रकरण २९ वें.

पुनः शोध.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

" त्या बालिकेला पाहतांच नानानें आपल्याजवळचा कंदील पेटवून तिला कांहीं इशारा केला. मी तात्याच्या पाठीमागें असल्यामुळें तो इशारा कसला होता हें मला कळलें नाहीं; पण मला एवढें मात्र दिसलें कीं, त्याचा इशारा मिळतांच ती बालिका तेथून नाहींशी झाली; आणि थोड्याच वेळानें हातांत एक कंदील घेऊन पुन्हां तेथें परत आली. या कंदिलावर देवनगरी लिपींत पुढीलप्रमाणें मोठीं अक्षरें लिहिलीं होतीं.

" मॅकेअर सध्यां येथें नाहीं. रोज येथें असावी असें वाटतें; पण कोणत्या खोलींत तिला ठेवलें आहे हें मला अजून समजलें नाहीं. मी स्वतःही या ठिकाणीं नजर कैदेंत आहें. बाहेर पडावयास कांहींच उपाय दिसत नाहीं. समोरच्या दरवाजावर कडक पाहरा आहे. आज येथें कसलीशी गुप्त सभा भरणार आहे. "

हा मजकूर वाचून मला अतिशय आनंद झाला आणि रोजचा तपास लागल्याबद्दल मीं ईश्वराचे मनःपूर्वक आभार मानले. यानंतर तात्यानें

पुन्हां कांहीं तिला विचारलें. त्याचें तिजकडून पुढीलप्रमाणें उत्तर मिळालें.

" ठिकाणा ठाऊक आहे. आपण थांबा. मी इतक्यांत येतें. "

ती बालिका लौकरच तेथून निघून गेली. मीं थोडा दूर उभा राहून हा सर्व प्रकार पहात होतों. सुमारें वीस मिनिटांनीं ती बालिका पुन्हा एकदां खिडकीजवळ आली; आणि पुन्हां कोणीकडच्या कोणीकडे अंधेरांत विलीन झाली. त्या उंच माडीवरून अंधाऱ्या रात्रीं खालीं उतरणें किती साहसाचें काम आहे, हें मी जाणून होतों. म्हणून थोड्या वेळानें ती खालीं येतांच तिच्या धैर्याचें मला अतिशय आश्चर्य वाटलें. समोरून माणसांच्या पावलांचा ध्वनि ऐकूं येऊं लागला तसतशी तीच बालिका तात्याकडे येत आहे अशी माझी खात्री होत चालली. मी अगदीं उत्सुकतेनें तिची मार्गप्रतिक्षा करीत होतों. तात्याही तिचीच वाट पहात होता. तो माझ्यापासून सुमारें दहाबारा हात लांब होता.

थोड्या वेळानें एक श्वेत वस्त्र परिधान केलेली आणि केशभार सोडलेली बालिका तात्याजवळ येऊन पोहोंचली. ही दुसरी तिसरी कोणी नसून मैनाच होती. ती तात्याजवळ येऊन दाखल होतांच त्याला म्हणाली, " या निराश्रित आणि भीषण संसारांत आपणच माझें रक्षण कर्ते आहांत. मग आपण मला सोडून कसे जातां ? आपण ज्ञानशिक्षा देण्याचे कामीं माझे गुरु, दुःखाचें वेळीं सांत्वन करणारें बंधु आणि संसारांतील उच्च ध्येयाचा आदर्शही आपण मजपुढें ठेविला एवढेंच नव्हे तर प्रत्येक गोष्टींत माझें आश्रयस्थान आहां. मग आपणच सांगा, कीं, अशा भयंकर प्रसंगीं आपण मला सोडून गेला तर पाठीमागें माझी काय अवस्था होईल ? वाईट लोकांच्या संगतीला लागून माझ्या पित्यानें प्रत्यक्ष आपल्या पत्नीचा म्हणजे माझ्या आईचा त्याग केला. ही गोष्ट आपल्याला ठाऊकच आहे. असें जर आहे तर तो माझाही त्याग करणार नाहीं याला प्रमाण काय ? त्यानें सामर्थ्यवान इंग्रज राजा विरुद्ध बंड उभारलें आहे. अशा प्रसंगीं त्याला देखील तुमच्याखेरीज कोण वांचवूं शकणार ? या सर्व गोष्टी मनांत आणून या आणिबाणीच्या प्रसंगीं आपण आपल्या लाडक्या मैनेला सोडून जाऊं नका, एवढीच तुम्हांला माझी विनंति आहे. "

तात्या सद्गदित कंठानें म्हणाला, " मुली, तुझी ही विनंति मला मान्य करण्याबद्दल फार वाईट वाटतें. मी या वेळीं तुझा निरोप घ्यावयाला आलों आहें. उगी ! शोक करूं नकोस तुला मीं जें शिक्षण दिलें त्याचें चीज करून दाखविण्याचा हाच समय आहे. कर्तव्यपरिपालन आणि धर्माचरण यासाठीं मनुष्याचें जीवन आहे, हें ध्यानांत ठेव. माझा हा उपदेश तूं विसरणार नाहींस आणि माझ्या गमन कार्यालाही आड येणार नाहींस अशी मला आशा आहे. तुझ्या पित्याला जी दुष्ट बुद्धि झाली, त्याबद्दल मला अतिशय वाईट वाटतें. चल. माझी त्याची भेट करून दे. मी त्यांना पुन्हां एक वेळ ह्या कार्यापासून पराङ्मुख होण्याविषयीं विनंति करून पहातों. जर माझ्या हातून त्याची थोडी-बहुत सेवा झाली असेल तर त्याबद्दल हेंच बक्षिस मला द्या म्हणून मी त्यांना भीक मागतों."

मैना—आपल्या पवित्र कर्तव्यापासून आपल्याला पराङ्मुख करण्याची माझी इच्छा नाहीं; पण अशा भयंकर स्थितींत आम्हांला सोडून जाऊं नका, एवढीच पुन्हां आपल्याला माझी विनंति आहे. चला. आपण पुन्हां एक वेळ त्यांना विनंति करून पहा. त्यांच्या गुप्त मसलतीचें गुप्त ठिकाणही आपणास दाखवितें.

तात्या—"पण माझी ही त्यांना अखेरची विनंति आहे. ही जर त्यांनीं मान्य केली नाहीं तर त्यांना यापुढें मजकडून कोणतेंच साह्य मिळावयाचें नाहीं. यापुढें मी पौर्णिमेला येथें येईन आणि त्याच दिवशीं झांशीला रवाना होईन. राणी लक्ष्मीबाईचें पत्र मला आलें आहे. तुला जर तिकडे यावयाचें असेल तर तूंही आपली तयारी असूं दे. "

यानंतर तीं उभयतां पश्चिमेकडे जाऊं लागलीं. मीहि त्या घराकडे हळुहळू येऊं लागलों. मैना ज्या खिडकींतून उतरली होती ती मजबूत आहे अशी खात्री करून घेतल्यावर मी आपल्या सोबत्यांना बोलावून आणण्यसाठीं पुन्हां जंगलाच्या बाजूला आलों. ते सर्वजण एका झाडाखालीं उभे होते. त्यांच्यापैकीं एकजणाला बाहेरची देखरेख पहाण्यासाठीं तेथेंच उभें रहाण्याचें सांगून बाकीच्या सर्वांना मीं आपल्याबरोबर घेतलें आणि पुन्हां त्या वाड्याकडे निघालों.

केवळ रोजला सोडविण्याच्याच उद्देशानें मी त्या वाड्यांत शिरत होतों. बंडखोरांची संख्या दिवसानुदिवस वाढत असल्यामुळें आज जर तिची मुक्तता केली नाहीं तर तिचा प्राण वाचणें अशक्य आहे असें मला अगदीं पक्केपणीं वाटत होतें. कारण बंडाची आग भलतीच भडकल्यावर किल्ल्यांतून बाहेर पडण्याची आमची प्राज्ञा नव्हती. हें कसेंहि असो; पण ईश्वराचें नांव घेऊन तें कार्य करावयास मी प्रवृत्त झालों.

आम्ही सर्वजण त्या खिडकीच्या खालीं जाऊन उभें राहिलों; पण दारावर किती इसम पहारा करीत आहेत हें पहाण्यासाठीं मी तिकडे निघून गेलों. प्रसंग आलाच तर कापाकापी करावयास तयार राहिलें पाहिजे, हें मीं माझ्या साथीदारांना अगोदरच सांगून ठेविलें होतें. त्याचप्रमाणें रोज तेथें असली तर तिला तेथून कसें बाहेर काढावयाचें, घरांतील माणसें सावध झालीं तर त्यांची कशी वाट लावावयाची वगैरे गोष्टी मीं त्यांना समजावून सांगितल्या. सर्वजण तयार झाल्यावर मी चौघांजणांना खालीं ठेवून बाकीच्या मंडळीसह त्या दोरीच्या शिडीनें वरच्या माडीवर गेलों. कांहीं कमजास्त दिसलें तर आम्हांला सावध करण्याबद्दल मीं खालच्या मंडळीस सुचविलें होतें. आम्ही प्रथम ज्या खोलींत गेलों, तेथें चार पांच दिवे जळत होते; पण माणसें कोणीच नव्हतीं. मी तेथून हळूंच बाहेर पडलों आणि समोरच्या खोलींत गेलों आणि शिट्टी फुंकली. त्याबरोबर माझ्या बरोबरचे चाळीस जवान तेथें येऊन दाखल झाले."

प्रकरण २६ वें.

रोजची मुक्तता.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

"मैना येईपर्यंत मी त्याच खोलींत बसून राहिलों होतों. सुमारें अर्धा एक घंटा लोटल्यावर मला मनुष्याची चाहूल ऐकूं आली. त्या वेळीं तीच आली असावी असें मला वाटलें आणि इतक्या शिपायांना पाहून

ती कदाचित भिईल ह्मणून माझ्या सर्व साथीदारांना बाहेर जाण्यास सांगितलें. तें सर्वजण कोणत्याहि प्रकारची गडबड न करतां तेथून हळूच बाहेर पडले. थोड्याच वेळानें मैना त्या खोलींत येऊन दाखल झाली. इतक्या घनघोर रात्रीं मला आपल्या खोलींत पाहून ती थोडी दचकली, पण दुसऱ्या क्षणीं तिचें सुंदर मुखकमल पाहिल्यापेक्षांहि सुंदर दिसूं लागलें. मीं म्हटलें, " मैना, एक वेळ अंधाऱ्या रात्रीं तुला जंगलांत पाहून मी थोडा घाबरलों. तशीच आज तुझी स्थिति झाली असेल ! अशा भलत्या वेळीं माझें येथें आगमन झालेलें पाहून तुला आश्चर्य वाटलें हें साहजिक आहे; पण आज मी येथें कांहीं विशेष कारणासाठीं आलों आहें. माझ्या या अनपेक्षित आगमनानें तुला कांहीं त्रास झाला असेल तर मला क्षमा कर. त्या दिवशीं तूं मला सहाय्य मागितलें होतेंस. आज मी आपण होऊनच द्यावयला आलों आहें. शिवाय— "

पण मला पुढें बोलूं न देतां ती मध्येंच ह्मणाली, " आपल्याला आतां अधिक बोलण्याची आवश्यकता नाहीं. तुमचें काम मीं ओळखलें. रोज इथेंच आहे आणि वाटेल तें करून तिची आज मुक्तता करीन अशी मीं तात्याजवळ प्रतिज्ञा केली आहें. आपण येथें आलां हें फार छान झालें. यामुळें हें काम किती जरी कठिण असलें तरी तें पार पाडावयास माझ्या अंगांत एक प्रकारचा उत्साह आला आहे. इतकेंच नव्हे तर हें आतां सफळ झालेंच पाहिजे असें मला वाटूं लागलें आहे. "

तिचें हें उत्साहजनक भाषण ऐकून मीं म्हटलें " मैना, मी एकटाच आज येथें आलों नाहीं. मजबरोबर आणखी चाळीस जवान आहेत. आणि प्राण गेला तरी हरकत नाहीं; पण आज या कैदखान्यांतून रोजला मुक्त करावयाचीच असा आमचा सर्वांचा निश्चय आहे ! तें पहा ती सर्व मंडळी बाहेरच्या पडवींत उभी आहे. ती कोठें आहे याचा शोध करून तें नक्की ठिकाण कळवशील तर हें काम सुलभपणानें होऊन जाईल. "

मैनाः—मी इतक्यांत शोध करून येतें; पण माझ्या खोलीच्या दारांत दोन शिपाई पहारा करीत आहेत. ही मोठी अडचण माझ्या मार्गांत आहे. मला खोलीच्या बाहेर मुळींच निघूं देऊं नका असा माझ्या पित्याचा सक्त हुकूम आहे. ह्मणून म्हणतें कीं, हें प्रकरण जर त्यांच्या

लक्ष्यांत आलें तर सगळेंच काम फिसकटावयाचें. इतकेंच नव्हें तर माझ्या जिवावर बेतावयाची !

मी:—तूं या गोष्टीची फिकीर करूं नकोस. त्या लोकांची मी अगादेर व्यवस्था करतों. हे कोठें पहारा करीत आहेत तें ठिकाण मला एकदां दाखीव म्हणजे झालें.

मैनाः—त्या दोघांपैकीं एक पुरुष आणि एक स्त्री आहे. ही स्त्री माझी मोलकरीण आहे. त्यामुळें तिला वश करणें कठिण जाणार नाहीं; पण तिचा साथीदार जो आहे त्याची मात्र तशी गोष्ट नव्हे, तो फारच हुशार असून माझ्या बापाचा एक जुना इमानी सेवक आहे. त्याचें मन वळवणें अशक्य आहे. पहा काय होतें तें मीं तुह्माला तो दाखवून देतें. चला माझ्याबरोबर.

मी मैनाबरोबर त्या खोलीच्या बाहेर पडलों माझ्या बरोबरच्या चाळीस वीरांना पाहून ती अगदीं आश्चर्यचकित झाली. इतकेंच नव्हे तर ती मजकडे संशयानें पाहूं लागली. मीं तिचा भाव ओळखून तिला म्हटलें " इतकीं माणसें पाहून मी तुझ्या पित्याला पकडावयाला आलों आहें असा तुला संशय आला वाटतें. मैना ! ही गोष्ट माझ्या हातून मुळींच घडावयाची नाहींत. हें ध्यानांत ठेव. या बाबतींत मी तात्याला वचन देऊन चुकलों आहे. मीं केवळ रोजला सोडवावें याच हेतूनें येथें आलों आहें. तूं कसलाच संशय मनांत आणूं नकोस. "

माझ्या या भाषणानें मैनाचें समाधान झालें. तिनें मला तावडतोब दुसऱ्या एका खोलींत नेलें आणि म्हटलें " येथेंच ते पहारेवाले असतात. घरांत पलीकडे जावयाचें असलें तर त्याच्या समोरूनच जावें लागतें. "

यानंतर मी कांहीं न बोलतां परत पहिल्या ठिकाणीं आलों आणि मजजवळच्या दोघां जवानांना घेऊन पुन्हां तिकडे गेलों. लांबूनच आह्मांला त्या पहारेवाल्यांचें भाषण ऐकूं येऊं लागलें ! त्या खोलींतही एक दिवा जळत असून बाहेर त्याचा स्पष्ट प्रकाश पडला होता. पहारेवाल्यांची दुकल महाराष्ट्रीय होती.

मीं त्यांना एकदम पकडावयाचेंच ठरावेिलें असल्यामुळें मजबरोबरच्या दोघां जवानांना मी एका बाजूस छपून बसावयाचें सांगून मी जरा पुढें

गेलों आणि खांकरलों. त्याबरोबर पुरुष पहारेवाला एकदम खोलीच्या बाहेर आला आणि कोण आहे ह्मणून विचारूं लागला! पण तो बाहेर पडल्याबरोबर छपून बसलेले माझे साथीदार पुढें आले आणि त्यांनीं त्याच्या तोंडावर एक कपडा टाकून त्यांनीं तो इतक्या जोरानें आवळला कीं, पुढें त्याच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाहीं! यानंतर मी एका हातांत पिस्तुल आणि दुसऱ्या हातांत नंगी तरवार घेऊन त्याच्या साथीदारिणीजवळ गेलों. मला पाहतांच ती भिऊन मोठ्यानें ओरडणार तोंच हातांतला पिस्तुल तिच्या मस्तकावर रोखून तिला म्हटलें " चूप रहा! एक शब्दही तोंडावाटें काढशील तर या पिस्तुलानें तुझें टाळकेंच फोडून टाकीन. मी विचारतों त्या प्रश्नांचीं खरी खरीं उत्तरें दे. लबाड बोलशील तर खबरदार! तुला माझ्या हातून जिवंत सुटावयाचें असेल तर त्याला हाच एक उपाय आहे. "

ती लटलट कांपत ह्मणाली, " मी सगळें खरें सांगतें पण मला मारूं नका. मी तुमच्या पायां पडतें. "

मीः—आज येथें कोण कोण आलें होतें?

तीः—नानासाहेब, एक मुसलमान, आणि तीन चार साहेबलोक!

मीः—त्यांच्याखेरीज कोणी नाहीं?

तीः—कोणी नाहीं!

ती खोटें सांगत आहे हें मीं ओळखलें. त्यांनीं आपल्याबरोबर रोजलाही तेथें आणलें होतें हें स्वतः मैनानें आपल्या डोळ्यांनीं पाहिलें होतें. यानंतर मी त्या मोलकरणीला एक ठुस्सा लगावला आणि म्हटलें " तूं अगदीं खोटें सांगतेस! त्यांच्याबरोबर एक इंग्रज स्त्रीही नव्हती? अजून तरी खरें सांग. नाहींतर तुझें डोकें उडवीन बघ. " आतां मात्र ती पूर्णपणें ताब्यांत आली आणि गयावया करून ह्मणाली " नका मारूं! मी आतां खरें खरेंच सांगतें. त्यांच्याबरोबर एक इंग्रज स्त्रीही आली होती."

मीः—मग तूं हें अगोदर कां सांगितलें नाहींस?

तीः—तिच्या बाबतींत कोणाजवळही कांहीं बोलावयाचें नाहीं अशी नानासाहेबांचीं सक्त ताकीद असल्यानें मीं हें आपणास सांगितलें नाहीं.

त्या पोरीला त्यांनीं या वाड्यांतच कोंडून ठेविलें आहे. तिचा आपला कांहीं संबंध आहे काय ?

मीः—ती माझे एका स्नेह्याची मुलगी असून तिला सोडविण्यासाठीं मी आज येथें आलों आहे समजलीस ! त्या कामीं तूं आह्मांस सहाय करतेस. बोल !

तीः—काय सहाय्य करणार बरें ? तिला ज्या खोलींत कोंडलें आहे तिची किल्ली नानासाहेबांजवळ आहे. ती जर मजजवळ असती तर एव्हांना मीं तिला तुमच्यापुढें आणून उभें केलें असतें. त्यांच्याजवळचा किल्ल्याचा झुपका जर तुम्ही आणाल तर मी अजून हें काम करतें; पण त्यांना हें कळल्यावर माझी स्थिति काय होईल ? ते मला जिवानिशीं मारतील ?

मी—त्याची फिकीर तूं करूं नकोस. तूं सुरक्षित राहशील अशी व्यवस्था मी करतों. बरें तर मी मैनाकडून किल्ल्याचा झुपका आणवितों.

यानंतर तिला मी आपल्या जवानाच्या स्वाधीन करून मैनाकडे गेलों. घडलेली सर्व हकीकत तिला सांगितली. पांच दहा मिनिटांच्या आंत मैनानें किल्ल्यांचा झुपका आणला आणि माझ्या स्वाधीन केला, मीं आपल्याबरोबर आणखी चार जवान घेतले; पण त्यांना पूर्वीच्या जवानाजवळ बसवून मजकडून इशारा मिळतांच धांवत येण्याचें सांगितलें.

मोलकरणीबरोबर फक्त मी आणि मैना रोजच्या खोलीकडे गेलों. तिकडे जाण्याकरतां आम्हांला खालच्या मजल्यावर यावें लागलें. मोलकरणीला मीं आपल्यापुढें चालविली होती. " जर कांहीं लबाडी करण्याचें मनांत आणलेंस तर जागच्याजागीं तुला ठार करीन अशी ताकीद निघतांनाच मीं तिला केली होती.

खालच्या मजल्यावरील कित्येक खोल्या, दालनें आणि पडव्या ओलांडल्यावर आम्ही एका अंधार कोठडींत शिरलों. आंत शिरण्यापूर्वीच मी आपला विजेचा कंदील पेटविला. ही खोली पहातांच ती बऱ्याच वर्षांपासून मोकळी असावीसें वाटलें. तेथें अतिशय दुर्गंध येत होता; पण आम्हांला तिच्याही पलीकडच्या दुसऱ्या एका लहान खोलींत जावें लागलें. ही तर पहिल्यापेक्षांही घाणेरडी होती. येथें मनुष्य दोन घंटे

देखील जिवंत राहणें शक्य नव्हतें; पण रोजला हिच्याही पलीकडच्या तिसऱ्याच एका खोलींत कोंडून ठेवल्याचें मोलकरणीनें आम्हांला सांगितलें. या वेळीं माझे अंगावर कांटा उभा राहिला, खरोखर अशा ठिकाणीं एखाद्याला ठेवण्यापेक्षां ठार केलेलें बरें! मैना जवळच्या किल्याचा झुपका घेऊन मीं ती पलीकडची तिसरी खोली उघडली. तेथें एक दिवा जळत होता. आंत एक मेज असून त्यावर कांहीं खाण्यापिण्याच्या वस्तु ठेवल्या होत्या, आणि गरीब बिचारी रोज एका पलंगावर पडली होती. ती या वेळीं संसारांतील सर्व दुःखें विसरून परम शांतिदायक निद्रादेवीच्या आधीन झाली होती, मैनानें तिच्याजवळ जाऊन तिला उठविलें. मजकडे तिची नजर जातांच ती मोठमोठ्यानें रडूं लागली! हाय! त्या विधिदुःखि बालिकेचें रोदन ऐकून पाषाणाला देखील पाझर फुटला असता.

कांहीं वेळानें मैना तिचा हात धरून तिला अस्खलित इंग्रजी भाषेंत म्हणाली, "हे दुर्दैवी भगिनी, मी एक तुजसारखीच चिरदुःखिनी आहें! आजपर्यंत तुजप्रमाणेंच मजवरही दुःखाचे अनेक प्रसंग कोसळले आहेत. म्हणून तुझें दुःख पाहून मला आपलें रडूं आवरणें अशक्य होत असल्यास त्याचें आश्चर्य वाटूं देऊं नकोस. जगांत सुख असावें असें प्रत्येक माणसास वाटतें; पण देवाची इच्छा जर तशी नसेल तर दुर्बळ मनुष्य काय करणार? ही गोष्ट कांहीं कोणाच्या स्वाधीन नाहीं. यासाठीं अशा **प्रसंगीं धैर्य राखणें** हेंच आपलें कर्तव्य होय. एका थोर महात्म्यांनीं मला हा मला मंत्र शिकविला आणि त्याच्याच बळावर मला थोडीबहुत शांतता लाभली आहे. सध्यां आपण सुरक्षित नाहींत. या कारणानें मला तुझ्याशीं विशेष बोलतां येत नाहीं. तथापि मी तुझी एकसख्खी बहिणच आहे असें समज आणि आजपासून याच नात्यानें मजकडे पहात जा. एवढें तुला मी शेवटचें सांगतें. चल ऊठ. तुला सोडविण्यासाठींच सरदार रामपाल आले आहेत. आतां आपण बाहेर जाऊं. वाटेल तें होवो; पण तुझी आज मुक्तता करावयाची अशी मीं प्रतिज्ञा केली आहे."

मैनाचें भाषण ऐकून रोज उठून उभी राहिली; पण पुन्हां डोक्याला

त्या पोरीला त्यांनीं या वाड्यांतच कोंडून ठेविलें आहे. तिचा आपला कांहीं संबंध आहे काय ?

मीः—ती माझे एका स्नेह्याची मुलगी असून तिला सोडविण्यासाठीं मी आज येथें आलों आहे समजलीस ! त्या कामीं तूं आह्मांस सहाय करतेस. बोल !

तीः—काय सहाय्य करणार बरें ? तिला ज्या खोलींत कोंडलें आहे तिची किल्ली नानासाहेबांजवळ आहे. ती जर मजजवळ असती तर एव्हांना मीं तिला तुमच्यापुढें आणून उभें केलें असतें. त्यांच्याजवळचा किल्ल्याचा झुपका जर तुम्ही आणाल तर मी अजून हें काम करतें; पण त्यांना हें कळल्यावर माझी स्थिति काय होईल ? ते मला जिवानिशीं मारतील ?

मी—त्याची फिकीर तूं करूं नकोस. तूं सुरक्षित राहशील अशी व्यवस्था मी करतों. बरें तर मी मैनाकडून किल्ल्याचा झुपका आणवितों.

यानंतर तिला मी आपल्या जवानाच्या स्वाधीन करून मैनाकडे गेलों. घडलेली सर्व हकीकत तिला सांगितली. पांच दहा मिनिटांच्या आंत मैनानें किल्ल्यांचा झुपका आणला आणि माझ्या स्वाधीन केला, मीं आपल्याबरोबर आणखी चार जवान घेतले; पण त्यांना पूर्वीच्या जवानाजवळ बसवून मजकडून इशारा मिळतांच धांवत येण्याचें सांगितलें.

मोलकरणीबरोबर फक्त मी आणि मैना रोजच्या खोलीकडे गेलों. तिकडे जाण्याकरतां आम्हांला खालच्या मजल्यावर यावें लागलें. मोलकरणीला मीं आपल्यापुढें चालविली होती. "जर कांहीं लबाडी करण्याचें मनांत आणलेंस तर जागच्याजागीं तुला ठार करीन अशी ताकीद निघतांनाच मीं तिला केली होती.

खालच्या मजल्यावरील कित्येक खोल्या, दालनें आणि पडव्या ओलांडल्यावर आम्ही एका अंधार कोठडींत शिरलों. आंत शिरण्यापूर्वीच मी आपला विजेचा कंदील पेटविला. ही खोली पहातांच ती बऱ्याच वर्षांपासून मोकळी असावीसें वाटलें. तेथें अतिशय दुर्गंध येत होता; पण आम्हांला तिच्याही पलीकडच्या दुसऱ्या एका लहान खोलींत जावें लागलें. ही तर पहिल्यापेक्षांही घाणेरडी होती. येथें मनुष्य दोन घंटे

देखील जिवंत राहणें शक्य नव्हतें; पण रोजला हिच्याही पलीकडच्या तिसऱ्याच एका खोलींत कोंडून ठेवल्याचें मोलकरणीनें आम्हांला सांगितलें. या वेळीं माझे अंगावर कांटा उभा राहिला, खरोखर अशा ठिकाणीं एखाद्याला ठेवण्यापेक्षां ठार केलेलें बरें! मैना जवळचा किल्याचा झुपका घेऊन मीं ती पलीकडची तिसरी खोली उघडली. तेथें एक दिवा जळत होता. आंत एक मेज असून त्यावर कांहीं खाण्या-पिण्याच्या वस्तु ठेवल्या होत्या, आणि गरीब बिचारी रोज एका पलंगावर पडली होती. ती या वेळीं संसारांतील सर्व दुःखें विसरून परम शांतिदायक निद्रादेवीच्या आधीन झाली होती, मैनानें तिच्याजवळ जाऊन तिला उठविलें. मजकडे तिची नजर जातांच ती मोठमोठ्यानें रडूं लागली! हाय! त्या विधिदुःखि बालिकेचें रोदन ऐकून पाषाणाला देखील पाझर फुटला असता.

कांहीं वेळानें मैना तिचा हात धरून तिला अस्खलित इंग्रजी भाषेंत म्हणाली, "हे दुर्दैवी भगिनी, मी एक तुजसारखीच विरदुःखिनी आहें! आजपर्यंत तुजप्रमाणेंच मजवरही दुःखाचे अनेक प्रसंग कोसळले आहेत. म्हणून तुझें दुःख पाहून मला आपलें रडूं आवरणें अशक्य होत असल्यास त्याचें आश्चर्य वाटूं देऊं नकोस. जगांत सुख असावें असें प्रत्येक माणसास वाटतें; पण देवाची इच्छा जर तशी नसेल तर दुर्बळ मनुष्य काय करणार? ही गोष्ट कांहीं कोणाच्या स्वाधीन नाहीं. यासाठीं अशा प्रसंगीं **धैर्य राखणें** हेंच आपलें कर्तव्य होय. एका थोर महात्म्यांनीं मला हा मला मंत्र शिकविला आणि त्याच्याच बळावर मला थोडी-बहुत शांतता लाभली आहे. सध्यां आपण सुरक्षित नाहींत. या कारणानें मला तुझ्याशीं विशेष बोलतां येत नाहीं. तथापि मी तुझी एक-सख्खी बहिणच आहे असें समज आणि आजपासून याच नात्यानें मजकडे पहात जा. एवढें तुला मी शेवटचें सांगतें. चल ऊठ. तुला सोडविण्यासाठींच सरदार रामपाल आले आहेत. आतां आपण बाहेर जाऊं. वाटेल तें होवो; पण तुझी आज मुक्तता करावयाची अशी मीं प्रतिज्ञा केली आहे."

मैनाचें भाषण ऐकून रोज उठून उभी राहिली; पण पुन्हां डोक्याला

हात लावून खालीं बसली. हा प्रकार पाहून ती फारच अशक्त बनली असावी असें मीं ओळखलें. तथापि अशा स्थितींत तिला असल्या घाणे-रड्या ठिकाणीं फार वेळ राहूं देणें मला बरें वाटलें नाहीं म्हणून मीं तिला म्हटलें, “ रोज उठ ! आपणास येथून लवकर गेले पाहिजे. नाहीं तर शत्रु सावध होऊन पुनः आपणास पकडील. इतकेंच नव्हे तर मग आपला जीव वांचविणें मुष्किल होईल. ”

माझें हें भाषण ऐकून तिनें हातरुमालानें डोळे पुसले आणि मला म्हटलें, “ सरदारसाहेब, आपण मला वडिलाप्रमाणें आहां. इतकेंच नव्हे तर त्याच्यापेक्षांहि आपण माझ्या संरक्षणाची काळजी घेत आहां हे आपले उपकार ह्या जन्मीं तरी फिटावयाचे नाहींत. ईश्वर मजसारखें दुःख दुसरे कोणालाच न देवो. येथून निघण्यापूर्वीं आपणास एक प्रश्न मला विचारावासा वाटतो; पण त्याचें स्मरण झाल्याबरोबर मला रडूं येते. त्याचें उत्तर काय मिळेल तें एक ईश्वरालाच ठाऊक.”

एवढें बोलून ती गप्प बसली मीं तिला अत्यंत उतावीळपणानें म्हटलें, “ रोज, तुला जें कांहीं विचारावयाचें असेल तें लौकर विचार. कारण प्रस्तुतचा एकेक क्षण म्हणजे सोन्याप्रमाणें आहे. ”

रोज अगदीं निराशेनें म्हणाली, “ माझ्या नशिबांत काय लिहिलें आहे कोण जाणें. येथून माझी सुटका होते कीं, येथेंच माझा अंत होतो हें एक ईश्वरालाच ठाऊक ! सांगा तर स्टिफन जिवंत आहेना ? तिच्या दुःखाचें मर्म आतां माझ्या लक्ष्यांत आलें. त्याचा अंत झाला असावा अशाच समजुतीनें तिला स्वतःचें जीवित अगदीं असह्य वाटूं लागलें होतें. मीं तिला म्हटलें “ स्टिफन अजून ईश्वरकृपेनें जिवंत आहेत. मी वेळेवर पोहोंचलों म्हणूनच त्याचा जीव वांचला. ते सध्यां किल्ल्यांत आहेत. तुझे वडीलहि तेथेंच आहेत. आणखी त्या दोघांचीहि शुश्रूषांची उत्तम प्रकारें व्यवस्था केली आहे. “ माझें हें भाषण ऐकून तिनें एक दीर्घ निश्वास सोडला; आणि ईश्वराचे आभार मानीत मानीत ती मजबरोबर खोलीच्या बाहेर पडली. येथून आम्ही सर्वजण मैनाचे खोलींत गेलों. मैनानें प्रथम रोजच्या जेवणाची व्यवस्था केली. तिनें कोणीकडून बाहेर जावें याबद्दल बरीच चर्चा झाली. कारण उपासमार

आणि काळजी यांमुळें ती अगदीं क्षीण बनली होती. अशा स्थितींत तिला दोरीच्या शिडीवरून खालीं उतरणें शक्यच नव्हतें. थोडा वेळ विचार केल्यावर मला एक युक्ति सुचली. आरंभीं मीं आपणाबरोबरच्या सर्व जवानांना त्या शिडीवरून खालीं उतरण्याचें सांगितलें. त्याप्रमाणें ते खालीं उतरतांच मीं त्यांना सडकेवर उभे राहण्याचा हुकूम केला. यानंतर मीं रोजच्या खोलीबाहेरील पहारेकऱ्यांचे आणि मोलकरणीचे हातपाय बांधून टाकण्याची व्यवस्था केली. नानाच्या रागापासून त्यांचा बचाव व्हावा म्हणून मीं ही युक्ति काढली. त्यांचे हातपाय त्यांच्या अंगावरच्या कपड्यानेंच बांधलें. त्यांनाहि या गोष्टीनें समाधान वाटलें असावें असें त्याच्या चर्येवरून दिसलें. निघतेवेळीं मीं त्या दोघांस चांगलीं बक्षिसें दिलीं.

यानंतर मी मैनाचा निरोप घेऊं लागलों. त्यावेळीं ती चकीत होऊन मला म्हणाली, " आपण रोजला घेऊन जाणार तरी कसें ? शिडीवरून तर तिला जातां येत नाहीं. मग काय आपण मुख्य रस्त्यानें जाणार ? पण इतक्या पहारेवाल्यांच्या मधून आपण कसें जाऊं शकाल ? "

मीः—एवढी सामान्य गोष्टहि जर मला करतां आली नाहीं तर मग अतांपर्यंतच्या गुप्त पोलीसच्या धंद्यांत मीं जें आपलें आयुष्य घातलें तें सर्व फुकट घालविल्याप्रमाणें होईल.

एवढें बोलून मी पुनः मैनाच्या मोलकरणीकडे गेलों आणि तिजकडून दारावरच्या मुख्य पहारेवाल्याचें नांव माहित करून घेतलें. या वेळीं मीं तिचे आणि तिच्या जोडीदार पहारेवाल्याचे जुने कपडे घेतले. हे कपडे घेण्यांत माझा एक उद्देश होता. तो मैनाच्या प्रथम लक्षांत आला नाहीं; पण मोलकरणीचें लुगडें रोजला नेसवण्याची तिला विनंति करतांच तिनें सगळें मर्म ओळखलें. वेषाच्या दृष्टीनें रोजला हुबेहुब मोलकरणीप्रमाणें बनवितां आलें; पण तिच्या गौरवर्णाची काय वाट लावावी हा विचार मला त्रास देऊं लागला. तथापि थोडक्याच वेळांत माझें अचाट डोकें याहि कामांत यशस्वी झालें. तिचा वर्णहि मीं अगदीं मोलकरणीप्रमाणें बनविला. रोजला त्या वेषांत पाहून तशा दुःखमय प्रसंगींहि मैनाला आपलें हंसें आवरणें अशक्य झाले. मीहि तिजबरोबर

हसूं लागलों. हें सगळें संपल्यावर मीं मैनाच्या पहारेवाल्यास आणि मोल करणीस खोलींत कोंडून घातलें आणि रोजसह तेथून खालीं उतरलों. मैनाहि आमच्याबरोबर खालीं आली. मीं तिला म्हटलें, " मैनाताई, मी रोजला येथून घेऊन जातों खरा. या बाबतींत तुझ्या पित्याला तुझा सुद्धां संशय येईल त्याची वाट काय ? मला वाटतें त्यापासून तुला पुष्कळ त्रास होईल. अशा प्रसंगीं तुला जर माझी गरज लागली तर तूं मला अवश्य कळव. मी या वेळीं अशा प्रसंगीं सगळीं कामें सोडून तुजकडे धांवत येईन."

मैना—या अभागी मैनेला संकटसमयीं सहाय्य करावयास आपण इतके उत्सुक आहां, हें पाहून मला अतिशय आनंद वाटतो; पण माझी आपणास एकच प्रार्थना आहे, कीं, आपण माझ्या सहवासाला या अथवा नका येऊं, पण माझ्या या पित्याचें मात्र अनिष्ट करूं नका. त्याच्याकडे क्षमादृष्टीनेंच पहा. माझी ही विनंति आपण मान्य कराल अशी मला आशा आहे.

यावर मीं तिला म्हटलें, " तुझ्या पित्याच्या केंसालाहि धक्का लावणार नाहीं. अशी शपथ मी यापूर्वींच तात्याजवळ वाहून चुकलों आहें. तसें जर नसतें तर एवढी धामधुम माजविण्याची तुझ्या पित्याची काय प्राज्ञा होती ?

केव्हांही मला त्या शपथेविरुद्ध जातांच यावयाचें नाहीं. शीख लोक प्राण गेले तरी घेतलेली शपथ मोडीत नाहींत, हें लक्षांत ठेव. मी तुझ्या समोर हेंही सांगतों, कीं, मी तुझ्या पित्याच्या केंसालाही धक्का लावणार नाहीं. "

यानंतर आम्ही उभयतांनीं एकमेकांचा निरोप घेतला; आणि ईश्वराचें नामस्मरण करून हातांत पिस्तुल घेऊन रोजसह मुख्य दरवाजापाशीं येऊन दाखल झालों. रोज मागोमाग होती दार बंद होतें. मीं आंतूनच स्वर पालटून म्हटलें, " गुरुदयाळ, दार उघड पाहूं. आह्मांला बाहेर जावयाचें आहे. "

गुरुदयाळ हंसत ह्मणाला, " नानासाहेबांचा हुकूम घेतला आहे ? "
मीं:-होय.

त्यानें तावडतोब दार उघडलें. मैनाला मी जरा दूर उभें राहण्याची सूचना दिली होती. मैना पलीकडे झाली तोंच दार उघडलें.

मीं चटकन मैनाला पुढें करून बाहेर झालों. समोर पाहरा करणाऱ्या शिपायांची रांगची रांग उभी होती. मी बाहेर पडतांच त्यांना संशय यावयाला संधीच राहूं नये म्हणून मोठ्यानें "धोंडोपंतनानाकी जय." अशी गर्जना केली! व सगळया शिपायांनीं या जयजयकाराचा अनुवाद केला."

थोड्याच वेळानें त्यांच्या कचाट्यांतून आम्ही आमच्या मंडळीस येऊन मिळलों. अंधार इतका भयंकर होता, कीं, नुसता रस्ता दिसावयाला मारामार पडत होती.

आम्ही दोघेहि सुरक्षित आलों हें पाहून आमच्या जवानांनीं गुरु नानकची प्रार्थना केली. रोजचें हृदय आनंदानें भरून गेलें.

यानंतर थोड्याच वेळानें लागलीच आम्ही सर्वजण रोजला घेऊन किल्ल्याकडे रवाना झालों!"

प्रकरण २७ वें.

रोजची दुसरी एक अवस्था.

(ब्रिटिश सर्जन स्टिफनची जबानी.)

"त्या दिवशीं रोजच्या तोंडून जेम्सचें नांव ऐकून आरंभीं मला अतिशय संताप आला; पण याच सुमारास एक तोफेचा गोळा लागून रोजच्या खोलीसमोरची भिंत पडल्यामुळें माझा संताप जागच्या जागीं जिरून मी धांवत धांवत तिच्या खोलींत गेलों. हें संकट नीच मॅकेअरनेंच उत्पन्न केलें असावें असें मला वाटलें. न जाणों हें घर लुटावें असा त्याचा हेतू असावा. माझें हें अनुभवास थोड्या वेळानें आलें. मीं खोलींत शिरतांच रोज मला म्हणाली, "ही काय गडबड आहे?"

मी—बंडखोर शिपाई तुमचें घर लुटावयाला आले आहेत. अशी माझी समजूत आहे." माझें भाषण ऐकतांच जेम्स तिच्या शेजारींच

खुर्चीवर बसला होता. तो म्हणाला, " रोज, तूं याच्या गप्पावर विश्वास ठेवूं नकोस. बंडवालें इकडे येताहेत कशाला ! मी तुला खात्रीनें सांगतों कीं, ते इकडे मुळींच येणार नाहींत. " तो इतकी खात्री कशाच्या आधारावर देत आहे हें मला कळेना. थोडक्याच वेळानें रोज घाबरून उठली आणि माझा हात धरून मला ह्मणाली, " स्टिफन चला ! चला ! पळा ! "

मी तिचा हात धरून बाहेर पडणार तोंच जेम्सनें तिला मजजवळून ओढलें आणि अत्यंत कर्कश स्वरानें म्हटलें, " मीं इथें असतांना हिला घेऊन जाणारा तूं कोण ! हिचा अधिपति मी आहें. माझें म्हणणें हिनें मान्य केलें पाहिजे. "

त्याचें हें उन्मत्तपणाचे भाषण ऐकून माझ्या अंगाची अगदीं आग झाली. याबद्दल त्याचा खरपूस समाचार घेण्यासाठीं मीं पुढें झालों तोंच मागून माझ्या उजव्या खांद्यावर सुरी खुपसली. या मारण्यानें मला भयंकर वेदना होऊं लागल्या. हें नीच काम करणारा नरपिशाच्च कोण आहे, हें पहावें ह्मणून मीं आपली मान मागें वळविली, तों समोर अबदूल ! त्या नीचाच्या हातांत रक्तानें भरलेली ती सुरी अजून तशीच्या तशी कायम होती. यद्यपि झालेल्या जखमेनें माझ्या आंगातील रक्त वाहून मीं अगदीं हीनबल झालों होतों. तरी त्या हरामखोराचा सूड घेण्याची प्रबळ इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. या इच्छेबरोबरच अंगांत कोणीकडून सामर्थ्य आलें होतें तें कळत नाहीं. पण त्याच क्षणांत म्यानांतून तलवार काढून तिचा जोरदार वार मीं त्याच्या मस्तकावर केला. यानंतर त्याचें काय झालें तें मला कळलें नाहीं. कारण अगदीं याच वेळेला अधम जेम्सनें माझ्याही मस्तकावर काठीचा एक सणसणित प्रहार करून मला जमीनदोस्त केलें. त्यानें असा आघात करतांच रोज " अगबाई " ह्मणून मोठ्यानें ओरडली. यापुढें काय झालें तें मला कळलें नाहीं.

थोड्या वेळानें मी शुद्धीवर आलों. त्या वेळीं मला मॅकेअरचे शब्द ऐकूं येऊं लागले आणि तशा स्थितींतच पडल्या पडल्या रोजचें संरक्षण करण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करूं लागलों. याही प्रसंगीं माझ्या

पाठीवर पुन्हां एकदां सुरीचा आघात झाला. हा आघात करणारा मॅकेअरच असावा असें वाटतें. या आघाताबरोबर पुन्हां मी बेशुद्ध झालों. यानंतर सरदार रामपालसिंह आल्यावर मी जरासा भानावर आलों; पण हें भान जवळ जवळ स्वप्नासारखेंच होतें. माझ्या बेशुद्धावस्थेंतच ते मला किल्ल्यावर घेऊन गेले. तेथें मी तशा स्थितींत किती दिवस होतों याची मला कल्पना नव्हती. परंतु मला त्या ठिकाणीं ज्या दिवशीं पुनश्च शुद्धीचा लाभ झाला त्या दिवशीं तेथें एकच दंगल झाली होती आणि चोहोंकडून रोदनाचा ध्वनि कानावर येत होता. त्या वेळीं मी उठून बसण्याचा प्रयत्न करूं लागलों, पण इतक्यांत रोज मजजवळ आली आणि तिनें मला गुपचूप पडून राहण्याविषयीं विनंती केली. तिला तेथें पाहून मी चकित झालों. मला अजून भोंवळ येत असून माझ्या जखमेंतूनही रक्त वाहत होतें. मी निजल्यावर तिनें ती जखम आपल्या नाजूक हातानें हळूच बांधली. यानंतर मीं तिला क्षीणस्वरानें विचारलें." रोज, ही कसली गडबड चालली आहे ? " ती रडत रडत ह्मणाली, " कांहीं नाहीं, सैन्यांत उगीच क्षुल्लक गोष्टीवरून भांडण उपस्थित झालें आहे. "

याच सुमारास एक बंदुकीची गोळी, मी निजलों होतों त्या खोलीच्या भिंतीवर येऊन आदळली आणि तिच्या मागोमागच रामपालसिंह घाबऱ्या घाबऱ्या येऊन म्हणाले, " रोज! रोज! बंडवाल्या पलटणींनीं किल्ल्याला वेढा दिला आहे! आणि त्यांच्या गोळ्यांचा वर्षाव याच खोलीवर होण्याचा सुमार आहे! यासाठीं स्टिफनला येथून दुसरीकडे ने."

रोजः—ठीक आहे; पण जरा हळू बोला. त्यांची झोंप मोडेल. " यानंतर मी पुन्हां बेशुद्ध झालों ! "

प्रकरण २८ वें.

संशयपिशाच्च.

(मिस् रोजची जबानी !)

" आज जूनची सहा तारीख. दिवसभर भयंकर कापाकापी चालली होती. सरदार रामपालसिंहाच्या मदतीनें मीं स्टिफनला किल्ल्याच्या दुसऱ्या एका सुरक्षित जागीं आणून निजविलें. माझे वडीलही याच ठिकाणीं होते. त्यांच्या मानसिक अवस्थेंत अजून लेशमात्रही फरक झाला नव्हता. सरदार रामपालसिंह आज दिवसभर समरभूमीवरच होते; आणि किल्ल्यांत जिकडे तिकडे एकच गोंधळ माजून राहिला होता.

तो सर्व दिवस आम्हीं संशयास्पद अवस्थेंत काढिला. रामपालसिंहांनीं आपल्या एका गुप्त अनुचरास पाठवून सर जॉन लारेन्सच्या सैन्याचें सहाय मागितलें होतें; पण हें सहाय जर लौकर आलें नाहीं तर आमच्या जगण्याची आशा नव्हती ! स्टिफनकरितां माझा जीव प्रत्येक क्षणीं व्याकुळ होत होता ! कारण त्यांना आज भयंकर ज्वर चढला असून ते अगदीं बेहोष झाले होते. सैन्यांतील डॉक्टर त्यांना औषध देत होतें. हे डाक्टर माझें बरचेंवर समाधान करून धीर देत. पण माझ्या मनाला मुळींच चैन वाटत नव्हतें. दोन प्रहरचें सुमारास स्टिफन जरा शुद्धीवर आले; पण सारखें मजकडे टक लावून पाहूं लागले. यामुळें माझ्या मनांत नाहीं नाहीं त्या शंका येऊं लागल्या. आतां मला आपले अश्रु आवरणें अशक्य झालें. मी मनांतल्या मनांत ईश्वराचा धांवा करूं लागलें. अमळशानें मीं त्याला म्हटलें, " तुम्ही मला ओळखतां काय ? "

स्टिफन—होय. तूं रोजच आहेस; पण तूं इकडे कां आलीस ? अजूनही मला फसविण्याचा विचार आहे काय ?

त्याच्या भाषणाचा अर्थ मला कळला नाहीं त्याचें मस्तक बिघडलें असल्यामुळें असें असंबद्ध बोलत असतील असें मला वाटलें. त्यांना औषध द्यावें ह्मणून त्यांच्याजवळ बाटली घेऊन गेलें; पण त्यांनीं औषध घेण्याचें नाकारलें व मला म्हटलें, " तुझें मन आज माझ्याविषयीं शुद्ध

नाहीं, तें अगदीं कपटानें भरलें आहे. भयंकर विश्वासघाताच्या विषानें तें दूषित झालें आहे! माझा आतां तुझ्यावर मुळींच विश्वास राहिला नाहीं. तूं औषध ह्मणून विषसुद्धां पाजावयास मागेंपुढें पाहणार नाहींस, असें मला वाटतें."

त्याचें हें भाषण ऐकून मला किती दुःख झालें असेल याची कल्पनाच करावी. त्या दुःखाच्या भरांत माझ्या औषधाची हातांतली बाटली खालीं पडून तिचे तुकडे तुकडे झाले आणि मीही त्यांच्या बिछान्याजवळ जाऊन रडूं लागलें. मी अशा दुःखांत मग्न आहें तोंच मला कोणीं हाक मारली! मी बाहेर येऊन पाहतें तों जेम्स!

जेम्सला पाहिल्याबरोबर मला त्याची अगदीं किळस आली! तो माझा नातेवाईक असूनही त्यानें माझ्या सर्वस्वाचा घात केला होता किंवा करूं पहात होता. मला वश करून घेण्यासाठींच तो मॅकेअरला मिळाला असावा, अशी त्याच्या त्या वर्तनावरून मला दाट शंका येऊं लागली होती. ते नीच लोक जेव्हां मला घेऊन गेले त्या वेळीं जातां जातां मॅकेअरनें जेम्सशीं कांहीं गुप्त खलबत केलें होतें, हें मीं स्वतः पाहिलें होतें. त्याचप्रमाणें त्यांनीं स्टिफनच्या मस्तकावर लाठी लगावली त्या वेळींही मला असाच संशय आला आणि पुढें कमी न होतां उलट बळावलाच.

मीं जेम्सला म्हटलें " अरे! नीचा! तुझ्यासारख्याचें तोंड पाहणें देखील पाप आहे. मी निराश्रित असलेली पाहून तूं आपली इच्छा पूर्ण करण्यासाठीं मॅकेअरला जाऊन मिळालास काय? पण तुझ्या असल्या कपट कारस्थानानें तुझा हेतू कधींही सिद्धीस जाणार नाहीं. मंगलमय परमात्म्याला हें पाप सहन होणार नाहीं. तो तुझ्या पापाला तुला अवश्य दंड देईल. जोंपर्यंत मी धर्ममार्गांत स्थिर आहें तोंपर्यंत तूं, मॅकेअर किंवा अबदूल यांच्यासारख्या नीचाच्या हातून परमेश्वराच्या आशीर्वादानें आमचें कांहीं नुकसान होणार नाहीं. आतां मला विनाकारण त्रास देऊं नकोस. येथून चालता हो."

एवढें बोलून मी संतापानें तेथून निघून गेलें. नीच जेम्स मजकडे पहात उभा होता. तो अगदीं आश्चर्यचकित होऊन गेल्यासारखा दिसला. या वेळीं किल्ल्याच्या ज्या भागांत मी होतें तेथें कोणीच नव्हतें. सगळे

दुसरीकडे होते. मी मनांतल्या मनांत अतिशय भ्यालें; पण मोठा हिय्या करून मीं त्याला म्हटलें " रस्ता सोडा, नाहींतर विनाकारण स्वतःला त्रास करून घ्याल. तुम्ही मॅकेअरचे गुप्त हेर आहांत हें मी सगळ्या किल्ल्यांतल्या लोकांना ओरडून सांगतें. "

माझी ही धमकी ऐकून तो नीच म्हणाला " ओरडूं नकोस. मी येथून निघून जातों.; तुझ्या फायद्यासाठींच मी केवळ इतके कष्ट भोगून इथें आलों आहें. तुझें जीवन किंवा मरण हें सांप्रत माझ्या शब्दावर अवलंबून आहे. तुला जर माझें म्हणणें कबूल असेल तर तूं जिवंत राहशील, हें नीट लक्ष्यांत ठेव. "

मीः—तुमचें भाषण ऐकावयाची माझी मुळींच इच्छा नाहीं. मग माझ्या नशिबांत जें असेल तें घडेल. तुम्ही आपलें काळें तोंड शक्य तितक्या दूर करा.

पण माझ्या या भाषणाकडे बिलकुल लक्ष्य न देतां तो म्हणाला, " मॅकेअरच्या सैन्यानें सगळा किल्ला वेढला आहे आणि हिंदुस्थानांत जिकडे तिकडे बंडाची आग पेटली आहे. नानाला सहाय्याची बिलकुल कमतरता नाहीं. उलटपक्षीं तुमच्या पक्षानें मात्र कोणत्याही सहायाची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. तुमचा मृत्यु अगदीं कायम नेमला ह्मणून समजा ! तरी पण तुला वांचवावें अशी माझी फार इच्छा आहे. तूं माझें म्हणणें अगदीं निमूटपणें कबूल कर. "

मीः—जारे ! मेल्या ! अशा प्रकारें पापांत जिवंत राहण्यापेक्षा मला मरण्यांतच आनंद वाटेल. व्यर्थ बडबड करून उपयोगी नाहीं. प्रसंग पडल्यास मीच आपल्या हातानें आपली वाट लावीन आणि याबद्दल ईश्वराच्या घरीं जें शासन मिळेल तेंही मी आनंदानें भोगीन; पण तुझ्यासारख्या पाप्याच्या हातांत मुळींच पडणार नाहीं. माझी ही प्रतिज्ञा केव्हांही भंगणार नाहीं हें ध्यानांत ठेव. चल. कर आपलें तोंड काळें ! तो जातां जातां म्हणाला, " ठीक आहे. आणखी कांहीं दिवस वाट पहा म्हणजे तुला काय तें कळून येईल. तुझ्या आजच्या भाषणानें योग्य प्रायश्चित्त दिल्याखेरीज मी कधीं राहणार नाहीं. "

एवढें बोलून तो चालता झाला. यानंतर मी स्टिफनकडे गेलें. ते नुक-

तेच उठून बसण्याचा प्रयत्न करीत होते. मी त्यांच्याजवळ जाऊन उठूं नका ह्मणून विनंति केली. ते मजकडे अगदीं लक्ष्यपूर्वक पाहूं लागले. त्यांच्या सर्वांगावर पांढुरकी आली होती. ते अमळशानें मला म्हणाले, " मला इतक्यांत स्वप्न पडलें कीं, जेम्स येथें येऊन तुला मॅकेअरकडे घेऊन जात आहे. माझी झोंप याचमुळें मोडली. "

"इतक्यांत तुझ्याशीं कोण बोलत होतें ? सरदार रामपालसिंह. "

मी —छे! सरदारसाहेब नव्हते. जेम्सच होता. आपले स्वप्न कांहीं अंशीं खरें आहे.

माझें हें भाषण ऐकतांच स्टिफन एकदम उठून उभे राहिले. त्याची मुद्रा मला एकाद्या वेड्याप्रमाणें दिसली. मी त्याला एकदम धरलें; पण त्यांनीं मला लागलेच जोरानें ढकललें आणि मी लांब कोलमडत गेल्यावर एका खुर्चीवर जाऊन बसले. या खुर्चीसमोर टेबल होतें. त्या वेळच्या त्यांच्या त्या अवस्थेचें स्मरण झालें म्हणजे अजूनहि माझ्या हृदयाचा थरकांप होतो. खुर्चीवर बसल्यानंतर ते दोन्ही हातांनीं डोळे झांकून मला म्हणाले, " हाय ! मीं पाहिलें तें स्वप्न नव्हतें तर ! अगदीं सत्यसृष्टि ! देवा ! देवा ! पिशाचिनी रोजपासून तूं माझें संरक्षण कर. केवढा हा विश्वासघात ! परमेश्वरा, याला तूं साक्षी आहेस आणि तुझेंच न्यायी मत याचा विचार करो."

आतां मला स्टिफनचें भाषण अर्थशून्य अथवा असंबद्ध वाटलें नाहीं. त्यांच्या हृदयांत संशयानें ठाणें दिलें आहे हें मी ओळखलें; पण तो अगदींच खोटा असल्यामुळें मला अतिशय वाईट वाटलें ! चिरसंचित प्रेमाची एका क्षणांत राखरांगोळी झाली ! प्रियतम भगिनी आणि प्रेमळ माता या दोन्हीहि एकामागून एक स्वर्गलोकीं गेल्या. पिताहि वेडा बनला ! अशा स्थितींत स्टिफनचें प्रेम हेंच काय तें माझ्या सुखाचें स्थान होतें; पण तेंहि आतां त्यांच्या संशयामुळें नाहींसें झाले ! मला सगळें जग अंधारमय दिसूं लागलें. माझे डोळे अश्रूंनीं भरून गेले. मीं त्यांच्या पायावर डोकें ठेवून त्यांना म्हटलें, "हृदयेश्वर, माझ्या हातून न कळत जर कांहीं चूक झाली असली तर त्याबद्दल मला क्षमा करा. मी तुह्मांला पदर पसरतें."

पण संशयपिशाच्यानें झपाटलेल्या मला क्षमा केली नाहीं. त्यांनीं मला लाथेनें दूर ढकललें ! त्या वेळीं बाहेर तोफेचे आवाज निघत होते. मीं ईश्वराला म्हटलें, "देवा ! त्यांतला एक गोळा माझ्या दुःखी हृदयावर पडून तें कायमचें चूर होऊं दे."

प्रकरण २९ वें.

नानाचा स्मृतिलोभ आणि मैनावध.

(सर टामस हे यांच्या सरकारी रिपोर्टावरून)

सरदार रामपालसिंहाची तीक्ष्ण बुद्धि आणि चतुरता फारच प्रशंसनीय आहे आणि ते जसें दूरदर्शी तसेंच उत्तम प्रतीचे राजनिष्ठ आहेत. बंडाचा भयंकर वणवा इतक्या लौकर विझवण्यास मी समर्थ झालों. त्याला त्यांचें सहाय्यच पुष्कळ अंशीं कारणीभुत झालें, हें मी येथें मोठ्या अभिमानानें नमूद करतों. खरोखरच या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांचें सहाय्य मला जर नसतें, तर भारतांतील ब्रिटिश साम्राज्यसूर्याचा कदाचित् कायमचाच अस्त झाला असता ! त्यांच्या ठिकाणचें साहस आणि वीरत्व हे सद्गुण खरोखरच अनुकरणीय आहेत. या सर्व गोष्टी लक्षांत आणून ब्रिटिशसरकार त्याचें सदैव ऋणी राहील आणि त्याच्या सेवेबद्दल त्यास योग्य बक्षिस देईल अशी मला आशा आहे.

कानपुरच्या त्या भयंकर कत्तलीनंतर नानाचा आणि तात्याचा अगदीं नायनाट झाला. सरदार रामपालसिंहानीं बरेच प्रयत्न केले; पण त्यांना त्यांची बातमी लागली नाहीं. मॅकेअर आणि अबदुल या दुकलीला कैद करण्याच्या बाबतींत त्यांचे प्रयत्न चालू आहेत. थोड्या दिवसांपूर्वींच स्वतः सरदारसाहेब आपल्या कित्येक साथीदारांना बरोबर घेऊन त्याचा तपास करण्यासाठीं गेले आहेत. परंतु ते अजून परत आले नाहींत किंवा त्यांच्याकडची अजूनहि बातमी कळली नाहीं. विठूर येथें असलेलें नानाचें घर तपासलें. त्यांत थोडाबहुत पैसा सांपडला. आज तोफा डागून तें सबंध घर जमीनदोस्त करून टाकलें.

आम्हीं हें काम करावयास आरंभ केला त्या वेळीं तेथें अवाचित एक देवतातुल्य बालिका प्रकट झाली आणि आमच्या पुढें येऊन उभी राहिली. आश्चर्याची गोष्ट ही, कीं, घराच्या तपासणीच्या वेळीं ही मुलगी कोठेंच दिसली नाहीं. तिनें गच्चीवर उभें राहून तोफा न डाग-ण्याविषयीं मला विनंति केली. तिच्या ह्मणण्याला मान देऊन मीं तें काम तितक्यांत संपाविलें आणि तिचें काय म्हणणें आहे याची चौकशी करूं लागलों. तिजकडे नजर गेल्याबरोबर एकाएकीं पुष्कळ दिवसांची स्मृति झाली. या अप्रतिम रूपवती बालिकेला आपण केव्हां तरी पाहिलें असावें असें मला वाटूं लागलें. तिचें करुणापूर्ण मुखमंडल पाहून मला तिची दया आली आणि तिला काय हवें आहे याची मी तिज-जवळ चौकशी केली. ती माझ्या प्रश्नांचीं उत्तरें इंग्रजींत देऊं लागली. ती शुद्ध आणि अस्खालित इंग्रजी भाषेंत उत्तरें देऊं लागली. तिची शुद्ध आणि अस्खालित इंग्रजी पाहून मी अगदीं आश्चर्य-चकित झालों.

ती—कृपा करून आपण हें घर जसेंच्या तसें राहूं द्याल का ?

मी—कां बरें ? हें कायम असण्यांत तुझा काय फायदा आहे ?

ती:—पण तें पाडण्यांत काय फायदा आहे ?

मी:—बंडखोराचा एक पुढारी या घरांत राहात होता ह्मणून तें पाडण्याविषयीं मला सरकारचा हुकूम झाला आहे.

ती:—प्रत्यक्ष आपल्याविरुद्ध ज्यांनीं शस्त्र उचललें अशांचा नायनाट करणें आपलें कर्तव्य आहे; पण बिचाऱ्या अचेतन घरानें काय केलें ? तुम्ही माझी एवढी विनंती ऐकाच. मला हें स्थान फार प्रिय आहे आणि म्हणूनच तें न पाडण्याविषयीं मी आपल्याला प्रार्थना करतें.

मी:—तुझी ही विनंती मला मान्य करतां येत नाहीं, याबद्दल मला अतिशय खेद होतो. तुझ्या करुण वाणीनें माझें हृदय द्रवलें आहे, तरी कर्तव्यापुढें माझा इलाज नाहीं.

ती:—आपण सेनापति आहांत हें मला ठाऊक आहे. आपल्या लाडक्या कन्येचें–मेरीचें मजजवळ एक पत्र आहे. आज तीन वर्षें झाली. तिनें हें पत्र आपल्याला देण्यासाठीं मजजवळच दिलें होतें. परंतु कांहीं

कारणामुळें मीं अद्यापपर्यंत तें स्वतःजवळ ठेवून घेतलें होतें. तिच्या मृत्यूमुळें आपल्याला अतिशय दुःख झालें हें मी जाणून आहें आणि हें पत्र वाचून आपलें दुःख अधिकच वाढेल, यांतही शंका नाहीं, तथापि कर्तव्य म्हणून मला हें कार्य करणें भाग पडत आहे. मेरीची आणि माझी बालपणापासूनच मैत्री जडली होती. तिचें मजवर अतिशय प्रेम होतें; त्याप्रमाणें आपणही मजवर अतिशय माया करीत होतां. फार काय पण मी मेरीपेक्षांही आपणाला अधिक आहें. या गोष्टीला पुष्कळ दिवस झाले; कदाचित् आपण हें सारें विसरला देखील असाल.

त्या बालिकेचें हें भाषण ऐकून माझी पूर्वस्मृति पुन्हां ताजी झाली आणि सर्व गत गोष्टी आठवावयास लागल्या. माझी प्रिय कन्या मेरी माझ्या डोळ्यापुढें दिसूं लागली; आणि त्याबरोबरच तिची मैत्रीण कोण हें माझ्या लक्षांत आलें. तिची मैत्रीणही सांप्रत मजपुढें उभी असलेली नानाची एकुलती एक कन्या मेरीच होय. नाना त्या वेळीं ब्रिटिश सरकारशी प्रेमानें वागत होता. मेरीला देवाच्या घरीं जाऊन आज सुमारें तीन वर्षें झालीं होतीं. इतक्या दिवसांनंतर तिचें पत्र मला पाहावयास मिळालें. हें कितीहि विलक्षण असलें तरी त्यासाठीं माझें मन अगदीं व्याकूळ होऊन गेलें. मीं त्या रूपवती बालिकेला—मैनेला म्हटले, " मुली तूं कोण आहेस हें मीं आतां ओळखलें. तूं नानाची मुलगी मैना बापाच्या घराचा बचाव व्हावा असें तुला वाटणें साहजिकच आहे; पण मी सरकारचा नौकर असल्यामुळें मला त्यांचा हुकूम मोडतां येत नाही. असो. या बाबतींत मला विशेष बोलतां येत नाहीं. तुजजवळ असलेलें मेरीचें पत्र मला एकदां पाहूं दे. तें पाहण्यासाठीं माझा जीव अगदीं कावरा बावरा झाला आहे. "

मैनानें तें पत्र खालीं टाकून दिलें. त्याच्या हस्ताक्षरावरून तें पत्र मेरीचेंच आहे हें मीं ओळखलें. पुष्कळ दिवसांनीं माझ्या लाडक्या कन्येचें हस्ताक्षर माझ्या डोळ्यापुढें पुन्हां आलेलें पाहून माझा कंठ भरून गेला. त्यांतला सगळा मजकूर येथें नमूद करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. फक्त इतकेंच सांगणें पुरें आहे कीं, संकटप्रसंगीं मैनाला सहाय करावें असें तिनें मला अगदीं कळवळून लिहिलें होतें. या मजकुरानें मी अगदीं

संकटांत पडलों. एकीकडे कर्तव्य ! व दुसरीकडे प्रेम ! या दोन गोष्टींपैकीं कोणती गोष्ट करावी आणि कोणती गोष्ट सोडावी हें मला कळेना. मी अगदीं जडमूढ झालों.

मी घर पाडावयास विलंब लावू लागलों हें पाहून जनरल आउटरॅम मजजवळ आले. त्यांना हें घर बचावतां येईल, कीं, नाहीं हें मीं विचारलें. तेव्हां ते म्हणाले " गव्हर्नर जनरलच्या संमतीखेरीज आपणाला मिळालेल्या हुकूमाविरुद्ध जातां यावयाचें नाहीं. सरकारचा नानावर अत्यंत रोष आहे. अशा स्थितींत त्याचें हें स्मारक राहूं देणें गव्हरनर जनरलला पसंत पडावयाचें नाहीं. "

मी म्हटलें, " लॉर्ड कॅनिंगना याबद्दल तार देऊन त्यांचें काय उत्तर येतें तें पाहूं. त्यांचा अभिप्राय समजून घेणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. "

जनरल आऊटरॅम—आपल्याला असें करावयास हरकत नाहीं; पण नानाच्या मुलीला आपणास मोकळें सोडतां यावयाचें नाहीं.

मीः—त्यांच्याकडून तारेचें उत्तर येईपर्यंत या दोन्ही गोष्टी मी करीत नाहीं. मग जें व्हावयाचें असेल तें होवो. तुह्माला वाटेल तर तुम्ही खुशाल करा.

यानंतर मैनाला ही सगळी हकीगत कळवून मी तेथून निघालों. मी गेल्यावर जनरल आऊटरॅमनें त्या घराला सैन्याचा वेढा देऊन त्याचा मुख्य दरवाजा फोडला आणि मैनाला पकडावें ह्मणून बऱ्याच लोकांसह आंत जाऊन तिचा शोध केला; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांनीं सगळें घर धुंडाळलें; पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, ती त्यांच्या कोठें दृष्टीस पडली नाहीं.

त्या दिवशीं संध्याकाळीं लॉर्ड कॅनिंगकडून पुढीलप्रमाणें तार आली—

" नानासाहेबाचें स्मृतिचिन्ह ह्मणून हिंदुस्थानांत कांहींच राहूं देऊं नये असें विलायतच्या मंत्रिसभेचें मत आहे. तेव्हां मला त्याविरुद्ध जातां येत नाहीं" ही तार पोंचल्यापासून एका घट्याच्या आंतच जनरल आऊटरॅमनें तें घर जमीनदोस्त केलें ! मी घोड्यावर स्वार होऊन लांबूनच तो प्रकार पहात होतों. त्या वेळीं मैनाची मूर्ति मला आठवून माझ्या डोळ्यांत अश्रु आले.

तारीख ६ सप्टेंबर सन १८५७ च्या " टाईम्स " मधील उतारा—

दुष्ट नाना अजूनही पकडला गेला नाहीं! हिंदुस्थानसरकारला या कामांत अजून यश आलें नाहीं. ही अत्यंत संतापजनक गोष्ट आहे. सर्व इंग्रज जातीचें हृदय नानाविषयींच्या संतापानें कढत आहे. आमच्या अंगांत जोंपर्यंत ब्रिटिश रक्त खेळत आहे तोंपर्यंत कानपूर येथें झालेल्या कत्तलीचा सूड उगविल्याखेरीज आम्ही कधींच राहणार नाहीं.त्या दिवशीं हाऊस ऑफ लॉर्डच्या सभेंत सर टॉमस हेच्या रिपोर्टाचा बराच फजिता उडाला! ज्या नानानें आमच्या बायकामुलांची कत्तल करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, त्याच्या घराची आणि त्याच्या मुलीचें संरक्षण करण्यास महाराणीच्या या पुढाऱ्या नौकरानें प्रयत्न करावा ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे. ही गोष्ट खरी आहे किंवा खोटी आहे हें आह्मांला अजून निश्चित कळलें नाहीं. तथापि खरी जर असेल तर जनरल हेवर हा मोठा कलंक आहे. सर्व जन्म युद्धांत घालवून शेवटीं म्हातारपणीं एका स्वमान्य महाराष्ट्रीय मुलीच्या सौंदर्यावर भुलून जाऊन कर्तव्यच्युत होण्याचा प्रसंग त्यांच्यावर यावा हें फारसें प्रशंसनीय नाहीं. आमच्या मतें नानाची एकूण एक संपत्ति मग ती मुली असोत अगर मुलगे असोत, ठार करावी आणि त्याच्या ज्या मुलीवर जनरल हेचें प्रेम बसलें आहे तिला तर त्याच्या समक्ष फांसावर चढवावें!"

तारीख १० सप्टेंबर सन१८५७ च्या दरकगरांत पत्रांमधील उतारा—

सरदार रामपालसिंह हे एक आदर्शभूत गुप्तपोलिस आहेत. त्यांच्या तोडीचा गुप्तपोलिस इकडेच काय पण युरोपांतहि मिळणें मुष्किल. कार्यदक्षता तीक्ष्ण बुद्धि आणि चतुरता या गुणांत त्यांचा हात धरणारा मनुष्य पृथ्वीवर कोणीच सांपडणार नाहीं असें जर म्हटलें तर त्यांत कांहीं अतिशयोक्तीचा दोष पदरीं येईल असें आह्मांस वाटत नाहीं. त्यांच्याच प्रयत्नामुळें बंडाचें स्वरूप झालें त्याहून अधिक भीषण झाले नाहीं. शीखयुद्धांत सरदार रामपालसिंह हे ब्रिटिशसरकारतर्फे हातांत शस्त्र घेऊन समरभूमीवर गेले होते. इतकेंच नव्हे तर त्यांच्याच सहाय्यामुळें त्या लढाईत आमची फत्ते झाली. हाच वीरपुरुष सध्यां मॅकेअर, अबदुल,

नाना वगैरे बंडखोरांच्या तपासांत असून त्यांत तो यशस्वी होईल अशी, आमची खात्री आहे.

आज बरेच दिवस झाले. नानाची एकुलती एक कन्या मैना जनरल आऊटरमनें पकडली असून सध्यां ती कानपुरच्या तुरुंगांत आहे. तिच्या प्रकरणाचा लौकरच निर्णय होईल अशी आशा आहे.

* * * *

(महाराष्ट्रीय इतिहासकार **चिटनीस** यांच्या बखरींतून घेतलेला उतारा)

ता० ३ सप्टेंबर रोजीं दोन प्रहर रात्रीच्या सुमारास एक महाराष्ट्रीय बालिका नानाच्या जमिनदोस्त केलेल्या दगडामातीच्या ढिगावर बसली होती. त्या वेळीं स्वच्छ चांदणें पडलें असून तिनेंहि त्याचप्रमाणें शुभ्र-वस्त्र परिधान केलें होतें. या स्थानापासून जवळच जनरल आऊटरम याचा तळ होता, त्या बालिकेचा रोदनाचा आवाज ऐकून कांहीं सैनिक तिकडे गेले आणि तिला रडण्याचें कारण विचारूं लागले; पण ती कांहींच बोलली नाहीं, सैनिकांनीं परत येऊन ती सगळी हकीगत जनरल आऊटरमला निवेदन केली, त्याबरोबर ते तिकडे गेले, बालिके-वर त्याची नजर जातांच ही नानाची मुलगी मैनाच आहे हें त्यांनीं ओळखलें, आश्चर्याची गोष्ट ही, कीं, मैनाभोंवतीं सैन्याचा गराडा पडला असूनहि ती बिलकुल भ्याली नाहीं, थोड्या वेळानें जनरल आऊ टरमनें तिच्याशीं बोलावयास आरंभ केला. ते म्हणाले, "मैना, सरकारच्या हुकुमावरून तुला कैद करीत आहें."

थोड्या वेळानें त्याच्या तोंडाकडे पाहून मैना ह्मणाली, "मला थोडा वेळ द्या. आज मी येथें पोटभर रडून घेणार आहें."

खेदाची गोष्ट ही, कीं, आऊटरमनें तिची ही शेवटची इच्छा पूर्ण होऊं दिली नाहीं. त्याच क्षणीं तिला कैद करून त्यांनीं तिला कानपुरच्या किल्ल्यांत आणून ठेविलें, किल्ल्यांत प्रवेश होण्यापूर्वीच तिनें एक वेळ वळून आपल्या उद्ध्वस्त पितृभुवनाकडे नजर फेंकली.

* * * *

काल रोजीं कानपूरकिल्ल्यांत एक भयंकर प्रकार घडून आला. नानाची एकुलती एक मुलगी मैना हिला जिवंत जाळलें, धडधडणाऱ्या

अग्नींत ती शांत मूर्ति जळत असतांना शेंकडों लोकांनीं तिला देवता समजून प्रणाम केलें !

मैनाजवळ तात्याचीं कित्येक पत्रें सांपडलीं. त्यांत काय मजकूर दिला होता ते कळलें नाहीं कदाचित मैनाहि बंडखोर लोकांची साथीदारीण असावी असा अधिकाऱ्यांचा समज होऊन त्यांनीं तिला हें भयंकर शासन केलें असावें.

यानंतर दहाच मिनिटांनीं सर टामस हेला लॉर्ड क्यानिंगकडून पुढील आशयाची तार आली:—

" सरदार रामपालसिंहाच्या शिफारसीवरून मैनाला विलायतच्या मंत्रीमंडळाकडून क्षमा मिळाली आहे. तिनें आतां आपल्या इच्छेनुरूप कोठेंहि जावें."

"यापेक्षां पश्चात्तापजनक आणि खेदाची दुसरी कोणती गोष्ट असेल!"

या वेळीं मैनाचा सुंदर पण नश्वर देह भस्म होऊन तिचा आत्मा अनंत शांतींत निलीन झाला होता !

हाय ! सरदार रामपालसिंहाचा सर्व प्रयत्न निष्फळ झाला !

या प्रकारामुळें ब्रिटिश अधिकारी लोकांना काय वाटलें तें कळत नाहीं; पण न्यायी ब्रिटिशसत्तेच्या नेत्रांतून मात्र खात्रीनें अश्रु गळल्याखेरीज राहिले नसतील ! या न्यायी ब्रिटिश सत्तेचा विजय असो !

सर टामस हेलाहि पराकाष्टेचें दुःख झालें. "

प्रकरण ३० वें.

संन्यासी वेशांत अबदुल !

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

" विठूर येथें नानासाहेबाबरोबर आम्हांला चांगलाच सामना करावा लागला. या सामन्यांत नाना आणि मॅकेअर या दोघांच्याही अंगचें शौर्य

चांगलेंच प्रगट झालें. या प्रसंगीं आमचा आतां खास पराजय होतो असें आम्हाला वाटलें; पण ईश्वर कृपेनें अखेर विजयश्रीनें आह्मालाच वरिलें आणि त्याचक्षणीं बंडाचा वणवा एकदम विझला ! नानाच्या सैन्याची पार घूळधाणी उडाली. आम्ही त्यांना अगदीं नेस्तनाबूत करून टाकलें !

पण मॅकेअर, अबदूल आणि नाना हें त्रिकूट आमच्या हातीं मुळींच लागलें नाहीं. पराजयाचा रंग दिसूं लागतांच त्यांनीं मागल्यामागें पोबारा केला. याप्रमाणें आमचें सगळें काम फुकट गेलें. ते कोणीकडे गेले याची कांहींच बातमी लागली नाहीं. यानंतर कांहीं दिवसांनीं मला असें कळलें, कीं, पश्चिमेकडच्या राजानें आपलें कांहीं सैन्य विठूरच्या बाजूला पाठवलें आहे. ही बातमी मला कळल्यावर नाना वगैरे त्रिकूटाचा तपास लावण्यासाठीं मीं लक्ष्मणप्रसादाला गुप्त वेषानें तिकडे पाठविलें; पण खुद्द त्याचाच त्यानंतर नापत्ता झाला.

नाना, मॅकेअर आणि अबदूल वगैरे या त्रिकूटावरच सरकारचा फार कटाक्ष होता. त्यांना पकडण्यासाठीं सरकारचे प्रयत्न मोठ्या जारीनें सुरू होते. तथापि त्यांचा तपास लागणें दिवसानुदिवस अधिकच मुष्कील होत चाललें होतें. या कामासाठीं माझेही गुप्त अनुचर चोहोंकडे फिरतच होते; पण त्यांनाही आपल्या कामांत अद्याप यश आल नव्हतें.

आज तारीख २८ आगष्ट सन १८५७ इसवी रोजीं "नाना, मॅकेअर आणि अबदूल या त्रिवर्गाला जो कोणी पकडून देईल त्याला पन्नास हजार रुपयांचें बक्षिस देण्याविषयीं विलायतच्या मंत्रिमंडळीचा नुकतांच हुकूम आला आहे" अशा आशयाची **लार्ड क्यानिंग**कडून मला आज रोजीं तार आली होती. याखेरीज हें काम शक्य तितक्या लौकर पार पाडण्याची सूचनाही मला याच तारेंत लॉर्ड क्यॉनिंगसाहेबांनीं केली होती. मी पैशाच्या किंवा कीर्तीच्या लोभानें त्या त्रिवर्गाला पकडायला उद्युक्त झालों होतों असें नाहीं. त्यांनीं जी निर्दयपणानें बायकामुलांची कत्तल केलेली होती तिजबद्दल मला अतिशय चीड आली होती. याच गोष्टीचा सूड घेण्याकरितां विचार माझ्या हृदयांत रात्रंदिवस जागृत होता इतकेंच नव्हे तर ज्या दिवशीं माझ्या हातून हें कार्य पार पडेल तो दिवस माझ्या

आयुष्यांत खरोखरच धन्य होय, असेंही मी समजत होतों. रोजच्या डोळ्यांतील अश्रु अजूनही थांबले नव्हते. तिचें विषादमय मुखमंडळ पाहून हेलनचें स्मरण होई आणि त्याबरोबरच माझी सुडाची इच्छा पराकाष्ठेला पोंहचे.

तारीख २८ आगष्ट रोजीं दुपारीं जनरल लॉरेन्सला भेटावयाला जात असतांना एका अपरिचित माणसानें माझ्या हातांत एक पत्र आणून दिलें. तें लक्ष्मणप्रसादाचें होतें आणि तें आणून देणाऱ्या इसमानें आपण त्याचा एक नोकर असल्याचें कबूल केलें. मी ताबडतोब घरीं गेलों आणि पत्र फोडून वाचूं लागलों. त्यांत येणेंप्रमाणें मजकूर होता.

" अबदुलचा तपास लागला. तो भगवीं वस्त्रें परिधान करून एक हिंदु संन्याशी बनला आहे. त्याच्याबरोबर त्याचे आणखी दहा अनुयायी आहेत. त्या सगळ्यांचाही एकसारखाच पोषाख आहे. त्यांच्यापैकीं एकानें द्वारका, काशी, जगन्नाथपुरी वगैरे तीर्थयात्रेस ही मंडळी जाणार असल्याचें मला कळविलें. आज ते बहुतकरून कानपुरास पोहोंचून भैरवाश्रमांत उतरतील. आपण आज त्या ठिकाणीं अवश्य जावें. "

मीं तत्काळ वेश पालटून भैरवाश्रमांत प्रयाण केलें. पाठीमागें लक्ष्मणप्रसाद आला तर त्याला घरींच थांबवून ठेवण्याचें नोकरांस सांगितलें.

भैरवमठ कानपुरापासून पांच मैलांवर एका जंगलांत होता. या ठिकाणीं पुष्कळ हिंदु संन्यासी राहात होते. मी तेथें जाऊन पोहोंचलों त्या वेळीं तेथला पूजनसमारंभ चालला होता. मठाच्या चारी बाजूंस संन्यासी उभे होते. लक्ष्मणप्रसादही कदाचित् या मंडळींत संन्यासी वेषानें आला असेल असें मला वाटलें आणि माझें हें अनुमान लौकरच खरें ठरलें. त्याला ओळखायाला बिलकुल त्रास पडला नाहीं. आमचा एक खुणेचा शब्द ठरला होता. त्याच्या योगानें कसल्याही वेशांत आम्ही एकमेकांना ओळखीत असूं. आम्ही दोघांनीं एकमेकांस ओळखतांच लक्ष्मणप्रसादनें माझा हात धरून मला एका बाजूस नेलें आणि माझ्या कानांत सांगितलें, कीं, "अबदूल आणि त्याचे अनुचर येथें जवळच एका झाडाखालीं बसले आहेत. आतांपर्यंत ते सगळे मिळून नऊजण होते; पण त्यांत नुकतीच आणखी दहांची भर पडली आहे. सगळेच संन्यासी

वेषांत आहेत. मला तर असें वाटतें, कीं, आतां विलंब न लावतां येथेंच पकडावें हें बरें. ”

त्याचें हें भाषण ऐकून मीं म्हटलें “ त्यापेक्षां यांचाच पाठलाग केलेला फायदेशीर होईल. कारण त्या योगें नाना आणि मॅकेअर यांचाही पत्ता लागेल. यांचा येथें येण्यांत कांहीं तरी गूढ उद्देश असला पाहिजे. ”

लक्ष्मणप्रसादः—ठीक आहे. आपल्या मर्जीप्रमाणें होऊं द्या. आपण येथें थांबा. मी त्याचा पाठलाग करितों.

लक्ष्मणप्रसादाच्या सांगण्याप्रमाणें मी तेथेंच थांबलों आणि थोड्या वेळानें अबदूल आणि त्याचे अनुचर ज्या ठिकाणीं बसले होते त्याच्या अगदीं जवळच असलेल्या एका झाडाखालीं आम्ही दोघेही जाऊन निजलों. झोंपेच्या मिषानें आमचें सर्व लक्ष्य त्यांच्या हालचालीवर होतें.

रात्रींच्या बारा वाजण्याच्या सुमारास त्यांतले तिघे संन्यासी जंगलाच्या बाहेर पडले. आतां स्वतः मीच त्यांचा पाठलाग करण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें लक्ष्मणप्रसादाला तेथें बसवून मी त्यांच्या मागें निघालों. ते प्रथम कानपूर शहरांत घुसले आणि एका टोलेजंग वाड्यापाशीं उभे राहून त्यांनीं कसलासा इशारा केला. त्याबरोबर त्या घराचें दार उघडलें आणि आंतून कांहीं माणसें बाहेर आलीं. या वेळीं त्यांचीं काय काय भाषणें झालीं तीं मी दूर असल्यामुळें मला ऐकावयास आलीं नाहींत. थोड्या वेळानें ते सर्वजण त्या घरांत घुसले. मी त्यांच्या प्रत्यागमनाची वाट पहात बाहेरच उभे राहिलों.

यानंतर तिघेजण संन्यासी तीन घंट्यांनीं आणि त्याच्या बरोबरच आणखी कित्येक माणसें त्या घराच्या बाहेर पडलीं व पूर्वेकडे जाऊं लागलीं. यावेळीं आकाश मेघांनीं भरून गेलें असून चोहोंकडे गडद अंधःकार पसरला होता. या अंधःकाराला भेदून पलिकडची वस्तु पाहणें मनुष्यांच्या दृष्टिसामर्थ्यापलिकडचें होतें. मीं केवळ त्यांच्या पावलांच्या ध्वनीचा पाठलाग चालविला होता. ”

———

प्रकरण ३१ वें.

नानाचा सांकेतिक शब्द " आवेस्ता "

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

"रात्रींचे दोन वाजले होते. मीं अगदीं जोराजोरानें संन्याशांच्या मागें जात होतों. सपाट रस्ता बहुतेक संपला होता. याच सुमारास एक गांव दिसूं लागलें आणि त्याबरोबरच कोणाचासा आवाज ऐकूं येऊं लागला. मी हातांत पिस्तुल घेऊन मोठ्या सावधगिरीनें चालूं लागलों. कांहीं वेळानें आम्ही सर्वचण त्या गांवांत जाऊन पोहोंचलों.

पण संन्यासी आणि त्याचे अनुचर या गांवांत न थांबतां लगेच तेथून बाहेर पडले. मीहि त्यांचाच मार्ग अनुसरला; पण काय आश्चर्याची गोष्ट ? गांवाबाहेरच्या मैदानांत येतांच ते सर्वजण एकदम गुप्त झाले. मीं त्यांचा पुष्कळ तपास केला; पण व्यर्थ !

यांच सुमारास मला समोर दिवा जळत असलेला दिसूं लागला. आणि लागलाच बंदुकीचा शब्दहि माझ्या कानावर आला. हा प्रकार काय आहे तो पहावा म्हणून मी लागलाच एका झाडाच्या आड जाऊन उभा राहिलों बरोबर याच वेळेला गांवांतून निघालेलीं कांहीं माणसें बोलत बोलत माझ्या पुढून निघून गेलीं. त्यांचा जो संवाद मला ऐकावयास आला तो असा.

एकः—बंदूक कोणीकडे उडाली बरें ?

दुसराः—याच मैदानांत.

एकः—पण ते लोक जर इथें असतील तर आम्हांलाहि निष्कारण पेंचांत पडावें लागेल.

दुसराः—असें डरतां काय ? हें सगळे लोक मॅकेअरचेच आहेत. आज रात्रींतच ते येथें येणार असल्याची बातमी होती. नानासाहेबांचेंहि पत्र मला आज मिळालें आहे.

एकः—हळूच तरी बोला. इंग्रजाच्या गुप्त पोलिसांनीं आपल्याला रात्रंदिवस अगदीं घेरुन टाकलें आहे. ही गोष्ट तुम्ही विसरलां वाटतें ?

याप्रमाणें बोलत बोलत ते लोक बरेच दूर गेल्यामुळें मला त्यांचें भाषण पुढें ऐकावयास आलें नाहीं. आतां मी झाडापासून दूर झालों. आणि पुढें चालूं लागलों. तीं माणसें पुढेंच एका झाडाआड उभी राहिलीं होती. त्यांच्या मागें आणखी एक झाड होते. तेथें कोणचि नव्हतें. मी हळूच तेथें जाऊन उभा राहिलों.

कांहीं वेळानें त्यांचेपैकीं एकानें शिटी वाजवावयास आरंभ केला. तो ती दहा पंधरा मिनिटें सारखी वाजवीत होता. पण त्याला तिचें कांहींच उत्तर मिळालें नाहीं. पण यानंतर दहा मिनिटांनीं मात्र लांबून एक शिटीचा ध्वनि ऐकावयास आला. मॅकेअरचें दल आलें असावें अशी माझी कल्पना झाली. कांहीं वेळानें त्यांचीं आपसांत भाषणें सुरू झालीं. त्यांतील एकाच्या आवाजावरून तो अबदूल असावा असें मीं ओळखलें; पण मॅकेअरचा आवाज मात्र मला ऐकावयास आला नाहीं.

एकः–काय आहे प्रकाश ? आम्ही किती वेळापासून तुमची वाट पहात आहों.

अबदुलः–मी नानाची वाट पहात आहें. ते या वेळीं येणार होते. इतक्यावर माझें जर येणें झालें नाहीं तर दुसऱ्या कोणाला तरी मी पाठवून देईन असेंही ते म्हणाले होते. तो माणूस आपली आणि मॅकेअरची भेट करून देईल.

एकः–पण असल्या गोंधळानें आमची काय अवस्था: होईल, याचा नीट विचार करा. इंग्रजाचे गुप्त पोलीस आमच्या मागें रात्रंदिवस आहेत. ते कोणत्या वेळीं आम्हांस पकडतील व फांसावर नेऊन लटकावतील याचा काय नेम आहे ? आम्ही मॅकेअरची वाट पाहून थकून गेलों. आज जर तो आम्हाला भेटला नाहीं तर आम्ही कोणीकडेहि निघून जाऊं. त्याची मुळींच मग वाट पहात बसणार नाहीं.

अबदुलः–इंग्रजांचा राग तुमच्यापेक्षां माझ्यावर अधिक आहे. मला पकडण्यासाठीं त्यांचे रोज शेंकडों रुपये खर्च होत आले आहेत आणि दुष्ट रामपाल तर रोज निरनिराळे ढंग काढीत आहे. मॅकअरची भेट घ्यावी ह्मणून मी नानाप्रकारचे वेष घेऊन हिंडत आहें. तो आतां भेटला म्हणजे मग मी त्याला झांशीला घेऊन जाईल.

एकः—तुमची मर्जी असेल तिकडे तुम्ही चालते व्हा. आम्ही आतां येथें मुळींच राहूं इच्छित नाहीं. येथें आमचा जीव रात्रंदिवस धोक्यांत आहे बरें. आज नानाचा गुप्त हेर जर येथें आला तर कसें ओळखावयाचें ?

अबदूलः—मजकडून जो मनुष्य येईल त्याला माझा संकेत शब्द विचार ह्मणून नानानें लिहिलें आहे. तो जर "आवेस्ता" ह्मणून सांगेल तर तो माझाच मनुष्य निश्चयानें समजावें असें त्यांत आहे.

हें शब्द ऐकून मला मोठा आनंद झाला. असला सुयोग गमविणें मला योग्य वाटलें नाहीं. इतक्या दिवसानंतर मॅकेअरला पकडण्याची संधी आज प्राप्त झाली. यानंतर मीं ताबडतोब आपला वेष पालटला आणि त्याच्याजवळ जाऊन दाखल झालों. अबदूलनें मला पाहतांच ताबडतोब त्याच्या पिस्तुलाचें निशाण मजवर रोखून म्हटलें, "बोल ? तूं कोण आहेस ?"

मीं निर्भयपणानें म्हटलें, "मीं नानासाहेबांचा एक सेवक आहें. असें भितां काय ?"

अबदूलः—छट ! तूं इंग्रजाचा गुप्त हेर असला पाहिजेस.

मीं हंसत ह्मटलें, "आपण काय पागल बनलांत ? मीं नानाच्या अगदीं विश्वासांतला माणूस आहें. ते मॅकेअरची वाट पहाताहेत. त्याला घेऊन जाण्यासाठीं मीं आलों आहें. मला त्याजकडे न्या."

अबदूलः—तूं जर नानाच्याच विश्वासांतला माणूस आहे ह्मणतोस तर त्यांचा सांकेतिक शब्द काय आहे हें सांग पाहूं ?

मीं हंसत हसत ह्मटलें, "आवेस्ता !"

प्रकरण ३२ वें.

विख्यात बंडखोर मॅकेअरशीं सामना !

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

“ माझ्या मुखांतून आवेस्ता हा शब्द बाहेर पडतांच अबदुलचा कोपानल शांत झाला. तो मला हळूच झाडाखालीं घेऊन गेला. तेथें गेल्यावर त्याठिकाणीं असलेल्या सर्व मंडळींनीं माझ्याभोंवतीं वेढा घातला. मी ह्मणालों, “ नानासाहेबांनीं जर सांकेतिक शब्द सांगितला नसता तर तुमच्यासारख्या वीराच्या हातून आज मला खात्रीनें मृत्यु आला असता! बरें आतां मला लौकर मॅकेअरकडे घेऊन चला. ”

त्याची वाट पहात राहिल्यामुळेंच नानाला कोठें पळून जातां आलें नाहीं. मॅकेअर एकदां घडपणीं आपल्या देशीं जावा अशीच त्याची इच्छा आहे.

अबदुलः—ठीक आहे; पण मला तुमच्याबद्दल कांहींच संशय राहिला नाहीं. मी तुह्मांला इतक्यांत मॅकेअरची गांठ घालून देतों. बरें तुह्मांला हें एक विचारतों. मॅकेअरखेरीज आणखी कोणाला पाठवूं कां ?

मॅकेअर एकटा असला ह्मणजे आपण त्याला कैद करूं शकूं. हा विचार माझे मनांत उभा राहून अबदुलला ह्मटलें, “ त्याला एकट्यालाच घेऊन ये, अशी मला नानासाहेबांची आज्ञा आहे. मग तुमच्या मर्जी प्रमाणें करा. बाकी मला हुकुमाप्रमाणें दुसऱ्या कोणालाच नेतां येणार नाहीं. हें काम अगदीं सावधगिरीनें करावें असा मला त्यांचा हुकूम आहे. ”

अबदूलः—बरें मी स्वतःच तुमच्याबरोबर आलों तर.

त्याच्या त्या प्रश्नानें तर मी फारच पेंचांत पडलों. त्याजसारखा बलवान आणि युक्तिबाज मनुष्य बरोबर असल्यावर मॅकेअरच्या अंगाला नुसता हात लावण्याची मात्रा नव्हती. बरें, त्याला नाहीं म्हणावें तर त्याच्या मनांत माझ्याविषयीं संशय उत्पन्न होण्याचा संभव होता. याशिवाय या कामालाही उशीर करणें धोक्याचें होतें. कारण याच वेळेला

नानाचा खरा अनुचरही तेथें येऊन पोहोंचण्याचा संभव होता. या सर्व गोष्टीचा विचार करून मीं त्याला म्हटलें, " खुद्द आपणच त्याच्याबरोबर येत असल्यास माझी कांहीं हरकत नाहीं. कारण आपण त्याचे एक विश्वास दोस्त आहां हें मला ठाऊक आहे. असेंच करा. आपण मॅकेअरला लौकर घेऊन या. मी पुढें जाऊन नानासाहेबांना बातमी देतों."

शेवटचें वाक्य केवळ मजविषयीं त्याचे मनांत विश्वास उत्पन्न व्हावा म्हणून उच्चारलें. त्याचा परिणाम अगदीं माझ्या कल्पनेप्रमाणेंच होऊन तो मला ह्मणाला, " नको माझी येण्याची कांहीं जरूर नाहीं. "

याच सुमारास दुसरा एक मनुष्य पुढें येऊन त्यानें त्याला एका बाजूस नेलें; आणि त्याच्या कानांत कांहीं सांगितलें. अबदूल परत येऊन मला म्हणाला, " तुमच्याविषयींचा संशय पार मिटला; पण तुमचें नांव काय आहे. हें मला कळवाल तर बरें होईल. "

मीं हंसून म्हटलें, "यांतहो काय ? माझें नांव सदाशिवराव ! नानासाहेब माझे मामाच आहेत. त्यांचें महत्त्वाचें कामकाज मीच बघतों. "

यानंतर अबदुल मला कांहींच न बोलतां आपल्या साथिदारास म्हणाला, " चला, आपण सगळेच मॅकेअरकडे जाऊं. नानाकडे तुमचा निरोप त्याच्या मार्फतच पाठवूं. त्याचें उत्तर उद्यांच हवें तर सदाशिवराव घेऊन येतील. यावर तुमच्या मर्जीप्रमाणें करा. "

एवढें बोलून अबदुल तेथून निघाला. त्याच्यामागें त्याचे साथीदार आणि मीहि निघालों. अर्ध्या घंट्याच्या आंतच आम्ही एका जंगलांत आलों. या वेळीं रात्रीचे तीन वाजले असतील. जंगलांत आल्यावर अबदुल मला ह्मणाला, "येथें आपणास थोडें दुजाभावानें वागाविलें जाईल. याबद्दल आपण मजवर रागावणार नाहीं अशी आशा आहे."

मी—दुजाभावानें म्हणजे कसें ?

अबदूल—आमच्या नियमाप्रमाणें तुमचे डोळे बांधून तुह्मांला मॅकेअरकडे नेण्यांत येईल. यांत थोडासा अविश्वास दिसतो; पण मॅकेअरची तशी सक्त ताकीद असल्यामुळें माझा नाइलाज आहे.

मी—या गोष्टीला बिलकूल हरकत नाहीं; पण तुह्मास माझा खरोखरच

संशय येत असेल तर तसें मला स्पष्ट कळवा म्हणजे मी आपला आलों तसा नानासाहेबाकडे चालता होतों.

अबदुल—छे, छे. तसा प्रकार नाहीं. केवळ ठरलेला नियम मोडूं नये ह्मणून आपणास असें करावें लागत आहे. शिवाय ही गोष्ट नानाला ठाऊक असून त्यांना ती कबूलहि आहे.

त्याची ही अट कबूल करण्याचें साहस अखेर मीं केलेंच. माझी कबूली मिळतांच त्यानें एका हातरुमालानें माझे डोळे घट्ट बांधून टाकिले. अशा स्थितींत मी पंधरा वीस मिनिटें मार्ग क्रमण करीत होतों.

त्यानंतर अबदूलनें माझे डोळे सोडले. त्या वेळीं आपण एका गुहेसमोर उभें आहों हें मला कळून आलें.

या गुहेभोंवतीं घनघोर जंगल होतें. अबदूल हळु हळू गुहेचें दार ठोठावूं लागला.

थोड्या वेळानें आंतून "कोण आहे ? असा ध्वनि निघाला."

अबदुल ह्मणाला, "मीच परत आलों आहें. दार उघड."

गुहेचा दरवाजा उघडल्याबरोबर आम्ही सर्वजण आंत शिरलों. तेथें एक दिवा जळत असून एका पलंगावर प्रख्यात फ्रेंच दरोडेखोर मॅकेअर विराजमान झाला होता. अबदुल त्याला ह्मणाला, " नानासाहेबाकडून हे गृहस्थ आले आहेत, यांचें नांव सदाशिवराव. हे त्यांचे भाचेच आहेत. आमच्या लोकांचा सांकेतिक शब्द यांनीं सांगितला. आतां नानाच्या आज्ञेप्रमाणें तुला यांचेबरोबर गेलें पाहिजे. लौकर आटप. उशीर केलास तर तिसरेंच एकादें संकट उत्पन्न होण्याचा संभव आहे. "

अबदुलचें बोलणें ऐकून घेतल्यानंतर मॅकेअरनें मला आपले जवळ बसवून घेतलें. त्याच वेळीं माझ्यासमोर दारांत उभा असलेल्या एका व्यक्तीनें मला परिचित असलेला इशारा दिला. त्याबरोबर तो लक्ष्मणप्रसाद आहे हें मीं ओळखलें. त्याचा प्रवेश कसा झाला हें एक त्याचें त्यालाच ठाऊक !

प्रकरण ३३ वें.

मॅकेअर साथीदारांसह जाळ्यांत सांपडला.

मींहि विलंब न करितां खुणेनेंच लक्ष्मणप्रसादाला त्याचा इशारा ओळखल्याची जाणीव करून दिली. त्याचप्रमाणें ही कामगिरी शक्य तितक्या लौकर पार पाडण्याचाहि मीं त्याला इशारा केला.

मजकडे बराच वेळ तीक्ष्ण दृष्टीनें पाहिल्याबरोबर मॅकेअर अबदूलला ह्मणाला, "अबदुल, या माणसानें खाणाखूणा जरी बरोबर सांगितल्या तरी मला त्याचा संशय येतोच. तुला काय वाटतें ?"

अबदुल—शत्रूनें सारखा पिच्छा पुरविला म्हणजे माणसाचें मन संशयी बनणें साहजिक आहे. त्यांतून मनुष्य अपरिचित असला तरी मग बोलावयासच नको. शेवटपर्यंत संशयच !

मॅकेअर—हा माझा संशय खरा आहे किंवा खोटा आहे याची एकदां नीट खात्री करून घे.

आतां मात्र माझी पुरी तिरपीट उडाली. मी प्रतिक्षणीं लक्ष्मणच्या आंत येण्याची मार्गप्रतीक्षा करीत उभा राहिलों. त्याच्या अशा ढिलेपणाचा मला अतिशय संताप आला. अगदीं याच वेळेला अबदुलनें माझा हात धरला; पण मी लागलाच त्याजवर संतापून ह्मणालों, "अजून जर तुह्मांला माझा संशय येत असेल तर मग मी आपला निघून जातों."

मॅकेअर—परिक्षा केल्याखेरीज तुह्मांला आतां आम्ही येथून सोडतच नाहीं. तुझ्या आवाजावरून तुझ्या परीक्षेचें काम म्हणजे सुलभ गोष्ट नव्हे हेंहि मी जाणतों.

मी—तुमच्या या विलक्षण संशयखोर वृत्तीला काय म्हणावें हेंच कळत नाहीं. मीं तुह्मांस सांकेतिक शब्द सांगून टाकिला. हा शब्द आपल्या मंडळीखेरीज दुसऱ्या कोणास ठाऊक नाहीं ही गोष्ट तुम्ही जाणतांच आहां. तर मग विनाकारण कां मजवर संशयाची आग पाखडतां ?

मॅकेअर—(अबदुलला) अबदुल, अगोदर याच्या दाढीचे आणि डोकीचें केंस खरे आहेत अगर कृत्रिम आहेत हें तपासून पहा बरें !

यानंतर याचें सगळें शरीर पाण्यानें धुवून याला रंग लाविला आहे किंवा काय तें बघ.

शरीर धुण्याची गोष्ट निघतांच मी घाबरलों. कारण पाण्याचा हात फिरविल्याबरोबर त्याजवरील बनावट रंग निघून जाण्याचा संभव होता. शिवाय लक्ष्मण अजूनहि आंत आला नव्हता. हीहि गोष्ट माझा धीर खचविण्यास बऱ्याच अंशांनीं कारणीभूत झाली होती.

मॅकेअरच्या सांगण्यावरून अबदुलनें माझ्या डोकीचे आणि दाढीचे केंस खूप जोरानें उपटून पाहिले; पण ते पक्के बांधिले असल्यामुळें ते निसटले नाहींत. यामुळें त्या बाबतींत तरी संशय उरला नाहीं.

या वेळीं मला त्याचा आणि मॅकेअरचा इतका संताप आला, कीं, पिस्तुलाच्या दोन गोळ्यांनीं दोघांचींहि डोकीं फोडावींत असें माझ्या तेवढ्यांतल्या तेवढ्यांत मनांत आलें; पण लक्ष्मणप्रसाद अजून आंत आला नसल्यामुळें मला माझा राग मनांतल्या मनांत गिळावा लागला. थोड्या वेळानें अबदुल मॅकेअरला ह्मणाला, "याची दाढी आणि केंस तर खरे दिसतात. आतां अंगाला पाणी लावून पाहिलें पाहिजे."

असें ह्मणून तो पाणी घेऊन आला. मी मोठ्या फिकीरींत पडलों. लक्ष्मण अजून आला नव्हता. इतक्यांत मला एक गोष्टीचें स्मरण झालें. मला जरूर पडली म्हणजे तूं मजकडे येत जा. असा लक्ष्मणप्रसादांत आणि माझ्यांत संकेत ठरला होता. त्याप्रमाणें तो सध्यां माझ्याच शिट्टीचीच वाट पहात असावा असें मला वाटलें आणि त्याबरोबर मीं जोरानें शिट्टी फुंकली. हा प्रकार पहातांच मॅकेअर पिस्तुल घेऊन उठला आणि अबदुल पाण्याचा लोटा झुगारून देऊन सुरा घेऊन माझें अंगावर धांवला; पण मी सावधच होतों. एकाद्या कोंबड्याप्रमाणें मीं अबदुलला दूर झुगारलें आणि दुसऱ्या क्षणींच मॅकेअरच्या अंगावर उडी घालून त्याला जमिनविर लोळवलें!

मॅकेअरच्या पिस्तुलांतील गोळी याच वेळीं सूं सूं करीत बाहेर निघाली आणि गुहेच्या भिंतीला लागून बाहेर पडली. मॅकेअर पुन्हां उठावयास पहात होता; पण त्याला मीं असा एक गुद्दा चढविला, कीं, तो बेशुद्ध होऊन धाडकन जमिनीवर आदळला. याच वेळीं लक्ष्मणप्रसादनें तेथें

येऊन अबदुलचे हातपाय बांधले, या अवधींत मीहि मॅकेअरला चांगलेंच जखडलें नंतर त्याला सावध केलें.

अजूनपर्यंत माझ्या डोळ्यांत धूळ फेंकून मॅकेअर किती तरी वेळां पळाला होता; पण आज मात्र तो पूर्णपणें माझ्या कचाट्यांत सांपडला. मीं त्याचे खिसे तपासले त्यांत एक पिस्तुल, एक पत्र आणि विषाची बाटली सांपडली. पिंजऱ्यांत अडकलेल्या सिंहाप्रमाणें मॅकेअर हातपाय आपटून ह्मणाला, "अखेर मला वाटत होतें तसेंच झालें !"

मी--आतां पुन्हां पळशील काय मॅकेअर ?

मॅकेअर--आतां कसचा पळतो ? पापाचें प्रायश्चित्त भोगलेंच पाहिजे.

मी--केलेल्या पापाबद्दल ईश्वराची क्षमा माग.

मॅकेअर—मजसारख्या भयंकर पातक्याला ईश्वराजवळ क्षमा नाहीं, मला त्याचें भयंकर प्रायश्चित्त भोगलेंच पाहिजे.

आजवर भयानक पापकर्मांत लिप्त झालेल्या आणि पाषाणतुल्य हृदय असलेल्या मॅकेअरच्या डोळ्यांत यावेळीं अश्रु आले !"

प्रकरण ३४ वें.

पापाचा पश्चात्ताप.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा)

" कानपूर सेंट्रल जेलमध्यें लोहशृंखलाबद्ध झालेला प्रसिद्ध फ्रेंच दरोडेखोर मॅकेअर हा पडला असून त्याच्या शेजारच्याच खोलींत अबदुल वगैरे त्याचे सहचर होते. त्यांना पकडल्यापासून कानपूर शहरांत बरीच चळवळ उडाली.

आज लार्ड क्यानिंगची पुढील तार मला आली.

" आपले किती आभार मानावेत तेंच मला कळत नाहीं. ब्रिटिश राष्ट्राचें संरक्षण आपण केलें. फ्रेंच आणि हिंदु यांच्या एकीकरणानें भलताच प्रसंग ओढवण्याचा संभव होता; पण आपल्या कार्यकुशलतेनें अखेर सर्व कांहीं ठीक झालें. आज ही सर्व हकीगत मीं विलायतसरकारला

कळविली आहे. तात्या टोप्यावर नजर असूं द्या. त्याची मॅकेअरपेक्षांहि जास्त भीति आहे."

कानपुरांतल्या शिपायांच्या बंडाची चळवळ सर्वस्वीं नष्ट होऊन पुन्हां चोहोंकडे शांततादेवीचें राज्य प्रस्थापित झालें. तात्या टोपे मध्य प्रदेशांत ब्रिटिशांविरुद्ध लढण्याची तयारी जारीनें करीत आहे. अशा बातम्या मजकडे येत होत्या; पण मॅकेअरला या जगाची कायमची रजा घ्यावयाला लावल्याखेरीज मला कानपूराहून हालणें इष्ट वाटत नाहीं.

आज मी गार्डनच्या भेटीला गेलों होतों. ते कांहीं दिवस पागलखान्यांत होते; पण नुकतेच तेथून घराकडे आले होते. मला त्यांनीं प्रेमानें आपल्याजवळ बसवून घेतलें.

मीं त्यांच्याकडे पाहून म्हटलें, "कशी काय आहे आपली प्रकृति ?"

गार्डन--आतां बरी आहे.

मी—मॅकेअरला पकडण्याची बातमी आपल्या कानावर आली ?

या वेळीं गार्डनच्या मुखमंडलावर विषादाची छाया दिसूं लागली. त्याचें कारण माझ्या लक्षांत येऊन मी त्यांस म्हटलें, "मॅकेअरला आतां भयंकर पश्चात्ताप होत आहे."

गार्डनः-मॅकेअरला आणि पश्चात्ताप ? आश्चर्य आहे.

मीः-खरोखरच त्याला पश्चात्ताप होत आहे.

गार्डनः—मोठा चमत्कार आहे; पण ईश्वर असेच चमत्कार कधीं कधीं घडवून आणतो, यांत शंका नाहीं. माझी त्याची एक वेळ भेट होईल ?

मीः-चला हवें तर. मीं आपल्याला आजच त्यांच्याकडे घेऊन जातों.

एवढें बोलून मी तेथून उठलों. खालीं रोज मला भेटून ह्मणाली, "शत्रूला क्षमा करणें हेंच खरें मनुष्यत्व. आपण वाटेल तें करून त्याची फांशी वांचवा."

मीः—ही गोष्ट माझ्या हातची नाहीं. न्यायाधीश काय करतील तें खरें."

रोजः—जज्ज हॅमिल्टनसाहेब माझ्या ओळखीचे आहेत. मी त्यांचे

पाय धरून त्यांच्या प्राणाची भीक मागेन ! त्याला काळेपाण्याची शिक्षा पुरेसी आहे, असें मला वाटतें आणि यापेक्षां अधिक देणें आवश्यकच असेल तर ती ईश्वराच्या न्यायासनापुढें मिळेल.

मी:—बरें तुझे वडील त्यांना भेटूं इच्छितात. आज दोन प्रहरींच आम्हीं त्यांच्याकडे जाणार आहोंत. या बाबतींत तुमचें मत कसें काय आहे ?

रोज:—त्यांच्या इच्छेप्रमाणेंच करणें बरें होईल. त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना वागूं देत जा असें डॉक्टरचेंहि म्हणणें आहे.

मी:—पण त्या नीचाला पाहिल्याबरोबर त्यांची पूर्वस्मृति जागृत होऊन त्यांचा नुकताच शम पावलेला विकार तर पुनः भडकणार नाहीं ?

रोज:—मी पुनः या बाबतींत डॉक्टरांना विचारतें. तें काय सांगतील तें आपणास कळवितें.

मी:—मीहि पलटणींतल्या डॉक्टराजवळ याबद्दलची चौकशी करतों. पण स्टिफन कोठें आहेत ?

रोज:—ते जार्ज हॅमिल्टनला भेटावयास गेले आहेत लौकरच परत येतील.

दुपारीं दोन वाजतां मी पलटणींतले प्रमुख डॉक्टर जोसेफ फौलरची भेट घेतली आणि वरील बाबतींत त्यांना सल्ला विचारला. तेव्हां ते म्हणाले, "हा मोठा भानगडीचा प्रश्न आहे. यांत दोहों बाजूंनीं संकट दिसतें. त्यांची आणि मॅकेअरची भेट झाली तर तुम्हाला वाटतें तसें होण्याचा संभव आहे. बरें न झाली तर त्याच्या इच्छेविरुद्ध बसावयास त्याला भाग पाडल्यामुळें जवळ जवळ तसेंच होणार.

अखेर बरीच चर्चा झाल्यावर मॅकेअरचीं आणि त्यांची भेट होऊं देणेंच डॉक्टरला इष्ट वाटलें.

चार वाजतां मला रोजचें पत्र मिळालें त्यांत त्याच्या डॉक्टराचीहि या गोष्टीला संमति मिळाल्याचें तिनें कळविलें होतें.

मीं ताबडतोब गाडी करून गार्डनच्या घरीं गेलों. सगळीं मंडळी घरांतच होती. मीं गार्डन, रोज आणि स्टिफन यांना घेऊन गाडींत बसलों; आणि गाडी जेलकडे नेण्याचें कोचमनास सांगितलें.

जेलमध्यें जाऊन पोहोंचल्याबर जेलसुपरिंटेंडेंटची आज्ञा घेऊन आम्ही

आंत घुसलों. तें स्थान म्हणजे आम्हांला एक निराळी सृष्टीच वाटली. शेंकडों अपराधी याठिकाणीं कठीण शिक्षा भोगीत असलेले आम्हांस दिसलें. कित्येक कामचुकार किंवा विश्रांतीची अपेक्षा करीत असलेले कैदी पोलीसचे वेत खात होते.

हा प्रकार अवलोकन करून गार्डन म्हणाले, " काय सरदारसाहेब, मॅकेअरलाही असेंच वेत खावे लागत असतील नाहीं ! "

मीः—नाहीं. अजून त्याची चौकशी व्हावयाची आहे. ती होईपर्यंत त्याला कोणी मारणार नाहीं.

यानंतर मॅकेअर जेथें होता त्या खोलींत आम्ही गेलों. ही खोली तुरुंगांत अगदीं एकीकडे होती. तेथें सहजासहजी कोणाचा प्रवेश होणें शक्य नव्हतें.

आम्ही या खोलींत पाय ठेवण्याबरोबर एक अपूर्व दृश्य आम्हांला दिसलें ! धर्माचें नांवही ज्याला ठाऊक नाहीं अशी एक मानवी पाषाण मूर्ति आर्द्र झालेली आह्मांस दिसली. नरपिशाच्च मॅकेअर आज अगदीं अंतःकरणपूर्वक परम मंगलमय भगवानाच्या आराधनेंत लीन होऊन गेला होता !

सुमारें अर्धा तास आम्ही अगदीं स्तब्ध होतों; इतका काळ लोटला तरी मॅकेअरची ईश्वराधना संपली नाहीं. दुराचारी माणसांला धर्माची प्रथम भेट अगदीं अपूर्व आणि मधुर वाटत असतें.

मॅकेअरच्या एकंदर वृत्ति ईश्वरसेवेंत गढून गेल्या होत्या; आणि त्यावेळीं आम्हांलाही त्याच्या समाधीचा भंग करणें बरें वाटलें नाहीं !"

प्रकरण ३९ वें.

पापाचें प्रायश्चित्त.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

" मॅकेअरचें ध्यानविसर्जन व्हावयाला बराच वेळ लागला. त्याची समाधी संपल्यावर प्रथम आमच्याकडे त्याची दृष्टी गेली. त्याच्या दोन्ही पायांत लोहशृंखला होत्या. त्यामुळें त्याला उठून उभे राहावयाला बराच त्रास पडत होता, तरी तो तसाच उठला आणि आमच्याकडे काण्या दृष्टीनें पहात राहिला.

मीं म्हटलें, " मॅकेअर, गार्डन, रोज आणि स्टिफन ही मंडळी मुद्दाम तुला भेटावयास आली आहेत. " माझें हें भाषण ऐकून त्यानें हात जोडलें. आणि म्हटलें, " आपण सर्व मंडळी खरोखर साधु आहांत. आपण जर मला क्षमा करणार नाहींत तर मला ती ईश्वराच्या हातूनही मिळणें कठिण आहे. "

गार्डनः–मॅकेअर, तुझ्या ठिकाणीं सद्बुद्धि उपजावी ह्मणून मीं ईश्वराची किती वेळ तरी प्रार्थना केली आहे. आज तुला खरोखरच पश्चात्ताप होऊन तूं ईश्वरध्यानांत मग्न झालेला पाहून मला किती तरी आनंद होत आहे ह्मणून सांगूं! तुला क्षमा करावी या हेतूनेंच आम्ही सर्वजण येथें आलों आहों आणि स्वतः मी तर अगदीं मनापासून तुला क्षमा केली आहे.

यानंतर स्टिफन आणि रोज यांजकडे दृष्टि फेकून मॅकेअर म्हणाला, " तुम्हां दोघांचा तर मीं फार घोर अपराध केला आहे; पण आतां मागलें सर्व विसरून तुम्ही मला क्षमा कराल अशी मी आशा बाळगतों."

यावर रोज आणि स्टिफन म्हणाले, " आम्हीं तुला कधींच क्षमा केली आहे. इतकेंच नव्हें तर तुजवर दया करण्यासाठीं ईश्वरालाही आमची निरंतर प्रार्थना आहे. "

यानंतर मॅकेअर गार्डनकडे पाहून म्हणाला, " मीं तुमची एवढी हानी केली तरी तुम्ही अत्यंत धार्मिक गृहस्थ असल्यामुळें त्याचा लवमात्र

सुद्धां सूड घेण्याचा विचार तुमच्या मनांत कधीं आला नाहीं. असो. आतां तुम्हाला शेवटच्या दोन गोष्टी सांगावयाच्या आहेत. त्यांपैकीं पहिली गोष्ट, तुम्हीं मला जो तीस हजारांचा चेक दिला होता तरी ती रक्कम तुम्हीं पदरांत घ्यावी हें होय. सरदार रामपालसिंहाच्या इतक्या सावधगिरीला न जुमानतां मीं तो चेक आग्रा बँकेंत वटवून आणला होता. रोजला ज्या खोलींत कोंडून ठेविलें होतें तिच्या शेजारच्या असलेल्या दुसऱ्या एका खोलींत एक तिजोरी आहे. तिच्यांत ही सगळी रक्कम ठेविली आहे. तिच्यांतली एक पैही मीं खर्च केली नाहीं. ही रक्कम तुम्हीं घेतलीच पाहिजे. न घेतली तर माझ्या आत्म्याला चैन वाटणार नाहीं. आतां दुसरी गोष्ट या तिजोरींत दुसरी एक पन्नास हजारांची रक्कम आहे. ती खर्च करून एक प्रार्थनामंदिर बांधा. आणि त्याजवर " दुरात्मा मॅकेअरनें आपल्या भयंकर पापाच्या प्रायश्चित्तार्थ हें मांदिर बांधलें आहे. मात्र या कामीं जो पैसा खर्च झाला तो सर्व त्याचा असून त्यांतील प्रत्येक पै त्यानें न्यायानें मिळविली होती. " अशीं वाक्यें लिहा.

गार्डनः–तुझी ही दुसरी गोष्ट मी मोठ्या आनंदानें कबूल करितों. परंतु पहिली मात्र मला पसंत नाहीं. ती रक्कम मीं तुला दान ह्मणून दिली होती. ती मला आतां परत घेतां येत नाहीं. ही गोष्ट अन्यायी आहे असें मी समजतों.

मॅकेअर डोळ्यांत अश्रु आणून म्हणाला, " या पाप्याची शेवटची इच्छाही तुम्ही मान्य करीत नाहीं ना ? "

गार्डन स्तब्ध राहिले.

मॅकेअर पुन्हां म्हणाला, " तें माझें स्वतःचें धन नव्हे. तुमच्यापासूनच बळजबरीनें घेतलें होतें. ह्मणून त्यावर माझा कोणत्याही प्रकारें हक्क नाहीं. तुम्ही जर ते घेणार नाहीं तर माझ्या आत्म्याला मुळींच शांतिलाभ व्हावयाचा नाहीं. दुःखानें माझें हृदय निरंतर जळत राहिल."

मॅकेअरचें हें भाषण ऐकून रोज आपल्या पित्याला ह्मणाली, " करा कबूल बाबा ! याची शेवटची इच्छा पूर्ण करणें आपलें कर्तव्य आहे. आपल्याला तें धन घरीं ठेवावयाचें नसेल तर त्याचा एकाद्या योग्य कामाप्रीत्यर्थ धर्मादाय करा. "

रोजचें भाषण ऐकून गार्डन कांहीं वेळ स्तब्ध राहिले. नंतर मॅकेअरला ते म्हणाले, "तुझी हीही विनंती मी मान्य करतों. तुझ्या व्यथित आत्म्याला शांति मिळो हीच ईश्वराजवळ माझी विनंती आहे."

यानंतर गार्डन, स्टिफन आणि रोज हे तिघेही गुढघे टेकून मॅकेअरच्या—त्यांच्या शत्रूच्या—आत्म्याला शांतता लाभावी म्हणून परमेश्वराची प्रार्थना करूं लागले.

मॅकेअरही त्याचप्रमाणें गुढघे टेकून पुन्हां ईश्वरध्यानांत निमग्न झाला! या वेळीं या पापमय जगांतलें दृश्य स्वर्गीय रम्य दिसूं लागलें. याचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला कीं, मला त्याची आजन्म विस्मृति झाली नाहीं.

यानंतर आम्ही सर्वजण तेथून निघून गेलों."

प्रकरण ३६ वें

गतस्मृति!

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

"संध्याकाळचा समय. विमलनील आकाशांत सुधांशु आपल्या असीम, अद्भुत आणि सौंदर्यमयी जोत्स्नेनें पुण्यमयी भारतभूमीला उज्ज्वल करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचें तारांगणरूपीं सहचरही आकाशांत इतःस्ततः विहारत आपली अपूर्व छटा दाखवीत होते. परंतु हें चित्ताकर्षक दृश्य अधिक वेळ पहात बसण्याइतकी माझी मनःस्थिती नव्हती. मी हळु हळू घराकडे चाललों होतों. रस्त्यांत आज सबंध दिवसांत घडून आलेला प्रकार क्रमाक्रमानें मला आठवूं लागला. मॅकेअरचें विलक्षण परिवर्तन झालें होतें. त्यानें तर मीं नुसता आश्चर्यचकित झालों होतों. इतक्या पतित माणसाचें हें एवढें जबर परिवर्तन कोणीं बरें घडवून आणलें असेल! मी आपल्या मनांतल्या मनांत म्हणालों, तो सगळा ईश्वरी कृपेचा खेळ असावा! धन्य त्याची लीला!"

अशा प्रकारचा विचार करींत करीत मी घरीं येऊन पोहोंचलों. या

वेळीं रात्रीचा एक वाजला होता. पण मी गाडींतून उतरून घरांत घुसणार तोंच कसलासा पांढरा पदार्थ मला दिसला. मीं तो जिज्ञासेनें उचलून घेतला आणि नंतर घरांत गेलों.

तो पदार्थ म्हणजे एक पत्र होतें. त्यावर माझ्याच नांवाचा पत्ता होता. दिव्याजवळ जाऊन मी तें वाचूं लागलों त्यांतील आशय याप्रमाणें होता.

" **प्रिय रामपाल,** कांहीं जरूरीच्या कारणामुळें मी दिल्लीहून येथें आलों आहें. तुमच्या भेटीची आवश्यकता आहे. दोनप्रहरीं नानाच्या भग्न प्रासादाजवळ मला एकटेच भेटावें.

' एक शुभाकांक्षी ' **संन्यासी.** "

हा संन्यासी कोण बरें ? मी स्वतःशीं विचार करूं लागलों. तात्या टोपे तर दिल्लीला गेला होता. मग काय तोच पुनः येथें आला काय ? का आपल्या एखाद्या शत्रूचें हें कारस्थान आहे ? "

रात्रिचे बारा वाजले तरी माझें कांहींच निश्चित ठरलें नाहीं. अखेर लक्ष्मणप्रसादाचा या बाबतींत काय सल्ला मिळतो तो पहावा म्हणून मीं त्यास हाक मारिली. माझी सगळी हकीकत ऐकल्यावर तो म्हणाला,

" मला तर बुवा हें एखाद्या शत्रूचेंच कारस्थान दिसतें. बंडाचा समूळ नायनाट झाल्यावर तात्या येथें येण्याचें काय प्रयोजन ? "

लक्ष्मणप्रसादाचें म्हणणें अद्यापि तर्काला धरून होतें. तरी पण मला भित्रेपणा दाखवून घरांत बसणें हें आवडलें नाहीं ! बरोबरच आहे. ज्याचा सर्व जन्म संकटांत आणि साहसांत गेला व अनेक दुर्धर प्रसंगीं ज्यानें प्राणाचीहि परवा केली नाहीं, त्याला भित्रेपणा कसा रुचावा ? कांहींहि होवो. हा संन्यासी कोण आहे हें तरी एकदां आपल्याला पाहिलें पाहिजे असा विचार करून मीं तिकडे जाण्याचें निश्चित केलें. संकटाला निर्भयपणानें तोंड देणें हा माझा नेहमींचाच क्रम होता. तत्काळ आपला वेष मीं पालटला आणि शस्त्रास्त्रें घेऊन लक्ष्मणप्रसादासह निघालों.

नानाच्या भग्न प्रासादाजवळ जाऊन पोहोचलों त्यावेळीं सरासरी दोहोंचा सुमार असेल. लक्ष्मणाला जरा लांब उभा करून मी एकटाच

त्या ठिकाणीं जाऊन उभा राहिलों. पण बराच वेळ झाला तरी मला कोणीच दिसेना. सर्व वाड्याभोंवतीं हिंडलों पण व्यर्थ! संन्यासी नाहीं कीं कोणी नाहीं! तीन वाजून गेले तरी मला कोणींच भेटलें नाहीं. आतां मात्र हें कोणा तरी शत्रूचेंच कारस्थान असलें पाहिजे असें मला वाटूं लागलें. पण शत्रु का होईना तो तरी एकदा आपल्या दृष्टीस पडावा म्हणून मीं पुनः वाड्याला वेढा दिला. पण याहि खेपेला माझे प्रयत्न निष्फळ झाले! या वेळीं लक्ष्मणप्रसादानें मीं सावध रहावें म्हणून सिटी फुंकली.

बरोबर याच वेळेला मला पिंपळाच्या वृक्षाजवळ एक अंधूक मानवी मूर्ति दिसली. तिला पाहून हा आपला मित्र असेल कीं शत्रू असेल हा विचार माझे मनांत आला. ती आकृति मजकडे हळू हळू येऊं लागली. त्याबरोबर मीं पुनः एकदां सिटी फुंकली.

मीं आपल्या जवळचें पिस्तुल त्या आकृतिवर रोखून म्हटलें, " बोल, तूं शत्रू आहेस कीं मित्र? अत्यंत कोमल आवाजानें " मी मित्र आहें, शत्रू नाहीं. " असें उत्तर मिळालें.

ती आकृति थोड्या वेळानें स्थिर राहिली. या वेळीं तिच्या मस्तकावर जटाभार आहे हें मला चंद्रप्रकाशांत दिसलें. तिचें सर्व शरीर उघडें असून त्यावर भस्म लाविलें होतें आणि कमरेला नुसती लंगोटी होती. मीं तत्काळ पुढें जाऊन तिला प्रणाम केला. वाचकहो, ती व्यक्ति तात्या टोपेच होय, हें मीं ओळखलें.

थोड्या वेळानें तात्या म्हणाला, " तुम्ही बरोबर मनुष्य कां आणला? माझ्यावर तुमचा विश्वास नाहीं?

मीः—माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे; पण येथें तुम्ही मला भेटणार आहे हें मीं कसें ओळखावें? तुमचें अक्षर माझ्या ओळखीचें नसल्यामुळें पत्रावरूनहि तें समजून येण्याचा मार्ग नव्हता.

तात्याः—बरें, तुम्ही बरोबर आणलेला हा माणूस विश्वासु तरी आहे का? का दगलबाज आहे?

मीः—छेः छेः तो माझ्या अगदीं पूर्ण विश्वासांतला आहे.

तात्याः—हरकत नाहीं. आतां तरी तुम्ही त्याला परत पाठवूं शकाल काय ?

मीः-- हो मोठ्या खुषीनें.

यानंतर मी लक्ष्मणप्रसादाला हाक मारून त्याला घरीं जाण्याचें सांगितलें. तो निघून गेल्यावर त्याचा जीव जरा खालीं पडला. थोडा वेळ तो सारखा नानाच्या भग्न प्रासादाकडे पहात उभा राहिला. यावेळीं कोण जाणें कोणकोणत्या गतस्मृति त्याच्या हृदयाला दग्ध करीत होत्या.

अमळशानें तो मला म्हणाला " सरदारसाहेब, मैनाची कांहीं हकीकत तुम्हाला ठाऊक आहे ?"

त्यांच्या या प्रश्नाचें काय उत्तर द्यावें तेंच मला कळेना.

हाय ! ती सरल अनिंदनीय देवता मूर्ति मुनि केव्हांच अग्निच्या भक्ष्य स्थानीं पडून नष्ट झाली होती; पण हा हृदयभेदक वृत्तांत मी त्याला कसा कळवूं ?

त्याला ही हकीगत अगोदर समजली असेल असें मला वाटत होतें; पण आपली ही समजूत चुकीची आहे–हा खेदकारक समाचार त्याला अजून कळला नाहीं–हें मला आतां स्पष्ट दिसून आलें. पण हें कांहीं जरी असलें तरी मला ही गोष्ट त्यांचे कानावर घालण्याचें धैर्य होईना. मीं किती वेळ तरी त्याच्या तोंडाकडे एखाद्या वेड्याप्रमाणें सारखा पहात राहिलों.

मला त्यानें पुन्हा विचारलें, " काय, तिला इंग्रजांनीं कैद केलें का?"

त्या निस्पृह संन्याशाला संसारांत तेवढेंच एक मायाबंधन होतें.

मींः—छेः तिच्या पवित्र शरीराला कोणीही स्पर्श करूं शकला नाहीं.

तात्याः—मग तिची हकीगत सांगावयास तुम्ही एवढे कां भितां ? सांगा ती कुठें आहे तें ?

मीः—तें हृदयभेदक वृत्त कळवावयाला मीं अगदीं असमर्थ आहे.

तात्या (घाबरून):–काय हृदयभेदक वृत्त ?

मीः—होय. तें स्वर्गीयकुसुम दग्ध झालें ?

तात्याः—काय ? स्पष्ट बोला ?

मीः—तिचा पवित्र आत्मा या नश्वर जगांत राहिला नाहीं.

तात्या अगदीं स्तब्ध राहिला ! त्याचें तेजःपुंज मुखमंडळ अगदीं म्लान होऊन गेलें. तारानाथ या वेळीं आकाशांत मधूर हास्य करीत होता. वसुंधराही अगदीं आनंदांत बुडून गेली होती; पण तात्याला हें सर्व विश्व अत्यंत शोभाशून्य, उदास, सौंदर्यहीन आणि निस्सार वाटूं लागलें.

थोड्या वेळानें तो मला म्हणाला, "त्या वेळीं मैना येथेंच होती कां?"

मीः—होय. तिनें त्या वेळीं घरावर तोफेंचा मारा करूं नका म्हणून जनरल औटरॅमला मीं पुष्कळ विनविलें. सर टामस हेनेंहि त्यांना भीड घातली; इतकेंच नव्हे तर त्यांनीं व्हाइसरायाकडे तारहि केली; पण अखेर कशाचाच उपयोग झाला नाहीं. " नानाचें कोणत्याही प्रकारचें स्मारक राहूं द्यावयाचें नाहीं, असा विलायतच्या प्रधान व मंत्रिमंडळीचा हुकूम आहे आणि त्यामुळेंच येथल्या अधिकाऱ्यांला हें घर उद्ध्वस्त करणें भाग पडत आहे " असें जनरलनें सांगितलें.

तात्याः—पण पुढे मैनेची काय स्थिति झाली ?

मीः—नंतर जनरल औटरॅमनें तिला धरण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाहीं.

तात्याः—का ?

मीः—ती गुप्त मार्गानें कोणीकडे नाहींशी झाली.

तात्याः—पुढें काय झालें ?

मीः—पुढें कांहीं दिवसांनीं ती जनरल अउटरॅमच्या हातीं लागली.

तात्याः—कोणत्या प्रकारें ?

मीः—ती आपण होऊन त्यांच्या स्वाधीन झाली.

तात्याः—जनरल आउटरॅमनें तिला कांहीं शासन केलें ?

मीः—होय; पण कसलें भयंकर शासन तें ! छे, माझ्यानें नाहीं त्याचा उच्चार करवत !

तात्याच्या नेत्रांतून जणु कांहीं अग्निवर्षाव होऊं लागला ! तो म्हणाला, " सरदारसाहेब ! बोला ! बोला ! माझ्या प्रस्तरलुब्ध बनलेल्या हृदयाला तें आता बिलकुल भंग करूं शकणार नाहीं ! कसलें शासन तिला मिळालें ? "

मीः---तें पुष्प जिवंत जाळलें.

तात्याः---जिवंत जाळलें ! ईश्वराच्या-इंग्रजाच्या न्यायी अमलाखालीं एवढा अन्याय ! तुह्मी त्यांना या कामापासून परावृत्त केलें नाहीं ?

मींः---माझ्याकडून झाली तेवढी खटपट मीं केली. इतकेंच नव्हे तर तिला क्षमा करण्याविषयीं विलायतच्या मंत्रिमंडळाकडूनही तारेनें हुकूम आला होता; पण तो हुकूम तेथें पोहोंचण्यापूर्वींच त्या बालिकेचा देहांत झाला होता.

तात्याः---सरदारसाहेब, संपला येथचा माझा निवास ! त्या स्वर्गीय कुसुमामुळें मला हें कानपूर नंदनवनाप्रमाणें वाटत होतें; आणि त्याच कारणामुळें मी येथें रहात होतों; पण आतां काय ? आतां त्या पुष्पाच्या अभावीं मला हें स्थळ साक्षात् नरकाप्रमाणें वाटू लागले आहे. " पौर्णिमेच्या रात्रीं मी तुला येऊन भेटेन" असें मीं तिला वचन दिलें होतें आणि त्याचप्रमाणें आज येथें आलों; पण येथें काय राहिलें आहे ? देवतातुल्य बालिकेची रक्षा ! हाय ! ! ठीक आहे मी आतां येथून जातों.

मी---आपण येथून कोठें जाणार ?

तात्या---काशीला आणि तेथें इंग्रजाबरोबर भयंकर युद्ध सुरू करणार ! मैनेचा सूड घेण्यासाठींच मला ह्या कार्यास प्रवृत्त व्हावें लागत आहे. या युद्धांत आह्मांला विजय मिळून दक्षिणेंतून तरी निदान इंग्रजांना आम्ही हद्दपार करूं असा भरंवसा आहे. इतक्याउपरहि या युद्धांत जर आह्मांस अपेश आलें तर भारतवर्षावर स्वकीय लोकांची सत्ता राहूं नये असा ईश्वराचा संकेतच आहे असें मला कळून येईल व माझें समाधान होईल.

मी---आपण पुढें काय करणार ?

तात्या---या युद्धांत बहुतकरून माझा शेवट होईल.

मी---आमच्याजवळ सध्यां एकंदर सैन्य किती आहे ?

तात्या---सोळा हजार.

मी---किती हिंदु राजांचें सहाय्य आपणास मिळालें ?

तात्या---फारच थोड्या. माझ्या अपेक्षेप्रमाणें सहाय्य मिळालें नाहीं.

मी---झांशीहून कांहीं सहाय्य मिळालें ?

तात्या—नाहीं. कबूल केलें पण अजून मिळालें नाहीं. मी आज मैनेला घेऊन तिकडे जाणार होतों. पण आतां कांहीं त्याची जरूरी राहिली नाहीं. असो, आतां आपणास दुसरी एक विनंति आहे, आपण कृपा करून ज्या ठिकाणीं मैनाला जिवंत जाळलें तें ठिकाण मला दाखवाल काय ?

मी—तें ठिकाण येथून जवळच आहे. चला. मी आपणास हवें तर आतांच दाखवितों.

विषण्ण वदनानें तात्या मजबरोबर तें ठिकाण पहावयास निघाला. मैनाच्या सुंदर देहाची रक्षा अजूनही कायम होती. त्या स्थानाचें चुंबन घेऊन तात्या ह्मणाला, " **मैना, आज येऊन भेटेन असें मीं तुला वचन दिलें होतें त्याप्रमाणें मी येथें आलों आहें; पण तूं कोठें आहेस ?** "

तात्याच्या करुणाव्यंजक स्वरावरून तो अश्रुमोचन करीत आहे हें मीं ओळखलें. कितीहि बलवान् मनुष्यप्राणी असला तरी हृदयव्यथा कोठपर्यंत सहन करणार ? त्याच्या सहनशक्तीलाही कांहीं मर्यादा आहे ! भस्मीभूत झालेल्या मैनाच्या देहानें जणूं काय वायुमंडळांत संचार करून त्याला उत्तर दिलें. " मी आतां या जगांत नाहीं. तुमच्याकरितां माझा हा अवशेष ठेवून मी स्वर्गलोकीं, गेलें आहें. "

तात्याला जणूं कांहीं हें उत्तर ऐकावयास येऊन तो पुनः तिला उद्देशून ह्मणाला, " जगांत मला दोनच प्रिय वस्तु होत्या. एक तूं व दुसरी स्वदेश. त्यांपैकीं तुझा तर शेवट लागला ! आत्मा नाशिवंत नाहीं. तूं या वेळीं स्वर्गांत विहार करीत असशील हें मी जाणतों. तुझ्या देहाची जी ही राख मला दिसत आहे, ती नुसती अवस्थामात्र आहे. तुला मुक्ति देणारें हें स्थान मला अत्यंत पवित्र वाटत असून तुझ्या देहाची रक्षा मला आपल्या प्राणापेक्षांही प्रिय आहे. माझ्या देहांत प्राण आहेत तोंपर्यंत ही रक्षा मी सांभाळून ठेवीन. "

एवढें बोलून तात्यानें तेथली थोडीशी राख घेतली आणि ती व्यवस्थेनें आपल्या जवळ बांधून ठेविली. यानंतर त्यानें त्या भूमीला साष्टांग प्रणिपात केला. त्याच्या द्वितीय व्रताचें उद्यापन याच स्थानावर झालें !

थोड्या वेळानें तो मला म्हणाला, " सरदारसाहेब, मॅकेअरचें काय झालें ?"

मी—त्याच्यांत आतां फारच विलक्षण पालट पडला आहे.

तात्या—त्याची चौकशी झाली ?

मी—नाहीं.

तात्या—त्याला बहुतकरून फांशीची शिक्षा होईल ?

मी--हो. मलाहि असेंच वाटतें.

तात्या—त्याचा जीव बचवावयाचा तुम्ही प्रयत्न करा. त्याच्या पापाचें योग्य शासन त्याला ईश्वराकडूनच मिळूं द्या. पाप्याला आम्ही भयंकर शिक्षा करणें हा मला थोडासा अन्याय वाटतो.

मी—आपलें म्हणणें मला मान्य आहे. बरें सध्यां नाना कोठें आहेत ? आपणाला त्यांची कांहीं बातमी समजली आहे ?

तात्या—सध्यां ते जगदीशपुरांत आहेत. तेथचे राजे अमरसिंह यांचे बंधु कुवरसिंह यांना भेटून ते पुढें नेपाळांत जाणार आहेत. अर्थात वेष पालटूनच ते प्रवास करणार.

मी—पण सध्यां नानाच समजून एका माणसाला पकडलें आहे आणि तो नानाच असावा असें बहुतेक सगळ्या सरकारी अधिकाऱ्यांना वाटतें तो माणूस कोण ? माझा मुळींच या गोष्टीवर भरंवसा नाहीं.

तात्या--तो एक नानाचा अनुचर आहे. नानाच्या सांगण्यावरून तो आपखुषीनें सरकारी अम्मलदाराच्या स्वाधीन झाला.

मी--पण असें करण्यांत नानाचा काय फायदा होता ?

तात्या—त्यांना पकडण्यासाठीं इंग्रजांचे गुप्त पोलीस सध्यां चोहोंकडे पसरले असून त्यांचा डोळा चुकवून पळून जाणें नानाला अशक्य झालें आहे. अशा स्थितींत असा एखादा तोतया त्यांच्या पुढें केला म्हणजे त्याला पळून जायला अनायासें संधि मिळेल.

मी--बरें तोतया आहे असें सिद्ध झाल्यावर ?

तात्या--तोंपर्यंत नाना येथें रहातो कशाला ? चौकशी होऊन खरें बाहेर पडावयाला बरेच दिवस लागतील. तेवढ्या अवधींत तो नेपाळाला जाऊनही पोहोंचेल.

मी—ही एक नानाची युक्ति आहे ह्मणावयाची.

तात्या—यांत काय संशय !

यानंतर तात्या मैनेच्या रक्षेकडे सतृष्ण नेत्रांनीं पाहूं लागला. या वेळीं त्याच्या डोळ्यांत अश्रु आले; पण ते माझ्या दृष्टोत्पत्तीस येऊं न देतां त्यानें ते हळूच पुसलें आणि मला म्हटलें, "सरदारसाहेब, मी आतां आपला निरोप घेतों."

मी—बरें युद्ध संपल्यावर आपली भेट होईल !

तात्या—हे ईश्वराच्या मर्जीवर अवलंबून आहे.

लौकरच तात्या निघुन गेला. त्याची माझी पुन्हां भेट झाली नाहीं ! तात्याचा शेवट कसा झाला हें इतिहासवाचकांना माहीत आहेच."

प्रकरण ३७ वें.

दैवाचा खेळ.

(मिस् रोजची कहाणी.)

"बालपणापासूनच मी दैववादिनी आहें. नशिबांत जें लिहिलें असेल तें टळत नाहीं, या गोष्टिवर माझा तेव्हांपासून भरंवसा. आपणास जें काय सुखदुःख भोगावयाचें असेल तें ईश्वरानें अगोदरच आपल्या कपाळावर लिहून ठेवलेलें असतें. तेव्हां या बाबतींत हर्षाविषाद मानणें वेडेपणाचें आहे, असें माझें अगदीं ठाम मत आहे.

माझ्यावर किती तरी भयंकर प्रसंग कोसळले ! पण याबद्दल मीं कोणालाही दोष दिला नाहीं ! किंवा कधीं घाबरलेंही नाहीं. सर्व सुखःदुःखपूर्ण घटनांचें कारण भावितव्यतेवर लोटून मी नेहमीं स्वस्थ चित्तानें असे. माझ्याविषयीं स्टिफनला नेहमीं संशय येई—मी जेम्सवर अनुरक्त आहें असें त्यांना वाटे; पण ही त्यांची चूक होती; पण याहून दुःखाची गोष्ट ह्मटली म्हणजे त्यांची ही गैरसमजूत दूर करावयाला ते मला मुळींच संधि देत नसत ही होय. युद्धाच्या आरंभींच त्यांना कानपूरच्या

किल्ल्यांत आणून ठेविलें होतें. त्या वेळीं त्यांना शत्रूंनीं जखमी केल्यामुळें ते बेशुद्ध स्थितींत होते. मी नेहमीं त्यांच्या शुश्रुषेंत असे. या अवधींत दुरात्मा जेम्स एकवेळ माझ्या भेटीला आला होता आणि कर्म-धर्म-संयोगानें स्टिफनही याच वेळेला शुद्धीवर आले होते. त्यांच्या कानावर जेम्सचे शब्द गेले आणि त्यांना माझा संशय आला. मला यामुळें अतिशय वाईट वाटलें; पण ते भ्रमांत असतील असें समजून मी स्तब्ध राहिलें.

त्या दिवशीं त्यांचा ज्वर अतिशय वाढला होता. डॉक्टरनेंही त्यांचें पुढें हात टेकले. तथापि मी मात्र दैवावर हवाला ठेवून एकनिष्ठ मनानें त्यांची रात्रंदिवस शुश्रुषा करीत होतें. त्या वेळीं ते सारखे बरळत होते आणि त्यांतील पुष्कळ भाग माझ्यासंबंधीचा होता.

योग्य औषध योजना आणि शुश्रुषा यांच्या योगानें ते लौकर बरे झाले आणि एके दिवशीं मजकडे पाहून मला म्हणाले " तूं कोण आहेस ? "

हा रविवारचा दिवस होता.

त्यांचा प्रश्न ऐकून मीं म्हटलें, " मी कोण आहें हें समजून आपणास काय करावयाचें ? आपण चांगलें झालांत म्हणजे मी कोण आहें हें आपोआप आपणास कळून येईल. "

स्टिफनः—पण तुझा आवाज परिचित माणसासारखा दिसतो आहे. मला जरा तो स्पष्ट कळत नाहीं.

मीः—आपण उगीच निजा. फार बोलल्यानें रोग वाढण्याचा संभव आहे.

यानंतर संध्याकाळपर्यंत ते पडून होते; पण संध्याकाळीं त्यांनीं पुन्हां बोलावयास सुरवात केली, ते म्हणाले, " रोज, कुठें आहे हें तुला ठाऊक आहे ? "

मीः—तिजजवळ आपलें काय काम आहे ?

स्टिफनः—काम कसलें ? ती माझ्या दृष्टीसमोर येऊं नये अशी माझी इच्छा आहे.

मी स्तब्ध राहिलें. त्यांना स्वतःची ओळख देण्याविषयीं डॉक्टरानें मला मनाई केली होती. त्यानंतर दोन दिवसांनीं ते चांगले शुद्धीवर आले. त्यांचा आजार उलटूं नये म्हणून तेव्हांपासून मीं त्यांच्या खोलींत

जावयाचें बंद केलें. हळु हळु स्टिफन खोलींतल्या खोलींत फिरूं लागले. ते अगदीं खडखडीत बरे झाल्यावर एके दिवशीं मी त्यांच्या भेटीला गेलें. पण ते मजशीं कांहींच न बोलतां स्वस्थ पुस्तक वाचीत पडले! ते चांगलें झालें हें पाहून मला किती तरी आनंद झाला. त्यांच्या वरचें माझें प्रेम तसेंच असीम होतें. त्यांचें गांभीर्य किती आहे हें ठरवावयास मी समर्थ झालें नाहीं. मीं त्यांना म्हटलें, " ईश्वरकृपेनें आपण बरें झालां याबद्दल मला अतिशय आनंद वाटत आहे."

पण या वेळीं देखील ते कांहींच बोलले नाहींत. मला या गोष्टीनें अतिशय दुःख झालें.

मीं पुन्हां त्यांना म्हटलें, " माझ्या हातून न कळत एकादा गुन्हा घडला असेल तर त्याची आपण मला क्षमा करा. मी आपल्याला पदर पसरतें."

यानंतर ते अत्यंत रुक्ष स्वरानें म्हणाले, " क्षमा कोणाला करावयाची? तुला! पण तूं जरी अपराधी असलीस तरी तुला क्षमा करावयास मला काय अधिकार आहे!"

त्यांच्या हृदयांत मजविषयीं आतां प्रेम राहिलें नाहीं हें मीं ओळखलें आणि म्हटलें, " आपण आतां पूर्वींप्रमाणें प्रेम कां करीत नाहीं?"

स्टिफनः—" माझा पहिला भ्रम नाहींसा झाला ह्मणून!"

मीः—एखाद्यावर आरंभीं प्रेम करावयाचें आणि नंतर त्याचा निष्कारण त्याग करावयाचा ही गोष्ट आपल्याला योग्य दिसते कां?

स्टिफनः—तुझ्यावर प्रेम करण्यांत माझ्या हातून मोठी चुक झाली.

त्यांचे हे शब्द ऐकतांच माझ्या मस्तकावर वीज पडल्यासारखें झालें. ज्यांना मीं आपलें सर्वस्व अर्पण केलें होतें, हृदयस्थ ईश्वर समजून ज्यांची मी निरंतर आराधना करीत होतें आणि ज्यांच्या प्रेमळ भाषणानें आणि वर्तनानें मी संसारांतील सगळीं दुःखें विसरत होतें, त्यांचे तोंडचे शब्द.

थोड्या वेळानें ते अगदीं संतापून म्हणाले, " यापुढें तूं मला तोंड दाखवूं नकोस!"

मला आपलें अश्रु आवरणें अशक्य झालें! मीं रडत रडत त्यांना

म्हटलें, " ठीक आहे. आपल्या मर्जीप्रमाणें करत्यें; पण एकाद्याच्या हातून जर न कळत अपराध घडला असेल तर त्याला मुळींच क्षमा नाहींच, कीं काय, हेंच अखेरचें मला आपणास विचारावयाचें आहे. "

स्टिफनः—न कळत अपराध घडला असेल तर क्षमा आहे; पण जाणूनबुजून अपराध करणारास क्षमा कसली ?

मला आतां माझा हृदयावेग आवरणें अशक्य होऊन मीं एकदम त्यांच्या चरणावर लोळण घेतली. आणि आपल्या अश्रूंनीं तें न्हाणीत न्हाणीत म्हटलें " हृदयेश्वरा, दासीला क्षमा करा. "

या करुणवाणीचा त्यांच्या हृदयावर परिणाम झाला. त्यांचा शुद्ध झालेला प्रेमप्रवाह पुन्हां जोरानें उचंबळून ते म्हणाले, " लाडके रोज, रडूं नकोस. "

त्या वेळीं त्यांनीं माझें दोन्ही हात आपल्या हातांत घेतले होते !

पण हाय रे ! दुर्दैवा ! याच वेळीं बाहेरून कोणी दुष्टानें, "रोज, पर-पुरुषाबरोबर असा व्यवहार करणें चांगला कां ? ध्यानांत ठेव. तूं मला वचन दिलें आहेस ? " असे शब्द उच्चारिले.

स्टिफनच्या कानावर हे शब्द येतांच त्यांनीं मला लाथेनें दूर झुगारलें आणि म्हटलें, "पिशाच्चिनी ! दूर हो ! तुझ्या शरीराला स्पर्श करणें देखील पाप आहे ! "

थोड्याच वेळानें मी भानावर येऊन पहातें तों खोलींत स्टिफन नसून हंसत असलेला जेम्स मात्र दारांत उभा आहे ! हें भीषण दृश्य पाहून माझ्या हृदयाचा कांप झाला ! "

प्रकरण ३८ वें.

आशेचा संचार.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

" आज कित्येक दिवस झाले. स्टिफन पुन्हां आजारी पडले. मनोवृत्तींचा एकाएकीं क्षोभ झाल्यामुळें त्यांचा आजार उलटला,

असें डॉक्टरांचें मत पडलें. त्यांना आतां किल्ल्यांतून घरीं आणून ठेविलें होतें.

स्टिफनच्या बाबतींत डॉक्टरांची बहुतेक निराशाच झाली होती आणि त्या दिवसापासून रोजहि त्यांच्याजवळ जाईनाशी झाली होती. याचें कारण मीं रोजला अनेक वेळा विचारलें; पण ती कांहींच उत्तर न देतां नुसते अश्रु गाळी. यावरून या दोघांत कांहीं तरी बेबनाव झाला असावा अशी मीं कल्पना केली.

गार्डनचा भ्रमिष्ठपणा दूर होऊन ते आतां चांगले झाले होते. अजून थोडीबहुत कसर होती; पण लौकर तीहि नाहींशी होऊन ते पूर्णपणें बरे होतील असें डॉक्टरानें आश्वासन दिलें होतें.

या खेपेला स्टिफनच्या शुश्रूषेची सर्व जबाबदारी मजवर आली होती; पण ईश्वरकृपेनें ते या खेपेला लौकरच दुरुस्त झाले. एके दिवशीं संध्याकाळीं ते मला म्हणाले, " आपणाला कुठें पाहिल्याप्रमाणें वाटतें."

मी हसून ह्मणालों, "मीं रामपाल आहें."

स्टिफन—सरदारसाहेब, मी आपल्याला प्रथम ओळखूं शकलों नाहीं याची क्षमा करा. मी सध्यां कोणत्या ठिकाणीं आहें ?

मी—गार्डनसाहेबांच्या घरांत.

स्टिफन—मला येथें कां आणलें ?

मी—किल्ल्यांत आपणास योग्य स्थळ नाहीं ह्मणून.

स्टिफन—मग मला दवाखान्यांत कां नाहीं पोंचतें केलें ?

मी—दवाखान्यापेक्षां हें स्थळ आपणास चांगलें आहे.

स्टिफन—अगदीं शंभरपटीनें का ?

त्याच्या या उपरोधिक शब्दावरून रोजचें आणि त्यांचें पूर्ण बिनसलें असावें याबद्दल माझी जवळ जवळ खात्रीच झाली ! मी थोड्या वेळानें त्यांना म्हणालों, " तुमची तबीयत जरा बरी होऊं द्या. मग आपण दुसरी स्वतंत्रच जागा घेऊं."

एवढें बोलून मी बाहेर पडलों. तों रोज दाराजवळ अश्रु गाळीत असलेली मला दिसली. मीं तिला एकीकडे नेऊन म्हटलें, " रोज, मी तुला वडिलासारखा आहें; मला न लाजतां खरें सांग. स्टिफनचें आणि

तुझें कशामुळें बिनसलें ? शक्य असेल तर तुमचा तेढ मिटवण्याचा मी प्रयत्न करतों.”

माझें हें भाषण ऐकतांच रोज एकाद्या लहान मुलीप्रमाणें माझ्याकडे पाहून मोठमोठ्यानें रडूं लागली.

\+ \+ \+ \+

स्टिफन आतां पूर्णपणें बरा झाला होता. त्याची आतां दुसरीकडे जाऊन रहाण्याची पिरपीर सुरू झाली होती; पण मीं तिकडे मुळींच लक्ष देत नव्हतों. गार्डनर्चीहि त्या गोष्टीला संमति नव्हती.

रोजनें मला एकंदर हकीकत कळवितांच स्टिफनचा संशय दूर करण्याचा मीं प्रयत्न केला; पण त्याचा कांहीं उपयोग होण्याचें चिन्ह दिसेना. तो मला स्पष्ट ह्मणाला, “जी गोष्ट मीं स्वतःच्या डोळयांनीं पाहिली तिजवर भरंवसा ठेवाल ह्मणून तुम्ही मला कसें सांगतां ? ”

मीं म्हटलें, “ आपल्या समजुतींत चूक झाली आहे. जेम्ससारख्या दारूबाज आणि दुराचारी माणसावर रोज सांप्रतहि प्रेम करणार नाहीं. तिच्याजवळ असलेल्या धनाच्या लोभामुळें तिला आपल्या हस्तगत करून घेण्याविषयीं त्या नीचाचे प्रयत्न चालले आहेत. आपण जो प्रकार डोळयांनीं पाहिला ह्मणून म्हणतां तो सगळा त्याचा कारस्थानी खेळ आहे. रोजकडे त्याचा कांहीं दोष नाहीं. ती बिचारी जन्माची अभागिनी असून आपल्याला तरी ती साक्षात देवाप्रमाणें मानते इतकें असूनहि आपण तिला क्षमा करीत नाहीं याचा अर्थ काय ? ”

स्टिफन--आपल्याविषयीं माझे मनांत पराकाष्ठेचा आदरभाव असल्यामुळें मी आपल्या शब्दावर विश्वास ठेवतों. पण मीं जें पाहिलें तें सगळें त्याचेंच कारस्थान होतें असें एकादें प्रमाण मिळेल तर बरें होईल.

मी--रोज आपल्या प्रेमाभावीं रात्रंदिवस तळमळत आहे हेंच याचें प्रमाण !

स्टिफन--पण ती त्याची वाग्दत्तवधू नाहीं ही गोष्ट तरी निदान पुराव्यानें सिद्ध व्हावी.

मी--ठीक आहे. यासंबंधींचा भरपूर पुरावा मी तुह्मांस देतों.

याच दिवशीं संध्याकाळीं, "अबदुल छद्मवेषानें कानपुरजवळ आला आहे." अशा आशयाची लक्ष्मणप्रसादाची चिठ्ठी मला मिळाली. त्याबरोबर मीं स्टिफनकडे जाऊन त्याला म्हटलें, "कांहीं जरूरीच्या कामाकरितां मला बाहेर जावें लागत आहे. मी लौकरच परत येतो. तोंपर्यंत तुम्ही येथेंच रहा."

त्यावर तो ह्मणाला, "ठीक आहे. मी आपल्या बाहेर नाहीं."

जातां जातां घडलेला सर्व वृत्तांत मीं रोजला कळविला. तो ऐकून तिला पुष्कळच धीर आला आणि तिचें मुखमंडल पहिल्याप्रमाणें प्रफुल्ल दिसूं लागलें. तिच्या आनंदानें मलाहि आनंद झाला.

प्रकरण ३९ वें.

संदेहभंजन.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

"तात्याला निरोप देऊन मी घरीं आलों. यावेळीं उजाडलें होतें. मॅकेअरचा खटला आजच निघणार होता. थोडासा उपहार केल्यानंतर मी स्टिफनच्या भेटीला गेलों. मॅकेअरला पकडल्यानंतर तर माझी ही पहिलीच भेट होती.

गार्डनच्या घरांत शिरतांक्षणींच रोज मला भेटली आणि ह्मणाली, "आज मॅकेअरच्या खटल्याची तारीख आहे वाटतें."

मीः—हो. स्टिफन कोठें आहेत? बरेच दिवस मी त्यांना भेटलों नाहीं. आतां त्यांचें डोकें ठीक आहे ना?"

रोज (हंसून):—आतां जरासे ताळ्यावर आल्यासारखे दिसतात; पण संशयपिशाच्च मधून मधून डोकं वर्तेच.

मी—तुझें त्यांचें कांहीं बोलणें झालें?

रोजः—साधारण झालें.

मी तिच्याबरोबर स्टिफनच्या खोलींत गेलों. त्यांनीं आह्मां दोघांचेंही आदरपूर्वक स्वागत केलें. गृहस्थ आतां जरा बराच निवाळल्यासारखा

दिसला. थोड्या वेळानें तो मला म्हणाला, " मॅकेअरला पकडून ब्रिटिश साम्राज्याची तुम्ही बरीच मोठी सेवा केलीत. "

मी:--आणि हेलनच्या वधाचाही सूड घेतला.

स्टिफन:--याबद्दल आम्ही आपले अत्यंत ऋणी आहोंत.

मी:--आज खटला पाहावयाला तुम्ही याल का ?

स्टिफन:--रोज आली तर येईन.

मी:—(रोजला उद्देशून) का आहे का यायचा विचार ?

रोज:—आमची आज साक्ष होईल कां ?

मी:—नाहीं. आज फक्त त्याची जबानी होईल.

रोज (स्टिफनला उद्देशून):–आपली जाण्याची इच्छाच असेल तर मीहि येईन.

त्या दोघांचें आपोआप जुळलेलें पाहून मला त्या बाबतींत व्यर्थ " बीचमे मेरा चांदभाई " करण्याची आवश्यकता दिसली नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांना एकांत देणें आवश्यक आहे, असें मला वाटून मी तेथून बाहेर पडलों. जातां जातां कोर्टांत दहाच्या सुमारास या म्हणून मीं त्यांना कळविलें.

मी तेथून बाहेर पडतांच रस्त्यावर जेम्स उभा असलेला मला दिसला. मीं त्याच्याजवळ जाऊन त्याला म्हटलें, " जेम्स, तुजवळ कांहीं काम आहे. "

जेम्स:—कसचें काम ?

मी:—तूं स्टिफनचा प्रतिस्पर्धी आहेसना ?

जेम्स:—कोणत्या बाबतींत ?

मीं:—रोजच्या बाबतींत.

जेम्स:--हें आपणांस कसें कळलें ?

मी:--स्टिफनकडून.

जेम्स:--मग त्याची वाटाघाट करून आपणास काय करावयाचें ?

मी:—माझा यांत थोडासा डांव आहे. स्टिफननें मला एका बाबतींत फसविलें. त्याचा सूड मला उगवावयाचा आहे.

जेम्स (हंसून)–पण सध्यां तर तुम्ही मला फसवीत नाहींना ?

मी गंभीरपणानें म्हटलें, " शीक लोक कधीं कोणाला फसवतात ? मी अगदीं खरें बोलत आहें.

जेम्सः—त्यानें आपणांस कसें फसविलें ?

मीः—एका कामगिरीबद्दल दोन हजार रुपये द्यावयाचें कबूल करून पुढें नाकबूल झाला.

जेम्मः—या बाबतींत आपण कसा सूड घेणार ?

मीः—तूं जी योजना काढलीस असशील तिचाच मीं उपयोग करणार आहें.

जेम्सः—मीं त्याला ठार करण्याचें ठरविलें आहे.

मीः—हें जरा जास्त होतें. शिवाय त्या योगानें आपल्या स्वतःच्याही प्राणाला धोका बसण्याचा संभव आहे.

जेम्सः—मग कशा रीतीनें सूड उगवावा ह्मणता ?

मी!—त्याची आणि रोजची कायमची ताटातूट होईल अशी एकादी युक्ति काढ. हें शासन फार भयंकर आहें.

जेम्सः—मीही त्याच धोरणांत आहे.

मीः—रोज तुझी कोण आहे ?

जेम्मः—मामेबहीण.

मीः—तिचें तुजवर प्रेम आहे ?

जेम्सः—नाहीं. तिचें सगळें प्रेम त्या चोरावर आहे. माझ्याकडे डोळा उचलून देखील बघत नाहीं.

मीः—तूं तिजजवळ कधीं आपलें प्रेम व्यक्त केलें होतेंस ?

जेम्सः—होय पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

मीः—तूं सध्यां येथें कशाला आलास ?

जेम्सः—मी रोज सकाळसंध्याकाळ येथें येत असतों.

मीः—कशाकारितां ? रोज तर तुला कांहीं भेटत नाहीं.

जेम्सः—ती न भेटली तरी निदान स्टिफनचा संशय दृढ होईल.

मीः—तुझा हा उद्देश सफळ होणार नाहीं असें मला वाटतें ?

जेम्सः—कां बरें ? तुमची चुक आहे. स्टिफन दिवसानुदिवस संशयांत गुरफटूं लागला आहे.

मीः—तुझी ही कामगिरी जर मीं ताबडतोब सिद्धीस नेली तर काय बक्षित देशील बोल.

जेम्सः—स्टिफननें जितक्या रुपयांना तुम्हांस फसविलें त्याच्या दुप्पट देईन.

मीः—ठीक आहे. आतां प्रथमः मी कोणतें काम करूं ?

जेम्सः—मी एक पत्र देतों तें रोजला नेऊन द्या.

मीः—त्यांत काय लिहिलें आहे ?

जेम्सः—त्याच्याशीं तुह्मास काय करावयाचें आहे ? हें मी स्वतःच्या नांवानें न लिहितां तिच्या एका मैत्रिणीच्या नांवावर लिहीत आहे.

मीः—तिची ही मैत्रीण कोण ?

जेम्सः—जार्ज हामिल्टनची मुलगी.

मीः—ठीक आहे. पण माझी दुसरी ही अट तुला कबूल केली पाहिजे.

जेम्सः— ती कोणती ?

मीः—या बाबतींत माझ्याखेरीज परभारें तूं कोणतेंहि काम करावयाचें नाहीं.

जेम्सः—ही तुमची अट मान्य आहे.

मीः—आतां मला संध्याकाळीं येऊन भेट.

जेम्स निघून गेला. त्याच्या मागोमाग मीहि आपल्या घराकडे प्रयाण केलें. त्यांच्याशीं माझें जें भाषण झालें त्यावरून रोज पूर्णपणें निर्दोषी आहे, हें मला कळून आलें. आतां या बाबतींत स्टिफनला खात्री पटेल इतका पुरावा द्यावयास मला अडचण राहिली नाहीं.

मॅजिस्ट्रेटकोर्टांत मॅकेअरचा मुकदमा निघून त्याची कोर्टमार्शलद्वारी चौकशी व्हावयाचें ठरलें. माझ्या सांगण्याप्रमाणें रोज आणि स्टिफन हीं उभयतां हा खटला पाहावयाला आलीं होतीं. त्यांचीं मुखें अगदीं प्रफुल्ल दिसत होतीं. त्यावरून त्यांच्यातलें मनोमालिन्य नाहींसें झालें असी माझी कल्पना झाली. त्या दिवशीं संध्याकाळीं जेम्स मला कबूल केलेल्या रकमेपैकीं विसाराचे एक हजार रुपये घेऊन आला. मीं कांहीं सबब काढून ते त्याच्याजवळ तसेच आणखी दोन दिवस राहूं देण्याचें सांगितलें.

———

प्रकरण ४० वें.

मॅकेअरची कहाणी.

(रामपालसिंहाची आत्मकथा.)

कोर्ट मार्शलच्या बैठकीला सुरवात झाली. तिच्यांतील मुख्य न्यायाधीश जॉर्ज हामिल्टन होते. न्याय कोर्टांत माणसांची खूपच दाटी झाली होती. प्रमुख नागरिकांत रोज, स्टिफन, गार्डन वगैरे मंडळी दिसत होती. बारा वाजल्यानंतर मॅकेअरच्या जबानीला आरंभ झाला. रीतीप्रमाणें शपथ घेतल्यावर " माझें नांव रॉबर्ट मॅकेअर, माझा जन्म फ्रान्स देशांतल्या केन नांवाच्या शहरांत सन १८१६ जून महिन्यांत झाला. माझ्या पित्याचें नांव हेनरी फौलर मॅकेअर. हे फारच संपन्न असून नेपोलियन बोनापार्टीच्या हाताखालीं मेजरचें काम करीत होते. सम्राटाला याचे गुण चांगले आवडत होते.

मी चांगला विद्वान् व्हावा अशी त्यांची इच्छा असल्यामुळें त्यांनीं मला तेथल्या एका प्रधान विद्यापीठांत ठेवलें होतें. तेथें मीं वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत अभ्यास केला. लक्ष्यपूर्वक अभ्यास केल्यामुळें पांच वर्षांत पांच भाषा हस्तगत करून घेतल्या आणि परीक्षेंत पहिला नंबर घेऊन सुवर्णपदक पटकावलें !

माझे वडील प्राटेस्टंट होते; पण मला स्वतःला रोमन कॅथेलिक मत पसंत होतें. मी बाळपणापासून पापभिरु आणि धर्मपरायण होतों. नित्य ईश्वराराधना केल्याखेरीज मला जेवणही गोड लागत नव्हतें.

या वेळीं प्रख्यात वीरमार्शल यांच्या परिवाराशीं माझा परिचय झाला. त्याची धाकटी मुलगी एनी फारच सौंदर्यसंपन्न होती. फार काय पण त्या वेळीं सबंध फ्रान्स देशांत तिजसारखी रूपवान् आणि गुणवान् दुसरी कोणी होती, कीं, काय याची मला शंकाच आहे. हळु हळूं आम्हां दोघांचें प्रेम जडलें. मी तिला प्राणापेक्षांही प्रिय मानूं लागलों. तीही मजवर प्रेम करूं लागली होती; पण तें निराळे प्रकारचें असून मला त्याची त्या वेळीं कल्पना झाली नाहीं.

याच सुमारास एका इंग्रज तरुणाशीं माझा परिचय झाला. आम्ही दोघे एकाच ठिकाणीं रहात असून खाण्यापिण्यांतही असाच प्रकार चालू होता. मीं शपथ वाहिली असल्यामुळें त्या तरुणाचें नांव मला उघड करतां येत नाहीं.

सन १८१५ च्या वाटर्लूच्या युद्धांत मार्शलनें यांना राजद्रोही समजून ठार करण्यांत आलें. या वेळेपासून त्यांच्या दोघां मुलींचें संगोपन काऊंट लाली बार्थ या गृहस्थांनीं केलें. बार्थ आणि मार्शल यांचा अतिशय स्नेह होता.

बार्थ यांना एक मुलगा होता. याचें नांव जोसेफ. हा माझ्यापेक्षांही वडील होता. त्याचा एनीबरोबर विवाह व्हावा अशी त्याच्या बापाची इच्छा होती. आणि त्याप्रमाणें त्यांनीं खुद्द एनीलाही आपला मनोदय कळविला; पण ती त्या गोष्टीला राजी झाली नाहीं. ती ह्मणाली, "संसारांत लग्न ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. तेव्हां या बाबतींत पूर्ण विचार केल्याखेरीज मी कांहींच करणार नाहीं. आपला विवाह एनीबरोबर व्हावा अशी काऊंटप्रमाणेंच त्यांच्या मुलाचीही इच्छा होती. आणि त्या हेतूनें तो नेहमीं तिच्याबरोबर फिरे."

कांहीं दिवसांनीं मीं माझ्या बंधूंचा ऍनीशीं परिचय करून दिला; पण त्याचा परिणाम त्या उभयतांच्या प्रेमांत झाला! ॲनीनें आपलें हृदय माझ्या बंधूला अर्पण केलें आहे ही गोष्ट लौकरच माझ्या लक्षांत आली. आणि त्याबरोबरच मला त्यांच्याविषयीं पराकाष्ठेचा तिटकारा वाटूं लागला.

या भानगडीमुळें ॲनीवर प्रेम करणाऱ्या जोसेफच्याही मनांत माझ्या बंधूविषयीं वैर उत्पन्न झालें. मलाही जोसेफबद्दल कांहीं न वाटतां भावाचा राग आला! याचें कारण ती जोसेफशीं विवाह करणार नाहीं अशी माझी खात्री होती.

हें कांहीं असलें तरी माझ्या या दोघांही प्रतिस्पर्ध्यांना ठार करावयाचा मीं निश्चय केला. माझे विचार एकाएकीं इतके कसे भयंकर बनले हें आतां मला सांगतां येत नाहीं; पण यापैकीं निम्मे काम माझ्या भावानेंच उरकलें!

जोसेफनें आपल्या पित्याकडून आम्हां दोघां भावांना ॲनीजवळ येण्याची मनाई केली. यामुळें अर्थात माझ्या भावाचा संताप पराकाष्ठेला पोंचला आणि यद्यपि तो अत्यंत सच्चरित्र आणि धार्मिक होता तरी त्याला हा अनावर जुलूम सहन न होऊन त्यानें एके दिवशीं संधि पाहून जोसेफला ठार केलें! हा प्रकार माझ्या डोळ्यांदेखत घडला. आणि मीं मनांत आणलें असतें तर भावाची मान न्यायाधीशाच्या हातून फांसावरही लटकावतां आली असती; पण मीं तसें केलें नाहीं. याचें कारण ती आपल्या हातानेंच तोडावयाची मीं ठरविलें होतें!

जोसेफच्या खुनानें चोहोंकडे बरीच चळवळ उडाली. महाधूर्त पोलिस कमिशनर मि. फ्रॅंची यांनीं स्वतः या गुन्ह्याचा तपास लावण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली होती. यामुळें तर माझ्या भावाला फारच दहशत वाटूं लागली. आणि तो ॲनिला घेऊन तेथून पळून जाण्याचा उद्योगाला लागला. मीही त्याला ठार करण्याचे उपाय शोधूं लागलों. ॲनि दुसऱ्याची झालेली पाहणें माझ्या डोळ्यांना मुळींच शक्य नव्हतें. याच कारणानें मीं भावाला मारण्याचा संकल्प केला."

मॅकेअर याप्रमाणें जबानी सांगत आहे तोंच गार्डननें मला हळूच बोलावून घेतलें आणि म्हटलें, "मला बरें वाटत नाहीं. तुमची परवानगी असेल तर मी घरीं जातों."

मीं त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्याबरोबर मला अतिशय आश्चर्य वाटलें! त्यात इतकें परिवर्तन कां झालें हें मला कळलें नाहीं. मीं घाबरून त्याला म्हटलें "ठीक आहे, आपण येथेंच बसलें पाहिजे असें नाहीं."

गार्डन हे स्टिफनला घेऊन बरोबर निघून गेले व रोज, तेथेंच बसून राहिली.

मॅकेअर पुढें आपली हकीगत सांगूं लागला, "संधि मिळेल तेथें भावाला ठार करावयाचें असा माझा निश्चय झाला असल्यामुळें मी नेहमीं भरलेला पिस्तुल जवळ ठेवूं लागलों. तो दररोज सकाळ संध्याकाळ गुप्तपणें ॲनिला भेटावयास जाई. त्या वेळीं मीही त्याच्या मागें लपून छपून जात असे. अखेर एके दिवशीं संधि आली. एक व्यक्ति काळा पोषाक करून ॲनिच्या खोलींत घुसली. तो माझा बंधूच असला

पाहिजे. अशी माझी समजून होऊन मी त्याजवर पिस्तुल झाडलें. ती व्यक्ति मोठ्यानें किंकाळी मारून खालीं पडली आणि त्याबरोबर मी तेथून पळालों.

त्या घराच्या पाठीमागें बाग होता. त्याच्या भिंतीवरून मीं खालीं उडी मारली; पण दुर्दैवानें याच वेळीं पोलिसकमिशनर मि. फ्रॅंची हे त्या रस्त्यावरून जात होते. त्यांना माझा संशय येऊन त्यानीं मला जागच्या जागीं रोखलें आणि म्हटलें, "सरळ रस्त्यानें जावयाचें सोडून तूं भिंतीवरून का आलास ?"

मी अगदीं स्तंभित झालों. काय उत्तर द्यावें हें मला सुचेना. यामुळें तर पोलिसकमिशनरनीं मला दरडावून म्हटलें, "बोलत का नाहींस ? बोल ? तू कोण आहेस ?"

मीं म्हटलें, "क्षमा करा. एक रोगी अगदीं भयंकर स्थितींत आहे. त्याजकरितां औषध आणविण्यास मी जात आहें."

माझें हें भाषण ऐकून पोलिसकमिशनर म्हणाले, "तुझ्या बोलण्यावर माझा भरंवसा बसत नाहीं. हें काऊंट वार्टोचें घर आहे. तूं मजबरोबर आंत चल आणि कोण आजारी आहे तें मला पाहूं द्या."

बरोबर याच वेळेला घरांतून रोदनाचा ध्वनि निघाला. तो ॲनीचाच आहे हें मीं ओळखलें. तिचा प्रियकर मरण पावला हें समजून ती रडत असावी असें मीं अनुमान केलें आणि मला आनंद झाला; पण फ्रॅंचीकडे माझी नजर जातांच हा आनंद मावळला !

आतां पळून जाण्याखेरीज उपायच राहिला नव्हता; पण फ्रॅंचीनें माझा हात धरला असल्यामुळें हाहि उपाय अंमलांत आणणें मला अशक्य झालें ! तथापि माझें डोकें कांहीं कमी क्लृप्तिबाज नव्हतें ! मीं आपल्या हातांतलें पिस्तुल जोरानें फ्रॅंचीच्या डोक्यावर मारलें आणि तो तें चोळीत उभा आहे तोंच मीं तेथून पलायन केलें.

दुसरे दिवशीं काऊंटवार्टोचा खून झाल्याची बातमी माझ्या कानावर आली ! हें असें कसें झालें ? मी आपल्या मनाशीं ह्मणालों, "काऊंटांनाच मीं भाऊ समजून मारलें काय ? हाय ! माझ्या हातून भयंकर चूक झाली व इतकें करून भाऊ पुन्हां जिवंतच ! "

आतां माझा तपास लावण्यासाठीं चोहोंकडे गुप्त पोलिस फिरूं लागले. मी आरंभीं कांहीं दिवस बापाच्या घरामध्यें लपून होतों. नंतर अनेक ठिकाणीं भटकलों. माझ्याप्रमाणें माझ्या भावाच्या पाळतीवरहि पोलिस आहेत असें मला पॅरीस येथें कळलें.

सुमारें एक महिन्यानें मला पोलिसांनीं बॅंचफोर्ट येथें गांठलें आणि तेथून पॅरीसला आणलें. या वेळीं मीं त्याला खरीखुरी हकीगत कळविली आणि फांसापासून माझा प्राण वांचविण्याची मीं त्यांना विनंति केली.

माझी ही विनंति सफळ झाली. केवळ माझ्या पित्याच्याच प्रयत्नानें मला फांशीची शिक्षा झाली नाहीं. मात्र काऊंटवार्टोचा खून करणारा मीच, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होऊन मला वीस वर्षें काळेपाण्याची शिक्षा झाली.

हें शिक्षेचें वर्तमान ऐकून माझे वडील आजारी पडले आणि त्यांतच त्यांचा अंत झाला आणि मीहि काळेपाण्यावर जाण्यापूर्वींच तुरुंगांतून पळून गेलों.

माझा बंधू ॲनीला घेऊन पळून गेल्याची बातमी मला पॅरीसमध्यें कळली होती. त्या वेळीं उभयतांनाहि ठार करण्याचा मीं पुन्हां निश्चय केला होता.

पोलिसनें माझा चोहोंकडे तपास केला; पण मी पुन्हां त्यांच्या हातीं लागलों नाहीं. यापुढें उपजीविकेसाठीं मला दरोडेखोरांचा धंदा स्वीकारावा लागला.

थोडक्याच दिवसांत मी फ्रान्सांतील एक नामांकित दरोडेखोर बनलों आणि मला हजारों अनुयायी मिळाले. हे लोक मोठे धूर्त आणि बलवान होते. हळुहळू माझा पराक्रम इतका वाढला, कीं, खुद्द फ्रेंच सरकार मला भिऊं लागलें आणि मला पकडण्यासाठीं मोठमोठीं बक्षिसें लाविलीं; पण त्यांचा हा सगळा प्रयत्न फुकट गेला.

अशा स्थितींत एक वर्ष गेलें; पण मी सरकारच्या हातीं लागलों नाहीं. सन १८५० सालीं मीं केन शहरच्या पोष्टावर दरवडा घातला. या ठिकाणीं रोकड आणि नोटा मिळून बरीच रोकड रक्कम मला

मिळाली. या वेळीं कित्येक पत्रें माझ्या हातीं लागलीं. तीं सगळीं मी क्रमाक्रमानें वाचूं लागलों. त्यांत माझ्या भावाचेंहि एक पत्र मिळालें. हें पत्र त्यानें आमच्या बहिणीस लिहिलें होतें. पत्रावरून ती हिंदुस्थानांत आहे, हें मला कळून आलें आणि त्यामुळें मला अतिशय आनंद झाला. ”

या सुमारास सरकारी बॅरिस्टर न्यायाधीशाला ह्मणाला, “ आरोपी प्रस्तुत खात्याशीं ज्यांचा संबंध नाहीं, अशा गोष्टी सांगण्यांत कोर्टाचा निष्कारण वेळ घेत आहे. त्याचें अद्‌भुत रसपूर्ण आणि भयानक चरित्र ऐकून घेण्यासाठीं कोर्ट येथें बसलेलें नाहीं. तेव्हां त्यानें या गोष्टी मागें ठेवून मुद्द्याचें काय असेल तेवढेंच सांगावें. आम्ही त्याच्यावर जो आरोप केला आहे तो त्याला कबूल आहे किंवा नाहीं हें प्रथम कळविणें त्याचें कर्तव्य आहे. तो जर त्याला कबूल नसेल तर तो आम्हीं पुराव्यानें शाबीत करावयास तयार आहों. ”

त्याचें हें भाषण ऐकून मॅकेअर म्हणाला, “ महाशय, क्षमा कर. मी जर सगळयाच गोष्टी कबूल करतों आहें तर तुमच्या पुराव्याची काय आवश्यकता ! सगळ्या आयुष्यभर मीं काय पापें केली आहेत तेव- ढ्यांचें जें ओझें माझ्या छातीवर बसलें आहे तें उतरावयास थोडी संधि मला द्या. शिवाय या योगानें मनुष्यजीवनांत कसें परिवर्तन होतें हेंहि लोकांना दिसून येईल. माझी ही हकीकत फ्रान्ससरकाराला कळवा आणि मलाहि तिकडे कृपा करून पाठवा. न्यायाधीशानें मॅकेअरला त्याच्या इच्छेप्रमाणें जबानी देण्याची परवानगी दिली. ते बॅरिस्टरला म्हणाले “ तो काय म्हणतो तें सांगूं द्या. विनाकारण कां अडथळा आणतां ! मला त्याची सगळी हकीकत खरी खरी दिसते. आणि प्रस्तुतच्या खटल्याशीं तिचा संबंधहि पण येऊन पोहोंचतो. ”

यानंतर पांच वाजल्यामुळें कोर्ट उठलें. पोलिसांनीं मॅकेअरला आणि अबदूलला बेड्या घालून परत तुरुंगांत नेलें.

मी घरीं येत असतांना रस्त्यांत स्टिफनची भेट झाली. त्यांची म्लान चर्या पहातांच माझ्या काळजांत धस्स झालें. तो मला म्हणाला, “ कांहीं महत्वाच्या कार्यासाठींच मी आपणाकडे निघालों होतों.

मीः—कोणतें कार्य ?

स्टिफनः--आपल्या सांगण्याप्रमाणें मीं रोजवर भरंवसा ठेवला पण–

मीः—(मध्येंच) या बाबतींत पुनः कांहीं बोलूंच नका. ज्या बालेचें हृदय स्फटिकाप्रमाणें निर्मल आहे, तिच्यावर तुम्ही भरंवसा ठेवला यांत अस्वाभाविक काय आहे ?

स्टिफनः—तिच्यासंबंधीं माझा संशय अजून दूर झाला नाहीं आणि आपणहि पुरावा दिला नाहीं.

मीः--तुम्हाला त्याची काळजी नको. मजजवळ भरपूर पुरावा आहे.

स्टिफनः--पण तुम्ही तो पुढें आणणार केव्हां ?

मीः--ज्या लुच्चा जेम्सनें आपल्या पोटांत विष कालविलें आहे त्यांच्याच तोंडून, हें सगळें कारस्थान त्याचेंच आहे, हें मी आपल्याला वदवून दाखवितों. रोजची प्राप्ती व्हावी म्हणून तो नीच तिला अतिशय छळीत असतो.

स्टिफनः--मला नाहीं खात्री वाटत.

मीः--पण आपली खात्री केली म्हणजे झालें कीं नाहीं ? आपण स्वस्थ असा. ती खरीच निर्दोष आहे.

स्टिफनः--बरें, जेम्सशीं आपण मघां काय बोलला ?

मीः--कोठें ?

स्टिफनः--गार्डनच्या घराजवळ.

मीः—सध्यां तुम्हाला त्याच्याशीं काय करावयाचें ? नंतर हें मी तुम्हाला सांगेनच !

स्टिफन खिन्नपणानें मान हालवून मजजवळून निघून गेला. हाय ! एकदां ज्याला संशयानें पछाडलें त्याच्या हृदयांत शांति, सौख्य, किंवा आशा यांचा लेशहि उरत नाहीं."

प्रकरण ४१ वें.

खटल्याचा दुसरा दिवस.

(सरदार रामपालसिंहाची आत्मकथा.)

आज देखील कोर्टांत माणसांची अतिशय गर्दी झाली होती. त्यांत गांवांतले प्रमुख लोकहि बरेच दिसत होते, मॅकेअरला—विख्यात फ्रेंच दरोडेखोराला पाहण्याचें सर्वांना जसें काय वेडच लागलें होतें. चांगल्या चांगल्या इंग्रजी वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनींही कोर्टाची थोडीबहुत जागा अटकावली होती. रोजनें आपल्याबरोबर एका मोलकरणीला आणलें होत. गार्डन आणि स्टिफन या दोघांपैकीं आज कोणीच दिसत नव्हतें.

बारा वाजण्याच्या सुमारास सशस्त्र पोलिसच्या पहाऱ्यांत मॅकेअरला कोर्टांत आणलें. त्याला पाहिल्याबरोबर लोक अगदीं त्याची पुढील हकीकत ऐकण्यासाठीं उतावीळ होऊन गेले.

मॅकेअरची जबानी सुरू झाली. तो म्हणाला, " पोष्टावर दरोडे घातल्यानंतर कित्येक महिन्यांनीं माझ्या अनुयायाच्याच विश्वासघातकीपणामुळें मी सरकारच्या हातीं लागलों; पण हे लोक गुप्तपोलिस होते हे मला पुढें कळलें. त्यांनीं मोठ्या शिताफीनें आमच्या कंपूंत प्रवेश करून घेतला. डोक्यांतही अजब कल्पना फ्रॅचीनेंच भरविली होती. असो. माझ्या असावधतेमुळें मला असा धोका बसला. तरी पण या खेपेलाही मीं पुन्हां सरकारच्या हातावर तुरी दिल्याच. चौकशी होण्यापूर्वीच मी तुरुंगांतून पळालों. या कामीं मला माझ्या खऱ्या अनुयायाचें बरेंच साह्य झालें. या पुढें मग फ्रान्सदेशांत राहण्यांत अर्थ नाहीं, असें समजून मीं हिंदुस्थानांत आलों. माझ्या या जीवनक्रमांत मीं फ्रान्समध्यें एकंदर दोनशें पंचाहत्तर माणसांचें खून केले. त्यांपैकीं पन्नास स्त्रिया आणि पस्तीस मुलें आणि बाकीचे पुरुष होते. त्यांचीं नांवें निशीवार यादी कोर्टांत दाखल करणें आवश्यक असेल तर ही घ्या. यांत त्यांच्या खुनाच्या तारखा आणि ठिकाणेंही टिपलीं आहेत. "

एवढें बोलून मॅकेअरनें न्यायाधीशाच्या टेबलावर एक कागद ठेवला; आणि पुढील जबानी चालूं केली.—

" हिंदुस्थानांत आल्यावर माझी आणि माझ्या भावाची भेट झाली कीं नाहीं हें कळविणें आवश्यक नाहीं. यापुढची हकीगत मी आतां कळवितों. **शिपायांच्या बंडांतील प्रमुख पुढारी मीच असून** इंग्रजांविरुद्ध लढावयाला अनेक हिंदुराजे तयार झाले यालाही कारण **मीच**. हिंदुस्तानामध्यें आपण फ्रेंच साम्राज्य स्थापन करावें हाच माझा प्रमुख उद्देश होता. ही गोष्ट सिद्धीस गेली तर फ्रेंच सरकार मला माझ्या मागील अपराधाची क्षमा करील असें मला वाटे. यापुढें दरोडेखोरपणा सोडून शांततेंत आयुष्य घालवावयाचें मीं ठरविलें होतें. माझ्या भावाची सूड घेण्याची इच्छा मात्र माझ्या हृदयांत अजून जागृतच होती.

महाराष्ट्रांतल्या एकदोन राजांनीं आह्मांला सहाय देण्याचें कबूल केलें होतें. धोंडोपंत नाना आणि तात्याटोपे यांच्याबरोबर बंडाची आग पेटविण्यासाठीं मी कानपूरला आलों. तेथें गार्डनची ओळख झाली. त्याच्या धाकट्या मुलीला मीं मागणी घातली; पण ती त्यानें आणि तिनें ही अमान्य केली. याच वेळीं मीं त्या उभतांचा सूड घेण्याचें ठरविलें. हेलनचें (न्यायाधीशास उद्देशून) आपल्या चिरंजीवावर—हेन्रीवर प्रेम होतें. हा काटा काढला तर ती आपलें ह्मणणें कबूल करील असें मला वाटलें, आणि मीं हेनरीला तिच्या नांवाचें एक खोटेंच पत्र लिहिलें. हें पत्र काय होतें हें आपणास ठाऊकच आहे. हुबेहूब तिजसारख्या अक्षरांतच हें पत्र लिहिलें असल्यामुळें हेनरीचीहि फसगत झाली; आणि त्यानें जीव दिला पण इतकें होऊनही हेलन मला कबूल झाली नाहीं तीं नाहींच. यामुळें मीं संतापून अखेर तिचाही खून केला ! या वेळीं ती गरीब बालिका डोळयांत आसवें आणून करुण वाणीनें ह्मणाली, " मला नकाहो मारूं ! नका मारूं ! " हाय तिचे हे शब्द अजून माझ्या कानांत घुमत आहेत ! पाप्याला प्रायश्चित्त कुठलें ? "

याच वेळेला लॉर्ड कॅनिंकडून एक तार आली. तींत पुढील मजकूर होता. " मॅकेअरच्या बाबतींत फ्रेंच सरकाराकडून एक खलिता आला आहे. त्यांत तहनाम्याच्या अटीप्रमाणें ब्रिटिश सरकारला त्याची चौकशी

करतां येत नाहीं; असें त्यांनीं आमच्या नजरेस आणलें. तरी ही तार पोहोंचतांच त्याच्या खटल्याची चौकशी बंद करून त्यांना रामपालसिंहा- बरोबर अगदीं बंदोबस्तानें चंद्रनगराला पाठवावें. तेथेंच त्याची चौकशी होईल; आणि त्याच न्यायकोर्टांत आमचा एक प्रतिनिधी राहील. गार्डनच्या मुलीच्या खुनाच्या बाबतींत रामपालसिंहाच्या साथीदाराचीही आवश्यकता असल्यामुळें त्यांना तिकडे पाठवावें लागत आहे. ”

यानंतर कोर्ट उठलें. मॅकेअरला त्याच रात्रीं चंद्रनगरला रवाना केलें. त्याजबरोबर मलाही जावें लागलें. अबदुलची चौकशी व्हावयाची असल्यामुळें तो तुरुंगांतच होता. ”

प्रकरण ४२ वें.

प्रेमाचा परिणाम.

(रोजच्या डायरीचा उतारा.)

“नशिबांत लिहिलेलें कधीं टळत नाहीं. मनुष्याचें क्षुद्र सामर्थ्य भवि- तव्यतेची तीव्र गती कशी रोकूं शकेल. मी सुखी व्हावें अशी विधात्याचीच इच्छा नव्हती. मग मनुष्याच्या इच्छेचा तिजपुढें कसा टिकाव लागावा ? तथापि या सर्व गोष्टीकडे लक्ष्य देऊन मीं संसारांतील एकंदर दुःखें अगदीं शांत मनानें सहन करीत होतें.

‘नीच जेम्स स्टिफनला मारावयास टपला आहे याकरितां त्यांना सावध राहण्याची सूचना दे ’ असें सरदार रामपालसिंहांनीं चंद्रनगराला जातांना मला सांगितलें होतें. त्याचप्रमाणें आमच्या घराकडे वरचेवर जाण्यावि- षयींहि त्यांनीं आपल्या अनुयायाला बजावलें होतें.

स्टिफनचें मन अजून मजविषयीं शुद्ध झालें नाहीं. हें त्याच्या वागणु- कीवरून मला कळत होतें. यामुळें मला अतिशय खेद होत असून मज- विषयींचा त्यांचा संशय कसा दूर होईल व ते माझे कधीं होतील ? हाच एक विचार रात्रंदिवस माझ्या मनांत घोळत होता. शक्य

असते तर मी आपलें हृदय देखील चिरून दाखविलें असतें; पण ही गोष्ट मानवी शक्तीपलीकडील होती! माझें हृदय इतकें शुद्ध असून त्यांनीं असा संशय घ्यावा! हा केवढा दुर्दैवाचा विचित्र खेळ! मला या विचारानें जेवण आणि झोंपहि गोड लागत नव्हती. अखेर माझ्या कपाळीं विधात्यानें हेंच लिहिलें असावें असें मानून मी स्वस्थ बसलें.

एकदां स्टिफन एकटेच असतांना मी त्यांच्या खोलींत गेलें. यावेळीं त्यांच्या हातांत एक फोटो असून त्याचें निरीक्षण करण्यांत ते गुंग झाले होते! तो कोणाचा फोटो आहे हें पाहण्याकरतां मला जिज्ञासा होऊन मीं हळूंच मागें जऊन पाहिलें पण—पण काय? त्यावर माझी नजर जातांच माझ्या सर्व अंगांवर रोमांच उभे राहिले; आणि माझ्या अंतःकरणांत आनंदाच्या लाटा उंचबळू लागल्या. देवा! हें काय मी पाहतें. संशयानें सगळें हृदय ग्रासलें असूनही प्रेमाचा प्रवाह अजून तसाच कायम आहेना. तो फोटो माझाच होता!

ते लाजतील किंवा त्यांचें मन खट्टु होईल ह्मणून यावेळीं मी त्यांच्याशीं कांहीं एक न बोलतां तशीच मागल्या पायीं परतलें आणि पुन्हां संध्याकाळपर्यंत त्यांचेकडे गेलें नाहीं. संध्याकाळीं त्यांची माझी भेट झाली त्यावेळीं ते कोठें बाहेर जावयास निघालें होते मी त्यांना विचारलें "कुठें जातां?"

यावर ते ह्मणालें "फिरावयाला"

मी——दासीचीं एक प्रार्थना ऐकावयाची.

स्टिफन—काय?

मी—जरा सावधपणानें फिरावें.

स्टिफन——कां?

मी——मत्सरग्रस्त एक दुष्ट आपला घात करावयाला टपला आहे.

स्टिफन——कोण तो?

मी—दुरात्मा जेम्स.

यावर ते खालीं मान वाळून म्हणाले, "कां बरें? मी तर त्याच्या सुखाच्या आड कधीं आलों नाहीं" याप्रमाणें मर्मभेदक वाक्याचा उच्चार

करून ते बाहेर पडले. या वेळीं मला किती दुःख झालें तें एक ईश्वराला ठाऊक ! तथापि त्यांना सुरक्षित घरीं आणण्याची मीं देवाला प्रार्थना केली आणि आपल्या खोलींत परतलें.

मी खोलींत आल्यावर विचार करीत बसलें. स्टिफननें माझ्या भाषणाकडे लक्ष दिलें नाहीं. याचें मात्र माझ्या मानापमानाच्या नव्हे तर त्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेंही अतिशय वाईट वाटलें. थोड्या वेळानें मोलकरणीनें माझ्या हातांत एक पत्र आणून दिलें. यांत पुढील मजकूर होता.

" प्रिय रोज. तुला कांहीं सांगावयाचें आहे. आताच्या आतां पार्कमध्यें येऊन भेट."

—मिस हॅमिल्टन.

माझ्या घरासमोरच पार्क होता. मिस हॅमिल्टन मला नेहमीं येऊन भेटे. माझी तिची लहानपणापासून मैत्री होती. हें पत्र तिचें नसेल अशी बिलकूल शंका माझे मनात आली नाहीं.

वाटेंत स्टिफनची भेट झाली. ते घराकडे येत होते; पण मजशीं मुळींच बोलले नाहींत. घरामध्यें पोहोंचले त्या वेळीं रात्रीचे नऊ वाजले असतील. मिस हॅमिल्टन ज्या ठिकाणीं मला भेटणार होती तिकडे मी गेलें; पण तेथें ती नसून तिच्या ऐवजी दुसरी एक व्यक्ती समोरून येत होती.

ही व्यक्ति जेम्स होय. त्याला पाहतांच माझ्या अंगाची लाही झाली; आणि याच वेळीं मिस हॅमिल्टनचें पत्र खरें नसून तें या नीचाचेंच कारस्थान असलें पाहिजे हें माझ्या लक्षांत आलें. आता मी तावडतोब घराकडे जावयास निघालें. इतक्यांत तो नीच मजपुढें येऊन उभा राहिला.

मीं त्याला तिरस्कारानें म्हटलें, " दूर हो नीचा. मला जाऊं दे. "

पण तो माझ्या भाषणाकडे बिलकूल लक्ष न देता म्हणाला, " रोज, मी तुझ्या सौंदर्यानें अगदीं वेडावून गेलों आहें ! मजवर प्रेम करावयाला आहेना तुझी तयारी ! बोल एकदां बोल ? "

मीः—आजन्मांत म्हणून तुमच्या विषयीं माझ्या मनांत प्रेम उत्पन्न होणें शक्य नाहीं.

जेम्सः—रोज ! इतकी निर्दय होऊं नकोस. या हतभाग्याची थोडी तरी दया येऊं दे. मी तुझ्या सौंदर्यानें अगदीं उन्मत्त बनलों आहें. तुझ्यापुढें एकंदर वस्तु मला तुच्छ वाटतात.

यानंतर मी त्याच्याशीं कांहीं न बोलतां मागें निसटलें; आणि दुसऱ्या रस्त्यानें बागेच्या बाहेर पडलें. जेम्स माझ्या मागोमागच होता. तो मला ह्मणाला, " रोज, या गोष्टीचा नीट विचार कर. ही बेपर्वाई अगदीं अक्षम्य आहे; आणि हिचें कटुतर फळ तुला चाखावें लागेल. "

मी त्याचे बोलण्याकडे लक्ष न देतां झपाट्यानें चाललें होतें. याच वेळीं स्टिफन एकदम मजपुढें येऊन उभे राहिले. ते एवढा वेळ एका झाडाच्या आड उभे होते. त्याचें सर्वांग या वेळीं थरथर कांपत होतें. त्यांची ती भीषण मूर्ति अवलोकन करून मीही कांपूं लागलें ! ते गंभीर स्वरानें मला ह्मणाले, " कोठें गेली होतीस ? आपल्या जाराकडे ! "

त्याचें हें भाषण ऐकून माझ्या मस्तकावर वज्र पडल्याप्रमाणें झालें ! हृदयांत ज्वाला उठूं लागल्या; आणि डोळयांत अश्रु येऊन सर्व जग अंधेरांत बुडाल्याप्रमाणें वाटलें; पण स्टिफन माझ्या अवस्थेची किंवा उत्तराची पर्वा न करतां तेथून निघून गेले ! मीही कपाळ बडवीत घराकडे आलें. " झालें. अभागी रोजची आणि स्टिफनची पुन्हां भेट झाली नाहीं. स्टिफन आपल्या नौकरीचा राजीनामा देऊन विलायतेस निघून गेले. ही बातमी तिनें कांहीं दिवसांनीं एका वर्तमानपत्रांत वांचली. "

उपसंहार.

मॅकेअरनें सर्व गुन्हे कबूल केल्यामुळें चंद्रनगरच्या न्यायकोर्टांत लौकरच निकाल लागला. न्यायाधीश त्याला देहांत शासन करणार होते; पण रोज, गार्डन, रामपालसिंह वगैरे मंडळीच्या विनवणीवरून त्यांनीं त्याला आजन्म काळया पाण्याची सजा दिली; आणि ती सजा भोगण्याकरितां त्याला ताबडतोब सुप्रसिद्ध सेंट हेलिना बेटांत पाठवून दिलें. तेथें तो

तीस वर्षें जिवंत होता; पण त्याच्या आयुष्यांत विलक्षण परिवर्तन होऊन गेले होते. तेथें त्याला सर्व लोक फादर एडमंड ह्मणत; आणि आपल्या आयुष्याच्या अखेरीस अखेरीस तो त्या बेटांतल्या प्रार्थनामंदिराचा प्रधान पाद्री बनला. त्याजविषयीं सर्वांना पराकाष्ठेचा आदर वाटत होता आणि त्यानें लिहिलेली प्रत्येक पुस्तकें अजूनही अनेक बड्या बड्या धर्ममंदिरांतून वांचलीं जात आहेत.

अबदूलचा खटला कानपुराच्या कोर्टांतच चालून त्याला फाशीची शिक्षा मिळाली. त्याच्या इतर अनुयायांसहि अशीच कडक शिक्षा मिळाली. जेम्स राजद्रोहीच होता. त्याला पकडण्यासाठीं सरकारनें पुष्कळ प्रयत्न केले. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तो कायमचाच नापत्ता झाला.

गार्डननें आपल्या व्यापाची वगैरे व्यवस्था लावून विलायतेला प्रयाण केलें. रोजंहि त्याजबरोबर तिकडे गेली. तिनें आपले राहिलेलें आयुष्य धर्माचरण आणि जनसेवा यांत घालविलें. पण पुढें स्टिफननें अखेर तिला क्षमा केली कीं नाहीं हें कळलें नाहीं.

धोंडोपंत नाना समजून अनेक निर्दोषी माणसें फांसावर चढविलीं. पण खरा नाना आणि जगदीशपुरच्या राजाचा भाऊ कुंवरसिंह हे दोघे केव्हांच निघून गेले होते. तात्या टोप्याचा शेवट कसा झाला हें सर्व इतिहासवाचकांस ठाऊक असल्यामुळें त्याचा येथें तूर्त उल्लेख करण्याची जरुरी नाहीं.

पण सरदार रामपालसिंहांना मात्र सरकाराकडून बरीच मोठी जहागीर आणि सन्मानपूर्वक अनेक पदव्या मिळाल्या. लक्ष्मणप्रसादाला पंजाबसरकारनें आपल्या गुप्त पोलिसखात्यांत सर्वांत श्रेष्ट अधिकाऱ्याची जागा दिली. आणि प्रिय वाचकहो, आमच्या कादंबरीचा तूर्त आम्ही येथेंच शेवट करतों.

समाप्त.

सूचना:—सरसवाङ्मयमालेच्या ज्या नव्या ग्राहकांस मालेचीं मागील पुस्तकें हवीं असतील तीं त्यानाच फक्त निम्मे किं. स मिळतील. (ट. ह. निराळें.) मात्र त्यांनीं र. नं. कळविणें.

बाई कुसुमावती!

(शेवटची वेल सुकली!)

लेखक—'संदेश'कार

श्रीयुत अच्युत बलवंत कोल्हटकर,

B. A. LL. B.

दोन शब्द.

' साठ वर्षांपूर्वी ' या कादंबरींत नानासाहेबाचा उल्लेख आला आहे. पण पुढें त्याचें काय झालें, याची जिज्ञासा वाचकांना असणें साहजीक असल्यामुळें व ती हकीगत प्रत्यक्ष त्यांचे बहिणीनेंच सांगितली असल्यामुळें आमचे सन्मान्य मित्र राजश्री कोल्हटकर यांनीं लिहिलेलें तद्विषयक लेखच येथें सादर केले आहेत.

मुद्रक:—केशव रावजी गोंधळेकर,

' जगद्धितेच्छु प्रेस, ' ४३२ शनवार पेठ,

पुणें शहर.

प्रकाशक:—तात्या नेमिनाथ पांगळ,

प्रोप्रायटर—सरस्वाङ्मयप्रसारक मंडळी, गिरगांव, मुंबई.

“ शेवटच्या पेशव्यांची कन्या–बाई कुसुमावती ! ”

शेवटची वेल सुकली !

चार वर्षांपूर्वीं पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरमध्यें ‘ तोतयाचें बंड चाललेलें होतें व त्यावेळीं एक वयस्क व्यक्ति दुसऱ्या मजल्यावर बसून तो ‘ खेळ ’ पहात होती ! ही व्यक्ति कोण बरें ? आणि ही व्यक्ति काय पहात होती ? ही व्यक्ति ‘ तोतयाचें बंड ’ पहात होती आणि किर्लोस्कर थिएटरमध्यें बसून हें ‘ बंड ’ ती पहात होती ! हें किर्लोस्कर थिएटर म्हणजे पूर्वींचा माणकेश्वरांचा वाडा होय व हे माणकेश्वर, नाना फडणीस वारल्यानंतर नाना फडणिसांचे जागीं मराठी राज्याचे झालेले मंत्री होत ! थोडेंसें पलीकडे गेलें, क्रिकेटचें एक दुकान, एक न्हाव्याचें दुकान व एक चहाकॉफीचें दुकान मध्यें टाकलें म्हणजे तेथें नानाफडणिसां‘चा’ वाडा लागतो ! मराठींतील षष्ठीच्या प्रत्यया, असें कां खोटें बोलतोस ? हा वाडा नानाफडणिसांचा कोठला ? आतां तेथें नानाफडणीस कोठें आहेत ? त्यांच्या वंशजांची सुद्धां त्या वाड्यावर आतां मालकी नाहीं !

* * *

त्या वाड्यांत, कीं ज्या वाड्यांत एके काळीं बारभाईचें प्रसिद्ध कारस्थान रचलें गेलें, ज्या वाड्यांत **राघोबादादाला कोठें कैदेंत ठेवावें** ह्याचा प्रथम विचार झाला, ज्या वाड्यांत मराठी राज्याच्या सुरक्षितपणाविषयीं अहोरात्र चिंतन चालत होतें व पलीकडे शनवारवाड्याच्या कारंजावर, सवाई माधवरावांची उडी पडल्याबरोबर ज्या वाड्यांत, कोणी न पाहतां, कोणाला न कळवितां, सर्वांपासून दडवून, अगदीं एकान्त स्थळीं, डोळ्यांतील अश्रुधारांचें प्रथम कारंजें उडालें त्या वाड्यांत, त्या नानाफडणिस(च्या)वाड्यांत षष्ठीच्या प्रत्यया, तूं इतका खोटें बोलणारा, इतका निर्लज्ज, इतका बेशरम आहेस कीं तुझें खोटें बोलणें चुकवावें ह्मणून तुझ्याभोंवतीं आह्मी पाटी तरी किती वेळ धरूं?–जा, नीचा,जा व खुशाल,त्या नाना फडणिसांच्या वाड्यांत असें ठांसून बोल—त्या नानाफडणिसांच्या वाड्यांत आतां पन्नास रुप-

यांवर " तुनुमुनु, तुनुमुनु " करणारीं मास्तरें, बारा वाजल्याची घंटा बडविणारे शिपाई व छडीच्या धाकानें खोटी सबब हुडकून काढण्यांत गर्क झालेलीं पोरें हींच आज वावरत आहेत !

*　　　*　　　*

कथानक तुटलें ! आम्हीं आपल्या वाचकांना आज जें कथानक सांगणार होतों तें कथानक तुटलें ! मध्येंच हीं न्हाव्याचीं दुकानें व मास्तरांचीं वाळकुंडीं " देहें " निघालीं ! पण चला, आपण आज तुटकेंच कथानक लावूं या ! हें कथानक तुटकेंच आहे, कारण जें जरासंधाच्या वज्रदेहाइतकें एके काळीं बेमालूम सांधलें गेलें होतें तें तुटल्याचेंच हें कथानक आहे ! होय, वाचकांनों, तें तुटलें तें तुटलें बरें ! तें तुटलें हें सांगण्याकरितांच आज हें कथानक लावलें आहे ! एक वयस्क मूर्ति नाना फडणिसांच्या वाड्यापासून फार दूर नसलेल्या माणकेश्वरांच्या वाड्यांत चार वर्षांपूर्वी " तोतयाचें बंड " पहात बसलेली होती ! त्या नाटकांत पेशव्यांचा वाडा आलेला होता. पांचपन्नास रुपयांवर तोंडाला रंग लावावयास कबूल असलेला एक माणूस त्यादिवशीं कानांत कुण्डलें घालून "नाना फडणीस" बनलेला होता व तितक्याच किंवा कांहीं कमीजास्ती रुपयांवर लुगडें नेसायला कबूल असलेला एक पुरुष त्या दिवशीं "पार्वती"बाई झाला होता—झालीं त्या नाटकांतलीं मुख्य पात्रें हीं दोनच. ह्यांशिवाय मग एक विठाई होती, एक बगम्भट होता, एक दौलतराव होता, त्याच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे ? तीं पात्रें सगळीं काल्पनिक—खोटीं ! आणि तो तोतया तर बोलूनचालून तोतयाच ! तो खरा कोठला ? त्या नाटकांत खरीं पात्रें अशीं मुख्यतः दोनच. एक पार्वतीबाई आणि दुसरें नाना फडणीस !

*　　　*　　　*

नाना फडणिसांच्या वाड्यापासून जवळच असलेल्या त्या माणकेश्वराच्या वाड्यांत बसून नाटक पाहणारी ती "वयस्क व्यक्ति" हें सर्व पहात होती ! ती नाना फडणीस पहात होती, ती पार्वतीबाई पहात होती. ती राकेलच्या फळ्यांचा व दीडदमडीच्या जर्मन रंगांचा बनविलेला शनिवारवाडाही पहात होती ! शनवारवाडा ? शनवारवाडा ? नाना फडणिसांच्या वाड्यापलीकडचाच चार पावलांवरला तो शनवारवाडा—शनवार-

वाड्याची कल्पना आल्याबरोबर त्या व्यक्तीच्या अंतःकरणांत चर्र झालें! खाण्डसानें चरके द्यावे त्याप्रमाणें त्या व्यक्तीच्या स्मृतीला चरके बसले! कर्वतीनें चरचर करवतावें त्याप्रमाणें त्या व्यक्तीची स्मरणशक्ति करवतली गेली! डोळ्यांपुढें अंधेरी आली! किटसनूचे दिवे असतांनासुद्धां डोळ्यांना दिसेनासें झालें! त्या व्यक्तीनें डोळे मिटले! कुलूप लावलेल्या गेटाप्रमाणें त्या घट्ट झांकलेल्या डोळ्यांच्या आंत अश्रुबिंदूंचा घोळका बाहेर येण्याकरितां डळडळत होता! पण डोळे इतके घट्ट मिटलेले होते, कीं, त्यांना बाहेर यायला मार्गच नव्हता!

*　　*　　*

इतर माणसेंही नाटक पहातच होतीं! एकदां नाना फडणिसांची तारीफ करावी, एकदां पार्वतीबाईची तारीफ करावी, एकदां त्या विठाबाईच्या 'ॲक्टिंग'वर खूष व्हावें, एकदा त्या बगम्भटाकरितां दांत काढावे, असें त्यांचें चाललेलें होतें. शनवारवाड्याचा 'सीन' काय हुबेहूब साधलेला आहे असें तीं आपआपसांत कुजबुजत होतीं. त्यांना वाटत होतें कीं, फळकुटांवर रंग दिला म्हणजे शानिवारवाडा होतो आणि कानांत कुण्डलें घातलीं म्हणजे नानाफडणीस होतो. शनवारवाडे व नानाफडणिस इतक्या सोप्या युक्तींत जर होत असते तर मग आणखी काय पाहिजे होतें? राकेलची प्रत्येक पेटी व मण्यांचा लोंबता लम्बक एवढ्या तयारनिंच जर नाना फडणीस व शनवार वाडा बनत असते तर नानाफडणिसांचा वाडा निदान त्यांच्या वंशजांकडे तरी कां न राहता व शानिवार वा–वा–वा–तुटलें, हें कथानक पुन्हां येथें तुटलें. हें कथानक आज कांहीं तडीला जात नाहीं बोवा!

*　　*　　*

ती व्यक्ति हें सारें पहात होती; पण छे, ती हें कोठून पहाणार? तिनें नाटक पहायला सुरवात केली व फळकुटांवरच्या शनवारवाड्यामुळें तिनें आपले डोळे घट्ट आंवळून घेतले. तिला कांहीं दिसेना. तिच्या डोळ्यांपुढें भयंकर अन्धारी आली आणि त्या अन्धारांत किट्सन् लाइटमुळेंसुद्धां तिला कांहीं दिसेना. तिनें मान खालीं घातली; गुडघ्यावर हात ठेवले व रात्र जशी सूर्याच्या गोलकाला दडविते त्याप्रमाणें आपल्या

पदरांत तिनें आपला गोल चेहरा दडविला. ती आपलें सर्व अस्तित्व विसरली. आजूबाजूच्या प्रेक्षकांचीही तिला जाणीव नाहींशी झाली. नाटकांतला एकही शब्द तिला ऐकूं येईना. सुम्म्. असा एकच आवाज, अन्धार हें एकच अस्तित्व व आयुष्य हें एकच ओझें तिला वाटूं लागलें. अशा स्थितींत तिला बाहेरचें नाटक कोठून ऐकूं येणार ?

* * *

पण हें बाहेरचें नाटक तिला ऐकूं येत असतें तरच बरें झालें असतें ! कारण हें बाहेरचें नाटक बन्द झाल्याबरोबर तिच्या अन्तःकरणांत जें एक नवें नाटक सुरू झालें तें फारच क्रूर होतें ! त्या नाटकानें तिचीं आंतडीं ओढलीं ! त्यानें तिला स्मरणाच्या यमयातना दिल्या ! बाहेर एक नाना फडणीस नरसोपंतांनीं लिहिलेलीं मोजकीं वाक्यें बडबडत होता! बाहेर एक धरमधसाडा लुगडें नेसून पार्वतीबाईचे अश्रु गाळीत होता ! पण आतां तिच्या अंतःकरणांत खरा नाना फडणीस आपल्या खऱ्या दिवाणखान्यांत बसला होता ! आंत खरी पार्वतीबाई खऱ्या शनवारवाड्यांत बसून टिपें मोजीत होती ! त्या वेळीं नानाच्या वाड्यांत न्यूस्कूल नव्हतें, नाना फडणीसच होते ! त्या वेळीं शनवारवाड्याच्या नवीन इमारती झालेल्या नव्हत्या ! शनवारवाडा आपले सर्व मजले सायसंगीन उभे करून तिच्या स्मरणांत थाटलेला होता ! आणि ते नाना फडणीस, ती पार्वतीबाई, त्या शनवारवाड्यांतून, त्या आपल्या खऱ्या भाषेंतून ह्या व्यक्तीला विचारीत होती कीं, " कुसुम, तूं एकटीच येथें कोठें ! "

* * *

जिवन्त माणसांनीं जिवन्त माणसांना प्रश्न विचारला ह्मणजे त्यांत कांहीं विशेष नसतें ! कारण जिवन्त माणसें त्यांची सहज वाट लावूं शकतात ! पण मेलेल्या माणसांनीं जिवन्त माणसांना प्रश्न विचारला ह्मणजे तो फार वाईट! कारण, त्या प्रश्नांतून कशानेंच सुटका होत नाहीं. तो प्रश्न त्यांचा सारखा पाठलाग करीत असतो. जिवन्त माणसें पाठीस लागलीं ह्मणजे त्यांना सहज झुकाण्डी देतां येते, कारण, एखाद्या अरुन्द वाटेंत अथवा एखाद्या आडव्या घरांत शिरलें ह्मणजे त्यांची चुकामूक पडते. परन्तु मेलेल्या माणसांचा पाठलाग फार वाईट ! कोणत्याही

गल्लींत शिरलें तरी तीं पाठीमागें असतातच ! आपण पळालों ह्मणजे तीं आपल्या मागें पळतात, आपण टांगा केला ह्मणजे तीं टांगा करतात आपण मोटारींत बसलों तर तीं मोटार करून आपल्यामागें धांवत येतात, आपण बांकावर बसलों तर तीं बांकावर बसतात, आपण खुर्चीवर टेंकलों ह्मणजे तीं आपल्याजवळ खुर्ची घेतात व कड्याकुलपें घालून आपण एकांतांत म्हणून जाऊन बसलों म्हणजे तीं बिनूपाय वाजवीत त्या कड्याकुलपांतून आपल्या जवळ येऊन आपल्याला असें विचारित असतांत कीं आम्हाला तूं कसें टाळणार ? त्या व्यक्तीचें–किर्लो-स्कर थिएटमधील त्या व्यक्तीचें—त्या दिवशीं तसेंच झालें! तिनें डोळे मिटल्यानंतर एकदम तीं सारीं मेलेलीं माणसें, तो उंच मानेचा नाना फडणीस, त्या झुरत असलेल्या पार्वतीबाई, तो पोटाचा कोथाळा बाहेर पडलेला नारायणराव, तो ' भाऊ, ' ' भाऊ, ' करीत ऊर बडविणारा नानासाहेब, तो थेऊर येथें कफ दाटलेला माधवराव—फार काय सांगावें? कारंज्यावर उडी टाकण्याच्या तयारींत असलेला तो सवाई पेशवा, हीं सारीं मेलेलीं माणसें तिच्याभोंवतीं जिवन्त झालीं व तिला, ' कुसुम, तूं एकटीच येथें कोठें ? ' असें तिला विचारीत सुटलीं !

* * *

पण एवढ्यावरच थाम्बलें नाहीं! ह्यापेक्षां आणखी पुष्कळ प्रकार झाले! पेशव्यांनीं पुण्यापासून ब्रह्मावर्तापर्यन्त प्रवास केला ह्मणजे आपली त्यांची संगति तुटते! मग आपण दयाळू इंग्रज प्रभूंचा अंमल पहावयास लागतों! लहान पोरांच्या डोळ्यांपुढून एखादें प्रेत उचलून नेलें,ह्मणजे त्यांची 'आई,' किंवा ' बाप, ' किंवा ' मामा ' किंवा ' काका ' तेथें सम्पतो ! पुढचे मसणवटींतील प्रकार त्यांच्या कोंवळ्या डोळ्यांना सहसा दिसूं देत नाहींत. पेशवाईचें असेंच झालें ! रावबाजी पुण्याहून ब्रह्मावर्ताला गेले कीं तेथेंच आपणास पेशवाई सम्पली ! मग पेशवाईचें प्रेत तिकडे मसणवटींत किती दिवस पडून राहिलेलें होतें व त्याला जमीनींत गाडलें कीं कोल्ह्याकुत्र्यांनीं फाडलें कीं तें तसेंच तेथें पडलें ह्याची आपल्याला वार्ताहि नव्हती !

* * *

पण ती किर्लोस्कर थिएटरमधील त्या दिवशींची व्यक्ति आपल्या-इतकी सुखी नव्हती. किंबहुना ब्रह्मावर्ताच्या अलीकडील इतिहास तिला जितका निकट होता, त्यापेक्षां ब्रह्मावर्ताच्या पुढील इतिहासाशींच तिचा संबंध जास्त आला! तिचा जन्म ब्रह्मावर्त येथें झाला व तिच्या जन्मा-पासून ती पदच्युत नृपतीची कन्या म्हणून मिरविली गेली! शहाजी राजाचें अपत्य असून पुढें शिवाजी होणें निराळें, हुमायूनचें अपत्य असून पुढें अकबर होणेंही बरें, एवढेंच नव्हे, तर नेपोलियनप्रमाणें साम्राज्य-सिंहासनावर नाचून अन्तकाळीं झोंपडींत मरणेंही पत्करेल, कारण, त्यांत स्वतःच वैभव मिळविलेलें असतें व तें स्वतःच घालविलेलें असतें. परंतु पदच्युत राजाच्या पोटीं येणें, वितळलेल्या सोन्याच्या पाळण्यांत हेलकावे खाणें, डिसमिस केलेल्या नोकरांचेकडून लाड केले जाणें, ह्या गोष्टीइतकी मानहानीची गोष्ट दुसरी कोणतीही नाहीं. परंतु किर्लोस्कर थिएटरमधील ती व्यक्ति अशा अपमानांतच जन्माला आली! तिनें जन्मापासून अपमान पाहिला, अपमान ऐकला व अपमान सहन केला! पूर्वींच्या राजवैभवाच्या हकीकती ऐकाव्या व ब्रह्मावर्तांत असावें, पूर्वींच्या अफाट सत्तेचीं वर्णनें ऐकावीं व स्वतः सत्ताहीनतेचा अनुभव घ्यावा, पूर्वींचा अटकेपासून रामेश्वरापर्यंत फडकलेला भगवा झेंडा ऐकावा आणि स्वतः फक्त ब्रह्मावर्तांत वेष्टिलेलें असावें, ही स्थिति अत्यन्त शोचनीय, अत्यन्त दुःखकारक, अत्यंत क्लेश देणारी होय! पण किर्लोस्कर थिएटर-मधील त्या व्यक्तीनें ही सर्व स्थिति प्रत्यक्ष सहन केलेली होती! एवढेंच नव्हे तर तो भाग्यहीन बाजीराव, त्याचा तो भाग्यहीन चिमाजी आप्पा, तो बंडखोर नानासाहेब, तो बंडखोर रावसाहेब, तो बण्डखोर तात्या टोपे व त्यांच्या बायका, त्यांच्या मुली, त्यांच्या सुना, ह्यांचा उडालेला हल-कल्होळ, किर्लोस्कर थिएटरमधील ह्या व्यक्तीनें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहि-लेला होता ही आमची व्यक्ति म्हणजे दुःखपर्यवसायी नाटकांतील शेव-टचा आकांत, करुण कहाणींतील शेवटची किंकाळी, अपशकुनी भवित-व्यतेची शेवटची गांजणूक होती! अशा ह्या व्यक्तीपुढें त्या दिवशीं, त्या "तोतयाचें बण्डा"चे दिवशीं, सर्व मराठी इतिहास पुन्हां जिवंत होऊन पुन्हां थडग्यांतून उठून, पुन्हां चितेवरून खडबडून कसा उभा राहिला

असेल व त्या व्यक्तीला त्या दिवशीं त्यानें किती भेडसावलें असेल ह्याची वाचकांनींच कल्पना करावी !

* * *

ही व्यक्ति कोण हें आतां वाचकांना सांगण्याची गरजच राहिली नाहीं. कारण, ज्यानें मराठी राज्य गमाविलें, ज्यानें महाराष्ट्राचा स्वराज्यसूर्य लोपविला, ज्यानें श्रीशिवाजी महाराजांच्या कीर्तीला कृतीला, व उपकारांना हरताळ फांसला त्या परम दुर्दैवी, परम अमंगळ परम सुतकी अशा शेवटल्या बाजीरावाची ही कन्या होय ! ज्याप्रमाणें श्री शिवाजी महाराजांनीं मराठी राज्य कमावलें ही गोष्ट आम्ही कधींही विसरणार नाहीं, त्याचप्रमाणें आमचे मराठी राज्य घालवावयास दुसरा बाजीराव कारणीभूत झाला ही गोष्टही आमच्या स्मरणांतून कधींही जाणार नाहीं. मराठी राज्याचा इतिहास प्रतापवन्त शिवाजी महाराजापासून सुरू झाला व प्रतापहीन बाजीरावापाशीं संपला ! मराठी इतिहासाचें पहिलें कव्हर शिवाजी आहे, व शेवटचें मलपृष्ठ बाजीराव आहे. तेव्हां कोणी कितीही आळशी वाचक असला तरी निदान पहिलें व शेवटचें कव्हर हें त्याच्या लक्षांत राहिल्यावांचून कधींही राहणार नाहीं. हीं दोन्हीं कव्हरें तांबड्या लालभडक रंगांत आहेत. पहिलें कव्हर पुण्यश्लोक शिवाजीच्या प्रतापांनीं खुललेलें आहे व शेवटचें कव्हर रावबाजींनीं उधळलेल्या विलासरंगांनीं रंगविलेलें आहे. दुर्दैव इतकेंच, दुःख इतकेंच, विलापाची शोकाची गोष्ट इतकीच कीं, रावबाजीशीं, "शेवटचा" हें उपपद कायमचें चिकटलें गेलें व "हाय हाय," ह्या उपपदाबरोबर स्मृतीचा बाण त्या व्यक्तीच्या हृदयांत कायमचा रोंवला गेला !

* * *

त्या दिवशीं किर्लोस्कर थिएटरमध्यें "तोतयाचें बण्ड" पहात बसलेली ही व्यक्ति त्या बाजीरावाची मुलगी होय ! हिचें नांव कुसुमाबाई व हें कुसुम ब्रह्मावर्ताच्या भाग्यहीन बागेंत उगवलें, भाग्यहीन बगीच्यांतच राहिलें व नुकतेंच भाग्यहीन रीतीनें भाग्यहीनपणांतच काशी येथें म्लान झालें ! ज्या शेवटच्या बाजीरावानें मराठी राज्याचा शेवट केला त्याच्या त्या कोणत्याही खऱ्या रक्ताच्या मराठ्याचें स्मरणांतून कधींही नाहींसा न

होणाऱ्या इ. स. १८१८ सालाचा पहिला शेंकडा ऐन संपण्याच्या वेळींच, म्हणजे १९१७ सालीं त्याची कन्या मृत्यु पावावी हा योगायोग खरोखर फार विलक्षण दिसतो. बाजीराव गादीवर आला तेव्हां तो ऐन पंचविशींत होता. तेव्हां ज्यानें सन सतराशेंच्या शतकाची पंचवीसतीस वर्षें उत्तम तऱ्हेनें पाहिलीं, त्यानें व त्याच्या कन्येनें मिळून सन अठराशेचें सबंध शतक मध्यें गडप करून शिवाय सन एकुणीसच्या शतकाचीं पहिलीं सतरा वर्षें पहावीं ही गोष्ट फारच लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बाजीराव जर आपल्या परमप्रतापी पंचम जॉर्ज बादशहांप्रमाणें भाग्यवंत असता व त्याची कन्या ही कुसुमाबाई जर भाग्यवन्तपणांत व्हिक्टोरिया चक्रवर्तिनी असती तर ह्या दोन व्यक्तींत बापांत व कन्येंत मिळून मराठ्यांच्या इतिहासाचीं दीडशें वर्षें सहज गेलीं असतीं. परंतु मराठी इतिहासाला तें भाग्य कधींही लाभलें नाहीं. मराठी इतिहासाच्या अल्पावधींत ग्रीक थर्मापिलीचे प्रसंग आहेत, रोमन् इतिहासाच्या हॅनिबॉलच्या स्वाऱ्या आहेत, मराठी इतिहासांत ट्यूडर–स्टयुअर्टच्या घराण्यांची जोड आहे. ह्या दृष्टीनें जगांतील कोणत्याही इतिहासापेक्षां मराठी इतिहास जास्त उद्दीपक, जास्त भरगच, जास्त देशभक्तिपूर्ण व जास्त पराक्रमी आहे. पण दुर्दैव एकसारखें हात धुऊन मागें लागल्यामुळें मराठी इतिहासाला त्यानें कधीं उसन्तच पडूं दिली नाहीं. अकबर, अवरंगजेब, व्हिक्टोरिया राणी, तिसरा जॉर्ज, चवदावा ल्युई, राणी क्याथेराईन ह्याप्रमाणें शिवाजी, राजाराम, बाजीराव, पहिला माधवराव, महादजी शिंदा ह्यांपैकीं मराठी इतिहासांत एक जरी "सेंचुरी बॅटर" निघता तरी मराठी इतिहास ज्या वर्षीं संपला त्या वर्षीं संपला नसता ! पण भगवन्तानें मराठी राज्यांतलीं सर्व रत्नें व माणकें अत्यन्त अल्पायुषी केलीं व पुढील भाग्यहीन व्यक्तींना एवढालीं आयुष्यें दिलीं कीं त्यांपैकीं फक्त दोघांमध्यें दीडशें वर्षें अटून गेलीं !

* * *

असो, पेशवाई संपल्यानन्तर पेशवे घराण्यांतल्या व्यक्तींचे काय काय धिंडवडे उडाले, ह्यासंबंधीं खुद्द कुसुमाबाईच्या तोंडून निघालेलें वृत्त आम्हीं आज दुसरीकडे दिलें आहे. कुसुमाबाईचें निधनवृत्त दोनचार दिवसा-

पूर्वी संदेशमध्यें प्रसिद्ध झालेंच आहे. हें निधनवृत्त १९१७ मध्यें—१८१८ चें शतक पूर्ण करणाऱ्या सालांतच-घडावें व पेशवाई घालविणाऱ्या पुरुषाच्या वंशांतील शेंवटची व्यक्ति पेशवाई बुडाल्यापासून बरोबर शंभराव्या वर्षीं नाहींशी व्हावी हा योगायोग आह्मांस फार विलक्षण वाटतो व त्याचा पुन्हां पुन्हां उच्चार केल्यावांचून आह्मांस राहवत नाहीं. पेशव्यांनीं पुणें सोडल्यापासून पेशव्यांच्या एकाही वंशजाचे पाय पुन्हां पुण्याला लागले नाहींत, फक्त १९१३ मध्यें ह्या कुसुमाबाई—हें त्यांच्या माहेरचें, ह्मणजे पेशव्यांच्या घरचें नांव, त्यांचें सासरचें नांव बयाबाई आपटे असें होतें—पुणें येथें आल्या व विशेष संस्मरणीय योग असा कीं त्याच वर्षीं "तोतयाचें बण्ड" हें नाटक प्रथमच रंगभूमीवर येऊन ग्रंथकारांच्या विनन्तीवरून त्यांनीं नाटक पहाण्यास येण्याचें उदारपणानें कबूल केलें! मराठी राज्य नामशेष झाल्यानंतर नाना फडणीसांच्या वाड्याची शाळा बनावी, माणकेश्वरांच्या वाड्यांत थिएटर यावें आणि पदभ्रष्ट पेशव्यांची कन्या तेथें पार्वतिबाईचें नाटक पहाण्यास बसावी ही करुणप्रसंगाची जुळणी इतकी कल्पनातीत आहे कीं प्रत्यक्ष शूद्रक अवतरला तरी त्याला इतके चमत्कारिक प्रसंग जमवितां यावयाचे नाहींत. पण नियति ही खरोखर करुण काव्यापेक्षांही ज्यास्त करुण काव्यांची कर्ती आहे, दुर्दैव हें विचित्र घटनाघटकापेक्षांही ज्यास्त विचित्र घटनांचें घटक आहे आणि परमेश्वर हा कोणत्याही कल्पनाबाज नाटककारापेक्षां जास्त कल्पक नाटककार आहे, ह्मणूनच त्याच्या दरबारीं असले अतर्क्य प्रसंग उद्भूत होतात! असले प्रसंग पाहिले ह्मणजे आश्चर्य करणें, स्तिमित होणें, थक्क होऊन जाणें ह्यापेक्षां आपणांसारख्या मर्त्यजीवांच्या हातांत काय आहे?

* * *

परन्तु आपण कितीही थक्क झालों तरी ज्या दुर्दैवग्रस्त स्त्रीचें, ज्या कुसुमाबाईचें ज्या भाग्यवान् पेशवे वंशांतल्या अभागी कुसुमचें, आयुष्य गेल्या आठव्यांत संपलें, त्याचेबद्दल शेंवटचें मनमुराद अश्रु गाळल्याशिवाय आपल्या स्वदेशभक्तीचें ऋण आपण बरोबर रीतीनें फेडलें असें ह्मणतां येणार नाहीं. कुसुमाबाई अप्रसिद्ध होत्या, कुसुमाबाईचा पिता हतभागी होता, चांडाळ होता, हें सर्व जरी खरें आहे तथापि श्रीशिवराजांच्या स्व-

राज्यांतील शेवटचा दुवा ह्यांमुळें त्यांचें महत्त्व, त्यांची किंमत व त्यांच्याविषयींची आदरबुद्धि हीं तिळमात्र कमी होत नाहींत. आज कुसुमाबाईचें चरित्र आपण आठवलें नाहीं ह्मणून आपल्याला कोणीही शासन करणार नाहीं, कारण, राज्य घालवलेल्या बापाची ती राज्यावर नसणारी कन्या होती ! ज्ञानप्रकाशनें तसेंच केलें ! रावबाजी ब्रह्मावर्तास वारले तेव्हां त्यांचें निधनवृत्त ज्ञानप्रकाशनें फक्त तीनचार ओळींतच दिलें. तेच रावबाजी जर पेशवाईवर असतांना वारते व त्यावेळीं जर ज्ञानप्रकाश हयात असता तर त्यांच्याकरितां हुंदके देतां देतां ज्ञानप्रकाशला पन्धरा दिवससुद्धां पुरले नसते ! पण आम्ही तर असें म्हणतों कीं, भाग्यहीनपणांत कुसुमबाई वारली ह्यामुळें तर त्यांच्यासंबंधानें शोक करण्याचें दुप्पट कर्तव्य आपणांवर येऊन पडलेलें आहे. आणि हें कर्तव्य जर आपण बजावणार नाहीं तर आपल्या देशभक्तींत ती एक विलक्षण उणीव राहून जाईल !

* * *

मराठी इतिहास ह्मणजे काय ? महाराष्ट्रीय मनुष्य ह्मणजे काय ? मराठा ह्मणजे तरी काय ? मराठा ह्मणजे शिवाजी, मराठा ह्मणजे राजाराम, मराठा ह्मणजे बाजीराव, मराठा ह्मणजे पानपतचा विश्वासराव ! स्वतःला मराठा ह्मणवून घेणारा मनुष्य हें जर नसेल, ह्यांची जर त्याला पदोपदीं आठवण न होईल, ह्यांच्या स्मरणांनीं अवगुंठित असें जर त्याचें आयुष्य न जाईल तर तो मराठा कसला ? शिवाजीनें महाराष्ट्र उत्पन्न केलें, शिवाजीनें मराठी इतिहास बनविला, शिवाजीनें "मराठा" चैतन्य उत्पन्न केलें, तेव्हां जो शिवाजीला व शिवाजीपासून बाजीरावापर्यन्त वाहिलेल्या इतिहासप्रवाहाला विसरेल तो हाडाचा मराठाच नव्हे ! तें रक्त, ती स्फूर्ति, तो देशाभिमान, तें सत्य जर आजच्या महाराष्ट्रीयांच्या अंगांत सळसळलें तर ते ' मराठा ' ह्या नांवाला योग्य. नाहींतर ह्या महाराष्ट्रांत त्यांनीं राहूं नये, कृष्णेच्या पाण्याला स्पर्श करूं नये, सह्याद्रिकडे पाहूं नये व विष्णुशास्त्र्यांनीं नटविलेल्या मराठी भाषेचा एक उच्चार त्यांनीं करूं नये ! शिवाजीपासून बाजीरावापर्यन्त, बाजीरावाच्या अलीकडे शिवाजी पावेतों ज्याची स्मृति, ज्याची भावना, ज्याची प्रेमबुद्धि सारंगीवरील काठीप्रमाणें इकडून तिकडे व तिकडून इकडे सारखी फिरत न राहील व

त्यांतून सारिंगीप्रमाणेंच देशभक्तीचीं मधुर गीतें न काढील तर त्यानें नांव बदलून ठेवावें, ' मराठा ' हें नांव कधींही विटाळूं नये !

* * *

किर्लोस्कर थिएटरमध्यें आपण कोणतेंही नाटक पहात बसलों तरी कुसुमाबाईप्रमाणें आपल्या स्मरणाला स्फुरण भरलें पाहिजे, आपल्या डोळ्यांपुढें पराक्रम आले पाहिजेत, आपण हातरुमालानें तोंड दडवून आपल्या अन्तःकरणाच्या रंगपटावर तो शिवाजी, तो सम्भाजी, ती येसूबाई, तो रामशास्त्री, तो चाफाजी, तो महादजी ह्यांनाच नाचावयास बोलावलें पाहिजे. थिएटरच्या बाहेरील पाटीवर शनवारबुधवारचा कोणताही खेळ लागलेला असो, आपल्याला त्यांत माणकेश्वराचा वाडाच दिसला पाहिजे. जातांना, येतांना, कार्य करतांना, विश्रांति घेतांना जर आपलें मराठी सत्य, आपलें मराठी देशप्रेम व आपलें मराठी वैभव आपणांस आठवलें तरच आपण आपल्या आईच्या पोटीं जन्मलों ! जो मनुष्य पुण्यांत पाय ठेवील आणि शिवाजीच्या स्मरणानें मुदित होणार नाहीं, जो मनुष्य बोलाईच्या पटांगणावर उभा राहील आणि आपल्यापुढें दुसरा उभा करणार नाहीं, जो मनुष्य पेशव्यांच्या शनवारवाड्यावरून जाईल व अन्तःकरणांत पूज्यबुद्धीनें थरारणार नाहीं तो मनुष्य नव्हे, ताजमहालापुढें उभें राहून फुर्र करणारें गाढव व असला मनुष्य ह्यांची योग्यता सारखीच !

* * *

आणि म्हणून पेशवेकुळांतली ही शेंवटली स्त्री मृत झालेली पाहून, पेशवेकुळांतली ही शेंवटली पताका खालीं पडलेली पाहून, पेशवेवंशवृक्षाची ही पालवी सुकून गेलेली पाहून आपण दुःखी झालें पाहिजे, शोक केला पाहिजे, अश्रूंनीं ही महाराष्ट्रभूमि नाहविली पाहिजे ! आज आपण शिवाजीच्या राजवटींत नाहीं. दयाळू पंचम जार्जांच्या राजवटींत आहों ! आज आपण भगव्या झेंड्याखालीं नाहीं, यूनियन् जॅकखालीं आहों ! आज आपण शिवाजीपासून बाजीरावापर्यंत नाहीं, तर क्लाइव्ह वॉरन हेस्टिंग्जपासून मॉण्टेगूच्या तीरातीरानें पुढें चाललेलें आहोंत ! काळ बदलला आहे. कर्तव्यांत पालट पडला आहे. भविष्यत्काल निराळ्या

स्वरूपाचा झालेला आहे. तरी पण कुसुमाबाईप्रमाणें लक्षांत ठेवलेंच पाहिजे कीं आपण श्रीमंताचे आहोंत, राजघराण्यांतले आहोंत, मराठा परंपरेंतले आहोंत ! फेरोजशहा मेथा, सुरेंद्रनाथ बानर्जी, चिन्तामणी, जिना ह्यांच्या परंपरेंतले आपण नाहीं! त्यांना ज्या गोष्टी पाहून तोण्डाला पाणी सुटत असेल त्या आपल्यालाही मिळाल्या तर उत्तमच, कारण, आपण कांहीं त्यांचें वैरी नाहीं, ते आपले देशबान्धवच आहेत ! पण जें पाहिलें असतां जिना, जिन्यावरून दडदड धांवत येतील, जिचें वर्णन करतां करतां ना. वॉच्छांना शेक्सपीयरची इंग्रजी वाचासुद्धां अपुरीच वाटेल जें मिळण्याचा लग्गा दिसला असतां चिन्तामणींना चिन्तामणि लाभल्या-सारखें वाटेल, त्याकरितां तसल्याप्रकारची सुरेन्द्रनाथी घिसाडघाई आप-ल्याला कधींच करायला नको ! आपण राजनिष्ठ, शान्त, गंभीर व धीराचे बनलें पाहिजे ! देशभक्ति, सत्यनिष्ठा, राष्ट्रीयपणा हाच काय तो आपला बाणा, व तेंच आपण चोवीस तास वाढवीत गेलें पाहिजे. हेंच, हेंच आपलें कर्तव्य ! महाराष्ट्रीयाला दुसरें कर्तव्य नाहीं ! कांग्रेस, प्रांतिक कमिट्या, एकोणीसांचा मसुदा, गोखल्यांची स्कीम, जिनांची योजना—हूं–चालूं द्या ! चालूं द्या हें सारें! वाच्छा व सुरेन्द्रनाथ त्यांत पटाईत आहेत, त्यांना त्यांत चोवीस तास गुन्तूं द्या. आह्मां महाराष्ट्रीयांना त्यांत कांहीं समजतच नाहीं! कोणत्या बैठकींत, कोणी निवडलेले, किती मेंबर घ्यावेत–छेः आम्हीं महाराष्ट्री यांनीं असले उखाणे कधीं सोडविले-लेच नाहींत ! आम्हांला एकच समजतें, तें काय? तर देशभक्ति ! चोवीस तास शिवाजी–रामदासांचें स्मरण करून व चोवीस तास इंग्रज सरकाराशीं राजनिष्ठ राहून, चोवीतास सत्य व चोवीसतास कायदा पुढें ठेवून, चोवीस तास राष्ट्रीय चारित्र्य व चोवीस तास सनदशीर कर्तव्यें, ह्यांचें पालन करून आम्ही महाराष्ट्रीय सत्तत्वाच्या श्रीमंतींत झुलत राह-णार! जर आम्हां महाराष्ट्रीयांना कोणी असें म्हणाले, कीं, जरा आमचे-कडे लक्ष देऊन, येथें आठच मेम्बर ठेवावे कीं नववा मेंबर आणखी घ्यावा एवढें सांगा तर आह्मी त्यांस वंदन करून एवढें सांगू, कीं, भाई, ह्या महाराष्ट्राच्या इतिहास–सिन्धूंत आह्मी डोकें खुपसून बसलों आहोंत, ज्यावेळीं त्यांत आह्मांला कुसुमाबाईसुद्धां दिसेनाशी होईल त्या वेळीं मी

तुला मेम्बराची फोड करून देईन, तोंपर्यंत मी स्वतःशीं सन्तुष्ट आहे, कीं, मी "महाराष्ट्रीय" आहें.

कुसुमाबाईच्या मुखांतून !

कुसुमबाईसाहेब ! कोण विलक्षण त्यांची ती स्मरणशक्ति ! त्या शाळेंत शिकावयास गेल्या नव्हत्या तरी पन्नास साठ वर्षीखालीं झालेल्या गोष्टी त्या अजून अजूनपर्यंत अशा अचूक सांगत कीं जशा कांहीं त्या कालच घडल्या ! कुसुमबाई साहेबांनीं जर प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी स्वतःच्या तोंडानें सांगून ठेवल्या नसत्या तर पेशवे ब्रह्मावर्तास गेल्यानंतर त्यांचें कसें काय झालें याचें वृत्त कोणासहि कळलें नसतें. एक म्हणतो, नानासाहेबांना फांसावर चढविलें दुसरा म्हणतो ते रशियांत गेले, तिसरा म्हणतो ते अफगाणिस्थानांत आहेत, चवथा तर्क करतो कीं ते अजूनहि हिंदुस्तानांतच कोठें तरी भ्रमन्ती करीत आहेत ! त्यांना इंग्लंदांत नेऊन एखाद्या वनगाईप्रमाणें किंवा कांगारूप्रमाणें पिंजऱ्यांत कोंडून ठेवलें आहे अशाहि गप्पा पिकावयास कोणी कमी करीत नाहीं ! पण कुसुमबाईसाहेबांनीं या वेळची हकीकत आपल्या तोंडानेंच सांगितली असल्यामुळें भलत्यासलत्या गोष्टीवर मुळींच विश्वास ठेवतां कामा नये. कुसुमबाईच्या स्मरणशक्तीची मौज अशी कीं त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी शकवार आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं तिथिसुद्धां बरोबर सांगितल्या आहेत. वाचकहो ! ही मनोरंजक हकीकत ऐकण्याची तुमची इच्छा असल्यास ह्या पहा कुसुमाबाईसाहेब बोलताहेत, समोरच आपले राजवाडे बसले आहेत. त्यांच्या शेजारीं कृश बांध्याचे कोण आहेत हें तुम्हांस माहीत नाहीं ? अहो, ते स्यतः काळोखांत राहून जगाला प्रकाशांत आणणारे राजवाड्यांचेच साहाय्यकर्ते आपले पांडुरंग नरसिंह पटवर्धन आहेत. ऐका तर कुसुमबाईच्या तोंडची हकीकत चांगली सावधान चित्तानें श्रवण करा:—

ब्रह्मावर्तास गेल्यानंतर बाजीराव पेशव्यास तीन कन्या झाल्या. त्यांतील एकतर जन्मतांच वारली; दुसरी योगाबाई. हिचा विवाह श्री. बापूसाहेब कुरुंदवाडकर याच्याशीं झाला; पण लग्न झाल्यानंतर दोनतीन वर्षांच्या आंतच

त्या मरण पावल्या या योगाबाई कधींच आल्या नाहींत. बाजीरावसाहेबांच्या कन्या म्हणजे कुसुमबाईसाहेब उर्फ बयाबाईसाहेब. ग्वालेर-लष्कर येथील बाबासाहेब आपटे यांचे चिरंजीव रावसाहेब यांस ह्या दिल्या होत्या. त्यांनीं आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस काशीस दुर्गाघाटीं राहून घालविले. त्यांचें सासरचें नांव सरस्वतीबाईसाहेब. ह्या अत्यंत नैष्ठिक, दयाशील आणि परम धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांना इंदूर व ग्वाल्हेर संस्थानांतून कांहीं वेतन मिळत असे. ह्या चार वर्षांखालीं दक्षिणेंत आल्या होत्या. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं त्यांस अत्यंत आग्रह करून एक क्षणभर 'तोतयाचें बंड' हें नाटक दाखविण्यास नेलें होतें.

"बाजीरावसाहेबांनीं ब्रह्मावर्तास गेल्यावर नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब असे तीन मुलगे एकामागून एक दत्तक घेतले होते, पैकीं दादासाहेब लौकरच वारले व त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी रोहिणीबाईसाहेब यांनीं पांडुरंगपंत ऊर्फ रावसाहेब यांस दत्तक घेतलें."

"बाजीरावांच्या मरणानन्तर त्यांचें आठ लाखांचें पेनशन् मिळविण्याकरितां नानासाहेबांनीं पुष्कळ खटपट केली, पण त्यांचें कांहीं चाललें नाहीं. नंतर "नाना गर्दी" यांनीं पेनशनचा नाद सोडून राज्य परत मिळविण्याचा खटाटोप चालविला, त्या प्रयत्नांची माहिती वाचकांस आहेच."

पण नानासाहेबांचा अंत कसा झाला यासंबंधानें कोणास माहिती नाहीं. ती कुसुमावतीबाई साहेबांनीं आपल्या मुखानें सांगितलीं आहे. "धामधूम झाल्यानंतर नानासाहेब कानपुर सोडून आपल्या परिवारासह अयोध्येस आले. तेथें तात्या टोपे यांची व त्यांची शेवटची गांठ पडली. नंतर ते उत्तरेंत नेपाळ प्रांताकडे गेले आणि तात्या टोपे पश्चिमेकडे गेले."

"नानासाहेब नेपाळाकडे गेले खरे, पण तेथें त्यांस कोणी आश्रय देईना. नेपाळच्या हद्दींत शिरावें तर तेथील राजांनीं त्यांस हुसकावून लावावें, इंग्रजांच्या हद्दींत यावें तर त्यांचेंही सुदर्शनचक्र रात्रंदिवस नानांच्या पाठीवरच असे. त्यांच्या जिवास अहोरात्र चैन म्हणून नसे. सुमारें चौदा महिनेपर्यंत त्यांना या हद्दींतून त्या हद्दींत व त्या हद्दींतून या हद्दींत असे गोते खात रहावें लागलें. शेवटीं या श्रमांनीं थकून ते "दिवखरी" नांवाच्या गांवीं गेले. तेथें त्यांस ताप भरला व त्यांतच त्रिदोष होऊन त्यांचा अंत झाला!"

"नानासाहेब तापानें बेशुद्ध होऊन पडले व नेपाळकरांनीं त्यांची गय न करतां आपल्या सीमेंतून निघून जाण्याची तंगी लाविली. तेव्हां नानासाहेबांच्या जवळच्या लोकांनीं तेथील माणसांच्या दोन तुकड्या केल्या. बायका होत्या त्यांची बिंदागी शेजारच्या एका खेड्यांत केली आणि नानासाहेब यांस पांच चार शेलक्या स्वारांनिशीं जवळच्या रानांत एका लहानशा ओढ्याच्या जवळ पाठवून दिलें. या ठिकाणीं थोड्याच वेळांत नानासाहेबांनीं आपला देह ठेविला!"

"या मंडळींनीं नानासाहेबांचें शव दहन केलें आणि अस्थि घेऊन बायामंडळी होती तेथें आले. त्यांत कुसुमाबाईसाहेब होत्या. नानासाहेबांची उत्तरक्रिया त्यांच्या देखत झाली.या वेळीं त्यांचें वय फक्त बारा वर्षांचें होतें."

"नानासाहेबांचा अशा रीतीनें अंत झाला. पुढें रावसाहेब आपला परिवार सोडून ग्वाल्हेरकडे चालते झाले. पण ते सियालकोटच्या जवळपास असतांना मराठे जातीच्या एका मनुष्यानें इंग्रजांस त्यांची बातमी दिली; ती लागतांच त्यांस पकडण्यांत येऊन फांसावर चढविण्यांत आलें! त्यांच्या पत्नीचीही अशीच कांहीं गत झाल्याचें ऐकिवांत आहे. पण नक्की कांहीं कळत नाहीं."

"नानासाहेबांच्या मरणानंतर बाजीराव साहेबांच्या दोन स्त्रिया, बाळासाहेबांची स्त्री, नानासाहेबांची स्त्री काशीबाई आणि बाजीराव साहेबांच्या कन्या कुसुमाबाईसाहेब एवढाच स्त्री परिवार जिवंत उरला. त्यास नेपाळ सरकारनें पुढें कोणताच उपसर्ग पोंचविला नाहीं. नंतर कांहीं दिवसांनीं ही मंडळी कटमंडूस गेली. तेथें त्यांनीं आपल्याजवळ होतें नव्हतें तें जडजवाहीर विकून आपल्या मालकीचा एक गांव विकत घेतला, व तेथें एक वाडा बांधला. ह्या **राणीगंज** गांवीं त्यांनीं रामाचें व लक्ष्मीनारायणाचें अशीं दोन देवळें बांधलीं. ह्या लक्ष्मीनारायणाच्या देवळांत **मराठ्यांचा भगवा झेंडा** आणि पेशव्यांची गादी त्यांनीं स्थापिली ती तेथें अजूनहि आहेत.

—संदेश, ता. २ सप्टेंबर १९१७.

संपूर्ण.

खास
जानेवारीत

ंभी [illegible] अविण [illegible]

अत्यंत हृदयं [illegible]

फसरचे [illegible]

छापील [illegible]

[illegible]